देवभूमी गोमंतक

— विनायक

[illegible]
28/12/92

देवभूमी गोमंतक

लेखक

विनायक नारायण शेणवीं धुमें

प्रकाशक

ऑल इंडिया सारस्वत फौन्डेशन

'वाग्देवी' ३६९-ब, सेनापती बापट मार्ग,

माहीम, मुंबई ४०००१६

"हे "देवभूमी गोमंतक" पुस्तक जशाचे तसे किंवा त्यातील सर्व लेख एकत्र करून निराळे पुस्तक छापण्यास मनाई आहे. पण, ह्या पुस्तकातील कोणत्याही फक्त एकाच देवालया संबंधीच्या माहितीचा लेख वेगळ्या, स्पेशल पुस्तक रूपांत त्या संबंधीत देवालयाची व्यवस्थापक मंडळी किंवा त्या देवालयाचे कुळावी महाजन यांना जर तसे पुस्तक छापून प्रकाशात आणण्याची इच्छा असेल तर त्यासाठी आमची पूर्ण संमती आणि परवानगी आहे. मात्र, तसे करणाऱ्यांना ह्या पुस्तकात स्पष्टपणे नमूद करावे लागेल की, तो लेख "देवभूमी गोमंतक" पुस्तकातून कॉपी करून घेतलेला आहे."

© ऑल इंडिया सारस्वत फॉन्डेशन

मुद्रक

शशिकांत ना. रेगे,
शर्वरी आर्टस्,
४२१ – अे मोगल लेन,
माहीम – मुंबई ४०० ०१६.

कव्हर फोटो

विलास भेंडे, मुंबई

कव्हर व आतील फोटो छपाई

सुमन आर्ट प्रिंटर्स,
प्रभादेवी, मुंबई ४०० ०२५.

पुस्तक मिळण्याचे ठिकाण

१) **ऑल इंडिया सारस्वत कल्चरल ऑर्गनायझेशन**
'वाग्देवी' २६९ – ब, सेनापती बापट मार्ग,
माहीम – मुंबई ४०० ०१६ दूरध्वनी – ४३७४९७५

२) **पॉप्युलर बुक डेपो,**
मुंबई ४०० ००७
दूरध्वनी – ३५९४०१

३) **बॉम्बे बुक डेपो**
राजा राममोहन रॉय मार्ग,
मुंबई ४०० ००५
दूरध्वनी – ३५६७६२

मूल्य ४० रुपये

देवभूमी गोमंतकांतील समस्त

देवदेवतांच्या चरणीं सादर समर्पण

The All India Saraswat Foundation is grateful to **Shri V. P. Acharya**, a Patron of AISCO and the Proprietor of Laxmi Decorators, Bombay and his family for kindly subsidizing the cost of publication of this book. It has enabled the publishers to keep the price of the book low @ Rs. 40/- so as to bring it down within reach of all readers.

॥ श्री ॥

ॐ ॥ 卐

अङ्कः ९५४

शके १९०९
दि. ३१/१०/८७

श्रीमत्परमहंस परिव्राजकाचार्य पदवाक्यप्रमाणपारावारपारीण यम-नियमासन प्राणायाम प्रत्याहार ध्यानधारणासमाध्यष्टांग योगानुष्ठान-गरिष्ठनिष्ठानादिगुरुपरम्पराप्राप्त निगमागमसार श्रुतिमार्गप्रकाशक सर्वतन्त्र स्वतन्त्र श्रीमज्जमदग्नितनुज तपस्स्वाध्यायाद्यर्थ विनिर्मित शूर्पारक महाक्षेत्र गोमन्ताचल गोमतीतीरसन्निहित कुशस्थलीनगर महामठादिप्रतिष्ठापनाचार्य सकलसुरमुकुटमणिनीराजित दिव्यश्री-भवानीशङ्करपादारविन्दाराधक श्रीमदात्मानन्दसरस्वतीकरकमलसंजात श्रीमत्पूर्णानन्दसरस्वत्यनुगृहित श्रीमत्सच्चिदानन्दसरस्वती श्रीपादैः

अस्मदत्यन्तप्रेमास्पदीभूत श्रीमदुमारमणचरणारविन्द भक्तिपरायण शिष्यवर्य

श्रीयाविराजित राजमान्य राजश्री शांताराम वेंकटराव पिकळे

अध्यक्ष ऑल इंडिया सारस्वत कल्चरल ऑर्गनायझेशन निवासिषु मुंबई

कृतनारायणस्मरणपूर्विकाशिषः समुल्लसन्त्वद्य शके १९०९ प्रभव नाम

संवत्सरे कार्तिक शु॥ ९मी स्थिर वासरावधि कैवल्य मठे, गोवा प्रांते

कुशलिनः स्मः भवदीयानामनामयत्वमनुदिनमेधमानमाशास्महे ॥ विशेषस्तु :—

प्रस्तुत आज्ञापत्रास कारण आपले दि. २३/१०/८७ च्या विनंती पत्र संस्थानीं मिळून आपण गोमंतकांतील कांहीं नामांकित आणि सुप्रसिद्ध देवस्थानाबद्दल ऐतिहासिक संशोधनपूर्वक श्री. विनायक नारायण शे. वी धुमे यांनीं लिहिलेले "देवभूमी गोमन्तक" नांवाचे एक पुस्तक प्रसिद्ध करणेचे ठरविले आहे इत्यादि मजकूर लक्षी आला, व समाधान वाटले. या पुस्तकाचे भाविक लोकांना फार उपयोग होईल यांत शंका नाही. तरी पुस्तक प्रकाशनाचे कार्य यथासांग निर्विघ्नपणे पार पडावे आपणां सर्वांस दीर्घायुरारोग्य लाभून आपणां सर्वांचें निरंतर कल्याण व्हावे, या विषयीं श्री संस्थानाराध्यदैवत श्री भवानी शंकर चरणीं प्रार्थना करून गंधप्रसाद पाठविला आहे. तसेंच श्री संस्थान देवतेचेही शुभाशीर्वाद आहेत. सुज्ञेषु किं बहुना लेखनेन शतिनी धणमाधवी

ALL INDIA SARASWAT CULTURAL ORGANISATION (AISCO) AND ALL INDIA SARASWAT FOUNDATION (AISF)

were inaugurated at Bombay in Dec. 1972 in the august presence of and with blessings from our revered Mathadhipatis



(L. to R.) H. H. Sudhindra Teertha Swamiji, H. H. Vidyadhiraj Teertha Swamiji, H. H. Sachidananda Saraswati Swamiji, H. H. Parijnyanashram Swamiji.

The aims and objects of AISCO & AISF are :

* Unity and solidarity of Saraswats of all denominations and promotion of spiritual culture of Saraswatism aimed at common welfare and universal brotherhood.
* Moral renaissance by a synthesis of our ancient tenets of Sanatana Dharma and impact of modern technology and urbanisation on our way of life.
* Propagation of our sacred symbol and crest — "Yajno Yajneyna Kalpataam"- a spirit of sacrifice or self-dedication for common good.
* Maintenance of communication with fellow Saraswats through our house magazine — "The Samyukta Saraswat" — posted free to members.

As the Federal Body of All India Saraswats, AISCO invites all Saraswat institutions and Temples to enrol as Institutional members and participate in the task of integration, co-ordination and championing the causes of the community, as often vindicated by AISCO successfully taking up issues with the Government and concerned authorities.

Introduction

It was an auspicious day, Monday of the month of Shravan. I was in Goa and had gone to Gowdapadacharya Math at Kavale to have darshan of His Holiness Sachchidanand Saraswati Swamiji. When I reached the Math, it was Puja time. The Swamiji was in a very relaxed mood and blessed me.

There was one more gentleman who had also come to have darshan of the Swamiji. He was Vinayak Narayan Shenvi Dhume, historian and author of many articles and books on the temples of Goa. Clearly, it was the wish of the Almighty that we should meet in the presence of His Holiness. Shri Dhume had mentioned to the Swamiji just a little before his writing of a new book on the temples of Goa. Swamiji was on the lookout for a publisher who could undertake the publication of this valuable work of a man who had grown old and would like to see, in all probability, his labour of love seeing the light of day during his life-time.

His Holiness said to me after giving his blessings, 'Pikale, you have arrived at a right time on an auspicious day. Here is a book you must publish. Generations will remember you and Dhume for this.'

I agreed at once, I did not wonder even for a moment about the pros and cons of a publishing venture. I thought : 'It is a labour of love for me too!' I brought the manuscript to Bombay and put before the members of the AISCO managing committee at the very next meeting. All, without exception, agreed and gave their consent to publishing this book under the auspices of the organisation, because it fitted in well with its aims and objects.

This is how this book came to be published by us and we have great pleasure in putting it in the hands of our readers.

For us — the Dakshinatya Saraswats- Goa is a Punyabhoomi, a 'Homeland' closely linked with our spiritual and social aspirations. From this holy land many of our forefathers had migrated to other parts of India to escape repeated and well planned persecution by the Portuguese and proselytisation by their missionaries. Those who remained had to pass through hell for generations together.

Although we are spread over the length and breadth of this vast country and although many of our families left Goa centuries ago, we still consider Goa as our source of spiritual aspirations, cultural tradition, and social heritage. Such is the irresistible hold of this land, such is its charm for us!.

Why is it so? What is it that keeps us bound to this place although some of us are thousands of miles away? I have often pondered over this phenomenon. One of the most important

factors, as I could reason out, is our linkage with our sacred temples. Most of our temples of Kuladevatas are in Goa. In spite of repeated persecution, our dauntless and farsighted ancestors protected our Kuladevatas from savage onslaughts, carrying them to remote places, hiding them from the iconoclasts and doing Punarpratishtha whenever and wherever possible. This only shows their perseverance and commitment to Dharma and to their way of life which was evolved over the centuries, and to their abiding love of their unique cultural heritage. Perhaps it is not an exaggeration if I say that there is no other example of this type and of this magnitude anywhere else in this country!

The temples of Goa are not just 'temples', they are veritable institutions in themselves. They were evolved under unique socio-economic conditions. I would like to elaborate the point a bit.

During the course of centuries, dating from the hoary past, Goa had developed two most valuable institutions — Mahajans and Gaunkars. The Portuguese called them Mazanias and Comunidads. Mazanias were associations of a religious nature and the Comunidads were agricultural and welfare associations. These institutions functioned side by side and in close concert with each other; the Comunidads to satisfy the material needs of the Gaunkars and the Mazanias to satisfy their spiritual aspiration, so says Rui Gomes Pereira, the celebrated Goan historian and writer. To quote him again : 'In pre-Portuguese period the comunidades were almost autonomous bodies which were self-sufficient, powerful and progressive. Comunidade embodied the concept of joint possession which the Gaunkars have on the village properties. 'In almost all villages it is seen that the main temple has always been founded by the Comunidade and that its Gaunkars are the Mahajans of the same temple. 'The Comunidades, as a matter of fact, were very keen on this and, therefore, a part of the best land in the village was usually reserved for the maintenance of the temple and its servants. The expenses of the construction of the temple were incurred by them. The expenses of the cult and maintenance of a large body of servants composed of Bhats (Pujaris, Puraniks, Abhishekis, etc.), carpenters, washermen, ironsmiths, potters, barbers, Devadasis (Kalavants and Bhavinis, musicians, Mahars, etc. were also borne by the above institutions.'

Temples were teaching institutions too. They were places not just of prayer but of meditation also. It is in these temples that decisions were taken, offences were judged, medicine and astrology were practised. 'All these activities were being carried out with the blessing of the patron deity.' Many devotees either in distress or embarking on ventures sought divine grace through oracles in the precints of temples.

'Besides this, they were also the only centres of many kinds of entertainment. Therein sang and danced the Devadasis to please the deity. Under the tutelage of this deity **natakas** (dramas) were held, the traditional festivals of Sigmo, Kalo, Zagor, Novem, Zatra, etc. all of them profusely coloured and full of excitement were celebrated.

As has already been mentioned, ruthless and repeated onslaughts by

the Portuguese with the active co-operation of Christian missionaries, thousands of temples were razed to the ground or converted into churches. People in large numbers fled Portuguese territory. Many of our ancestors did not just run away. They either took with them their deities or hid them temporarily only to re-establish them later.

At present the descendants of the founder members of these temples in Goa are spread far and wide in different parts of the country, many of them having settled in the Kanara districts, Kerala and Maharashtra. They make up the general body of the Mahajans of their respective family temples.

Although much of the earlier glory of these temples was either destroyed or usurped attachment to these temples which is deep rooted in a collective psyche of the people has not diminished or vanished.

Since ancient times temples have been the centres of Indian civilization of learning, ritual, amusement and social congregation. It was perhaps much more so in Goa. Temples in India are treasure-houses of art and sculpture. A. L. Basham, author of **The Wonder that was India** says: "…. though secular architecture was no doubt highly developed, it is clear that India's architects and masons devoted their greatest energies to temple building. Working according to strict traditions, but showing much ingenuity and originality within the main standardized pattern, they erected monuments of fantastic beauty with the simplest technical equipment. Many patient hands reared the Sikharas above the plain, and capped them with great slabs of stone, raised on enormous ramps of earth".

The ancient temples of Goa may not have been huge structures, but some of them were certainly of remarkable beauty. This has been affirmed by the very people who destroyed them. To quote Rui Gomes Pereira. 'In the vast art gallery that India is, Goa should have occupied a prominent place, had not the Portuguese destroyed all its temples, sparing none.'

The temples that we see today in Goa were built after peace had descended on Goa, that is, when the Portuguese realised their folly of driving out enterprising Hindus. The hidden images of deities were brought back or retrieved from their hiding places and temples were built with great patience and fortitude. Although all of the old glory could not be revived, many of the practices and systems were restored. People who had permanently settled in far-off places and could not come back to Goa for many a reason kept close contact with their temples. They did not forget their Kuladevatas although many of the migrated communities had built their own temples wherever they had settled. The spiritual bond never broke.

The temples of Goa, whatever their size, contain a variety of images of the Hindu pantheon.

Lord Shiva is the most venerated God in Goa. In all Shiva temples he is worshipped in the form of Linga some of which are of natural formation and others are hand-made. Saptakoteshwara, Mangesh, Nagesh Maha-

rudra, Kundeshwara, Kamaleshwar are some of the well-known Shiva temples.

Goddess Parvati is worshipped as **Shakti** who is greatly venerated all over Goa.

Devi Shanteri or Shantadurga is worshipped practically in every village of Goa. The worship of Goddess Mhalasa who is believed to be Narayani is also popular. The fierce forms of Devi worshipped in Goa are Mahishasuramardini, Chamunde, Ashtabhuja and Kali. Devi Durga is also worshipped in her aspects of Vijayadurga and Navadurga. The temple of Mahalaxmi at Bandiwade seems to have an ancient tradition. The goddess is considered to be the Sattvika form of Devi. The mother aspect of Devi is worshipped as Mahamaya.

Lord Vishnu is symbolised by the Shaligrama just like Lord Shiva is symbolised by the Linga. The Vaishnavite sect is very ancient. It was popularised by Srimat Madhwacharya in Goa. Lord Vishnu is worshipped in the form of Vittal, Damodara, Ramanath, Narayana, Anantha, Madhava, Pundalika, Pandurang, Krishna, etc.

Ravalnath is another popular deity of Goa. He is worshipped as a main or affiliate deity.

In addition to these Vetal Bhairav, Kalabhairav, Khetrapal, Veerabhadra, Bhumika and Vanadevi are also worshipped.

Lord Ganesh is very much venerated by all. Ganesh Chaturthi is one of the biggest festivals of Goa and is celebrated in all Hindu homes irrespective of caste and economic status.

Images of gods play an important role in the everyday life of India. 'Generally speaking, the image of the divinity is regarded as being merely an instrument to promote the worshipper's spiritual life.' The worship of images can be considered as a means to realise a spiritual end.

A Hindu temple can be looked upon as a microcosm of the world. 'Like Hindu civilization itself, the temple was at once voluptuous and austere, rooted in earth, but aspiring to heaven' and temples of Goa are no exception to this.

Having given a short introduction, I now invite readers to go through this fascinating book on the temples of Goa — 'Deva Bhoomi Gomantak' — written by one of the greatest temple authorities of our time, Vinayak Narayan Shenvi Dhume. I am very much aware that the book is in Marathi and this will limit its readership.

How I wish, we had an English translation of this monumental work! God willing, we mean to attempt to do it in future.

Vinayak Narayan Shenvi Dhume needs no introduction to people of Goa and to those Marathi readers outside who have a liking for literature on temples — their history, art and sculpture. He has to his credit many monograms on individual temples and scores of articles in Marathi papers and magazines. Through this valuable research work, Shri Dhume has stimulated a study of our historical archives and love for grandeur of our cultural heritage

The All India Saraswat Cultural Organisation has just completed fifteen

years. On this happy occasion it gives us immense satisfaction in bringing out such a book. This is in keeping with its aims and objectes. The AISCO has been doing this type of job. It has been its endeavour not only to publish books and articles on our culture and heritage but also to help temples and maths whenever problems confront them. For example, when the Government of Kerala brought forward the Devaswom Endowment Bill proposing to take over our temples, the AISCO played as an important a role as many of Saraswat temples. It made a representation to the Chief Minister urging him to withdraw the bill, or the Saraswats of the country comprising not less than 20 lakhs would stage a Dharna. The impact was so great that the Government ultimately withdrew it. Similarly, when some sections of Kashmiri Muslims were dead set on having their hands in the affairs of our temples in Kashmir, the AISCO addressed a representation to the Prime Minister.

Telegrams were sent urging that neither the Muslims nor the State Government should interfere in the affairs of our temples. Our prayers were answered and the issue was settled peacefully and gracefully in our favour.

It may also be recalled that very recently, when the Shri Mhalsa Temple in Goa had to be closed down, as the result of a dispute between the trustees and others, the AISCO played an important part in settling the issue.

The AISCO is the apex body of the Saraswat institutions of India and as such it strives to play an important role in a collective manner and solves problems facing the community at large. It also aims at preserving its glorious heritage and culture. It has implicit faith in our Swamiji's words: 'In Kaliyuga Sanghashakti is supreme.'

In tune with this spirit, what is more appropriate than publishing a book on our temples to celebrate our 15th anniversary?

We are very deeply indebted to Dattatray Nagesh Nadkarni, who has done an excellent job in going through the proofs which was not an easy task. Our thanks are also due to Tulsidas Sukhtankar of Suman Art Printery for willingly printing the cover and art plates with much zeal and involvement. Shashi N. Rege of Sharvari Arts has taken great pains in getting the book printed in record time. We are grateful to him. I would also like to thank J. D. Isloor and other members of the Editorial Board of 'The Samyukta Saraswat' and members of the Managing Committee of the AISCO and fellow-trustees of the All India Saraswat Foundation for their co-operation and encouragement in bringing out the book in deference to the wishes of His Holiness Sachchidanand Saraswati Swamiji of Shri Kavale Math.

S. V. Pikale

President,

All India Saraswat Cultural Organisation

Chairman,

All India Saraswat Foundation

Gudi Padva

March 18, 1988

- श्रीसंस्थान गोकर्ण पर्तगाळी जीवोत्तम मठाधीश श्रीमत् विद्याधिराजतीर्थ श्रीपाद वडेर स्वामीजींनी मानपत्रासह 'इतिहास विशारद' पदवी देऊन भुषविलेले, व
- श्रीसंस्थान गौडपादाचार्य कैवल्यपूर मठाधीश श्रीमत् सच्चिदानंद सरस्वती स्वामीजींनी मान पत्रासह 'इतिहासाचार्य' पदवी देऊन गौरविलेले :—

लेखक **श्री. विनायक नारायण शेणवीं धुमें**

श्री. विनायक नारायण शेणवीं धुमें यांचा अल्प परिचय

जन्मस्थळ तिसवाडी तालुक्यांतील कुंभारजुवे. जन्मतारीख ६ नोव्हेंबर १९०५. स्वभाव निगर्वी. कोणत्याही विषयांत लक्ष घातले तर निष्ठेने व चिकाटीने आर्थिक वा शारिरीक झीज सोसून तडीस नेणारे. विशेषतः ऐतिहासिक संशोधनासाठी घेतलेल्या कष्टाला सीमाच नाही. जोडीला मोडी लिपी, जुनी पोर्तुगीज, मराठी व कोंकणी भाषा यांच्यावर असामान्य प्रभुत्व. त्यामुळेच त्यांच्याकडुन दुर्मिळ, अप्रकाशित व मौलिक संशोधनाची निर्मिती.

गोमंतकांचे आकर्षण म्हणजे तेथील निसर्गरम्य सौंदर्य, सुमधुर संगीत व चवदार मासळी आणि त्याचबरोबर तेथील टुमदार, स्वच्छ व प्रसन्न देवालये. गोमंतकांतील प्रत्येक देवस्थान अत्यंत पुरातन असून प्रत्येकाला स्वतंत्र इतिहास, परंपरा, रुढी, आचार यांचा आधार आहे व तेथील भक्तगणांनीं त्यांची जपणूक पिढ्यान् पिढ्या अबाधित राखली आहे. या निरलस भक्तीच्या प्रेरणेतूनच खास गोमंतकीय प्रकृति व संस्कृतीस पोषक ठरणाऱ्या घटकांना आज शेकडो वर्षे खतपाणी मिळत आहे. या ऐतिहासिक देवालयाचे अभ्यासपूर्ण संशोधन करून जास्तीत जास्त प्राचीन माहिती संकलित करून हा अमूल्य ठेवा जतन करण्यासाठी कोणत्याही व्यक्तीने, संस्थेने, विद्यापीठाने अगर सरकारी पातळीवर प्रयत्न केलेले ऐकीवांत नाही. याला एकमेव अपवाद म्हणजे श्री. धुमें. अनेक वर्षे सातत्याने संशोधन करून दुर्मिळ हस्तलिखिते, रोजनिश्या, पुराभिलेख, देवस्थानची व ग्रामसंस्थांची दप्तरें, जेझुईट मिशनऱ्यांची कागदपत्रें, सरकारी पत्रव्यवहार यांच्या आधारें अनेक प्राचीन देवालयासंबंधी अत्यंत मौल्यवान माहिती त्यांच्या संग्रही आहे व लेखाद्वारे प्रसिद्ध झाली आहेत. विशेषतः स्थलांतराबद्दलची जी माहिती दाखले पुराव्यासह प्रसिद्ध झाली आहे ती तशी यापुर्वी कधींच वाचावयास मिळाली नाही. अशा देवस्थानविषयक कांही लेखांचा समावेश 'गोमंतक पुण्यभूमी' या संग्रहात केलेला आहे. इतर काही लेख प्रस्तुत ग्रंथात एकत्रित केलेले आहेत. नायब राज्यपाल, मुख्यमंत्री, मंत्रीमहाशय, धर्मपीठांचे स्वामीजी यांच्याकडुन विशेष जाहीर सभांतून श्री. धुमें यांचे सत्कार झालेले आहेत.

आतापर्यंत प्रकाशित झालेल्या पुस्तकांची यादी :

- श्रीमंगेश देवस्थान प्रियोळ – गोवा, समग्र इतिहास.
- श्रीमंगेश उपासना.
- श्रीमंगेश देवस्थान दैनंदिनी.
- श्रीमहालक्ष्मी देवस्थान बांदिवडे – गोवा समग्र इतिहास.
- श्रीशांतादुर्गा कुंभारजुवेंकरीण देवस्थान, श्री क्षेत्र माशेल – गोवा समग्र इतिहास.
- श्रीगणपती देवस्थान खांडोळे – गोवा समग्र इतिहास.
- श्रीशांतादुर्गा देवस्थान कवळें – गोवा समग्र इतिहास.
- श्रीकालभैरव देवस्थान धारगळ – पेडणे – गोवा समग्र इतिहास.
- ‘गोमन्तक पुण्यभूमी’ (गोवा, दमण आणि दीव सरकारनें आपल्या क्रीडा आणि सांस्कृतिक खात्याकडून, सरकारी मुद्रणालयांत छापवून प्रकाशित)
- श्रीगौडपादाचार्य संस्थान कैवल्यपूर महामठ समग्र इतिहास (या पुस्तकाचे लेखक व्याकरणाचार्य श्री. गजानन शास्त्री गायतोंडे आणि श्री विनायक नारायण शेणवीं धुमे.)
- श्रीधाकटी वनदेवी देवस्थान, मुळगांव – गोवा, समग्र इतिहास.

त्याशिवाय अनेक नियतकालिकांतून विविध विषयावर फुटकळ लेख

देवभूमी गोमंतकांतील प्रमुख देव आणि देवस्थानें

देवभूमी गोमंतकांतील प्रमूख देव आणि देवस्थानें यांचा प्राचीन काळीं उगम केव्हां आणि कसा झाला, ते देव आणि त्यांचीं देवालयें मूळ प्रथमतःच केव्हां कोणी स्थापन केलीं, कारण काय, आणि ते देव व त्यांचीं देवालयें यांचे आद्य संस्थापक कोण, ही अत्यावश्यक माहिती प्राथमिक स्वरूपांत कां होईना, तत्कालीन धार्मिक आणि राजकीय गतेतिहासाच्या आधारें समजून घेतल्याशिवाय मुख्य विषयाचें आकलन होणें जरा कठीण आहे म्हणून ती माहिती आरंभींच अगदीं संक्षिप्तांत घेण्याचा प्रयत्न करूं ।

सह्याद्रिपासून समुद्रापर्यंत अरुंद अशी जी लांबच्या लांब कोंकणपट्टी आहे, तिला परशुराम क्षेत्र असें नांव आहे. ह्या परशुरामक्षेत्रासंबंधी स्कंद पुराणांतील सह्याद्रिखंडांत जी माहिती आहे, त्या माहितीवरून हें परशुरामक्षेत्र शूर्पाकार म्हणजे सुपासारखें असून वैतरणी नदीच्या दक्षिणभागीं आणि सुब्रम्हण्याच्या पश्चिमेस आहे. शूर्पाकार म्हणण्याचा हेतू असा कीं, सह्याद्रिपासून समुद्रापर्यंत बारा कोस रुंद आणि चारशें कोस लांब, सुपाच्या आकाराप्रमाणें भार्गवरामास भूमि मिळाली, आणि ती भूमि काशी-क्षेत्रापेक्षां अधिक पवित्र झाली. कारण, त्या भूमीवर परशुरामानें सर्व तीर्थे आणून स्थापिलीं. तीं तीर्थें हीं : 'विमल, निर्मल स्वादिरतीर्थ, हरिहरेश्वर (बाणकोटाजवळ), मुक्तेश्वर, वालुकेश (वाळकेश्वर), बाणगंगा, सरस्वती, तिच्या दक्षिणभागीं, कुशस्थली (कुठ्ठाळ), मठग्राम (मडगांव), गोमांचल (गोमांतक), त्या गोमंतकीं गोरक्षनामक तीर्थ, रामकुंड, कुडमलादिक तीर्थांची स्थापना केली, आणि अशा प्रकारें तें पवित्र स्थान निर्माण करून या ठिकाणीं परशुराम वास करून राहिला. पुढें कांहीं दिवसांनीं त्यानें दिग्विजयार्थ एक यज्ञ करण्याचें ठरविलें व त्याच्या सिध्दिसाठीं पुष्कळ विद्वान ब्राम्हणांची गरज असल्यानें उत्तरेकडील त्रिहोत्र (तिरहुत) देशांतून आपले आप्त भारद्वाज, कौशिक, वत्स, कौंडिण्य, कश्यप, वसिष्ठ, जमदग्नि, विश्वामित्र, गौतम आणि अत्रि अशा महान् तपस्वी विद्वान सारस्वत ब्राम्हणांना दक्षिणेंत गोमंतकांत आणून परशुरामानें आपलें यज्ञाचें काम उरकून घेतलें व गोमंतक पर्वताच्या आसमंतातील अष्टग्रामांत अग्रहारें देऊन तेथें त्यांची स्थापना केली. मठग्राम, वरेण्य, कुडतरी, बाणावली, शंखावली, रायचूरी, लोटली आणि नागवें, यांस अष्टग्राम म्हणतात. मुख्यत्वेंकरून एव्हांपासून दक्षिण प्रांतीं सारस्वत ब्राम्हणांचा प्रवेश समजण्यांत येतो. त्या पूर्वी एका परशुरामावांचून दुसरे सारस्वत ब्राम्हण कोणी नव्हते. हा दिग्विजय यज्ञ गोमंतकामध्यें पेडणें प्रांताच्या हरमल गांवीं झाला असें परंपरागत आख्यायिकेवरून समजतें. तेथील लोक अद्याप तेथें त्या यज्ञाची साक्ष भस्माचा डोंगर दृष्टी पडतो असें सांगतात.

परशुरामानें जे दहा सारस्वत ब्राम्हणऋषी आणिले त्यांची सहासष्ट कुळें होतीं. त्या सहासष्ट कुळांतून कुशस्थळी आणि केळोशी या दोन क्षेत्रांत कौत्स, वत्स आणि कौंडिण्य ह्या तीन गोत्रस्थ ब्राम्हणांचीं दहा दहा कुळें स्थापिली. बाकी जीं गोत्रें राहिलीं त्यांतून मठग्राम, वरेण्य, लोटली आणि कुडतरी या चार ग्रामांत सहा सहा कुळें, चूडामणि (चोडण) महा-क्षेत्रांत दहाकुळें आणि दीपवति (दिवाडी) व गोमंचलाच्या मध्यभागीं बारा कुळें स्थापिलीं. याप्रमाणें सहासष्ट कुळांची स्थापना करून त्यांतील मुख्य ब्राम्हणांस १६ गांवांचा अधिकार दिला. हा अधिकार अजून पावेतों त्यांकडेच वंशपरंपरेनें चालत असून नंतरच्या कालांत जरी गोमंतकप्रांत फिरंगी क्रिस्ती धर्मीय पोर्तुगीज सरकारच्या स्वाधीन गेला, तरी ते त्या गांवचा कर (फोर) सरकारास देवून त्या गांवचें उत्पन्न आपआपल्यांत वांटून घेत असत. जे सारस्वत ब्राम्हण नंतरच्या कालांत फिरंगी पाद्र्यांनीं बलात्कारानें बाटविले त्यांस देखील हा अधिकार आहे.

कालांतरानें गोमंतक व आजुबाजूच्या प्रांतांत निरनिराळ्या देशी राजांचीं राज्यें चालूं लागलीं. त्यांत मौर्य, कदंब, चालुक्य वंशाचे राजे, त्यानंतर विद्यानगरचे, बेंदरचे बहामनी संज्ञक मुसलमान राजे, विजापूरचे मुसलमान राजे आणि त्यांचा मांडलिक

सौंदेकर राजा, सावंतवाडीकर मराठे राजे हे अधिकारावर आले. या सर्व संस्थानिक राजवटींमध्यें त्या त्या राजांच्या कारकिर्दींत सारस्वत ब्राम्हणांच्या प्रभावी बौध्दिक सामर्थ्याचें सहकार्य त्यांना मिळत गेल्यानें त्यांच्या राज्यांचा भरीवपणा वाढत गेला आणि त्यामुळें, त्याकालीं, प्रत्येक संस्थानिक राजा दरबारांत आर्थिक महत्वाच्या व उच्च दर्जाच्या अधिकारावर सारस्वतांच्याच नेमणुका होत गेल्याची माहिती गतेतिहासांतून वाचावयास मिळते म्हणून यांचाही लौकिक व विस्तार वाढत गेला, आणि नानाविध कारणामुळें उत्तरेकडील वसाहती सोडून दक्षिणेंत कांहीं सारस्वत ब्राम्हण कुटुंबें गोमंतक प्रांत व आसपासच्या भागांत वसाहती करून जीं राहिलीं, त्यांचे सांस्कृतिक धर्म व राजकारण हीं दोन्हीं व्यवस्थित चालल्यानें समाजशासनही उत्तम होऊं लागलें. पण, ही परिस्थिती त्यांना फार काळ लाभली नाहीं.

गोमंतकांत मुसलमान व क्रिस्ती धर्मीयांचे आक्रमण

इसवी सन् १३१२ त मुसलमानांनीं देवगिरीच्या यादव वंशाची समाप्ती केल्यावर ते मुसलमान गोमंतकांत येऊन बंड करू लागले. त्यांनीं येथील पुष्कळ देवालयें मोडून टाकलीं आणि राज्याधिकाऱ्यांस हांकलून आपण राज्य करूं लागले. परंतु पुढें इ. स. १३६७ मध्यें विजयनगरचे राजे हरिहरराय यांचे पदरीं असलेले मुख्यमंत्री माधव उर्फ माधवाचार्य यांनीं पुष्कळ सैन्यानिशीं गोमंतकांत येऊन मुसलमानांस हांकलून दिलें आणि मुसलमानांनीं मोडलेलीं देवालयें पुन्हां बांधिलीं व त्या माधवाचार्यांनीं श्रीसप्तकोटीश्वराची पुनःस्थापना केली. तरी पण, मुसलमानांनीं आपलें आक्रमण थांबविलें नाहीं. माधवाचार्यांच्या स्वर्गवासानंतर हरिहररायानें नरहरी मंत्री यास प्रधान नेमून गोमंतकांत पाठविलें.

पुढें इ. स. १५१० सालीं फिरंगी लोकांनीं समुद्रांतून येऊन अकस्मात गोमंतकावर घाला घातला. आणि लढाई होतां होतां त्यांचा अधिकार येथें पक्का झाला. त्यांनीं हिंदूंचा धर्म समूळ उपटून टाकण्याचा दृढ निश्चय केला आणि पराकाष्ठेचा क्रूरपणा चालवून हिंदूंचीं घरें, गांवें आणि देवालयें बाटविणें, देवांच्या मूर्ती फोडणें, यज्ञोपवीतें तोडणें, शेंड्या कापणें, अभक्ष्य वस्तू त्यांच्या तोंडांत दांडगाई करून खुपसणें अशा कृत्यांचा सपाटा चालविला. हिंदूंनीं प्रतिकारार्थ दंगे केले. परंतु शत्रु एकमतानें वागणारे आणि हिंदु परस्परांमध्यें कलह करण्याच्या कामीं अत्यंत प्रवीण यामुळें शत्रूच विजयी झाले. प्रायश्चित्तादि योग्य विधि करून आपण पूर्व धर्मीच राहूं इत्यादि प्रकारचे विचार त्या कालीं त्यांच्या स्वप्नींही येईनात. यामुळें त्यांचा सर्वथैव नाश झाला. लक्षावधि लोक मारले गेले, बाटले गेले, राहिलेले वाट मिळेल तिकडे पळून गेले. त्यांचीं घरें दारें, देवालयें छिन्नभिन्न आणि उध्वस्त झालीं. याप्रमाणें सारस्वत ब्राम्हणांवरच नव्हे, तर सर्व हिंदूंवरही हा मोठा कहर झाला आणि म्हणून तेव्हां देशत्यागावांचून दुसरा उपाय नाहीं हें जाणून कित्येक लोक सह्याद्रि ओलांडून पूर्वेकडे गेले. कित्येक दक्षिणेकडे गेले आणि कानडा व मलबार प्रांतांत राहिले. त्यांचे पराकाष्ठेचे हालहाल झाले. याप्रमाणें साधारण अर्धा-शतक वर्षे त्यांची स्थिती फारच भयंकर आणि करुणास्पद होती. तदनंतर मग ते हळूहळू जिकडे तिकडे स्थायिक झाले. पोर्तुगीजांच्या धार्मिक जाचास कंटाळून गोमंतकांतील हिंदूनीं देशत्याग केला, त्या घटनेचा काल निश्चित करणें कठीण नाहीं. इ. स. १५१६ नंतर व इ. स. १६०८ सालापूर्वी गोमंतकीयांनीं देशत्याग केलेला आहे ही गोष्ट ऐतिहासिक पुराव्यावरून सिध्द करतां येईल. फ्रेंच प्रवासी Pyrard यास कालिकतमध्यें जाऊन राहिलेले गोमंतकीय सारस्वत इ. स. १६०८ त भेटले होते, असा उल्लेख श्री. कुंज रिव्हार कृत Viagem de Pyrard दुसरी आवृत्ती पृष्ठ ३३ मध्यें आहे. कर्नाटक व मलबार येथेंही हिंदु राजे होते त्यांच्याही आश्रयास सासष्टीतील कांहीं हिंदु कुटुंबें गेलीं. त्यापूर्वी देखील सासष्टींतील कांहीं सारस्वत कुटुंबें कर्नाटकमध्यें जाऊन तेथें स्थायिक झालीं असावींत. कारण, इ. स. १५४६ तील एका लेखांत सासष्टींतील कुडतरी गांवाच्या खेतपय्या नारायण, यानें भटकळ येथें देवालय बांधल्याचा उल्लेख आहे. तसेंच, दुसऱ्या एका लेखांत गोव्यांतून आलेल्या ब्राम्हणांसाठीं इसवी सन् १५३७ त वेंकटरमणाचें देवालय उभारल्याचा निर्देश आढळतो. हे सारस्वत पोर्तुगीजांचें सासष्टींत आगमन होण्यापूर्वी कर्नाटकमध्यें गेले असावेत. गोव्याच्या दक्षिणेस कर्नाटकमध्यें होनावर, गोकर्ण, मंगलूर, इत्यादि ठिकाणीं व मलबारांतील कानानूर, त्रिचनापल्ली, अळपळ्ळी, कोचीन, मंजेश्वर येथे गोवेकऱ्यांच्या जुन्या जुन्या वसाहती आढळतात. ते लोक आपण फिरंग्यांच्या गांजवणुकीमुळें परागंदा झालों असें सांगतात. ह्या गोवेंकरांस 'कानारी' किंवा 'कोंकणी' असें तेथें म्हणतात. ते कोंकणांतून तिकडे गेले म्हणून किंवा ते कोंकणचे रहिवासी म्हणून ह्या

अर्थानें त्यांस हें नांव मिळालें, असें केरळचा इतिहासकार श्री. पद्मनाभ मेनन यानें लिहिलें आहे.

हिंदूंनीं गोमंतकाचा त्याग केला, त्यामुळें हा प्रदेश ओस पडला. व्यापार बुडाला. राज्यामध्यें उत्पन्न नाहींसें झालें. नंतर राज्यकर्त्यांचे डोळे उघडले आणि नक्षा उतरला. असें होण्याचें कारण काय, याचा विचार झाला तेव्हां, हिंदू लोकांचा आणि धर्माचा छळ याचेंच हें फळ आहे असा निर्णय झाला आणि विचारांतीं राज्यकर्त्यांनीं कायदा केला कीं, यापुढें धर्माच्या कामीं दांडगाई करूं नये, बाटविणें खरोखरच बंद केलें. पुन्हा पुन्हा जाहीरनामे प्रसिध्द करून हिंदू लोकांस धर्मस्वातंत्र्य देण्याचें धोरण चालू केलें. परंतु जनतेचा विश्वास बसेना. पण, हळूहळू लोक परत येऊन परत स्थिरता झाली. जे लोक दूर जाऊन राहिले, तें तेथेंच राहिले ते परत आले नाहींत. प्रायः दक्षिणेंतील सारस्वत ब्राम्हणांचे कुलदेव गोमंतका-मध्यें आहेत. भरत खंडांत इतर सर्व ठिकाणीं जीं ब्राम्हण देवस्थानें आहेत तीं ही त्यांना वंद्यच. परंतु गोमंतकांतील देवस्थानें त्यांना विशेष पुज्य वाटतात. कारण, त्यांनीं तीं मूळ त्रिहोत्र पुराहून स्थलांतर करतांना आपआपले कुलदेव म्हणून आपल्या बरोबर आणून स्थापिलीं आहेत. त्यांतील बहुतेक देवालयें शिवाचीं, कित्येक पार्वतीचीं अशीं आहेत याचा पुरावा स्कंदपुराण, सह्याद्रिखंड उत्तरार्ध अध्याय १ मध्यें खालील प्रमाणें आढळतो :

"आनीता भार्गवेणैव गोमंतारव्ये च पर्वते ।
मांगिरीशो महादेवो महालक्ष्मीश्च म्हालसा ॥
शांतादुर्गा च नागेशः सप्तकोटीश्वरः शुभः ।
तथा च बहुला देवाः परशुरामेण चानिताः ॥
स्थापिता भक्तकार्यार्थं तत्रैव शुभस्थले ।
ते देवा वार्यवंताश्च भक्ताभीष्ट प्रदायकाः ।
स्मरणाध्दरते तेषां पापं सत्यं वदाम्यहं ॥"

वरील दैवतें ही कुलदैवतें आहेत, आणि तीं त्या त्या संबंधित गोत्राच्या सारस्वत कुलपुरुषांनीं गोमंतक वसविल्यावेळीं स्थापन केलेलीं आहेत, यात संशय नाही. परंतु गोमंतकांत आणखी अनेक देव आणि त्यांची देवालयें आहेत, त्यांत मुख्यत्वें करून तीन प्रकार आढळतात. १) कुलदेव, २) ग्रामदेव, ३) उपास्यदेव. कुलाचें संरक्षण करणाऱ्या म्हणून मान-लेल्या दैवतांस कुलदैवत म्हणतात. ग्रामाच्या कांहीं देवता असतात त्या सर्व साधारणपणें मुख्यत्वेकरून त्याच गांवात असतात. यास क्वचित अपवाद आहे. नाहीं असें नाही. एखादें ग्रामदैवत त्याच गावांत जरी प्राचीन कालीं होतें, तरी नंतरच्या कालांत बाटाबाटी-मुळें स्थलांतर करून तत्कालीन राज्य हद्दी बाहेर नेल्याची उदाहरणें आहेत, आणि उपासनें करितां मुद्दाम स्विकारलेले दैवत तें उपास्य दैवत होय. उपास्य दैवत हें सर्वांचें एकच नसून प्रत्येक व्यक्तीचें वेगवेगळें असूं शकतें. प्रत्येक जण आपल्या पसंती-प्रमाणें दैवत निवडतो, आणि त्या दैवताची उपासना करून समाधान आणि आध्यात्मिक अधिकार वाढवूं शकतो.

अशा प्रकारें हे दैवतांचे निरनिराळे तीन प्रकार असले, तरी ते मुख्य कुलदेवाच्या अंतर्भूत असतात. कुलदेवाची जागृती ठेवून अवांतर देवांची उपासना चालू ठेवण्याचा प्रघात सारस्वत ब्राम्हणांमध्यें प्रामुख्यानें असलेला दिसतो.

गोमंतकांत प्राचीन कालीं स्थापिलेल्या प्रमुख कुलदैवतांचा उल्लेख जो सह्याद्रिखंडांत सांपडतो, तो वर दिलेला आहे, आणि तीं कुलदैवतें म्हणजे मांगिरीश महादेव, महालक्ष्मी, म्हालसा, शांतादुर्गा, नागेश आणि सप्तकोटेश्वर हीं आहेत. पण, गोमं-तकांत आणखी पुष्कळ कुलदैवतें सारस्वतांचीं जशीं उदाहरणार्थ : रामनाथ, नारसिंह, गणपति, अजादुर्गा, विजयादुर्गा, कामाक्षी, देवकीकृष्ण इत्यादि आहेत, तशीच इतर वेगवेगळ्या ज्ञातीची आणि लोकसमाजाचीं आहेत इतकेंच नव्हे, तर सारस्वतांनीं, स्थापन केलेल्या आपल्या कुलदेवतांस सारस्वतेतर ब्राम्हण आपलींच तीं कुलदैवतें मानून भक्त झाल्याची उदाहरणें आहेत. श्रीमहालक्ष्मी–बांदिवडें, श्रीमहालसा-म्हार्दोळ, या देवींस कऱ्हाडे ब्राम्हण आणि पद्ये ब्राम्हण आपल्या कुल-देवता मानतात. कऱ्हाडे हे मुळचे घाटावर कऱ्हाड कोल्हापूर इत्यादि प्रदेशीं रहाणारे. हे कोंकणांत, गोव्यांत नंतरच्या कालांत आले आणि येथें आल्यावर ते सारस्वतांच्या देवस्थानांचे भक्त झाले. त्याप्रमाणें पद्ये यांनीं केलें, ही वस्तुस्थिती आहे.

गोमंतकांत कांहीं लोकसमाजाचीं खास अशीं देवालयें आहेत

गोमंतकांत कांहीं लोकसमाजाचीं खास अशीं देवालयें आहेत. तीं देवालयें विशिष्ट समाजाचीं मालकीं असलीं, तरी त्या समाजाची मालकी फक्त त्यांच्या त्या देवालयाची व्यवस्था पाहाण्यापुरती आहे.

इतर लोकांस त्या देवालयांत, त्या त्या देवस्थानच्या घटनात्मक आणि व्यवस्थापन नियमांचे पालन करून उपासना किंवा देवकृत्यें करविण्यास बंदी नाहीं. अशा समाज नियंत्रणाखालील देवालयांमध्ये प्रामुख्यानें पुढील देवालयांचा समावेश होतो :

सारस्वत समाजाचें : श्रीदत्तात्रेय – सांखळी.

क्षत्रिय राणेसमाजाचें : श्रीपांडुरंग – सांखळी.

दैवज्ञ समाजाचें : श्रीकालिकादेवी – कांसारपाल

वैश्य समाजाचें : श्रीशांतादुर्गा – धारगळी.

गुर्जर समाजाचें : श्रीलक्ष्मीनारायण – नारवें

भंडारी समाजाचें : श्रीरुद्रेश्वर – हरवळें.

ब्रम्हकर्मा (सुतार) समाजाचें : श्रीरामसीता – गिमोणें, पिळगांव.

गावडा समाजाचें : श्रीमल्लिकार्जुन – गांवडोंगरें, काणकोण.

नापित समाजाचें : श्रीगोमंतेश्वर – जुनेंगोवें, ब्रम्हपुरी

या शिवायही आणखी देवालयें अनेक गांवांत त्या त्या गांवच्या विशिष्ट लोकसमाजाचीं खास अशीं आहेत परंतु त्या सर्वांचा नाम निर्देश आज या लेखांत स्थल संकोचामुळें करतां येणें शक्य नाहीं.

गोमंतकांत अर्वाचीन कालांतील स्थल निर्देशासह कांहीं देवस्थानें

शिवालयें :

श्रीमंगेश – प्रियोळ, श्रीनागेश – बांदिवडें, श्रीमल्लिकार्जुन – सांगे श्रीमल्लिकार्जुन – अष्टग्रहार, श्रीमल्लिकार्जुन – गांवडोंगरें, श्रीमल्लिकार्जुन – काणकोण, श्रीनागनाथ – नार्योकनी, श्रीरामनाथ – बांदिवडें, श्रीरामनाथ – अष्टग्रहार, श्रीरामनाथ – तळवडें, श्रीसिध्दनाथ – अष्टग्रहार, श्रीमहादेव – सांकोर्डें, श्रीमहादेव – कुडचडें, श्रीमहादेव – मुळें, पारोडें, श्रीमहादेव – पिसुर्ले, श्रीमहादेव – काकोडें, श्रीमोलेश्वर – रिवण, श्रीसोमेश्वर – कुडीं, श्रीकुर्पेश्वर – कुर्पे, श्रीकमलेश्वर – कोरगांव, श्रीसप्तेश्वर – मांद्रें, श्रीकपिलेश्वर – कवळें, श्रीचन्द्रेश्वर – पारोडें, श्रीरुद्रेश्वर – हरवळें, श्रीसिध्देश्वर – खुर्ल, श्रीसप्तकोटेश्वर – नेरवें, श्रीकुडणेश्वर – कुडणें, श्रीगोमंतेश्वर – ब्रम्हपुरी, जुनेंगोवें, श्रीधारेश्वर – धारगळी श्रीभूतनाथ – अष्टग्रहार, श्रीकालनाथ – काल, श्रीशिवनाथ – शिरोडें, श्रीसोमनाथ – दाभाळ, श्रीदामोदर – जांबावली, श्रीनिरंकार – लोलयें, श्रीदामोदर – लोलयें.

श्रीदेवीचीं देवालयें :

श्रीम्हामाई – अष्टग्रहार, श्रीम्हामाई – काळंबा, सावित्री – कांसारपाल, श्रीमाया केळबाय – मयें. श्रीशांतादुर्गा – कवळें, श्रीशांतादुर्गा – अष्टग्रहार, श्रीशांतादुर्गा तेलींकरीण – मांद्रें, श्रीशांतादुर्गा – कुंकळ्ये, श्रीशांतादुर्गा कुंभारजुवेंकरीण – माशेल, श्रीशांतादुर्गा – फातर्पे, श्रीशांतादुर्गा – सांखळीं, श्रीशांतादुर्गा – पीर्ण, श्रीशांतादुर्गा चिमुलकरीण – माशेल, श्रीशांतादुर्गा – अडवलपाल, श्रीशांतादुर्गा – बोर्डे, श्रीशांतादुर्गा – कालापूर, श्रीशांतादुर्गा – पिळगांव, श्रीशांतादुर्गा – बाळ्ळी, श्रीशांतादुर्गा – वानोडें, श्रीशांतादुर्गा – खांडेपार, श्रीशांतादुर्गा – वागुर्बे, श्रीशांतादुर्गा – धारगळी, श्रीशांतादुर्गा – तिवरें, श्रीशांतादुर्गा – केरी, श्रीशांतादुर्गा – गोठण, श्रीशांतादुर्गा – सांखवाळ, श्रीशांतादुर्गा – आमोण, श्रीसांतेरी – मडगांव, श्रीसांतेरी – आलोर्न, श्रीसांतेरी – पारोड, श्रीसांतेरी – खोर्ली, म्हापसें, श्रीसांतेरी – बोर्डें, श्रीसांतेरी – विनोंडें, श्रीसांतेरी – लांठवारसें, श्रीविजयादुर्गा – केरी, श्रीभगवती – तुयें, श्रीभगवती – पेडणें, श्रीभगवती – माशेल, श्रीभगवती – खांडोंळें, श्रीमोरजा देवी उर्फ श्रीमहिषासुरी – मोरजी, पेडणें, श्रीभूमिका – चोपडें, श्रीभूमिका – पीरयें, श्रीभूमिका – पालिहें, श्रीभूमिका – साले, श्रीभूमिका – मांद्रें, श्रीमाऊली – वारखोंड, श्रीमाऊली – तोरसें, श्रीमाऊली – मेणकुरें, श्रीनवदुर्गा – कुंडई, श्रीनवदुर्गा – मडकई, श्रीनवदुर्गा – बोरी, श्रीकामाक्षी – शिरोडें, श्रीमंदोदरी – बेतकी श्रीम्हालसा – म्हार्दोळ, श्रीम्हाळसा – नारायणी – वेर्णे, श्रीकाणकेश्वरी – नारवें, श्रीमहालक्ष्मी – बांदिवडें, श्रीमहालक्ष्मी – पणजी, श्रीचामुंडेश्वरी – वरगांव, श्रीचामुंडेश्वरी – शिखई, श्रीदेवी शर्वाणी – अडवलपाल, श्रीसरस्वती – वेरें, श्रीकालिका – चोपडें, श्रीलईराई – शिरगांव, श्रीमहाकावी – जांबावली, श्रीधाकटी वनदेवी – मुळगांव.

श्रीविष्णुचीं देवालयें :

श्रीलक्ष्मीनारायण – नारवें, श्रीलक्ष्मीनारायण – म्हापसें, श्रीलक्ष्मीनारायण – नावेली, श्रीलक्ष्मीनारायण – शिवोली, श्रीमल्लिनाथ – माशेल.

श्रीविठ्ठल रखुमाईचीं देवालयें :

श्रीविठ्ठल – कारापूरा, (सांखळी), श्रीविठ्ठल-महारुद्र शिरोडकर – मुळगांव, श्रीविठ्ठल – कोताली (सांगें), श्रीविठ्ठल – रखुमाई – म्हापसें, श्रीविठ्ठल उर्फ श्रीपांडुरंग – कामुर्ली, श्रीविठ्ठल-मंदिर – मडगांव, श्रीविठ्ठल – सांगें.

श्रीदत्तमहाराजांचीं देवालयें :

श्रीदत्तात्रय – सांखळी, श्रीदत्तात्रय – आमोणें, श्रीदेवदत्त – कुचेलीबारदेश, श्रीदत्तात्रेय – सांवर्डे, श्रीदत्तात्रेय – सांगें.

श्रीमारुतीचीं देवालयें :

श्रीमारुती – म्हापसें, श्रीमारुती – मारुतीगड, काकोडें, श्रीदेवहनुमान – वाळपई.

श्रीराम-सीता देवालयें :

श्रीसीतारामचन्द्र – डोंगरी (मांडूर), श्रीराम-सीता – गिमोणें-पिळगांव, श्रीरामपंचायतन – कोलवाळ.

श्रीगणपतीचीं देवालयें :

श्रीगणपती – खांडोळें, श्रीगणपती – फर्मागुडी.

नानाविध दैवतांचीं देवालयें :

श्रीअनंत – सावईवेरें, श्रीवेंकटेश – नानोडें, श्रीकालभैरव – धारगळी, श्रीवेताळ – आमोण, फातर्पे, प्रियोळ, हेमाडबारसें, आलोर्न, श्रीवेताळेश्वर – वेलिंग, श्रीलक्ष्मीनृसिंह – वेलिंग, श्रीदेवकीकृष्ण – माशेल, श्रीपरशुराम – लोलयें, श्रीरवळनाथ – माशेल, श्रीशांता-दुर्गा – श्रीलक्ष्मीनृसिंह, सांखळ्यो – सांखवाळ, श्रीहेमाडदेव – उगें, श्रीपायकादेव – कोताली (सांगें), श्रीबोंडपुरुष – अष्टग्रहार, श्रीरामपुरुष – मडकई, श्रीनामोपुरुष – मडकई, श्रीबोराडी – आलोर्न.

याशिवाय, आणखी अनेक, नानाविध दैवतांचीं शेंकडों देवस्थानें गोमंतकांत आहेत. गोमंतकाच्या चतुःसीमा, क्षेत्रफळ, आणि हिंदु धर्मीयांची लोकसंख्या लक्षांत घेतां, तसेंच, त्या बरोबर देव आणि देवस्थानें यांच्या संख्येचा विचार करतां या भूमीस देवभूमी हें सार्थ नांव आहे हें कोणीही जसें मान्य करील, त्याच-प्रमाणें या देवस्थानांच्या सभोंवार आसमंतात जिकडे तिकडे सृष्टी देवीनें पसरलेला तो नेत्रदीपक आणि आनंददायक हिरवागार शेतीचा गालिचा, वाऱ्याच्या झुरकेनें झोके घेणारी उंच उंच फोफळीचीं झाडें, वनपुष्पांचा सुवास, गोडपाण्याचे झरे आणि तलाव, मनोरम सृष्टी सौंदर्य आणि निसर्ग देवता दूध-सागराच्या रूपानें ह्या देवभूमीवर सतत अभिषेक करीत असते, असा आल्हादकारक देखावा पाहिल्या-नंतर स्वर्गीय देवतांनाही हेवा वाटावा आणि या भूमींत आपलें वास्तव्य असावें असें त्यांस वाटल्यास नवल तें कोणतें ?

शेवटीं या "देवभूमी गोमंतक" पुस्तक प्रकाशन कार्यात, ज्यांनीं ज्यांनीं, प्रत्यक्ष – अप्रत्यक्षपणें हात-भार लावण्यांत मदत केली, त्या सर्वांची कामगिरी श्रींच्या चरणीं रुजू आहे. त्या सर्वांचे आभार मानण्याचें गोड कर्तव्य प्रकाशक महाशय पार पाडीत असून ही सेवा आपल्या चरणीं रुजू करून घेऊन सर्वांचें सर्वतोपरि कल्याण करावें अशी श्रींच्या चरणीं मी प्रार्थना करीत आहे.

लेखक : विनायक नारायण शेणवीं धुमें,
कुंभारजुवें – गोवा

अनुक्रमणिका

क्रमांक	देवस्थानाचे नांव	पृष्ठ
१)	**श्रीमंगेश देवस्थान** – प्रियोळ	१
२)	**श्रीगणपती देवस्थान** – खांडोळे	३५
३)	**श्रीम्हालसा देवस्थान** – म्हार्डोळ–प्रियोळ	४९
४)	**श्रीलक्ष्मी – नृसिंह देवस्थान** – वेलिंग	७३
५)	**श्रीशांतादुर्गा शंखवाळेश्वरी देवस्थान** – गोठण–वेलिंग	९९
६)	**श्रीविजयादुर्गा देवस्थान** – केरी–फोंडा	१०७
७)	**श्रीनागेश देवस्थान** – बांदिवडे	११९
८)	**श्रीरामनाथ देवस्थान** – रामनाथी	१३१
९)	**श्रीकामाक्षी देवस्थान** – शिरोडे	१५१
१०)	**श्रीकपिलेश्वर देवस्थान** – कपिलेश्वरी–कवळें	१५७
११)	**श्रीदत्त देवस्थान** – सांखळी	१६३
१२)	**श्रीपांडुरंग देवस्थान** – सांखळी (विठ्ठलापूर)	१८३
१३)	**श्रीदेव राधाकृष्ण मुरलीधर देवस्थान** – सांखळी	१८७
१४)	**श्रीदेवी शर्वाणी आणि श्रीवेताळ साळगावकर देवस्थान** – अडवलपाल	१९१
१५)	**श्रीचंद्रेश्वर – भूतनाथ देवस्थान** – पारोडे–केपे	१९३
१६)	**श्रीशांतादुर्गा चामुंडेश्वरी कुडतरी महामाया देवस्थान** – अवेडे–केपे	२०१
१७)	**श्रीभगवती चिंबलकरीण देवस्थान** – माशेल–वरगांव	२११
१८)	**श्रीधाकटी वनदेवी देवस्थान** – मुळगाव–डिचोली	२१७
१९)	**श्रीपरशुराम देवस्थान** – पैंगिणी	२२१
२०)	**श्रीदेवी महामाया काळंबा अथवा श्रीदेवी कालिका देवस्थान** – कासरपाल	२२७
२१)	**श्रीकालभैरव देवस्थान** – धारगळ–पेडणे	२३७
२२)	**श्रीनवदुर्गा देवस्थान** – हडकोळण–फोंडा	२५१
२३)	**श्रीमन्दोदरी देवस्थान** – बेतकी	२६१
२४)	**श्रीमहामाय (म्हामाय वडपादेवी) देवस्थान** – फातर्पे–होर्णे,	२६७
२५)	**श्रीशांतादुर्गा देवस्थान** – कवळें–फोंडा	२७१

ॐ नमस्ते अस्तु भगवन् विश्वेश्वराय महादेवाय त्र्यंबकाय
त्रिपुरुषाय त्रिपुरान्तकाय त्रिकाग्निकालाय कालाग्निरुद्राय
नीलकंठाय सर्वेश्वराय सदाशिवाय श्रीमंगेश महारुद्राय नमः

माता च पार्वती साक्षात् पिता देवो महेश्वरः ।
बांधवाः शिवभक्ताश्च स्वदेशो भुवनत्रयम् ॥

असित गिरिसमं स्यात कज्जलं सिन्धुपात्रे
सुरतरुवर शाखा लेखनी पत्र मुर्वी ।
लिखति यदि गृहित्वा शारदा सर्वकालं
तदपि तव गुणानामीश पारं न याति ॥

१

श्रीमंगेश देवस्थान

मंगेशी – प्रियोळ

सासष्टी तालुक्याच्या कुशस्थली गावातून इसवी सनाच्या १५६० साली, शालिवाहन शकाचे १४८२ रौद्र नाम संवत्सरी, फोंडा तालुक्याच्या प्रियोळ गावात स्थलांतर करून आलेले श्रीमंगेश देवस्थान.

श्री मंगेश



श्री मंगेश देवस्थान, मंगेशी

श्रीमंगेश देवस्थान

कैलासीचा राणा देवाधिदेव महादेव गोमंतकात का, कोणत्या कारणामुळे, कोणत्या जागी अवतरला आणि मंगेश नावाने तेथे राहिला ?

कैलासीचा राणा देवाधिदेव महादेव गोमंतकात, कोणत्या कारणामुळे, कोणत्या जागी अवतरला आणि श्रीमंगेश नावाने तेथे का राहिला, श्रीमांगीश माहात्म्यात कथन केलेली पार्वती आपल्या पतिशोधनासाठी कैलासाहून निघून फिरत फिरत गोमंतकात आली आणि मिलनोत्तर उभयता नवनाम रूपानी तिथे कशी राहिली, हा सर्व कथाभाग जितका भक्तिप्रधान तितकाच मोठा चित्तवेधक असून तो स्कन्द पुराणांतर्गत सह्याद्रिखंडात वर्णिलेला आढळतो.

भारतीय पुराणाच्या समृध्द परंपरात स्कन्द पुराणांतर्गत सह्याद्रिखंडाचे स्थान फार वरचे असून प्राचीनतेच्या दृष्टीने त्याची तुलना काशी, कांची अवन्तिकेच्या तोलाची व मोलाची आहे.

उत्तरेस भडोचपासून दक्षिणेस केरळमधील मोठ्या भागाचा समावेश असलेल्या सह्याद्रीच्या ह्या परिसरात वास करणाऱ्या प्राचीन जातीजमाती, त्यांचे आचारविचार व चालीरीती, त्यांची तीर्थक्षेत्रे व देवस्थानं इत्यादिचे विस्तारपूर्वक उल्लेख, आणि त्याचबरोबर या निसर्गरम्य प्रदेशाचे सौंदर्यात्म वर्णन, या साऱ्यामुळे या ग्रंथाला सांस्कृतिक वाङ्मयीन तसेच इतिहास संशोधनाच्या दृष्टीने वेगळे व आगळे असे सर्वांगीण महत्व आहे.

अशा या सह्याद्रिखंडाच्या श्रीमांगीश माहात्म्यात जो कथाभाग वर्णिलेला आहे, त्यातील अगदी आवश्यकतेपुरता सारांश रूपाने कथाभाग खाली दिला असून त्यावरून कैलासीचा राणा गोमंतकात अवतरण्यासाठी कोणती कारणे झाली, श्रीमंगेश नावाने येथे राहण्यासाठी कोणती घटना घडली, या सर्वावर प्रकाश पडेल.

महाविष्णुभक्त नारदमुनीच्या प्रश्नास श्रीशंकरानी स्वतःच उत्तर देऊन ते म्हणाले,

"कैलास पर्वताच्या रमणीय शिखरावर एकदा पार्वतीसह मी द्यूत खेळू लागलो. त्या द्यूतात मी कौतुकाने पार्वतीला विजय मिळू दिला. पण, माझा पराजय होताच, पार्वतीने कठोर शब्दानी माझा छळ केला. पार्वतीच्या त्या कठोर शब्दानी मला फार कष्ट झाले, म्हणून ते स्थान सोडून अन्यत्र जाण्याचा विचार माझ्या मनात आला. कल्याणेच्छु माणसाने, द्यूत, मद्य, स्त्री, धूर्त, मूर्ख व लबाड यांवर विश्वास ठेवूच नये. कारण प्रज्वलित अग्निज्वाला व विष यांचा चुकूनसुध्दा जर संसर्ग घडला, तर घात झालाच म्हणून समजा. याप्रमाणे विचार करून मी सर्वसंगमुक्त झालो व पार्वतीचा त्याग करून तपश्चर्येसाठी वनात गेलो."

श्रीशंकर तेथून निघाले आणि कृष्णा-वेणीच्या संगमेश्वर नावाच्या संगमावर येऊन तप करू लागले, आणि नंतर तेथून समुद्रतीरी जाऊन आपल्या गणांसह तेथे राहू लागले.

गंगेसह श्रीशंकर तिकडे गेल्यावर पार्वतीने पूर्वी आपल्या पितृगृही घडलेला वृत्तांत आठवून ती फार दुःखी झाली, व सखींसह विलाप करू लागली.

"हे नीलकंठ, वृषभध्वज, मदनारि, रावणादि श्रेष्ठ राक्षसांच्या ईश्वरा, हे पंचानन मुरारे, तू माझा भाग्यनिधी आहेस. मी कामतप्त आहे, माझा उध्दार कर, माझ्यावर कृपा कर, जगात खरोखर स्त्रीजन्म कष्टदायक व निंद्य आहे. कारण, दरिद्र्याने तपश्चर्या करून मिळविलेले धन घालवावे, त्याच प्रमाणे तू योगिदुर्लभ भगवान् मला प्राप्त झाला असताही, स्त्रीस्वभावाला अनुसरून तसलेच कृत्य मी केले ! म्हणूनच मला आज अत्यंत कष्टदायक पतिवियोग झाला."

मैत्रिणीनी विरोध केला तरी ती पतिव्रता सतत बडबडतच राहिली व आपल्या रूपाची निंदा करू लागली. सख्या तिला म्हणाल्या,

त्या ब्राम्हणाने देवेशास पुनः पुनः नमस्कार करून स्तोत्र म्हटले. श्रेष्ठ ब्राम्हणाची ती स्तुती ऐकून महेश्वर प्रसन्न झाले आणि इच्छित वर माग म्हणाले.

देवशर्मा म्हणाला, 'हे जगद्गुरो ! तुझे नाव काय व हे तीर्थ कोणते ?'

हे ऐकून श्रीशंकर हसून म्हणाले, 'माझे नाव मांगीश आहे व या श्रेष्ठ तीर्थाचे नाव कपिल आहे.' कारण कपिला धेनु रोज तेथे दुग्धाभिषेक करीत असे.

हे ऐकून त्याने श्रीशंकरांस प्रणाम केला. तेव्हापासून हे लिंग प्रख्यात झाले आणि पुढे ते ईश्वरी इच्छेने पाण्याच्या बाहेर आले.

ही कपिला धेनु कोण, तिचा वर्ण कोणता, तिचा स्वामी कोण, ती कोठे मिळाली, याची कथा थोडक्यात अशी : पूर्वी त्या अघनाशिनी नदी तीरी वेदवेदांग पारंगत असा देवदत्त नावाचा ब्राम्हण राहत होता, तो फलपुष्पे व दर्भ आणण्यासाठी एकदा अरण्यात गेला होता. तेथे त्याला एक जलाशय दिसला. त्यात पुष्कळ चिखल होता. तेथे त्या चिखलात रुतलेली गाय पाहून तो मनात म्हणाला, उपकारासारखे पुण्यकारक कार्य ऐकण्यात नाही. यास्तव, या पुष्ट, शुभ्रवर्णी व दुधाळ गाईला चिखलातून बाहेर काढण्याचा निश्चय करून, त्या देवदत्त ब्राम्हणाने एका शूद्र कुमाराच्या मदतीने त्या चिखलातून गायीला बाहेर काढले व तिला आपल्या घरी नेऊन तिचे पोषण केले व तिच्यासाठी त्या शूद्र कुमारासही आपणाकडे ठेवून घेतले.

एकदा ती कपिला गुराख्यासह वनात चरत असता, मध्यान्हीच्या वेळी, त्या शूद्र कुमार गुराख्यास तहान लागली म्हणून तो एका विहीरीजवळ गेला व पाण्यासाठी त्या विहिरीत पाहत असता त्याला रत्न-खचित लिंग दिसले. हे काय असावे, असा विचार करून बारकाईने पाहताच त्याला अद्भुत दृश्य दिसले.

ती पंचमुख, दशभुज, श्वेतांग, चंद्रशेखर, नीलकंठ, सर्वभूषण व भस्मचर्चित मूर्ति होती. हे आश्चर्य पाहून त्याने त्या मूर्तीस प्रणाम केला व माझ्यावर कृपा करा असे म्हणत हात जोडले व ईश्वरास आपले मन व नेत्र अर्पण केले.

ईश्वराने त्याची स्तुती ऐकली व प्रसन्न होऊन म्हणाले, 'मी प्रसन्न झालो आहे 'इष्ट वर माग'. शूद्र कुमार म्हणाला, 'केवळ तुझी भक्ति, तुझ्या चरणांचे प्रेम, सान्निध्य, पूजन व चिंतन मला दे.' हा वर मागताच 'तथास्तु' असे म्हणून श्रीशंकर विहिरीतून बाहेर येऊन नदी व सागर यांच्या संगमावर त्या दोघांवर अनुग्रह करून अंतर्धान पावले.

कपिल धेनु पाण्यात जाऊन शिवलिंगावर दुग्धाभिषेक करीत असते हे आश्चर्य वाटून देवशर्माही गोपुच्छ धरून पाण्यात गेला, व तेथे शिवस्तुती करून धन्य झाला !

अघाशी तीर्थ का प्रसिध्द झाले आणि त्या तीर्थाने कोणाचे पाप नष्ट केले ? केरळ देशामध्ये भद्रसेन नावाचा एक प्रसिध्द अधर्मी वैश्यपुत्र होता. त्याने अधर्माने धन संपादन केले, धर्म मात्र कधी केला नाही. तो अत्यंत स्त्रैण व गर्विष्ठ, शिवाय, रोज दारूत व कुकर्मात गर्क असे. त्याला वनात काळसर्पाने दंश केला, तेव्हा त्याला यमदूतानी भयंकर ताडन करून व पाशबध्द करून यमालयी नेले. पुढे नरकात त्याने पुष्कळ दुःखे भोगली व तो राक्षस होऊन पुनः मृत्यु लोकात जन्मास आला.

तो पिशाच्च बुभुक्षित राक्षस वटवृक्षाच्या खाली उभा असता, शिवशर्मा नावाचा शिवभक्त ब्राम्हण कौण्डिण्यगोत्रोत्पन्न स्नान करून शिव विष्णु स्तोत्रे म्हणत शिवमंदिरात जाताना, तो राक्षस या ब्राम्हणास खाण्यासाठी त्याच्याजवळ गेला. त्या ब्राम्हणाने आपल्याकडील तुलसीमिश्रीत जल राक्षसावर टाकले.

त्या जलाचा संसर्ग होताच, त्या पिशाच्चाला ज्ञानप्राप्ती होऊन क्रौर्य नष्ट झाले आणि त्याने मुनि-चरणाना वंदन केले. हे पाहून शिवशर्म्याने त्याला विचारले की, 'तू कोण आहेस, कोठून आलास आणि कोणत्या कर्माने तू ब्रम्हराक्षस झालास हे सांग.'

त्या राक्षसाने पूर्ववृत्तांत निवेदन केला व विचारले, 'हे महामुने ! आपण कोठे जात आहात ?' शिवशर्मा त्या राक्षसास म्हणाला, 'मी ही फुले घेऊन शिवपूजेसाठी जात आहे. येथे प्रत्यक्ष शंकराचा मांगीश या नावाने वास आहे.'

त्याप्रमाणे ब्राम्हणाने त्याला शिवकथा सांगितली. राक्षसाने संचित पापामुळे आपणास हा देह मिळाल्याचे सांगून आपणासही तुझ्याबरोबर ने अशी ब्राम्हणास विनंती केली. ब्राम्हणाने त्यास अघाशी नदीवर नेऊन शिवसन्निध कपिलतीर्थात स्नान करविले, तोच त्यास शिवदूतासह विमान दिसले. तो त्या विमानात बसताच त्याचे तमोगुणी शरीर नाश पावले. त्यास रुद्ररूप प्राप्त झाले व तो कैलासास गेला. तेव्हा पासून ह्या नदीचे नाव अघाशी हे जगप्रसिध्द झाले. वरील कथाभाग मांगीश माहात्म्याच्या अध्याय सहा, सात व आठ मध्ये आहे व त्यातील माहिती वरून देवशर्मा, शिवशर्मा आणि मुलकेश्वर कोण यांचा परिचय होतो.

श्रीमंगेश देवाचे आद्यस्थान

श्रीमंगेश देवालयाचे आद्यस्थान, गोंवा प्रांतातील सासष्टी तालुक्यात अघनाशिनी नदीच्या पवित्र तीरावरील कुशस्थली या महान पुण्य क्षेत्रात होते. आज ह्या गावास कुठ्ठाळ म्हणतात. पुरातन काळी हे देवालय कुशस्थलीत ज्या मोठ्या वैभवात होते, त्याची आज कल्पनाही येत नाही. चारशे वर्षापूर्वीच्या पोर्तुगीज राजवटीतील दप्तरावरून अंधुकशी कल्पना येते. त्या देवालयाच्या मालकीच्या कुशस्थली व इतर गावात शेती, बागायती व कुळागरे अशा जमिनी होत्या. सोन्याचांदीचे दागदागिने, भरजरी रेशमी वस्त्रे वगैरे भारी किंमतीच्या नानाविध वस्तु होत्या. आणि देवालयातील मोठ्या घंटा, **चांदीच्या मोठ्या साखळदंडानी टांगल्या होत्या, असा उल्लेख त्यात सांपडतो.**

कुशस्थली तथा कुठ्ठाळ ह्या गावची ग्रामसंस्था (कोमुनिदाद) गावातील लोकानी स्थापन केली होती. तेच गावकरी ह्या ग्रामसंस्थेचे मालक होते व त्या सर्वांचा श्रीमंगेश देव असल्यामुळे, तो ग्रामसंस्थेचाही देव झाला.

गोमंतकात नाथ सांप्रदाय सुरू झाल्यावर श्रीमंगेशास 'मंगनाथ' व 'मंजीनाथ' ह्या नावानी संबोधण्यात येऊ लागले. साहजिकच ह्या देवालयातील उत्सव साजरे करणे व एकंदर खर्च करणे ह्याची जबाबदारी ग्रामसंस्थेकडे असे. त्याबद्दलचे पुरावे पुरातन ऐतिहासिक कागदपत्रात व सरकारी अधिकाऱ्यानी लिहिलेल्या ग्रंथात आहेत. फिलीप नेरी शाव्हियेर आपल्या 'बोस्केजु इस्तोरिक, दस कोमुनिदादीस' या ग्रंथात (पान २६३) लिहितो की, कुठ्ठाळ गावची ग्रामसंस्था श्रीमंगेश व पंचिष्ट देवता मिळून आपल्या गावातील सहाही देवालयाचा खर्च करीत असे.

अशा वैभवात व बडेजावात नांदत असलेले देवालय श्रीक्षेत्र कुशस्थली येथून आजच्या ठिकाणी म्हणजे फोंडा तालुक्याच्या प्रियोळ गावातील एका वाड्यावर स्थलांतर करण्याचा प्रसंग गोमंतकातील राजकीय परिस्थितीमुळे इसवी सनाच्या सोळाव्या शतकाच्या उत्तरार्धात आला. तो इतिहास जेवढा भयानक आणि चित्तथरारक आहे, तेवढाच आमच्या पूर्वजांच्या देवावरील अढळ श्रध्देची, महान् त्यागाची व अतुल धैर्याची साक्ष देतो.

तारीख २७ फेब्रुआरी १५१० रोजी फितुरी झाल्यामुळे पोर्तुगीज सेनापती आफोंस द आल्बुकेर्क याने गोवा शहरावर छापा घातला व ता. २६ नवंबर रोजी गोवे शहर आपल्या ताब्यात घेतले. काही महिन्यातच पोर्तुगीजांनी गोवा बेट (तीसवाडी) व त्या लगतची बेटे जिंकून शेजारच्या सासष्टी व बारदेश ह्या दोन तालुक्यांकडे दृष्टि वळविली.

आपण धार्मिक क्षेत्रात अजिबात ढवळाढवळ करणार नाही, असे त्यानी सुरवातीला आश्वासन दिले होते. परंतु, नंतरच्या कालात त्यानी पवित्रा बदलला. गोव्यातील खिरस्ती धर्माधिकाऱ्याने ता. १२ जानेवारी १५२२ रोजी पोर्तुगीज सरकारला लिहिलेले पत्र आंतोनियु द सिल्व्ह रेगु ह्याने आपल्या 'दोकुमेंतासांव पर

अ इस्तोरिअ दस मिस्सोंइस द पाद्रोआद्, पोर्तुगेज द्, ओरियेंत' (भाग पहिला, पान २०१) ह्या ग्रंथात प्रसिध्द केले आहे.

ह्या पत्रात त्याने लिहिले आहे की, 'जर ह्या बेटातील देवालये उध्वस्त करून त्या जागी चर्चेस उभारले गेले तर ईश्वरी सेवा घडेल... आणि ज्या कोणास ह्या बेटावर वास्तव्य करणे असेल, तर त्याने खिश्चन होऊन राहावे, आणि आपआपल्या जमिनीचा व घराचा उपभोग घ्यावा आणि खिस्ती धर्म नको असेल तर, त्याने हे बेट सोडून जावे.'

पुढील सरकारी धोरण त्या पत्राने ठरविले. हिंदूच्या छळास दिवसें दिवस धार चढू लागली, व त्यांच्या देवालयावर संक्रांत आली. पाद्रि लुसेन, सेंट फ्रान्सिस झेवियर ह्याच्या चरित्र ग्रंथात (पान ७४) लिहितो की, इ. सन १५४० पर्यंत मिगेल व्हाज या पोर्तुगीज पाद्रीने, गोवा बेटातील हिंदूंची सर्व देवालये जमीनदोस्त केली.

पोर्तुगालच्या राणीने लिस्बनला दि. २६ मार्च १५५९ रोजी काढलेले फर्मान दि. ६ अक्टोबर रोजी गोवा शहरात दवंडी पिटून जाहीर करण्यात आले.

ह्या हुकूमाच्या तारखेनंतर गोवा बेट व संलग्न बेटे येथे हिंदूची देवालये असणार नाहीत, त्यातील मूर्ति कोणत्याच घरात किंवा बाहेर असता कामा नयेत, त्या संपूर्णपणे उध्वस्त करून जाळून टाकण्यात याव्या, हिंदु धर्मातील धार्मिक कृत्ये घरात अगर बाहेर करू नयेत आणि ब्राम्हण, हरिदास व पुराणिक ह्यानी ह्या राज्याच्या हद्दीत राहू नये, असा राणीचा आदेश होता.

हुकूमाचा भंग करणाऱ्यास हद्दपारी, कारावास, इस्टेट जप्ती वगैरे शिक्षाही यात नमूद करण्यात आल्या होत्या. त्यानंतर बाटाबाटीस कोणतेच बंधन उरले नाही. ता. २ एप्रिल १५६० रोजी व्हॉइसरॉयचा हुकूम निघून पोर्तुगीज राज्यातील कित्येक सारस्वत ब्राम्हणास हद्दपार करण्यात आले.

ह्या आसुरी काळात गोव्यातील हिंदुपुढे दोनच मार्ग शिल्लक होते. खिस्ती धर्म स्वीकारा, नाही तर घरदार, जमीनजुमला वगैरेवर पाणी सोडून देशत्याग करा, असे फिरंगी राज्यसत्तेचे आव्हान होते. बऱ्याच हिंदु कुटुंबानी दुसरा मार्ग पत्करला. गोव्यातील आदिलशाहीच्या भागात व सौंदेकरांच्या फोंडा तालुक्यात काही कुटुंबांनी सोय लावून घेतली. बाकीची कारवार, कर्नाटक, मलबार वगैरे प्रांतात गेली.

गोवा बेटाची दक्षिण सीमा अघनाशिनी (जुवारी) नदीच्या तीरावर असल्यामुळे नदीच्या पलीकडच्या सासष्टी तालुक्यावर ह्या संहारशक्तीचा प्रहार होणे क्रमप्राप्त होते, कुठ्ठाळ हे तेथील महत्वाचे गाव असल्यामुळे, तेथील हिंदु जनतेच्या पोटात भीतीचा अक्षरशः गोळा उठला. केव्हा काय होईल याचा नेम नव्हता. तातडीने निर्णय घेतला पाहिजे हे ओळखून श्रीमंगेशाच्या कुशस्थलीतील कुळाव्यानी देवालयात गुप्त बैठक घेतली व देवानाच मार्ग दाखव अशी प्रार्थना केली.

त्याच रात्री त्याना दृष्टांत झाला की, 'माझे वास्तव्य सर्वत्रच आहे, तुम्ही साशंक होण्याचे कारण नाही. परंतु, तुम्हास शिवलिंग श्रीमंगेश प्रतिकाचे संरक्षण करावे असे वाटत असेल, तर ते लगेच उचलून ह्या क्षेत्राबाहेर तुम्हास पसंत असेल त्या मार्गाने न्या व ज्यावेळी लिंगास जडपणा येऊन ते पुढे नेणे अशक्य होईल, त्यावेळी ते खाली ठेवून त्याची पुनःप्रतिष्ठा करा.'

लगेच, प्रमुख महाजन जमा झाले. त्यानी त्याच रात्री, श्रीमंगेश शिवलिंग पालखीवजा झोळीत ठेवले. जेवढ्या अत्यावश्यक परिवार देवतांच्या मूर्ती किंवा प्रतिके बरोबर घेणे शक्य होते, तेवढ्या घेतल्या, आणि रात्रीच्या गडद अंधःकरात गुप्तपणे, अंत्रुज प्रांताचा रस्ता धरला.

कुठ्ठाळ्हून होडीने नदी ओलांडून पैलतडी आजच्या मेडकई जवळच्या तीरावर त्या देवदेवता घेऊन जाणे हे सोपे काम नव्हते. तेथून पालखी सारखी झोळी, खांद्यावर घेऊन भूक तहान वगैरेचा विचार न करता नेली व आताच्या मंगेशी वाड्यावर आणून ठेवली व तेथेच श्रीमंगेश शिवलिंगाची व परिवार दैवतांची पूजा अर्चा सुरू करण्यास प्रारंभ झाला.

कुशस्थली पासून प्रियोळ गावच्या भागात पालखीसारखी झोळी खांद्यावर घेऊन जाणे आणि तेही रात्रीच्या अंधारात धांवपळ करीत, हे एक दिव्यच होते. ज्यानी ते केले ते सर्व वत्स गोत्री कळावी महाजन होते अशी आख्यायिका आहे. त्यांच्या महान् कार्याचे महत्व ओळखून सर्व कळावी महाजनांनी त्यांचा बहुमान राखावा, ह्या इच्छेने, प्रतिवर्षी कार्तिक शुक्ल त्रयोदशीचे दिवशी श्रीमंगेश देवाची उत्सवमूर्ति श्रीविठ्ठल रखुमाई मूर्तीसह पालखीत बसवून ही पालखी, काला उत्सव मंडपातून तलावावर जाते व तलावाच्या काठावर ही पालखी ठेवण्यात येते.

नंतर पालखीतील श्रीविठ्ठल रखुमाईची मूर्ति देवस्थानचे ब्राम्हण पुजारी पैरीकर आपल्या पोटास एका शेल्याने घट्ट बांधून त्या मूर्तीसह तलावाच्या पाण्यात कमरेपर्यंत पाण्यातून तलावाच्या प्रदक्षिणा पांच फेऱ्या काढतात. त्याबरोबर देवस्थानच्या सेवेकरी गावडे जातीतील तरुण मुलेही पाण्यात पोहून जात येत प्रदक्षिणा काढतात. तलावाच्या कांठावरून कळावी महाजन भक्त मंडळी, कलावंतीणी, वाजंत्री वाद्ये वाजवून, तशाच प्रदक्षिणा काढतात. हा कार्यक्रम चातुर्मास समाप्ती बद्दल होत असतो. प्रदक्षिणा पूर्ण झाल्यावर श्रीविठ्ठल रखुमाईची मूर्ति देववस्त्राने पुसून, शृंगारून परत पालखीत श्रीमंगेश देवाच्या उत्सव मूर्ति सान्निध बसविली जाते.

नंतर ही पालखी तलावाच्या काठावरून एक प्रदक्षिणा घेऊन, वाटेत ठिकठिकाणी पेणी करीत करीत, देवालयात परत येई पर्यंत आपल्या खांद्यावरून पालखी वाहविण्याची सेवा करण्याचा अधिकार फक्त वत्स गोत्रीय कळावी महाजनास दिला आहे. ही प्रथा पुरातन कालापासून अव्याहतपणे चालू आहे.

श्रीमंगेश देवाचा मंगेशी येथे काला उत्सव, प्रतिवर्षी कार्तिक शुक्ल द्वादशी रोजी होत असतो. ह्या दोन्ही घटना ध्यानी घेता, श्रीमंगेश देवाचे सध्याच्या ठिकाणी, ज्या रात्री आगमन झाले, तो काल उत्सवाचा दिवस ठरला व ज्यानी श्रम घेतले त्यांचा बहुमान दुसरे दिवशी झाला, असे मानावे लागते.

आपला कुलदेव कायमचा प्रियोळ गावी गेल्यामुळे कुठ्ठाळ गावावर दुःखाची छाया पसरली. गोवा बेटावरील आपले इष्ट, मित्र, सगेसोयरे वगैरेंची जी गत झाली तीच आपली, देवाचे छत्र गेल्यामुळे होणार ह्या भीतीने मागे राहिलेल्या श्रीमंगेश देवाच्या कळावी कुटुंबानी स्थलांतर करण्याचे ठरविले. काही कुटुंबानी देवालयाच्या आश्रयाखाली राहावे या बुध्दीने मंगेशी, प्रियोळ, म्हार्दोळ, वेलिंग, कुंडई ते फोंडा ह्या परिसरांत साधले आणि जमेल तशी सोय करून घेतली.

काही कुंभारजुवे, नारवे वगैरे पोर्तुगीजांच्या हद्दीपलीकडील गोव्यातील इतर भागात गेली आणि काही गोव्याबाहेर गेली. श्रीमंगेश देवालयाच्या आसपास प्रियोळ गावात जी कुटुंबे स्थायिक झाली, त्यात केंकरे, धुमे, नाईक, कोलंबे (करंडे) वगैरे कुटुंबे असल्याचे दाखले श्रीमंगेश देवस्थानच्या दप्तरात मिळतात. ह्या वत्स गोत्रीय कुटुंबाप्रमाणे भांडारी, मंडुरकर, आरस व पावसे ही कौंडिण्य गोत्री घराणी आसपासच्या गावात स्थायिक झाल्याचेही पुरावे उपलब्ध आहेत.

श्रीमंगेश देवस्थानच्या जुन्या दप्तरात पुढील माहिती मिळते :–

"श्रीमंगेश देवाचे आगमनस्थान पूर्वी साहासष्ट येथील कुडथाळी उर्फ कुशस्थळ हा गाव असून शालिवाहन शकाचे १४८२ रौद्रनाम संवत्सरी अगर खिस्ती सनाचे १५६० सालात साहासष्ट प्रांतामध्ये पोर्तुगीज अगर फिरंगी सरकारचा अंमल चालू झाल्यानंतर हिंदु लोकांस खिस्ती धर्मात वळविण्याचे काम सुरू झाले. तोपासून आजतागायत श्रीचे वसतिस्थान मंगीश नामे वाड्यात झाले येथे महाजन यांचे आराधनेस पात्रीभूत आहे."

प्राचीन काली श्रीमंगेश देवस्थान कुशस्थलीत असताना मालमत्ता आणि सांपत्तिक स्थिती कशी होती ?

कुठ्ठाळ येथे श्रीमंगेश देवस्थान असताना त्या देवस्थानची सांपत्तिक परिस्थिती कशी काय होती, याचा शोध घेण्याचा प्रयत्न केल्याअंती गोवा सरकारच्या पोर्तुगीज कालीन दप्तरात, "फोराल द सालसेत"

या वहीच्या पृष्ट ४५६ ते ४६४ वर एक पंचनामा आढळला. जो पंचनामा ता. ५ मार्च इ. स. १५६८ रोजी कुठ्ठाळ गावात केला गेला होता.

त्या पंचनाम्याची कॉपी किंवा त्या दाखल्याचे कायदेशीर सर्टीफिकीट ता. २७ नवंबर १९५८ चे घेतलेले, आजच्या कालात, सध्याच्या प्रियोळ येथे असलेल्या श्रीमंगेश देवस्थानच्या दप्तरात आहे. हा पंचनामा ता. ५ मार्च १५६८ रोजी कुठ्ठाळ येथे तेथील देवस्थानच्या स्थलांतरा नंतर जी संपत्ती मागे राहिली, त्या संपत्तीचा पंचनामा, तत्कालीन गोव्यातील पोर्तुगीज व्हॉइसरॉय यांच्या हुकूमाने केला गेला असून, तो पंचनामा जज्जाच्या उपस्थितीत केला होता.

त्यात ज्या जमिनी देवालयांच्या मालकीच्या आणि त्याच्या सेवेकऱ्यांच्या भोगवटीच्या होत्या, त्या सर्व जमिनीची आणि मालमत्तेची तपशीलवार यादी केली गेली होती, त्या यादीत देवालयाची नावे व त्यांच्या सेवेकऱ्यांच्या जमिनी, गुरव, पेर्णी, जोशी, महार, सुतार, लोहार, रंगारी, मेर्गुरी, भट, घाडी, हिलामतदार, पालखी वाहीवणारे, नऊ रात्री देवालयात निजणारे, कुंभार, भांडारी (खजिनदार), अविवाहित नृत्यांगना, तसेच, देवालयास अर्पण केलेल्या जमिनी कुठ्ठाळ आणि कुठ्ठाळ गावाबाहेर असलेल्या, शिवाय, सोन्याचे दागिने, चांदीच्या वस्तु, रेशमी वस्त्रे, तांबे, पितळ व इतर धातूच्या घंटा **व त्या टांगण्यास वापरलेल्या चांदीच्या सांखळ्या** वगैरे वगैरे सर्व वस्तूंची यादी त्या पंचनाम्याचे वेळी करण्याचा हुकूम त्या जज्ज-कडून फर्मावला गेला होता.

या हुकूमावरून श्रीमंगेश देवालय कुठ्ठाळ येथे असताना त्या देवस्थानची मालमत्ता, ऐश्वर्य व सांपत्तिक स्थिती कशी होती, याचा अंदाज येणे कठीण नव्हे. त्या देवस्थानच्या मालकी हक्काच्या शेत-जमिनी, बागायती, कुळागरे खुद्द कुठ्ठाळ गावात जशी होती, त्याच प्रमाणे कुवेली, कांसावली, पाली, चिखली या गावातही होती.

श्रीमंगेश देवाचे कुठ्ठाळी गावामधून गावाबाहेर प्रयाण झाल्यानंतर त्या सर्व जमिनी देवालय इमारती-सह व्हाइसरॉयने कुठ्ठाळच्या खिरस्ती धर्मियाच्या चर्चेस भोगवट्यासाठी बहाल केले हे मागे सांगितलेच आहे. कीरता विस्तार भयास्तव त्या सर्व जमिनीची नावे, सविस्तरपणे येथे देण्याचे टाळले आहे.

गांवकार लोक (ग्रामस्थ) यानी प्रतिवर्षी सुपारीची सात झाडे (माड्या), प्रत्यंक देवालयास एक माडी म्हणजे सुपारीचे झाड, या प्रमाणे दिलीच पाहिजे होती.

(बहुतेक हे सुपारीचे झाड देवालयासमोर होलिकोत्सवासाठी असावे असे वाटते.)

गावकरी (ग्रामस्थ) यानी प्रतिवर्षी ४८ तांगें पांढरी पैकी २३ तांगें पांढरी नृत्यांगनास आणि १५ तांगें पांढरी वाजंत्री लोकांस द्यावी लागत. शिवाय, श्रीमंगनाथाच्या (श्रीमंगेशाच्या) देवालयास दर महि-न्यास १२ गिडे तेल गांवकऱ्यांकडून दिले जाई.

या देवालया शेजारी एक भुसारी मालाचे दुकान होते. परंतु ते दुकान नंतरच्या कालात चर्चच्या शेजारी झाल्याने भाड्यास कोणीच करीनासे झाले व उत्पन्न येईनासे झाले. पुढे ते मोडूनही गेले. त्याच प्रमाणे गांवकरी लोक (ग्रामस्थ) यानी प्रतिवर्षी देवालयात गायन करणाऱ्यास १५ तांगें पांढरी, तसेच रथासाठी ९॥ तांगें पांढरी, पेर्णी म्हणजे जागर करणाऱ्यास २४ बाझारक्या, बरगणी, २५ सुपाऱ्या आणि शंभर विड्याची पाने दिलीच पाहिजे होती.

कुठ्ठाळ येथे श्रीमंगेश देवस्थान असताना तेथे कोणती परिवार दैवतें होती ?

गोवा सरकारच्या पुरातत्व खात्यात पोर्तुगीज कालीन जे दप्तर आहे त्यात, "फोराल दे सालसेत" या सन १५६८ च्या वहीवर जो कुठ्ठाळ गावात केलेला ता. ५ मार्च १५६८ चा पंचनामा पृष्ठ ४५६ ते ४६४ वर आढळतो, त्यातील माहितीवरून कुठ्ठाळ येथे तत्कालीन दैवते खालीलप्रमाणे होती असे लक्षांत येते.

मंजीनातु- सांतेरी-केशंभू- वीर-कपेलासोर- नारायण (चंदिरनातु) बागोती-गोपिनातु. वरील नावे पोर्तुगीज लिपीत लिहिलेली असल्यामुळे, त्यांचा उच्चार कसा होता हे प्रत्यक्षात वाचकास कळण्यासाठी ती मराठीत जशाची तशी लिहिलेली आहेत. सध्याच्या प्रियोळ गावातील मंगेशी येथे, श्रीमंगेश देवस्थानात, ज्या देवता

स्थापित आहेत त्याचा व कुठ्ठाळ येथे जुन्या काली ज्या देवता होत्या, त्यांची एकमेकांशी जुळवाजुळव होते की काय, याचा विचार करता, असे दृष्टोत्पत्तीस येते की, जुन्या काळची मंजीनात् ही देवता आता श्रीमंगेश या नावाने, जुन्या काळची सांतेरी ही देवता आताही त्याच श्रीसांतेरी नावाने, जुन्या काळची केशंभू ही देवता श्रीनिरंकार किंवा श्रीक्षेत्रपाळ असावा की काय असा संशय येतो, जुन्या काळची वीर ही देवता आता श्रीवीरभद्र या नावाने आहे.

जुन्या काळची कपेलासोर (कपिलेश्वर) या नावाचे दैवत आज श्रीमंगेश देवस्थानात नाही, पण, मंगेशी-हून कवळेस जाताना वाटेत फोंडेहून पुढे कपिलेश्वरी म्हणून गाव आहे व तेथे श्रीकपिलेश्वराचे देवालय आहे, पण ते ही देवालय तेथे इ. सन १५६० वर्षापूर्वीच तेथे असल्याचे पुरावे असल्याने, कुठ्ठाळीहून गमन केलेला कपिलेश्वर हा नव्हे हे खचित सांगता येईल, व ते दैवत कुठे आहे, हे कळत नाही.

जुन्या काळची नारायण किंवा चंदिरनात् ही देवता आज श्रीमंगेश देवस्थानात श्रीलक्ष्मीनारायण नावाने, जुन्या काळची बागोति आता श्रीभगवती या नावाने आणि जुन्या काळची गोपिनात् ही देवता आता श्रीमुलकेश्वर या नावाने ओळखण्यात येतात. व तशाच नावानी प्रतिष्ठापना केलेल्या आहेत.

इतिहास कालात, कुशस्थलीस जी दैवते होती म्हणून सरकारी दप्तरात माहिती मिळते, त्या व्यतिरिक्त आणखी दैवते आजच्या कालात श्रीमंगेश देवस्थानात प्रतिष्ठित आहेत. उदाहरणार्थ :– श्रीगणपती-श्रीसूर्यनारायण- श्रीगरुड- श्रीकालभैरव- श्रीनिरंकार-श्रीनंदिकेश्वर- श्रीदेवशर्मा (श्रीग्रामपुरुष) वत्सगोत्री-श्रीशिवशर्मा (श्रीकौंडिण्य गोत्रीपुरुष)– श्री क्षेत्रपाळ ही दैवते आज श्रीमंगेश देवस्थानात स्थापित असलेली, जुन्या काळी कुशस्थली स्थापित असलेल्याची लेखी पुराव्याची माहिती अद्याप तरी उपलब्ध नाही. पण, ती कुशस्थलीस असणे शक्य वाटते. कारण, तेथे ती दैवते नसताना उगीच कारणाशिवाय नवी दैवते आमचे पूर्वज नव्याने स्थापन करतील असे वाटत नाही.

कुठ्ठाळ येथे श्रीमंगेशाचे देवालय असताना त्या वेळी कुठ्ठाळ गावची ग्रामसंस्था (कोमुनिदाद) तेथील देवालयाचा खर्च करी. कारण, त्या ग्रामसंस्थेचे सभासद तेच श्रीमंगेश देवालयाचे कुळावी महाजन होते. पुढे देवाचे इ. सन १५६० सालात खिरस्ती धर्मप्रसारकांच्या छळाच्या भीतीने, स्थलांतर कुठ्ठाळीहून प्रियोळ गावी झाले, त्यावेळी ग्रामस्थ हिंदु काही पळून पोर्तुगीज सरहद्दी बाहेर गेले म्हणून हिंदु-धर्मीय राहिले. पण, पळण्यापूर्वी पकडून ज्यांस बळजबरीने बाटीवले, ते खिरस्ती धर्मीय झाले.

कुठ्ठाळीस ग्रामसंस्थेचे एकंदर वांगड चोवीस होते व तेथील श्रीमंगेश देवस्थानच्या कुळावी महा–जनांचेही चोवीस वांगड होते तेच चोवीस वांगड देवस्थानचे स्थलांतर प्रियोळास झाल्यानंतरही देवस्थानचे चोवीसही वांगड टिकून राहिले. पण कुठ्ठाळीस ग्रामसंस्थेच्या चोवीस वांगडातील काही वांगडांचे ग्रामस्थ जे बाटीवले गेले ते खिरस्ती धर्मीय बनले गेले. मात्र त्यातील एकाच वांगडाचे ग्रामस्थ "धुमे" उपनावाचे वत्स गोत्रीय हेच हिंदुधर्मीय, कुठ्ठाळ ग्रामसंस्थेचे म्हणजे कोमुनिदादीचे गांवकार, कोंपोनेंत सभासद टिकून आहेत व श्रीमंगेश देवालयाचे कुळावी महाजन आहेत.

जुन्या काळच्या कुठ्ठाळ ग्रामसंस्था (कोमुनिदाद) दप्तर तपासता त्यात अशी माहिती मिळते की, ती कुठ्ठाळ ग्रामसंस्था आपल्या गावात असलेल्या सहा देवालयाचा सर्व खर्च करी. ती देवालये-मंजीनाथ, सांतेरी-खेरियाबुस (केशव ?), रामेश्वर नारायण आणि भगवती. या सहा नावामध्ये असलेली खेरियाबुस (केशव ?) आणि रामेश्वर ही दोन दैवते मागे उल्लेख केलेल्या पंचनाम्यात नाही. तेव्हा ही काहीतरी चुकभूल असावी. शिवाय या नावाची दैवते आज श्रीमंगेश देवस्थानातही नाहीत.

कुट्ठाळ येथे श्रीमंगेश देवस्थान असताना त्यावेळी तेथे असलेल्या काही सेवेकऱ्यांची नांवे

मंगू भट-नारायण भट-दुगो भट-मांगोरस (मांगिरीश) भट-दुलो भट-रामू भट-बाळो भट अभिषेकी-आबुलो भट-मंगू भट-बाळ भट-झुल भट-दुलू भट-लख्या भट-शंकर भट-हरी भट-बना घसास-बोरख गुरव, मलू धुमाळी-केशव-मांगो मेर्गुरी.

कुठ्ठाळ ग्रामसंस्था (कोमुनिदाद) दप्तरात, इ. स. १६४१ सालच्या वहीत, त्या ग्रामसंस्थेचे सभासद असलेल्यांची काही उपनावे जी सध्या श्रीमंगेश देवस्थानाच्या कुळावी महाजनांची आहेत.

भेंडे– लाड– कॅसरे– राजाध्यक्ष– नायक– वागळे-करंडे- कंटक- सत्यवंत– धुमें– नेत्रावळी (नेत्रावळकर) केंकरे– भांडारी.

वरील उपनावांच्या इसमांची संपूर्ण नावे लिहिताना ती अशा प्रकारे लिहिलेली आढळतात की, प्रारंभी त्यास बाटवून ठेवलेले नाव व त्यापुढे त्याचेच पूर्वाश्रमीचे नाव लिहिलेले आहे. उदाहरणार्थ नमुन्यासाठी पहा :–

आंद्रे दे मिनेझीस दिवोगु दे मिनेशीस भेंडो (भेंडे) याचा पुत्र.

आंतोनियु आंतांव, फेर्नांव आंतांव लाडू (लाड) याचा पुत्र.

आंतोनियु फेर्नांदिस सांतु शेणवी कॅसरो (कॅसरे) याचा पुत्र.

आंतोनियु व्हियेरु फ्रांसिस्क व्हियेरु राजादेकु (राजाध्यक्ष)

फ्रांसिस्कु पेरेर-जुवांब पेरेर वागुलो (वागळे) याचा पुत्र.

जेरोनिमु मास्कारेंजस किता नायक काराडो (करंडे).

जुवांब लोबु आंतोनियु लोबु कोंटोक, (कंटक) याचा पुत्र.

मानुयेल दे सा सातवंतु (सत्यवंत).

मानुयेल दे साल्दांजु- मांगु शेणें धुमो (धुमें) याचा पुत्र.

सिमांब दे सा-अंता शेणें नेत्राउली (नेत्रावळकर) याचा पुत्र.

दुमिंगिस फेर्नांदिस रवळू शेणें केंकोरोस (केंकरे)

सासष्टी तालुक्याच्या कुठ्ठाळ गावातून फोंडा तालुक्याच्या प्रियोळ गावात सध्याच्या श्रीस्थळ मंगेशी वाड्यावर स्थलांतर नक्की कोणत्या साली झाले त्याबद्दलचे स्पष्ट पुराव्यासह माहिती.

सासष्टी तालुक्यातून अंत्रुज महालात, आजच्या फोंडा तालुक्यात हिंदु देवतांचे स्थलांतर नक्की कोणत्या साली झाले असावे, याबद्दल नानाविध मते व तर्कवितर्क अनेक ठिकाणी वाचनात येतात. सर्वच देवते एकाच बरोबर एकाच दिवशी सासष्टीतून स्थलांतर करून गेली हे जसे शक्य नाही आणि बरोबर नाही, त्याच बरोबर इतके तरी खरे असलेच पाहिजे की, ती देवते साष्टीत जेझुइट पंथाच्या खिरस्ती धर्म प्रसारकानी अनीन्वित छळ केलेला, मूर्ती आणि देवालयाच्या इमारती विध्वंस करण्याच्या कामाचा प्रारंभ झाल्याचा पाहिल्यानंतर किंवा तसे करण्याचा सुगावा संबंधित देवतांच्या हितसंबंधियाना लागल्यानंतर, त्या देवतांचे अविलंबे, अचानकपणे, रात्रीच्या काळोखात, सासष्टी तालुक्याबाहेर त्या कालच्या पोर्तुगीज सरहद्दी बाहेर स्थलांतर झाले, असे मानणे क्रमप्राप्त आहेच.

आणि ज्या देवतांचे स्थलांतर अविलंबे अचानकपणे गुप्तीरत्या घडू शकले नाही, मग ते कोणत्याही कारणामुळे का असेना, ती देवते किंवा त्यांच्या मूर्ती ज्या जागच्या जागी राहिल्या, त्याच त्या जेझुइत पंथाच्या खिरस्ती धर्म प्रसारकांच्या हातात सापडल्या आणि त्यांनी त्यांचा विध्वंस केला जाणे शक्य आणि उघड आहे.

आणि एक गोष्ट निश्चितपणे ग्राह्य मानली पाहिजे व ती ही की, कुशस्थली (कुठ्ठाळ) च्या बाबतीत तरी असे क्रमप्राप्त ठरते की, कुठ्ठाळ येथे खिरस्ती धर्मीयांची जी इग्रेंज म्हणजे चर्च बांधली गेली, ती प्रत्यक्षपणे पूर्वी ज्या जागेवर श्रीमंगेशाचे देवालय होते, त्या जागेवरच बांधली गेली आहे.

याबद्दल सरकारी म्हणजे त्यावेळच्या जेझुइत पाद्री मंडळाच्या पत्रसंग्रहावरून व इतरही पुराव्यावरून स्पष्ट आणि निःसंशयपणे सिध्द होते. म्हणून, त्या कागदपत्रातील मजकुराचा आवश्यक भाग, त्याच-

प्रमाणे कुठ्ठाळी गावात जी इग्रंज किंवा चर्च आहे त्या चर्चच्या इतिहासातील आवश्यक भाग, तसेच, हे खिरस्ती धर्मवेडे जेझुइत पाद्री मंडळ, नक्की कोणत्या दिवशी, सासष्टीतील कुठ्ठाळ गावात, कोणत्या मार्गाने आले व त्याने पहिल्याच खेपेस कुठ्ठाळ गावात कोणत्या दिवशी पाय ठेविला, याचे साद्यंत सविस्तर पृथक वर्णन त्याकाली त्याच जेझुइट पाद्री मंडळाने गोव्याहून पोर्तुगालास जी पत्रे पाठीवली होती, तो सर्व पत्रसंग्रह लिस्बन शहरात एकत्र करून त्यात त्या वेळच्या गोव्याच्या सरकारी दप्तरातील अनेक घटना समाविष्ट करून कोंपाजीय दे जेझुसचा समग्र इतिहास, त्या कोंपाजीय दे जेजुसच्या पाद्री लोकानी पोर्तुगालची राजधानी लिस्बन येथे "ओरियेंतु कोंकिस्तादु" या नावाचा मोठा ग्रंथ इ. सन १७१० साली, त्या वेळच्या राजघराण्याचा जो छापखानदार "व्हालेंती दा कोस्त दिस्लांदिस" याकडून प्रसिध्द केलेला आहे, त्या ग्रंथात विशेषतः ज्या पाद्री इसमानी सासष्टी प्रांतातील कुठ्ठाळ गावात प्रथमतःच प्रवेश केला होता, त्याच पाद्री इसमांची तपशीलवार कृत्ये त्यात सविस्तर प्रकारे त्यावेळच्या माहितीपूर्ण पत्रावरून पूर्णपणे लक्षात येतात.

"ओरियेंतु कोंकिस्तादु" या इतिहास ग्रंथाच्या पहिल्या भागात इ. सन १४९८ ते १५६३ व दुसऱ्या भागात इ. सन १५६४ ते १५८५ पर्यंतच्या कालात ज्या ज्या घटना त्यावेळी कोंपाजीय दे जेझुसच्या पाद्री मंडळाने घडवून आणल्या, त्यांचा समग्र वृत्तांत त्यात आहे. त्या ग्रंथाच्या पहिल्या भागाच्या पृष्ठ १६९ वर जो मजकूर पोर्तुगीज भाषेत तत्कालीन जुन्या लिपीत आहे. त्याचे मराठीत भाषांतर वाचकाच्या सोयीसाठी संक्षिप्तपणे खाली दिलेले आहे :-

"आम्ही गोवा बेटाच्या दक्षिण बाजूस जल प्रवासाने सासष्टीकडे चाललो. जेथे ता. १ मे १५६० रोजी पहिलेच मिशनरी कंपनीचे पाद्री पेद्रु मास्कारेंजस आणि त्याचा सोबती मानुयेल गोमीस या दोघानी समाधानपूर्वक पाय ठेविला. हे दोघे पाद्री, पेद्रु मास्कारेंजस आणि मनुयेल गोमीस, यांस पाद्री प्रोव्हिंसिअल (पाद्री वरिष्ठ अधिकारी) आंतोनियु दे क्वाद्रुस याने व्हिस्सू रे दों कोंस्तांतिनु दे ब्रागांस यांच्या आग्रहावरून पाठविले होते. सासष्टीचे दक्षिण दिशेचे शेवटचे टोक, जिथे मुरगांवचा किल्ला आहे, ते नोस्स सिंजोर दे काबु टोकापासून म्हणजे गोवा बेटाच्या पश्चिम टोकापासून मध्यंतरी समुद्राचा फाटा व तो पाण्याचा प्रवाह अनुकूल असल्यास अवघ्या अर्ध्या तासात ओलंडता येईल...."

पृष्ठ १७६ वरील मजकूराचे संक्षिप्त भाषांतर असे आहे :-

"(सासष्टीतील पहिला मिशनरी आणि पहिला खिरश्चन)"

पाद्रि पेरू मास्कारेंजस व त्याचा सोबती यानी सां फिलीप आणि सां तियागु या संताच्या दिवशी सासष्टीतील कुडथाळ गावात सकाळच्या प्रहरी एक लहानसा मंडप झाडाच्या फांद्यानी उभारला. कारण, हाच पहिला गाव, ज्या गावात पहिल्यानेच त्यानी पाय ठेविले व तेथे मिस्स म्हणजे ईश प्रार्थना करून आषण चालविलेल्या धर्मकार्यात परमेश्वराची, यश संपादन होण्याबद्दल मागणी चालविली.

या गावाहून पुढे ते राशोल (रायतूर) किल्ल्याकडे गेले. ज्या किल्ल्यात एक लहान कपेल (छोटेसे चर्च) होते व तेथे पोर्तुगीज मिलीटरी सोल्जर व काही स्थानिक खिरश्चन, ज्यांचा व्यवसाय त्या किल्ल्यातच असे ते सर्व लोक मिस्स (ईश प्रार्थना) ऐकत असत. तिथे एक क्लेरिगु म्हणजे ईश प्रार्थना करण्यास परवानगी दिलेला इसम त्या ईश प्रार्थनेसाठी हजर राहत असे.

कारण, त्यावेळेपर्यंत सबंध सासष्टीमध्ये बाप्तीस्मा घेतलेला एकही बिनलष्करी इसम नव्हता व कदाचित तसा मनुष्य किंवा धर्मोपदेशकाचा किताब मिळालेला एखादा इसम तिथे होता, असे जरी गृहीत धरले, तरी तोही तेथून परत गेलेला असावा आणि म्हणून पाद्री पेरु मास्कारेंजस याने त्या कपेलाचा ताबा घेतला.

नंतर त्या किल्ल्यातून निघून ईश्वरी विश्वासाच्या जोरावर सभोंवतालच्या गावात खिरस्ती धर्मप्रचार करून बरेच हिंदू बाटविले. इ. स. १५६१ च्या शेवटास तो "मालुकस" येथे आपल्या मिशनचे कार्य व आपले जिवीत खिरस्त सेवेस अर्पण करण्यासाठी गेला. त्याचा इतिहास पुढे कोंकिस्त दुसऱ्या भागात इ. स. १५८२ मध्ये कथन करीन."

याच "ओरियेंत् कोंकिस्ताद्" ग्रंथाच्या दुसऱ्या भागाच्या पृष्ठ २० वर जो मजकूर आहे त्याचे संक्षिप्तात भाषांतर असे आहे :–

"इ. स. १५६६ कुडथाळ गावच्या बातम्या :– १३ मे इसवी सन १५६६ साली कुठ्ठाळ गावात चर्च आणि मिशनरी कंपनीचा धर्मोपदेशक (व्हिगारियु) होता व ता. १ मे रोजी त्या चर्चमध्ये पहिलेच मिस्स (ईश प्रार्थना) त्यानी केले. कुठ्ठाळ हा सासष्टीतील गाव गोवा बेटाच्या समोर आहे व तो काम्र जेरालच्या बारा गावापैकी एक होय. याच गावात आमच्या मिशनऱ्यांनी पहिल्यानेच आपले पाय इ. स. १५६० साली सां फिलीप व सां तियागु या संतांच्या दिवशी (१ मे रोजी) रोविले व तीच देवता त्या चर्च (इगर्ज) मध्ये स्थापिली.

"कुठ्ठाळ्कर इसम जुन्या काळी फार देवभक्त असून आपल्या देवाची फार निष्ठेने भक्ती करीत. कुठ्ठाळ हा गाव म्हणण्यासारखा एरवी मोठा विस्तीर्ण नव्हे. पण, असे असूनही तेथील पुष्कळ जमिनी देवालयाच्या मालकीच्या आहेत. आणि याचे कारण, कुठ्ठाळ्कर कायद्याचे ज्ञान व लेखणीबहाद्दर असल्यामुळे ते आपल्या कर्तबगारीवर पैसा मिळवून परत आपल्या गावी श्रीमंत होऊन कुठ्ठाळ येथे परतत. आणि आल्यानंतर जमिनी विकत घेऊन देवालयास अर्पण करीत व अशा प्रकारे आपले नाव चिर--स्मरणीय करीत. या सगळ्या कुठ्ठाळ्कर लोकांस शेणैं (शेणवी) हा किताब आहे. याचा अर्थ विद्वान शिक्षक. कोंकणातील गावामध्ये हेच लोक इत्तर ब्राम्हण लोकास लिहिणे, वाचणे व गणित शिकवीत असत."

वर उल्लेखिलेल्या "कोंपाजीय दे जेझुसच्या" त्या काळी लिहिलेल्या व गोव्याहून पोर्तुगालास पाठविलेल्या अत्यंत महत्वाच्या कागदपत्रातील मजकूरावरून स्पष्ट व निःसंदिग्धपणे खालील गोष्टी समजून येतात :–

१. खिरस्ती धर्मप्रसारार्थ 'कोंपाजीय दे जेझुसचे' पाद्री मंडळ गोवा बेटातून सासष्टी प्रांताकडे जे गेले, ते प्रथमतःच इ. स. १५६० साली. त्या पाद्री मंडळाचा प्रवास गोवा बेटापासून सासष्टी प्रांताकडे जलमार्गाने झाला. त्या पाद्रीनी सासष्टी प्रांताच्या मुरगाव टोकाकडे किल्ला आहे, तेथून ते काबोच्या समुद्र फाट्यातून प्रवास करीत सां फिलीप व सां तियागु या संतांच्या दिनी म्हणजे ता. १ मे रोजी सकाळच्या प्रहरी, प्रथमच कुठ्ठाळ गावात पाय ठेविला. हा (तारीख १ मे) दिवस त्या दोन संतांचा दिवस असल्यामुळे त्या कुठ्ठाळ गावात जी चर्च (इग्रेज) उभारली गेली, त्या चर्चमध्ये आराध्यदेवता म्हणून त्याच दोन संताची स्थापना केली.

२. इ. स. १५६६ सालात कुठ्ठाळ गावात चर्चची इमारत पूर्णावस्थेत होती व तेथे कोंपांजीय दे जेझुसचा व्हिगारियु (पाद्री धर्मोपदेशक) होता. त्या व्हिगारियु धर्मोपदेशकाने ता. १ मे १५६६ या दिवशी त्या इग्रेजमध्ये म्हणजे चर्चमध्ये मिस्स (ईश प्रार्थना) सांगितली. कारण, ती १ मे तारीख म्हणजे त्या तारखेस सासष्टी प्रांतात व तेही कुठ्ठाळ गावातच प्रथमच मिशनरी पाद्री मंडळाने आपला पाय ठेविलेला स्मारक दिन.

आता, यापुढे, आणखी याच्यापेक्षाही महत्वाच्या घटनावर पूर्णपणे प्रकाश पाडणारे दाखले-कागदपत्र-पुरावे पाहिल्यानंतर कुडथाळी गावातून श्रीमंगीश देवाचे लिंग लपवून सासष्टी प्रांताच्या हद्दीबाहेर आदिलशाही मुसलमानाच्या हद्दीत नेले. श्रीदेवाचे तेथून स्थलांतर झाल्यावर त्या देवालयाची रिकामी इमारत त्या वेळी जेझुइत पाद्रीनी चर्च स्थापन करण्यास सरकारकडून मंजूरी मिळविली व चर्चच्या उपयोगात आणिली व नंतरच्या काळात त्याच जागी मूळची इमारत मोडून नवी, चर्चसाठी इमारत केव्हा, कोणी, कोणाच्या खर्चाने बांधिली वगैरे बद्दल स्पष्टपणे समजून येते.

Monumenta Historica Sociolatis Iesu-DOCUMENTA INDICA Edit-Ioseph Wicki S.I. (Vol. VII) (1566-1569 (Romae-Apud 'Monumenta Historica Soc. Iesu' Via Dei Panitenzieri 20-1962. हा अत्यंत महत्वाचा ग्रंथ रोममध्ये छापलेला असून त्या ग्रंथाचे काही भाग आहेत. हा ग्रंथ म्हणजे मिशनरी सोसियेदाद दे

जेझुइसच्या मिशनरी पाद्री मंडळाने सुरवातीपासून शेवटपर्यंत ज्या ज्या भूमीत पाय ठेविले, जी जी कृत्ये केली, ज्या ज्या घटना घडविल्या, त्यांची तारीख, महिना, सन, जागा वगैरे साद्यंत रिपोर्ट लिहून त्या पाद्री मंडळाच्या रेक्टरने किंवा रेक्टरच्या हुकूमानुसार व परवानगीने कार्यकर्त्या दुसऱ्या पाद्रीने, गोव्याहून पोर्तुगालास जी पत्रे पाठीवली तो सर्व अस्सल पत्रसंग्रह या ग्रंथात छापलेला आहे. एकंदरीत हा ग्रंथ म्हणजे मिशनरी सोसियेदाद दे जेझुसच्या समग्र इतिहासाचा भक्कम पुरावाच मानला जातो. या ग्रंथाच्या भाग ७ वा, पृष्ठ ६२ वर माजीन नंबर ७४५ वर जो मजकूर आहे, त्याचे मराठी भाषेत संक्षिप्त भाषांतर असे आहे :–

"यापूर्वीच काही (देव) लपवून दुसऱ्या राज्यात (हद्दीत) नेले असून त्यांची देवालये निराधार स्थितीत ठेवली आहेत. आमच्या पाद्रींनी त्यातील एका देवालयाच्या इमारतीची मागणी केली. कारण, त्या इमारतीत चर्च स्थापन करण्याचे योजिले. ती इमारत चर्चसाठी वापरण्यास मंजूरी तर दिलीच. पण, त्या बरोबर देवालयास जे उत्पन्न होते, तेही चर्चच्या भोगवट्यासाठी बहाल केले.

मूळ देवालयाची इमारत आता चर्चसाठी योग्य अशा प्रकारे केली व स्वच्छही केली. एक दिवस त्या जागेवर पाद्री प्रॉव्हिंसियाल (वरिष्ठ अधिकारी पाद्री) व पाद्री फ्रांसिस्क रोद्रिगीस हे दोघे स्वतः जाऊन ती इमारत व स्वच्छता वगैरे पाहून आनंद व समाधान व्यक्त करून परतले.

परमेश्वरी कृपेने नजीकच्या दिवसात त्या चर्चमध्ये पहिले मिस्स गायन केले जाणार आहे. ही चर्च या (गोवा) बेटाच्या पैलतीरावर सासष्टीतील जमिनीत, एका थंड ठिकाणी आहे. हा मजकूर पाद्री गोमिस व्हाज याने सां पावलु कॉलेज गोवाचे रेक्टर पाद्री आंतोनियु दे कोस्त यांच्या तर्फे सही करून गोव्याहून ता. २९ नोव्हेंबर १५६६ रोजी जे पत्र लिहिले (म्हणजे दाखला नं. १६) त्या पत्रातील असून ते समग्र पत्र पृष्ठ ३८ ते ७१ पर्यंत, भाग ७ वा "दोकुमेंता इंदिका" या ग्रंथात छापलेले आहे.

या पुढच्या माजीन नंबर ७६५ पुढे असलेल्या मजकुराचे मराठी संक्षिप्त भाषांतर असे आहे.

"६५ गेल्या साली म्हणजे इ. स. १५६६ साली, आपण कळलेच आहे की, ज्या देवालयातील देव हिंदूनी यापूर्वीच दुसऱ्या मुसलमानी राज्याच्या हद्दीत नेले होते, त्या देवालयाच्या मूळ जागेवरच पाद्रींच्या प्रयत्नानी नवीन इग्रेज (चर्च) बांधिली आहे. (हा देव म्हणजे मंगेश (मंगनाथ) मूळ कुड-थाळीचा, आता जो प्रियोळ-फोंडा नवीन कबिजादीत आहे. ब्रागांस पेरैर यानी लिहिलेले "अ इंदिय पोर्तुगेज" १-४५ पिसुर्लेकर, तोंब १७२)

गेल्या मे महिन्यात तिथे पहिले मिस्स गायन, दियाकोनु, सुबदियाकोनु या अधिकारी पाद्रीसह, ऑर्गन, चर्मेला व इतर म्युझिक वाद्यांसह झाले व ते पाद्री फ्रांसिस्क रुद्रीगीश यानी कथन केले."

त्या पुढील माजीन नंबर ७८५ पुढे असलेल्या मजकूराचे मराठी संक्षिप्त भाषांतर असे आहे :–

"एकंदरीत हा उत्सव उपस्थित मंडळीच्या आनंदात भर घालणारा झाला व त्याच दिवशी संध्याकाळी एक बाप्तिस्मा समारंभही झाला. त्याबद्दल उल्लेख पुढे करीन. ही घटना त्या नशिबवान सां तियागु आणि सां फिलीप या दोन संताच्या दिवशी झाली. ज्या संतांच्या स्मरणार्थ व गौरवार्थ ती इग्रेज (चर्च) उघडी आहे. (तो संतांचा दिवस १ मे)."

कुठ्ठाळ येथे पूर्वीच्या देवालयाच्या जागेवरच इग्रेज (चर्च) उभारले व सध्या तेथे असलेली इग्रेज (चर्च) ची इमारत केव्हा, कोणी खर्च करून बांधली, याबद्दल आणखी काही जास्त पुरावा आहे.

गोमंतकात जुन्या काळापासून ज्या ग्रामसंस्था म्हणजे आज ज्याना आपण कोमुनिदादी म्हणून ओळखतो, त्या प्रत्येक ग्रामसंस्थेच्या गावात, त्या गावकऱ्यांचे देवालय होते व त्या देवालयाचा खर्च, उत्सव वगैरे त्या त्या ग्रामसंस्थेच्या उत्पन्नातून होई. बाटाबाटीनंतर हिंदु दैवतांचे स्थलांतर झाले. देवालयाच्या मूळ जागेवर खिश्चनानी चर्च स्थापिली. देवालयाचे उत्पन्न चर्चसाठी बहाल झाले.

पण, या ग्रामसंस्था किंवा कोमुनिदादी संबंधी जास्तीत जास्त माहिती एकत्र जमवून, फार वर्षापूर्वी फिलीप नेरी शाव्हियेर या इसमाचे 'बोस्केजु इस्तोरिकु दस कोमुनिदादीस' नावाचा सर्व कोमुनिदादीचा

एक इतिहास लिहिलेला आहे. या पुस्तकात कुठ्ठाळ गावच्या कोमुनिदादीच्या संदर्भात जी माहिती प्रसिध्द झालेली आढळते, ती पुढे दिली आहे. त्या पुस्तकाच्या पृष्ठ ३२१ वर जो मजकूर आहे त्याचे संक्षिप्तात मराठी भाषांतर असे आहे.

"बोस्केजु इस्तोरिक, दस कोमुनिदादीस" लेखक- फिलीप नेरी शाव्हियेर पृष्ठ ३२१. कुठ्ठाळ चर्चची इमारत, जुन्या श्रीमंगेश देवालयाच्या भूमीने व्यापिलेली आहे. तिची बांधणी गावाच्या जमावाने स्वखर्चाने केली गेली व तिचे नेतृत्व पाद्री फ्रांसिस्क आरांज, म्हणजे गोव्याचा पहिला आर्चबिशप दो गास्पार त्याचा भाचा, जो नंतरच्या कालात कोंपाजीय दे जेझुस या संघटनेत शिरला व कुंकळी येथे हुतात्मा ठरला. त्या इसमाने केलेले त्या चर्चमध्ये पहिले मिस्स गायन इ. स. १५६७ साली झाले.

पृष्ठ ३२२ :– चर्चच्या इमारती पासून अवघ्या सव्वाशे पास्तांच्या अंतरावर (पास्स म्हणजे मनुष्य चालत असताना एका पावलापासून दुसरे पाऊल जिथे टाकतो, त्यामधील अंतर) एक क्रॉस होता. व त्याच्या पायाजवळच्या चौथऱ्याकडे एका शिलेवर जो मजकूर कोरलेला होता, त्याचे मराठी भाषांतर असे आहे.

"या जागेवर पहिलेच मिस्स गायन (ईश प्रार्थना) सांगितले व इथेच सासष्टीत पहिला क्रॉस ठेविला. शुध्द पावन आत्मे देवभक्तांकडे याचना करतात की, त्यानी आपली सदैव आठवण ठेवावी."

सदर मिस्स ता. १ मे १५५२ रोजी झाले असे कळते. व वर लिहिलेला मजकूर, ज्या शिलेवर होता, ती शिला तो क्रॉस मोडून गेल्यामुळे (जमीनदोस्त झाल्यामुळे) चर्चच्या इमारतीत जिथे धार्मिक वस्तु ठेवण्यात येतात त्या जागेत ठेवण्यात आली."

सध्याच्या कालात (इ. स. १९७० मे महिन्यात) मुद्दाम कुशस्थली (कुठ्ठाळ) या गावात स्वतः जाऊन तेथे सद्यः स्थिती पाहता, असे आढळून आले की, हा क्रॉस मुळच्याच जागी परत नवीन बांधणी करून उभा केला आहे. त्या क्रॉसवर जुनी पाषाणी शिला (म्हणजे उल्लेखित शिलालेख) परत बसविलेली आहे. पण, ती त्या क्रॉसच्या पायाजवळ नसून क्रॉसचा जो चबुतरा आहे, त्या चबुतराच्या मध्यभागी बसविलेली आहे.

या चबुतऱ्याच्या शिरोभागी क्रॉसच्या खालीच १८५६ असे कोरलेले आहे. यावरून हा क्रॉस प्रारंभी इ. स. १८५६ साली बांधला होता असे दिसते. चबुतऱ्याच्या खालच्या भागावर १-५-१५६० – १-५-१९६० असे चुन्याच्या गिलाव्यावर कोरलेले आहे त्या वरून या क्रॉसची पुनर्बांधणी ता. १ मे १९६० रोजी केली असावी. हा क्रॉस कुठ्ठाळ फेरीबोट बंदरावरून कुठ्ठाळच्या चर्चकडे जाताना चर्चच्या अलीकडे प्रमुख रस्त्याच्या उजव्या बाजूस एक लहान कपेल (अगदी लहानसे चर्च) आहे, त्या कपेला शेजारी असून, त्या क्रॉस पासून कुठ्ठाळ गावाची इग्रेज (चर्च) म्हणजे जुन्या काळी ज्या जागेवर श्रीमंगेश देवाचे देवालय होते, ती जागा एकशे पंचवीस पास्सांवर आहे (आजच्या कालात म्हणजे इ. स. १९८४ सालात कुठ्ठाळ आगशी मध्ये जुवारी नदीवर पूल बांधणी झाल्यामुळे कुठ्ठाळ येथे फेरीबोट बंदर नाही.)

पृष्ठ ३२३– "पेद्रु फ्रांसिस्क मास्कारेंजस, सासष्टीत जन्मलेला, याला ता. १ मे १५५२ या दिवशी, पहिलाच हिंदु यास ख्रिस्त धर्माची दीक्षा देण्याचे काम, त्याच नावाचा जेशुइत पाद्रि याने केले. हा पेद्रु फ्रांसिस्क मास्कारेंजस कुठ्ठाळ ग्रामसंस्थेच्या दुसऱ्या वांगडाचा गावकरी होता व शिवाय, तो 'कामर जेराल' चा कायम लेखनिक (चिटणीस) होता. त्याचे वंशज आज राय गावात 'वेजोरो'चा वाडयावर राहतात."

पाद्री मरियानु रुद्रिगीस आणि साल्व्हादोर दु रोझारियु रुद्रिगीस हे दोघे इसम, आपआपले दाखले (सर्टीफीकेट) सादर करून आपण कुठ्ठाळ ग्राम संस्थेच्या पाचव्या वांगडाचे म्हणजे 'वागळ' नामक वांगडाचे वारस व हक्कदारपणाची मागणी केल्याचे व ही मागणी नामंजूर केल्याचे ता. २३ जुलै १८०२ साली हायकोर्टाने दिलेल्या निकालावरून कळते.

आणखी थोडीशी माहिती अशी :–

कुठ्ठाळ गावात जी इग्रेंज किंवा आता सध्या चर्च आहे. त्या चर्चच्या संबंधीची, तेथील खिरश्चन ग्रामस्थानी इ. स. १९५९ साली, त्यावेळचे गोव्याचे मुख्य खिरस्ती धर्माधिकारी, गोव्याचे पात्रियार्क दों जुजे व्हियेर आल्व्हेर्नीज यानी कुठ्ठाळच्या चर्चला भेट दिली, त्या भेटीच्या वेळी मोठा जाहीर समारंभ व उत्सव केला. त्या भेटीत ता. ४ डिसेंबर १९५९ रोजी एक छापील पुस्तिका चर्चच्या उत्सवास हजर असलेल्या खिरस्ती इसमाना वाटली होती. ही पुस्तिका अवघ्या चार पानाची असून ती कुठ्ठाळ गावचा एक ग्रामस्थ, जुजे मारीय जास्सु क्रूज या इसमाने लिहिली व छापून वाटली. व त्या पुस्तिकेचे नाव "क्रोनिक दा आल्देय दे कोर्ताली" असे आहे.

या पुस्तिकेतील काही अवघ्याच ओळींचे मराठी भाषांतर करून सारांश रूपाने खाली दिले आहे. याचं कारण, त्या पुस्तिकेस ऐतिहासिक दृष्ट्या महत्व नाही. पण, ही पुस्तिका ज्या समारंभात, गोव्याचे त्या वेळचे युरोपियन पात्रीयार्क कुठ्ठाळ गावच्या चर्चला भेट दिलेल्या प्रसंगी त्यांच्या उपस्थितीत वाटली आहे, तो समारंभ व वेळ, काळ परीस्थिती लक्षात घेता, त्या पुस्तिकेतील मजकूरावर त्या चर्चमधील पुरातन काही कागदपत्रांची छाया पडणे असंभवनीय नाही असे वाटल्यावरून व विशेष करून आता पर्यंत वर उल्लेखित पोर्तुगालच्या लिस्बन शहरात इ. स. १७१० साली सरकारी इसमाच्या छापखान्यात छापून प्रसिध्द झालेला 'ओरियेंत, कोंकिस्ताद' हा ग्रंथ व इटालीतील रोम शहरात इ. स. १९६२ साली प्रसिध्द झालेला 'दोकुमेंता इंदिका' हा प्रचंड ग्रंथ, या दोन्ही ग्रंथात त्या वेळच्या जेझुइट पाद्रींची अस्सल पत्रे प्रसिध्द झाली आहेत.

त्यातील अत्यावश्यक व जरूरीपुरता मजकूर भाषांतर संक्षिप्त रूपात करून मागे दिलेला आहे, त्या सर्व मजकूराशी पूर्णपणे जुळत असल्याने, त्या पुस्तिकेतील आवश्यकते पुरता मजकूर मराठी भाषांतर संक्षिप्त रूपात करून खाली देण्यात येत आहे :–

"क्रोनिक दा आल्देय दे कोर्ताली, (कुठ्ठाळ गावच्या जुन्या काळचा इतिहास) लेखक : जुजे मारीय जास्सु क्रूज.

पात्रियार्क दस इंदियस ओरियेंताइस दों जुजे व्हियेर आल्व्हेर्नाज यांची भेट कुठ्ठाळच्या चर्चला झाली, त्या प्रसंगी लेखकाकडून अर्पण. कुठ्ठाळ, ४ डिसेंबर १९५९.

कुठ्ठाळ या गावाचे व चर्चचे दैवत सां फिलीप आणि सां तियागु. कारण या संताच्या दिनी कोंपातीय दे जेझुसचे पाद्री मंडळ, सासष्टीतील याच पहिल्या गावात आपले पाय इ. स. १५६० साली ठेवित झाले. येथील इग्रेंज (चर्च) बांधणी इ. स. १५६६ साली झाली. ज्या जागेवर जुन्या काली मंगेश देवाची आराधना करीत असत, त्याच जागेवर करण्यात आली. त्या चर्च बांधणीचा खर्च दोन गाव एकत्र जमून त्यानी केला.

त्याचे नेतृत्व व पुढाकार पाद्री फ्रांसिस्क आरांज, गोव्याचे त्या वेळचे पहिले आर्चीबिशप दों गास्पार दे लेयांव पेरैर यांचा भाचा जो त्या कोंपाजीय मध्ये ता. १ जानेवारी १५७१ रोजी प्रवेश करता झाला, व पुढे कुंकळी गावात हुतात्मा ठरला. व ज्याचा पोप लेयांव १३ वा, याने गौरव केला, अशा इसमाने स्वीकारले होते.

त्या चर्चमध्ये पहिले मिस्स (ईश प्रार्थना) ता.१ मे १५६६ रोज करण्यात आले. सासष्टी प्रांत काबीज केल्यानंतर याच गावात पहिला हिंदु ब्राम्हण धर्मांतर करून खिरस्ती धर्मात आणला गेला व ही ऐतिहासिक घटना चिरकाल स्मरणात राहवी, एतदर्थ या गावात 'सां कुरासांव दे जेझुस' या देवाच्या नावे एक कपेल म्हणजे अगदी लहान चर्च किंवा प्रार्थना मंदिर, त्या वेळचे गोव्याचे आर्चीबिशप दों आंतोनियु सेबास्तियांव व्हालेंती, यांच्या ता. २२ फेब्रुवारी १८९२ रोजी निघालेल्या हुकूमान्वये बांधले गेले व त्या कपेला शेजारीच एक क्रॉस बांधण्यात आला व क्रॉसवर एक शिला स्मरणिका बसविली असून तीवर खालीलप्रमाणे मजकूर कोरलेला आहे. पण तो मजकूर आज जरासा पुसट स्थितीत सांपडतो.

"या जागेवर पहिले मिस्स (ईश प्रार्थना) सांगितले आणि पहिला क्रॉस कुठ्ठाळ गावात रोवला गेला. शुध्द पावन आत्मे देवभक्तांकडे याचना करतात की, त्यांनी आपली सदैव आठवण ठेवावी."

वरीलप्रमाणे माहिती लक्षात घेता, खालील घटना सत्य ठरतात :–

१. कुशस्थली (कुठ्ठाळ) येथे कांपाजीय द जेझुसचे पाद्री मंडळ पहिल्यानेच शिरले ते ता. १ मे १५६० रोजी सकाळी व तेथे पोचल्यानंतर झाडाच्या फांद्यांचा एक तात्पुरता मंडप उभारून पहिले मिस्स कथन केले व संध्याकाळी एका हिंदु मनुष्यास बाटवून त्यास बाप्तिस्मा दिला.

२. त्या रोजी कुशस्थली येथील श्रीमंगेश देवालयाच्या इमारतीत देव नव्हता व तो त्यापूर्वी कोणास चाहूल न लागू देता लपवून सासष्टी प्रांताच्या हद्दीच्या बाहेर, मुसलमानाच्या राज्यात केव्हाच पळवून नेण्यात आला होता.

३. जुन्या देवालयाची इमारत तात्पुरत्या चर्च स्थापनेसाठी, सरकारी मंजुरी मिळवून वापरण्यात आली. सरकारने चर्चच्या स्थापनेसाठी ती इमारत वापरण्यास मंजुरी तर दिलीच. शिवाय, देवालयाचे सर्व उत्पन्न चर्चला बहाल केले.

४. नंतरच्या कालात, जुन्या देवालयाची इमारत मोडून त्याच जागी इग्रेज (चर्च) नवीन इमारत बांधणी, गोव्याचे जुन्या काळचे पहिले आर्चबिशप यांच्या भाच्याने म्हणजे पाद्री फ्रांसिस्क आरांज याने, कुठ्ठाळ व शेजारचा गाव या दोन गावातील लोकाकडून पैसे जमवून, आपण पुढाकार घेऊन व नेतृत्व करून ती इमारत बांधणी इ. स. १५६६ साली पूर्ण केली व त्याच साली १ मे रोजी नवीन चर्च बांधणी-नंतर पहिले मिस्स गायन मोठ्या उत्सवाने केले गेले.

या सत्य घटनेनंतर व उल्लेखित अत्यंत खात्रीच्या विश्वसनीय तत्कालीन पुराव्यानंतर एक गोष्ट निःसंशयपणे सिध्द होते की, कुशस्थलीहून श्रीमंगेश शिवलिंगाचे स्थलांतर ता. १ मे इ. स. १५६० दिवसा पूर्वी खचित फोंडे तालुक्याच्या प्रियोळ गावात अंत्रुज महालात, आजच्या मंगेशी वाड्यावर झाले आहे, यात मुळीच संशय नाही व ही घटना निर्विवाद होय.

आता हे स्थलांतर बरोबर इ. स. १५६० या वर्षीच ता. १ मे पूर्वी म्हणजे जानेवारी ते एप्रिल पर्यंतच्या कालात झाले की, त्या पूर्वी झाले आहे, याबद्दल अद्याप खात्री ठेवण्यासारखा सरकारी किंवा इतर कोणत्याही प्रकारचा लेखी पुरावा उपलब्ध झालेला नाही. पण, मंगेश देवस्थानच्या जुन्या कागद-पत्रात व विशेषे करून त्या देवालयाची संस्थापना, महाजन समुदाय व कारभाराचा कर्तव्यनिर्बंध यासंबंधी मसुदा, त्या वेळच्या सरकारकडे मंजुरीकरता पाठविण्याचे कागदपत्र, यांची तपासणी करता, त्यात स्पष्टपणे, त्या वेळच्या महाजन मंडळीने आपल्या सभेत एकमताने ठराव केलेला आढळत असून, त्यात श्रीमंगेश देवाचे कुशस्थली उर्फ कुठ्ठाळ येथून प्रियोळ येथे, सध्याच्या जागी इ. स. १५६० साली, स्थानांतर झाले असा उल्लेख आहे.

हा महाजन लोकानी केलेला ठराव तारीख २० ऑक्टोबर सन १८८५ या दिवशी केलेला असून, त्या ठरावात ज्या महाजन इसमानी आपआपल्या स्वाक्षऱ्या केलेल्या दिसतात, ते किंवा त्यातील काही इसम आजतागायत म्हणजे इ. सन १९८४ सालापर्यंत जर हयात असते तर, त्याचे यावेळी वय निदान एकशे त्र्यायशी (१८३) वर्षापेक्षा जास्त ठरले असते, हे त्यांच्या कुटुंबियांकडून समजून येते.

कुशस्थलीहून प्रियोळ गावी, श्रीदेव मंगेशाचे स्थलांतर कोणत्या महिन्यात व कोणत्या तिथीस किंवा तारखेस निश्चितपणे झाले, याबद्दल जसा काहीच विश्वसनीय पुरावा नाही, त्याच प्रमाणे सध्याच्या प्रियोळ गावात मंगेशी वाड्यावर श्रीदेव मंगेश शिवलिंगाची प्रतिष्ठापना कोणत्या महिन्यात कोणत्या दिवशी झाली, याबद्दलही काही लेखी पुरावा अद्याप तरी उपलब्ध झालेला नाही. परंतु या दोन्ही घटना केव्हा झाल्या असाव्यात, याबद्दल संभाव्य दिवस ठरविता येतील असे वाटते.

कोणत्याही देवाची प्रतिष्ठापना करावयाची झाल्यास, हिंदु धर्मशास्त्र ज्योतिष वगैरेंचे नियम लक्षात घेता, ही प्रतिष्ठापना दक्षिणायनात कधीच होणे शक्य नाही. कारण, ते अशुभ मानले जाते व देव प्रतिष्ठा उत्तरायनातच करणे शुभ आहे, असा धर्मशास्त्र, ज्योतिष, मुहूर्त या सर्वांचा संकेत आहे.

यावरून ती प्रतिष्ठा उत्तरायनातच झाली असली पाहिजे. उत्तरायनाचा काल सर्वसाधारणपणे मार्गशीर्ष महिन्यापासून ज्येष्ठ-आषाढ महिन्यापर्यंत, म्हणजे डिसेंबर किंवा जानेवारी पासून जूनपर्यंत बहुधा असतो.

ही परिस्थिती लक्षात घेता व तारीख १ मे १५६० दिवसापूर्वी कुशस्थलीहून श्रीमंगेश शिवलिंग प्रियोळ गावी स्थलांतर झाल्याचा पुरावा मिळतो हे लक्षात घेता, तसेच, श्रीमंगेश देवालयात दरवर्षी फक्तच कार्तिक शुक्ल त्रयोदशी दिवशी होणाऱ्या उत्सवासच प्रतिवर्षी श्रीमंगेश देवाची पालखी खांद्यावरून वाहविण्याचा बहुमान त्या देवाचे वत्सगोत्री कुळावी महाजनांस देण्यात येतो, या गोष्टीचाही बारकाईने विचार करता, असे दिसते की, कुशस्थलीहून रातोरात गुप्तपणे, श्रीमंगेश शिवलिंग जे प्रियोळ गावात आणले गेले, तो दिवस कार्तिक शुक्ल द्वादशी रात्रीं पासून कार्तिक शुक्ल त्रयोदशीचा दिवस असणे शक्य आहे.

कार्तिक महिना दक्षिणायनात येत असल्यामुळे, ते श्रीदेवाचे शिवलिंग मंगेशीस आणल्यानंतर काही दिवस नित्य नैमित्तिक पूजा अर्चनविधी चालू झाल्या. पण सर्व महाजन एकत्र जमून पुढील विचार-विनिमय, इमारत बांधणीची व्यवस्था, प्रतिष्ठापना करण्यासाठी उत्तरायनाची मार्गप्रतीक्षा व सुमुहूर्त इत्यादी कार्यक्रम पार पाडण्यास अत्यावश्यकपणे व साहजिकच निदान कमीत कमी तीन महिने तरी गेले असले पाहिजेत व अशा आंखणीने विचार करता, ती सुप्रतिष्ठापना माघ शुक्ल पौर्णिमा याच रोजी झाली असावी असे वाटते.

कारण, श्रीस्थळ मंगेशी माघ शुक्ल पौर्णिमा हाच दिवस महोत्सव पर्वणीचा. सार्वजनिक गाऱ्हाणे श्रीकडे घालणे, वार्षिक कौलाचा प्रसाद देणे वगैरे सर्व महत्त्वपूर्ण कार्यक्रम, त्या एकाच दिवशी, वर्षातून एकदाच होतात. त्याच दिवशी सर्वात मोठा रथोत्सव होतो व श्रीमंगेश देवस्थानचा सर्वात मोठा वार्षिक महोत्सव हाच मानला जातो.

या देवाचे कुळावी महाजन याच महोत्सवास शक्यतो गैरहजर न राहता श्रीमंगेश देवाच्या भेटीस येऊन रथावर नारळ फोडतात. या महोत्सव महापर्वणीचा सर्व खर्च महाजनांतर्फे देवस्थानच्या भांडारातूनच खर्च होत असतो. शास्त्रकारानी देव प्रतिष्ठेस मुहूर्त सांगताना माघ मासात श्रीविष्णुमूर्ति वाचून अन्य देवतेची प्रतिष्ठा करावी, असेही सांगितलेले आहे.

या सर्व गोष्टीचा अभ्यास करता श्रीमंगेश शिवलिंगाची सुप्रतिष्ठापना प्रियोळ गावी, प्रस्तुतच्या जागी, उत्तरायन कालात, माघ शुक्ल पौर्णिमा या शुभदिनी झाली असावी असा बहुतांशी समज होतो.

आता, श्रीमंगेश शिवलिंग कुशस्थळीहून अंत्रुज महालात प्रियोळ गावात जे रातोरात खांद्यावरून वाहवून आणले गेले, तो दिवस कार्तिक शुक्ल द्वादशीची रात्र व त्रयोदशीचा दिवस असावा, हे मागे नमूद केले असून त्याची कारणेही सांगितली.

कार्तिक शुक्ल द्वादशी त्रयोदशीचा दिवस सर्वसाधारणपणे आक्टोबर महिन्याच्या शेवटी किंवा नवंबर महिन्याच्या सुरवातीस येत असतो, कार्तिक शुक्ल त्रयोदशीस श्रीमंगेश शिवलिंग प्रस्तुतच्या जागी पोचल्यानंतर त्या नंतरच्या माघ शुक्ल पौर्णिमेच्या शुभदिनी सुप्रतिष्ठापना झाली असे गृहित धरले, तर मध्यंतरीचा अवधी फक्त तीनच महिन्याचा राहतो व हा अत्यल्प काळ सर्व महाजन जमून देव प्रतिष्ठापनेची व्यवस्था व लहानशी तरी अत्यावश्यक देवालयाची इमारत पूर्ण होण्यास अत्यंत गरजेचा ठरतो.

श्रीमंगेश देवस्थानची ऐतिहासिक परंपरा ही अशी आहे.

श्रीमंगेश देवस्थान मंगेशी येथे, फोंडा तालुक्याच्या प्रियोळ गावात, स्थापना करण्यात आले, त्या घटनेस आज ४२४ वर्षे झाली. सासष्टी तालुक्याच्या कुशस्थली (कुठ्ठाळ) हून स्थलांतर, शालिवाहन शकाचे १४८२ रौद्र नामसंवत्सरी म्हणजे इसवी सन १५६० साली करून श्रीदेव मंगेशलिंग आजच्या मंगेशीस स्थापन करण्यात आले.

ह्या प्रदीर्घ कालात श्रीमंगेशाचे मुख्य देवालय मंगेशी येथे कोणत्या साली बांधले गेले, श्रीमंगेशलिंग स्थापण्यासाठी प्रारंभीच बांधण्यात आलेले देवालय कसे होते ते ज्ञात नाही. त्याचा जीर्णोध्दार किती वेळा व केव्हा केव्हा झाला, याचे संशोधन झालेले नाही.

देवालय मराठेशाहीच्या वैभवकालात बांधले गेले असावे. सुदैवाने इसवी सन १८९० साली नवे देवालय बांधण्यापूर्वीच्या देवालयाची इमारत कशी होती, त्या इमारतीचा फोटो उपलब्ध असून तो श्रीमंगेश देवस्थान समग्र इतिहास, लेखक विनायक नारायण शेणवी धुमे, प्रकाशक तिमाजी शेणवी काकोडकर, मुद्रक चिंतामण वामन जोशी, माधव प्रिंटिंग प्रेस, अलिबाग, प्रथम प्रकाशन आश्विन शु॥ १०, शके १८९३ विजयादशमी, २९ सप्टेंबर, १९७१ या पुस्तकात प्रसिध्द केलेला आहे.

तसेच, इ. स. १८९० सालापूर्वीच्या देवालयातील लाकडी नक्षीदार कोरीव काम असलेले खांब जतन करून ठेवलेले देवस्थानच्या मालकी हक्काची 'मठ' नावाची इमारत आहे त्या इमारतीत मधोमध असलेल्या मंडपास बसविलेले आहेत, त्यावरून तत्कालीन देवालय नक्षीदार कसे होते याची कल्पना येते.

प्रस्तुतच्या देवालयात श्रीमंगेश देवाच्या कुळावी भक्तांनी, त्यांच्या पाच पिढ्यानी आराधना केली. वरील लाकडी खांब पाहिलेल्या तज्ञानी ते देवालय अठराव्या शतकाच्या उत्तरार्धात बांधले गेले असावे असा तर्क केला आहे. प्रस्तुतचे देवालय शके १८१२ म्हणजे इ. स. १८९० साली बांधून पूर्ण झाल्याचे दाखले देवस्थानच्या दप्तरात आहेत.

इ. सनाच्या सोळाव्या शतकात धार्मिक परीस्थितीमुळे आमचे पूर्वज वाडवडील देवभूमी गोमंतक सोडून आपल्या सर्व मालमत्तेवर आणि घरादारावर तिलांजली देऊन कोठेही गेले तरी आपल्या प्रिय कुलदैवताचे श्रीमंगेशाचे एकदा तरी दर्शन घ्यावे, ही आकांक्षा प्रत्येक पिढीने आपल्या उराशी बाळगली व ह्या श्रीमंगेश देवालयाच्या पुण्यक्षेत्राचे महत्व पटविणारा इतिहास गेल्या चार शतकापेक्षा जास्त कालात येथे घडला.

मंगेशी येथील देवालयाने अगणित साधुसंताना शिवस्तुतीची प्रेरणा दिली. काशीयात्रेस निघालेल्या नाईक स्वामीना हीच काशी असा दृष्टांत होऊन ते येथेच स्थायिक झाले. सुबानंत कवीने श्रीमंगेश देवाच्या समोर बसून श्रीमांगीश माहात्म्य लिहिले. त्यानंतर एकशे दोन वर्षांनी विठ्ठल कृष्ण कार्यकिणीनी तेच केले. श्री महेश्वर शास्त्री सुखठणकर ह्यानी 'मांगिरिशाष्टकम्' रचण्याचा मुहूर्त याच देवालयात साधला.

स्वामी विवेकानंदाच्या भजनाने ही अति पवित्र वास्तु श्रीशके १८१४ म्हणजे इ. सन १८९२ च्या कार्तिक महिन्यात दुमदुमली. वेदशास्त्रांची सनातन धारा येथेच चालू राहिली. शास्त्री, पंडित, पुराणिक तसेच थोर संगीतिक याच देवालयामुळे निर्माण झाले. देवस्थान परिसरातील लोकाप्रमाणे बाहेरील लोकासही त्याचे लाभ मिळाले.

श्री. रामचंद्रबाबा सुखठणकर, श्री. लखबादादा शेणवी लाड, वगैरेनी श्रीमंगेश देवाचा आशीर्वाद घेऊन इतिहास गाजविला. इ. स. १९६१ सालच्या गीताजयंती दिनी भारतीय सैन्याने गोमन्तक, दमण आणि दीव मध्ये चाल करून, अवघ्या दोन दिवसात चारशे एकावन्न वर्षांची पोर्तुगीज राजसत्ता रसातळास पोचविली.

भारतीय सेनेचे प्रमुख ले. ज. कँडेथ चाल करून जाताना, वाटेत श्रीमंगेश देवाचा कृपाप्रसाद घेऊन गेले, आणि त्यानंतर मंगेशीस पुनःपुन्हा येऊन त्यानी आपले मस्तक श्रीमंगेश देवापुढे नमविले. भारताचे पंतप्रधान पंडित जवाहरलाल नेहरू यानीही आपल्या गोमंतक फेरीत श्रीमंगेश-श्रीशांतादुर्गेचे दर्शन घेतले.

श्रीमंगेश देवस्थानची ही परंपरा आहे. आठ दशके झाली तरी देवालयाची इमारत सुंदर दिसत होती. परंतु तिचा जीर्णोध्दार होणे आवश्यक होते व तो जीर्णोध्दार करताना देवस्थानच्या कुळावी महाजनाचा वेलविस्तार लक्षात घेऊन मंदिराचे गर्भगृहही विस्तीर्ण करणे इष्ट होते. कुळावी महाजनाच्या भावना ह्या देवालयाशी एकरूप झाल्यामुळे देवालयाचे बाह्य स्वरूप न बदलता हे पवित्र कार्य सिध्दीस जावे, अशी सर्व कुळावी महाजनाची उत्कट इच्छा होती.

इ. सन १९७० मध्यें श्रीमंगेश देवस्थानात श्रीमंगेश देवास साक्षीस ठेवून निर्णय घेतला व हे कार्य करण्यासाठी श्रीमांगिरीश सेवा समितीची स्थापना झाली. भारत सरकारनें समितीकडील देणग्या कर-मुक्त केल्या. परंतु हे देवालय गोवामुक्तीनंतर भारत सरकारनें पुरातन वास्तु म्हणून पूर्वीच जाहीर झाल्यामुळें, भारत सरकारच्या पुराण वास्तु संग्रह करणाऱ्या खात्याच्या ताब्यात हे देवालय असल्यामुळें तें परत ताब्यात मिळण्यापासून अडथळ्याना सुरवात झाली, आणि तें दूर करण्यासाठी त्या देवस्थानचें कुळावी महाजन नसलेले भक्त श्रीमंगेश देवानें समितीस मिळवून दिले. श्रीमांगिरीश सेवा समितीनें भारत सरकारला विनंती केली व आवश्यक असलेला पुरावा दिल्यानंतर भारत सरकारनें ता. ४ सप्टेंबर १९७० रोजी फेरहुकूम काढून पुराण वास्तूच्या यादीतून श्रीमंगेश देवालयाच्या वास्तु वर्ग केल्या. त्यामुळें जीर्णोध्दाराच्या कामास सुरवात करणें सोपें झालें.

ज्या ज्या अधिकारी व्यक्तीनी व त्याना उद्युक्त करणाऱ्या व्यक्तीनी भारत सरकारचा हुकूम बदल-ण्यास श्रीमांगिरीश सेवा समितीस हातभार लावला, त्या सर्वांचा नामनिर्देश करणें उचित नसल्यामुळें त्यांचें ऋण सामुदायिकरित्या मानण्याखेरीज दुसरा पर्याय समितीपुढें राहीला नाही.

श्रीमंगेश देवालयाच्या गर्भागारावरील उंच घुमट लांबून व बाहेरून फार सुंदर आणि आकर्षक दिसत होता. प्रत्यक्षात मात्र त्याला सभोंवार टरबुजासारखे तडे गेले होते व त्यामुळें पावसाळ्यात त्यातून देवालयाच्या आत पाणी झिरपत असे. त्यामुळें जीर्णोध्दाराची घाई झाली होती. तो घुमट उघडल्यावर आंत चिऱ्याची भुसभुशीत माती झाल्याचें आढळलें. तो घुमट तशा स्थितीत कसा राहिला हे एक मोठें आश्चर्य होतें व त्याबद्दल तंत्रज्ञाची मति कुंठित झाल्यामुळें 'ईश्वरी कृपा' हे उत्तर शिल्लक राहतें.

तें गर्भगृह बांधण्यात आल्यापासून त्या नंतरच्या ऐंशी वर्षांत कुळावी महाजनांची कुटुंबें तिप्पट झाली होती व पूजेस बसणाऱ्यांना अपुऱ्या जागेमुळें दाटीवाटीनें कसें तरी बसावें लागत असे. त्यामुळें, त्या गर्भगृहाचा परीघ वाढविण्याशिवाय गत्यंतर नव्हतें.

गर्भगृह व त्यावरील घुमट पायापासून शिखरापर्यंत होता तसाच नवा बांधणें हे फार जबाबदारीचें, अत्यंत जोखमीचें व महान् अडचणीचें काम होतें. गर्भागारातील श्रीमंगेश लिंग ह्याला स्पर्श होता कामा नये व त्यावर त्रिकाल होणारी पूजाअर्चा ह्यात व्यत्यय येता कामा नये ही बंधनें पाळणें आवश्यक होतें.

तसेंच अधांत्री असलेला प्रचंड घुमट पायापासून सभोंवार सिमेंट कॉंक्रीटच्या भिंती उभारून त्यावर बांधणें हे साधेसुधें काम नव्हतें. तज्ञ इंजिनियर व त्यांचे सहकारी ह्यांची ती सत्वपरीक्षा होती. त्यांची देवावरील श्रध्दा व हाती घेतलेल्या पवित्र कार्यावरील निष्ठा, यामुळेंच त्यांच्या परिश्रमाचें चीज झालें.

ज्यांनी जीर्णोध्दार पूर्व परिस्थिती स्वतःच्या डोळ्यांनी पाहिली असेल, त्यानाच बाहेरील स्वरूप न बदलता करण्यात आलेलें काम किती प्रचंड आहे याची कल्पना येईल.

आजचा गर्भागार त्या भोंवतालची प्रदक्षिणेची मोकळी जागा. त्या दोहोंवरचा मजला व त्यावरील शोभिवंत घुमट व मौलिक वस्तु ठेवण्यासाठी आधुनिक प्रकारचें सुसज्ज भांडारगृह हे पाहून मन प्रसन्न होतें. सबंध देवालयाच्या कौलारू छप्पराऐवजी सिमेंटकॉंक्रीटचें छप्पर घालणें, देवालयाच्या दर्शनी भागाच्या घुमटाची व सर्व खिडक्यांची पुनर्बांधणी वगैरे नानाविध सुधारणा दृष्टोत्पत्तीस येतात.

हे अत्यंत पवित्र कार्य कोणतेंही विघ्न न येता माघ पौर्णिमा शके १८९४ ता. १७ फेब्रुआरी १९७३ पर्यंत पूर्ण झालें ही केवळ श्रीमंगेशाची कृपा. त्यानेंच कुळावी महाजनांस व इतर भक्तांस स्फूर्ति देऊन हे कार्य पुरें करून घेतलें. श्रीमांगिरीश सेवा समिती केवळ निमित्त होती. ती निर्माण करण्याची बुध्दि सर्व कुळावी महाजनांस झाली, आणि तिच्या हातानें हे कार्य पूर्ण झालें. श्रीमंगेश देवाचा आशीर्वाद फळा-साठी उपयोगी पडला.

धन्य धन्य ते श्रीमंगेश भक्त की, ज्यांचा हातभार या कार्यास लागला. ज्यानी दीड वर्षांच्या कालात देवालयाच्या जीर्णोध्दाराचे कार्य श्रीच्या पूजेत व्यत्यय न येता श्रीवरील निष्ठा व आपले सर्वस्वपणाला लावून पूर्ण केले, त्या त्रयीचे, प्रख्यात वास्तुशास्त्रज्ञ श्री. श्रीकांत साठे, इंजिनिअर श्री. केशवराव चाफेकर व कॉंट्र्याक्टर एस. व्ही. आपटे आणि कंपनी यांचे, तसेच, श्री. अरुण भा. कसबेकर यांचे समितीला अत्यंत बिनमोल असे सहाय्य झाले. त्याच्या निरलस भक्तीचे जेवढे कौतुक करावे तेवढे थोडेच आहे.

प्रतिवर्षीचा माघ पौर्णिमेचा श्रीस्थळ मंगेशी येथील महोत्सव हा अत्युच्च परम पवित्र दिवस वर्षातून एकदाच येतो. शके १८९४ (इ. स. १९७३) सालातील महोत्सव कळावी महाजनाच्या भाग्याचा दिवस ठरला. त्या दिवशी श्रीमंगेश देवाच्या मंदिराच्या गर्भागारावरील सर्वोच्च घुमटाच्या घुडास विधीपूर्वक सुवर्ण कलश श्रीगौडपादाचार्य संस्थान कैवल्यपूर मठाधीस श्रीमत् सच्चिदानंद सरस्वती स्वामी महाराज यांच्या पवित्र हस्ते चढविला व तेथे बसविला गेला. इच्छा पूर्तीवर कलश चढल्याचे मनोहर दृश्य पाहण्याचे सद्भाग्य कळावी महाजनाना लाभले.

अखिल जगात भूकैलास म्हणून नावाजलेल्या या सुप्रसिध्द जागृत श्रीमंगेश देवालयावर सुवर्ण कलश चढला ही घटना अपूर्व आहे. श्रीमंगेश देवाच्या कीर्ति मंदिराच्या इतिहासात सुवर्णाक्षरानी लिहिलेले आणखी एक पान घातले गेले आहे. श्रीमंगेश देवालयाच्या प्रवेश महाद्वाराच्या उजव्या बाजूस भिंतीस शुभ्र संगमरवरी पाषाणावर शिलालेख कोरलेला असून त्यावर मजकूर खालील प्रमाणे आहे :–

श्रीमंगेश प्रसन्न

श्रीमंगेश देवालयाच्या वास्तूच्या पुनरुद्धाराची कामे श्री कृपेने पूर्ण होऊन श्रीशालिवाहन शके १८९४ परिधावी संवत्सरी, माघ पौर्णिमा ह्या शुभदिनी (ता. १७–२–१९७३) ह्या नव्या इमारतीचे उद्घाटन झाले. त्याच शुभ मुहूर्ती ह्या मंदिराच्या शिखरावर सुवर्ण कलशारोहण विधी समारंभपूर्वक करण्यात आला.

श्रीमंगेश देवाची लीला अगाध असून कर्ता करविता तोच एक आहे, ह्याचा अनुभव वेळोवेळी सर्वासच आला. ऐतिहासिक प्रत्ययाना अशा रितीने उजाळा मिळाला. त्या देवाधिदेव श्रीमंगेशाबद्दल जाहीर रित्या सर्व कळावी महाजनाना आपली कृतज्ञता व्यक्त करता यावी, श्रीस्थळ मंगेशी हे वैभवसंपन्न धार्मिक आणि सांस्कृतिक केन्द्र व्हावे ह्या आकांक्षेने जी व्यापक योजना आंखण्यात आली ती, पूर्ण होण्यासाठी श्रीमंगेश देवाचा कृपाशीर्वाद मिळावा म्हणून त्या पवित्र दिनी, माघ पौर्णिमा शके १८९४ ता. १७ फेब्रुवारी १९७३ रोजी, देवस्थानात जाहीर सभा संपन्न होऊन त्या निमित्ताने त्या सभेत एक स्मरणिका प्रसिध्द केली गेली. त्या दिवशी माघ पौर्णिमेचा महोत्सव नेहमीपेक्षा जास्त उत्साहाने साजरा होणार ह्या कल्पनेनेच श्रीमंगेश देवाचे भक्त प्रगतीच्या आणि महान् समृध्दीच्या आनंदाने बेहोष होऊन "**धन्य भूमि ही समान काशी। किती वर्णु महिमा श्रीमंगेशाची**" हे गोड पद अनेक मुखातून समाधानाच्या आनंदात म्हटलेले ऐकावयास मिळाले.

देवालयाचे काम पूर्ण झाले, परंतु नगारखाना पूर्वीचाच राहिला आहे. येथे त्रिकाल झडणाऱ्या समईसुर समवेत चौघड्याने आतापर्यंत प्रसन्न वातावरणात सतत भर टाकली आहे. एवढेच नव्हे तर गायन वादन वगैरे ललित कलात अखिल भारतीय कीर्ति मिळीवलेल्या अनेक कलावंताना हा नगारखाना स्फूर्ति देत आहे. देवालयाच्या समोरच्या विस्तीर्ण पटांगणात, नाट्य संगीत वगैरे कार्यक्रम उत्सवाचे वेळी होतात तेव्हा, रंगभूषा व वेशभूषा यासाठी तात्पुरती कशीबशी व्यवस्था केली जाते. नगारखाना पुन्हा बांधताना ही व्यवस्था कायमची होईल अशा रितीने योजना आंखणे इष्ट होईल.

श्रीमंगेश देवाचे कळावी महाजन व इतर भक्त यांचा वेलविस्तार भारतभर पसरलेला आहे. गोव्याशी त्यांचे पूर्वीचे संबंध राहिले नसले तरी श्रीमंगेश देवावरील त्यांची श्रध्दा दृढ आहे. तसेच देवस्थानची दिगंत कीर्ति पसरली असल्यामुळे दूरदूरचे प्रवासीही येथे येतात. देवाच्या सेवेसाठी येणारे

भाविक व कुतूहलानें देवस्थानात येणारे प्रवासी, या सर्वांची येथें राहण्याची गैरसोय होते, हा अनुभव नवीन नाही. देवालयाच्या प्राकाराबाहेर भटवाडीकडे जाणाऱ्या रस्त्याच्या उजव्या बाजूस श्रीदत्तमहाराजांच्या मंदिराजवळ दोन निवासस्थानें बांधण्याचें काम श्रीमांगिरीश सेवा समितीनें तत्परतेनें हाती घेऊन ते काम पूर्णही करून टाकलें. त्यामुळें अठ्ठावीस कुटुंबाची व्यवस्था होऊं शकली आणि अडचणीचा ताण अंशतः तरी कमी होण्यास मदत झाली.

अग्रशालांची पुनर्बांधणी, तलावाची दुरुस्ती वगैरे कामें आवश्यक आहेत. हें ओळखून श्रीमांगिरीश सेवा समितीनें देवालयाच्या डाव्या बाजूकडील प्रचंड अग्रशालेचें पुनर्बांधणीचें काम हाती घेऊन त्या पुनर्बांधणीचा शिलान्यास श्रीगौडपादाचार्य संस्थान कैवल्यपूर (कवळें) मठाधीश श्रीमत् सच्चिदानंद सरस्वती स्वामी महाराज यांच्या पवित्र हस्तें श्रीशके १८९६ माघ शुक्ल १३ शी आनंद नाम संवत्सरी ता. २४ फेब्रुवारी १९७५ च्या शुभ मुहूर्तावर साजरा होऊन त्या अग्रशालेचें बांधकाम पूर्ण झाल्यानंतर त्याच श्रीमत् स्वामी सच्चिदानंद सरस्वती महाराजांच्या शुभहस्तें उद्‌घाटन समारंभ मोठ्या थाटात माघ शुक्ल त्रयोदशी शके १९०० (इ. स. १९७९) रोजी साजरा करण्यात आला.

या भव्य आणि मनोवेधक अग्रशालेमुळें प्राकाराची शोभा आणि सौंदर्य यात जशी भर पडली, त्याचबरोबर अठ्ठेचाळीस कुटुंबास, यात्रेकरूस निवासस्थानाची सर्व आवश्यक सोईनिशी सोय झाली, आणि देवस्थानच्या उत्सव महोत्सवात वापरण्याची लांकडी कोरीव वाहनें विजयरथ, हत्तीअंबारी, सुखासन, लालखी, खांद्यावरून वाहविण्याचा रथ, नंदीवाहन तसेंच महापर्वणी महोत्सवात मिरवणुकीनें फिरणारे मोठे दोन रथ इत्यादी सर्व वाहनाची सुव्यवस्थितपणें जतन करण्यासाठी लागणाऱ्या जागेची अडचण दूर झाली.

या भव्य आणि प्रचंड अग्रशालेचा तळमजला एका विस्तीर्ण लांबी रुंदीच्या सभागृह- हॉलनें व्यापला असून, असें सुंदर, आकर्षक आणि नेत्रदीपक विस्तीर्ण सभागृह या तारखेपर्यंत गोमंतकात दुसरीकडे पाहण्यात नाही आणि म्हणूनच, या जागी प्रतिवर्षी शुभमंगल कार्ये साजरी करण्यासाठी इच्छूकांची रीघ चालू असते. या सभागृह-हॉलचा अनावरण विधी किंवा उद्‌घाटन मोठ्या अवर्णनीय समारंभात, मोठ्या थाटानें श्रीगोकर्ण पर्तगाळी जीवोत्तम मठाधीश श्रीमत् विद्याधिराज तीर्थ स्वामी महाराज वडेर आणि श्रीगौडपादाचार्य संस्थान कवळें मठाधीश श्रीमत् सच्चिदानंद सरस्वती स्वामी महाराज या उभय तपस्वी यांच्या उपस्थितीत श्री शके १९०२ रौद्र नाम संवत्सर कार्तिक शुक्ल प्रतिपदा शनिवार तारीख ८ नवंबर १९८० या शुभमुहूर्तावर झाले असून, उद्‌घाटन श्रीगोकर्ण पर्तगाळी संस्थान मठाधीश यांचे हस्तें व समारंभाचें अध्यक्षस्थान श्री गौडपादाचार्य संस्थान कवळें मठाधीश, यानी भुषवून हा गोड समारंभ "न भूतो न भविष्यती" अशा संस्मरणीय थाटात ईश्वरी कृपेनें साजरा झाला.

असंख्य उपस्थितांची अंतःकरणें भावनेनें आणि अत्यंत आदरानें उचंबळून आल्याचें मनोहर दृश्य आणि उभय मठाधिशांच्या अनन्य साधारण उपस्थितीत या देवस्थानाच्या इतिहासात सुवर्णाक्षरात लिहून ठेवण्यासारखा सुप्रसंग पाहून, सर्व उपस्थितानी नतमस्तक होऊन उभय स्वामी महाराजांच्या पादुकांस अभिवादन आणि प्रणाम करून धन्योद्‌गार काढले. हा सुप्रसंग ज्यानी स्वतः आपल्या डोळ्यांनी पाहिला, ह्या सर्वांनी आपआपल्या हृदयात त्यास कायमचें स्थान दिलें. त्याचें वर्णन करून कळण्यासारखें नव्हे.

श्रीस्थळ मंगेशी सांस्कृतिक आणि वेदशास्त्र शैक्षणिक केंद्र व्हावें या दृष्टीनेंही काही योजना फलद्रूप झाल्यास कुशस्थलीचें वैभव येथें नांदू शकेल. हें स्वप्न उराशी बाळगण्यात कुळावी महाजनाच्या कित्येक पिढ्या खर्ची पडल्या आहेत, पूर्वजांचें हें स्वप्न अंशतः साकार झाल्याचें पाहून आशेला पालवी फुटली आहे, अनेक भाविक कुळावी महाजनाकडून देवस्थानकडे येणाऱ्या विविध प्रकारच्या सूचना पाहून ही अपेक्षा एकट्या दुकट्याची नसून सामुदायिक स्वरूपाची असल्याचें स्पष्ट दिसतें.

श्रीमंगेश देवाची कळा अगाध आहे. असा अनुभव आहे की, देवस्थानात मनोभावें सत्कार्य करण्यासाठी, निःस्वार्थपणें आणि निष्ठेनें संकल्प सोडल्यास कोणतेंच कार्य अपूर्ण राहत नाही. देवस्थानाच्या गतेतिहासाची पानें ह्याची साक्ष देतात. ह्या महान् जागृत देवस्थानातील श्रीमंगेश देवानें कोणत्याच कालात व

कितीही प्रतिकूल परिस्थिती असली तरी कार्य अडू नये म्हणून त्या त्या प्रवर्तकांवर आपला वरदहस्त ठेवल्याचे हा इतिहास सांगतो.

गेल्या चौदा वर्षापूर्वी कोणास कल्पना होती की, आजच्या कालात श्रीस्थळ मंगेशी येथे जे पाहण्यात येते ते प्रचंड कार्य पूर्ण होईल ? कर्ता करविता श्रीभवानीशंकर ह्याच्या मनात आले व व्यावहारिकाना अशक्य वाटले ते शक्य होऊन प्रत्यक्षात उतरलेले आपण पाहतोच की नाही ?

पुढील कामाचा भार किंवा डोंगर उचलण्यासाठी तोच दयाघन प्रभू सर्व कुळावी महाजनास व भक्तास स्फूर्ति व शक्ति खचित देईल ह्यात तिळमात्र संशय नाही.

आजच्या कालात प्रियोळ येथे श्रीमंगेश देवस्थानात जी दैवते सुप्रतिष्ठीत आहेत ती अशी.

प्रियोळ गावात सध्याच्या 'मंगेशी' वाड्यावर आमच्या पुण्यवान पुर्वज्यानी श्रीमंगेश कुलदैवत व इतर पंचायतन परिवार दैवताची विधी सुप्रतिष्ठापना केली. ती सर्व दैवते आजतागायत तिथे आहेत.

प्रमुख देवालयाच्या मुख्यस्थानी, गर्भागारात, श्रीमंगेश देवाचे लिंग गर्भागाराच्या बाहेर, समोरच्या शुभ्र संगमरवरी चौकावर, श्रीमंगेश देवासमोर हातजोडून नमस्कार करीत आहे व दोन्ही हाताच्या ओंजळीत श्रीफल घेऊन दिसत आहे अशी श्रीदेवशर्मा (श्रीग्रामपुरुष) किंवा वत्स गोत्री यांचा मूळ पुरुष. या श्रीदेवशर्माच्या पाठीमागे, साधारणपणे साडेआठ इंच उंच, साडे पंचवीस इंच लांब व सतरा इंच रुंद अशा आकाराच्या काळ्या पाषाणाच्या उंचासनावर पितळेचा श्रीनंदिकेश्वर बसलेल्या स्वरूपात आहे.

पूर्वीच्या काली म्हणजे शके १८१२ (इ. स. १८९०) सालापूर्वी याच पाषाणी आसनावर, पाषाणी नंदी बसलेल्या स्थितीत होता, असे अगदी निश्चितपणे वाटते व हा नंदी मागाहून कधीतरी, कोणत्या तरी कारणपरत्वे बहुतकरून देवालयाच्या जीर्णोध्दार समयी, मुखाकडे जरासा तडा गेल्यामुळे असेल, तेथून हलविला गेला असावा व तो सध्या प्राकारात नगारखान्याशेजारी, डाव्या बाजूस, तशाच स्थितीत असून, त्या ऐवजी देवालयात चौकावर मुळच्या पाषाणी नंदीच्या आसनावर पितळधातूचा आणि इ. स. १९७१ च्या नंतरच्या कालात त्यावर चांदीचा पत्रा मढविलेला नंदी आजच्या कालात आहे.

श्रीमंगेश देवाच्या उजव्या बाजूस चौकावरच्या भिंतीस देव्हाऱ्यात श्रीगणपती काळ्या पाषाणी दगडाची मूर्ति व तसेच डाव्या बाजूस श्रीभगवतीची काळ्या पाषाणी दगडाची मूर्ति देव्हाऱ्यात आहे.

श्रीमंगेश देवालयाच्या पाठीमागे वेगळे देवालय असून त्यातील गर्भागारात साधारणपणे एक मिटर उंच काळ्या संगमरवरी पाषाणाच्या उच्चासनावर श्रीमुलकेश्वर शीला रूपात आहेत.

श्रीमुलकेश्वराच्या गर्भागाराच्या उजवीकडे, दोन वेगवेगळ्या पण एकमेकाशेजारी असलेल्या गर्भागार सारख्या मंदिरात, पहिल्यात श्रीवीरभद्र लिंगरूपात आणि त्याच्या उजव्या बाजूस श्रीसांतेरीची मूर्ति काळ्या पाषाणाची जरासी कमी उंचीच्या आसनावर (श्रीवीरभद्राच्या आसनाच्या तुलनेने) आणि दुसऱ्यात श्रीलक्ष्मी-नारायण काळ्या पाषाणाची मूर्ति, श्रीसूर्यनारायण चांदीने मढविलेल्या शीला रूपात, आणि श्रीगरुड काळ्या पाषाण मूर्तीच्या स्वरूपात, याप्रमाणे परिवार देवता स्थापित आहेत.

या शिवाय, श्रीमंगेश देवालयासमोरच नगारखान्याची इमारत असून त्या इमारतीच्या तळ-मजल्यावर एका साजेश्या लहान मंदिरात श्रीकाळभैरवाची काळ्या पाषाणाची मूर्ति श्रीमंगेशदेवा सन्मुख उभी आहे.

त्या पुढे म्हणजे नगारखान्याच्या मागच्या बाजूस विस्तीर्ण तलाव असून त्या तलावाच्या उजवीकडे उंचवट्यावर एक टुमदार देवालय असून त्या देवालयाच्या गर्भागारात वारुळाच्या रूपात श्रीसांतेरीदेवी, आणि तिच्या उजवीकडे त्याच गर्भागारात श्रीनिरंकार लिंग रूपात, तसेच, या देवालयाच्या प्रवेशद्वारा-पुढे श्रीक्षेत्रपाळ एका पाषाण रूपात आहे.

ही श्रीसांतेरी देवी वारुळ स्वरूपात असलेली श्रीमंगेश देवाच्या सर्व कुळावी महाजनाची आराध्य ग्रामदेवता आहे असे श्रीमंगेश देवस्थानच्या पुरातन कागदपत्रावरून कळते. याच श्रीसांतेरी देवीची प्रतिवर्षी जत्रा, माघ शुक्ल पंचमी रोजी रात्रौ, एका विशिष्ट पध्दतीने या देवस्थानात साजरी केली जाते. हे श्रीसांतेरी देवालय जीर्णोध्दार करून नव्याने इमारत बांधून जीर्णोध्दाराची इमारत ता. १४ मे १९५८ रोजी पूर्ण झाली.

श्रीमंगेश देवालयाच्या प्राकाराबाहेर उजव्या बाजूस एक दोन मिनिटाच्या अंतरावरच एक सुंदर, आधुनिक पध्दतीचे देवालय असून त्या देवालयाच्या गर्भागारात, श्रीशिवशर्मा (कौण्डिण्य गोत्री यांचा मूळ पुरुष) लिंगरूपात स्थापित आहे. या श्रीशिवशर्माच्या देवालयाची सध्याची इमारत जी दिसते ती, त्या पूर्वीची इमारत पायापासून शिखरापर्यंत जीर्ण झाल्याने मोडून, त्या जागी नवीन इमारत स्वखुषीने, मुंबईस राहणारे श्री. शंकर द. प्रभावळकर यांनी शके १८५७ साली स्वखर्चाने बांधली आणि त्या देवालयाच्या इमारतीस प्रवेशद्वाराच्या डाव्या बाजूकडे भिंतीस, स्मरणासाठी, एक संगमरवरी शिलालेख बसविला आहे आणि त्यावर खालील मजकूर कोरलेला आहे :–

॥ श्री मंगेश प्रसन्न ॥

आमचे परमपूज्य शीव पुरुषाचे हे देऊळ
कै. ती. दत्तात्रेय पां. प्रभावळकर यांचे स्मरणार्थ बांधिले.

शके १८५७ शंकर द. प्रभावळकर

वर उल्लेखित दैवतात, श्रीमुलकेश्वराच्या देवालयात उजव्या बाजूकडील एका मंदिरात, श्रीवीरभद्र लिंगरूपात आणि त्या जवळच दुसऱ्या आसनावर श्रीसांतेरीची मूर्ति काळ्या पाषाणाची आहे असे लिहिले आहे. पण, ही सांतेरीची काळ्या पाषाणाची मूर्ति श्रीमंगेश देवस्थानच्या पंचायतन किंवा परिवार दैवतापैकी नसून त्या मूर्तीशी देवस्थानच्या परिवार दैवताचा दुरान्वयानेही कसलाच संबंध नाही.

ती सांतेरीची मूर्ति या देवस्थानच्या कुळावी कुटुंबातील भेंडे उपनावाच्या एका कुळावी कुटुंबाने आपल्या घरात असलेली, तिची पूजाअर्चा त्याकडून होणे अशक्य झाल्याने, प्रसंगोपात ती मूर्ति आपल्या श्रीमंगेश कुलदैवताच्या देवालयात आणून ठेविलेली अशी आख्यायिका सांगतात.

श्रीमंगेश देवस्थानच्या सर्व कुळावी महाजनाची कुशस्थलीकराची जी आराध्य ग्रामदेवता श्रीसांतेरी देवी तिचे वेगळे देवालय तलावाशेजारी उंचवट्यावर असून, त्या श्रीसांतेरी देवीचे वारुळ तेथे आहे, पाषाणी मूर्ति नाही. या वारुळरूपी श्रीसांतेरी देवीची नित्य पूजाअर्चा, नंदादीप, नैवेद्य, तसेच प्रीतवर्षी जत्रा माघ शुक्ल पंचमी रोजी श्रीमंगेश देवस्थानच्या भांडारातूनच इतर परिवार देवता प्रमाणेच सर्व खर्च होत असतो.

उलट पक्षी वर उल्लेखित श्रीसांतेरी देवीच्या पाषाणी मूर्तीचा कसलाच खर्च श्रीमंगेश देवस्थानकडून होत नसतो. ती मूर्ति श्रीवीरभद्र लिंगाजवळ असल्याने श्रीवीरभद्राची पूजा करणारा इसम त्या श्रीदेवी सांतेरी मूर्तीवर गंधाक्षता फुले वाहतो.

वरील सर्व परिवार दैवताशिवाय आणि त्यांच्या मंदिराशिवाय आणखी एक सुंदर टुमदार मंदिर, देवालयाच्या प्राकाराबाहेर भटवाडीकडे जाताना उजव्या बाजूस आहे. या मंदिरात 'श्री नाईक स्वामी' या नावाचे श्रीमंगेश देवाचे परम भक्त आपल्या हयातीत आपले दैनिक देवतार्चन करण्याकरीता श्रीशिवलिंग, देवांच्या मूर्ति वगैरे जे काही बाळगीत, ते सर्व त्यांच्या पश्चात् एका लांकडी देव्हाऱ्यात ठेवून त्याची पूजाअर्चा तसेच 'श्रीनाईक स्वामी' च्या पादुकाची पूजा अर्चा श्रीमंगेश देवस्थान मार्फत करण्याची व्यवस्था श्रीमंगेश देवस्थानने स्वीकारली व त्यासाठी, ते श्रीशिवलिंग, देवाच्या मूर्ति आणि श्रीनाईक स्वामीच्या पादुका वगैरे ज्या सिमेंट कॉंक्रीटच्या नवीन देव्हाऱ्यात ज्या ठिकाणी आहेत ते संपूर्ण मंदिर व त्या मंदिरासभोवार असलेल्या सर्व इमारत बांधणीचा एकंदर खर्च श्रीमंगेश देवस्थानच्या भांडारातून केलेला आहे.

हे मंदिर आणि त्या सभोवार असलेल्या इमारतीचे बांधकाम इसवी सन १९४० साली सरकारी मंजुरीसह त्या बांधकामाचे कंत्राट जाहीर लिलाव पध्दतीने फोंडा तालुक्याच्या मामलेदार ऑफिसात लेखी करार करून श्री. श्रीपाद मंगेश भट करंडे, मुक्काम मंगेशी, या सद्‌गृहस्थाने घेऊन ते बांधकाम केले व ते मंदिर आणि इमारत श्रीमंगेश देवस्थानच्या भांडारातून खर्च करून बांधलेली आहेत, याबद्दचा स्मरण शिलालेख संस्कृत भाषेत कोरून त्याच मंदिरात गर्भागारात सिमेंटच्या देव्हाऱ्याच्या खाली बसविलेला असून त्या संगमरवरी शिलालेखावर खालील मजकूर कोरलेला आहे :–

"श्रीमन्मङ्गेश देवस्थानी याद भाण्डाख्ययाद्देवागारस्य
श्रीशालीवाहन शके १८६१ प्रमाथी संवत्सरे जीर्णोद्धतिरभूत।
अस्मिन्नेवत्सरे माघ सुदि १३ बुधे चास्मिस्थित पूज्यपाद
श्रीनायक स्वामीना पादुकयोः पुनः प्रतिष्ठाचा भवतू॥

श्रीनाईक स्वामीच्या पादुकाची पुनःप्रतिष्ठा शके १८६१ प्रमाथी संवत्सर माघ शुक्ल त्रयोदशी, बुधवार ता. २९ फेब्रुवारी सन १९४० रोजीच्या शुभमुहूर्तावर वर उल्लेखिलेल्या नवीन मंदिरात करण्यात आली. श्रीनाईक स्वामीची समाधी श्रीमंगेश देवस्थानच्या 'मठ' नावाच्या इमारतीच्या बाजूस म्हणजे देवालयाच्या समोर मठाच्या इमारतीच्या भिंती शेजारीच मोठ्या तुलसी वृंदावनाच्या आकाराची आहे.

श्रीनाईक स्वामी हे साक्षात्कारी साधूपुरुष मूळचे कारवार जिल्हा, कुमठा तालुका, दिवगी नजीक अंत्रवल्ली या गावी राहणारे होत. यांचे मुळचे नांव मंगेश शंकर नाईक करंडे देसाई असे होते. त्यांची पुण्यतिथी वैशाख वद्य द्वादशी रोजी होत असून तत्संबंधीचा खर्च श्रीमंगेश देवस्थानातून चालतो. श्रीनाईक स्वामीनी आपल्या हयातीत कित्येक कविता, शिवगीतेवर प्राकृत टीका, तसेच 'झुलवे' नावाची सोळा गाणी केली.

श्रीमंगेश देवाच्या शिबिकोत्सवात जी सोळा पेणी (मुक्काम) होतात, त्या प्रत्येक पेण्याचे सुरवातीस नित्यकीर्तनी याने आपला अभंग किंवा पद म्हटल्यानंतर लगेच नृत्यांगनानी नृत्य गायन करावयाचे असते. त्याच्या आरंभी या नृत्यांगना स्तुतीपर पदे झुलवे म्हणतात.

प्रत्येक पेण्याचे वेळी एक झुलवा म्हणतात. वरील 'झुलवे' नावाची सोळा गाणी पृष्ठ ५१ ते ५४ "श्रीमंगेश उपासना" या पुस्तकात दिले असून या पुस्तकाचे लेखक श्री. विनायक ना शें. धुमे आणि प्रकाशक श्री. अरविंद रघुनाथ तेंडुलकर, वसंत बुक स्टॉल, देऊबाई लेन, न. चिं. केळकर रोड, दादर, मुंबई-२८ हे आहेत.

श्रीमंगेश देवस्थानचे आद्य संस्थापक

श्रीमंगेश देवस्थानाचे आद्य संस्थापक आणि विधायक गौड सारस्वत वृंदाचे ब्राम्हण चोवीस वांगडाचे म्हणजे उपनावाचे वर्गी होत. यांची बहुप्राचीन काली जी अभिदान होती, ती खाली दिलेली असून त्या अभिदानात 'वत्स' व 'कौंडिण्य' या दोनच गोत्रांचा म्हणजे ऋषी कुलाचा समावेश आहे.

(१) लाड पुरुष सत्यवंत, [दुभाषी, सांगडेकर], (२) केंडारी, (३) भांडारी, [पतावरकर], (४) सत्यवंत भांडारी, (५) दळवी, (६) राजाध्यक्ष दळवी, [धायमोडे, गडणीस, मणेरकर– नाडकर्णी– रांगणेकर-गुडे मंडुरकर– नगर्सेकर– साललकर– पिळगांवकर– पावसे– देशपांडे– उसपकर– मुळगांवकर– मयेकर–कर्णिक- देशकुलकर्णी] (७) शिंगण दळवी [शिंगबाळ, आरस], (८) कंटक [टांकी, साळकर, उसगांवकर काकोडकर] (९) ब्रम्हे [शिरपुरकर] (१०) पालेकर [आंबये, कोळमुळे, नेर्लीकर, कायसुलकर, बस्तोडकर], (११) भिसे [आठवणकर, बोंडसे, पाटकर, भाटीकर] (१२) नेत्रावळीकर, (१३) कैसरे [केसरी], (१४) तिनईकर, (१५) वागळे [वाघ, वैष्णव, नाडकर्णी, माजाळकर, अऊर्सेकर, आजगांवकर] (१६) तेलंग [देवनळ्ळी] (१७) भेंडे [पागनीस] (१८) केंकरे [लावणीस, आगशीकर, अडवलपालकर, तोरसेकर, प्रियोळकर, कोनेकर, कवडे, गुंजीकर, खांत, फडणीस, आंन्ये.] (१९) नाईक कोलंबे [करंडे],

(२०) नाईक माईकर [भाटकी, म्हाईमे, सराफ] (२१) धुमें (२२) कबाडी [नाडकर्णी, रेडकर] (२३) नाईक हिंगटे, [देऊलकर] (२४) नाईक संजगिरी [केरकर, मोरजकर, हरमलकर, नाडकर्णी, देशपांडे, हल्याळकर, संझगिरी].

'वत्स' गोत्री १४ वांगड :

१-लाड, २-केंडारी, ७-शिंगण दळवी, ८-कंटक, ९-ब्रम्हे, ११-भिसे, १२-नेत्रावळीकर, १४-तिनईकर, १६-तेलंग, १८-केंकरे, १९-नाईक कोलंबे, २१-धुमें, २३-नाईक हिंगटे, २४-नाईक संजगिरी.

'कौंडिण्य' गोत्री १० वांगड :

३) भांडारी, ४) सत्यवंत भांडारी, ५) दळवी, ६) राजाध्यक्ष दळवी, १०) पालेकर, १३) कँसरे, १५) वागळे, १७) भेंडे, २०) नाईक माईकर, २२) काबाडी.

या शिवाय, बोरकर व वालावलीकर या उपनावाचे गृहस्थ कवळें येथील श्रीशांतादुर्गा देवीस व श्रीमंगेश देवासही भजतात. हे दोन्ही उपनावाचे गृहस्थ 'वत्स' गोत्री असून ते मूळचे श्रीमंगेश देवाचे महाजन होते. पण, पुढे श्रीशांतादुर्गेच्या उपासनेने त्याना त्या देवतेपासून वर मिळाला व 'वर दे' हे उपनावही तेव्हापासून प्रचारात आले.

या शिवाय, श्रीमंगेश देवाचे महाजन चंदावरकर, नाळकूळ, कायसूवकर, कोळसकर, विडीकर, चक्रमनी, तलगरे, सलगर, कारकोळ, पुर्णेकर, गोकर्ण, कल्याणपुरकर, कबाडकर, इसलुरकर, गुळवडी, धर्मे, मुजुमदार, गुळगुळे, हरवाडकर, इत्यादि उपनावाचे आहेत. पण, ते कोणत्या वांगडांचे ते कळत नाही. धर्मे (कौंडिण्य गोत्री) हे गोमंतकातील धुमें उपनावाशी सादृश दिसले, तरी धुमें वत्स गोत्री आहेत हे लक्षात घेणे जरूरीचे आहे.

श्रीमंगेश देवस्थानची सद्यःकालीन स्थावर मालमत्ता

श्री रामचंद्र मल्हार सुखठणकर हे पेशवाईतीलनानासाहेब पेशव्यांच्या कारभारात प्रमुख म्हणून लौकिकास आले. श्री. रामचंद्र बाबाच्या प्रयत्नामुळे श्रीमंगेश देवस्थानास पेशवे सरकारकडून व तत्कालीन पेशव्यांचे मांडलीक सोंदेकर राजे सवाई इमडी सदाशिव राजेंद्र यांच्याकडून प्रियोळ गावचा एक वाडा, आज ज्या वाड्यास 'श्रीमंगेश स्थळ' म्हणून आपण ओळखतो किंवा मंगेशी गाव म्हणून संबोधित असतो, तो वाडा मोकासा करून दिला.

शिवाय, श्रीमंगेश देवाचे ऊर्जेस तेल, फुले आणि द्रव्ये पाहिजे होती. त्यांच्या खर्चाबद्दल नगदी सालीना अडीचशे रुपये इनाम संपादून घेऊन सनदी बहाल केल्या. ज्या सनदेने श्रीमंगेश देवास प्रियोळचा एक वाडा मोकासा करून दिला व सालीना अडीचशे रुपये इनाम म्हणून देण्याची व्यवस्था केली, त्याच सनदेने कवळें ग्राम श्रीशांतादुर्गा देवीस व प्रियोळ गावातील दुसरा एक वाडा श्रीम्हाळसा देवीस, याप्रमाणे ती इनामे करून सरकारची पत्रे दिली.

श्रीमंत पेशव्याचे वरील मजकूराचे पत्र पोर्तुगीज सरकारास जे पाठविले होते, त्यावर मिती 'र वा ना छ १८ माहे शीबान (११ माहे जून)' अशी आहे. हे पत्र व्हिस्सी रें द इंदिय म्हणजे गोव्याचे व्हाइसरॉय याना ता. ११ जून सन १७५४ रोजी मिळाले.

त्याच प्रमाणे फोंडे, सांगे, हेमाडबारसे, केपे इत्यादि महालातील ग्रामसंस्था म्हणजे कोमुनिदादीकडून 'कालेपटी' 'रथपटी' या नावाने वार्षिक वतन ही मिळाले. पेशवे सरकारने दिलेल्या वतनाची परिपूर्ती करण्याचे करार नंतरच्या पोर्तुगीज सरकारने केल्यामुळे, पोर्तुगीज सरकारच्या तिजोरीतून ज्या वार्षिक रकमा श्रीमंगेश देवस्थानास कायदेशीर हक्कामुळे गोव्यात पोर्तुगीज राजवट चालू होती त्या कालात मिळत, त्या रकमा कोणकोणत्या तिजोरीतून मिळत असत, त्याचा तपशील खालील प्रमाणे आहे.

'हक्क-पेसांव' नामक, वार्षिक चौदा रुपये, चौदा आणे, नऊ पै, जे फाझेंद पुब्लिक (रेव्हेन्यु ऑफिस) देत असे ते. डिक्री कायदा ता. १५ डिसेंबर १८८०, अंमलबजावणीसाठी केलेला. या कायद्याला "रेगुलामेंतु,

दे देस्सायाद्" या नावाने ओळखण्यात येते. ही रक्कम श्रीमंगेश देवस्थानास रेव्हेन्यु खात्याच्या फोंडा तालुका तिजोरीतून मिळत असे.

खालील ग्रामसंस्था (कोम्युनिदादी) तिजोरीतून प्रतिवर्षी श्रीमंगेश देवस्थानास कालेपटी-रथपटी किंवा इतर नावाने येत असलेली रक्कम :

महाल फोंडा :–

बोरी	रु.	१-१४-३	
मडकई	,,	२-१३-४	
प्रियोळ	,,	१-६-८	
सावईवेरे	,,	०-१५-२	
वेलिंग	,,	०-१५-२	
वळवई	,,	०-७-७	
पंचवाडी	,,	१-१४-३	
प्रियोळ	,,	३२६-१-३	(हक्क)
प्रियोळ	,,	१०-२-२	कै. रा. शंभू शि. शें. धुमे यानी अर्पण केलेले
वेलिंग	,,	४-४-०	

महाल सांगे :–

जानकीनुंदे	रु.	२-१-३
हेमाडबारसें	,,	२-१४-३
अष्टाग्राहार	,,	२-१-३

महाल केपें :–

बाळी	,,	२-१-३
चंद्रवाडी आज असोळडें	रु.	२-४-३

कुंकळये येथील "माइन बाग" नामक बागायतीचा फोर-दोमिनियु दिरेक्तु, रु. ३-५-४ श्री. विनायक ना. शें. धुमे यांकडून देवस्थानास अर्पण केल्याप्रमाणे.

श्रीमंगेश देवस्थानच्या मालकी हक्काच्या व भोगवटीच्या सर्व जमिनीची यादी विस्तारभयास्तव येथे देणे शक्य नाही. यासाठी, त्या कोणत्या तालुक्यात आणि गावात आहेत, याची साधारण कल्पना यावी, त्यासाठी त्रोटक माहिती :–

फोंडा तालुक्यात :– प्रियोळ मंगेशी, वेलिंग, शिरोडें, कुंडई, कुकीळयें, बांदिवडें, खांडोळें, भोम

तिसवाडी-इल्यस गोवा तालुक्यात :– कुंभारजुवें, मेरकुरी (आगशी), थोरले नेवरें, खोर्ली, करंबळी.

सासष्टी महालात :– पारोडें.

डिचोली महालात :– सुर्ल, पाळी, वेळगें.

श्रीमंगेश देवस्थानच्या मालकी हक्काचे शेअर्स (आक्साव्वां) कोणकोणत्या तालुक्याच्या कोणकोणत्या ग्रामसंस्था किंवा कोम्युनिदादीत आहेत त्याची संक्षिप्तात यादी :–

फोंडा महालातील कोम्युनिदादी :- कुंडई-मडकई-वेलिंग.

सासष्टी महालातील कोम्युनिदादी :– मडगांव-कुडतरी.

मुरगाव महालातील कोम्युनिदादी :– कुठ्ठाळ-सांखवाळ.

श्रीमंगेश देवस्थानच्या मालकी हक्काच्या भोगवटेच्या सर्व एकंदर जमिनी, शेती, बागायती, कुळा-गरें, इमारती, हक्क, पेसांवां, वतनें, आक्सावां (शेअर्स) इत्यादीची संपूर्ण यादी, त्यांचे दाखले, नकाशे, सर्व माहितीसह देवस्थानच्या दप्तरात आहेत.

श्रीमंगेश कुलदैवत असलेल्या महाजनाची पालवी देवस्थाने

श्रीमंगेश देवाच्या कुळावी सर्वच महाजनाची पालवी देवी एकच नसून जे कोणी कुळावी महाजन लाड, केंडारी भांडारी, राजाध्यक्ष, दळवी, पालेकर, कंटक, 'भिसे, वागळे, तेलंग, केंकरे, नाईक, मांईकर, धुमे, काबाडी, नाईक, संजगिरी या वांगडांचे असतील त्यांची पालवी देवी बांदिवडें-फोंडा येथील श्रीमहालक्ष्मी देवी असून, राहिलेल्या शिंगण दळवी, ब्रम्हे, नेत्रावळकर, नाईक, हिंगटे, सत्यवंत भांडारी, दळवी, कैसरे, भेंडे, या वांगडांच्या उपनावाच्या कुळावी महाजनाची पालवी देवी म्हार्दोळ-फोंडा येथील

श्रीमहालसा देवी आहे. तसेच, तिनईकर व नाईक कोळंबे (करंडे) यांची पालवी देवी श्रीआर्यादुर्गा, अंकोला (कारवार) ही आहे.

पालवी म्हणजे सहाय्यभूत किंवा उपकुल देवता. 'पाल' 'पालव' याचा अर्थ सहाय्यक असा आहे. कुलदेव श्रीमंगेश आपल्या कुळावी महाजनांचे कल्याण करताना या पालवी देवतांचे सहाय्य घेत असतात अशी या मागची भावना आहे.

श्रीमंगेश कुलदेवाचे दर्शन, पूजा अर्चादि देवकृत्य पूर्ण झाल्यावर प्रत्येकाने आपल्या कुटुंब कल्याणार्थ व वंशपरंपरेने चालत आल्याप्रमाणे आपली जी पालवी देवता असेल, तिचे दर्शन व देवकृत्य करून परत श्रीमंगेश कुलदेवाकडे येऊन दर्शन घेतले म्हणजे यात्रा पूर्ण झाल्याचे मनास समाधान मिळते.

कुशस्थलीकरांचे श्रीमंगेश देवस्थान मंगेशी व केळोशीकरांचे श्रीशांतादुर्गा देवस्थान कवळें यामधील परस्पर संबंध

श्रीमंगेश देवस्थान आणि श्रीशांतादुर्गा देवस्थान कवळें या दोनही देवस्थानातील महाजन मंडळीस एकमेकामधील परस्परात सर्व प्रकारचा अग्रेसरत्वाचा मान देण्याची परंपरागत वहिवाट चालत आलेली आहे. श्रीमंगेश देवस्थानच्या नियमावली कायद्यात (कोंप्रोमिस्स कलम ५० वे) श्रीशांतादुर्गा-कवळें देवालयाचे महाजन एखाद्या उत्सवास हजर असले तर, तेव्हा त्यांचे रीतसर स्वागत करून त्याना अग्र-मानपूर्वक वागविण्यात येते. अशाच प्रकारे श्रीशांतादुर्गा कवळें नियमावली कायद्यात (कोंप्रोमिस्स कलम ४२ वे) श्रीमंगेश देवाच्या महाजनास जो आजवर अग्रमान देण्याची वहिवाट आहे ती तशीच चालू राहवी, असा स्पष्ट आदेश आहे.

यामुळे, श्रीमंगेश देवस्थानात माघ शुक्ल पौर्णिमा महापर्वणी महोत्सवात तसेच महाशिवरात्री उत्सवात श्रीमंगेश देवाची स्वारी महारथारूढ होत असते त्या वेळी, रथावर नारळ फोडणे, चौकावर मानाचे विडे देणे, इत्यादि बाबतीत श्रीशांतादुर्गा कवळेंच्या महाजनास मान देण्याची वहिवाट आहे. त्याच प्रमाणे मुक्तद्वार असलेल्या दिवसात देखील परस्पर देवस्थानातील पुराणिक, हरिदास यांसही पहिल्याने पुराण सांगण्याचा व कीर्तन करण्याचा मान दिला जातो.

श्रीगौडपादाचार्य संस्थान कैवल्यपूर (कवळें) मठाधीश श्रीगुरुस्वामी

केळोशी कुशस्थलादि स्मार्त सांप्रदायी, श्रीमंगेश, श्रीशांतादुर्गा इत्यादी कुलदैवताची महाजन गौड सारस्वत ब्राम्हण मंडळी श्रीगौडपादाचार्य संस्थान कैवल्यपूर (कवळें) मठाच्या शिष्यत्वाखाली येते. श्रीगौडपादाचार्य आद्य मठ प्रारंभी कुशस्थली नगर (कुठ्ठाळ) येथे श्रीमंगेश देवता सन्निधानीच होता, हे त्या मठाच्या प्रदीर्घ कालापासून चालत आलेल्या बिरुदावलीवरून स्पष्टपणे लक्षात येते. दैवतांच्या स्थलांतरानंतर तो मठ सध्याच्या जागी कवळें येथे बांधला गेला आहे.

श्रीमत् गौडपादाचार्य संस्थान कवळें मठाधीश श्रीगुरूस्वामी महाराजाची स्वारी आपल्या मुख्य मठात कवळें येथे वास्तव्यास असल्यास, श्रीमंगेश देवस्थानच्या मुख्य यात्रेस म्हणजे महापर्वणी माघ पौर्णिमेस श्रीमंगेश देवस्थानात अवश्य येत असते, त्या वेळी किंवा संचारोद्देशाने वगैरे श्रीस्वामी महाराजांचे आगमन श्रीमंगेश स्थलात झाल्यास, देवस्थानात असलेल्या सर्व महाजन मंडळीने देवाच्या एकंदर लवा-जम्यासह श्रीस्वामीच्या सामोरे जाऊन त्याना देवस्थानात सत्काराने आणले पाहिजे.

देवालयात श्रीस्वामी महाराजाची पाद्यपूजा वगैरे झाली पाहिजे. ही पाद्यपूजा देवस्थानचे घैसास यांच्या हातून करण्याची वहिवाट चालत आलेली आहे. देवस्थान श्रीस्थलांत श्रीस्वामी महाराजांची स्वारी असता उत्सवाचे वेळी म्हणजे देवाची स्वारी पालखी, रथ वगैरे यानातून मिरवणुकीने निघते, त्या प्रसंगीही श्रीस्वामी महाराजांच्या निवासस्थानी वाद्ये, मशाल वगैरे नेऊन श्रीस्वामी महाराजाना आणले पाहिजे.

कैवल्यपूर, चित्राव किंवा गौड सारस्वताच्या कोणत्याही स्वामी महाराजाची स्वारी श्रीमंगेश संस्थानी यावयास निघेल तेव्हा, श्रीआलया पर्यंत श्रीस्वामीबरोबर चालण्यास ठराविक टप्प्यावर रितीप्रमाणे

वाद्ये, हिलामत सामोरे पाठविण्यात यावी आणि संस्थानी आल्यावर त्यांचा योग्य सन्मान करण्यात यावा, त्यांचा मुक्काम मोकाशाच्या हद्दीत असल्यास, वाद्य, मशाली वगैरे राजचिन्हे त्यांच्या निवासस्थानी पाठवून त्याना श्रीमंगेश देवाच्या मिरवणुकीस अगर कोणत्याही उत्सवास आणण्यात यावे, असा स्पष्ट आदेश देवस्थानच्या नियमावली कलम ४८ मध्ये आहे. तसेच, धार्मिक बाबतीत कदाचित लढा उपस्थित झाल्यास महाजन मंडळीने विनंती केल्यावर कैवल्य मठाधीश श्रीस्वामी जो निकाल देतील तो मान्य केला जाईल, असाही आदेश उल्लेखित नियमावलीच्या कलम ७२ मध्ये आहेत.

प्रसाद कौल

श्रीमंगेश देवस्थानात, प्रसाद-कौल वर्षाचे एकंदर दिवस घेण्याची वहिवाट नाही. ज्या ज्या दिवशी प्रसाद-कौल त्या देवस्थानात घेण्यास येत नसतात, ते ते सर्व दिवस खाली नमूद केलेले आहेत :–

चैत्र महिना :– शुक्ल प्रतिपदा (संवत्सर प्रतिपदा), शुक्ल ९ मी (श्रीरामनवमी), शुक्ल दशमी.

वैशाख महिना :– शुक्ल तृतीया (अक्षय्य तृतीया)

आषाढ महिना :– शुक्ल एकादशी, शुक्ल द्वादशी, कर्क संक्रांत येईल त्या दिवशी.

श्रावण महिना :– प्रत्येक सोमवारी, शुक्ल पंचमी (नागपंचमी) शुक्ल पौर्णिमा (नारळी पौर्णिमा), वद्य अष्टमी (श्रीकृष्ण जयंती).

भाद्रपद महिना :– शुक्ल चतुर्थी (श्रीगणेश चतुर्थी), शुक्ल पंचमी (ऋषी पंचमी), शुक्ल चतुर्दशी (श्रीअनंत चतुर्दशी)

आश्विन महिना :– नवरात्र शुक्ल प्रतिपदा ते दशमी (विजया दशमी पर्यंत), वद्य द्वादशी, वद्य चतुर्दशी.

कार्तिक महिना :– शुक्ल एकादशी ते पौर्णिमा पर्यंत, परंतु त्यात त्रयोदशी तिथी एकाच दिवशी आल्यास त्या दिवशी संध्याकाळी प्रसाद-कौल घेण्याची वहिवाट आहे.

मार्गशीर्ष महिना :– शुक्ल पौर्णिमा (श्रीदत्त जयंती)

पौष महिना :– मकर संक्रांत शिवाय शेवटच्या सोमवारी, सार्वजनिक महारुद्र सांगता होते, त्या दिवशी.

माघ महिना :– शुक्ल दशमी, शुक्ल द्वादशी ते पौर्णिमा पर्यंत (वार्षिक महापर्वणी महोत्सव,) वद्य पंचमी (कवचोत्सव), वद्य चतुर्दशी (महाशिवरात्र).

फाल्गुन महिना :– वद्य प्रतिपदेपासून वद्य पंचमी (रंगपंचमी) पर्यंत.

या शिवाय, सूर्यग्रहण किंवा चंद्रग्रहण ज्या दिवशी येईल त्या दिवशी कौल-प्रसाद घेण्यास मिळत नाही. ज्येष्ठ महिन्यातील तीसही दिवस, तसेच, अधिक मास आल्यास त्या महिन्याचे तीसही दिवस, कौल-प्रसाद घेण्यास मोकळीक असते. हे प्रसाद मुख्य उत्सवाचे दिवस खेरीज करून, सकाळी निर्माल्य विसर्जन झाल्यापासून रात्रौ आरती होण्याचे वेळेपर्यंत किंवा सोमवार अगर इतर दिवशी श्रीची स्वारी मिरवणूकीस देवालयाबाहेर निघण्यापूर्वीच्या वेळेत लावीत असतात.

ही प्रसाद पूजा श्रीदेवशर्मा उर्फ श्रीग्रामपुरुषाच्या पाषाणी मूर्तीस लावतात व ती पूजा तांबड्या रंगाच्या पांटकळीच्या फुलाच्या कळ्यांची आणि फुलांच्या पाकळ्यांची लावतात.

कुठ्ठाळ गावचा खिश्चन इसम आपले प्रसाद घेण्यासाठी श्रीमंगेश देवालयात आल्यास, अग्रक्रमाने त्याचेच प्रसाद लावण्याची वहिवाट या देवालयात आहे.

प्रसादपूजा कशी लावतात आणि पूजेतील प्रत्येक कळी आणि फुलाच्या पाकळीची परिभाषा काय समजण्यात येते, याची माहिती श्रीदेवशर्मा (श्रीग्रामपुरुष) च्या मूर्तीस प्रसाद पूजा लावल्यानंतरचे छायाचित्र (फोटो) श्रीमंगेश देवस्थान समग्र इतिहास या पुस्तकात दिली आहे.

महत्त्वाचे वार्षिक उत्सव

श्रीमंगेश देवस्थानात दैनंदिन होणारी सर्व देवकृत्ये आणि उत्सव यांची नोंद येथे देणे अगदीच अशक्य असल्यामुळे फक्तच वार्षिक महत्वाचे कार्यक्रमाची यादी येथे दिली आहे :– (सर्व एकंदर

देवकृत्ये आणि सर्व उत्सवाची नोंद 'श्रीमंगेश देवस्थान दैनंदिनी' या पुस्तकात आहे. त्या पुस्तकाचे लेखक :– श्री. विनायक ना. शें. धुमे, प्रकाशक :– श्री. पुट्टपा शि. नाडकर्णी, आणि मुद्रक श्री. ना. द. रंगे, मोहन प्रिंटरी, मुंबई १६ आहे).

चैत्र

चैत्र शु. १ – श्रीसंवत्सर प्रतिपदा, पंचांग श्रवण, श्रीरामायण पारायण प्रारंभ, पंचमूर्तिदर्शन, रात्रौ सुखासनोत्सव, श्रीराम नवमी उत्सवाचा प्रारंभ, वसंत पूजा प्रारंभ.

चैत्र शु. ७-८-९-१०- चार दिवस, रात्रौ नाटक.

चैत्र शु. ९ – श्रीराम नवमी. श्रीरामजन्मोत्सव, रात्रौ फलाहार.

चैत्र शु. १० – समाराधना, ब्राम्हण संतर्पण, पहाटेस खांद्यावरील रथोत्सव.

चैत्र शु. १५ – हत्तीअंबारीतून श्रीची मिरवणूक, दीपस्तंभावर दीपाराधना.

चैत्र वद्य ६ – श्रीउमामहेश्वर व्रत, समाराधना.

चैत्र वद्य ७ – चांदीच्या पालखीतून मिरवणूक.

वैशाख

वैशाख शु. ३ – अक्षय्यतृतीया- दुपारी समाराधना, रात्रौ शिबिकोत्सव.

वैशाख वद्य १२ – श्रीनाईकस्वामी यांची पुण्यतिथी, समाराधना.

ज्येष्ठ

ज्येष्ठ वद्य ५ – शिबिकोत्सव.

आषाढ

आषाढ शु. १२ – श्रीशयन द्वादशी, श्रीची स्वारी पालखीतून तलावावर जाते.

श्रावण

श्रावण शु. १५ – श्रावणी पौर्णिमा, पवित्रारोपण.

श्रावण वद्य ८ – श्रीकृष्ण जन्माष्टमी, रात्रौ शिबिकोत्सव.

भाद्रपद

भाद्रपद शु. ५ – नवान्न ग्रहण.

भाद्रपद शु. ६ – श्रीदेवी भगवतीस रात्रौ रंगपूजा.

भाद्रपद शु. १४ – श्रीमदनंतव्रतोत्सव, ब्राम्हण, संतर्पण, समाराधना, रात्रौ शिबिकोत्सव.

भाद्रपद वद्य १० – शिबिकोत्सव.

आश्विन

आश्विन शुक्ल प्रतिपदे पासून शुक्ल ९ मी पर्यंत नवरात्रोत्सव, मखरोत्सव, कीर्तन.

आश्विन ८-९ मी– "धुमे" उपनावाच्या वत्स गोत्रीय कुटुंबियाकडून शिंगाचा महारूद्र.

आश्वन शु. १० – विजया दशमी- दसरा- सीमोल्लंघनाचा शिबिकोत्सव सुवर्णपालखीतून, नंतर सार्वजनिक कल्याणासाठी गाऱ्हाणे प्रार्थना गावडे लोकासह सर्वाकडून नंतर कौल प्रसाद. नंतर रात्रौ सुखासनोत्सव– "धुमे" उपनावाचे वत्स गोत्रीय यांकडून.

आश्विन शु. १२ ते कार्तिक शु. १२– दररोज हरिजागर चालू असतो.

आश्विन शु. १२ – प्रियोळ गावाच्या देवालयातील श्रीवेताळाची स्वारी (अवसर) श्रीमंगेश देवस्थानात येते त्याची पूजा, तळी, शेला तसरीफ बहुमान करतात.

आश्विन शु. पौर्णिमा – कोजागिरी उत्सव रात्रौ सुखासनोत्सव.

आश्विन वद्य १२ शी – श्रीगुरुद्वादशी उत्सव, दुपारी ब्राम्हण संतर्पण, समाराधना. रात्रौ थोरल्या लालकीतून श्रीची मिरवणूक.

आश्विन वद्य १४ शी – नरक चतुर्दशी, दिपवाळीचा उत्सव, पंचमूर्ति दर्शन, रात्रौ कुबेर-लक्ष्मी पूजनोत्सव.

कार्तिक

कार्तिक शु. १ पासून शु. १४ पर्यंत सतत १४ दिवस रात्रौंची देवालयात दोन दारी सहा रांगांची दीपाराधना.

कार्तिक शु. २ – भाऊबीज उत्सव, दुपारी समाराधना, सुखासनोत्सव.

कार्तिक शु. ११ – पंचमूर्ति दर्शन, रात्रौ खांद्यावरील रथोत्सव.

कार्तिक शु. १२ – काला उत्सव, रात्रौ गोपालकाला. हा उत्सव फार प्रेक्षणीय असतो.

कार्तिक शु. १३ – सकाळी दहिकाला, नंतर श्रीची मूर्ति व श्रीविठ्ठल रखुमाईची मूर्ति पालखीतून तलावावर जाते. श्रीविठ्ठल रखुमाईची मूर्ति तलावाच्या पाण्यातून तलावात पाच प्रदक्षिणा घेऊन नंतर श्रृंगार करून परत पालखीत बसते. श्रीमंगेशदेव आणि श्रीविठ्ठल रखुमाई ही दोनही देवते पालखीत बसून ही पालखी परत देवालयात पोहोचेपर्यंत, ती पालखी आपल्या खांद्यावरून वाहविण्याची सेवा वत्स गोत्रीय कुळावी महाजन यांकडूनच केली जाते. त्यास प्रीतवर्षी हा बहुमान दिला जाण्याची वहिवाट परंपरेने चालत आली आहे. नंतर सार्वजनिक गाऱ्हाणे प्रार्थना कौल-प्रसाद.

कार्तिक शु. १४ शी – वनभोजनोत्सव. श्रीची स्वारी पालखीतून मठात जाते. तेथे वनभोजन समारंभ समाराधना दुपारी होऊन, रात्रौ १० वाजता परत पालखी मिरवणुकीने देवालयात येते.

वैकुंठचतुर्दशी उत्सव – रात्रौ श्रीची पालखी तलावावर जाऊन परत येते. दीपोत्सव.

कार्तिक शु. १५ मा. – वनभोजनोत्सव. श्रीची स्वारी पालखीतून मठात जाते. तेथे वनभोजन समारंभ दुपारी समाराधना होऊन रात्रौ परत येते.

कार्तिक वद्य ७ मी – श्रीशिवशर्मा (कौंडिण्य पुरुष) चा काला उत्सव.

कार्तिक वद्य ८ मी – श्रीशिवशर्मा देवालयाकडे गोपालकाला.

कार्तिक वद्य १४ शी – शिबिकोत्सव.

मार्गशीर्ष

मार्गशीर्ष शु. ११ – श्रीमद्भगवद्गीता जयंत्युत्सव, समाराधना, रौप्य शिबिकोत्सव.

मार्गशीर्ष शु. १५ – वनभोजन, समाराधना, रात्रौ पालखी उत्सव.

मार्गशीर्ष वद्य ४ थी – रौप्य शिबिकोत्सव.

मार्गशीर्ष अमावास्या – रौप्य शिबिकोत्सव.

या महिन्यात श्रीक्षेत्र प्रयाग येथून श्रीगंगाभागीरथीची कावड श्रीस्थळ मंगेशी येथे येत असते

पौष

पौष वद्य षष्ठी नंतरच्या शुक्रवारी प्रारंभ होऊन जवळच्या सोमवारी सार्वजनिक लिंगाचा महारुद्र सांगता, दुपारी समाराधना, रात्रौ सोमवारच्या शिबिकोत्सवा नंतर रथोत्सव. हा महारुद्र श्रीमंगेश देवाचे सर्व कुळावी महाजन यांच्या आयुरारोग्य आणि कुटुंब कल्याणार्थ व उत्तरोत्तर अभिवृध्दीसाठी केला जातो.

पौष अमावास्या – 'गड' घालणे म्हणजे चतुःसीमांवर 'गड दाळप' केले जाते.

माघ

माघ शु. ५ मी – श्रीसांतेरी देवीचे कालटं (जत्रा) ही श्रीसांतेरी देवी सर्व कुळावी महाजनाची आराध्य ग्रामदेवता असून तिचे देवालय तलावाच्या उजव्या बाजूस असलेल्या उंचवट्यावर आहे.

माघ शु. ७ – रथसप्तमी विजयरथोत्सव

माघ शु. ८ – हत्ती अंबारीतून श्रीची मिरवणूक

माघ शु. ९ – रौप्य शिबिकोत्सव

माघ शु. १० – खांद्यावरील रथोत्सव

माघ शु. ११ – रौप्य शिबिकोत्सव

माघ शु. १२ – माध्यान्ही पंचमूर्ति दर्शन. रात्रौ नौकारोहण (सांगड)

माघ शु. १३ – सुखासनोत्सव

माघ शु. १४ – धाकटा रथोत्सव, दीपोत्सव, रोषणाई

माघ शु. १५ – महापर्वणी महोत्सव, थोरला रथोत्सव, महाप्रसाद कौल, सार्वजनिक समाराधना, दीपोत्सव, मुक्तद्वार इत्यादी. सार्वजनिक गाऱ्हाणे.

माघ वद्य १ – सार्वजनिक समाराधना.

माघ वद्य २ – दुपारी समाराधना, रात्रौ शिबिकोत्सव श्रीमंगेश देवाची सुवर्णमूर्तीचा.

माघ वद्य ५ – नूतन कवचोत्सव दुपारी समाराधना, रात्रौं रौप्य शिबिकोत्सव आणि "जागर"

माघ वद्य ८ – दुपारी समाराधना, रात्रौं रौप्य शिबिकोत्सव

माघ वद्य १४ – महाशिवरात्रीचा उत्सव, रात्रौं सार्वजनिक फलाहार, पहाटेस धाकटा रथोत्सव. (प्रदोष काली श्रीगंगाभागीरथीचा अभिषेक, रात्रौं चतुःप्रहरी)

माघ अमावास्या – दुपारी ब्राम्हण संतर्पण समाराधना ब्रम्हीभूत श्रीमत् परमहंस पूर्णानंद सरस्वतीस्वामी महाराज गौंडपादाचार्य संस्थान कवळें मठ यांच्या इच्छेनुरूप कवळें मठाच्या खर्चानें.

वैशाख

फाल्गुन १५ – रौप्य शिबिकोत्सव.

फाल्गुन वद्य ५ – रौप्य शिबिकोत्सव.

फाल्गुन वद्य १० – रौप्य शिबिकोत्सव.

श्रीमंगेश देवस्थानातील काही परिवार देवतांची पुनःप्रतिष्ठा व काही दैवतांच्या देवालय इमारतींचा जीर्णोद्धार झाला त्यांची नोंद

श्रीमंगेश देवस्थानातील काही पैचिष्ट परिवार दैवतांपैकी श्रीलक्ष्मी नारायण, श्रीसूर्य नारायण, श्रीवीरभद्र व श्रीगरुड आणि कौंडिण्य गोत्री मुळपुरुष श्रीशिवशर्मा यांची पुनःप्रतिष्ठा वैशाख कृष्ण द्वितीया शके १८५० रविवार ता. ६ मे १९२८ या शुभमुहूर्तावर झाली.

नंतर श्रीशिवशर्माच्या देवालयाची इमारत फार जुनी झाल्यामुळे ती मोडून, परत त्याच जागी सुंदर नवी इमारत-देवालय आधुनिक पध्दतीने बांधण्यात आले. या कारणास्तव, श्रीशिवशर्मा लिंगाची पुनः प्रतिष्ठा करावी लागली. ही पुनःप्रतिष्ठा शके १८५८ माघ वद्य तृतीया, शनिवार ता. २८ फेब्रुवारी १९३७ या शुभ मुहूर्तावर श्रीकैवल्यमठाधीश श्रीमत् पूर्णानंद सरस्वती स्वामी महाराजांच्या उपस्थितीत झाली.

श्रीनाईक स्वामीच्या पादुका असलेली इमारत अत्यंत मोडकळीस आल्यामुळे ती इमारत परत श्रीमंगेश देवस्थानच्या खर्चाने गर्भागार मंदिर आणि त्या सभोंवारची इमारत संपूर्णपणे नवीन पध्दतीने बांधून त्यात श्रीनाईक स्वामीच्या पादुकांची आणि त्यांच्या देवतार्चनाच्या मूर्तींची पुनःप्रतिष्ठा शके १८६१ माघ शुक्ल त्रयोदशी, बुधवार ता. २१ फेब्रुवारी सन १९४० या शुभमुहूर्तावर करण्यास आली.

श्रीसांतेरी देवीचें देवालय तलावाच्या उजव्या बाजूस उंचवट्यावर असलेले फारच जीर्ण झाल्यामुळे त्याचा जीर्णोध्दार करून, ती नवी इमारत ता. १४ मे १९५८ रोजी पूर्ण होऊन त्याच तारखेला बांधकाम केलेल्या कंत्राटदाराकडून ती इमारत कायदेशीररित्या देवस्थान व्यवस्थापक कमिटीकडे सुपूर्त करण्यात आली आहे.

श्रीमंगेश देवस्थानात "मठ" नावाची एक मोठी इमारत देवस्थानच्या मालकी हक्काची असून या जागेत प्रतिवर्षी आंवळी भोजनें होतात. तसेंच, माघ पौर्णिमा महापर्वणी महोत्सवात सार्वजनिक अन्नसंतर्पण समाराधनाचें कार्यक्रम साजरे केले जातात. याशिवाय व्रतबंध, विवाहादि मंगलकार्यें करण्यास सर्व सोई असल्यामुळे गरजूस ती इमारत उपयुक्त आहे. ही इमारत जीर्ण झाल्यामुळे तिचा जीर्णोध्दार करण्यात आला व जीर्णोध्दाराचें काम पूर्ण होऊन ती इमारत ता. १५ नवंबर १९५४ या दिवशी श्रीमंगेश देवस्थान व्यवस्थापक कमिटीच्या स्वाधीन कायदेशीरपणे करण्यात आली.

वर उल्लेखित श्रीसांतेरी देवीच्या देवालयाच्या जीर्णोध्दाराचें बांधकाम आणि 'मठ' इमारतीच्या जीर्णोध्दाराचे बांधकाम श्रीमंगेश देवस्थानचे एककुळावी महाजन पणजी येथे कायम वास्तव्य करणारे कंत्राटदार श्री. गोविंद मर्तो शेणवी केंकरे आगशीकर यानी केले आणि श्रीनाईक स्वामीच्या पादुका असलेले गर्भागार आणि सभोंवारची इमारत बांधकाम श्रीमंगेश देवस्थानचे कुळावी महाजन कै. श्रीपाद नाईक करंडे राहणार मंगेशी यानी कंत्राट घेऊन केले.

सुज्ञ विचारवंतानी गोमंतकातील देवालयांची जमेची बाजू विचारात घ्यायला हवी.

गोमंतकातील देवालये ही केवळ अंधश्रध्देने पूजा किंवा प्रार्थना करण्याचे स्थान नसून त्यांच्या कित्येक वैशिष्ट्यामुळे ती अद्वितीय, अनुपम, संस्थारूप आहेत असे विचारवंत मानतात. जगातील प्राचीन संस्कृतीत भारतीय संस्कृतीची आणि अर्थात त्यात गोमंतकीय संस्कृतीची गणना होते. त्या संस्कृतीची प्रतीक-रूप ही देवालये आहेत.

भारतीय संस्कृतीची प्राचीन काली केवढी प्रगती झाली होती, हे ज्या साधनानी जोखले जाते, त्यापैकी गोमंतकातील देवालये ही महत्वाची साधने आहेत. एवढी भव्य, आकर्षक व नयनरम्य देवालये त्या काली बांधण्यात आली, म्हणूनच आपल्या संस्कृतीची महानता समजण्याची एक उत्तम संधी आपल्याला लाभली.

देवालये मूकपणे जो इतिहास सांगत उभी आहेत, तो जाणून समजावून घ्यायची अत्यंत आवश्यकता आहे. आपले अतिप्राचीन ग्रंथ कंठस्थ करून किंवा ताडपत्रावर लिहून सांभाळले गेले, त्यामुळे त्यात भर पडण्याची व काही भाग गळण्याची शक्यता होती.

मोठमोठे सम्राट चक्रवर्ती होऊन गेले. त्यांची साम्राज्ये नष्ट झाली लुप्त झाली. तथापि, त्या सर्वानी बांधलेली देवालये आजवर टिकली आहेत. तशीच आमच्या पुण्य पुरुष पूर्वजानी सर्व प्रकारचा स्वार्थत्याग करून गोमंतकात जी देवालये बांधली, तीही आजवर टिकली आहेत आणि ती त्या कालच्या भारतीय आणि त्यातल्या त्यात गोमंतकाच्या संस्कृतीची गुणगाथा गात आहेत.

गोमंतकीय आणि अखिल भारतीय देवालयाच्या कालातील अथवा त्या पूर्वीच्या कालाची काही शिल्पे, स्थापत्य जगात क्वचित आहेत. पण, भारतीय शिल्प स्थापत्याशी तुलना करता येईल असे शिल्प-स्थापत्य कोठेच आढळत नाही. खुद्द गोमंतकात अशी काही शिल्पे, स्थापत्ये आहेत की, विशेषतः देवालये, की ज्याचा पाश्चिमात्य कला रसिकानी व स्थापत्यकारानी मोकळ्या मनाने आणि मुक्त कंठाने त्या देवा-लयाची, शिल्पाची व स्थापत्याची प्रशंसा केली आहे.

यावरून गोमंतकीय शिल्पकार व कलाकार किती उच्च दर्जाचे असले पाहिजेत याची कल्पना येते. ते स्वतःच्या कल्पनाशक्तीपेक्षा परंपरेने चालत आलेल्या मान्यताशी अधिक प्रामाणिक होते. अहंला विसरलेले होते. म्हणूनच अशा महान् आश्चर्यकारक कलाकृती निर्माण करूनही स्वतःची नावे त्यानी सहसा गोमंतकात कोठेही कोरलेली नाहीत. गोमंतकीय देवालयात भव्यता, प्रमाणबध्दता, सौंदर्य आणि कलौघात टिकून राहण्याची शक्ती, यांचे अद्‌भूत मिश्रण आहे. शिवाय गोमंतकीय देवालये बांधण्यामागची भूमिकाही फार भिन्न होती. आपल्या संस्कृतीचे खास वैशिष्ट्य जी सहिष्णुता ती त्याच्या पाठी होती. गोमंतकातील देवालये जबरदस्तीने पकडून आणलेल्या गुलामाकडून अथवा वेठीला धरलेल्या गोर-गरीबाकडून बांधलेली नाहीत. गोमंतकीय देवालय बांधणीचा इतिहास क्रौर्याने माखलेला नाही. तर मांगल्याने प्रसन्नतेने लिहिलेला आहे.

गोमंतकात देवालये बांधण्यास आरंभ केव्हा झाला असावा, ते नक्की ठरविता येणार नाही. तथापि वैदिक वाङ्मयातील आणि नंतरच्या महाकाव्याच्या उल्लेखावरून अनुमान काढता येते. वेदकालापासून प्रतिक, प्रतिमा आणि काही देवतांचा उल्लेख आढळतो.

त्या काली देवतांची पूजा आजच्या प्रमाणे पत्रपुष्पद्वारा करीत नसत. हवनद्वारा होत असे. ब्राम्हणात, सूत्रात, देवायतन, देवप्रतिमा, शब्दांचा समावेश झालेला दिसतो. बहुतकरून वेदाच्या रचनेनंतर देवालये बांधण्यास आरंभ झाला असावा.

गोमंतकीय मनोवृत्तीचा कल विचारात घेता, असे वाटते की, तत्कालीन अन्य संस्कृतीच्या लोकापेक्षा ते अधिक आध्यात्मिक प्रवृत्तीचे होते.

असे म्हणतात की, योग्याना ध्यानावस्थेत प्रतिमाची दर्शने झाली असावी. अशा अवस्थेत ज्या प्रतिमा दिसतात, त्या अलौकिक कल्पनातीत, आनंददायी असतात. योगाचे अध्यात्म साधनेचे साधक असतील तेच यातील रहस्य समजू शकतील.

अशा प्रकारे ध्यानावस्थेत दिसलेल्या प्रतिमावरून मूर्ति बनविण्यात आल्या आणि त्यानंतर ध्याना-साठी, पूजेसाठी सर्वांना त्याचा लाभ मिळू लागला. त्यातूनच देवालयाचा जन्म झाला. देवालयाचे महत्त्व वाढू लागले. दान, पुण्य, पापविमोचन,विजयाचे स्मारक किंवा स्पर्धा अशा नानाविध कारणानी देवालये अधिकाधिक प्रमाणात बांधण्यात येऊ लागली.

गोमंतकात जी देवालये सध्या उभी दिसत आहेत, ती बहुतेक सर्वच इसवी सनाच्या शतका-नंतरची आहेत. गोमंतकातील अति प्राचीन देवालये आणि त्यातील मूर्तीभंजन मुस्लीमानी केले. त्यानंतरच्या कालात खिरस्ती धर्मियानी केले. त्यामुळे बहुतेक सर्व शिल्पाकृती नष्ट झाल्या. या सर्वांच्या अत्याचारातून थोडीसी वांचलेली देवालये, प्राचीन गोमंतकीय शिल्पकलेचा इतिहास सांगायला उरली आहेत.

शिल्प स्थापत्यात गोमंतकीय शिल्पकारानी साफल्याचा जो उच्चांक साधला, त्याचे वर्णन करायला शब्द थिटे पडतील. गोमंतकातील देवालयाची शिल्पकला धार्मिक असूनही जीवनापासून दूर जाणारी नाही. शिवाय निराशावादी नव्हती व नाही. आनंदमय अवस्थेतील आशावादी होती. म्हणूनच देवालयात किंवा देवालयाबाहेर कोरलेल्या देवता, संत, साधू इत्यादी सारे हंसतमुख व मोल्यवान वस्त्रे आणि दागदागिनेही धारण करणारे होते. त्या कालातील समाजाला अशा प्रकारच्या शक्तीची जरूरी होती, त्या शक्तीच्या प्रतीक रूपाने देवता निर्मिलेल्या होत्या.

गोमंतकातील देवालयाच्या शिल्पाची व स्थापत्याची रचना पूर्वी पासूनच गृह प्रासादाहून भिन्न असा-यची. देवालयाचे ते उत्तुंग शिखर आसमंतावर सर्व प्रकारे प्रभुत्व गाजवायचे आणि स्वतःच्या अस्ति-त्वाची जणू काही जाणीव द्यायचे.

मूर्तिपूजेला प्राधान्य मिळाल्याने देवालये बांधली गेली. त्यामुळेच गोमंतकात शिल्पकला, स्थापत्य-कला, चित्रकला, रंगकला, गायनवादन, नृत्य, विणकाम, धातुकाम वगैरे कलाना उत्तेजन मिळून त्या विकास पावल्या. देवालयाच्या आश्रयाने शिक्षणाचा विकास झाला. त्या काली पाठशाळा देवालयात किंवा त्याच्या आवारात त्याच्या आश्रयाने चालविल्या जात. प्रवचने, धर्मसभा, चर्चा, आयोजिल्या जात. मोठी देवालये जी मागाहून तीर्थस्थाने बनली, ती शेंकडो वर्षे विद्यापीठे, ज्ञानपीठे होती. राजांकडून, धनिकां-कडून, देणग्या, दाने, वतने, मिळत. देवालये गोमंतकात तरी त्या धनामुळे गावात आणि शेजारच्या परि-सरात बँकाप्रमाणे गावकऱ्याना आणि गरजूना उपयुक्त होत.

पुजारी, अभिषेकी, पुराणिक, कथेकरी, जोशी, वादक, नर्तक, शिक्षक, माळी, कुळकर्णी, शिंपी, धोबी, सुतार, सुवर्णकार, सोनार, लोहार, महार, चांभार वगैरेना देवालयाच्या आश्रयाने कामकाज मिळत असे. न्याय निवाडा देवासमोर करण्याची प्रथा अगदी अलीकडच्या काळापर्यंत म्हणजे ७०-७५ वर्षापूर्वी गोमंतकात होती. उत्सवाच्या निमित्ताने आजूबाजूच्या परिसरातील लोकांचे एकप्रकारचे संमेलन भरायचे. या सर्व दृष्टीकोनातून गोमंतकातील देवालयांची महत्ता, सामाजिक दृष्टीने अतिमोलाची खचित होती व अद्यापही काही अंशी निश्चितपणे आहे, याची पूर्ण जाणीव मनातून सर्वांनाच आहे.

औद्योगिक युगापूर्वीच्या कालात देवालयाचे गावावर जे प्रभुत्व असायचे त्याच अर्थाने देवालये गोमंतकीय संस्कृतीची धामे होती व आहेत, असे मानण्यात येते व ते योग्यच आहे. देवालये केवळ अंध-श्रध्देने पूजा किंवा प्रार्थना करण्याची स्थाने आहेत, आजच्या युगात त्यांचे महत्व नाही असा विचार मांडणाऱ्यानी, गोमंतकीय देवालयाची जमेची आणि लाभाची बाजू सुज्ञ विचारवंतानी मुद्दाम लक्षात घ्यायलाच हवी. शेवटी ही प्रार्थना :–

"त्वन्नामेंच स्थल प्रसिद्ध जाहलें मंगेशि त्या बोलती
तेथींची महिमा मला न वदवे वेद ध्वनी गर्जती
पाहोनी रचना स्थलाचि सुजना आनंद संतोषवी
भोला शंकर पार्वतीसह नमों कूला तुझ्या नांदवी"

॥ ॐ नमस्ते अस्तु लंबोदराय एकदंताय
विघ्ननाशिने शिवसुताय श्रीवरदमूर्तये नमः ॥

२

श्रीगणपती देवस्थान

खांडोळें

श्रीगणपती आद्य मूर्ती खांडोळें



श्रीगणपती देवालय, खांडोळें

श्रीगणपती देवस्थान-खांडोळें-गोवा

गोमंतकात फोंडा तालुक्यातील खांडोळें गावात, आजच्या कालात, एक रम्य स्थळी, जे श्रीगणपती देवस्थान भाविक लोकांचे आकर्षण बनले आहे, ते देवस्थान प्राचीन काली म्हणजे इसवी सनाच्या सोळाव्या शतकापूर्वी गोव्यातच तिसवाडी तालुक्याच्या नावेली गावात मोठ्या वैभवात नांदत होते व त्या काली त्या देवालयाची सुकीर्ती, नावलौकिक व विशेषकरून संकटग्रस्ताना त्वरेने संकटमुक्त करण्यासाठी धावत येणारे महान जाज्वल्य दैवत, अशी त्या दैवताची फार मोठी ख्याती असल्यामुळेच, त्या दैवताचे भाविक संस्थापकच नव्हेत, तर इतर असंख्य लोकांची रीघ तेथे लागत असली तर नवल नव्हे.

पण कोणताही इसम, कोणत्याही अडचणीत सांपडलेला, त्या दैवताशी भक्तिभावनेने आपआपल्या अडचणी निवारण व्हाव्यात, या हेतूने हुकमी धाव घेई.

वास्तविक, श्रीगणपती दैवत, श्रीसिध्दिविनायक, संकष्टहर गणपती या नावानी प्रसिध्द आहे. त्याचे कारण, हिंदु दैवतात या दैवताची महती व प्रचिती वेदकालापासूनच फार विशेष महत्वपूर्ण गुणानी वर्णिलेली असून, खुद्द देवांवरही संकट आल्यावेळी त्या देवांनी श्रीगणपती दैवताकडेच धाव घेऊन, त्याकडून विघ्नहरण करून घेऊन, संकटमुक्त झाल्याची अनेक उदाहरणे, वेदात आणि पुराणात सांपडतात. आणि याच कारणामुळे श्रीगणपती दैवतास विघ्नहर महागणपती म्हणून प्रत्येक शुभकार्याच्या प्रारंभी अचूक आणि अत्यावश्यकपणे, श्रीमहागणपती पूजन करूनच त्या कार्यास सुरूवात करण्याची पध्दती हिंदु-धर्मीयात आहे, हे सर्वांना अनुभवाने माहीत आहे.

अशा या श्रीगणपती देवस्थानच्या मूळ नावेली (तिसवाडी तालुका) येथे असलेल्या श्रीगणपती दैवताच्या स्थलांतराच्या ऐतिहासिक संशोधनपूर्वक माहितीचा शोध आणि बोध घेऊ गेल्यास, जितक्या खोलात जाऊ, तितक्या मनोवेधक आणि चित्तथरारक घटना समजून येतात. हे येथे मुद्दाम नमूद केल्या-शिवाय राहवत नाही.

याचे प्रमुख कारण, हे देवस्थान मूळ नावेलीहून कशा परिस्थितीत, केव्हा, कोणत्या कारणामुळे, कोणत्या गावात, स्थलांतर करणे प्राप्त झाले, हे अभ्यासदृष्ट्या शोध घेऊन गेल्यास, तेथे आणखी ज्या घटनांचा शोध लागतो, त्या घटना जितक्या भयानक आणि चित्तथरारक आहेत, तितक्याच त्याकाली त्या दैवताचे भक्तगण कोणत्याही जीवनमरणासारख्या प्रसंगी व्यक्तिशः किंवा सामुदायिकपणे त्या दैवताकडे प्रार्थना करून, त्या दारूण संकट प्रसंगातून सुटण्यासाठी मार्गदर्शन व्हावे म्हणून, प्रसाद-कौल घेऊनच आपले धोरण आखीत असत.

याबद्दलचे स्पष्ट, साधार खात्रीचे ऐतिहासिक पुरावे आणि तेही कोणी हिंदुधर्मीयानी लिहून ठेविलेले नसून, खुद्द खिरस्तीधर्मीय जेजुइट पंथाच्या धर्मनिष्ठ पाद्रीनी जे आपल्या दप्तरात सविस्तररित्या गुप्तपणे, त्या काली नमूद करून ठेविले व जे कालाच्या ओघात प्राचीन ऐतिहासिक साधनाच्या उपलब्धतेमुळे प्रकाशात आले, त्यावरून कळते.

कोणत्याही धार्मिक परंपरेच्या कृतीची अभ्यासून तपासणी करून अनुभव पाहिल्या शिवाय किंवा नाण्याची दुसरी बाजू समजून घेऊन, तपासल्याशिवाय कुचेष्टा करणे, याला प्रामाणिक विचार, सुज्ञ इसम तरी कधीच म्हणणार नाही.

कुलदैवताकडे प्रार्थना करून, प्रसाद कौल घेणे याला सध्याच्या कालात एक थोतांड असे नाव देऊन, त्या प्रकाराविरुध्द भरपूर तोंडसुख घेणारे, जसे आजच्या समाजात भरपूर प्रमाणात आढळतात, त्याहीपेक्षा

मोठ्या प्रमाणात, त्याच समाजात, बाहेरून थोतांड म्हणून तोंडसुख घेऊन, प्रसिध्दपणे वावरणारेच, गुपचूप देवालयात जाऊन तेथे गुप्तरीत्या प्रसाद-कौल घेणारे जास्त आढळतात. हे उघड सत्य आहे !

प्रसाद-कौल घेणे हा ज्याचा त्याचा वैयक्तिक, विश्वासाचा, दृढ भावनेचा प्रश्न आहे. कोणताही मनुष्य कोणत्याही संकटकाली, जेव्हा त्याला कोणाचाच काडीमात्र आधार नसल्याची खात्री पटते, त्यावेळी, शेवटचा उपाय किंवा आधार म्हणूनच तो कोणत्याही आपल्या विश्वासाच्या दैवताकडे, प्रसाद-कौल घेऊन संकटमुक्त होण्याच्या आशेने धाव घेतो. ती धाव घेण्यावेळची त्याची मनःस्थिती, वेळ, काळ, परीस्थिती आणि त्याची भावना, ज्याची त्यास ठाऊक असते.

आणि त्या कौल-प्रसादामुळे जर दैवबशात् त्याला चांगला गुण आला, तर तो आपल्या नंतरच्या प्रसंगात, कौल-प्रसादासाठी धाव घेणे हे अनैसर्गिक नसून, तो मनुष्य स्वभावच आहे.

प्रसाद-कौल हा विषय चर्चेचा नव्हे किंवा ती चर्चा करण्याची ही जागा नव्हे. शिवाय, तो घ्यावा किंवा घेऊ नये, याची चर्चा किंवा साधे विचारसुध्दा मांडण्याची लेखकाची मुळीसुध्दा इच्छा नाही व गरजही नाही.

पण फक्त इ. सनाच्या सोळाव्या शतकातील एक सत्य ऐतिहासिक घटना पुराव्यासह आता वाचकांपुढे ठेवावयाची आहे. आणि ती ही की, साडेचारशे वर्षापुर्वीही तत्कालीन हिंदुधर्मीय आणि श्रीगणपती दैवताचे भक्तगण आपल्या महान् संकटाचे वेळी, आपले गाऱ्हाणे देवापुढे ठेवून, प्रसाद-कौल घेऊन आपले धोरण ठरवीत असत, हे स्पष्टपणे दाखवून द्यावयाचे असल्याने, ती सविस्तर माहिती ऐतिहासिक दप्तरातील असल्याने ती येथे देणे प्राप्त आहे.

शिवाय त्याकालीन आमच्या पूर्वजाना त्या प्रसाद-कौलामुळे जर अपेक्षित गुण येण्याचा अनुभव नसता, तर ते प्रसाद कौल का घेत राहिले असते, हा प्रश्न विचार करणाऱ्यांपुढे आल्याशिवाय कसा राहील ? असो.

श्रीगणपती देवस्थान-खांडोळे संबंधित, प्राचीन ऐतिहासिक माहितीचा आढावा घेण्यापूर्वी, अत्यावश्यक तेवढी तरी, आणि संक्षिप्त प्रमाणात का होईना, श्रीगणपती दैवताबद्दल धार्मिक आणि पौराणिक माहितीचा परिचय करून घेऊ.

श्रीगणपती दैवताबद्दल अत्यावश्यक कांही पौराणिक माहिती

श्रीगणेशाचे अवतार

श्रीगणपतीचे 'महोत्कट विनायक', 'गुणेश', 'गणेश', व 'धुम्रकेतू' असे चार अवतार, श्रीगणेशादि पुराणात वर्णिलेले आहेत.

महोत्कट विनायक याचा जन्म कृतयुगात कश्यप-अदिती यांच्या पोटी झाला. या अवतारात, त्याने देवान्तक व नरान्तक या राक्षसाना ठार करून, धर्म परित्राण केले व अवतार समाप्ती केली. (गणेशपुराण क्रीडा १). कृतयुगीन महोत्कट विनायक आजन्म ब्रम्हचारी होते.

गुणेश त्रेतायुगात श्रीगणपतीने उमेच्या पोटी भाद्रपद शुक्ल चतुर्थीस 'गुणेश' नावाने जन्म घेतला. या अवतारात श्रीगणपतीने सिंधू दैत्याला ठार केले आणि ब्रम्हदेवाच्या सिध्दि बुध्दि नावाच्या कन्यांशी विवाह केला.

गणेश : द्वापारयुगात पुनश्च पार्वतीच्या पोटी श्रीगणपतीने 'गणेश' या नावाने जन्म घेतला. पण, जन्मतःच हा कुरूप निपजल्यामुळे, त्याला रानात टाकून दिले आणि पराशर मुनीने त्याचा प्रतिपाल केला. या गणेशाने सिंदुरासुराचा वध करून, त्याने बंदीत टाकलेल्या अनेक राजाना आणि वीरांना मुक्त केले. याच अवतारात श्रीगणपतीने वरेण्य नामक आपल्या भक्ताला गणेशगीतेच्या रूपाने शाश्वत तत्वज्ञान उपदेशिले. (गणेश गीता पहा.)

धूम्रकेतू : कलियुगात धूम्रकेतू किंवा धूम्रवर्ण नावाचा श्रीगणपतीचा चवथा अवतार होणार असून, तो म्लेंच्छांचा नाश करणार आहे असे भविष्य पुराणात वर्णिलेले आहे.

सुरुवातीला श्रीगणपती हा द्विभुज म्हणजे दोन हातांचा होता. पुढे त्याला चार, सहा, आठ, दहा व सोळा हात आले. जपानमध्ये तीन मुखाचा श्रीगणपती आणि कंबोडियात चार मुखे असलेला श्रीगण-पती असल्याची माहिती प्रसिध्द आहे.

दुर्वा, शमी व मंदार या तीन वनस्पती श्रीगणपतीला प्रिय आहेत. दुर्वा ही महादेवाची साक्षात् कन्या. तिने तप केले आणि ती गणेशाची आवडती झाली. परंतु तिला ऐश्वर्याचा गर्व झाल्यामुळे ती स्वतःला जगदंबेहून श्रेष्ठ समजू लागली. तेव्हा पार्वतीने 'तृण रुपाने तू पृथ्वीवर जन्म घेशील,' असा शाप दिला.

पुढे तप करून, ती शापमुक्त झाली आणि अंशरूपाने पृथ्वीवर राहून श्रीगणपती पूजेस आवश्यक बनली. औंर्व ऋषीची मुलगी शर्मिका आणि धौम्य ऋषीचा मुलगा मंदार यांचा विवाह झाल्यानंतर, ती दोघे भृशंडी ऋषीच्या मोठ्या मुलास हंसली, म्हणून त्या ऋषीने या दोघानाही शाप दिला. शापामुळे ती वृक्ष योनीत जन्माला आली. औंर्व ऋषीने तप करून श्रीगणपतीची स्तुती केली. श्रीगणपतीने मंदार वृक्षाच्या तळाशी मी वास करीन आणि शमीपत्रे मला प्रिय होतील असे सांगितले.

व्यास मुनींचे महाभारत श्रीगणपतीने लेखक म्हणून लिहिले हे प्रसिध्द आहे. कंबोडिया देशा-तील द्विभूज श्रीगणपतीच्या मूर्तीच्या एका हातात लेखणी व दुसऱ्या हातात पुस्तक आहे.

उंदीर श्रीगणपतीचे वाहन का, कसा बनला ?

क्रौंच नावाचा एक गंधर्व होता. तो इंद्रसभेत वावरत असताना चुकून त्याचा पाय वामदेवाला लागला. वामदेवाला वाटले की, आपणास त्याने लाथ मारली आणि त्या रागाने गंधर्वास शाप दिला की, तू मूषक होशील. तो लगेच मूषक झाला. त्याबरोबर त्याने पराशराच्या आश्रमात येऊन तेथील सर्व जिन्नसांचा फडशा उडविला. आणि पराशराला अगदी सतावून सोडले. तेव्हा पराशर ऋषीने श्रीगणेशाची प्रार्थना केली. श्रीगणपती प्रसन्न होऊन, त्याने उंदरावर पाश टाकला. तेव्हा उंदीर गणपतीला शरण गेला. श्रीगणपतीला त्याची दया आली आणि त्याने हवा तो वर माग, असे उंदरास सांगितले.

पण, तो उंदीर चढेल बनला आणि त्याने उलट श्रीगणपतीस सांगितले की, तूच माझ्याकडे वर माग. त्याचा हा उद्दामपणा पाहून श्रीगणपती त्याला म्हणाला, 'आजपासून तू माझे वाहन हो'. त्या दिवसापासून उंदीर श्रीगणपतीचे वाहन बनला. (कोश, पुराण, गीता वगैरेंच्या आधारे.)

डाव्या सोंडेची आणि उजव्या सोंडेची मूर्ती

डाव्या सोंडेची व उजव्या सोंडेची मूर्ती असे दोन प्रकार आढळतात. उजव्या सोंडेच्या मूर्तीस सामान्यतः सिध्दि विनायक म्हटले जाते. ऋध्दि-सिध्दि यापैकी स्थान उजव्या बाजूला असल्यामुळे सिध्दिकडे तोंड वळविलेले ध्यान सिध्दिविनायक म्हणण्याचा प्रघात दिसतो. पण, त्याला बरेच अपवाद सापडतील.

सिध्दटेक येथे असलेल्या श्रीगणपतीच्या एकाच बाजूला ऋध्दि व सिध्दि असलेल्या पाहण्यात येतात आणि यावरून ऋध्दि सिध्दीच्या निश्चित जागा आहेत की, नाहीत याबद्दल शंका येते. सोंड मुळा-तूनच डाव्या किंवा उजव्या बाजूला वळलेली असली, तर प्रश्न उरत नाही.

परंतु, प्रथम सोंड सरळ खाली जाऊन, मग डाव्या अथवा उजव्या बाजूला ती जर वळलेली असेल, तर कोणत्याही मनुष्याच्या मनात ती मूर्ती डाव्या सोंडेची की, उजव्या सोंडेची म्हणून समजावे, ही शंका उद्भवणे अशक्य नव्हे.

आणि याबद्दल शास्त्रशुध्द उत्तर कोणत्याही ग्रंथात सांपडल्याचे ऐकिवात नाही. मात्र उजव्या सोंडेच्या मूर्तीची उपासना फार कडक असते. व एखादी चूक किंवा हयगय झाली तर ती बाधक होते, अशी समजूत असल्याने, सर्वसामान्य उपासक डाव्या सोंडेच्या मूर्तीची उपासना करतात.

संगमरवरी उजव्या सोंडेची मूर्ती दक्षिणेत स्वामी मलाई जवळील तिरवलमपुरीच्या देवालयात आहे. कर्जत पासून तीन चार मैलावर एक खेडे वेणगाव म्हणून आहे, तेथे एक सभामंडप असून तीन कमानी आहेत. उजवीकडे श्रीशंकराची पिंडी, तर उजव्या बाजूच्याच कोनाड्यात उजव्या सोंडेचा श्रीगणपती आहे.

दोनपासून अठरा हात असलेल्या मूर्तीही आढळतात

आपल्या डोळ्यांसमोर श्रीगणपतीचे जे रूप आहे ते श्रीगणपती-खांडोळेचे. ते एकमुखी, चतुर्भुज श्रीगणपतीचे आहे. श्रीगणपती अथर्वशीर्षात वर्णन केलेला श्रीगणपती चार हाताचाच आहे. पण, भारतात आणि भारताबाहेर, अनेक ठिकाणी असलेल्या मूर्ती दोन, चार, सहा, आठ, दहा, बारा, चौदा, अठरा असे वेगवेगळे हात असलेल्या श्रीगणपतीच्या मूर्ती आढळतात.

श्रीगोकर्ण क्षेत्री श्रीमहाबळेश्वर मंदिराजवळच वेगळे देवालय श्रीगणपती दैवताचे आहे. ती मूर्ती उभी द्विभुज म्हणजे दोन हात असलेली आहे.

नाशिक जवळील चांदवड येथील रेणुका देवीच्या डोंगराच्या पायथ्याशी द्विभुज श्रीगणपती आहे. गणेश पुराणातील वर्णनाप्रमाणे कलियुगातील श्रीगणेशावतार द्विभुज असल्याचे म्हटले आहे.

मद्रासच्या वस्तुसंग्रहालयात श्रीगणपतीची दोन हात असलेली, धातूची एक मूर्ती आहे.

मुंबईच्या इंडियन हिस्टोरिकल इन्स्टिट्यूटच्या संग्रहालयात श्रीगणपतीच्या दोन मूर्ती आहेत. पैकी एकीला तीन डोळे आहेत, तर एक बसलेली आहे.

श्रीज्ञानेश्वरानी ज्ञानेश्वरीच्या सुरुवातीला ज्या श्रीगणेशाचे स्तवन केले आहे, तो श्रीगजानन सहा हाताचा आहे. संत एकनाथाना मात्र चतुर्हस्त श्रीगणेशमूर्ती अभिप्रेत होती.

नर्मदा नदीच्या कांठावरील नेमावर (इंदूर संस्थान) येथील अतिप्राचीन सिध्देश्वर मंदिरातही सहा हाताची नृत्यमान मूर्ती आहे.

ग्वाल्हेर संस्थानात अष्टभुज श्रीगजाननाची मूर्ती सांपडली आहे. या मूर्तीच्या आठपैकी दोन हात दोन्हीकडील गणाच्या डोक्यावर ठेवण्यात आले असून, दोन हातानी परशु धरला आहे. एक हात कमरेवर ठेवून, दुसऱ्या हाताने मोदक तोंडात टाकत आहे.

पुण्यात दशभुज श्रीगणपतीची दोन मंदिरे आहेत. एक कोथरूडला आहे. पण मूर्तीचे सुटे हात, अगर त्यांच्या रेखा दिसत नाहीत. दुसरा श्रीगणपती पर्वतीजवळ सहकार नगरमध्ये आहे. हा श्रीगणपती १६-१७ वर्षापूर्वी विहीर खोदताना सांपडला. त्याचे हात सुटे नसले, तरी स्पष्ट दिसून येतात.

औरंगाबाद येथे थोरल्या बाजीरावाने भेट म्हणून दिलेली उजव्या सोंडेची श्रीगजाननाची मूर्ती बारा हाताची आहे. चौदा हाताची मूर्ती बिहारजवळ मेर येथे सांपडलेली आहे. अठरा हाताची श्रीगजानन मूर्ती ही मंत्रदेवता समजली जाते. याला वीर विघ्नेश म्हणतात.

अशी अठरा हाताची प्रत्यक्ष तयार केलेली श्रीगणपतीची मूर्ती रत्नागिरी येथे आहे. ती श्री. वि. कृ. जोशी यानी जयपूरहून मुद्दाम करवून आणली असून, तिची स्थापना आपल्या राहत्या घराच्या परीसरातच त्यानी केलेली आहे.

संकष्टी चतुर्थी व चंद्रोदय

स्कंद पुराण आणि श्रीगणेश पुराणाचा उपासना खंड अध्याय ६१ यात संकष्टी चतुर्थी व चंद्रोदय यासंबंधी पुढील आख्यायिका आहे.

एकदा श्रीगणेशाचे विचित्र रूप पाहून चंद्र हसला, तेव्हा 'आजपासून तू निस्तेज व मलीन होशील व तुला पाहणाराही पापी होईल' असा श्रीगणेशाने चंद्रास शाप दिला. लगेच चंद्र निस्तेज व मलीन झाला, व त्यामुळे त्रैलोक्याच्या व्यवहारात बिघाड होऊ लागला.

चंद्राला पश्चाताप झाला व सर्व देवांना पुढे करून, चंद्र श्रीगणपतीस शरण गेला. तेव्हा श्रीगणपतीने प्रसन्न होऊन चंद्रास पूर्वी प्रमाणे सतेज व आल्हादकारक केले व फक्त भाद्रपद शुक्ल चतुर्थीस त्याचे दर्शन लोकाना वर्ज्य केले आणि संकष्टी चतुर्थीस चंद्रोदय झाल्यानंतर लोकानी आपले पूजन करावे व चंद्राला अर्ध्य देऊन नंतर भोजन करावे असा नियम केला.

श्रीगणपतीला 'वक्रतुंड' हे नाव आहे त्याचा अर्थ असा आहे.

शुभकार्य निर्विघ्नपणे पार पडण्यासाठी 'वक्रतुंड महाकाय...' ही श्रीगणपतीची प्रार्थना म्हटली जाते. परंतु त्यातील पीहिला शब्द जो 'वक्रतुंड' त्याचा अर्थ बहुतेकाना माहीत नसतो. बरेच लोक अज्ञानाने वक्रतुंड म्हणजे वांकडे तोंड अथवा वांकडी सोंड असा अर्थ लावतात.

एखाद्याच्या तोंडास व्यंग असताना जर तुम्ही त्याला वाकडतोंड्या म्हटले, तर त्यास राग नाही का येणार आणि त्यातून श्रीगणपती तर देवांत श्रेष्ठ देव ! त्यास वाकडतोंड्या म्हटले, तर तो आपणावर कृपा करणार कशी ? म्हणून गणेशपुराण भाग १ अध्याय ४० व पान २०२ वरून वक्रतुंड मधील 'वक्र' म्हणजे दुष्ट आणि तुंड म्हणजे ताडण करणारा म्हणजेच दुष्टाचे ताडण करणारा असा अर्थ लक्षात घ्यावा.

ऐतिहासिक माहिती प्राचीन काली नावेली गावात श्रीगणपतीचे देवालय कोणत्या जागी होते व आजच्या कालात त्या जागी काय आहे.

तिसवाडी तालुक्यातील जुने गोवे किंवा ओल्ड गोवा या प्राचीन पोर्तुगीज राजधानीच्या पैलतीरावर दिवाडी नावाचे बेट चार खेड्यात विभागलेले आढळते.

ती चार खेडी म्हणजे नावेली, गोलती, मालार आणि नार्वे ही आहेत. नावेली आणि गोलती या दोन खेड्याचे क्षेत्रफळ एकत्र करून त्या भागास पोर्तुगीज अमदानीत पियेदाद हे नाव देण्यात आले.

मालार या खेड्यास सां मातियस नाव देण्यात आले. मात्र नार्वे खेड्याचे नाव न बदलता तसेच कायम ठेवण्यात आले.

कारण, दिवाडी बेटात एका खेड्यास जे नार्वे असे नाव आहे. त्याचा अर्धा भाग दिवाडी बेटाच्या पूर्वेकडील बाजूस पाण्याच्या नाल्यापलीकडे पैलतीरावर आहे. व हा भाग डिचोली तालुक्याच्या क्षेत्रात संभवतो.

यासाठी या भागाला नार्वे-डिचोली अशा नावाने संबोधित असतात. आणि नार्वेचा जो भाग दिवाडी बेटात मालार जवळ आहे, त्याला नार्वे-इल्यस (तिसवाडी-नार्वे) या नावाने ओळखतात.

दिवाडी बेटावर क्यॉथोलिक खिरस्तीधर्मीय जनतेची दफन भूमी म्हणजे सिमितेर, सध्या ज्या जागेवर बांधलेली आहे, त्या जागेवर ती क्यॉथोलिक धर्मीयांची दफनभूमी करण्याच्या पूर्व कालात, श्रीगणपती देवालय होते.

ही जागा नावेली खेड्याच्या क्षेत्रफळात संभवते, म्हणून त्या श्रीगणपतीस तेथे असतानाच नव्हे, तर नंतरच्या कालात, त्याचे आगमन सध्याच्या खांडोळे गावात झाल्यानंतरही त्या श्रीगणपतीस नावेलकर आणि तो खांडोळेंस, ज्या जागी स्थापित आहे, त्या जागेस **'श्रीगणपती नावेलकर श्रीस्थळ खांडोळे'**

तर्फे प्रियोळ बागायत" या नावाने ओळखत आणि त्या नावाने खांडोळें कोमुनिदादीच्या प्राचीनकालीन दप्तरात, मराठी भाषा मोडी लिपीत लिहिलेले आढळतें.

याचा पुरावा पणजी येथील पुरातत्व खात्याच्या ऐतिहासिक दप्तरात, खांडोळें कोमुनिदादीचे जुनें दप्तर इ. सन १७६५ ते १८५७ पर्यंतचें आहे, त्यात वही इ. सन १८५७ पृष्ठ ५ पाठीवर पाहिल्यास सांपडतो.

ते देवालय त्या जागेवर असताना, त्या देवालयाची इमारत मंदिर चांगले पाषाणी, अप्रतीम कला-कौशल्यपूर्ण, कोरीव कामाने युक्त असावें, असा निष्कर्ष काढण्यास जरूर ते पुरावे, आजच्या कालातही तेथें आसपास बारकाईनें, शोधक बुध्दीनें संशोधन करून पाहणाऱ्यास मिळतात.

उदाहरणार्थ : त्या दफनभूमीस संयुक्तपणें एक कपेल किंवा चर्च बांधलेलें आहे. त्या चर्चमध्यें तीन दगड काळ्या पाषाणाचें आहेत. ते एखाद्या हिंदू देवालय इमारतीचें प्राचीनकालीन असावेत असें स्पष्ट दिसतें.

त्या तीन दगडांपैकी एका दगडावर तक्तपोशीसारखें एक सुरेख, उठावदार कोरलेलें आढळतें. आणि इतर दोन दगड खिडक्याच्या चौकटी, ज्याच्यावर कलाबुतीसारखें डिझाईन आहेत.

या पाषाणी दगडाची आणि त्यावर आढळत असलेल्या कोरीव कामाची साधारण कल्पना द्यावयाची झाल्यास, गोमंतकात सांगें तालुक्यात तांबडें सुर्ल येथें कदंब राजवंश कालातील, फार जुनें श्रीमहादेवाचें मंदिर पाषाणी दगडी कोरीव कामानें युक्त असें एकमेव सुप्रसिध्दपणें फार गाजलेलें आहे. त्या देवा-लयाच्या कोरीव कामाशी मिळतें जुळतें आहे म्हटल्यास चालेल.

प्राचीनकाली नावेली येथें ज्या जागेत ते श्रीगणपती देवालय होतें, ते डोंगराच्या पायथ्याशी होतें. आणि त्या पायथ्याच्या परिसरात एक तलाव होता. त्या जुन्या तलावाच्या काहीशा खुणा अद्यापही बारकाईनें पाहणाऱ्यास तेथें दिसतात.

जुनें गोवें किंवा ओल्ड गोवा येथील सरकारी आर्किओलोजिकल म्युझियममध्यें गेल्या पोर्तुगीज राजवटीपासूनचें इतिहासकालीन अनेक जूनें अवशेष राखून ठेविलेले दृष्टीस पडतात. त्यात काही अवशेष जे 'नोस्स सिंजोर दे सेन्हा' चर्च बांधण्याच्या वेळी, त्या इमारतीचा पाया उत्खननाचे वेळी सांपडलें, तेही तेथें आहेत.

आणि त्यात 'मखर तोरण' एक पाषाणी अवशेष कला कौशल्याचा सुंदर नमुना आहे. तो जुन्या प्राचीन श्रीगणपती देवालयाच्या इमारतीच्या एखाद्या दरवाजास पाषाणी कोरीव तोरण होतें, त्याचाच तो अवशेष निश्चितपणें असावा अशी खात्री पटतें.

या अशा प्रकारच्या इतर पुष्कळकडे विखुरलेल्या अवशेषांचा संशोधनपूर्वक अभ्यासू दृष्टीनें शोध घेतल्यास, ते श्रीगणपतीचें प्राचीन देवालय किती सुंदर, अप्रतिम कलाकौशल्यपूर्ण कोरीव पाषाणी दगडाचें होतें, याची सहजासहजी कल्पना येतें.

त्या प्राचीन देवालयाच्या इमारतीचा एखादा अवशेषही कोणी खाजगी कुटुंबानें आपणाकडे ठेव-ल्यास, मग ते कुटुंब खिरस्तीधर्मीय असो किंवा हिंदुधर्मीय असो, त्याबद्दल अनुभव कसा काय येतो, याची ओळख सध्याच्या कालातही पाहवयास मिळतें.

दिवाडी बेटावर परंपरेनें वास्तव्य असलेल्या एका नामांकित घराण्याच्या कुटुंबाला, काही वर्षा-मागें आपल्या निवासस्थानाची इमारत नवी बांधण्यासाठी पाया खोदताना जमीनीत एक पाषाणी कोरीव दगड सांपडला. तो पाषाणी दगड म्हणजे एका स्तंभाचा वरचा भाग ज्यास 'उथाळे' म्हणतात. तो पाषाण. त्या कुटुंबानें आपल्या गोदामात अडगळी वस्तू ठेवलेल्या होत्या त्यात ठेवून दिला. व तेथें तो पडून होता.

एके दिवशी त्यांच्या घरात त्यांच्या शेतजमिनीच्या पिकाचे भात वजन करण्यासाठी गरज भासली. तेव्हा त्यानी सरकारी एक मण वजन आणले, व ते परत मागून आणण्याची गरज भासू नये, यासाठी त्या सरकारी मण वजनाइतके वजन असलेला, एक पाषाण करून ठेवावा या इराद्याने गोदामात पडून असलेला, तो पाषाण आणवून, त्याचे तोलून वजन केले. व ते वजन सरकारी मणापेक्षा जरा जास्त भरले.

हे पाहून या पाषाणी दगडाचा थोडा भाग तोडून टाकला. व पुन्हा त्याचे वजन करून पाहता, तो पाषाण पूर्वीच्या वजनापेक्षा जास्त भरला !

हे असे कसे होणे शक्य आहे, म्हणून परत तोलून पाहता, तोच अनुभव पाहून ती विस्मयकारक घटना अद्‌भूत आहे, असे त्याना वाटले. व हा दगड त्यानी वापर करण्याचे मनातून काढले.

पण त्यांच्या मनात संशयाचे वातावरण निर्माण झाले व हा पाषाण त्या श्रीगणपती देवालयाच्या प्राचीनकालीन असावा व तो घरात बाळगणे प्रशस्त नव्हे, अशी त्यांची भावना झाली व तो पाषाण दगड त्यानी आणखी एका पाषाणी उंबरठ्यासारख्या दगडासमवेत ज्याच्या मध्यभागी कोरीव उठावदार काम आढळते, अशा पाषाणी दगडाबरोबर, खांडोळे येथे श्रीगणपती देवस्थानाकडे पोहोचवून मोकळे झाले.

वरील दोन पाषाणी दगडापैकी जो पाषाण उथाळ्यासारखा दिसत होता, त्या दगडाची प्रतिष्ठापना श्रीगणपती देवस्थानाच्या सपरिवार देवतांपैकी, श्रीकालभैरव देवताचे प्रतिक म्हणून विधीपूर्वक, देवाचा कौलप्रसाद निरोपाप्रमाणे ठरवून आणि त्याच्या दर्शनी भागास श्रीकालभैरवाची उभी मूर्ती पितळ धातूच्या पत्र्यावर उमटवून केलेला आहे.

वाचकानी या वस्तुस्थितीची सत्यता खांडोळे येथे जाऊन, त्या देवस्थानात स्वतः पाहिल्यास पटू शकते.

दिवाडी-नावेलीहून श्रीगणपती देवताचे स्थलांतर खांडेपार येथे झाले. त्याची कारणमीमांसा आणि संभाव्य काल कोणता असावा ?

इसवी सन १५१० साली पोर्तुगीज लोकानी आदिलखानाकडून गोवा बेट जिंकून घेतले. आदिलखानाच्या त्या गोव्यात हिंदूंची पुष्कळ देवालये होती. पोर्तुगीजानी गोवा बेट जिंकून घेण्याच्या कामी गोव्यातील हिंदूंनी त्याना भरपूर सहाय्य केले हे प्रसिध्द आहे.

आफोंस दे आल्बुकेर्कच्या कारकिर्दीत हिंदूना जबाबदारीच्या अधिकारावर पोर्तुगीजानी नेमले होते. आल्बुकेर्कच्या नंतर देखील काही काल म्हणजे इ. स. १५४७ पर्यंत गोव्यात, मोठमोठ्या हुद्यांवर गोवेकर हिंदूच होते.

ह्यापैकी सरठाणेदार कृष्णा शेणवी, चोडणचे लखू नाईक, थोरल्या नेवऱ्याचे गोपू शेणवी, गोवे शहरातील अनू शेणवी मोने, दादाजी कृष्ण शेणवी ही नावे पोर्तुगीजांच्या राज्य कारभाराच्या गतेतिहासात ठळकपणे आढळतात.

प्रारंभीच्या कालात आफोंस दे आल्बुकेर्क याने गोव्याच्या प्रजाजनास धार्मिक संरक्षणाची हमीही दिली होती. आफोंस दे आल्बुकेर्क हा आग्वादच्या किल्ल्यात त्याचे वास्तव्य असताना तेथेच ता. २७ डिसेंबर १५१५ रोजी खिरस्तवासी झाला.

त्याने आपल्या कारकिर्दीत पुष्कळ चर्चेस बांधल्या. पण, त्याने हिंदू देवालये मोडून टाकल्याचा ऐतिहासिक स्पष्ट पुरावा नाही. पण नावेली-दिवाडी येथील श्रीगणपतीचे देवालय अपवाद असावे असे खालील पुरावे दर्शीवितात त्यावरून वाटते.

तिसवाडी इल्यस गोवा बेट तालुक्यातील हिंदू देवालये इ. स. १५४० किंवा १५४१ च्या सुमारास मोडली गेली आणि या बाबतीत सर्व इतिहास संशोधकांचे एकमत आहे. तरी पण, श्री. आंद्रे कोर्साली याने कोचीनहून ता. ६ जानेवारी १५१५ रोजी, श्री. जुलियांव दे मेंदिसी याला लिहिलेल्या पत्रात तो म्हणतो :

"गोवा शहरात आणि सर्व भारत देशात, ज्यू धर्म वगळता सर्व धर्मीयांच्या असंख्य जुन्या इमारती आढळतात आणि शहराजवळच्या एका लहानशा दिवाडी नामक बेटावर पोर्तुगीजानी सर्व शहर नव्याने बांधण्याच्या इराद्याने "पागोडा" नावाने ओळखले जाणारे, एक सर्वात जुने देवालय नष्ट केले.

हे देवालय उत्कृष्ट शिल्पाचा नमुना होता. आणि या देवालयात प्राचीन चित्राकृती काळ्या दगडांवर कोरलेल्या होत्या. ज्यापैकी काही भग्नावस्थेत आणि विखुरलेल्या अवस्थेत आढळतात. पोर्तुगीज त्याना महत्व देत नव्हते."

मोडकळीस आलेल्या 'इग्रेज दे सेन्हा' चर्चमध्ये जे शिल्पशास्त्राचे नमुने मिळाले आणि जे जुने गोवे (ओल्ड गोवा) येथे 'सां कायतान' नावाच्या कन्व्हेंट मध्ये असलेल्या म्युझियममध्ये ठेवले गेले, ते अवशेष बहुतकरून दिवाडी बेटावर असलेल्या देवालय इमारतीचे असावेत.

'इंग्रेज दे नोस्स सिंजोर' हे चर्च इ. स. १५१३ साली आफोंस दे आल्बुकेर्क याच्या हुकूमावरून बांधण्यात आले, अशी माहिती गोव्याच्या हायकोर्टाचे सरन्यायाधीश होऊन गेलेले खिरस्तवासी दोतोर ब्रागांस पेरेर यानी Templos levantados em Goa por Afonse Albuquerque या शीर्षकाखाली एक महत्वाचा लेख ओरियेंती पोर्तुगेज' प्रकाशनाच्या सन १९२९ सालच्या अंकात (अंक नंबर २३ पृष्ठ १२५) लिहिलेला आहे त्यात मिळते.

वरील सर्व माहितीचे निरीक्षण केल्यानंतर त्यातून खालील प्रमाणे घटना घडल्याचे लक्षात येते :-

१) आफोंस दे आल्बुकेर्क हा ता. २७ डिसेंबर १५१५ रोजी खिरस्तवासी झाला.

२) त्यापूर्वी त्याच्या हुकूमाने इ. स. १५१३ साली दिवाडी बेटावर 'इग्रेज दे नोस्स सिंजोर दे दिवार' हे चर्च बांधले गेले.

३) ता. ६ जानेवारी १५१': रोजी श्री. आंद्रे कोर्सालि आपल्या पत्रात दिवाडी येथील 'पागोडा' नावाने ओळखले जाणारे सर्वात जुने देवालय पोर्तुगीजानी नष्ट केले. असा मजकूर आहे.

४) अर्थात हे देवालय आफोंस दे आल्बुकेर्क जिवंत असताना त्याच्या हयातीतच मोडले गेले.

यावरून निश्चितपणे सांगता येते की, या देवालय इमारत मोडतोडीची चाहूल लागताच, श्रीगणपती दैवत त्याच्या भाविक कुळावी महाजनानी नार्वेलीहून आकस्मिकपणे परराज्यात स्थलांतर करून नेले असले पाहिजे. आणि हे स्थलांतर तत्कालीन पोर्तुगीज राज्य सरहद्दीबाहेर खांडेपार येथे झाले. या स्थलांतराचा संभाव्य काल इ. स. १५१३ पूर्वीचा आहे. कारण, दिवाडी बेटावर जे चर्च आफोंस दे आल्बुकेर्क याच्या हुकूमाने बांधले, ते इ. स. १५१३ साली. ते बांधण्यास निदान एक वर्ष तरी कालावधी लोटणारच हे सांगायला नकोच. म्हणून हे स्थलांतर इ. स. १५१२ साली तरी झाले असावे, असे मानणे क्रमप्राप्त ठरते.

वर उल्लेखिलेल्या श्री. आंद्रे कोर्सालि याच्या पत्रात दिवाडी येथील, 'पागोडा' नावाने ओळखले जाणारे, सर्वात जुने देवालय पोर्तुगीजानी नष्ट केले, असा जो मजकूर आहे, तो बहुतकरून श्रीसप्त-कोटीश्वर देवालयाबद्दल असावा असे वाटते.

दिवाडी बेटावर 'पागोडा' नावाने ओळखले जाणारे, सर्वात जुने देवालय पोर्तुगीजानी मोडल्याचा उल्लेख ता. ६ जानेवारी १५१५ रोजीच्या पत्रात आहे.

म्हणजे त्या तारखेपूर्वी, हे देवालय मोडले आहे यात संशय नाही. आणि तेथील एक देवालय मोडलेले पाहून, लगेच तातडीने त्या भयाने या बेटावरील व इतर आसपासच्या देवालयाचे कुळावी, आपआपली दैवते त्या त्या देवालयातून पळवून, परराज्यात नेऊन स्थापतील की नाही, हे सुज्ञ वाचकाना सांगण्याची गरज नसावी.

या परीस्थितीनुरूप श्रीगणपती दैवत नार्वेली-दिवाडी येथून निश्चित आणि निःसंशयपणे इ. स. १५१२ पूर्वी खांडेपार येथे स्थलांतर करून गेले आहे, असे मानावे लागेल.

श्रीगणपती दैवताचे स्थलांतर नार्वेली-दिवाडी येथून खांडेपार येथे तत्कालीन परराज्यात झाले, पण खांडेपार येथे तरी त्या दैवतास कायम राहणे पसंत झाले काय ? नाही ! कारण ते दैवत खांडेपार येथून नार्वे-डिचोली येथे म्हणजे प्राचीन मूळ नार्वेली-दिवाडी बेटाच्या पूर्वेकडील भागाच्या पैलतीरावरील क्षेत्रात नेऊन तेथे स्थापावे लागले, याचे पुरावे गतेतिहासात दिसतात.

खांडेपारहून नार्वे येथे ते दैवत का, कोणत्या कारणामुळे न्यावे लागले याचा शोध घेऊ गेल्यास खालीलप्रमाणे माहिती मिळते. खांडेपार येथे, जेथे हे देवालय होते, ती इमारत कालांतराने मोडून गेली व त्या देवालयाचा चौथरा फक्त शिल्लक आहे. ते देवालय होते त्या जागेस 'गणेश मळ' या नावाने अद्याप ओळखतात.

खांडेपार येथून श्रीगणपतीचे स्थलांतर नार्वे गावात का झाले ?

श्रीगणपती दैवताचे संस्थापक, उपासक भक्तगणांपैकी जे तिसवाडी तालुक्याच्या ताळगाव येथे 'शेणवी नार्वेलकर' उपनावाचे होते, ते बऱ्याच संख्येने होते. आपले कुलदैवत श्रीगणपती नार्वेलीस असताना, ते वारंवार तेथे दर्शन भेटीस जाऊन भक्तिभावाने नियमितपणे सेवा करीत असत. परिस्थितीनुसार बाटाबाटीच्या भयाने ते दैवत अपरिहार्यपणे नार्वेलीहून हलवून, खांडेपार येथे न्यावे लागले ही जाणीव त्याना होती.

पण इतक्या दूर प्रांतात ते दैवत आकस्मिकपणे नेले गेले ते खरे असले, तरी त्यावेळी त्या भयानक प्रसंगाच्या गडबडीत डोळ्यासमोर विचार होता तो एकच म्हणजे कसेही करून ते दैवत बाटाबाटी करणाऱ्या खिस्तीधर्मीय प्रसारकांच्या तावडीतून वाचविण्याचा. पण ते वाचविल्यानंतर जसजसा काळ लोटत गेला, तसतसा त्या दैवताचे दर्शन आणि नियमित सेवा करण्यास कठीण होऊन, प्रवास लांब म्हणून नानाविध अडचणी येऊ लागल्या.

आणि त्या भक्तगणाना त्या दैवताचा विरह फार असह्य होऊ लागला. ते बेचैन स्थितीत वावरू लागले.

हा विरह त्याना यापुढे सहन करणे अजिबात शक्य होईना, तेव्हा त्यानी एक कट योजिला. आणि ते दैवत आकस्मिकपणे कोणास चाहूल न देता, खांडेपारहून उचलून आपल्या ताळगावात आणून, त्याची स्थापना करावी असे ठरवून ते नरकचतुर्दशी दिवाळीच्या पूर्व दिवशी, धनत्रयोदशी दिवशी, खांडेपार येथे गेले व गुप्तपणे दबा धरून लपून राहिले.

मध्यरात्री ह्या मंडळीने हळूच श्रीगणपती देवालयाचा दरवाजा उघडा केला. आणि गर्भागारातील श्रीगणपती मूर्ती वस्त्रात गुंडाळून घेऊन गुपचूप ते ताळगावच्या दिशेने मार्गस्थ झाले. आणि शक्य तितक्या लवकर घाईने वाटचाल करू लागले.

इकडे खांडेपार गावात धनत्रयोदशीची रात्र संपून पहाटेस लोकानी नरकचतुर्दशीचे दिवे आपआपल्या घराजवळ लावले. अभ्यंगस्नान करून ते देवदर्शनासाठी देवालयाकडे गेले, तर तेथे देवालयाचा दरवाजा पहाटेसच उघडा आणि आत गर्भागारात आसनावर श्रीगणपतीची मूर्तीच नाही.

हे पाहून लोक संतप्त झाले आणि गटागटाने जमून, प्रत्येक गट खांडेपार गावापासून मिळेल त्या रस्त्यावरून धावत पळत सुटले. ती मूर्ती कोठे, कुणी नेली, याचा शोध घेण्याचा प्रयत्न करू लागले.

या गटांपैकी एक गट जो खांडेपार गावाहून फोंडा तालुक्याच्या गावातून, तिसवाडी तालुक्याच्या गावाकडे रस्ता जातो, त्या रस्त्यावरून पळत धावत होता, तो गट भाणस्तारकडे आजच्या कालात जेथे

पूल आहे तेथे, नदी कांठी पोहोचला असताना, तेथे काही अवघे इसम वस्त्रात गुंडाळून लपविलेले बोचके बरोबर असलेले, बंदरावरून खाडी ओलांडून नदीच्या पैलतीरावर जाण्याच्या तयारीत, गडबडीत असल्याचे यानी पाहिले.

आणि त्यानी त्या लोकाना अडवून ते गुंडाळलेले बोचके, उघडून पाहण्याचा आग्रह धरला. प्रकरण हातघाईवर आले व शेवटी ते बोचके उघडून पाहता, त्यात श्रीगणपतीची मूर्ती सांपडली.

तेव्हा, दोन्ही कडील लोकांची एकमेकाशी मारामारी सुरू होण्याचा प्रसंग आला, आणि मूर्तीचा विध्वंस होऊ नये हे दोन्ही पक्षाचे इसम टाळतात हे एकमेकाच्या लक्षात आले, आणि ते चौकशी करू लागले की, तुम्ही ही मूर्ती का नेता ? कुठे नेता ? आणि तुम्ही कोण ? वगैरे.

शेवटी, सर्व प्रकार उघडकीस आला. मूर्ती नेणारे श्रीगणपतीचेच कुळावी भक्तगण, ताळगाव येथील वास्तव्याने असणारे, त्याना हे दैवत खांडेपार येथे फार लांब असल्याने, त्याची सेवा करण्यास फारच अडचणी, म्हणून ते ताळगावास नेण्याच्या इरादाने ही मूर्ती पळविली वगैरे हेतू समजल्यानंतर, त्या दोन्ही पक्षानी एकमेकात समंजसपणा आणून असे एक मत झाले की, आता हे दैवत अशा गावात स्थापावे की, तो गाव दोन्ही पक्षाना समांतर असावा.

त्याप्रमाणे त्या सर्वांनी ती मूर्ती येथे भातग्राम डिचोली हद्दीत स्थापन करून मोकळे झाले व एकदाचा सर्वांच्या मनातील किंतु दूर झाला.

ही मूर्ती ज्या जागी स्थापना केली, ती जागा म्हणजे मालारचा एक भाग, जो खाडीपलीकडे आहे व ज्यास मालार (नार्वे) अशाही नावाने ओळखत, त्या जागी स्थापन झाली आणि दोन्ही पक्षाचे समाधान झाले.

ही स्थापना त्याच जागी झाली, याचा ऐतिहासिक दफ्तरात पुरावा सांपडतो. हा पुरावा म्हणजे हे श्रीगणपती दैवत इ. स. १५६० साली मालार गावात, ज्या जागेत होते आणि ज्या जागेस नंतरच्या कालात नार्वे-डिचोली असे म्हणत, त्याचा स्पष्ट उल्लेख आहे.

तसेच गोवा सरकारच्या पुरातत्व खात्यात, 'फोराल' नावाचे हस्तलीखित इ. स. १५२६ साली तयार केलेले आहे. त्यात नार्वे गावाचा उल्लेख दिवाडी गावास अनुसरून केलेला आहे. वाचकांच्या मनात गोंधळ होऊ नये म्हणून स्पष्टीकरण करणे आवश्यक वाटते. नार्वे गावचा एक भाग तिसवाडी तालुका दिवाडी- मालार क्षेत्रात संभवतो व दुसरा भाग दिवाडी बेटाच्या पैलतीरावर खाडी पलीकडच्या तीरावर जो आहे, तो डिचोली तालुक्याच्या सरहद्द क्षेत्रात संभवतो, त्याला नार्वे-डिचोली या नावाने ओळखतात.

भाणस्तारीस श्रीगणपतीची मूर्ती त्या देवालयाचे कुळावी महाजन शेणवी नावेलकर यांचेकडे सांपडून त्यामध्ये आणि शेणवी खांडेपारकर यांच्यामध्ये जो समझोता घडून आला तो दिवस नरकचतुर्दशी (दिवाळी) असल्यामुळे, ही मंडळी त्या दिवशी आपआपल्या कुटुंबात घरात नसल्यामुळे, त्या दिवशी दिवे ओवाळणी घडली नाही. आणि त्या सालापासून शेणवी खांडेपारकर आणि शेणवी नावेलकर या दोनही श्रीगणपतीच्या कुळावी कुटुंबात त्या दिवाळीचे दिवशी दिवे ओवाळणी स्थगीत राहिली. ती अद्याप परंपरेने तशीच आहे.

आता पर्यंत पौराणिक आणि ऐतिहासिक माहिती दिली असल्याने यापुढे प्रत्यक्षात खांडोळे येथे देवस्थानातील अत्यावश्यक ती सर्व माहिती वाचकांपुढे ठेवण्याचा प्रयत्न करतो.

खांडोळें येथे श्रीगणपती देवस्थानात प्रमुख दैवत आणि सहपरिवार दैवते.

देवालय मुख्य मंदिराच्या गर्भागारात प्रमुख दैवत श्रीगणपती देवाची काळ्या पाषाणाची मूर्ती चार हात असलेली, आणि आसनस्थ बसलेली साधारणपणे दीड हात उंचीची आहे. या नव्या मूर्तीची स्थापना

त्या गर्भागारात अनुषंगिक यज्ञयागादि कृत्यांसह शास्त्रशुध्दरीत्या विधीपूर्वक, माघ शुक्ल ८ मी शनिवार ता. २५ जानेवारी १९६९ रोजी सुरू होऊन, शके १८९० कीलक नामसंवत्सर, माघ शुक्ल त्रयोदशी शुक्रवार ता. ३१ जानेवारी १९६९ दुपारी १ वाजून १५ मिनिटे पुनर्वसु नक्षत्राच्या शुभमुहूर्तावर श्रीगौडपादाचार्य संस्थान कैवल्यपूर मठाधीश श्रीमत् सच्चिदानंद सरस्वती स्वामी महाराजांच्या पवित्र हस्ते त्या मूर्तीची प्रतिष्ठापना झाली.

त्या पूर्वीची त्या गर्भागारात असलेली स्थापित पाषाणी मूर्ती मूळ दिवाडी-नार्वेलीस असलेली, नंतर तेथून खांडेपार तेथून नार्वे, तेथून खांडोळें येथे येऊन स्थापित झालेली जी मूर्ती, ती तीन स्थलांतरामुळे किंचित जागी जीर्णावस्थेत होती. या कारणामुळे, नवी मूर्ती करून प्रतिष्ठापना करणे भाग झाले. व शास्त्र नियमाप्रमाणे ती जुनी मूर्ती महासागरात विसर्जन करण्याचे ठरून तसा कार्यक्रमही आयोजित झाला होता. पण त्या वेळी अशा काही अपरिहार्य घटना घडल्या की, त्या मूर्तीचे महासागरात विसर्जन करणे रहित तर करावे लागलेच, पण ती जुनी मूर्ती परत त्याच देवालयात, त्याच गर्भागारात मुख्यासनाच्या उजव्या बाजूस वेगळ्या आसनावर पूर्वीच्याच उंचीवर बसली आहे.

आणि हा महान् साक्षात्कार पाहून भक्तगण अतर्क्य, जाज्वल्य दैवी शक्तीचे सामर्थ्य आणखी एकदा अनुभवून श्रध्देने आणि भाविकतेने त्या दैवताच्या चरणी नम्रतापूर्वक निष्ठेने सेवा करीत आहेत. या गर्भागारातच मागच्या भिंतीस कोनाड्याकडे उजव्या बाजूस एक लहान आकाराचे कुकुट असून, त्यात पितळ धातूच्या पत्र्यावर एक प्रतिमा कोरलेली असून, ती श्रीग्रामपुरुष-श्रीपूर्वाचारी यांची आहे.

मुख्यासनस्थ श्रीगणपतीच्या मूर्ती खालच्या जागेत, श्रीगणपतीची पंचधातूची एक फार सुंदर अति प्राचीन मूर्ती असून, याच मूर्तीला प्रसाद-पूजा लावतात.

या प्रमुख गर्भागाराबाहेर त्याच रांगेत उजवीकडे लहान आकाराच्या चार खोल्या एकास लागून दुसरी, अशा क्रमाने असून, पहिल्या खोलीत किंवा गर्भागारात एक मिटर उंच दगडी आसनावर श्रीरवळनाथ आणि श्रीमहालक्ष्मी अशा दोन वेगवेगळ्या पाषाणीमूर्ती स्थापित आहेत. त्यानंतरच्या खोलीत एक विहीर असून, त्या विहीरीच्या पाण्याचा वापर फक्त दैवतांच्या अभिषेकासाठी, व इतर कृत्यांकरताच होत असतो. त्यानंतरच्या खोलीवजा गर्भागारात श्रीलक्ष्मीनारायण श्रीसूर्यनारायण पाषाणीमूर्ती स्थापित आहेत.

त्यानंतरच्या खोलीत किंवा गर्भागारात वरील प्रमाणेच एक मिटर उंचीच्या दगडी आसनावर दोन वेगवेगळ्या संगमरवरी पांढऱ्या रंगाच्या पाषाणी मूर्ती स्थापित आहेत. त्यातील एक मूर्ती जी जटाधारी आहे, ती शेणवी खांडेपार घराण्याचा कुलपुरुष विठू किंवा विठ्ठल शेणवी यांच्या नावाने स्थापित असून, जी दुसरी शिरोभागी कानटोपी घातलेली दिसते, ती रामचंद्र शेणवी खांडेपारकर यांच्या नावाने स्थापित आहे.

या चार खोल्यांसमोर एक मोठे गर्भागार असून, त्या गर्भागाराचा प्रमुख दरवाजा श्रीगणपती देवालयाचा दरवाजा ज्या दिशेकडे तोंड केलेला आहे, त्याच दिशेकडे आहे. या मोठ्या गर्भागारात एक मिटर उंचीच्या दगडी आसनावर श्रीशांतादुर्गा-महामाया हे दैवत स्थापित असून, ते एका तांब्याच्या धातूच्या कलश रूपात आणि त्या कलशावर श्रीदेवीचा मुखवटा, असे आहे.

श्रीगणपती देवाचे मंदिर आणि त्याच्या उजव्या बाजूला जोडलेले श्रीशांतादुर्गा-महामाया मंदिर मिळून, पाहणाऱ्यास एकच भव्य इमारत अशी दिसते. या इमारतीबरोबरच हल्लीच्या काळात सुशोभित नवीन बांधणी पध्दतीचा सिमेंट कांक्रीटचा भव्य मंडप उभारलेला असून, त्या मंडपाच्या शेवटच्या भागाकडे एक स्टेजही तयार केलेले आहे. तिची उपयुक्तता जशी नाटकादि कार्यक्रमासाठी आहे तशीच लग्न विवाह मंगल कार्यादि साठी फार आहे.

मंडप इतका उत्तम व्यवस्थितरीत्या बांधलेला आहे की, देवस्थानात अन्नसंतर्पणास जशी सोय होते, तशीच लग्न विवाहादि मंगल कार्याचे वेळी तेथील उपस्थितास व नाटकादि कार्यक्रमांच्या प्रेक्ष-

कांस सोईस्करपणे होत असते. मंडपाच्या शेवटच्या भागाकडे असलेल्या, स्टेजच्या उजवीकडे आणि डावीकडे मंडपाच्या जमिनीच्या पातळीवर दोहों बाजूंकडे लहानच पण सुंदर आटोपशीर देवळ्या आहेत. स्टेजच्या उजवीकडील देवळीत, एका दगडी आसनावर श्रीनिराकार दैवत पितळ धातूचे लिंग आणि पितळ धातूच्या पत्र्यावर एक फूट उंचीची मूर्ती कोरलेली आहे. तसेच डाव्या बाजूकडील देवळींत श्रीकालभैरव दैवत स्थापित असून त्या दैवताची एक फूट उंच आकाराची मूर्ती पितळेच्या पत्र्यावर कोरलेली आहे व तो पत्रा मूर्तीसह एका काळ्या पाषाणी दगडास घट्ट जोडलेला आहे. हाच तो पाषाण दगड ज्याचा वापर दिवाडी येथे एका खिस्ती धर्मीय कुटुंबात वजनासाठी वापर करण्याचे योजले होते व तेथील अद्भुत प्रकारामुळे ते रद्द करून तो पाषाण शेवटी खांडोळे येथे देवस्थानात आणून पोचविला असा उल्लेख याच लेखात मागें केलेला आहे. तो पाषाण येथे देवस्थानात पोंचल्यानंतर सार्वजनिकरित्या देवाकडे प्रसाद घेऊन ठरल्याप्रमाणे त्या पाषाणाची विधिवत स्थापना श्रीकालभैरवाच्या संकल्पनेत झाली. वर जो सिमेंट कांक्रीटचा नवीन बांधणीचा मंडप देवालयासमोर उभारलेला आहे, असा उल्लेख केलेला आहे त्या सभामंडपाचे उद्घाटन शके १८९५ प्रमादी नाम संवत्सर चैत्र कृष्ण प्रतिपदा बुधवार, ता. १८ एप्रिल १९७३ रोजीं दुपारी १२ वाजता स्वाती नक्षत्र या शुभमुहूर्तावर श्रीगोकर्ण पर्तगाळी जीवोत्तम मठाधीश श्रीमद्विद्याधिराजतीर्थ श्रीपाद वडेर स्वामी महाराजांच्या पवित्र हस्ते झाले आहे.

देवस्थानात होणारे महत्त्वाचे उत्सव आणि देवकृत्ये

चैत्र

शुक्ल १ दा : श्रीवरदगणेशव्रत, पालखी उत्सव.
४ थी : पालखी उत्सव.
९ मी : श्रीरामनवमी.
वद्य ४ थी : श्रीसंकष्टी पूजा.

वैशाख

शुक्ल ३ या : अक्षय तृतीया उत्सव, पालखी उत्सव.
४ थी : श्रीविनायकी, पालखी उत्सव.
१५ मा : श्रीपुष्टिपती विनायक जयंती.

ज्येष्ठ

शुक्ल ४ थी : श्रीविनायकी, पालखी उत्सव.
वद्य ४ थी : श्रीसंकष्टी पूजा.

आषाढ

शुक्ल ४ थी : श्रीविनायकी पालखी उत्सव.
वद्य ४ थी : श्रीसंकष्टी पूजा.

श्रावण

शुक्ल ४ थी : श्रीविनायकी श्रावण पर्वणी उत्सव.
५ मी : द्वादश कलशार्चन.
वद्य ४ थी : श्रीसंकष्टी पूजा.
८ मी : श्रीगोकुळाष्टमी.
श्रावणात शेवटचा रविवार : महापूजा दिवाडी येथील समस्त ग्रामस्थांकडून.

भाद्रपद

शुक्ल ४ थी : श्रीगणेश चतुर्थी पालखी उत्सव. (चंद्रास्तानंतर).
१४ शी : श्रीअनंत व्रतोत्सव दुपारी १२ वाजता.

आश्विन

शुक्ल १ दा : घटस्थापना
४ थी : श्रीविनायकी पालखी उत्सव.
१० मी : श्रीविजयादशमी उत्सव. सीमोल्लंघन पालखी उत्सव.
वद्य ४ थी : श्रीसंकष्टी पूजा.

कार्तिक

शुक्ल ४ थी : श्रीविनायकी पालखी उत्सव.
शुक्ल १४ शी : श्रीवैकुंठचतुर्दशी, श्रीची गंधपूजा.
वद्य ४ थी : श्रीसंकष्टी पूजा.

मार्गशीर्ष

शुक्ल ४ थी : श्रीविनायकी, सार्वजनिक काला उत्सव, पालखी, लालखी उत्सव, काला.

मार्गशीर्ष

शुक्ल ५ मी : गवळण काला.
६ ष्टी : आंवळी भोजन उत्सव.
वद्य ४ थी : श्रीसंकष्टी पूजा.

पौष

शुक्ल ४ थी : श्रीविनायकी पालखी उत्सव
वद्य ४ थी : श्रीसंकष्टी पूजा.

माघ

शुक्ल १ दा ते ३ या : श्रीगणपती सहस्त्र पुरश्चरण.
४ थी : श्रीविनायकी श्रीगणेशजयंती पालखी, रथोत्सव.
५ मी : श्रीशांतादुर्गा कुलपुरुष उत्सव. श्रीगणपती, श्रीशांतादुर्गा पालखी.

माघ

६ ष्टी : श्रीगणेश नवरात्रोत्सव-पालखी उत्सव.
७ मी : पालखी उत्सव.
८ मी : दोन पालख्या श्रीगणपती व श्रीशांतादुर्गा
९ मी : पालखी उत्सव.
१० मी : पालखी उत्सव.
११ शी : पालखी उत्सव.
१२ शी : सहस्त्रावर्तने, प्रमुख देवतार्चन, अभिषेक, महानैवेद्य, रात्रौ पुराण, कीर्तन, पालखी उत्सव

श्रीकैवल्यपूर मठाधीशांकडून

१३ शी : श्रीगणेश नवरात्रोत्सव सांगता. पालखी, लालखी उत्सव, श्रीशांतादुर्गा देवीस दिवजां. सार्वजनीक गाऱ्हाणे इ.
वद्य ४ थी : श्रीसंकष्टी पूजा.

फाल्गुन

शुक्ल ४ थी : श्रीविनायकी, पालखी उत्सव.
१५ मा : हुताशनी उत्सव.
वद्य ४ थी : श्रीसंकष्टी पूजा.

प्रती शुक्ल चतुर्थी विनायकी रोजी पालखी उत्सव साजरा होत असून, त्या उत्सव मिरवणुकीत पालखी प्रयाण समयी प्रार्थना आणि मिरवणुकीत एकंदर आठ पेणी होत असतात. पेणी म्हणजे मुक्काम अवघी मिनिटापुरताच.

त्या प्रत्येक पेण्यात एक अष्टक, पालखी बरोबर असलेले भाविकजन म्हणतात. ती प्रार्थना, ८ अष्टके आणि मिरवणूक संपूर्ण होऊन पालखी देवालयात परत येते वेळी रहाट व नारळ ओंवाळकी नंतर गाऱ्हाणे घालतात. ते फारच मन प्रसन्न करणारे आहे.

प्रसादकौल किती लावतात, कोणत्या स्थानावर लावतात, कसल्या पानाचे लावतात आणि कोणत्या तिथीस लावत नाहीत याची अत्यावश्यक माहिती.

गोमंतकातील इतर देवस्थानाप्रमाणेच याही देवस्थानात प्रसाद-कौल घेण्याची वहिवाट फार प्राचीन कालापासून असल्याचा ऐतिहासिक पुरावा मागे दिलाच आहे. सध्याच्या खांडोळें येथील श्रीगणपती देवस्थानात ही वहिवाट परंपरेने राखून ठेविलेली असून, त्या प्रसाद कौलासाठी भाविक गरजू लोक तेथे येत असतातच ही काही नवलाची गोष्ट नव्हे.

या देवस्थानात ती प्रसादपूजा श्रीगणपती देवताच्या पंचलवी किंवा पितळेच्या एका फार प्राचीन मूर्तीस, करंबलीच्या झाडाच्या पिकलेल्या पानाच्या तुकड्याची लावतात. ते तुकडे खालीलप्रमाणे त्या मूर्तीच्या सभोवार प्रभावळीस व देहास लावतात. सभोवार प्रभावळीस डावीकडे १३, उजवीकडे १३, मध्ये कीर्तीमुखाकडे उंच १, उजव्या स्थानकास ४, तसेच डाव्या स्थानकास ४, खालील आसनास ३, पोटास ५, भालप्रदेशास ३, प्रत्येक हातास एक, या प्रमाणे चार हातास मिळून एकंदर ४, शिवाय मागच्या बाजूच्या दोन हातापैकी एका हातात त्रिशूल आहे त्या त्रिशूलास १, व दुसऱ्या हातात शंख आहे त्या शंखास १, आणि दोन कानास प्रत्येकी एक मिळून दोन कानास दोन याप्रमाणे एकंदर ५४ ठिकाणी पानाचे तुकडे लावून प्रसादपूजा पूर्ण केली जाते.

इच्छुक इसम जी काही आपली मागणी असेल, ती श्रीचरणी प्रार्थना करून मागतो व प्रसाद-कौल आपणास मिळण्याची उत्कंठा धरून असणे स्वाभाविकच आहे. प्रसाद-कौलाची परिभाषा म्हणजे कोणत्या जागीचे पान (प्रसाद-कौल) खाली पडल्यावर त्या पानाचा अर्थ-बोध काय समजावा, याचे ज्ञान व अनुभव त्या देवस्थानात जे प्रसाद-कौल पूजा लावणारे पुजारी भटजी त्यात ते रुळलेले असल्याने तो अर्थ इच्छुकास सांगतात.

ती परिभाषा सगळ्याच देवस्थानात एकाच तऱ्हेची नसते. तसेच, ती प्रसादपूजा वेगवेगळ्या देवस्थानात वेगवेगळ्या पानाची, फुलाची, उकड्या तांदुळाची जशी लावतात, त्याचप्रमाणे ते प्रसाद लावण्याची स्थाने ही वेगवेगळी आणि कमी अधिकही असतात. प्रत्येक देवालयातील वहिवाट वेगवेगळी असते. आणि त्या प्रसाद कौलाचे फल मिळणे, दृढश्रध्दा आणि निष्ठेवरच बहुताशी अवलंबून असते.

ते प्रसाद कौल सबंध वर्षाच्या ३६० ही दिवसात, पाहिजे त्या दिवशी, व पाहिजे त्यावेळी घेणे शक्य नसते. प्रत्येक देवस्थानात पुर्वापार वहिवाट चालत आल्याप्रमाणे काही ठराविक दिवशी ते

घेण्यास प्रसाद-पूजा लावली जात नसते. खांडोळें येथील श्रीगणपती देवस्थानात प्रसाद-कौल घेण्यास येणाऱ्या भाविक इच्छुकांची तेथे येऊन गैरसोय होऊन निराश होण्याची पाळी येऊ नये म्हणून मुद्दाम परिश्रम पूर्वक माहिती मिळवून कोणत्या तिथी महिन्यात **तेथे प्रसाद कौल घेण्याची वहिवाट नाही तेच दिवस खाली दिलेले आहेत.**

प्रत्येक महिन्याच्या शुक्ल चतुर्थी विनायकी रोजी, शुक्ल आणि वद्य एकादशी, अमावास्या, आश्विन शुक्ल प्रतिपदा ते दशमी (नवरात्र-दसरा) आश्विन वद्य १४ शी, नरकचतुर्दशी, माघ शुक्ल चतुर्थीपासून माघ शुक्ल त्रयोदशीपर्यंत उत्सवात, सूर्य आणि चंद्र ग्रहणाचे दिवशी प्रसादकौल घेण्याची वहिवाट नाही. या शिवाय, त्या देवस्थानात सार्वजनिकरीत्या त्या देवस्थानाकडून यज्ञयागादि हवनासारखे धार्मिक कृत्य तेथे चालू असले, तर त्या दिवसात प्रसाद कौल घेण्याची वहिवाट नसते.

श्रीगणपती देवस्थान प्राचीन काळी तिसवाडी तालुक्याच्या दिवाडी बेटाच्या नावेली गावात होते, तेव्हा तेथे कोणकोणती दैवते होती ?

पोर्तुगीज फिरंगी लोकानी खिरस्ती धर्म प्रसारासाठी जो हिंदूधर्मीयांचा अनन्वित छळ चालविला होता, त्या काली इ. स. १५४० मध्ये, गोवा बेटातील हिंदूंची देवालये पाडली असल्याचा पुरावा मिळतो. तिसवाडी तालुक्यातील जी देवालये पोर्तुगीजानी जमीनदोस्त केली, त्यांची यादी गोवा सरकारच्या पुरातत्व खात्याच्या प्राचीन दप्तरात आणि इतर ऐतिहासिक विश्वसनीय ग्रंथात सांपडते. त्या यादीत दिवाडी बेटात जी देवालये जमीनदोस्त केली गेली, त्या देवालयातील दैवतांची नोंद जी उपलब्ध आहे, त्यात ग्राम-पुरुष, नारायण, भैरांव, रवळनाथ, देवता, सप्तनाथ, सटी, भगवती, बावकादेवी, वंशनाथ, वीर;

कापरीदेव, ग्रामपुरुष, रवळनाथ, सांतेरी; रवळनाथ, गणेश; भैरांव, मस्कवासिणी, मोक्या, निर्गुण.

वरील दैवतांची नोंद बारकाईने लक्षात घेता, असे वाटते की, दिवाडी बेटातील सबंध क्षेत्रफळात जी गावे होती, यापैकी नावेली गावात श्रीगणपती देवस्थान होते त्या नावेली गावातील देवालये जी जमीनदोस्त केली (अर्थातच तेथील दैवताच्या स्थलांतरानंतरच्या कालात) ती देवालये श्रीगणेश देवाचे आणि श्रीरवळनाथाचे अशी असावीत. इ. स. १५४० सालापूर्वी नावेली येथून श्रीगणपती दैवत स्थलांतर करून गेले होते. यात मुळीसुध्दा संशय नाही. स्थलांतरानंतर दैवताशिवाय जी इमारत, पूर्वी देवालयाची होती, तीच इमारत, जमीनदोस्त केली गेली हे उघड आहे.

देवस्थानचे आद्य संस्थापक कुळावी महाजन

प्राचीनकाली नावेलकर वांगडाचे भारद्वाज, काश्यप, कौंस आणि अत्रि गोत्रांचे गौड सारस्वत ब्राम्हण ज्ञाती समाजातील ज्यांची उपनावे शेणवी, महाले, कुडव, कामत, प्रभू, रामाणी आहेत, हेच या देव-स्थानाचे आद्य संस्थापक कुळावी महाजन असून, त्यांचेच वंशज आजच्या कालात परंपरेने कुळावी महाजन आहेत. कालमानाप्रमाणे उपनावात वापर करताना शेणवी नावेलकर, प्रभू नावेलकर, शेणवी खांडेपारकर, शेणवी झंझाळ, अशा प्रकारे फरक केलेला दिसतो.

हे फक्त उदाहरण नमुना म्हणून दाखविले आहे. जसे शेणवी या मूळ नावाचे आपल्या नावापुढे नावेल-कर, प्रभू या मूळ नावाचे आपल्या नावापुढे नावेलकर लावतात, त्याचप्रमाणे आणखी पुष्कळ कुळावी महाजन फक्त मूळ उपनावेच वापरत राहिले आहेत. उदाहरणार्थ : महाले, कुडव, कामत, प्रभू वगैरे आणि पुष्कळ मूळ शेणवी उपनावाचे आपल्या त्या उपनावापुढे आणखी जोड नावाचा वापर केलेले दिसतात.

परंतु सगळेच मूळ नावेलकर वांगडाचे गौड सारस्वत ब्राम्हण समाजाचे आहेत. आणि त्यात जसे स्मार्त संप्रदायाचे आहेत, तसेच वैष्णव संप्रदायाचेही आहेत. आणि म्हणून त्या देवस्थानात दोन्हीही संप्रदायांच्या कुळावी महाजनाची योग्य प्रकारे सोय व्हावी, या सद्हेतूने स्मार्त आणि वैष्णव या दोनही संप्रदायांच्या वैदिक भटजी ब्राम्हणांची सेवेकऱ्यात नेमणूक केलेली आहे.

देवस्थानाची घटना नियमावली

श्रीगणपती देवस्थान खांडोळेंची घटना नियमावली, ज्याला देवस्थानाच्या प्रचलित कायद्यात 'कोंप्रोमिसु' असे नाव आहे, तो कोंप्रोमिसु, पोर्तारीय नामक सरकारी हुकूम नंबर १४२, तारीख २ मे १९१० ने गव्हर्नमेंटकडून पास झाला असून, तो गोवा गव्हर्नमेंट ग्यॉझेट 'बोलेती ओफिसियाल' नंबर ३४, ता. ६ जून १९१० च्या राजपत्रात प्रसिध्द झालेला आहे.

३

श्रीमहालसा देवस्थान

म्हाड्डोळ – प्रियोळ

श्रीमहालसा, म्हार्दोळ

श्रीमहालसा देवस्थान, म्हार्दोळ

श्रीमहालसा देवस्थान
म्हार्द्दोळ, प्रियोळ – गोवा

गोमंतकात अंतरूज महालातील एकंदर देवस्थानात श्रीमहालसा देवीचे स्थल, सौंदर्य गुणांत नावाजले जाते. देवालय रमणीय आणि भव्य असून या देवालयाचे छप्पर पूर्णतया ताम्रपत्र्याने मढविलेले असे, गोमंतकात हे एकमेव देवालय आहे.

देवालयाच्या उभय बाजूस चांगल्या विस्तीर्ण सोयीनिशी नवीन बांधणीच्या अग्रशाळा असून देवालयाच्या पाठीमागे तलाव आणि देवालयाच्या पुढच्या बाजूस, दगडी बांधकामाचा दीपस्तंभ व त्याच्या उजव्या बाजूस एक नयनमनोहर उंच एकवीस माल्यांची पितळ धातूची समई आणि त्यापुढे जवळच मोठा प्रेक्षणीय, एकाच रांगेत तीन कमानी दरवाजावर आधारीत नगारखाना आहे.

गोमंतकात श्रीमहालसा दैवत केव्हां, कोणत्या काली आले ?

गोमंतक वसीवण्याचे वेळी आणलेल्या इतर दैवतांत श्रीमहालसा देवीही होती. कोणकोणती दैवते त्यावेळी इकडे आणली गेली त्या विषयीचे स्कंद पुराणात उत्तर रहस्य सह्याद्रि खंड स्कन्देश्वर संवाद प्रथमोध्याय ओव्या ५२-५३ मध्ये वर्णन आहे ते असे :–

आनीता भार्गवेणैव गोमंताख्ये च पर्वते ।
मांगिरीशो महादेवो महालक्ष्मीच म्हालसा ॥ ५२ ॥
शांतादुर्गा च नागेशः सप्तकोटीश्वरः शुभः ।
तथाच बहुलादेवा आनीताः भार्गवेण च ॥ ५३ ॥

यावरून श्रीमहालसादेवीचा संबंध पुराणकालापासून लागतो हे उघड आहे. भारतीय पुराणाच्या समृध्द परंपरात स्कन्दपुराणांतर्गत सह्याद्रि खंडाचे स्थान फारच वरचे आहे. प्राचीनतेच्या दृष्टीने त्याची तुलना काशी, कांची, अवन्तिकेच्या तोलाची व मोलाची आहे.

उत्तरेस भडोचपासून दक्षिणेस केरळमधील मोठ्या भागाचा समावेश असलेल्या सह्याद्रीच्या ह्या परिसरात वास करणाऱ्या प्राचीन जातीजमाती, त्यांचे आचारविचार व चालीरित्ती, त्यांची तीर्थक्षेत्रे व देवस्थाने इत्यादीचे विस्तारपूर्वक उल्लेख व त्याबरोबर या निसर्गरम्य प्रदेशाचे सौंदर्यात्म वर्णन, या साऱ्यामुळे सह्याद्रि खंड ग्रंथाला सांस्कृतिक, वाङ्मयीन तसेच इतिहास संशोधकाच्या दृष्टीने वेगळे व आगळे असे सर्वांगीण महत्व आहे.

पण, केवळ एवढेच नाही. दशावतारातील सातवा अवतार, सप्तकोंकणचा निर्माता, तेथील जमातीचा संस्थापक, दुर्जनाचा शासनकर्ता आणि अनाथाचा त्राता जो परशुराम, त्याचे अनेक स्वरूपातील दर्शन, रौद्र तसेच हृद्यही, याच ग्रंथात घडते.

समुद्रमंथनाच्या वेळी चौदा रत्नाच्या वाटणीच्या प्रसंगी देवदैत्यामध्ये पडलेला लढा युक्तीने मिटविण्यासाठी भगवंतानी जे सुमनोहर मोहिनीरूप धारण केले होते, तोच श्रीमहालसादेवीचा अवतार होय असे पुराणांतरी आढळते.

गोमंतकात श्रीमहालसादेवीचे आदिस्थान कोठे होते ?

सासष्टी तालुक्यामधील "वेरणे" हा गांव श्रीमहालसादेवीचे आदिस्थान होय. हा गांव मडगाव शहरापासून अडीच कोस (१२॥ किलोमिटर) दूर असून, पायी अगर गाडीने जाण्यास चांगली सडक आहे. वेरणे या गावाचे मूळचे नाव "वरण्य" असे असून त्याचेच अपभ्रष्ट रूप "वेरणे" हे होय.

ज्या ठिकाणी पूर्वी म्हणजे डिसेंबर इ. स. १५६७ सालापूर्वी श्रीमहालसादेवीचे देवालय-इमारत होती त्या जागेस सध्याच्या कालात "जुने म्हाड्डोळ" असे म्हणतात.

वेरणे येथील खिरस्ती धर्मीयांचे चर्चकडे आपण पोहोचलो म्हणजे सडक सोडून उजव्या बाजूने असलेल्या उंचवट्यावरून एक पायवाट गेली आहे.

त्या वाटेने नीट चालावयास लागले म्हणजे अर्ध्या तासाने "जुने म्हाड्डोळ" लागते. या जागी जुन्या कालीन देवस्थानाचे बरेच अवशेष आहेत. सासष्ट बाटविताना पाद्री लोकानी याच देवालयावर प्रथम हल्ला केला. हे देवालय त्यानी सबंध मोडून टाकले. पण फक्त त्याचा चौथरा राहिला.

देवालयाच्या समोर की मागे ते आता निश्चितपणे सांगता येणे कठीण असले, तरी तेथे दगडानी बांधलेला एक तलाव आहे.

जेजुइट पाद्रीनी ते देवालय पाडल्यानंतर, त्याच जागी चर्च बांधण्याचे जेजुइटांनी ठरविले. पण, काही आकस्मिक संकटे येऊन ते काम त्यांच्याकडून घडून आले नाही. नंतर बऱ्याच वर्षाचा काल उलटल्यानंतर वेरणे येथे राहणाऱ्या खिरस्ती धर्मीयानी त्या देवालयाच्या इमारतीच्या मागे एक कपेल म्हणजे लहानसे चर्च बांधण्यास सुरवात केली. तेथे दगडाची चौकट बांधून तयार झाली. पण, लांकूडकाम करण्यापूर्वीच सगळे गवंडी तीन दिवसात तापाने मरण पावले !

नंतरही एकदोनदा अशा प्रकारचे प्रयत्न झाले, पण शाकारणीचा योग जमून न येता शेवटी कपेल व क्रूस ऊन पाऊस खात उघड्या स्थितीत राहिली !

ही कथा अद्याप त्या गावात अशीच सांगण्यात येते, आणि ती खरी किंवा खोटी कशीही मानली, तरी त्या कथेवरून लोकसमजुतीची मात्र कल्पना झाल्याशिवाय राहत नाही.

श्रीमहालसादेवीचे आदिस्थान जे वरेण्य किंवा वेरणे त्या स्थानाचे पुराणकालात माहात्म्य काय असावे आणि तेथील श्रीमहालसादेवीचा प्रभाव काय असावा, याबद्दल जिज्ञासूना माहितीची उत्सुकता असणे स्वाभाविक आहे. म्हणून त्या संबंधीची माहिती "वरुणापूर-माहात्म्य" आणि "श्रीमहालसेचा प्रभाव" नावाने सह्याद्रि खंडात उपलब्ध आहे तीच संक्षिप्तात खाली दिलेली आहे.

पौराणिक माहिती "वरुणापूर–माहात्म्य"

"शौनक म्हणाले, 'हे भगवन् सूत, तुम्ही आमचे भाग्यविधाते आहात. आम्हास वरुणापूर–माहात्म्य विस्तारपूर्वक सांगा.'

सूत म्हणाले, 'वरुणापुरी रत्नसंपन्न व रमणीयही आहे. शौनका, त्या क्षेत्राचे माहात्म्य ऐक. तेथील धार्मिक लोक वेदार्थ जाणणारे असून रामभक्त होते. त्यानी एकदा लोककल्याणासाठी ज्योतिष्टोम यज्ञ केला.

'त्यात सर्वांना प्रत्यक्ष भार्गवराम देवाचे दर्शन झाले. सर्व देव व ऋषी तृप्त झाले. राम संतुष्ट होऊन वरुणाला म्हणाला, हे बाहुशाली जलाधीशा, येथे माझ्यासाठी रत्नमय निवासस्थान निर्माण कर. ते स्थान स्वर्गीय ऋषीना राहवयास योग्य असावे.'

ते रामाचे वचन ऐकून व ठीक आहे असे बोलून वरुणाने स्वतःच्या घरासारखेच एक मंदिर तेथे निर्माण केले व भार्गवश्रेष्ठ परशुरामापुढे तो हात जोडून उभा राहीला. त्याने त्याला ते मंदिर पाहण्याची प्रार्थना केली. नंतर प्रीतिसंपन्न वरुणाला भार्गवराम म्हणाला,

'हे भद्रपुरुष वरुणा, तू स्वतःच्या मंदिराप्रमाणेच हे मंदिरसुध्दा रत्नसुवर्णखचित व मनोहर बनविले आहेस. यासाठी 'वरुणापूर' (सध्याचे वेरणे) याच नावाने ते प्रसिध्द होवो.'

तेव्हांपासून ते क्षेत्र "वरुणापूर" नावाने प्रसिध्द होऊन धर्म, संपत्ती व ऐश्वर्य यानी समृध्द झाले. येथे वेदघोष, यज्ञ, दाने व अतिथीपूजा नित्य होत राहोत. जल स्त्रवणारे, सुवर्णकलशयुक्त, रत्नजडित व गगनचुंबी असे हे दिव्य छत्र येथे असेल.

ब्राम्हणांना असा आशीर्वाद देऊन परशुराम तेथून गेला. भृगुश्रेष्ठ परशुरामाचे जो चिंतन करतो, त्याला तो प्रभु प्रत्यक्ष दिसतो.

एकदा वैशाखातील नवमी तिथीला शुक्रवारी तेथे सात दिवसाचा राम-महोत्सव सुरू झाला. यासाठी, तेथे यज्ञपति प्रभु रामाच्या नामाचा घोष, विविध दाने षडरसयुक्त ब्राम्हण भोजने सुरू झाली. काही लोक नाच व रामगाथेचे गायन करू लागले.

अशा वेळी एक मोठा बलिष्ठ महादैत्य त्या वरुणपुरवासी लोकाना पीडा देऊ लागला. ते पीडित लोक रामाला शरण गेले. राम राम असे म्हणून त्याच्या चरणकमलाचे ध्यान करू लागले.

'हे जगदीश रामा, हे जामदग्न्य महाप्रभो, दुष्ट क्षत्रिय संहारका, भक्तानुग्रहकारका, हे जगन्नाथ देवेशा, तू लोकांचे भय दूर करणारा आहेस. आम्ही तुला शरण आलो आहो. आम्ही तुझेच असून तूंच आमचे रक्षण केले आहेस. तुझ्या दर्शनासाठी आम्ही तळमळत आहो. आमचे रक्षण कर.'

हे त्याचे वचन ऐकून राम तेथे उपस्थित झाला. रामाचे दर्शन होताच ते सर्व वरुणापुरवासी लोक हात जोडून उभे राहिले व त्याची स्तुति करू लागले.

'हे भृगुश्रेष्ठा, तू सूर्यतुल्य द्विजश्रेष्ठ आहेस. तुला नमस्कार असो. तू दुःख दूर करणारा आहेस. तू सर्व कामना पूर्ण करणारा आहेस. तुला नमस्कार असो.'

'तू आदिपुरुष असून भक्तजनाच्या संसारवृक्षासाठी कुऱ्हाड असल्याने मुक्तिदाता आहेस. आपल्या क्षेत्रवासी लोकांचे रक्षण करण्यासाठी तू धनुर्बाण धारण केला असून लोकांचा दुःखसागर तू शुष्क करतोस. तुला नमस्कार असो.'

याप्रमाणे स्तुति केल्यावर भगवान राम गंभीर व गोड वाणीने त्या द्विज श्रेष्ठाना म्हणाला :-

'विप्रहो, तुम्हा सर्वांना हितावह असे जे मी सांगतो, त्याकडे लक्ष द्या. येथे मीं दैत्य दानवाच्या संहारासाठी देवीची स्थापना केली आहे. ही देवी सर्व लक्षण संपन्न, मायायुक्त व शक्तिपूजित आहे. लोक-पावनी अशी ही देवी रत्नजडित नूपुरधारी पायानी चालून जगाला पवित्र करणारी बाला आहे.

कन्या, कुमारी, मनमोहिनी युवति, शासन करणारी व सर्वेच्छा पूर्ण करणारी वृध्दा अशीही हिची अनेक रूपे आहेत.

प्रातःकाल, पूर्वाण्हि, मध्यान्ह, अपराण्ह, सायंकाल, प्रदोष, रात्र, मध्यरात्र, अपरात्र ह्या नऊ वेळी पृथ्वीवर नऊ रूपे धारण करणाऱ्या या भूतश्वात्री देवीची, १ आदिशक्ति, २ महामाया, ३ मूलप्रकृती, ४ ईश्वरी, ५ गन्धद्वारा, ६ दुराधर्षा, ७ नित्यपुष्टा, ८ करीषिणी व ९ श्रीदेवी अशी नऊ नावे आहेत. असे वेदवेत्ते समजतात.

दुर्गा, भद्रकाली, विजया, वैष्णवी, कुमुदा, दण्डिका, कृष्णा, माधवी, कन्यका, माया, नारायणी, शांता, शारदा, अंबिका, कात्यायनी, बालदुर्गा, महायोगिनी, अश्वीश्वरी, योगनिद्रा, महालक्ष्मी, कालरात्री, मोहिनी, सर्वदेवनमस्कार्या, भारती अशा २४ नावानी त्या श्रीस आवाहन करून पूजा करा. ही देवी सर्व कामना पूर्ण करणारी व सर्व फल देणारी आहे.

वरुणाच्या या श्रेष्ठ मंदिरातील देवीची तुम्ही सेवा करा. मीच हिची पूर्वी स्थापना केली असून इच्छा पूर्ण करणाऱ्या या देवीची भक्ती करा. तिचे सुंदर छत्र थल स्त्रवणारे असून त्यावर सुवर्णकलश आहे.

छत्राचा दांडा रत्नखचित असून तो गगनचुंबी आहे. पूजा, बलि व नमस्कार करून तिची प्रार्थना करा. ती तुम्हाला हवा असलेला वर देईल. तुमच्या सर्व शुभाशुभ कामना निवेदन करील.

असे सर्व जनाना सांगून राम गोमंतक पर्वतावर गेला. सूत म्हणाला, नंतर रामाच्या आज्ञेप्रमाणे सर्व वरुणापुरवासी लोकानी श्रीमहालसा देवीची स्तुति करून तिला नमस्कार केला.

श्रीमहालसेचा प्रभाव

नंतर रामाज्ञेप्रमाणे विधियुक्त पूजा करून ते सर्व देवीला शरण गेले व हात जोडून त्यानी तिची प्रार्थना केली.

'हे जगध्दात्री देवी, तूच सृष्टीची स्थिती व लय करणारी आहेस. चंडासुराला घाबरून आम्ही तुला शरण आलो आहो. ह्या दुष्ट दैत्याचा वध कर व आमचे रक्षण कर.'

या प्रमाणे स्तुति केल्यावर देवी प्रसन्न शब्दात बोलली.

'ब्राम्हणांनो, भिऊ नका. मी दैत्याला निश्चित ठार करीन.'

असे सांगून ती खड्गाधारी देवी चंडासुराला मारण्यासाठी निघाली. त्याच्याशी मोठे युध्द करून सर्व असुरसैन्य तिने कापून काढले व शेवटी त्या दैत्याचे अतिभयानक शीर कापले.

त्याचे ते शिर डाव्या हातात धरून देवी मंदिरात गेली.

त्यावेळी सर्व सिध्द, चारण, गुह्यक व देव यानी तिच्या त्या कार्याची स्तुति करून तिच्यावर पुष्प-वर्षाव केला. श्रेष्ठ गंधर्वांनी गायन केले. सर्व मुनि आनंदाने महामाया, महालक्ष्मी, महायोगिनी, अधीश्वरी, जया, विजया, सर्वलोकनमस्कृता या नावानी तिची स्तुति करू लागले.

या प्रमाणे लोकानी देवीची स्तुति व पूजा केली व ती सर्वमंगलदायिनी देवी जगप्रसिध्द झाली. नंतर सर्व लोक वरुणापुरात आले व त्यानी फलसमृध्दीसाठी मोठा उत्सव करविला. **ज्या दिवशी तो दैत्य मारला गेला, ती तिथी तिला प्रिय होय. म्हणून माघ शुक्ल पक्ष षष्ठी तिथी या दिवशी जे लोक मोठ्या भक्तीने त्रिभुवनेश्वरी देवीची पूजा करतात त्यांचे सर्व मनोरथ निश्चित पूर्ण होतात.**

वरील पौराणिक माहितीवरून वरुणापूर म्हणजे आजचे वेरणे क्षेत्राचे माहात्म्य आणि श्रीमहालसादेवी दैत्य दानवाच्या संहारासाठी पुराण कालात कोणी स्थापना केली हे समजून येते. त्या पुढच्या कालात श्रीमहालसादेवीच्या स्थापनेबद्दलची माहिती जी उपलब्ध आहे ती अशी :

पुराणकालानंतरच्या इतिहास कालात श्रीमहालसा देवीच्या स्थापनेबद्दलची माहिती.

श्रीमहालसादेवीचे देवालय वेरणे येथे कौशिक गोत्री सारस्वत ब्राम्हण श्री. म्हाळू पै याने स्वखर्चाने बांधिले. श्रीमहालसादेवी ही श्री. म्हाळू पै याची उपास्य देवता.

हा श्री. म्हाळू पै वास्तविक मूळ नागवे गावचा रहिवासी आणि नागवे गाव हा वेरणे गावा शेजारीच आहे.

इसवी सनाच्या अकराव्या शतकाच्या सुमारास गोवा प्रदेश ज्या राजसत्तेच्या अंमलाखाली होता, त्या राजवटीत श्री. म्हाळू पै सेनापती पदावर पोहोचला आणि मोठ्या हुद्याची आणि मानाची जागा आपणास श्रीमहालसादेवीच्या कृपेनेच मिळाली, या कृतज्ञतेने आणि भक्ती भावानेच ते देवालय त्याने बांधले.

या देवालयाच्या स्थापनेनंतर श्री. म्हाळू पै याचा उत्कर्ष आणखी वाढत जाऊन त्यास सासष्टी महालाचा सर्वाधिकारी नेमण्यात आला. साहजिकपणे श्रीमहालसादेवी तत्काल नवसास पावणारी देवी म्हणून कीर्ती सर्वत्र पसरली.

वेरणे गांवात उघड्या मैदानावर असलेली जुन्या म्हाड्डोळ्ची प्रशस्त जागा पाहिली म्हणजे पूर्वकालीन वैभवाचे वेळी त्या देवस्थानची शोभा अवर्णनीय होती हे सहजासहजी लक्षात येते.

यापुढे आता हे वेरणे गावात असलेल्या श्रीमहालसादेवीचे स्थलांतर गोव्यातच फोंडा तालुक्याच्या प्रियोळ गावात, अंत्रुज महालात, का, कोणत्या कारणाने, केव्हा झाले हे समजून घेण्यासाठी संबंधित कालातील राजकीय ऐतिहासिक घटनाचा शोध घ्यावा लागेल.

प्रारंभीच सांगावेसे वाटते की, प्राचीन कालापासून गोमंतकीयास आणि त्यातही विशेष करून हिंदु धर्मीय गोमंतकीयास, इतिहास लेखनाची आवड नाही. त्यामुळे या गोमंतक प्रदेशाचा साधार व सुसंगत इतिहास उपलब्ध नाही. गोमंतकात इ. सन १५१० साली पोर्तुगीज फिरंगी लोकांचा प्रवेश झाल्यानंतर, दहा वीस वर्षाचा काल लोटल्यानंतर त्यांनी खिरस्ती धर्म प्रचार आणि प्रसारासाठी हिंदु धर्मीय लोकांचा क्रूरपणे असह्य छळ चालविला.

देवालये उध्वस्त केली, मोडून टाकली, जाळली, मूर्तीभंजन केले व त्यांचे धार्मिक ग्रंथ शिकस्तीने शोधून काढून जाळून टाकले यात संशय नाही. या आगीमध्ये धर्मग्रंथाबरोबर इतरही वह्या, कागदपत्र, सर्व जळून गेले असा समज झाला आणि म्हणून गोमंतकाचा साधार आणि सुसंगत इतिहास उपलब्ध नसण्याचे प्रमुख कारण असावे असे मानणे क्रमप्राप्त आहे.

आणि हे कारण कोणतेहि निरर्थक वाद टाळण्यासाठी गृहीत धरले तरी, या घटनेस आज चारशे वर्षाचा काल उलटून गेला आहे. या कालात तरी गोमंतकात स्थायिक असलेल्या आम्ही हिंदु धर्मीयानी गोमंतकाचा साधार आणि सुसंगत सर्वांगीण सोडाच, निदान धार्मिक तरी इतिहास संपूर्णपणे लिहून प्रसिध्द झाल्याचे दिसत नाही, ही फार खेदाची गोष्ट नव्हे काय ?

काहीच नाही त्यापेक्षा यापुढे निदान आपआपल्या देवस्थानाबद्दल प्राचीन आणि अर्वाचीन घटनांचे संशोधन आणि संकलनपूर्वक सविस्तर नोंद घेऊन सर्वांगीण इतिहास, ज्यात जास्तीत जास्त उपयुक्त सर्व माहिती काही एक न वगळता, सत्य वस्तुस्थिती मांडून नमूद करून ठेवली व ती पुस्तक रूपाने प्रसिध्द केली, तरीसुध्दा हेच कार्य पुढील पिढ्यास फार मोठे लाभदायक आणि मार्गदर्शनाचे ठरेल. गोमंतकात प्रत्येक देवस्थानाच्या कुळावी महाजनामध्ये नामवंत लेखक, तज्ञपणे संशोधन करणारे, सूक्ष्म दृष्टीने अभ्यास करून लिखाण करणारे विद्वान खचितच आहेत. काही देवस्थानाच्या विद्वान लेखकांनी यापूर्वी आपला बहुमोल वेळ खर्ची घालून आपआपल्या आणि तसेच इतर काही देवस्थानाबद्दलही माहितीचे महत्वाचे लिखाण प्रसिध्द केलेले आहे हे नाकबूल करता येत नसले, तरी हे कार्य शक्य त्याप्रमाणे अभ्यासू वृत्तीने तरुण पिढीने यापुढे सतत चालू ठेवण्याचा प्रयत्न आपलेपणाने, स्वाभिमानपूर्वक चिकाटीने केलाच पाहिजे. तरच, गोमंतकीय हिंदु धर्मीय समाजाच्या सुसंस्कृतीचे दर्शन घडू शकेल.

नाही म्हणावयास शके १६४३ प्लव नाम संवत्सरी म्हणजे इ. सन १७२१ साली "कोंकणाख्यान" नावाचा ग्रंथ लिहिलेला आणि प्रकाशित झालेला उपलब्ध आहे. ऐतिहासिक दृष्ट्या या ग्रंथाचे महत्व बरेच आहे. ग्रंथकारानी शोधपूर्वक जी माहिती मिळाली, ती माहिती त्यात ग्रंथीत केली आहे. त्यात प्राचीन कथन, सासष्टी महिमान, तिसवाडी वृत्तांत, ऐक्य, दर्शन, वृध्दी विस्तार, गोत्र प्रवर दिग्दर्शन, दैवत स्थलांतर असे आठ अध्याय पूर्वार्धात आणि उत्तरार्धातही आणखी आठ अध्याय वेगळे आहेत.

सबंध ग्रंथात ११७९ ओव्या आहेत. गोमंतकाचा इसवी सनाच्या सोळाव्या शतकात हिंदु धर्मीय लोकांचा जो नानाविध प्रकारे असह्य छळ झाला, तो ज्या लोकांनी केला ते खिरस्ती धर्मवेडे जेजुइट पाद्री यांनी गोव्याहून त्या काली पोर्तुगालास जी गुप्तपत्रे पाठविली होती तो सर्व पत्रसंग्रह लिस्बन शहरात एकत्र करून त्यात त्या वेळच्या गोव्याच्या सरकारी घटना समाविष्ट करून कोंपाजीय दे जेजूसचा समग्र इतिहास त्या कोंपाजीय दे जेजूसच्या पाद्री लोकानी पोर्तुगालची राजधानी लिस्बन शहर येथे "ओरियेंते कोंकिस्तादु" या नावाचा मोठा ग्रंथ इ. स. १७१० साली त्यावेळच्या पोर्तुगीज राजघराण्याचा जो छापखानदार श्री. व्हालेंती दा कोस्त दिस्लांदिस याकडून प्रसिध्द केलेला आहे.

यापेक्षाही जास्त महत्वाचा ग्रंथ इटलीच्या राजधानी रोम शहरात छापलेला असून त्या ग्रंथाचे काही भाग आहेत. हा ग्रंथ म्हणजे मिशनरी सोसियेदाद दे जेजूसच्या मिशनरी पाद्री मंडळीने सुरवातीपासून शेवटपर्यंत ज्या ज्या भूमीवर पाय ठेविले, जी जी कृत्ये केली, ज्या ज्या घटना घडविल्या, त्यांची तारीख, महिना, सन, जागा वगैरे साद्यंत सविस्तर रिपोर्ट लिहून त्या पाद्री मंडळाच्या रेक्टरने किंवा रेक्टरच्या हुकूमावरून व परवानगीने कार्यकर्त्या दुसऱ्या पाद्रीने गोव्याहून त्या काली जी गुप्तपत्रे पाठविली, तो सर्व अस्सल पत्रसंग्रह या ग्रंथात छापलेला असून त्या ग्रंथाचे नाव, लेखक, प्रकाशक खालीलप्रमाणे आहेत :-

MONUMENTA HISTORICA SOCIETATIS IESU "DOCUMENTA INDICA" EDIDIT JOSEPH WICKI S.I.

वरील ग्रंथातील पत्रे ही त्या काली त्या जेजुइट पाद्रीनी जी सविस्तर पत्रे गुप्त मजकुराची गोव्याहून पोर्तुगालास पाठविली, ती व त्यातील सर्व मजकूर व घडलेल्या किंवा घडविलेल्या घटनांची माहिती तत्कालीन पोर्तुगालच्या राजास कळविण्यासाठी लिहिलेली असून, त्यात असत्य परिस्थिती किंवा वस्तुस्थिती लिहून त्यास कोणताच फायदा असणे शक्य नाही असे तर्कशास्त्रदृष्ट्या मानणे क्रमप्राप्त आहे.

मात्र त्या पत्रातील मजकूर बारकाईने वाचून अभ्यासपूर्वक विचार करता असे वाटते की, ती पत्रे लिहिणारास स्थानिक परिस्थितीत योग्य ज्ञान किंवा अपूर्ण माहिती जी जशी त्या त्या ठिकाणी मिळाली, किंवा प्रत्यक्षात दिसली, ती जशाची तशी त्यानी काहीच फेरफार न करता पत्रात अगदी त्यांच्या दृष्टीने विश्वासपूर्वकच लिहिली गेली आहे.

आजच्या काल वेळ, परिस्थितीनुरूप ती तत्कालीन गुप्तपत्रे उजेडात येऊन सद्यःकालीन गोमंतकीयास वाचावयास मिळाल्यानंतर, तत्कालीन परिस्थितीची जाणीव परंपरेने समजून आलेला एखादा इसम, त्या गुप्त पत्रातील मजकूर असत्य किंवा अर्धसत्य आहे किंवा असावा, असे सकृत दर्शनी म्हणू शकेलही. पण तोच इसम सावकाशपणे त्या पत्रातील मजकूर अभ्यासून पाहू लागला, तर ते पत्र लिहिणाराने मजकूर अगदी बरोबर सत्य वस्तुस्थिती जी जशी त्यास दिसली, त्याप्रमाणेच लिहिला आहे हे नाकबूल करणार नाही. मात्र त्या वस्तुस्थितीचे पूर्ण ज्ञान त्याला असावे तसे नाही व त्याला असणेही शक्य नाही.

यामुळे, त्याला जो मजकुराचा अर्थ अभिप्रेत होता तो अर्थ आम्हा आजच्या कालातील वाचकास तो तसा अर्थ स्वीकारणे कठीणच नव्हे तर अशक्यही वाटते. यासंबंधी प्रत्यक्ष उदाहरण पुढे दाखविता येईल.

श्रीमहालसादेवीचे स्थलांतर वेरणे येथून फोंडा तालुक्याच्या प्रियोळ गावात, कोणत्या परिस्थितीत, कोणत्या कालात, कोणत्या जागी झाले ?

सासष्टीतून अंत्रूज महालात आजच्या फोंडा तालुक्यात, हिंदु दैवतांचे स्थलांतर नक्की कोणत्या साली झाले असावे, याबद्दल नानाविधमते व तर्कवितर्क अनेक ठिकाणी वाचनात येतात.

पण, एक गोष्ट निश्चितपणे ग्राह्य मानली पाहिजे व ती ही की, खिरस्ती धर्म प्रसारार्थ कोंपाजीय दे जेजूसचे पाद्री मंडळ गोवा बेटातून सासष्टी प्रांताकडे जे गेले, ते प्रथमतःच इ. स. १५६० साली. त्या पाद्री मंडळाचा प्रवास गोवा बेटापासून सासष्टी प्रांताकडे जलमार्गाने झाला.

त्या पाद्रीनी, सासष्टी प्रांताच्या मुरगांव टोकाकडे किल्ला आहे, तेथून ते काबोच्या समुद्र फाट्यातून प्रवास करीत, सां फिलीप व सां तियागु या संतांच्या दिनी म्हणजे ता. १ मे रोजी, सकाळच्या प्रहरी प्रथमच कुठ्ठाळ गावात पाय ठेविला.

हा ता. १ मे दिवस त्या दोन संतांचा असल्यामुळे त्या कुठ्ठाळ गावात जी चर्च (इग्रेज) उभारली गेली, त्या चर्चमध्ये आराध्य देवता म्हणून त्याच दोन संतांची स्थापना केली. (पहा :- पृष्ठ १६९

"आरयेंीत कोंकिस्ताद, भाग पहिला.) मूळ मजकूर तत्कालीन पोर्तुगीज लिपीत आहे म्हणून वाचकांच्या सोयीसाठी अत्यावश्यक तेवढे मराठी भाषेत रूपांतर खाली दिले आहे.

"यापूर्वीच काही (देव) लपवून दुसऱ्या राज्यात (हद्दीत) नेले असून त्यांची देवालये निराधार स्थितीत ठेवली आहेत. आमच्या पाद्रींनी त्यातील एका देवालयाच्या इमारतीची मागणी केली. कारण, त्या इमारतीत चर्च स्थापन करण्याचे योजिले. ती इमारत चर्चसाठी वापरण्यास मंजुरी तर दिलीच. पण, त्याबरोबर देवालयास जे उत्पन्न होते तेही चर्चच्या भोगवट्यासाठी बहाल केले..."

हा मजकूर पाद्रि गोमिस व्हाज याने सां पावलु कॉलेज गोव्याचे रेक्टर पाद्रि आंतोनियु दे कोस्त यांच्यातर्फे सही करून गोव्याहून ता. २९ नवंबर १५६६ रोजी जे पत्र लिहिले, म्हणजे दाखला नंबर १६ या पत्रातील असून ते समग्र पत्र, पृष्ठ ३८ ते ७१ पर्यंत, भाग ७ वा, "दोकुमेंता इंदिका" या ग्रंथात पोर्तुगीज तत्कालीन लिपीत छापलेले आहे.

वरील तात्पर्यार्थ अनुवाद मराठी भाषेत करून वाचकांच्या सोयीसाठी दिला आहे.

वरील मजकूर येथे मुद्दाम देण्याचे कारण असे की, जेजुइट पाद्री लोकानी बाटाबाटी आणि खिस्ती धर्म प्रसारासाठी सासष्टी तालुक्यात जो प्रारंभी प्रथमच प्रवेश केला तो ता. १ मे १५६० दिवशी, आणि तो प्रवेश कुठ्ठाळ गावात म्हणजे गोवा बेटाच्या पैलतीरावरच्या भूमीत.

आणि ते लोक जेव्हा कुठ्ठाळ येथे त्या वेळी असलेल्या श्रीमंगेश देवालयाच्या इमारतीत शिरले, तेव्हा तेथे त्यानी पाहिले की, त्या देवालयातील देव या पूर्वीच लपवून दुसऱ्या राज्यात नेले असून त्याची ती देवालये निराधार ठेविली आहेत, ही वस्तुस्थिती वाचकाच्या लक्षात यावी म्हणून कुठ्ठाळ हा गाव जेथे आहे, त्याच्या चतुःसीमा भोंवती शंखावली, केळोशी हे असे गाव आणि जरा पुढे मडगांवकडे जाणाऱ्या रस्त्यावरच वेरणे हा गाव आहे.

जेजुइट लोकांचे पाद्रिमंडळ पैलतीरावर कुठ्ठाळीस पोचण्याच्या दिवसापूर्वी कुठ्ठाळीस असलेल्या देवालयातील देव, त्या देवाच्या कुळाव्यानी परराज्यात काळोख्यारात्री गुपचुप पळविले हे स्पष्ट व उघडपणे त्यांस दिसलेच. आणि हा असा प्रकार तेथे स्थानिक जनतेच्या आणि आसपासच्या गावांतील हिंदुधर्मीय जनतेस कळल्याशिवाय राहिला नाही.

तो कळल्यानंतर ती जनता आपआपल्या देवालयातील मुख्य दैवत किंवा त्या दैवताची तत्कालीन मूर्ती मोठी वजनदार पाषाणी असल्यामुळे ती जशाची तशी उचलून घेऊन रात्री अपरात्री गुपचुपपणे काळोखात दुसऱ्या राज्यात धांवपळ करणे प्रत्यक्षात कठीणच नव्हे अशक्यच आहे हे जाणून, प्रसंग ओळखून, त्या मुख्य दैवताची एखादी मूर्ती लहानशी त्या देवालयात असल्यास ती घेऊन, किंवा कोणतेही त्या भीषण आणि संकट काली मिळेल ते दैवताचे प्रतिक घेऊन पळल्याशिवाय आणि तेही लगेच तांतडीने, राहिले असतील काय ?

हा सारासार विचार तर्कशुध्दपणे कोणीही माणूस करू शकतोच असे निश्चितपणे खचित वाटते. त्या काली, आमच्या हिंदुधर्मीय पूर्वजांवर जो महा दारूण प्रसंग ओढवला त्याची कल्पनाही आज करवत नाही.

बाटाबाटीच्या भयाने लोकानी अनन्यगतिक होऊन जीवाहून प्यार मानलेल्या आपल्या हिंदु धर्माच्या रक्षणासाठी सुखाने असो किंवा दुःखाने असो, मरण पत्करले !

या भयंकर प्रसंगी आपल्या धर्माच्या व पवित्र दैवतांच्या रक्षणार्थ स्थलांतरावाचून गत्यंतर नाही असे पाहून जी मंडळी त्या वेळी खिस्ती धर्म प्रसारकांच्या तावडीत न सांपडता निसटली, ती त्या वेळी

हिंदू सरदारांच्या राज्य अधिकार छत्राखाली असलेला जो अंत्रूज महाल, त्यातील गावात आपल्या दैवताच्या प्रतीकासह पोचली.

धाबरून महान् संकटकाली निघालेली ही मंडळी फार वेळ एकसारखी निर्जभूकेला न जुमानता, अविश्रांत पळत सुटली होती हे न सांगताच समजण्यासारखे आहे. वेरणे गावात श्रीमहालसादेवीच्या कुळावी भक्तांस कुठ्ठाळच्या देवालयातील वस्तुस्थिती कळताच ते कुळावीही मोठा दुर्धर प्रसंग ओळखून श्रीमहालसा-देवीची मूर्ती जी त्यांस संकटकाली बरोबर घेऊन रानावनातून रात्रीच्या वेळी धांवपळ करणे शक्य होईल अशी किंवा तिचे प्रतीक घेऊन ते शत्रूच्या आटोक्याबाहेरचे निवांत स्थल सांपडताच, त्यांनी अंत्रूज महालातील फोंडा तालुक्याच्या प्रियोळ गावी एका वाड्यावर (सध्या ज्या जागी श्रीमहालसादेवीचे देवालय आहे त्या वाड्यावर) मुक्काम केला व तेथेच परिस्थितीनुरूप तात्पुरते नारळी पोफळीच्या चुडतानी शाकारणी करून एक लहानसे देवालय उभारून त्यात श्रीमहालसादेवीची स्थापना केली.

कालांतराने त्या जागी योग्य असे देवालय बांधण्यात आले. अंत्रूज महालाच्या प्रियोळ गावात वेरणे-हून जे श्रीमहालसादेवीचे स्थलांतर झाले, त्या स्थलांतराच्या काली अंत्रूज महाल पोर्तुगीज राज्यसत्तेबाहेर होता आणि तो आदिलशाहीच्या राज्यसत्तेखाली असून तेथे तत्कालीन सत्ताधारी हिंदू सरदार होते.

एकंदर तत्कालीन परिस्थितीचा बारकाईने अभ्यासपूर्वक विचार करता हे स्थलांतर शके १४८२ रौद्र नाम संवत्सर इ. सन १५६० या वर्षातच किंवा त्या आसपास झाले असले पाहिजे, असे निश्चितपणे वाटते.

आणि याचे कारण इ. सन १५६० साली १ मे रोजी कुठ्ठाळ गावच्या देवालयाच्या इमारतीत जेजुइट पाद्री मंडळ शिरल्यानंतर त्या पाद्री मंडळाने पाहिले की, त्या इमारतीतील देव त्यापूर्वीच त्या देवाच्या कुळाव्यांनी लपवून परराज्यात पळवून नेले होते.

अशी ही परिस्थिती आणि बातमी शेजारच्या वेरणे गावात आगीप्रमाणे वेगाने फोफावणारच हे उघड आहे. आणि ती बातमी कळल्यानंतर त्या वेरणे गावातील हिंदू धर्मीय लोक आपले दैवत तेथेच ठेवून भावी संकटास, मूर्ती भंजनास, बाटाबाटीस तयार होणे अशक्यच.

यासाठी त्यानी प्रसंगाची जाणीव होताच तांबडीने श्रीमहालसादेवीसह परराज्यात पलायन केले असणारच हे उघड दिसते. पलायन करताना देवालय इमारत ते आपल्याच हातानी मोडून उध्वस्त करणार होते काय ? म्हणून त्या देवालयाची इमारत, मोठमोठ्या पाषाणी दगडी मूर्ती, मंडप, वगैरे सर्वच तेथे जागच्या जागी राहिले, म्हणजे राहणे क्रमप्राप्तच होते. सर्वावर त्यानी तिलांजली देऊन आशा सोडून गेले, कारण दुसरा उपायच नव्हता हे कोणीही जाणू शकतो.

अशा प्रकारे त्या संकटकालाच्या परिस्थितीची जाणीव केल्यानंतर स्थलांतरानंतर त्या देवीच्या कुळावी महाजनानी योजणे आणि असे करणे अपरिहार्य होते की, ज्यावरून प्रमुख दैवत श्रीमहालसादेवी परराज्यात स्थलांतर करून तेथे स्थापन करून तात्पुरते तरी संकटमुक्त झालो आहोत.

वेरणे येथील देवालयातील प्रचंड पाषाणी वजनदार मूर्ती तेथून हालविणे व लपवून नेणे अशक्य आहे. तसेच देवालयाची इमारत ते उध्वस्त करू शकत नाहीत, तेव्हा काय होईल ते होवो, जोपर्यंत त्या देवालयात असलेल्या मूर्तीवर पूजा अर्चा चालू ठेवता येईल, तोपर्यंत चालू ठेवावी व येईल त्या संकटास तोंड देणे प्राप्त आहे. असे ठरवून तसे राहणे क्रमप्राप्तच होते.

अशा विवंचनेच्या परिस्थितीत कालक्रमण करीत असताना आणि सासष्टीत जेजुइट पंथाच्या पाद्री लोकांनी खिरस्ती धर्म प्रसाराच्या कामास वेगाने चालना दिल्यामुळे त्या लोकानी वेरणे गावात येऊन

श्रीमहालसा देवस्थान संबंधात काय, कोणत्या प्रकारे दिवे लावले, याबद्दलची माहिती त्यानी त्याकाली आपल्या वरीष्ठ केंद्राकडे पोर्तुगालास गोव्याहून रिपोर्ट गुप्त पत्रद्वारा पाठविला होता, याचा शोध घेऊन, ती माहिती वाचून आणि वर दिलेल्या संभाव्य स्थलांतर कालाबद्दची परीस्थिती लक्षात घेऊन सारासारपणे विचार करता त्यातून काय अनुमान काढता येणे शक्य आहे ते पाहू.

मागे उल्लेख केलेल्या इटलीच्या रोम शहरात छापलेल्या "दोकुमेंता इंदिका" या ग्रंथाच्या, क्रमांक ७ वा भागाच्या किंवा खंडाच्या पृष्ठ ३७१ ते पृष्ठ ४०५ पर्यंत एक (दाखला) दुकूमेंत नंबर ९० प्रसिध्द झालेला असून, त्यात गोव्याहून ता. १२ डिसेंबर इसवी सन १५६७ रोजी फ्रँ. गोमीस व्हाज या जेजुइट पाद्रीने जो रिपोर्ट पोर्तुगालास पाठविला होता, तो साद्यंत सविस्तर रिपोर्ट पत्रासह जशाचा तसा, त्यात वाचावयास मिळतो.

त्या रिपोर्टात पृष्ठ ३८९ पासून पृष्ठ ३९२ पर्यंत जो मजकूर आहे, त्या मजकुरात सासष्टी प्रांतातील वेरणे गावात असलेले श्रीमहालसा देवीचे देवालय, त्या देवालयास असलेला सुंदर मंडप, त्या मंडपास असलेले अप्रतीम लाकूड कोरीव काम, देवालया सभोंवार असलेला नयनमनोहर परिसर, शोभिवंत आणि रांगेने उभी असलेली झाडे आणि शीतल छाया देणारे वृक्ष, एकंदरीत मनाला फार आल्हाद देणारी भूमी असे वर्णन केलेली माहिती त्यात असून, शिवाय, अशी अवर्णनीय भूमी अखिल पोर्तुगालात दृष्टीस पडत नाही असेही त्यात स्पष्ट आणि निसंदिग्ध शब्दात नमूद केलेले आहे.

एकंदर मजकूर पोर्तुगीज तत्कालीन भाषेत आणि जुन्या लिपीत त्या ग्रंथात आहे. तो ती भाषा आणि लिपी वाचणाऱ्यानी वाचल्याशिवाय त्या सर्व मजकुराचे महत्त्व लक्षात येणार नाही. यासाठी, तो मजकूर जशाचा तसा मुद्दाम कॉपी करून खाली दिलेला आहे. वाचकानी मुद्दाम लक्षपूर्वक तो सर्व मजकूर अगत्यपूर्वक वाचावाच, अशी आग्रहाची विनंती आहे.

त्या मजकुरातील अगदी गरजेपुरताच काही भाग घेऊन त्याचे संक्षिप्तात मराठी भाषांतर केले तर, त्यात ज्या काही घटना लक्षात येतात त्या पोर्तुगीज भाषेतील मूळ मजकुराच्या शेवटी दिल्या आहेत. मूळ पोर्तुगीज मजकूर खालील प्रमाणे आहे :-

MONUMENTA HISTORICA SOCIETATIS IESU.
DOCUMENTA INDICA. VOL. VII.

Pagina 389.

43–Mass porque este meu era tambem prolongado e crescia tanto mais a necessidade de se destruirem quanto o numero dos christaos hia sendo maior, e alem disso parecia se poderia a cousa facilmente effeituar represen-tou o Arcebispo e os nossos Padres ao Viso-Rei por algumas vezes a cousa como passava ao qual paseeo bem destruirem-sse.

Ajudou tambem muito a isto a instancia que o capitao das terras de Salcete fazia ao Viso-Rei facilitando-Ihe o negoceo e offerecendo-sse pera o executar. Assi que entendendo os Padres certa necessidade que S.A. tinha de madeira pera repairs de suaartelharia emculcaram ao Viso-Rei que em alguns pagodes principais a avia muito boa pera este ofeito, pertendendo por este meio derribaren-sse os pagodes, Pollo que o Viso-Rei escreveu huma carta aos gentios de huma aldeia principal, em que estava o pagode maior do todo Salcete a que os gentios tinham grandedevocao, dedicando a huma molher

solteira chamada Malsadevi, que adorao por deos et in eius obsequiam mantinham muitas mulheres pubricas, que moravao a par delle expostas gratis a todos os que com ellas queriam peccar, em a qual carta lhe pedia a madeira daquelle pagode; e escreveo outra ao capitao Diogo Fernandez em que lhe encommendava o negocio.

44–Pera noticia de sucesso delle me pareceo que bastava referir aqui algumas cousas de huma carta que o Pe. Luis de Gois que estaa en gloria, quando residia em huma da igrejas daquellas terras, como assima apontei, escreveo ao Pe Reitor a dominga Lactare, a qual carta dizia assi :

45–"A dominga he de alegria, he a vespora fo, alegre, assi que todos em o Senhor nos avemos de alegrar porque nos vingou de seus inimigos : equm et descesorem deieiit in mare. Ontem foio capitao desta fortaleza de Rachol ao pagode de Mardor, e eu, por ma achar presente a sua destruicao, que tantos dias havia que o desejeva. O bemto seja Deos que prometio, pera sua ruína, ter que cobicar, scilicet, madeira pera rapairos ! E pois o Senhor lhe deitou esta alcapernai dei todos os mais por derrubados. Tive maneira que primeiro que o capitao la fosse, fiz que fosse diante o Irmao com algumas pessoas pera que antes do aviso lhe tomassem a dianteira.

E assi foi que chegou o Irmao a tempo que os servidores do pagode estavao pondo suas joias aos idolos tomou-lhe a presa e os affeites e, por serem de prata, se derao ao capitao, o qual chegado, se entregou de tudo e fez enventario do movel.

Ao idolo principal, que era huma maa molher, mandei fazer em pedacos; os outros mandei levar. Ordenamos huma cruz solene no mais eminante lugar." Foi posta com algumas lagrimas de pessoas aquem pareceo fermosae desejada naquelle lugar.

Esta no meio de um tereiro lageado maior que toda a nossa horta, sobre huns degraos, e assento tao alto como dous homens lavrado e com ameias, onde estavao ma (n) gericoes.

O sitio do pagode, nao se pode melhorar; estaa no baixo da serra em hum chao grande, todo cercado e lageado com grandes lagens, e mais sayndo delle huma rua da mesma maneira ladrilhada que vay dar en huum tanque soberano e dos mayores que eu vy. A rua toda he cercada de poiaes altos com assentos e degraos e detras por ordem muitas arvores; da outra banda se faz huma ponte; acabada, estam humas grandes arbores que eingem todo o chao de sombra, e de huma banda e outra de caminha arbores em ordem. 'A entrada do paguode esta huma ermida ou lavatorio de feicam da abobada de N. Senhora de Divar, com hum portal de pedra preta.

46–Certo que nem em Portugual ateguora vy sitio tam fermoso e donde milhor possa estar huma igreja de Nossa Senhora da Conceicao.

Peco por amor de Deos a Vossa Reverencia e' a honra das chagas de Nosso Senhor Jesu Christo que faca como aqui se ordene esta casa a Nossa Senhor,

e o pratique como o Patre Provincial, e o Padre Francisco Rodrigues. e se nella me quiserem por eu a ordenarey.

A cruzficou, alevantada e emrramada com palmeyras e flores, e adorada dos christaos, e sesta-feyra no dia que foy sanctificada e consagrada polo Filho de Deos, e no luguar em que os dias passados adoravam o demonio, bento e louvado seja o Pay de Nosso Senhor Jesu Christo, Pay de todas as misericordias e consolacao. O capitao mandou cortal ramos de arvores que empediam a vista da Cruz pera consolacao dos amiguos e fies e confussao dos ymigos delle.

Deos tragua a Vossa Reverencia em sua Sancta guarda.

De Rachol oje oyto de Marco de sesenta e sete.

47-Esta he a carta do Padre Luis de Guoes.

Nam ficou desta feita o paguode totalmente destruido porque somente lhe desbaratarap os idolos e o destelharao mas tudo mais ficou em pee. Vendo, isto os principais gentios da aldea bramenes como sam boons neguoceadores e sequazes em seus tratos foram pedir dahi a algum tempo a um portugues que ouvese por qualquer via do Visco-Rey o paguode como estava com seo sitio porque como viese outro Viso-Rey, esperavao de o tornarem a reedificar e entao lho comprariam muyto bem.

48–Soube isto o capitam e loguo sem mais detenca lho foy fazer em brasa ate os fundamentos pera que perdesem as esperancas que tinham de adorar aynda nelle ao diabo.

Este foi o principio da destruicam total que este anno se fez dos pagodes que avia nas terras de S.A. porque derribando este que era principal, logo todos os outros ouverao o mesmo fim. Huns forao postos a fogo, outros a saco, outros per terra, de maneira que desde o maior ate o menor nao ficou nenhum em pe.

Os grandes erao mais de dozentos e oitenta, alguns dellee mui sumptuosos e de obras muito bem acabados. Estavao em lugares frescos e apraziveis, rodeados de muito arvoredo sombrio, com seus tanques muito fermosos e alguns de notavel grandeza, onde os gentios se hiam lavar antes e depois de fazer suas cerimonias.

Todas estas bemfeitorias a aparates tinham estes pagodes grandes nas partes de fora, porque de dentro o lugar onde esta o ydolo principal he hum ymferno pintado, estrito, baixo, escuro, federento, cujo medonho. E pera comprehender tudo em huma so palavra he em tudo proporcionado ao Loca (na) to no que mostra bem o diado quam ymigo seja da luz.

Os pagodes mais pequenos eram ynumeraveis, porque afora alguns que estavao a par destes grandes commummente as casas dos gentios principais como bramenes e outros mais honrados, tinham seu pagode defronte da porta

muito bem concertado ou de pedra ou de pao ou de arvores a que tambem adoravao, e estes com os outros grandes todos forao desbaratados.

49–O principal nesta destruicao foi Diogo Farnandes que entao era capitao de Salcete o qual alem de o alembrar muitas vezes ao Viso-Rey como zeloso da honrra de Deos com muito fervor e trabalho o pos em execucao. (Isto termina a pagina 392) ... Goa, 12 Decembris 1567

(Documento Numero 90 esta desde pagina 371 te pagina 405 do Vol. VII do Documenta Indica Edidit JOSEPH WICKI S. I.) (1566-1569)

(पोर्तुगीज भाषेतील मजकुराचे संक्षिप्तात भाषांतर)

"तत्कालीन राजवटीत पोर्तुगीज सरकारी आर्तिल्यारीय म्हणजे तोफखाना-इमारत दुरुस्ती करता आवश्यक, चांगले उत्तम मजबूत जे लाकूड पाहिजे, ते लाकूड श्रीमहालसादेवीच्या देवालयाच्या मंडपास आहे.

तो मंडप जमीनदोस्त केल्यास त्या मंडपात असलेले लाकूड सरकारी तोफखान्याच्या इमारतीस वापरण्यास मिळेल म्हणून त्या जेजुइट पंथाच्या लोकानी तत्कालीन व्हॉइसरायाच्या कानात रदबदली चालविली.

व्हॉइसरायाने हिंदुधर्मीय लोकांस पत्र पाठवून कळविले की, हिंदु धर्मीय लोक ज्या एका कुमारी श्रीमहालसादेवीस फार मोठ्या भक्तीभावाने भजतात, त्या देवीच्या देवालयाच्या मंडपाचे लांकूड सरकारास पाहिजे. शिवाय, असेच वेगळे पत्र कॅप्टन दियोगु फेर्नांदिस यास पाठविले.

संबंधित हिंदु धर्मीय लोकांस किंवा त्या देवालयाच्या व्यवस्थापकांस उल्लेखित पत्रातील मजकुराबद्दल आता काय करावे, याचा विचारही करण्यापुरती फुरसत किंवा वेळ न देता अकस्मात तो कॅप्टन आणि जेजुइट पाद्रीनी त्या देवालयात प्रवेश केला.

त्या वेळी त्या देवालयात सेवेकरी भटजी गर्भागारातील मुख्य मूर्तीवर चांदीचे दागिने घालीत असल्याचे दिसले तेव्हा व ते दागिने त्या कॅप्टनने आपल्या स्वाधीन घेऊन त्यांची यादी केली, आणि तेथे जी देवीची मुख्य मूर्ती होती, त्या मूर्तीचे त्या कॅप्टनने फोडून तुकडे तुकडे करविले.

इतर मूर्ती आपणाबरोबर नेल्या, महत्वाच्या जागेवर उत्साहपूर्वक एक क्रूज स्थापन केला. ही घटना तेथे ज्या लोकांनी प्रत्यक्ष पाहिली, त्यांच्या डोळ्यातून अश्रूधारा वाहू लागल्या. तेथील सर्व परिसर जमिनीस लादी बसविलेला होता. तेथे ठिकठिकाणी चांगल्या प्रकारे पायऱ्या बांधलेल्या होत्या. साधारण एका उंचवट्यावर तुलसीवृंदावन होते.

त्याच्या दोन्ही बाजूस दोन मनुष्याची चित्रे कोरलेली दिसत होती. सबंध प्राकाराची भूमी लादीने मढविलेली होती, व सभोंवार उंच कठडा किंवा भिंत होती.

त्यापुढे रस्ता होता. त्या रस्त्याने थेट एका प्रचंड आणि पाण्याने तुडुंब भरलेल्या विस्तीर्ण तलावाकडे जाता येई. असा उत्तम तलाव आतापर्यंत कोठेच पाहण्यात आला नाही.

सभोवार पायऱ्या आणि ठिकठिकाणी विश्रांती घेण्यासाठी बसण्याची सोय, सभोंवार छाया देणारी झाडे व्यवस्थीत रांगेत, रस्त्याच्या दोन्ही बाजूस आणि देवालयाच्या प्रवेशद्वाराजवळ उंच घुमट. मुद्दाम निश्चितपणे सांगावेसे वाटते की, पोर्तुगालमध्ये अशी उत्कृष्ट आणि सुंदर जागा पाहण्यास मिळाली नाहीच, आणि त्या तशा प्रकारच्या जागेत एखादे चर्चही !"

वरील तात्पर्यार्थ मजकूर अगदीच त्रोटकपणे आणि संक्षिप्तात येथे दिला आहे, मूळ पोर्तुगीज भाषेतील मजकूर फार विस्तृतपणे आणि फार सुंदर वर्णन त्या जागेचे करून लिहिलेला आढळतो.

या त्रोटक मजकुरावरूनच लक्षात येते की, तत्कालीन व्हाइसरायाने हिंदुधर्मीय जनतेस पत्र पाठवून श्रीमहालसादेवीच्या देवालयाच्या मंडपाचे सर्व लांकूड देण्याची मागणी केली ती आणि त्याचबरोबर रायतूरच्या किल्ल्यावर असलेला कॅप्टन दियोगु फेर्नांदिस यास वेगळे पत्र पाठवून त्या लांकडी मंडपाची कशी काय व्यवस्था करावयाची ही सूचना दिली. तो कॅप्टन आणि जेजुइट पाद्री त्या देवालयाकडे गेले, तेथे सेवेकरी भटजी प्रमुख मूर्तीस चांदीचे दागिने घालताना पाहून ते दागिने हस्तगत केले.

शिवाय त्या प्रमूख मूर्तीचे फोडून तुकडे करविले आणि इतर मूर्ती आपल्या बरोबर घेऊन तो कॅप्टन गेला. त्याने ते देवालय आणि इतर देवालयांच्या मिळून एकंदर दोनशे ऐंशी इमारती उध्वस्त केल्या, जाळल्या मोडून टाकल्या वगैरे वगैरे पुष्कळ मजकूर त्या तारीख १२ डिसेंबर १५६७ च्या पत्रात आहे.

हे पत्र किंवा रिपोर्ट जो त्या पाद्री फ्रे. गोमिस व्हाज याने पोर्तुगालास कळविला तो पोर्तुगालात आपल्या वरिष्ठास येथील घटनांची माहिती देण्यासाठी आहे व त्यात त्याला खोटी वस्तुस्थिती कळविण्याचे कारण नव्हते व तसे कळवून त्याचा काहीच फायदा नव्हता.

त्याने पत्रात किंवा रिपोर्टात लिहिलेली सर्व माहिती त्याच्या समजाप्रमाणे खरीच होती हे नाकबूल करून चालणार नाही. परंतु त्याच बरोबर खरे की, ती वस्तुस्थिती त्याने आपल्या पत्रात किंवा रिपोर्टात आढळते तिची वेगळी बाजू जी त्यास माहीत नव्हती व ती वेगळी बाजू भावनिक अदृश्य होती व ती हिंदु धर्मीय लोकांपुरतीच असल्याने त्या पत्र लेखकास कळणे शक्य नव्हते. म्हणून वरवर पाहणारास तो मजकूर खरा किंवा खोटा याबद्दल शंका उपस्थित होणे साहजिक आहे. पण, समंजसपणे, बारकाईने, अभ्यासू दृष्टीने एकंदर परिस्थितीचा समतोलपणे विचार केला तर त्यात काय अनुमान काढता येते ते पाहू.

वेरणे येथून श्रीमहालसादेवीचे स्थलांतर बाटाबाटीच्या भयाने फोंडा तालुक्याच्या प्रियोळ गावात झाले आहे यात शंका नाही. कारण, ते स्पष्ट दिसतेच आहे. पण, हे स्थलांतर नक्की कोणत्या साली, कोणत्या दिवशी, कोणत्या महिन्यात झाले हे जरी तशा बळकट दाखल्या पुराव्यासह आज स्पष्टपणे सांगणे शक्य नसले, तरी ते स्थलांतर इ. सन १५६७ साल उजाडेपर्यंत झाले नाही असे मानणारा किंवा गृहीत धरणारा इसम चुकूनही सांपडेल असे खचित वाटत नाही.

आणि त्याचे स्पष्ट, उघड कारण म्हणजे ता. १ मे १५६० दिवशी जेजुइट पंथाच्या पाद्रीस ते कुठ्ठाळ गावच्या देवालयाचे इमारतीत शिरल्यानंतर त्यास त्या इमारतीत देव नसल्याचे आढळले व देव त्यापूर्वी परकी राज्यात त्या देवाच्या कुळाव्यानी सुरक्षितपणे पळवून नेला हे मागे सांगून झाले आहे.

आणि ही बातमी शेजारी, जवळच असलेल्या वेरणे गावात समजल्यानंतर त्या गावचे लोक तेथील श्रीमहालसादेवीचे कुळावी त्या देवीचे स्थलांतर तातडीने केल्याशिवाय सात वर्षे झोंपा काढीत बेफिकीरपणे राहिले असावे असे मानणे अविचारीपणाचे आहे.

त्याचप्रमाणे स्थलांतर करताना वेरणेस जशाची तशी त्या देवालयाची इमारत, मंडप, व त्या देवालयात असलेल्या नानाविध मूर्ती पाषाणी, वजनाने जड असल्याने त्या व इतर सर्व तेथेच राहिले आणि या अशा स्थितीत जेजुइट पंथाच्या पाद्री लोकांस व कॅप्टन दियोगु फेर्नांदिस, ते सर्व ज्यावेळी वेरणेस पोचले, त्यावेळी जे त्यांच्या हातात सांपडले त्या इमारतीची, मंडपाची, मूर्तीची नासाडी करून आपल्या मनात समाधान मानले हे उघड आहे.

ज्या दैवतांची म्हणजे प्रमुख दैवताची मूर्ती पाषाणी फार जड वजनाची घेऊन पळवाटेने तांतडीने स्थलांतर करणे अशक्य वाटे त्यावेळी ते भाविक श्रध्दावान लोक आपल्या पवित्र दैवताच्या मूर्ती-परधर्मी

यांच्या हातात पडू नये म्हणून आक्रांताने प्रसंग ओळखून ती मूर्ती तांतडीने पाण्यात विसर्जन करण्यासाठी विहीर, तलाव, नदी, नाला अशा ठिकाणी टाकीत असत, अशी उदाहरणे पुष्कळ पुराव्यासह आढळतात.

श्रीमहालसादेवीचे देवालय व मंडप उध्वस्त केला, मूर्ती फोडून टाकली, इतर मूर्ती बरोबर नेल्या ही जी माहिती फ्रे. ग्रोमिस व्हाज याच्या ता. १२ डिसेंबर १५६७ च्या पत्रात आढळते, ती पत्रलेखकाच्या समजुती-प्रमाणे खरीच आहे.

पण वेरणे येथील श्रीमहालसादेवीची मूर्ती किंवा श्रीदेवीचे प्रतिक त्या पूर्वीच्या कालात फोंडा तालु-क्याच्या प्रियोळ गावात स्थलांतर करून पळविली असल्याने कॅप्टन दियोग फेर्नांदिस याने जी मूर्ती फोडून टाकली, ती मूर्ती श्रीमहालसादेवीची खचितच नव्हे.

पण ती मूर्ती श्रीमहालसादेवीची आहे असा त्या कॅप्टनचा समज झाला असणे शक्य आहे. शिवाय, त्या मूर्तीस चांदीचे दागिने सेवेकरी भटजी घालीत होता असा त्या पत्रात मजकूर आहे. श्रीमहालसादेवीचे ऐश्वर्य, संपत्ती, भांडार यांची माहिती असलेला इसम त्या मुख्य दैवताच्या मूर्तीस सोन्या ऐवजी चांदीचे दागिने सेवेकरी भटजी घालीत होता हे वाचल्यावर ती मूर्ती खचित प्रमुख दैवत श्रीमहालसादेवीची नव्हेच असे मानल्याशिवाय राहील काय ?

यावरून ती मूर्ती श्रीमहालसादेवीची खचितच नव्हे हे स्पष्ट दिसतेच. श्रीमहालसादेवीचे स्थलांतर कॅप्टन दियोग फेर्नांदिस आणि जेजुइट पाद्री त्या देवालयाकडे पोचण्यापूर्वी बराच काल त्या देवीचे स्थलांतर प्रत्यक्षात झालेच असल्याने, मागाहून तेथे राहिलेल्या मूर्ती पाषाणी, इमारत वगैरेची नासधूस त्यानी केली हे सारासार विचार करणारास सांगण्याची गरज नाही.

त्या महान् संकट कालात प्राणाची पर्वा न करता सर्वावर कायमची तिलांजली देऊन आमच्या पुण्य-पुरुष पूर्वजानी स्वार्थत्याग करून आपआपली कुलदैवते बाटाबाटीपासून वाचवून रात्रीच्या काळोख्या अंधारात रानावनातून मार्ग काढीत धावत पळत ती परराज्यात सुरक्षितपणे पोचविण्याचे आणि त्या जागी पुनर्स्थापना करण्याचे दिव्य केले म्हणूनच आम्ही, त्यांचे आजच्या कालातील वंशज त्या कुल-दैवतांस भजण्याचे भाग्य उपभोगित आहोत. असो.

यापुढे आता सध्याच्या जागी म्हणजे प्रियोळ गावात म्हाडडोळ वाड्यावर श्रीमहालसादेवीचे स्थलांतर झाल्यानंतर त्या जागेवर आता देवालयाची इमारत आहे ती इमारत मूळ स्थापना कालापासून आजच्या कालापर्यंत, म्हणजे अंदाजे ४२३ वर्षाच्या अवधीत किती वेळा जीर्णोध्दार करून नवी केली, याबद्दल माहिती उपलब्ध नाही.

मात्र सध्याच्या कालात श्रीमहालसेचे देवालय ज्या पध्दतीचे दिसते, त्याचा जीर्णोध्दार किंवा त्या देवालयाचे छप्पर ताम्रपत्र्यानी उत्तम प्रकारे मढविलेले असून तशा प्रकारचे छप्पर असलेले अखिल गोमंतकात ते एकमेव देवालय आहे. ते छप्पर ताम्रपत्र्याचे केव्हा केले गेले, याची संपूर्ण माहिती असलेला ताम्रपट त्याच देवालयात शिरताच आपल्या उजव्या बाजूस गतकालात दिसत होता.

पण, हल्लीच्या बऱ्याच वर्षापासून त्या जागी किंवा त्या देवालयात दुसऱ्या कोणत्याच जागी तो ताम्र-पट दिसत नाही ! बहुधा त्या देवालयाच्या आतल्या बाजूच्या भिंतीस ऑईल पेंट रंगाचे किंवा इतर काम करताना तो ताम्रपट भिंतीपासून सुटला असणेही शक्य आहे.

पण ते काम पूर्ण झाल्यावरही तो जागच्या जागी परत बसविण्याची आठवण राहिली नसल्यामुळे तो ताम्रपट सध्याच्या कालात तरी तेथे दिसत नाही. त्या ताम्रपटावर तांब्याच्या छप्परासंबंधी काय मजकूर आहे हे जिज्ञासूस कळावे म्हणून प्रयत्नपूर्वक शोध घेऊन त्याची कॉपी एका ६६ वर्षापूर्वीच्या लिखाणात असलेली मिळवून ती जशाची तशी खाली दिलेली आहे :—

"श्रीमहालसा विजयते

श्रीः ॥ गो नागाद्रि विधू १७८९ न्मित शाके प्रभवाख्यवत्सरे राधे ॥

श्रीमन्महालसायाः प्रासादः प्राक्तनो विशीर्णोऽभूत् ॥१॥

सच ताम्रमयैः पट्टैः संघटय दृढो विनिर्मितो नूलः ॥

महतो लब्धेन जनादद्रवेण महाजनै स्तुषादिव्याः ॥२॥ श्रीः ॥६॥

श्रीमहालसादेवीच्या पुरातन प्रासादाचा जीर्णोध्दार. ताम्रपट घालून गोमंतकस्थ व कर्नाटकस्थ महाजनानी द्रव्य उत्पन्न करून शके १७८९ प्रभव संवत्सरी वैशाख मासी संपूर्ण केला."

या वरून या देवालयाचे लांकडी व कौलांचे पूर्वीचे छप्पर काढून टाकून गोमंतक आणि कर्नाटक येथील या देवीच्या भक्तानी नवे, तांब्याचे छप्पर घातले आहे, या घटनेस ११६ वर्षांचा काल उलटला असून ते तांब्याचे छप्पर आज पाहिल्यास ते ताजे नवेच केलेले असे दिसते.

सध्या ज्या जागी श्रीमहालसादेवीचे देवालय आहे त्या जागेसह सभोवतालचा सबंध वाडा त्या देवीच्या मालकी हक्काचा कसा, केव्हा आणि कोणत्या कारणाने झाला ?

श्री. रामचंद्र बाबा मल्हार उर्फ रामचंद्र बाबा शेणवई सुखटणकर हे आपल्या कर्तबगारीने पेशव्यांचे कारभारात एक हुशार मुत्सद्दी म्हणून नाव मिळविलेले प्रमूख असून, त्या वेळच्या राजकीय घडामोडी बऱ्याचश्या श्री. रामचंद्रबाबांचे मसलतीने चाललेल्या होत्या.

आपल्या कर्तबगारीने चढता चढता पेशव्यांचे दरबारी यांचे वजन फार वाढले. प्रसिध्द शिंदेशाहीचे मूळ उत्पादक हेच होत. यांची लेखणी व तलवार सारख्याच कुशलतेने चालत होती. त्यांच्या योग्यतेमुळे थोरले बाजीराव यानी त्यांस राणोजी शिंद्यांचा दिवाण नेमले.

पुढे राणोजी वारल्यावर जयाप्पा शिंदे याच्याही कारकिर्दीत आपण दिवाणगिरीचे काम करावे अशी त्यांची इच्छा होती. परंतु मल्हारराव होळकर आडवे आल्यामुळे हा त्यांचा हेतु सफल झाला नाही व ते पूर्ववत पेशव्यांचे दरबारी कामकाज पाहू लागले. तेथे त्यानी लेखणीची करामत दाखवून व तलवार गाजवून मोठा लौकिक संपादिला.

अशी मोठी योग्यता व वैभव संपादून रामचंद्रबाबा गोमंतकात आले. श्री. रामचंद्र बाबांचे कुलदैवत कवळे येथील श्रीशांतादुर्गा, त्यांच्या आजोळचे दैवत प्रियोळचा श्रीमंगेशदेव, आणि पालवीदेवी म्हाडूळची श्रीमहालसा. या तीनही दैवतांची आपल्याकडून चिरस्मरणीय अशी सेवा घडावी या सद्हेतूने श्री. रामचंद्र बाबांनी पेशवे सरकारातून या तीनही देवस्थानास एक सनद देवविली आणि त्या सनदेने कवळे गाव श्रीशांतादुर्गादेवीस, मौजे प्रियोळ येथील एक वाडा श्रीमहालसादेवीस, व एक वाडा श्रीमंगेश देवास व नगदी महाल मजकुरी अडीचशे रुपये इनाम संपादून घेऊन सनद बहाल केली. या सनदेची नक्कल खालील प्रमाणे आहे :–

"राजश्री रामचंद्र मल्हार यांचे कुलदेवांची देवालये अंत्रुज प्रांती आहेत. तेथील उर्जेस तेल व फुले आणि द्रव्ये पाहिजेत. त्यास खर्चाबद्दल, रफायत पन्हा सदाशिव नाईक, इमडी राजे सोंदे यांजकडून कवळ ग्राम श्रीशांतादुर्गादेवीस व मौजे प्रियोळ येथील श्रीम्हाळसादेवीस एक वाडा व श्रीमंगेशदेवास एक वाडा व नगदी महाल मजकुरी अडीचशे रुपये इनाम संपादून घेऊन सनदी हांसल केल्या आहेत. त्याप्रमाणे आम्ही ती इनामे करार करून सरकारची पत्रे दिली आहेत. अशास गाव व वाडा मजकूराची कमाविशी करून कमाविसदार जातील अशास, इजलाल पन्हांसी आमचा संकल्प की, सदरहू गाव, वाडे, देवालये व कमाविसदार यांस इजलाल पन्हाकडून काहीच तसोसी होऊ नये. सोंदे संस्थानी

व इजलाल पन्हामध्ये विभक्तता पडली आहे, तेव्हा इजलाल पन्हाकडील इसम यास आज्ञा केली पाहिजे की, सदरहू गाव, वाडे, देवालये व कमाविसदार यांच काहीच उपसर्ग करू नये. सोंदे संस्थान याशी पाहिजे तसे वर्तावे, परंतु, यात दिकत असू नये. श्रीसप्तकोटेश्वर क्षेत्र नारवें हे पुरातन पासून संरक्षिले आहे. इजलाल पन्हा अगोदरचा विसरें यानी डिचोली महाल व किल्ला काबीज केला. ते समयी गाव फरारी झाल्यामुळे देवालय खाली आले. तेव्हा गावाहून श्रीस्थळ काढिले अशास गाव मजकूर श्रीक्षेत्रास पूर्वीच इनाम देऊन आम्हाकडून सरकारात पत्र सादर झालेच आहे. प्रस्तुत श्रीक्षेत्राची उर्जा चालणेच्या खर्चाबद्दल सदरहू गावचे इनामपत्र इजलाल पन्हानी रवाना केले पाहिजे. रवाना छ. १८ माहे शाबान (११ माहे जून) जादा काय लिहावे हे किताबत्."

राजा
शाहू नरपति
हर्षनिधान बाळाजी
बाजीराव प्रधान

(वरील पत्र तत्कालीन गोव्याचे व्हिसी रें द इंदिय याना ता. ११ जून १७५४ रोजी मिळाले असल्याचे ऐतिहासिक कागदपत्रावरून कळते.)

वर नक्कल करून दिलेली सनद इ. स. १७५४ साली पोर्तुगीज राजवटीतील गोव्याचे तत्कालीन व्हॉईसराय याना मिळाली असली, तरी प्रियोळ गावच्या वाड्यावर श्रीमहालसादेवीचे देवालय त्या सनदेपूर्वी निदान एकशे नव्वद वर्षापेक्षा जास्त काल खचित होते. कारण, ज्या काली श्रीमहालसादेवीचे स्थलांतर सासष्टी प्रांताच्या वेरणे गावातून अंत्रूज महालात (आज फोंडा तालुका) प्रियोळ गावी झाले, त्या कालात अंत्रूज महाल पोर्तुगीज राज्यसत्तेबाहेर होता आणि तो आदिलशाहीच्या राज्य सत्तेखाली असून अंत्रूज महालात असलेले तत्कालीन सत्ताधारी हिंदू सरदार होते.

वेरणे गावात श्रीमहालसा देवस्थान असताना तेथे कोणती दैवते होती?

गोवा सरकारच्या पुरातत्व खात्यात असलेल्या पोर्तुगीज कालीन ऐतिहासिक दप्तरात, गोव्याच्या ख्रिस्तीकरण आणि बाटाबाटीच्या कालात जेजुइट पंथाच्या पाद्रींनी उध्वस्त केलेल्या सासष्टीतील देवालयाची जी माहिती मिळते, त्यात वेरणे गावात त्या काळी असलेल्या दैवताचा उल्लेख आहे. ती दैवते खालील प्रमाणे :–

सांतेरी – श्रीमहालसादेवी – नारायण – भगवती – ग्रामपुरुष – वेरणादेवी आणि लंबेस्वर.

ही दैवते आणि त्यांची देवालये ज्या वाड्यावर होती, त्या वाड्यास म्हाडदोळ असे म्हणत. आजच्या कालात त्याच वाड्यास जुनें म्हाडदोळ असे म्हणतात.

अंत्रूज महालात फोंडा तालुक्याच्या प्रियोळ गावात ज्या वाड्यावर सध्याच्या कालात आपण श्रीमहालसा देवस्थान पाहतो, त्या वाड्यास म्हाडदोळ अशा नावाने संबोधू लागले. म्हणजे जे नाव वेरणे येथे प्राचीन काली तेथे श्रीमहालसा देवस्थान असताना त्या वाड्यास म्हाडदोळ असे म्हणत, तेच नाव श्रीमहालसादेवीची स्थापना प्रियोळ गावात झाल्यापासूनच्या नंतर त्या वाड्यास म्हाडदोळ म्हणू लागले.

पण, कालांतराने त्या वाड्यासह सभोवारच्या परिसराचा एक वेगळा गावच म्हाडूडोळ नावाने निर्माण झाला असून फार मोठी रहदारी आणि उद्योग, व्यापार बाजाराची उलाढाल सुरू झाल्यामुळे तेथे पोष्ट, तार, टेलिफोन, पोलीसस्टेशन, बँक, सरकारी प्राथमिक शाळा, फार्मसी वगैरेची सोय झाली आणि ती सर्व म्हाडूडोळ गावची म्हणून ओळखतात. या गावात फुलांची विक्री सदा सर्वकाल होत असते. येथूनच गोमंतकात धार्मिक उत्सवासाठी फुले नेली जातात.

सध्याच्या कालात प्रियोळ म्हाड्डोळ येथे असलेल्या श्रीमहालसा देवस्थानात अधिष्ठीत सपरिवार दैवते जी आहेत ती अशी :-

गर्भागारात मुख्य स्थानी श्रीमहालसादेवीची चतुर्भुज शालिग्राम शिलेची मूर्ती असून त्या मूर्तीच्या उजव्या वरच्या हातात त्रिशूल, उजव्या खालच्या हातात केसाना धरून एका असुराचे कलेवर आणि तलवार आहे. मूर्तीच्या डाव्या वरच्या हातात अमृतपात्र असून डाव्या खालच्या हातात सुधा प्राप्तीसाठी वेषांतर केलेल्या असुराचे शीर त्यातून गळणाऱ्या रुधिराचे प्राशन करण्यासाठी त्या बाजूने आलेला वाघ आहे.

श्रीमहालसादेवीने आपल्या दोन्ही पायाखाली चिरडलेला राहूचा सबंध देह दिसत आहे. श्रीमहालसादेवीच्या अंगावर यज्ञोपवीत आहे हे विशेष ! अंगावर यज्ञोपवीत धारण केलेली ही गोमंतकात एकमेव देवी असून ही मूर्ती सुमनोहर अशी आहे. प्रारंभी येथे मूळ स्थापना काळी या श्रीमहालसादेवीने गर्भागारात मूर्ती प्रतिष्ठापना करण्याचे वेळी आपला जाज्वल्य साक्षात्कार दाखविल्याची आख्यायिका परंपरेने मुखोद्गत होऊन आताच्या पिढीपर्यंत सांगतात.

मूळ प्रारंभी मूर्ती प्रतिष्ठापना करण्याचे प्रसंगी श्रीदेवीने आयोजकांच्या स्वप्नात येऊन दृष्टांत दिला आणि सांगितले की, तुम्हास एकाच वेळी तीन मूर्ती उपलब्ध होतील. त्यातील ज्या मूर्तीत माझा प्रवेश होईल तीच मूर्ती मुख्यासनावर अधिष्ठित करा. श्रीची आज्ञा पालनासाठी कोणत्या मूर्तीची निवड करावयाची हा विचार करून उपलब्ध झालेल्या तीन मूर्तीपैकी एक मूर्ती निवडून तिची प्रतिष्ठापना करण्याचे योजिले असता, परत स्वप्नाद्वारे दृष्टांत झाला की, ती निवडलेली मूर्ती आपणास मान्य नाही.

या दृष्टांतामुळे तो बेत रद्द होऊन दुसऱ्या मूर्तीची योजना झाली. परत स्वप्नात दृष्टांत होऊन योजलेली निवड आपणास मान्य नाही. यासाठी जी तिसरी मूर्ती आहे त्या मूर्तीचीच मुख्यासनावर प्रतिष्ठापना करा अशी आज्ञा झाली व तीच मूर्ती यज्ञयागादि विधीपूर्वक आज गर्भागारात मुख्यासनावर अधिष्ठित विराजमान असून ती अंदाजे ४२० वर्षे आपला साक्षात्कार प्रभावितपणे भक्तजनास दाखवित आहे.

या मूर्तीखाली जे पाषाणी उच्चासन मूळ स्थापना काली रचिले होते ते उच्चासन किंवा पिंडिका कालांतराने जीर्णोध्दार करण्याच्या परिस्थितीत पोचल्यामुळे श्रीमहालसादेवीची निरोपआज्ञा प्रसादरूपाने मिळाल्यानंतर नवीन उच्चासन किंवा पिंडिका विधीयुक्त संस्कार करून योग्य प्रकारे जागच्या जागी बसविण्यात आली.

हा पिंडिका जीर्णोध्दार समारंभ श्रीशके १८८१ विकारी नाम संवत्सर वैशाख शुक्ल तृतीया (अक्षय तृतीया) रविवार ता. १० मे १९५९ या दिवशी शुभ मुहूर्तावर झाला. या शिवाय, श्रीशांतादुर्गा, श्रीलक्ष्मीनारायण, श्रीगणपती, श्रीरामपुरुष, श्रीभगवती, श्रीसोनाळ भैरव तसेच, श्रीम्हालपुरुष, श्रीगणपती, श्रीसहस्त्रपाळ, श्रीसंकष्टी, श्रीचतुःषष्ठी, श्रीकालभैरव, श्रीदाडक्षेत्रपाळ, श्रीमल्हाळ आणि श्रीसिंहपुरुष अशी दैवते आहेत.

या सर्व दैवतांची, सध्याच्या कालात, खालील प्रमाणे प्रतिष्ठापना, त्या त्या जागांवर केलेली आढळते.

गर्भागारात उच्च मुख्यासनावर प्रमुख दैवत श्रीमहालसादेवी आणि तिच्या आसनाजवळच खाली श्रीम्हाळ पुरुष (श्रीम्हालपुरुष) आहे. गर्भागाराच्या भिंतीस बाहेरच्या बाजूस दरवाज्याच्या उजवीकडे श्रीगणपती, डावीकडे श्रीसंकष्टी म्हणजे संकष्टनाशिनी आहे. श्रीगणपती समोरच्या भिंतीस एका कुर्कुटात श्रीसहस्त्रपाल लिंगरूपात आहे.

श्रीमहालसादेवीच्या देवालयाच्या पाठीमागे दुसरे वेगळे मंदिर उजव्या बाजूस श्रीसांतेरीदेवीचे देवालय असून त्याच्या गर्भागारात उजवीकडे श्रीलक्ष्मीनारायण आणि त्याच्या डावीकडे श्रीसांतेरीदेवी आहे. हीच त्या

मंदिरातील प्रमूख दैवता आहे. या गर्भागाराच्या भिंतीस, बाहेरच्या बाजूस दरवाजाच्या उजवीकडे श्रीगणपतीची स्थापना आहे.

श्रीसांतेरी देवालयाच्या डाव्या बाजूस आणखी एक देवालय असून, त्या देवालयात रांगेने गर्भागारे आहेत. पहिल्या गर्भागारात श्रीरामपुरुष, दुसऱ्या गर्भागारात श्रीभगवती आणि बाहेरच्या बाजूस श्रीसोनाळ-भैरव किंवा श्रीसंहारभैरव आहे. तिसरे गर्भागार यज्ञयाग मंडपाचे असून त्यात होमहवनादी यज्ञ कर्मकृत्ये संपादिली जातात. चवथे गर्भागारामध्ये श्रीचतुःषष्ठी आहे. पांचवे गर्भागारामध्ये श्रीकालभैरव असून सहावे गर्भागार श्रीदाड दैवताचे आहे.

याच गर्भागारात श्रीदाड दैवताच्या उजव्या बाजूकडे मागच्या भिंतीस एका कुर्कुटात श्रीमल्हार दैवताची दैनंदिन पूजा अर्चेसाठी स्थान निश्चित केलेले आहे. कारण, प्रत्यक्षात श्रीमल्हार दैवताची स्थापना श्रीमहालसादेवीच्या देवालयापासून बऱ्याच लांब अंतरावर एका डोंगर उंचवट्यावरील खास वेगळ्या देवालयात असल्यामुळे, त्या जागेवर दररोज देवस्थानाचे पुजारी नियमितपणे जाणे अडचणीचे आहे. यासाठी ही व्यवस्था केलेली आहे.

श्रीसांतेरीदेवीचे देवालय आणि इतर वर उल्लेखित दैवतांच्या गर्भागारामागे विस्तीर्ण तलाव दगडी बांधणीचा आहे. या तलावाच्या पायऱ्या सुरू होण्यापूर्वी त्या तलावाच्या काठावर दोन बाजूस दोन अश्वत्थ वृक्ष (पिंपळ) असून त्या प्रत्येकास व्यवस्थितपणे पारदगडी बांधणीचे आहेत. आणि प्रत्येक पिंपळाच्या मूळाशेजारी एक लहान टुमदार देवळी बांधलेली आहे.

तलावाकडे जाताना उजव्या बाजूस असलेल्या पिंपळाकडील देवळीत दोन नाग पाषाण दगडाचे आहेत. पैकी एक नाग खाली आणि त्याच्या उर्ध्व भागी दुसरा नाग अशी ती रचना आहे.

डावीकडील पिंपळवृक्षाच्या मुळाशी असलेल्या देवळीत श्रीमहालसादेवीची मूर्ती आहे. श्रीमहालसा देव-स्थान स्थापना काली, श्रीमहालसादेवीच्या तीन मूर्ती उपलब्ध एकाच वेळी झाल्या असल्याने त्यातील कोणती मूर्ती गर्भागारात मुख्यासनावर सुप्रतिष्ठापना करून विराजमान व्हावयाची हे त्या देवीच्या दृष्टांताने ठरल्यामुळे, राहिलेल्या दोन मूर्तींची व्यवस्था दोन वेगवेगळ्या ठिकाणी झाली.

त्यापैकी एक मूर्ती श्रीमहालसादेवीच्या गर्भागारा बाहेरच्या बाजूस त्याच भिंतीस डावीकडे श्रीसंकष्टी नावाने व दुसरी मूर्ती तलावाच्या काठावर अश्वत्थ वृक्षाच्या मुळाकडे देवळीत आहे ती ही; देवालयाच्या प्राकाराबाहेर जाताना वाटेवर पिंपळाकडे सहपुरुष किंवा सिंहपुरुष नावाने लिंगरूपात कौशिक गोत्री यांचा पुरुष आहे.

श्रीमहालसादेवीस दैनंदिन नित्य नैमित्तिक शृन्गार पूजा विशिष्ट रूपांत.

सकाळी निर्माल्य विसर्जन झाल्यानंतर महाभिषेकादि कृत्ये पूर्ण होताच श्रीमहालसादेवीस कुमारिका वेषशृंगार केला जातो. दुपारी महापूजेचे वेळी नानाविध अलंकारासह तरुणी स्त्री वेषशृंगार करतात. प्रति एकादशीस पंढरपूर क्षेत्रात असलेल्या श्रीपांडुरंग-विठोबाचे दर्शन कटेवर हात ठेवल्याप्रमाणे होत असते. आश्विन महिन्यात पंचांगात मूळ नक्षत्र ज्या दिवशी येते, त्या दिवशी पंचामृतासह एकशे आठ कोवळ्या नारळाच्या (आडसराच्या) पाण्याने अभिषेक करून श्रीव्यंकटेशरूपाने दर्शन तसा शृंगार करून भक्तगणास तल्लीन करतात.

भाद्रपद महिन्यात श्रीअनंतचतुर्दशी दिवशी शेषशयनाप्रमाणे पूजा बांधतात. देवस्थानच्या देवकृत्यांच्या यादीत नमूद केल्याप्रमाणे इच्छुक भाविकानी देवस्थानच्या व्यवस्थापक कमिटीकडे आगाऊ खर्चाचे पैसे भरल्यास श्रीव्यंकटरमण, श्रीमुरलीधर, श्रीबालकृष्ण, श्रीशारदा (श्रीलक्ष्मी), श्रीरामचंद्र, श्रीकालियामर्दन असे दर्शन घडविणारे शृंगारवेष पेहराव करण्याची पध्दती आणि व्यवस्था देवस्थानात आहे.

शिबिकोत्सव किंवा पालखी उत्सव.

प्रत्येक आठवड्याच्या रविवारी श्रीमहालसादेवीची पालखीतून मिरवणूक निघत असते, आणि त्या मिरवणुकीत दहा पेणी म्हणजे मुक्काम ठराविक ठिकाणी होतात. त्याच प्रमाणे श्रीसांतेरी किंवा श्रीशांता-दुर्गादेवीची पालखी मिरवणूक प्रत्येक महिन्याच्या शुक्ल आणि कृष्ण पक्षाच्या पंचमी तिथी रोजी होत असते. आणि या मिरवणुकीत तेरा पेणी (मुक्काम) ठराविक ठिकाणी होत असतात.

प्रसाद - कौल

इतर देवस्थानात असलेल्या पध्दतीप्रमाणे याही देवस्थानात प्रसाद-कौल घेण्याची पध्दत आहे. प्रसाद-कौल घेणे हा विषय ज्याच्या त्याच्या श्रध्देचा आहे. श्रीमहालसादेवीस प्रसाद पूजा लावताना ती तुळसीच्या झाडाची मंजिरीची (तुळशी कणसांची) लावली जाते. त्या तुळसी मंजिरी एकंदर ६४ ठिकाणी लावतात.

ही प्रसाद पूजा फक्त पहाटेचे वेळी ४ ते ६ पर्यंतच लावतात, नंतर लावण्याची पध्दत नाही.

श्रीदाड दैवतास प्रसाद पूजा लावतात. पण, ती तांबड्या रंगाच्या पोटकळीच्या फुलांची आणि कळ्यांची लावतात.

श्रीभगवतीदेवीस किंवा श्रीग्रामपुरुषास प्रसाद पूजा लावतात ती करमली झाडाच्या पानाचे तुकडे करून लावतात.

श्रीमहालसादेवीकडे प्रसाद – कौल कोणत्या वारी, कोणत्या तिथीस, घेण्याची वहिवाट नाही?

रविवार-मंगळवार-शुक्रवार.
प्रत्येक महिन्याची शु. ११ शी, शु. १२ शी, कृ. ११ शी, कृ. १२ शी.
आश्विन शु. प्रतिपदेपासून आश्विन कृ. पंचमीपर्यंत.
कार्तिक पौर्णिमा, कृ. प्रतिपदा, कृ. द्वितीया.
माघ कृ. प्रतिपदा ते माघ कृ. दशमी पर्यंत.
फाल्गुन शु. नवमीपासून ते फाल्गुन कृ. षष्ठी पर्यंत.
कर्क संक्रांतीचा दिवस (आषाढ महिन्यातील) आणि मकर संक्रांतीचा दिवस (पौष महिन्यातील).
याशिवाय, चंद्रग्रहण किंवा सूर्यग्रहण येईल तो दिवस.

देवस्थानचे आद्य संस्थापक कुळावी महाजन

श्रीमहालसादेवीचे कौशिक, अत्रि, भारद्वाज, कौत्स आणि गार्ग्य असे पाच गोत्रांचे गौड सारस्वत ब्राम्हण खालीलप्रमाणे उपनावाचे कुळावी महाजन आहेत.

पई- केणी- कामत- शेणवी- नेवरेकर- काकोडे-काणे- कीर- कोटणीस वैद्य- कुचेलकर- रायतूरकर- नोपकर- वेर्णेकर- जांबोडकर.

प्रियोळ येथील श्रीमंगेशदेवाच्या महाजनापैकी शिंगण दळवी, बरम्हे, नेत्रावळकर, नाईक हिंगटे, सत्यवंत भांडारी, दळवी, कैसरे, भेंडे या उपनावाच्या कुळावी महाजनांची पालवीदेवी श्रीमहालसादेवी आहे.

बांदिवडे येथील श्रीरामनाथदेवाच्या महाजनापैकी कुळावी महाजनाची पालवीदेवी श्रीमहालसादेवी आहे.

कवळें येथील श्रीशांतादुर्गादेवीच्या महाजनांपैकी सुखठाणकर, घांटकर, कुंवेलकर, कारापूरकर, रामाणी, रामायणी, देसाई, साखरदांडे, कुळकर्णी, नारिंगरेकर, कानविंदे, सवनी, सांहनी, मुंग्रे या उपनावाच्या कुळावी महाजनाची पालवीदेवी, श्रीमहालसादेवी आहे.

वरील पालवी महाजनाशिवाय, सर्व अन्य ज्ञाती समाजाचे लोक या श्रीमहालसादेवीस भजतात.

श्रीमहालसादेवीचे कुळावी महाजन माध्वसांप्रदायी आणि श्रीसंस्थान गोकर्ण पर्तगाळी जीवोत्तम मठाचे अनुयायी गौंड सारस्वत ब्राम्हण असून, या देवस्थानात माध्व सांप्रदाय बराच कडक रीतीने पाळण्यात येतो.

देवस्थानात विशेष प्रमुख उत्सव 'म्हाड्डोळची जत्रा' नावाने सुप्रसिद्ध, आणि इतर वार्षिक उत्सव

या देवस्थानात विशेष प्रमुख उत्सव म्हणजे माघ शु. षष्ठी पासून सुरू होऊन माघ वद्य १० मी पर्यंत सतत असतो. आणि या उत्सवाची सांगता श्रीमहालसादेवीच्या विजयरथोत्सवाने होते. हा उत्सव सर्व गोमंतक प्रांतभर सुप्रीसध्द असून या उत्सवाची "म्हाड्डोळची जत्रा" या नावाने ख्याती आहे.

जुन्या कालात विशेषतः अंत्रुज प्रांतातील जनता याच जत्रेत वर्षाचा पुरवठा करीत असे आणि त्या काली लोकांची सांपत्तिक स्थिती समाधानकारक असल्यामुळे या जत्रेच्या ठिकाणी नानाविध प्रकारच्या हजारो घडामोडी होत असत.

निरनिराळ्या मालाची मोठमोठी दुकाने दूरवरचे व्यापारी मुद्दाम येथे येऊन लावीत असत. त्यात रेशमी जरी वस्त्रे, पितांबर, शालू, वगैरे उंची कपड्यासह वस्त्रभांडार, तांबे, पितळ, जर्मन सिल्व्हर वगैरे धातूची लहान मोठी भांडी, चांदी, सोने, मोती वगैरेच्या दागदागिन्याची दुकाने, भूसारी मालाची दुकाने, लांकडी रंगी सामानाच्या वस्तू, मीठ, तंबाखू वगैरेचे व्यापारी, सुपारी, काजूबिया इतकेच नव्हे तर संसारोपयोगी सर्व गरजेचा माल त्या जत्रेत विक्रीसाठी येत असे आणि अशा प्रकारे एक व्यापारी केंद्रच म्हणाना. साधारणपणे तीन महिने तरी त्या ठिकाणी मोठी व्यापारी उलाढाल होई. सध्याच्या कालात या जत्रेचे ते स्वरूप पार बदलून गेले असून व्यापारी उलाढालीच्या दृष्टीने तितके महत्व राहिलेले नाही.

देवस्थानात वार्षिक महत्वाचे उत्सव :

चैत्र :

शु. १ दा नूतन पंचांग श्रवण, शतकलशार्चन.
शु. ९ मी श्रीरामपूजा व बाहेर चौकावर श्रीराम जन्मोत्सव.

वैशाख :

शु. ३ या पुनःप्रतिष्ठादिन, शतकलशार्चन, ब्राह्मण संतर्पण, रात्रौ विजयरथोत्सव.
पौर्णिमा : श्रीसांतेरी व श्रीमहालसा पालखी उत्सव, वनात गमन आणि परतल्यावर वसंतपूजा.

श्रावण :

१ ला रविवार पालखी व रंगपूजा.
वद्य ८ मी श्रीबालकृष्ण अलंकारपूजा, रात्रौ खास अभिषेक.
४ था रविवार रंगपूजा व पालखी उत्सव.

आश्विन :

शु. १ दा ते ९ मी पर्यंत नवरात्र, घटस्थापना, रोज रात्रौ मखरोत्सव, कीर्तन, श्रीचौसष्टीकडे हवन.
बहुधा शु. षष्ठीस 'ज्ञानदीप प्रज्वलन' मूळ नक्षत्र दिनी १०८ शहाळ्यांच्या पाण्याचा कुळकाभिषेक, महासरस्वती पूजन व लक्ष्मीपूजन रात्रौ मखरांत त्रिमूर्ती दर्शन.

आश्विन :

शु. ९ मी चंडीहवन, रात्रौं मखरात पंचमूर्ती दर्शन, पंचिष्ठांस फक्त रंगपूजा.

शु. १० मी विजयादशमी सकाळी घट विसर्जन. सायंकाली ४ वाजता सीमोल्लंघन. पालखीचे मल्हार पठारावर गमन, सोने लुटणे (पठारावर) व पुनरागमन

शु. १२ शी ग्रामदेव प्रियोळ तरंगाचे आगमन, रात्रौं ७-३० वाजता संस्थानतर्फे स्वागतपूजा इत्यादि. पौर्णिमा-कोजागरी, सर्व अवसरदर्शन, व. ५ मी पर्यंत पौर्णिमापासून कार्तिक पौर्णिमापर्यंत रोज पहाटे काकड आरती व सकाळी १० वाजता हरिजागर.

व. १ दा ते पंचमी कौलप्रसाद.

व. १४ शी नरकचतुर्दशी, पहाटे अभ्यंगस्नान, श्रीविठोबा अलंकारपूजा.

कार्तिक :

शु. ११ शी महा एकादशी- पंढरपूर श्रीविठोबा दर्शन.

शु. १२ शी श्रींचे रात्रौं सभामंडप आगमन, श्रीतुलसी विवाह.

पौर्णिमा : कार्तिक पौर्णिमा. उभय देवींच्या दोनही पालख्यांचे वनात गमन. धात्रीपूजन. वनभोजन दुपारी ३ वाजता. रात्रौं आगमन व दीपाराधना.

व. १ दा दशावतारी काला.

व. २ या गौळणकाला दुपारी व संध्याकाळी ४ वाजता तळीवर पालखी गमन.

व. ५ मी श्रीसांतेरी पंचिष्ठ प्रतिष्ठापना दिनानिमित्त सकाळी शतकलशाभिषेक व रात्रौं ब्राम्हण-संतर्पण, उभय पालखीउत्सव.

मार्गशीर्ष :

शु. ७ मी खांद्यावरील गुड्यांचा रथोत्सव.

व. ५ मी दशावतारी काला श्रीसांतेरीदेवीचा.

व. ६ ष्ठी श्रीसांतेरी गवळण काला संध्याकाळी ४ वा. व नंतर खांद्यावरील रथोत्सव.

पौष :

व. १४ शी कालट (भोगावळ) महार इत्यादि दसऱ्याप्रमाणे.

माघ :

शु. ६ ष्टी रात्रौं भोगावळ, मुक्तद्वार, रथोत्सव इत्यादि रथोत्सवाची सांगता दुसऱ्या दिवशी.

(श्रीमहालसा देवीचे कुळावी प्रतिवर्षी माघ वद्य ६ ष्ठी दिवशी आपआपल्या घरी श्रीमहालसादेवी प्रीत्यर्थ देवकार्य संतर्पण करतात.)

शु. ७ मी संध्याकाळी ५ वा. रथसप्तमी. खांद्यावरील रथोत्सव. दिवजां.

शु. ९ मी ते पौर्णिमा रात्रौं सुवारी वादन.

शु. १२ शी दीपस्तंभाचे पूजन व दीपप्रज्वलन श्रीमहालसादेवी चौघडा वाजतो तेथे जाते व पालखी खांबाजवळ त्राटिकावध व दहन इत्यादि भोगावळ.

शु. १३ शी ते पौर्णिमा- सभामंडपात शेजावर श्रीदेवीचे आगमन. कार्यक्रम संपताच गमन.

व. २ या वार्षिक जागर व सुवर्णशिबिकोत्सव.

व. ३ या सुवर्णशिबिकोत्सव.

व. ४ थी रथानुष्ठान सुरू, संध्याकाळी ५ वा. गरुडारोहण, पालखी, अष्ठावधान सेवा.

व. ५ मी संध्याकाळी ५ वा. रथारोहण, रात्रौं महारथोत्सव.

व. ६ ष्ठी रथानुष्ठान समाप्ती दुपारी १ वाजेपर्यंत, रात्रौं नौकारोहण.

माघ :

व. ७ मी उभय श्रीची अंबारीतून मिरवणूक.

व. ८ मी लालखी व सुखासनोत्सव व मिरवणूक.

व. ९ मी नौकारोहणोत्सव व नूतन अंबारीतून मिरवणूक.

व. १० मी विजयरथोत्सव.

व. १३ शी महाशिवरात्री रात्रौ चारही प्रहरांस अभिषेक, महानैवेद्य, मंगलारती व शेवटच्या प्रहरास अभिषेकानंतर सुवर्णमुख घालणे.

फाल्गुन :

शु. १० मी ज्ञानदीप प्रतिष्ठापना वर्धापनदिन, ज्ञानदीप प्रज्वलन पंचिष्ठ व पुरुषासह उभय श्रीची रंगपूजा, पालखीउत्सव.

शु. १४ शी फोंडा तालुक्यातील मेळांचे आगमन-शिमगोत्सव.

पौर्णिमा गडे पडणे, भोगावळ नंतर धुळवट.

व. १ ला होलिका दहन. (महार येणे), पालखी श्रीमल्हार पठारावर गमन व आगमन.

व. २ या 'हळदुणे' संध्याकाळी शिमगा श्रीमल्हारकडे पालखी.

व. ३ या संध्याकाळी मंगेशी पेंडावर पालखी गमन.

व. ४ थी संध्याकाळी वेलींग पेंडावर पालखी गमन.

व. ५ मी श्रीसांतेरीची पालखी व गुलाल उधळणे.

व. ६ ष्ठी फक्त श्रीमहालसादेवीच्या रात्रीच्या आरत्या, षष्ठी दिनी सकाळी ७ वाजता, नंतर रोमट, धुळवट, शिमगा समाप्ती इत्यादि. (या दिवशी रविवार किंवा बुधवार आल्यास धुळवट दुसऱ्या दिवशी होते.)

देवस्थानात सर्व सोईनी युक्त अशा नवीन भव्य अग्रशाळा

या देवस्थानात नेत्रदीपक विकास कार्य या दहा बारा वर्षांच्या कालात जे झालेले पाहण्यात येते, त्या विकास कार्यामुळे त्या देवस्थानच्या कुळावी महाजनाचीच नव्हे, तर सर्व हिंदुधर्मीयांची फार मोठी अडचण दूर झाली.

देवालयाच्या दोन्ही बाजूस भल्या मोठ्या सर्व सोईनी परिपूर्ण अशा दोन, सुंदर नमुन्याच्या अग्रशाळा बांधून पूर्ण झाल्या. त्यामुळे तेथे विवाहादि मंगलकार्ये करणाराचीच नव्हे, तर धार्मिक आणि समाजहित कार्य करणाराची फार मोठी अडचण दूर झाली. देवालयाकडे जाताना आपल्या डाव्या हाताकडील बाजूस अग्रशाळेची पहिली इमारत बांधून तिचे उद्घाटन श्रीगोकर्ण पर्तगाळी मठाधीश श्रीमत् द्वारकानाथ तीर्थ स्वामी महाराज यांच्या पवित्र हस्ते ता. १५ मे १९७२ रोजी झाले.

या इमारतीत तळमजल्यावर एक भव्य सभागृह असून त्यात सातशे मंडळींची खुर्चीवर बसण्याची व्यवस्था आहे. पहिल्या मजल्यावर सुव्यवस्थित राहण्याचे दहा गाळे असून त्यांपैकी दोन गाळे प्रत्येकी तीन खोल्यांचे आणि आठ गाळे दोन खोल्यांचे आहेत.

देवालयाकडे जाताना आपल्या उजव्या हाताकडील बाजूस अग्रशाळेची दुसरी इमारत बांधून तिचे उद्घाटन श्रीकाशी मठाधीश श्रीमत् सुधींद्रतीर्थ स्वामी महाराज यांच्या पवित्र हस्ते ता. १० मार्च १९७४ रोजी झाले. ही इमारत एक मजली असून त्यात सुव्यवस्थित राहण्याचे वीस गाळे बांधण्यात आले आहेत. त्यांपैकी चार गाळे तीन खोल्याचे असून उरलेले १६ गाळे दोन खोल्याचे आहेत.

देवस्थानातील श्रीसांतेरी किंवा श्रीशांतादुर्गा देवीचे देवालय तसेच पंचायतन देवतांचे देवालय नवीन धर्तीचे सुव्यवस्थित पध्दतीचे बांधून देवस्थानाच्या शोभेत भर घातलेली दिसते.

गोमंतकात कुठेही नसलेला असा वैशिष्ट्यपूर्ण ज्ञानदीप!

गोमंतकातील एकमेव देवालय ज्याच्या इमारतीचे छप्पर संपूर्णपणे ताम्रपत्र्यानी मढविलेले दिसते ते श्रीमहालसादेवीचे हे जसे एक वैशिष्ट्य, त्याचप्रमाणे या देवस्थानात एक उंच समई पितळधातूची जिचे आसन कांसव, त्यावर एकावर एक अशी एकवीस माली आणि त्या सर्व माल्याच्या शिराभागी एक गरुड इतके सांगितल्यावर ती प्रचंड समई म्हणजे प्रत्यक्षात एक दीपस्तंभच आणि ती किती उंच असणार हे मुळी सांगावयास नको.

ही समई पेटवावयाची झाल्यास त्यासाठी तेथेच तयार उंच मोठी शिडी ठेवलेली आहे. अशी एवढी उंच आणि प्रचंड समई या वेळपर्यंत तरी गोमंतकात कोठेच पाहण्यात नाही. या अशा समईची "ज्ञानदीप" नावाने श्रीमहालसादेवीच्या मंदिरासमोरच कायम सुप्रतिष्ठापना विधीपूर्वक श्रीशके १८९९ पिंगल नाम संवत्सर फाल्गुन शुक्ल दशमी रविवार ता. १९ मार्च रोजी झालेली आहे.

श्रीमहालसादेवी समोर न्याय निवाडा करण्याची प्रथा?

गोमंतकात इ. सन १५१० साली पोर्तुगीज खिरस्ती धर्मीयांचा प्रवेश झाला. त्यापूर्वी गोव्यातील हिंदु धर्मीय जनतेच्या ज्या धार्मिक आणि सांस्कृतिक चालीरिती होत्या त्या जशाच्यातशा पुढे चालू राहिल्या.

कारण पोर्तुगीजांनी त्यात हस्तक्षेप मुळीसुध्दा न करण्याचे पूर्ण आश्वासन प्रारंभीच गोमंतकीय जनतेस दिले होते. पुढे जसजसा काल लोटत गेला, तसतसे पोर्तुगीजांचे राजकीय धोरण बदलत जाऊ लागले आणि "ज्यांचे राज्य, त्यांचा धर्म". हे तत्व त्यानी आचरणात आणले. आणि अर्थातच हिंदु धर्मीयांच्या धार्मीक व सांस्कृतिक पूर्वापार चालीरितीमध्ये अडथळे येऊ लागले.

हिंदु धर्मीय जनतेने आपली गाऱ्हाणी पोर्तुगीज राज्यसत्तेपुढे वारंवार मांडली. पण, जेथे हिंदु धर्मच नष्ट करणे हाच त्यांचा एकमेव हेतु स्पष्ट होता, तेथे या गाऱ्हाण्याची दाद कोण कशी घेणार हे उघड आहे. कालांतराने त्या गाऱ्हाण्याची दखलगिरी घेणे त्यांस भाग झाले आणि हिंदु धर्मीय जनतेच्या चाली-रिती किंचित प्रमाणात का होईना, मान्य करण्याच्या धोरणात हालचाल झाली, आणि त्यामुळे "कार्त रैजिय दे म्युनिसिपालीदादि" नावाचा कायदा ता. २६ मार्च १८३२ रोजी प्रसिध्द झाला.

त्यानंतर कोदिगु दुस उझुस इ कोस्तुमिस म्हणजे चालीरितीचा कायदा ता. १४ आक्टोबर १८५३ रोजी प्रसिध्द झाला. या कायद्यात कलम ११० मध्ये ब्राम्हण ज्ञातीच्या इसमानी शपथ घेताना ती भगवत्-गीता पोथीवर हात ठेवून प्रणाम करून घेणे आणि ब्राम्हण ज्ञातीशिवाय इतर ज्ञातीच्या लोकानी शपथ घेताना ती श्रीमहालसादेवीसमोर घेणेचा नियम त्यात उल्लेखिला आहे. त्यानंतर २७ वर्षानी म्हणजे ता. १६ डिसेंबर १८८० 'रोजी कोदिगु दुस उझुस इ कोस्तुमिस दुस हिंदुस दस व्हेल्यस इ नोव्हस कोंकिस्तस" असा सर्व हिंदु धर्मीय जनतेच्या चालीरितीचा सुधारित एकत्र कायदा जारी झाला, आणि त्या कायद्याच्या कलम नंबर २७ आणि त्याचे पोटकलम एक मध्ये खालील आशयाचा मजकूर आहे :-

ब्राम्हण हिंदुनी कोर्टात शपथ घेताना ती शपथ सदैव श्रीभगवत् गीता पुस्तकावर प्रमाण करून घेतली पाहिजे, आणि इतर ज्ञातीच्या लोकानी शपथ घेताना ती शपथ नारळ, तांबुल (विड्याची पाने, सुपारी) आणि तांदुळ यांवर प्रमाण करून घेतली पाहिजे.

जर वादी प्रतिवादी प्रतिपादन करून ती शपथ श्रीमहालसादेवी समोरच घेण्याचा आग्रह धरतील, तर तसे करण्यासाठी अर्जदाराने प्रवास व भत्ता वगैरे खर्च कोर्टाच्या जज्जसाहेबांचा, वकिलांचा आणि कोर्टाचा कर्मचारी यांचा भरावा लागेल.

वरील कायद्यातील कलमावरून निःसंशयपणे सांगता येईल की, गोव्यात पोर्तुगीज खिरस्ती धर्मीय लोक राज्यकर्ते होण्याच्या पूर्वीच्या कालापासूनच न्यायालयीन न्याय निवाडा करण्यात तो श्रीमहालसादेवी पुढे करण्याची प्रथा होतीच व ती सरकारने नंतर कायदा करून मान्यही केली होती.

केवढाही दांभिक, लब्ध प्रतिष्ठित, लुच्चा, चोर किंवा खोटी कृत्यं करून ती पचविण्यासाठी खोटी शपथ घेण्याचे धाडस श्रीमहालसादेवी समोर कोणासच कधीच झाले नाही. एवढा जाज्वल्य प्रभाव आणि त्या देवीचे भय जनमानसात सदैव होते, आणि ते तसेच अद्याप कायम आहे. याचा अनुभव सर्व हिंदु धर्मीयांसच नव्हे तर इतर धर्मीय लोकासही असल्याचे जाणवते.

श्रीमहालसादेवी समोर राहून शपथ घेण्याची जी प्रथा होती त्याचा विधी असा होता की, शपथ घेणारा इसम प्रारंभी श्रीमहालसादेवीच्या देवालयामागे जो तलाव आहे त्या तलावावर जाऊन त्या तलावातील पाण्याने डोईवरून स्नान करून अंग पुसून दुसरे वस्त्र नेसून गळ्यात तांबड्या पोटकळींच्या फुलाची माळ घालायची व तो इसम त्या तलावावरून थेट श्रीमहालसादेवीच्या देवालयात येताना त्याचे बरोबर एक महार ढोलके वाजवीत यावयाचा; मंडपातून मुख्य देवालयात, त्या शपथ घेणाऱ्या इसमाने देवालयाच्या प्रवेश-द्वारातून येऊन प्रवेशद्वार आणि चौक यांमध्ये सरवळी आहे. त्या सरवळीतच वर टांगलेल्या मोठ्या घंटे-खाली उभा राहून श्रीमहालसादेवी समोर त्याने शपथ घेण्याची प्रथा होती.

या शपथे बद्दलचा कायदा जो वर उधृत केला आहे त्याची कॉपी वाचकांच्या माहितीसाठी खाली दिली आहे :—

Decreto de 16 de Dezembro de 1880, pelo qual foram revistos e codificados os Usos e Costumes dos hindus genitos de Goa.

Artigo 27° – Os hindus brahamanes prestarao sempre em juizo o juramento da pustoca de Xri Bhagvat Guita, e os de outras castas o de coco betle, areca e arroz.

‡ **Unico.** – No caso de juramento decisorio poderao as partes exigir que elle seja prestado perante a divindade Malsa, sendo pagas pelo requerente as despezas do transporte, os emolumentos dos juizes, os honorarios dos advogados e os salarios dos empregados de justica.

(Publicado este Decreto a pagino 309 te 311 da Colleccao da Legislacao Novissima do Ultramar Volume X 1879–1880 Impressa em Lisboa, NA IMPRESSA NACIONAL EM 1884 ———)

गोमंतकातील देवालये त्यांच्या कित्येक वैशिष्ट्यांमुळे ती अद्वितीय आणि अनुपम संस्थारुप आहेत असे विचारवंत मानतात

सुज्ञ विचारवंतानी गोमंतकातील देवालयांची जमेची बाजू विचारांत घेण्याविषयीं चर्चा 'श्रीमंगेश देवस्थान' या लेखांत आलेलीच आहे. प्रत्येक पिढी आपल्या संस्कृतीची मशाल दुसऱ्या पिढीच्या स्वाधीन करून जात असते, आणि ही मशाल तेवत ठेवून व काळजीने अधिक दीप्त करून सावधानीने भावी पिढीच्या हातात, जरी पूर्वीपेक्षा अधिक तेजस्वी नसली, तरी कमीत कमी आपल्याला मिळाली होती त्यापेक्षा कमी तेजस्वी न करता देणे, हे प्रत्येक पिढीचे कर्तव्य आहे.

समुद्र मंथनातून उपलब्ध झालेल्या चतुर्दश रत्नांच्या वाटणीच्या प्रसंगी देवदैत्यांमध्ये पडलेला लढा युक्तीने मिटविण्यासाठी भगवंतानी जे सुमनोहर मोहिनीरूप धारण केले होते, तोच श्रीमहालसादेवीचा अवतार होय, असे पुराणांतरी आढळते.

पुराण कालात वरुणापुरवासी लोकानी त्या श्रीमहालसादेवीची विधियुक्त पूजा करून, ते सर्व त्या देवीला अनन्यभावे शरण जाऊन व हात जोडून त्यानी तिची जशी प्रार्थना केली, त्याचप्रमाणे भक्तिभावे अनन्य शरण होऊन शिरसाष्टांग नमस्कार करून मी श्रीमहालसादेवीची प्रार्थना खालील प्रमाणे करीत आहे.

नमो देवि जगद्धात्रि सृष्टिस्थित्यन्त कारिणि । त्वामद्य शरणं याताश्चण्डासुरभयार्दिता : ॥

(स्कंदपुराण, वरुणापुर महात्म्य, अध्याय २ रा, ओवी ३ री)

कल्पान्तार्क प्रकाशं त्रिभुवन मखिलं तेजसा पूरयन्तं
रक्ताक्षं पिंगकेशं रिपुकुल भयदं भीमदंष्ट्राट्टहासम् ॥
शंखं चक्रं गदाब्जे पृथुतल मुसलं चापपाशांकुशास्त्रं
बिभ्राणं दोर्भिराद्यं मनसि मुररिपुं भावये श्रीनृसिंहम् ॥

ॐ नमो भगवते नरसिंहाय नमस्तेजस्तेजसे आविराविर्भव
वज्रनख वज्रदंष्ट्र कर्माशयान् रंधय रंधय तमो ग्रस ग्रस
ॐ स्वाहा । अभयम भयं मात्मनि भूयिष्ठा ॐ क्षौम्.

श्रीलक्ष्मी - नृसिंह देवस्थान

वेलिंग



श्रीलक्ष्मीनृसिंह, वेलिंग

श्रीलक्ष्मीनृसिंह देवस्थान, वेलिंग

श्रीलक्ष्मी-नृसिंह देवस्थान

वेलिंग-गोवा

गोमंतकात जी अनेक हिंदु देवालये आणि धार्मिक प्रेक्षणीय स्थळे आहेत, ती बहुसंख्य फोंडा तालुक्यात आहेत. ती तशी असण्याचे कारण काय व ती कोणत्या काली, याची माहिती पुढील वेगवेगळ्या प्रकरणातील मजकुरावरून लक्षात येण्यास अडचण पडत नाही. फोंडा तालुक्यातील बहुसंख्य देवालये आणि प्रेक्षणीय स्थळांमध्ये वेलिंग गावात असलेल्या श्रीलक्ष्मी-नृसिंह या सुप्रसिध्द देवस्थानाचा अंतर्भाव होतो. या देवस्थानाचा प्राचीन इतिहास मोठा चित्तवेधक आहे.

गोमंतकाची राजधानी पणजी शहर जिथे नदी किनाऱ्यावर बंदरात मुंबईहून गोव्यात येणारी प्रवासी वाहतूक करणारी आगबोट थांबते, त्या पणजी शहरापासून मडगाव या रेल्वे स्टेशनाकडे जाणारा जो प्रमुख डांबरी रस्ता आहे, त्या रस्त्यावरून नियमित प्रवास वाहतूक करणाऱ्या बसेस मधून पणजीहून निघून म्हार्दोळ बस स्टेशनवर उतरायचे.

पणजी शहरापासून म्हार्दोळपर्यंत रस्ता अंतर २१ किलोमिटर आहे. म्हार्दोळ मोटारस्टँड पासून वेलिंग गाव अगदी जवळ सीमेवरच आहे आणि त्या गावात जाणारा रस्ता जरा चढणीचा असून श्रीलक्ष्मी-नृसिंह देवालयापर्यंत जाण्यास पायवाटेने चालल्यास वीस मिनिटे वेळ लागतो. गरजू मनुष्यास तेथे जाण्यास म्हार्दोळ बस स्टँडवर टॅक्सी, मोटार सायकली, रिक्शा वगैरे वाहनेही भाड्याने मिळतात.

श्रीलक्ष्मी-नृसिंह देवस्थान एका शांत व सुंदर परिसरात वसलेले आहे. आसमंतात प्रदेशातील झुळ-झुळ वाहणारे गोड पाण्याचे झरे, वनपुष्पांचा मधुर सुवास, सृष्टी देवीने जिकडे तिकडे पसरलेला तो नेत्रानंददायक हिरवा गार गालिचा, गर्द झाडी, इत्यादि मनोरम सृष्टिसौंदर्य अवलोकन करून, ज्याचे अंतःकरण वेधून जात नाही, असा मनुष्य विरळा !

त्या देवस्थानचा प्राकार, अग्रशाळा, महाद्वार, मंदिरशिल्प वगैरे वैशिष्ट्यपूर्ण आहेत. देवस्थान, रस्त्यापासून थोडे उंचवट्यावर असून, थोडेसे अंतर चालून गेल्यावर महाद्वार आहे. त्यातून प्रवेश केल्यावर प्राकारात पोहोचतो आणि पुढे श्रीलक्ष्मी-नृसिंह मंदिरात जाता येते.

हे मंदिर पूर्वाभिमुख असून प्राकाराचे महाद्वार दक्षिणाभिमुख आहे. प्रवासी यात्रेकरूने प्राकारात प्रवेश केल्यानंतर त्याने डाव्या हाताकडे वळून सभामंडपातून देवालयात जावे लागते. सभामंडप जुन्या पध्दतीचा प्रशस्त आहे. या सभामंडपातून सोंड्यावर व सोंड्यानंतर देवालयाच्या चौकावर व त्यापुढे दोन अंतराळे आहेत. पैकी गर्भागाराला लागून असलेल्या अंतराळातून गर्भागारा भोवतालची प्रदक्षिणा करण्याची वाट आहे.

देवालयाच्या चौकाची रचना त्याचे सभोंवार असलेले आठ लांकडी भक्कम खांब, त्यावर परिश्रमपूर्वक केलेले कोरीव नक्षी काम, फारच सुंदर, मनोवेधक आणि अप्रतिम आहे. या खांबाच्या वरच्या बाजूस, खांब व छत यामध्ये दोनही चौकोनाच्या चारही बाजूस दोन पट्टिका आहेत आणि त्या लांकडी उठावाच्या सुंदर कोरीव मूर्ती आहेत. हे नक्षी कोरीव काम पाहिल्यानंतर जुन्या काली या वैभवाची महती फार मोठी होती, याची प्रचिती मिळते.

जुन्या कालच्या सर्वच देवालयामध्ये कोरीव काम विशेष करून देवादिकांच्या लांकडी कोरीव मूर्ती, पुराणकालीन नानाविध कथानकातील महत्त्वाचे प्रसंग, दशावतार, केशवादि चोवीस नावाचे श्रीकृष्णापर्यंत अवताराच्या सुंदर लांकडी प्रतिमा वगैरे दिसत होते.

हल्लीच्या अर्धशतक वर्षाच्या कालात काही देवस्थान मंदिराचा जीर्णोध्दार झाला असला, तरी पूर्वीच्या मंदिरात असलेले लांकडी कोरीव काम काळजीपूर्वक शक्यतो जपून राखून योग्य त्या व्यवस्थित तऱ्हेने देवालयाच्या व्यवस्थापकानी कोणत्या तरी दुसऱ्या दालनात त्याचा उपयोग करून, ठेवलेले अद्यापपर्यंत तरी पाहण्यात येते. असे कोरीव काम आजच्या जमान्यात करणारे कलाकार अगदी विरळाच.

या श्रीलक्ष्मी-नृसिंह देवस्थानातही हे लाकडी कोरीव नक्षीकाम फार सुंदर आणि अप्रतिम आहे व ते तसे राखून ठेवल्याबद्दल आणि त्यावर कलापूर्णीरत्या ऑइलपेंट केल्याबद्दल त्या देवस्थानच्या चालकाना भूषणास्पद ठरते.

देवालय मंदिरातील जमीन संगमरवरी पाषाणाने मढविलेली आहे. गर्भागारावर देवालयाचे प्रमुख उंच शिखर आहे, आणि त्याचे खास वैशिष्ट्य आणि नमुना इतर देवालयाहून फार वेगळा आहे. नमुना आणि वैशिष्ट्य पाहून त्या बांधणाऱ्या शिल्पकारांचे कौतुक करावे तेवढे थोडेच. कारण, हे शिखर खाली चौकोनी, त्यावरचा भाग अष्टकोनी, त्यावरचा भाग लिंगाकृती आणि त्यानंतर शेवटचा भाग केळीच्या घडास शेवटी बोंडी असते, त्या बोंडीच्या नमुन्यासारखा आहे.

देवालय मंदिराच्या गर्भागारात उच्चासनावर श्रीलक्ष्मी-नृसिंह मोठी मूर्ती विराजमान आहे. याच्या पुढील भागी छोट्या आसनावर लिंगाकृती व वर स्तंभाकृती पाषाणखंडाला टेकून श्रीलक्ष्मी-नृसिंहाची छोटी मूर्ती पंचधातूची अभिषेक मूर्ती आहे, हीच मूर्ती प्राचीन काली हे देवस्थान सासष्टी तालुक्यातील शंखावली येथे असताना "नायक" ब्राम्हण साधूला दृष्टांत होऊन त्याची जी उपास्य मूर्ती तेथील तलावात मिळालेली असे सांगतात, ही हीच मूर्ती असल्याचा, त्या कालापासून आजतागायत त्या देवस्थानच्या कुळावी महाजन मंडळीचा दृढ विश्वास आहे. (याबद्दलचा कथाभाग पुढील संबंधित प्रकरणात याच लिखाणात वाचावयास मिळेल.)

गर्भागार, चौक आणि सभामंडप झाल्यावर प्राकार संपतो. पुढे देवालयासमोरच गोड पाण्याचा तलाव असून त्यातील पाणी स्वच्छ, शुध्द आहे. कारण, तलावाच्या समोर जो डोंगर आहे, तेथून एक झरा आपले पाणी या तलावात सोडतो आणि ते पाणी औषधी असल्याची ख्याती असल्यामुळे त्या झऱ्यावर आंघोळीसाठी माणसांची रीघ लागलेली दिसते.

याच झऱ्याच्या पाण्याचा वापर देवाच्या अभिषेकादि कृत्यास करतात. हा तलाव चोहोबाजूनी उंच भिंतीनी बंदिस्त केला असून, तलावाची बांधणी मजबूत आणि सुरेख आहे. तलावाच्या पाण्याच्या पातळी-पर्यंत व्यवस्थित आणि सोईस्करीरत्या पायऱ्या बांधलेल्या आहेत.

देवालयाच्या प्राकारात परिवार देवताची स्थाने आहेत. एका देवळीत श्रीसाधक नृसिंह (मूर्ती) स्थापना केलेली आहे. हा 'श्रीसाधक नृसिंह' नायक शंखवाळकरांचा मूळ पुरुष जो नायकसाधू तोच होय. तेथे जवळच अग्रशाळा व पुजारी भटजींचे निवासस्थान आहे. एकंदर या देवस्थानचे वास्तुशिल्प, सभोवतालची रचना, विहंगम सृष्टीसौंदर्य, गोड आणि औषधी पाण्याचा शुध्द व स्वच्छ झरा, हे सर्व पाहिल्यावर यात्रेकरूचे मन सुप्रसन्न होऊन समाधानी लाभते.

पौराणिक आणि ऐतिहासिक माहिती

गोमंतकातील वसाहतीच्या आरंभापासून तो हा गोमंतक प्रांत फिरंगी पोर्तुगीज राज्यसत्तेखाली येई-पर्यंत जो फार मोठा कालावधी लोटला, त्या काळात हे देवस्थान सासष्टी तालुक्याच्या शंखवाळ गावात फार सुप्रसिध्द आणि पुरातन वैभवात नांदत आले असले पाहिजे. याबद्दलचे पुरावे मिळतात. नमुन्या साठी उदाहरण म्हणून दाखवावयाचे झाल्यास, दोनशे चौसष्ट वर्षापूर्वी लिहिलेल्या कोंकणाख्यान या ग्रंथात खालील प्रमाणे शंखावली गावाचे पौराणिक वर्णन आढळते. ते वाचल्यानंतर यथार्थ कल्पना येऊ शकते. (पहा :- अध्याय २ सासष्टी महिमान या प्रकरणातील ओंव्या क्रमांक ४५ ते ५६ पर्यंत)

पाचवा ग्राम शंखावळी ॥ सागर नदी संगम जवळी ॥
क्षेत्री भजनी तिन्ही स्थळी । शांता, नृसिंह, विजयदुर्गा ॥ ४५ ॥
दैवतांचा महिमा थोर ॥ नित्य हरिकथा जागर ॥
छत्र चामरे वाद्ये अपार ॥ ऊर्जा सुस्थिर चालते ॥ ४६ ॥
वाखाणिती क्षेत्र महिमान ॥ नदी सागर संगम म्हणोन ॥
शंख होतातीत निर्माण ॥ पुण्य पावन स्थान ते ॥ ४७ ॥
शंखोत्पत्तीचे स्थान ॥ म्हणोनि शंखावळी अभिधान ॥
आहे प्रसिध्द पुरातन ॥ क्षेत्र महिमान तेथींचे ॥ ४८ ॥
ब्राम्हण समुदाय बहुत ॥ सप्त गोत्रीचे असत ॥
त्यामाजी चारी गोत्रीचे तेथ ॥ सांगणे निश्चित ऐका ते ॥ ४९ ॥
जमदग्नि वत्सगोत्री एक ॥ भारद्वाज आणि कौशिक ॥
शंख पिंग कुत्स देख ॥ तिन्ही आणिक आहेती ॥ ५० ॥
गोमंचल दक्षिण भागासी ॥ तीर्थराज समीपतेसी ॥
उत्तम नाम ग्रामासी ॥ नरसिंह लक्ष्मी ते ठायी ॥ ५१ ॥
चतुर्वर्ण जन आहेत ॥ चारी आश्रम सेवीत ॥
विप्र अग्न-जन्मे वसत ॥ वेदांग पाराप्रत पावले ॥ ५२ ॥
अस्खलित तपो योग बळ ॥ साधनी भस्म क्रोधानळ ॥
जेणे करून धर्म प्रबळ ॥ कारणभूत सकळ जगा ॥ ५३ ॥
तेथे सौभाग्यवती ज्या नारी ॥ त्या पतिव्रता धर्मी तत्परी ॥
इषुपात रामक्षेत्रा माझारी ॥ नगरी शंखावळी मंडण ॥ ५४ ॥
जिच्या ठायी कमलनेत्र कमलापति ॥ वैकुंठाहुनी उतरले क्षिती ॥
भक्तानुग्रहा लागुनि सनातन वस्ति ॥ व्हावया मुक्ती जड जीवां ॥ ५५ ॥
ज्याचे दर्शनमात्रे करूनी ॥ मोचन होय संसार बंधनी ॥
सुरवरांच्या कार्यालागुनी ॥ जगजीवन त्या ठायी ॥ ५६ ॥

परंतु गोमंतकात फिरंगी पोर्तुगीज खिरस्तीधर्मीय लोकानी पाय ठेवल्यानंतर (ता. २७ फेब्रुवारी इ. स. १५१० रोजी तिमोजी नामक चांचाच्या मदतीने आफोंस दे आल्बुकेर्क या पोर्तुगीज सेनापतीने समुद्र-मार्गे अकस्मात छापा घालून प्रारंभी गोवा शहर हस्तगत करून घेतले व त्या दिवसापासून गोमंतकातील आदिलशाही सत्तेस उतरती कळा लागली हे इतिहास सांगतो). त्यानी जे खिरस्ती धर्म प्रसाराचे मोठे सत्र बळजबरीने पेटविले व त्यात गोवा बेटानंतर सासष्टी प्रांतावरही अत्याचार, जुलूम, छळ व सर्व हिंदुधर्मीयांची आहुती पडण्याच्या प्रसंगाचा प्रारंभ अनुभवास आला, व इतरांप्रमाणेच सासष्टीत सर्वा-आधी कुशस्थली (कुठ्ठाळ) हा गाव गोवा बेटाच्या पैलतीरावर समोरासमोरच असल्यामुळे, या गावावर हा दुर्धर प्रसंग जलद येणे केवळ संभवनीय नव्हे तर खचितच तातडीने ओढवणार, हे जाणून कुश-स्थलीकरानी प्राणाहून प्रिय असलेल्या आपल्या कुलदैवतास श्रीमंगेश देवास अचानक आणि गुप्तपणे रातोरात फिरंगीराज्य सरहद्दीबाहेर म्हणजे, त्या वेळच्या आदिलशाही राज्यात अंत्रुज प्रांतातील प्रियोळ गावात एका वाड्यावर आणून ठेविले आणि प्रस्तुतच्या प्रशस्त व आल्हाददायक ठिकाणी त्या दैवताची स्थापना केली.

कुशस्थली (कुठ्ठाळ) गावावरच हा दुर्धर प्रसंग जलद येण्याची काहीशी खात्री होती. याचे मुख्य कारण, त्या काली गोवाबेट म्हणजे आजचे तिसवाडी, याची सीमा आजच्या आगशी गावापर्यंत संपत होती. व तो आगशी गाव जुवारी नदीच्या त्या काली अघनाशिनी नावाने ओळखत असलेल्या नदीच्या तीरावर होता आणि त्या आगशी गावा समोरासमोर त्याच नदीच्या पैलतीरावर कुशस्थली हा गाव असल्यामुळे, या दुर्धर प्रसंगाशी धास्ती त्या गावास जास्त होती.

तसेच कुशस्थली गावात त्या काली ज्या जागी श्रीमंगेशाचे देवालय होते, त्या देवालयाकडे जाण्याच्या रस्त्याच्या उजव्या बाजूकडे त्याच रस्त्याचा एक फाटा जातो, त्या फाट्यापासून अगदी जवळच्या अंतरावरच सांखवाळ (शंखावली) गावात सांतेरी, ईश्वर, गांवपुरुष, नारायण, भगवती, विजयदुर्गा, नरसु व परमदेव देवतांची देवालये होती.

वाचकाना स्पष्ट कल्पना येण्यासाठी म्हणून सांगावयाचे झाल्यास वस्तुस्थिती प्रत्यक्षात अशी होती की, कुठ्ठाळ गावात जराशा उंचवट्याच्या भागावर असलेल्या श्रीमंगेश देवालयाच्या इमारतीपासून ज्या स्थानावर सांखवाळ गावच्या सरहद्दीत त्या गावचे देवस्थान होते, ते पाहिल्यावर दोनही कडील देवस्थाने एकाच गावातील असावीत, असे कोणासही परकी प्रवासी इसमास, ज्यास स्थानिक ग्रामीण विभागीय ते दोन वेगवेगळे गाव आहेत आणि त्यामधील त्या एकमेकाची सीमा अमुक जागेपर्यंत आहे, हे माहीत नाही, त्यांस खचित वाटल्यास नवल नव्हे, इतकी ती जवळ आसपासच्या क्षेत्रात होती.

कुठ्ठाळ आणि शंखवाळी या दोन गावात प्राचीन कालापासून सीमावाद सतत चालत आलेला होता. इतके सविस्तरपणे सांगण्याचे कारण एवढेच की, हे दोन गाव एकमेकाच्या फार जवळ व सीमेवर असल्यामुळे एका गावात साधारणपणे खट्ट झाले, तर शेजारच्या शंखवाळ गावात त्याचा आवाज लगेच समजू शके. आणि यामुळे कुठ्ठाळ गावावर काही संकट आले किंवा तेथे थोडीशी हालचाल जरी झाली, तर ती आपोआप सहजासहजी शंखवाळ गावात लगेच अविलंबे कळत असे.

या अशा परीस्थितीमुळे ज्या काली कुठ्ठाळ गावातील जनतेस आपल्या देवतांवर बाटाबाटीचा, मूर्तीभंजनाचा दुर्धर प्रसंग फारच जवळ आल्याची चाहूल लागली. म्हणून त्यानी अचानक आणि आकस्मिकपणे रातोरात आपल्या देवतांचे स्थलांतर कुठ्ठाळ गावाबाहेर आदिलशाहीच्या फोंडा प्रांतात प्रियोळ गावात केले, त्या स्थलांतराची बातमी आणि कारणे त्या कुठ्ठाळ गावाच्या देवालयापासून अवघ्याच अंतरावर असलेल्या शंखवाळच्या तत्कालीन देवालयाच्या व्यवस्थापकास आणि तेथील कुळावी महाजनाना तत्काळ अविलंबे कळल्याशिवाय राहिली नसावीत असे मानणे मोठ्या धाष्ट्याचेच नव्हे, तर अविचारी आणि मूर्खपणाचे ठरेल की नाही हे वाचकानीच आपआपल्या मनाशी सारासार बुध्दीचा वापर करून व्यवहार्यपणे ठरविणे प्रामाणिकपणाचे ठरेल.

ज्या काली, कुठ्ठाळच्या ग्रामवासीयानी, आपले कुलदेवत या महान् भयानक अवस्थेत कुठ्ठाळ गावातून तातडीने अचानकपणे हलवून स्थलांतर केले, त्याच काली त्या गावच्या सीमेवरील आसपासच्या देवस्थानातील देवते खचितच स्थलांतर करून पोर्तुगीज राज्य सरहद्दी बाहेर संबंधित कुळावी लोकानी नेली असली पाहिजेत, हे उघड आहे.

त्यास अनुसरून शंखवाळीचे श्रीविजयादुर्गा देवत फोंडे प्रांतातील केरी येथे, श्रीसांतेरी जिला नंतरच्या कालात श्रीशांतादुर्गा म्हणू लागले ते देवत त्याच फोंडे प्रांतातील गोठण येथे आणि श्रीनरसू, आताचा श्रीलक्ष्मी-नृसिंह थेट आता ज्या वेलिंग गावात स्थापित आहे, तेथे न येता, जुवारी नदी पलीकडे मडकई गाव आहे त्या गावच्या नदी किनाऱ्यावरच्या एका करंजाळ नामक वाड्यावर एका जागेत स्थलांतर करून राहिला.

ही जागा करंजाळ येथील 'फडते' उपनावाच्या कुटुंबाच्या मालकीची होती, ती त्या कुटुंबाने मोठ्या आदराने आणि भक्तिभावाने या देवाच्या मुक्कामास तत्परतेने आणि आनंदाने दिली. या वाड्यावर बहुसंख्य लोकवस्ती मच्छिमाऱ्यांची असून, त्या लोकांनी या देवताचे स्वागत मोठ्या हर्षभरितेने केले. श्रीदेवनृसिंहाने या करंजाळ वाड्यावर अल्प मुक्काम केला. व नंतर सध्याच्या वेलिंग गावात सुयोग्य जागी या देवताची स्थापना करण्यात आली.

करंजाळ वाड्यावरील ज्या 'फडते' उपनावाच्या कुटुंबाने त्या काली, श्रीनृसिंह देवतास भक्तिभावाने आपली जागा मुक्कामास दिली, त्या कुटुंबाच्या वंशजाना त्या कालापासून आजपर्यंत अव्याहतपणे वेलिंग

येथे देवस्थानात प्रीतवर्षी महापर्वणी महोत्सव जत्रा कार्तिक शु. १४ शी वैकुंठ चतुर्दशीच्या दिवसापासून पाच दिवस साजरी होत असते, त्या महोत्सवात, तेथील ठराविक वडाच्या पारावर नेऊन त्यांचा बहुमान पूर्वापार चालीरितीप्रमाणे केला जातो. आणि अशा रितीने कृतज्ञता व्यक्त केली जाते. धन्य ते करंजाळचे 'फडते' उपनावाचे भाविक कुटुंब आणि धन्य ते कुळावी महाजन त्या श्रीलक्ष्मी-नृसिंह दैवताचे.

शंखवाळ गावातील दैवतांचे स्थलांतर, ज्या काली शेजारच्या कुशस्थली गावातील दैवताचे स्थलांतर झाले, त्याच काली झाले असले पाहिजे, हे न सांगताही समजणे कठीण नाही. याची सविस्तरपणे कारणे पुढे समजून घेऊ. आता ते स्थलांतर कोणत्या साली झाले हे सिध्द करणारे कोणते स्पष्ट पुरावे गतीत-हासात सापडतात ते पाहू.

खिरस्ती धर्मीय झेझुइत पाद्री लोकानी सासष्टी तालुक्यात धर्मप्रसारार्थ प्रथमतःच जो पाय ठेविला तो इसवी सन १५६० सालीच, याबद्दल सर्व इतिहासकाराचे एकमत आहे. कारण, ती घटनाच उघड आणि राजरोसपणे पोर्तुगीज सरकारी आरमारी मदतीसह घडली.

इ. स. १५६० साली, गास्पार नावाचा पाद्री गोव्यात मुख्य खिरस्ती धर्मोपदेशक झाला. त्या पाद्रीने गोवा बेटातील गोवा शहरात, सासष्टी तालुक्यातील बरेच हिंदु लोक केवळ व्यापाराच्या उद्देशाने आल्याचे पाहून अचानकपणे एकाच दिवसात त्यातील चारशे नऊ लोकाना पकडून, त्याना बळजबरीने खिरस्ती धर्माची दीक्षा दिली ! ही दीक्षा 'सां पावलु' कॉलेजच्या इमारतीत इतियोपियाचा बिशप आणि माल्लाकचा बिशप यांच्या उपस्थितीत, उल्लेखित दो गास्पार गोव्याचा पहिला आर्चबिशप याने दिली.

या बद्दलचा उल्लेख 'ओरियेंति कोंकिस्तादु' या ग्रंथात (भाग पहिला, कोंकिस्त १ दिव्हिजांव २, पृष्ठ १०१, आवृत्ती १८८१ साली मुंबई येथे एक्झामिनर छापखान्यात छापलेली) वाचावयास मिळतो. व याच घटनेमुळे खिरस्ती धर्मप्रसाराचा ओनामा किंवा प्रवेश सासष्टी प्रांताच्या जनतेत झाला असे म्हणा-वयास हरकत नाही.

पुढे या पाद्री लोकानी सबंध सासष्टी प्रांत बाटविण्याची आपली इच्छा धरून तसे करण्याबद्दल सरकारी मंजुरी मागितली. सरकारने त्या कृत्यास मंजुरी पूर्णपणे तर दिलीच, पण शिवाय त्यांच्या मदतीस आरमारही दिले.

अशा तयारीने प्रत्यक्ष सासष्टी प्रांतावर आक्रमण करावयाचे तर ते आरमाराच्या मदतीसह म्हणजे सासष्टी प्रांताच्या ज्या सीमेस नदी आहे, त्या बाजूनेच व्हावयास हवे हे उघड आहे. ही सीमा म्हणजे त्या कालची गोवा बेटाची दक्षिण बाजू, ज्या बाजूला किंवा सीमेस अघनाशिनी नदी किंवा जुवारी नदी या नावाने ओळखली जाते ती. ही नदी मुरगांवकडे जाऊन समुद्रास मिळते.

त्या काली मुरगाव पासून सासष्टी प्रांताची सीमा जलमय व मुरगावपासून कुठ्ठाळपर्यंत सासष्टी प्रांताच्या उत्तर सीमेचा किनारा, पैलतीरावर गोवा बेटाचा किनारा आणि गोवाबेट व सासष्टी प्रांताची उत्तर सीमा या मध्ये आगशीची नदी किंवा जुवारी नदी म्हणजे अघनाशिनी नदी असल्यामुळे जल-मार्गानेच आरमारासह हल्ला किंवा आक्रमण सासष्टीवर येणार, असे निश्चित झाल्यावर या संग्राम मोर्चाचा रोख सुरवातीस कुठ्ठाळ गावावरच येणार हे सर्वानाच निःसंशयपणे समजून चुकले.

याचे मुख्य कारण, गोवा बेटाच्या समोर पैलतीरावर जे गाव आहे ते कुठ्ठाळ, गोवा बेट आणि कुठ्ठाळ यामध्ये अघनाशिनी नदी. शिवाय या झेझुइत पाद्री व पोर्तुगीज लोकाकडून सासष्टी प्रांतावर पूर्व व दक्षिण बाजूच्या सीमावरून प्रवेश होणे पूर्णपणे अशक्यच होते. कारण, या दोन्ही बाजूनी परकीय राज्य असल्यामुळे या पाद्री व पोर्तुगीज लोकांना तेथे शिरकाव होणे कठीण होते.

तत्कालीन पाद्री लोक पोर्तुगीज सरकारी कुमक घेऊन खिरस्ती धर्म प्रसाराचे व्रत स्वीकारलेले पाद्री-मंडळ गोवा बेटातील हिंदु धर्मीय लोकाना बळजबरीने एकसारखे बाटवीत चालले होते. हिंदुधर्मीय

लोकावर हा महान् दुर्धर प्रसंग ओढवला, तेव्हा त्या लोकाना आपली मालमत्ता, वतनवाडी, घरदार, सर्व सोडून जीव मुठीत धरून आपल्या हिंदुधर्म रक्षणासाठी आपापला प्रांत सोडून पोर्तुगीज हद्दीबाहेर जाणे भाग झाले होते.

इतिहासात हा काल अत्यंत हृदयद्रावक रितीने वर्णिलेला आढळतो. कित्येकानी अगतिक होऊन मरण पत्करले. ख्रिस्ती धर्माचा प्रचार करताना हे पाद्रीमंडळ हिंदुधर्मीय जनतेचे अनन्वित छळ व हालहाल करीत. देवालये जळून किंवा मोडून टाकणे, मूर्ती फोडणे, संपत्तीची लुटालूट किंवा नाश करणे, वगैरे अनन्वित कृत्ये करणारी ती मंडळी तशी कृत्ये करीत, गोवा बेटात जसजशी एकामागून एक गावी जाऊ लागली होती, व आता सासष्टी प्रांतावर पाय ठेवण्याच्या तयारीत आहे असे जेव्हा समजले, तेव्हा आता ही मंडळी लगेच कुठ्ठाळ गावात पोचणार या परीस्थितीची कल्पना व धोका कुठ्ठाळ गावच्या जनतेस उमजून चुकला.

आणि त्या जनतेने प्रसंग ओळखून आपल्या कुलदैवताकडे शरण येऊन गाऱ्हाणे घालून व प्रार्थना करून, त्यानी त्या दैवतास रातोरात उचलून, नदी ओलांडून, फोंडा प्रांताच्या प्रियोळ गावी स्थलांतर केल्याचा उल्लेख मागे दिला असल्यामुळे हे स्थलांतर कोणत्या साली झाले याचे पुरावे सरकारी दप्तरात किंवा झेझुइट पाद्री मंडळाने ही कृत्ये केली होती, त्यांच्या त्या कालच्या पत्रसंग्रहावरून व इतर पुराव्यावरून जे काही स्पष्ट आणि निःसंशयपणे सिध्द होते, त्याचाच शोध घेऊ.

कारण, एकदा हे पाद्रीमंडळ बरोबर कोणत्या साली, कोणत्या दिवशी, कुठ्ठाळीस प्रथमच आले. याची माहिती मिळताच, आणि त्याना तेथे काय परीस्थिती आढळली हे कळताच, शेजारच्या शंखवाळ गावाची मोहीम त्यानी केव्हा केली, याचा पुरावा निदान अंदाज करण्यास तरी सुलभ होईल, म्हणूनच प्रारंभी नदी किनाऱ्यावर असलेल्या कुठ्ठाळ गावातील त्यांच्या प्रथम प्रवेशाबद्दल काय माहिती मिळते ते पाहू.

कारण शंखवाळ गावात कुठ्ठाळहून जावयाचे असते. त्या झेझूइट पाद्री मंडळाने त्याकाली गोव्याहून पोर्तुगालास जी गुप्तपत्रे पाठविली होती, तो सर्व पत्रसंग्रह लिस्बन शहरात एकत्र करून त्यात त्या वेळच्या गोव्याच्या सरकारी दप्तरातील अनेक घटना समाविष्ट करून 'कोंपाजीय दे झेझूसचा समग्र इतिहास' ह्या कोंपाजीय दे झेझूसच्या पाद्री लोकानी पोर्तुगालची राजधानी लिस्बन शहर येथे 'ओरियेंति कोंकिस्तादु' या नावाचा मोठा ग्रंथ इ. स. १७१० साली त्यावेळच्या पोर्तुगीज राजघराण्याचा जो छापखानदार श्री. व्हालेंति दा कोस्त दिस्लांदिस याकडून प्रसिध्द केलेला आहे. त्या ग्रंथात विशेषतः ज्या पाद्री इसमानी सासष्टी प्रांतातील कुठ्ठाळ गावात प्रथमतःच प्रवेश केला होता, त्याच पाद्री इसमाची तपशीलवार कृत्ये त्यात सविस्तर प्रकारे त्या वेळच्या माहितीपूर्ण पत्रांवरून पूर्णपणे लक्षात येतात.

'ओरियेंति कोंकिस्तादु' या ऐतिहासिक ग्रंथाच्या पहिल्या भागात इ. स. १४९८ ते १५६३ व दुसऱ्या भागात इ. स. १५६४ ते १५८५ पर्यंतच्या कालात ज्या ज्या घटना त्यावेळी कोंपाजीय दे झेझुसच्या पाद्री मंडळाने घडवून आणल्या. त्यांचा समग्र वृत्तांत त्यांत आहे. त्या ग्रंथाच्या पहिल्या भागाच्या पृष्ठ १६९ वर जो मजकूर जुन्या तत्कालीन जुन्या लिपीत आहे त्याचे मराठींत भाषांतर वाचकांच्या सोयीसाठीं संक्षिप्तपणे खालीं दिले आहे. "आम्ही गोवा बेटाच्या दक्षिण बाजूस जलप्रवासाने सासष्टीकडे चाललो. जेथे ता. १ मे १५६० रोजी पहिलेच मिशनरी कंपनीचे पाद्री पेद्रु मास्कारेंजस आणि त्याचा सोबती मानुयेल गोमिस या दोघानी समाधान पूर्वक पाय ठेविला. हे दोघे, पाद्री मास्कारेंजस आणि मानुयेल गोमीस याना पाद्री प्रोव्हिंसीयाल (पाद्री वरिष्ठ अधिकारी) आंतोनियु दे क्वाद्रुस याने व्हिस्सु रे दों कोंस्तांतिनु दे ब्राग्रांस ह्यांच्या आग्रहावरून पाठविले होते. सासष्टीचे दक्षिण दिशेचे शेवटचे टोक, जिथे मुरगावचा किल्ला आहे, ते नोस्स सिंजोर दे काबु टोकापासून म्हणजे गोवा बेटाच्या पश्चिम टोकापासून मध्यंतरी समुद्राचा फाटा व तो पाण्याचा प्रवाह अनुकूल असल्यास अवघ्या अर्ध्या तासात ओलांडता येईल."

या पुराव्यावरून सिध्द झाले की, ते पाद्रीमंडळ जे धर्मप्रसारार्थ गेले होते, त्या पाद्रीमंडळाने ता. १ मे १५६० रोजी पहिल्यानेच सासष्टीच्या भूमीवर (कुठ्ठाळच्या तीरावर) पाय ठेविला. आता यापुढे यापेक्षा जास्त महत्त्वाचा पुरावा कोठे मिळतो काय, याचा शोध घेण्याचा प्रयत्न करू.

Monumenta Historica Socielatis lesu-Documenta Indica, Edit – Ioseph Wicki S. T. (Vol. VII) 1566-1569 Romae – Apud Monumenta Historica Soc. Iesu. Via Dei Penitenzierizo – 1962.

हा अत्यंत महत्वाचा मोठा ग्रंथ रोम शहरात छापलेला असून त्या ग्रंथाचे बरेच काही भाग आहेत. हा ग्रंथ म्हणजे मिशनरी दे झेझुसच्या समग्र इतिहासाचा भक्कम पुरावाच मानला जातो. त्या ग्रंथात सोसियेदाद दे झेझुसच्या पाद्री मंडळाने आपल्या सुरवातीपासून शेवटपर्यंत ज्या ज्या भूमीत पाय ठेविले, जी जी कृत्ये केली, ज्या ज्या घटना घडविल्या त्या सर्वांची तारीख, महिना, सन, जागा, वगैरे बारीकसारीक नोंदीसह साद्यंत रिपोर्ट लिहून त्या पाद्री मंडळाच्या रेक्टरने किंवा रेक्टरच्या हुकुमानुसार व परवानगीने कार्यकर्त्या दुसऱ्या पाद्रीने गोव्याहून पोर्तुगालास जी पत्रे त्याकाली पाठविली होती, तो सर्व अस्सल पत्र-संग्रह या ग्रंथात छापलेला आहे. या ग्रंथाचा भाग ७ वा पृष्ठ ६२ वर मार्जीन नंबर ७४५ वर जो मजकूर आहे त्याचे भाषांतर असे आहे :–

"यापूर्वीच काही (देव) लपवून दुसऱ्या राज्याच्या हद्दीत नेले असून त्याची देवालये निराधार स्थितीत ठेविली आहेत. आमच्या पाद्रींनी त्यातील एका देवालयाच्या इमारतीची मागणी केली; कारण त्या इमारतीत चर्च स्थापन करण्याचे योजिले. ती इमारत चर्चसाठी वापरण्यास सरकारने मंजुरी तर दिलीच पण त्याच बरोबर देवालयास जे उत्पन्न होते; ते ही चर्चच्या भोगवट्यासाठी बहाल केले...."

हा मजकूर पाद्री गोमिस व्हाज याने सां पावलु कॉलेज, गोव्याचे रेक्टर पाद्री आंतोतियु दे कोस्त यांच्यातर्फे सही करून गोव्याहून ता. २९ नवंबर १५६६ रोजी जे पत्र लिहिले (म्हणजे दाखला नंबर १६) त्या पत्रातील असून ते समग्र पत्र पृष्ठ २८ ते ७१ पर्यन्त भाग ७ वा 'दोकुमेंत इंदिका' या ग्रंथात छापलेले आहे.

वरील देव व देवालयाची इमारत कुठ्ठाळ येथील श्रीमंगेशदेव व त्याच्या देवालयाची असल्याचा उल्लेख पृष्ठ ६५ मार्जीन नंबर ७६५ वर त्याच ग्रंथात आहे. पण, तो सर्व मजकूर येथे जागेच्या अभावी देणे अशक्य आहे. जिज्ञासूनी तो ग्रंथ वाचून पाहिल्यास सत्यता पटेल.

वरील सर्व पुरावे पाहून अभ्यासू इसमाना तरी मुळीच शंका राहत नाही की, झेझुइट पाद्री मंडळ आरमारासह सासष्टीत धर्म प्रसारासाठी जे गेले व त्यानी त्या भूमीवर प्रथमच पाय ठेविला, तो दिवस म्हणजे तारीख १ मे १५६०, आणि त्या दिवशी कुठ्ठाळीत प्रवेश केल्यानंतर तेथील श्रीमंगेश देवाच्या देवालयात जाऊन पाहता, त्या पाद्री मंडळास आढळून आले की, त्या इमारतीत देव नव्हता. त्या देवालयाची इमारत देवाविना रिकामी होती व त्या दिवसापूर्वी केव्हातरी तेथील देव लपवून दुसऱ्या राज्यात नेल्याचे त्या पाद्री मंडळास तेथे कळले आणि ती रिकामी इमारत त्या पाद्री मंडळाने चर्च स्थापण्या-साठी सरकारकडे मागितली व सरकारने ती इमारत तर दिलीच, पण त्याच बरोबर त्या देवालयाच्या उत्पन्नाच्या जमिनीही त्या भावी चर्चसाठी सरकारने सुपूर्द केल्या !

हे पुरावे पाहून असे म्हणावयास हरकत नाही की, जर ता. १ मे १५६० दिवसापूर्वी कुठ्ठाळ गावच्या देवालयातील देव त्याच्या कुळावी लोकानी लपवून दुसऱ्या राज्यात नेल्याचे स्पष्ट आणि निःसंशयपणे सिध्द होते कारण, प्रत्यक्ष झेझुइट पंथाचे पाद्रीमंडळ आपल्या तत्कालीन पत्रव्यवहारात नमूद करते, तर त्याच कुठ्ठाळ गावच्या सीमेजवळ असलेल्या शंखवाळ गावातील देवस्थानच्या कुळाव्यानी त्या देवस्थाना-तील आपली दैवते जी शंखवाळ गावाबाहेर स्थलांतर करून नेली आहेत, ती ता. १ मे १५६० दिवसापूर्वी म्हणजे झेझुइट पाद्रीमंडळ त्या कुठ्ठाळ गावात प्रवेश करण्यापूर्वीच, बाटाबाटीच्या आणि मूर्ती भंजनाच्या भयाने स्थलांतर करून खचित गेली असली पाहिजेत, याबद्दल आणखी शंका, संशयास जागा आहे, असे मानण्याचे कारण नाही.

कारण उलटपक्षी ती दैवतें शंखवाळ गावात तशीच असती तर, ती परत त्या दैवतांच्या कुळावी महाजनाना बाटाबाटी आणि भंजनाशिवाय मिळाली असती काय ? मग स्थलांतर केलेली दैवतें त्या तारखे-पूर्वीच तेथून हलविली गेली असली पाहिजेत हे उघडच दिसते.

यात आणखी शंका येण्याचे कारण नाही. त्या स्थलांतराबद्दल 'कोंकणाख्यान' या ग्रंथात जो उल्लेख आहे, तोही वाचकापुढे ठेविल्यास त्यामुळे योग्य तो बोध होण्यास मदत होईल म्हणून तोही खाली दिला आहे.

'कोंकणाख्यान' हा ग्रंथ शके १६४३ प्लव नाम संवत्सर म्हणजे इ. स. १७२१ साली लिहिलेला आहे. या ग्रंथ निर्मितीस आज २६४ वर्षे उलटली आहेत. या अडीच शतकांपेक्षा जास्त वर्षे झालेल्या ग्रंथात 'दैवतांचे स्थलांतर' या प्रकरणात त्या ग्रंथ निर्मात्याने काय लिहून ठेविले आहे याची माहिती घेतल्यास मोठी उद्बोधक ठरू शकेल.

पहा :– अध्याय ८ वा :–

'दैवतांचे स्थलांतर'

श्रीगणेशाय नमः ॥ ऐसें असतां यानंतर विघ्न उदेलें महाथोर ॥
द्वीपांतीचे म्लेंच्छ टोपीकर ॥ गोमांचल नगरी प्रवेशले ॥ १ ॥

देशामाजी मुख्य नगर ॥ गोमांचल क्षेत्र अति पवित्र ॥
तेथें पातले अपवित्र ॥ पीडा अपार पैं केली ॥ २ ॥

पीडा आरंभिली नानापरी ॥ उत्पात केले महाथोरी ॥
मग देव क्षेत्रा बाहेरी ॥ परतीरी प्रवेशले ॥ ३ ॥

सासष्टीचे तीसवाडीचे देव ॥ आणि बारदेशाचे सर्व ॥
कोणेस्थळी गेले तो ठाव ॥ सांगेन निर्वाह सर्व पैं ॥ ४ ॥

सासष्टी देशामाजी वाहिले ॥ म्हाडगावीचे देव रिवणास आले ॥
कुडतरी ग्रामीचे पातले ॥ चंद्रवाडी वेळ्ळासी ॥ ५ ॥

कुशस्थळी श्रीमंगेश प्रियोळी ॥ वेरणे म्हाळसा म्हाडदोळी ॥
शंखावळी देव दोन्ही स्थळी, ॥ केरी आणि वेलिंगासी ॥ ६ ॥

वेलिंगासी नरसिंह सांतेरी ॥ विजयदुर्गा ते केरी माझारी ॥
आणि केळोशीची शांतादुर्गा बरी ॥ राहिली कवळे ते ग्रामी ॥ ७ ॥

वरील सर्व माहितीचे अभ्यासपूर्वक, बारकाईने निरीक्षण करणाऱ्यास शंकाच राहत नाही की, क्रमांक ६ आणि ७ व्या ओंव्यात कथिल्याप्रमाणे शंखावली गावातील देव त्या देवाच्या कुळाव्यानी स्थलांतर करून केरी आणि वेलिंग या दोन गावात नेले आहेत. हे स्थलांतर इसवी सन १५६० तारीख १ मे पूर्वी बाटाबाटीच्या आणि मूर्ती भंजनाच्या भयाने, आपल्या शेजारी कुठ्ठाळ येथील श्रीमंगेश देवाच्या कुळाव्यानी ज्या प्रमाणे प्रसंग ओळखून आपला कुलदेव कुठ्ठाळहून अचानक आणि आकस्मिकपणे रातोरात लपवून छपवून अंत्रुज-फोंडा प्रांतात प्रियोळ गावी नेला, त्याच प्रमाणे अंत्रुज-फोंडा प्रांतात स्थलांतर करून नेले असले पाहिजेत याची खात्री पटते.

वरील विवेचनावरून कुठ्ठाळ आणि शंखवाळ परिसरातील देवालयातील प्रमुख दैवतें तत्कालीन राजसत्तेच्या सरहद्दीबाहेर लपवून छपवून, गुप्तपणे आकस्मिकरित्या, काळोख अंधाराच्या आश्रयात, त्या दैवतांच्या कुळावी महाजनानी स्थलांतर करून नेली असल्याचे सिध्द झाले.

पण, मुद्दाम एक गोष्ट व्यवहार्यपणे लक्षात घेणे अत्यावश्यक आहे आणि ती ही की, ते स्थलांतर ज्या भयानक प्रसंगात करणे प्राप्त झाले, ते करताना ते करणाऱ्याच्या जीवावरचा, जीवनमरणाचा पूर्ण धोका

पत्करूनच ते त्यानी केले. कारण, ते स्थलांतर करताना दैववशात् त्याना वाटेत धर्मवेडे, जुलमाने बाटाबाटी करून झेझुइट पंथाचे लोक मूर्तीभंजन करणारे, जर भेटले तर मरण ओढणार; शिवाय मूर्तीभंजन तर नक्कीच.

यासाठी, ते स्थलांतर करताना मुख्य प्रमुख दैवताचे प्रतीक लिंग, किंवा लपवून छपवून नेण्यासारखी धातूची किंवा पाषाणी अगदी लहान मूर्ती बरोबर घेऊनच ते स्थलांतर केले तरी तडीस नेणे हे अपरिहार्य होते हे समजू शकते म्हणून, अशाच प्रकारे दैवतांचे स्थलांतर त्या प्रसंगी झाले हे उघड आहे.

कारण, प्रत्येक देवालयात प्रमुख पंचायतन किंवा आणखी दैवतांच्या ज्या मोठमोठ्या पाषाणी जड वजनी मूर्ती, त्या तेथून हलविणे आणि त्या उचलून तेथून दुसऱ्या राज्यात लांब नेणे हे काम सहजासहजी एका इसमाच्या किंवा दोन इसमाच्या शक्तीबाहेरचे तर आहेच, व वजनी पाषाणी मूर्ती घेऊन रात्रीच्या काळोख अंधारात धावत पळत जाणे तर अशक्यच, म्हणून त्या तशा वजनी मूर्ती आणि त्या देवालयाच्या इमारती जागच्या जागी राहिल्या.

आपले दैवत प्राणापलीकडे मानून ज्यानी बाटाबाटीच्या भयाने जीवावरचा धोका पत्करून ते दैवत दुसऱ्या राज्यात स्थलांतर करून नेले, तेच कुळावी महाजन आपल्यामागे येथे राहिलेल्या देवालयाच्या इमारती व त्यात असलेल्या पाषाणी मूर्ती आपल्याच हातानी मोडून नामशेष करणे कसेच शक्य नव्हते.

म्हणून, आपल्या पश्चात् काय होईल ते होवो, त्यास कोणाचा इलाज नाही असे मनात आणून मोठ्या दुःखीत अंतःकरणाने सर्वस्वावर तिलांजली देऊन ते स्थलांतर करणारे आपल्या बरोबर आपले मुख्य प्रमुख दैवत घेऊन पोर्तुगीज सरहद्दीबाहेर गेले.

त्यांच्या मागे येथे झेझुइट पंथाचे लोक जे प्रत्येक गावात फिरून तेथील दैवतांची व देवालयाची, इमारतीची मोडतोड, मूर्तीभंजन, लोकाची बळजबरीने बाटाबाटी करीत असत, त्यांचा हा अत्याचार आणि धुमाकूळ चालूच होता आणि असा हा कार्यक्रम ते नित्य करीत असत.

शंखवाळ गावातील देवालयाच्या इमारतीस दैवताच्या स्थलांतरनंतर त्यानी तशाच आगी लावल्या, इमारती संपूर्णपणे मोडून उध्वस्त केल्या.

याबद्दलचा सविस्तर माहितीसहित साद्यंत वृत्तांत फ्रँ. ग्रोमिस व्हाज ते कृत्य करणाऱ्या झेझुइट पंथाच्या पाद्री अधिकाऱ्याने आपल्या ता. १७ मार्च १५६७ च्या एका पत्रात आपण केलेल्या कृत्यांचा रिपोर्ट आपल्या वरिष्ठास सादर करताना दिलेला आढळतो. ही पत्रे त्याकाली फार गुप्त होती. पण, आता चारशे वर्षाच्या दीर्घ कालानंतर त्या सर्व पत्रांचा, रिपोर्टाचा समावेश जसाचा तसा, तत्कालीन ऐतिहासिक घटनाचा एक मोठा प्रचंड इतिहास ग्रंथ, इटालीच्या रोम शहरात छापलेला आहे. त्या ग्रंथाच्या भाग ७ वा, (इसवी सन १५६६-१५६९) पृष्ठ ३९२-३९३ नंबर ९० Fr. Gomes Vaz, S. T. P. (LEONI HEN RIQUES S.I.) ET SOCIEIS (LUSITAN.E) Goa, 12 Dezembro dt. 1567 मध्ये जे पत्र आहे, त्या पत्रावरील अत्यावश्यक, कल्पना येण्यापुरता, शंखवाळ गावच्या देवालयासंबंधात जो मजकूर आहे, तोच खाली दिला असून, त्या पुढे त्या मजकूराचे संक्षिप्तात मराठी भाषेत भाषांतर करून दिले आहे. त्याचे कारण, तो मजकूर मूळ पोर्तुगीज भाषेत आहे. व वाचकाना ती भाषा न समजणाऱ्यास, भाषांतरावरून वस्तुस्थितीची माहिती होऊ शकेल.

Documenta Indica. Vol. VII. Pagina 392-393.

600)–50. Oje 2a feira 17 dias do mes de Marco estando na minha fortaleza as tres horas da meya noite nao podendo dormir com muitas ocasioes que me desenquietavam determinei de empregar este dia e este 40 da noite da maneira que na outra vida me nao fosse pedido conta de ociosidade.

Embarquei com determinacao de ir a ver a V. R. a essa nova igreja de S. Philippe e tanto que o nao achei determinei de empregar este dia em louvor da morte e paixao de Christo N. Senhor.

Fui-me pela aldeia de Sanquoali e como tenha guerra campal com os diabos, a comecei com o desejo que trazia de servir a Deos N. Senhor. E por achar pequenas forcas no diabo e em mim g ande esforco com os companheiros que trazia sossobramos o primeiro paguode que esta a par do bandel de, Sanqoali e o paguode Daro e o outro Pormando e outro Narana e outro Baguonti e Hosporo, e Ajocini e Chrasta cemai de maneira que o surieantes ficaram tais, que delles a fogo e delles a ferro, fica V. R. s tisfeito da afronta que diz que ficarao, e a igreja desafrontada de roins vezinhos.

51 – O paguode grande de Sanquoalli que se chama Cantari tem boa madeira e perto de mar; sua senhoria a pode dar ao bem-aventurado S. Lourenco. Pode dar por nova aos Padres do Colegio que de quatro partes dos paguodes destas terras as tres sao ja ou feitas em poo ou derribadas. Fico pera servir a V.R. como seu. Aos 17 dias do mes de Marco de 1567.

वरील मजकूराचे संक्षिप्त भाषांतर

“आज सोमवार ता. १७ मार्च मी किल्ल्यात असताना मध्यरात्री २ वाजता मला या पूर्वीच्या अनेक प्रसंगाप्रमाणे, शांतपणे झोप घेणे शक्यच नव्हते. कारण या दिवसाच्या रात्रीचा चवथा भाग, मला ही वेळ रिकामटेकडेपणा घालविल्याचे पाप या जन्मात करून त्याचे प्रायश्चित मला पुढच्या जन्मात भोगावे लागेल याबद्दलची अस्वस्थता मनाला वाटत होती. म्हणून, मी सां फिलीपचे चर्च (हे चर्च म्हणजे कुठ्ठाळ गावचे, वाचकाच्या माहितीसाठी कळवित आहे). पाहण्यासाठी म्हणून निघालो. पण, तसे घडून येण्यापूर्वीच आजचा दिवस खिरस्तु नोस्सु सिंजोर देवाच्या मृत दिवसाच्या पुण्य स्मरणार्थ मी घालवावा असे ठरवून शंखवाळ गावात गेलो.

तेथे स्थानिक लोक माझ्याविरुध्द दोन हात करण्यास सिध्द होऊन आलेल्याचा मी पराभव केला आणि मी माझे आयुष्य ईश सेवेस खर्च करण्याची माझी इच्छा सफल करून घेतली. माझ्या सहाय्यासाठी बरोबर नेलेल्या लोकाच्या प्रतिकार शक्तीचा अंदाज प्रतिस्पर्धी यानी घेतला आणि त्यानी मोठा हाहाःकार माजविला.

पण, मी शंखवाळ येथे असलेल्या पहिल्या देवालयाच्या शंखवाळ सीमेवरच्या दैवताच्या, तसेच परममेद, नारायण, भगवती, ईश्वर, अजोशिणी, क्रास्तासिमाई या दैवतांच्या देवालयांच्या इमारतीस आगी लावून भस्म करून अशा प्रकारे टाकल्या की, त्यामुळे व्हॉईसराय फार संतोषी आणि पूर्ण समाधानी पावतीलच पण, शिवाय, आसपासच्या चर्चकडे वाकड्या नजरेने पाहण्याचे धाडस करणे कोणासच शक्य होऊ नये.

शंखवाळचे सर्वात मोठे देवालय ज्याला सांतेरीचे देवालय म्हणतात, त्या देवालयाच्या इमारतीचे लांकूड फार चांगले आहे आणि ते समुद्रानजिकच आहे. व्हॉइसरायना ते मोठ्या नशिबवान सां लॉरेंसला देता येईल. (सां लॉरेंस म्हणजे शंखवाळच्या पैलतीरावर आगशी गावात उभारलेले चर्च)

ही सर्व महत्वाची नवीन बातमी कॉलेजच्या पाद्री लोकाना कळवावी. आणि सांगावे की, या आसपासच्या परिसरातील तीन चतुर्थांश देवालयाचा फडशा उडवून, त्यांच्या इमारती मोडून त्यांचे अक्षरशः पीठ करण्यात यश मिळवून आपण चांगली ईशसेवा केल्याचे सांगावे. ता. १७ मार्च १५६७.

वरील भाषांतर तात्पर्यार्थ असून त्याचा मूळ मजकूर तत्कालीन पोर्तुगीज भाषेत आहे. आणि तो मूळ पोर्तुगीज भाषेतील ज्यांस पाहवयाचा असेल, त्या जिज्ञासू वाचकानी "दोकुमेंता इंदिका" खंड ७ वा (इ. स. १५६६–१५९९) पृष्ठे २९२-२९३ नंबर ९० फ्रँ. गोमिस व्हाज, एस. आय. पी. (लेवोनि येरिरीकस, एस. आय.) यत् सोसियेइस (लुझितानियें), गोवा, १२ डिसेंबर १५६७ ग्रंथ पाहून खात्री करून घ्यावी.

ही सर्व माहिती मुद्दाम येथे प्रयत्नपूर्वक देण्याचे कारण असे की, श्रीलक्ष्मी-नृसिंह दैवत जे प्राचीन-काली शंखवाळ गावात होते ते तेथून बाटाबाटीच्या भयाने स्थलांतर करून फोंडा तालुक्यात आणल्या नंतर त्याच काली म्हणजे इ. स. १५६० सालानंतर शंखवाळ गावात मूळ दैवताची जी देवालयाची इमारत होती, तसेच दैवताच्या इतर देवालयाच्या इमारती ज्या सर्व उभ्या होत्या, त्या सर्व इमारती ता. १७ मार्च १५६७ रोजी जाळून मोडून विध्वंस केल्या आहे, याचा पुरावा वरील माहितीत मिळतो.

झेझुइट पंथाचे लोक बाटाबाटी करणारे पाद्री, हिंदूधर्मीयानी आप-आपली दैवते जरी दुसऱ्या राज्यात हलविली, म्हणून त्या पाद्रीच्या तावडीत सापडली नाहीत, तरी त्या पाद्रीचा त्वेश आणि राग यामुळे मागे राहिलेल्या देवालयाच्या दैवताशिवाय इमारती, ते जाळून मोडून टाकीत. कारण, परत त्या इमारतीत कधी काळी हिंदू दैवते पुन्हा स्थापू नयेत म्हणून. व त्यासाठी, त्या काली, मुद्दाम कायदाही सरकारने जारी केला होता की, एकदा मोडून टाकलेली देवालये पुन्हा बांधू नयेत किंवा नवीन देवालये बांधण्यास पूर्ण बंदी घातली.

शंखावली (सांकवाळ) गावात श्रीलक्ष्मी-नृसिंह देवस्थान उत्पत्ती संबंधी दंतकथा

शंखावली गावात श्रीलक्ष्मी-नृसिंह देवस्थानाच्या उत्पत्ती संबंधात थोडीशी दंतकथारूप माहिती प्राचीन कालापासून उपलब्ध आहे, ती किती विश्वसनीय आहे हे आजच्या कालात निश्चितपणे ठरविता येणे अशक्य असले, तरी तिचा उल्लेख करणे प्रशस्त वाटते. कारण एकेकाळी ज्यास दंतकथा अशा नावाने संबोधित, त्याच दंतकथा कालांतराने इतिहास होऊ शकतात असा नामांकित इतिहास तज्ञाचा अनुभव आहे.

सासष्टी प्रांतात, शंखावली (सांकवाळ) म्हणून जो गाव आहे, तेथे हे देवस्थान प्राचीन काली उदयास आले. पण हे श्रीलक्ष्मी-नृसिंह देवस्थान तेथे उदयास येण्यापूर्वी श्रीविजयादुर्गा आणि श्रीसांतेरी म्हणजे आजची श्रीशांतादुर्गा ही दोन देवस्थाने त्या गावात होती आणि त्याच बरोबर आणखीही दैवते आणि त्याची देवालये तेथे होतीच याची खात्री आहे. याचा पुरावा पोर्तुगीजानी जी सासष्टीतील अनेक गावातील देवालयाच्या इमारती (त्यातील दैवते स्थलांतर केल्यामुळे दैवाशिवाय राहिल्या होत्या) मोडून टाकलेल्याची यादी सरकारी ऐतिहासिक दप्तरखान्यातील वह्या हस्तलिखिते, कागदपत्र वगैरेवरून उपलब्ध आहे, त्या यादीवरून शंखावली गावात कोणकोणती दैवते आणि देवालये होती हे समजून येते. त्या दैवतामध्ये 'नरसु' या नावाचे एक दैवत होते, ते श्रीलक्ष्मी-नृसिंह देवासंबंधी असावे की काय हे नक्की खात्रीपूर्वक जरी सांगता येत नाही, तरी पण 'नरसु' आणि 'नृसिंह' या दोन नावात साम्य दिसते म्हणून उल्लेखित दंत-कथा जरी नृसिंह देवस्थान उत्पत्तीबद्दल आहे तरी त्यातील माहिती उपयुक्त आहे यात संशय नाही. शंखवाळ गावात प्राचीन काली म्हणजे स्थलांतरपूर्व काली, जी दैवते आणि त्याची देवालये होती ती अशी :– सांतेरी, ईश्वर, गांवपुरुस, धारोजसीणी, नारायण, भगवती, अजोशिणी (विजयदुर्गा) नरसू, परममेद.

वर उल्लेखित सर्व दैवताचे उपासक सात गोत्राचे ब्राम्हण होते. काही कालानंतर कोणी एक 'नायक' उपनावाचा सारस्वत ब्राम्हण कर्नाटक प्रांतातून आपल्या आराध्य श्रीनृसिंह शालिग्रामाचे दैवत बरोबर घेऊन या शंखावळी गावात येऊन पोचला. तो कर्मनिष्ठ ब्राम्हण पूर्वोक्त देवालयाच्या आवारात असलेल्या एका प्रशस्त तलावावर आपले देवतार्चन करीत मोठ्या आनंदाने त्याच गावात राहीला होता.

गावातील लोकाची त्याच्या विषयी पूज्यबुध्दी वाढत चालली व त्यालाही हे रम्य स्थल पसंत पडून काही काल तो तेथे वास्तव्य करून राहिला. शंखावली गावातील लोकाची शेजारच्या कुशस्थली उर्फ

कुठ्ठाळ गावकरी लोकाशी स्पर्धा चालली होती. उभय ग्रामस्थ मंडळीत गावाच्या सीमा निर्णयाविषयी बराच काल पार्वतो वांधा चालला होता. कुठ्ठाळ्कर गावकरी त्या काली हे जरा जोमदार आणि संघशक्तीनें मातब्बर, यामुळे शंखावलीकरांच्या सीमेंतील बराच भाग शक्तीच्या जोरावर आपल्या गावात सामील करून घेऊन त्याचा उपभोग बळकटीनें घेत होते. पुन्हाः पुन्हाः सीमा निर्णयाचा हा तंटा उपस्थित होत असे. व शिरजोरपणे कुठ्ठाळ्कर आपली ग्रामसीमा पुढे पुढे ढकलीत जात असत. शंखावलीकर टेकीस आले होते. एकदा या सीमेचा कायमचा निर्णय होऊन आपसातील तंट्याचे हे बीज कायमचे नाहीसे व्हावे असे त्यांना वाटे. पण, कुठ्ठाळ्कराशी त्याचा उपाय चालेना.

गावात अलिकडेच येऊन राहिलेल्या ह्या त्रयस्थ ब्राम्हणाविषयी उभय ग्रामस्थाना आदरबुध्दी होती. एक वेळ हा सीमावाद जास्त निकरावर आल्यावेळी शंखावलीकरानी सदर ब्राम्हणास ह्या प्रकाराचा त्रयस्थ बुध्दीनें आपण निकाल करून द्याल तर भारी उपकार होतील अशी विनवणी केली. कुशस्थलीकराना ही गोष्ट मान्य होण्यासारखी आहे तर पहा, असे त्या ब्राम्हणाचे म्हणणे पडले. तदनुसार, कुशस्थलीकराचा विचार घेऊन उभयपक्षी मंडळीनें सदर त्रयस्थ ब्राम्हण सीमेविषयी आमचे दाखले वगैरे पाहून निर्णय जो देईल जो मान्य करावा असे ठरविले.

ह्या ब्राम्हणानें उभयपक्षीयास समक्ष आणून आपण जो निर्णय करू तो तुम्हास मान्य आहे काय ? असा प्रश्न केला. ब्राम्हणाच्या देवीनिष्ठतेवर व सच्छिलतेवर विश्वासून उभयपक्ष त्यावर निष्ठा ठेवून ब्राम्हणाने मी परकी मनुष्य तुमचे दाखले व इतर कागद-पत्र किंवा भोगवटा हा मला कसा कळेल ? तेव्हा मी निर्णयाची अशी योजना केली आहे की, ह्या माझ्या झारीत पाणी भरून तिची धार ह्या स्थलापासून लावीत जाईन. ती जेथे संपेल, तेथे गावची सीमा पुरी झाली असे समजावे. असे केल्यास ते तुम्हास मान्य आहे काय ? असा प्रश्न केला.

कुडथालीकराना ते म्हणणे मान्य झाले. झारीतील पाण्याची धार कितीशी लांब जाईल, असे त्यास वाटले, व ते ह्या गोष्टीस मान्य झाले. शंखावलीकरानीही त्या गोष्टीस रुकार दिला. ब्राम्हणानें आपल्या झारीतील पाणी अभिमंत्रित करून त्याची धार सुरू केली व ती कुशस्थलीचा बराचसा भाग शंखावलीत समाविष्ट होईपर्यंत संपेनाशी झाली.

देवापुढे उभयपक्षीयानी आणाभाका केल्या असल्यामुळे ह्या रीतीनें केलेला निर्णय निमूटपणे मान्य करणे कुशस्थलीयाना भाग पडले. पण, ब्राम्हणानें पक्षपात बुध्दीनें निवाडा केला ही अढी कुठ्ठाळीकराच्या मनातून गेली नाही. ते त्या ब्राम्हणाविषयी पुढे द्वेष बाळगून होते.

कोणे एके दिवशी तो ब्राम्हण निजला असता, संधी साधून त्याचे देवदेवतार्चन गुपचुप तलावात फेकून त्यानी आपला सूड उगविण्याचा मतलब सिध्दीस नेला. आपल्या नृसिंह शालिग्रामाची पूजा केल्या-वाचून अन्न घ्यावयाचे नाही, असा त्या ब्राम्हणाचा नित्य नियम होता. अर्थात तो शालिग्राम नाहीसा झाला तेव्हा, त्या निग्रही ब्राम्हणानें अन्न वर्ज करून खडतर उपोषण सुरू केले.

दोन दिवस या प्रमाणे गेल्यावर तिसऱ्या दिवशी त्या ब्राम्हणास स्वप्नात देवानें सांगितले की, समोरच्या तलावात बुडी देऊन जे तुझ्या हाताला लागेल तोच मी आहे असे समजून त्याची पूजा कर व अन्न सेवन कर. या दृष्टांतानें ब्राम्हणाची व इतर लोकांचीही, तलावात देव्हारा फेकून दिला असला पाहिजे, अशी समजूत होऊन चुकली.

ब्राम्हणानें तलावात बुडी दिल्यावर त्यास हात सव्वाहात लांबीचे एक पाषाणमय लिंग हाती लागले. त्याची नृसिंह भावनेनें पूजा उरकून ब्राम्हण जेवला. पुढे तलावात जास्त शोध केल्या अंती सर्व देवता-र्चनाच्या साहित्यासह नृसिंह शालिग्रामही सापडला. पुढे त्या ब्राम्हणानें सदर लिंगाला नारसिंहावताराच्या कल्पनेला जुळेल असे 'स्तंभ' हे नाव कल्पून त्यावरच आपल्या नृसिंह देवताची स्थापना करून त्यासह पूजा अर्चा चालविली.

शंखावलीतील उभय दैवस्थानाच्या आराधकानी नंतर त्या ब्राम्हणाचीही उपास्य दैवता स्वतंत्र दैवालयात स्थापना करून त्या ब्राम्हणास आपल्यात पूरे मिळवून घेतले. म्हणजे आपल्या उभय दैवस्थानातही त्याला अधिकार (वांगड) देऊन कृतज्ञता व्यक्त केली. ह्या ब्राम्हणाचे 'कौत्स' गोत्र व त्याचे शंख, पिंगल व कुत्स हे प्रवर होत. तोच पुढे शंखावलीकर उपनावाने प्रसिध्दीस आला.

या दंतकथेवरून श्रीनृसिंह दैवस्थान शंखावलीत नंतर अस्तित्वात आले व तेथील दैवस्थानाचा अधिकार ह्या 'नायक' उपनावाच्या घराण्यास मागाहून मिळाला असा इत्यर्थ निघतो. व त्याचे प्रत्यंतर त्या पुरुषाच्या गोत्रजास श्रीनृसिंह दैवस्थानात कोणतेही दैवकृत्य केल्यावर गोठण येथील श्रीशांतादुर्गेस व केरी येथील श्रीविजयादुर्गेसही अभिषेक वगैरे दैवकृत्य करावे लागते. यावरून मिळते. वैष्णव मतानुसार मूळच्या शिवलिंगास 'स्तंभ' संज्ञा मिळून ते श्रीनृसिंहस्थान बनेल हाही तात्पर्यार्थ निघतो.

'श्रीसाधन नृसिंह' म्हणून जे परिवार दैवतातील एक दैवत आहे, ते दैवत या मूळ संस्थापकाची 'पुरुषाची' मागाहून त्या कुळातील वंशजानी स्थापन केलेली प्रतिमा आहे, असे दिसते.

अतिप्राचीन पुराणकालात शंखावली नगरीची परिस्थिती आणि धार्मिक माहात्म्य

श्रीलक्ष्मी-नृसिंह दैवस्थान इसवी सनाच्या सोळाव्या शतकाच्या पूर्वार्धापर्यंत सासष्टी तालुक्याच्या शंखावली गावात मोठ्या वैभवात वसत होते. आजच्या कालात या गावास शंखवाळ या नावाने ओळखत असले, तरी अतिप्राचीन कालात शंखावली नगर या नावाने ओळखत असत. या अतिप्राचीन कालात या शंखावली नगरीचे माहात्म्य दैवधर्माच्या बाबतीत काय होते, हे जाणून घेण्याची उत्सुकता जिज्ञासू वाचकाना असणे स्वाभाविक आहे, हे जाणून त्या संबंधी संशोधनपूर्वक शोधाशोध करता जी माहिती उपलब्ध होऊ शकली, तीच जिज्ञासू वाचकासमोर ठेवण्याचा प्रयत्न केलेला आहे.

भारतीय पुराणाच्या समृध्द परंपरांत स्कन्दपुराणांतर्गत सह्याद्री खंडाचे स्थान फार वरचे आहे. प्राचीनतेच्या दृष्टीने त्याची तुलना काशी, कांची, अवन्तिकेच्या तोलाची व मोलाची आहे. उत्तरेस भडोचपासून दक्षिणेस केरळमधील मोठ्या भागाचा समावेश असलेल्या सह्याद्रीच्या ह्या परिसरात वास करणाऱ्या प्राचीन जाती, जमाती, त्यांचे आचारविचार व चालीरिती, त्यांची तीर्थक्षेत्रे व दैवस्थाने इत्यादिचे विस्तारपूर्वक उल्लेख व त्याच बरोबर या निसर्गरम्य प्रदेशाचे सौंदर्यात्मक वर्णन, या साऱ्यामुळे या ग्रंथाला सांस्कृतिक, वाङ्मयीन तसेच, इतिहास संशोधकाच्या दृष्टीने वेगळे व आगळे असे सर्वांगीण महत्त्व आहे. अशा या महत्त्वपूर्ण ग्रंथात, शंखावली माहात्म्यम्, शंखासुर वध, शंखावल्याख्यान कथनम्, कालान्तक वधः, विजयामाहात्म्यम् असे अध्याय मूळ संस्कृत भाषेत आहेत. त्यातील उल्लेखित पहिल्या फक्तच तीन अध्यायातील अत्यावश्यक भागाचे मराठी भाषेत रुपांतर केलेले खाली दिलेले आहे.

शंखावली नगरीचे माहात्म्य

गोमंतकाच्या दक्षिणभागी समुद्राजवळ शंखावली नावाची एक शोभायमान व पवित्र नगरी आहे. स्वर्गालाही तुच्छ करणाऱ्या या धनसंपन्न नगरीत श्रेष्ठद्विज राहत असत. ते कधी व्यग्रचित्त नव्हते. तेथे चार वर्णाचे आणि चार आश्रमाचे लोक राहत असत. ती नगरी आंबाडा, निंब व नारळीच्या वृक्षानी सुंदर दिसत होती.

कल्पवृक्षाचे पल्लव, बकुल, पांगार आणि कस्तुर मोगरा हे वृक्ष तिला वारा घालीत होते. समुद्रही आपल्या गंगामिश्रित तरंगानी तिला वारा घालीत होता; व तो वारा तेथील उद्यानातून सतत वाहत होता; तेथील अरण्यात कुश, काश, नीम, निचुळ, खैर आणि पळस हे वृक्ष शोभत होते; तेथील वेदपारांगत ब्राम्हणानी मंत्र, औषधी, तप व योग यांच्या सामर्थ्याने मृत्युलाही जिंकले होते; तेथील श्रेष्ठ पतिव्रता स्त्रिया अधर्मरूप पाण्यावरील सेतु व जगत्कारण होत्या. जणु दक्षकन्या प्रमाणे असलेल्या त्या स्त्रिया गृहस्थधर्मात तत्पर, असून त्यांच्याजवळ कुबेरापेक्षाही अधिक संपत्ती होती. त्या विभागाची सत्ता असलेले व अमृत-

धवल असे तेथील चुनेगच्ची वाडे जणू चंद्राला हसत होते. ती नगरी इषुपात नामक रामक्षेत्राचा एक अलंकार होता व अधर्मी मर्त्यांना शिक्षा करणारे चित्रगुप्ताचे मंदिर होते.

येथे रोज समुद्रातून शंखाची एक आयली म्हणजे पंक्ती किंवा रांग येत असे. म्हणून तिला शंखावली हे नाव पडले होते. हे एक मोठे मुक्तीक्षेत्र आहे. ज्या प्रख्यात मुक्तीपुरी आहेत, त्याहून ही कमी प्रतीची नाही. कारण, या नगरीत कमलनयन सनातन भगवान् श्रीविष्णु भक्तावर अनुग्रह करण्यासाठी स्वतः येऊन राहिले आहेत.

ज्याच्या दर्शनाने प्राणी, संसार बंधनातून मुक्त होतो, तो मुक्तीदाता श्रीमहाविष्णु येथे आहे. ज्यानी कालसदृश अतिमत्सरी दैत्यराजाचा वध केला. ते मूडानिपती, उग्रकामना पूर्ण करणारे श्रीशंकर येथेच वास करतात. त्याची केवळ कथा ऐकल्याने पुरुष देवलोकी येतो. देव, असुरेंद्र, मानव, योगी, द्वेष्टे आणि तपस्वी या सर्वांना जो निर्विकल्प फल देतो, तो श्रीभवानीपति सिध्देश्वर श्रीशंकर येथेच असतो. इच्छित परिपूर्ण करणारा विभुशंकर अर्धांगी भवानीसह येथेच असतो. येथे श्रेष्ठ मुनीचे अनेक आश्रम असून त्याच्या केवळ दर्शनाने पापनाश होत असे. येथेच विष्णुक्रांतादि वनस्पतीमुळे सुंदर दिसणारे बदर्याश्रम व पैंग्य ऋषीचा आश्रम होता. यात मोठा धर्मात्मा व सुव्रत असा एक सिध्द पुरुष एकाग्र मनाने श्रीशंकराची आराधना करीत होता.

तो भाग्यशाली श्रेष्ठ सिध्द एका बोरीच्या झाडाखाली तप करीत बसला असताना एक दिवस एक राक्षसी आली ती राक्षसी पूर्वजन्मी सुमुखी नावाची ब्राम्हणकन्या होती. पण, ती पतिद्वेष्टी नेहमी जारकर्मात गर्क असे. ती व्यभिचारिणी नेहमी ब्राम्हणनिंदा करीत असे. या सर्व कर्माचा परिणाम म्हणून ती राक्षसी झाली होती. तेथेही सर्व स्त्रियांना भीतिप्रद बनली होती.

एकदा ती वाघ बनून स्त्रियाना घाबरवू लागली. तेव्हा तिचे ते भयंकर रूप पाहून स्त्रियानी आक्रोश केला. त्याचा तो आवाज ऐकून सिध्द पुरुषाला फार दुःख झाले. तो विश्वेशाला शरण गेला व म्हणाला, 'हे विश्वेशा रक्षण कर, रक्षण कर. मी भयाने व्याकुळ झालो आहे, माझे रक्षण कर.' हे त्याचे करुण वचन ऐकून दीनवत्सल शूलपाणि पिनाकधारी भगवान् श्रीशंकर तेथे प्रकट झाले. व त्याच्या केवळ हुंकाराने ती द्विजकन्या जमिनीवर पडली.

सिध्द पुरुषाने आराधना केल्यामुळे त्या ईश्वराचे सिध्देश हे नाव जगात प्रसिध्द झाले. त्या सिध्देशाला बदरीवननिवास आवडला. सिध्देशाच्या चरणकमली भक्ती जडलेल्या मानवाचा अधःपात भव-सागरात हजारो कल्पकालानीही होणार नाही.

मुंगी, हत्ती किंवा मनुष्य असो, सर्वांचे मनोरथ या सिध्देश लिंगाच्या दर्शनाने सफल होतात. जो मनुष्य हा संपूर्ण अध्याय पठन करील किंवा ऐकवील तो सर्व पापमुक्त होऊन श्रेष्ठ गतीला जाईल.

शंखासुर - वध

अगस्त्य म्हणाले, 'हे सर्वज्ञ प्रभो भगवान् तू पार्वती हृदय कमलाचा चंद्र आहेस. हे ब्रम्हन्, हे आख्यान ऐकूनही माझी तृप्ती झाली नाही. आपण पूर्वी सांगितले होते की, कमलनयन श्रीविष्णूने शंख नावाच्या नगरीत राहणाऱ्या शंखासुराला ठार मारले. अद्वितीय पराक्रमी विष्णूचा शंखासुराशी युध्द केल्याचा आद्यंत इतिहास आपण मला सांगा. शंखासुराचे आगमन व मृडानीची कथा हे सर्व विस्तार पूर्वक सांगा. कारण, आपण सर्वज्ञ आहात.'

याप्रमाणे अगस्त्याचा तो मोठा प्रश्न ऐकल्यावर षडानन श्रीलक्ष्मीपतीच्या चरणकमलाचे ध्यान करून कुंभोद्भवाला म्हणाला, 'हे मुनिवर्या, लक्ष्मी ज्याच्या चरण कमलांचे अर्चन करते, त्या श्रीविष्णूचे चरित्र मी तुला सांगतो, ऐक. पूर्वी एकदा दैत्यानी या धरणीला फारच पीडा दिली. म्हणून दैत्यभाराने आक्रांत

झालेली पृथ्वी ब्रम्हदेवाला शरण गेली. गोरूप करून तिने आपले सर्व दुःख त्याला निवेदन केले. ते ऐकून लोकेश ब्रम्हदेव व श्रीशंकर पृथ्वीसह क्षीरसागराच्या तीरावर गेले. त्यांच्या बरोबर वन्हि, इंद्र, यम, निऋति, वरुण, वायु, ईश इत्यादि सर्व चांगले लोकपालही होते. तेथे शेषशायी लक्ष्मीपतीला पाहून त्यानी चारही वेदाच्या सारभूत स्तवनानी त्याची स्तुती केली. रजोमूर्ती व शुध्द ज्ञानरूप श्रीकेशवाने ती स्तुती ऐकली व ब्रम्हा, इंद्र, त्र्यंबक प्रभृति सर्व देवाकडे पाहून श्रीविष्णूने केवळ आपल्या शब्दानीच त्याच्या दुःखाचा नाश केला. भगवान् श्रीविष्णु म्हणाले, 'देव हो, तुमचे हृद्गत मला समजले. ही पृथ्वी दैत्य भाराने व्याकुळ झाली आहे. ज्या कार्यासाठी तुम्ही आलात, ते कार्य मी करतो. यदुवंशीय आनक दुंदुभीच्या घरी जन्म घेऊन मी ह्या शेषाच्या द्वारे तुमचे ते शैल्य उपटून काढतो. मी पृथ्वीचा उध्दार करणार व पुष्कळ दैत्यनाश करून पृथ्वीचा तापही नष्ट करणार. यासाठी आपणही पृथ्वीवर चला. देवस्त्रियासुध्दा माझ्या इष्टसिध्दिसाठी जन्म घेणार आहेत.'

याप्रमाणे देवताना सांगून श्रीहरि तेथेच अंतर्धान पावले. सर्व देवहि आपआपल्या स्थानी निघून गेले. पुष्कळ कालानंतर भोजराजा बंदिवासात असता प्रतापी श्रीविष्णूने वसुदेव देवकीच्या ठिकाणी जन्म घेतला. कश्यप व अदिति यानी पूर्वजन्मी श्रीविष्णूची आराधना केली होती. त्या तपाचे फळ म्हणून श्रीविष्णूने यादव कुळात जन्म घेतला. तो वसुदेवसुत श्रीकृष्ण या नावाने प्रसिध्द झाला. शेष हा बलदेव झाला. त्यालाच संकर्षण म्हणतात. सर्व बलवान देव रघुवंशात जन्मले. सर्व देवांगनानी राजकन्या रूपाने जन्म घेतला.

श्रीकृष्णाने नरकासुराला ठार मारून त्या सर्व राजकन्याना आपल्या मंदिरात नेले. काही देवांगनानी भगवंताच्या प्रेमासाठी गोपगृही जन्म घेतला. अत्यंत अल्पमति देवाना मात्र हा बेत बिलकुल समजला नाही. नंतर भगवान् श्रीविष्णूने श्रीकृष्ण-शरीर धारण करून भूभार कमी करण्यासाठी, पूतना, अरिष्ट, कंस इत्यादि बलवान् शत्रूना ठार केले. चांदण्यारात्री महासत्व श्रीकृष्णाने व्रजस्त्रियासह रासक्रिडा केली.

हे सर्व श्रीकृष्णचरित्र तू ऐकलेच असशील. तथापि, शंखासुराचा प्रसंग म्हणून मी ते पुनः सांगितले आहे. अत्यंत बुध्दिवान् गोपवेषधारी श्रीकृष्णाने भर सभेत कंसवध करून आपली माता देवकी व पिता वसुदेव याची मुक्तता केली. भोजगृही शृंखलाबध्द करून ठेवलेल्या उग्रसेन इत्यादिकाना गोपभूषण श्रीकृष्णाने सोडविले. विश्वव्यापी श्रीविष्णूने उग्रसेनाला राज्य दिले. सर्व देवश्रेष्ठाना पृथ्वीवर आणले व पृथ्वीवर राज्य केले. त्याला आपला सामान्य पुत्र समजून वसुदेवाने त्या उभयताचे उपनयनादि मंगल संस्कार केले,

उभय पुत्राचा गायत्री व्रताचा शुभसंस्कार झाल्यावर ते दोघेही सांदीपनी गुरुच्या घरी गेले, निग्रही व मिताहारी असे ते दोघे गुरुसेवेत तत्पर राहून सांदीपनीला मोठे दैवत समजून त्याची पूजा करीत होते. सर्व विद्याचे मूळ प्रवर्तक असे ते ज्ञानी देवश्रेष्ठ चौदा विद्यामध्ये पारंगत झाले.

त्या महामति कुमारानी सांदीपनी गुरुची आनंदीत मनाने गुरूदक्षिणेसाठी प्रार्थना केली. त्या ब्राम्हण गुरूने त्याचे ते अद्भूत तेज पाहून म्हटले, 'देवोत्तमानो, चौदा विद्यांचे शुल्क द्या. बाळानो, तुम्ही माझा मृतपुत्र मला द्यावा, हीच मी तुमच्याकडे याचना करतो.'

हे ऐकून भगवान् श्रीकृष्ण म्हणाले, गुरूजी तुम्ही हे काय बोलता ? तुमचा मुलगा कसा होता व त्याला मृत्यु कसा आला, ते मला सांगा.'

लगेच सांदीपनी गुरुजी व गुरुपत्नी यांच्या डोळ्यात अश्रू आले. ते त्याला म्हणाले, 'कृष्णा मी तुला सर्व वृत्तांत सांगतो, ऐक. एकदा, सूर्यग्रहण होते. सर्व भारतीय प्रजा प्रभास तीर्थावर जमल्या होत्या. दुर्दैवी मी सुध्दा पत्नी व मुलाना बरोबर घेऊन तेथे गेलो. तेथे जमलेला तो जनसमुद्र पाहून मला धन्यता वाटली. समुद्रात काही लोक बुड्या मारीत होते, काही पोहत होते व काही होडीत बसून मौज करीत होते. त्यामध्ये माझा सुलक्षणी मुलगा स्नान करण्यास गेला. पण, तो पुनः दिसलाच नाही. मी दुःखसागरात बुडून गेलो व गळ्यात शिळा बांधून पुत्रामागून मरण्यास सिध्द झालो. पण, लोकानी माझ्या गळ्यातील

तो दगड सोडवून मला त्या कर्मापासून परावृत्त केले. अच्युता, तेव्हापासून मी स्वतःस पापी समजतो. हे जगत्पते, तुझ्या दर्शनाने मी कृतार्थ झालो. कारण, यमाच्या घरी गेलेला पुत्र परत देण्यास तू समर्थ आहेस.'

स्कंद म्हणाले, त्याचे ते भाषण ऐकून कृष्णाने द्विजोत्तमाचे सांत्वन केले, आणि रथयुक्त व सशस्त्र दारुकाचे स्मरण केले. स्मरण करताच एका क्षणात, दैत्याना भयावह अशी शस्त्रे घेऊन दारुक उपस्थित झाला, नंतर कृष्ण ज्येष्ठ बंधूसह रथात बसून जेथे सांदीपनी पुत्र पूर्वी मेला होता, त्या प्रभास तीर्थावर गेला.

शंखावलीची कथा

स्कन्द म्हणाले, श्रीकृष्ण आल्याचे ऐकून समुद्राने त्याच्याशी भाषण केले. तेव्हा सुरेश्वर श्रीकृष्णाने समुद्रास गुरुपुत्र आपल्या स्वाधीन करण्याबद्दल बजाविले. अप्रमेय श्रीकृष्णाचे ते वचन ऐकून सागर म्हणाला, 'माझ्या पाण्यात पंचजन्य नावाचा दैत्य आहे. तो वरचेवर माझ्या पृष्ठभागावर मोठ्या लाटा आणून मला पीडा देत असतो. त्याच रागीट प्राण्याने तुझा गुरुपुत्र नेला आहे. त्या महाबलिष्ठ युध्दखोराला ठार मार. ते ऐकून श्रीहरीने पाण्यात प्रवेश केला. तेथे त्या अमोघ विक्रमी श्रीकृष्णाला शक्तिशाली पांचजन्य दिसला. तो असुर आपल्या असंख्य बांधवासह श्रीकृष्णाबरोबर युध्द करू लागला. अद्भूत रूप घेऊन तो भगवंताच्या छातीवर आपल्याच वंशाचे शंख फेकू लागला.

अतिपराक्रमी भगवान् मधुसुदनालासुध्दा जोराने आदळणाऱ्या त्या शंखाचा वेग सहन झाला नाही. याप्रमाणे पाण्यात त्याचे भयंकर युध्द जुंपले. श्रीकृष्णाने शेवटी पांचजन्याला आपल्या सुंदर नखानी फाडले. त्याच्या उदरात त्याचा गुरुपुत्र दिसला नाही; पण, त्याचे अवयव व हाताचे तळवे दिसले. नंतर श्रीकृष्ण हातात शंख घेऊन सर्व असुराना धमकी देत पाण्याबाहेर ज्या भूतलावर आला तेच रामक्षेत्र होय, व तेच गोमन्तचल नावाचे रमणीय शिखर सह्याद्रीचे होय. पवित्र इषुपात क्षेत्र, बदरिकाश्रम येथे असून, श्रीकृष्ण बाहेर येताच, त्याच्या मागून पांचजन्य वंशातील महाशंखही क्रमाने यदुपतीबरोबर लढण्यासाठी आले.

श्रीभगवान् म्हणाले, 'माझे प्रेमाचे मुक्तिदायक वचन ऐका. मी रणात ठार मारलेला पांचजन्य, त्याच्या हातात असलेले अवयव ज्याचे असतील त्याच्या वंशाचाही मी उध्दार केला आहे. आपल्या कर्मानुसार यमलोकी यातना अनुभवीत असलेल्या गुरुपुत्रालाही काही कालानंतर मागून घेतले आहे. शंख हो, जे कोणी आजपासून येथे येऊन प्राणत्याग करतील ते सर्व माझ्या सान्निध येतील.'

तेव्हापासून ते शंख त्रिभुवनात पूज्य झाले. याप्रमाणे जगत्पतीने त्या शंखाना वर दिला. श्रीकृष्णही तेथेच अंशभूत राहिला. तेव्हापासून ते पवित्र क्षेत्र जगप्रसिध्द झाले. अद्यापही शंख आपला देह टाकून भगवंताच्या रमणीय वैकुंठपदी जातात. तेव्हापासून शंखावली नावाची रमणीय नगरी श्रीविष्णूच्या चरण-जलाच्या स्पर्शाने अतिपावन झाली. जेथे महिषासुराच्या वंशातील लोकासुराने डुकराचे रूप घेऊन लोकाना त्रास दिला, त्या शंखक्षेत्रात शंखाला गिरिजेने ठार मारल्यावर तो दैत्यही विष्णुस्वरूप बनला. म्हणून त्याच्याच नावाने शंखलोक हे क्षेत्र अत्यंत कल्याणकारक व मुक्तिदायक झाले.

श्रीनाल अशी श्रीची एक संज्ञा असून त्याचे ते मोठे स्थान आहे. कारण तेथे वैकुंठदर्शनासाठी श्रीकामरूपाने राहते. तेव्हापासून कमळासारखे श्रीनालक्षेत्र हे श्रीलक्ष्मीचे व श्रीनारायणाचे उत्तम संकेतगृह झाले आहे. ते पवित्र क्षेत्र मनुष्याना दुर्मिळ असे आहे. श्रीरमण हरीची जे पूजा करतात, ते पापी लोक सुध्दा कोट्यावधी जन्मातील पापातून मुक्त होतात.

स्थलांतर पूर्व कालात हे देवस्थान सांखवाळ येथे असताना त्या देवस्थानच्या मालकी हक्काच्या जमिनीची माहिती

प्राचीन काली सासष्टी तालुक्याच्या सांखवाळ गावात हे देवस्थान असताना त्या देवस्थानच्या मालकी हक्काच्या जमिनी किती, कोणत्या, कशा तऱ्हेच्या होत्या, त्यात शेती, बागायती, कुळागरे असावीत काय आणि असल्यास त्याबद्दल काही माहिती मिळेल काय ? याबद्दल संशोधनात्मक प्रयत्न करून

त्या ग्रामसंस्थेचे जुने दप्तर, तसेच, गोवा सरकारच्या पुरातत्व खात्यातील पोर्तुगीज कालीन इ. सनाच्या सोळाव्या शतकातील कागद-पत्र, हस्तलिखिते बारकाईने तपासून पाहता त्यात ता. १७ मार्च १५६८ रोजी केलेला पंचनामा सरकारी जज्जाने विधीपूर्वक केलेला मिळाला.

त्या पंचनाम्यात संखवाळ गावात असलेल्या सर्व देवालयाच्या जमिनीचा सविस्तरपणे आढावा घेतल्याचे स्पष्टपणे नजरेस आले. हा पंचनामा तत्कालीन पोर्तुगीज व्हॉइसराय याच्या हुकूमाने आणि त्यानीच नेमलेल्या आंब्रोझियु दे सॉझ नावाच्या जज्जाने संखवाळ गावात येऊन तेथे त्या गावचे तत्कालीन गावकार, कुलकर्णी, इस्क्रीव्हांव (ग्रामसंस्थेचे लिखाण करणारे सेक्रेटरी), साक्षीदारांसह तेथील हिंदु व नवख्रिश्चन इत्यादि लोक जमवून त्या सर्वाकडून प्रत्येक धर्माच्या चालीरिती रिवाजाप्रमाणे त्या प्रत्येकाकडून आपल्यासमोर प्रमाणपूर्वक शपथ घेववून, त्या सर्वाकडून, त्या देवस्थानाच्या मालकी हक्काच्या सर्व जमिनी, तसेच त्या देवस्थानचे सर्व सेवेकरी, गुरव, जोगी, घाडी, धुमाळी, नेरगुडी, भटजी, सुतार, लोहार, चितारी, कुंभार, धोबी, भंडारी, देवस्थानची हिलामत पताका वाहविणारे, कुळागरात काम करणारे, दैवताच्या उत्सव मिरवणुकीत भाग घेणारे, देवालयाच्या इमारती-घरे याची शाकारणी शिवणावळ करणारे कुंभार, नमशी नामक जमिनीचे भोगवटदार, नृत्यांगना कलावंती या सर्वाच्या भोगवटी खाली असलेल्या देवस्थानच्या सर्व जमिनीची पूर्ण यादी एकंदर सर्व माहितीसह सादर करण्यास त्या सर्वाना बजाविले.

शिवाय स्पष्टपणे ताकीद दिली की, त्यानी फक्त विश्वास आणि जबाबदारीपूर्वक सर्वप्रकारे खरी तीच माहिती दिली पाहिजे. देवस्थानच्या मालकीहक्काच्या जमिनी लपवून ठेवता कामा नये. तसेच, द्वेषबुध्दीने परकी इसमाच्या जमिनी, देवस्थानच्या आहेत अशी खोटी माहिती देऊ नये. जर यदाकदाचित् कोणीही खोटी माहिती दिल्याचे उघडकीस येईल, तर त्याबद्दल व्हॉइसराय यानी ठरवून दिल्याप्रमाणे, गुन्हेगार कडक शिक्षेस पात्र होईल व त्यास सहा वर्षे हद्दपारीची कैदेची शिक्षा होईल व त्याची इस्टेटही जप्त होईल.

तसेच या गावाबाहेरील लोकानी या गावच्या देवस्थानास ज्या जमिनी दिल्या असतील, किंवा या गावांतील लोकानी किंवा देवस्थानानी इतर गावातील (सासष्टी तालुक्यातील) देवस्थानाना जर जमिनी दिल्या असतील, तर त्या सर्व जमिनीची माहिती द्यावी, असा हुकूम त्या जज्जसाहेबानी दिला. आणि त्या हुकूमास पाळा देऊन त्या उपस्थिताकडून जी माहिती मिळविली त्या माहितीचा पंचनामा ज्या जज्जसाहेबानी केला त्या पंचनाम्यावर सर्व उपस्थित अधिकाऱ्याच्या आणि साक्षीदाराच्या सह्या आहेत. त्या पंचनाम्याची कॉपी पोर्तुगीज कालीन ऐतिहासिक सरकारी दप्तरखान्यात आहे व ती प्राचीन पोर्तुगीज लिपीत आहे. आजच्या कालात त्या तशा लिपीने लिहिलेला पंचनामा त्या लिपीत निगटीत असलेल्या माहितगार किंवा सराव असलेल्या इसमाशिवाय इतरास वाचू येणे शक्य नाही हे जाणून, आणि जिज्ञासू वाचकांची उत्सुकता लक्षात घेऊन, त्या पंचनाम्यात काय माहिती आहे याची जास्तीत जास्त नोंद घेऊन, त्याचे मराठीत रूपांतर येथे देण्याचा प्रयत्न केलेला आहे.

त्यामुळे इच्छूकाना कोणत्या दैवताच्या देवालयाच्या मालकी हक्काची कोणती जमिन किंवा जमिनी, तिचे नांव कोणते, देवालय कोणत्या जमिनीवर होते, अशी उपयुक्त बरीच माहिती मिळू शकेल. जमिनीच्या तत्कालीन चतुःसीमा येथे भाषांतर करून देऊन त्याचा प्रत्यक्षात काहीच उपयोग नाही, म्हणून विस्तारभयास्तव तसे करण्याचे टाळले आहे.

हा पंचनामा "आंब्रोझियु दे सॉझ" या नावाच्या जज्जसाहेबांसमोर त्याच्या प्रत्यक्ष उपस्थितीत झाला असून तो लिहिणाऱ्या इस्क्रीव्हांव म्हणजे लेखक किंवा सेक्रेटरी याचे नाव "पेरू कोर्नेज्यु" असे आहे. त्या पंचनाम्यात, जी मंडळी हजर असलेल्या पैकीची नांवे आहेत, ती नांवे अशी :- नुनु बाऱ्हेतु-दाजू सगुण शेणवी-गोर्नु शेणवी-नरसू भांडारी-नारायण नाइक-म्हाबळा शेणवी-कृष्ण नाइक-विठ्ठल (विठू) भांडारी-विठ्ठल कामत-गणू भांडारी-माकू पडियार-सातू कामत-रामू शेणवी-म्हाबळा नाईक- हे

वाद्ये वाजविणारे वाजंत्री, तासे, शेनई-सुर्त वाजविणारे आणि एक भावीण या सेवकऱ्याना २६ तांगा आणि दुसरी भावीण जी सांतेरीच्या देवालयात सेवा काम करते तिला दहा तांगा पांढरी आणि तीन बरगणी देत असत.

सांतेरीच्या देवालयातील गुरव आणि एक तरुण यास पाच तांगां पांढरी आणि तीन बरगणी प्रत्येक वर्षी, तसेच वाजंत्री आणि एक भावीण, देवालयाचे सेवकऱ्यास, छत्तीस तांगां पांढरी मिळून पांढरी व एक बरगणी देत असत.

वर उल्लेखित व्यवस्थेशिवाय, ते सर्व गांवकर प्रतिवर्षी नारायण देवाच्या, 'दिंडी' नावाच्या उत्सवाच्या खर्चासाठी म्हणजे ज्यावेळी नारायण देव इतर देवालयाकडे भेटीसाठी मिरवणुकीने जात असत, त्या उत्सवाच्या खर्चासाठी तीन तांगां पांढरी आणि पालखी देत असत, आणि या दिंडी उत्सवात जे देवालयापुढे गाणे (भजन?) करीत, त्याचाही सर्व खर्च सोसीस असत.

या शिवाय, हे गांवकर प्रतिवर्षी ज्यावेळी भटजी उत्सव करण्याच्या कारणाने येई, त्या वेळी त्यास ८ कुडव तांदुळ त्यात एक पड कमी इतके तांदुळ, ३० नारळ, एक बरगणी, १०० विड्याची पाने, २५ सुपाऱ्या इतके देण्याची जबाबदारी घेत.

एक कुळागर "जोशीची नमसी" नावाचे ज्याचा एक चतुर्थांश भाग राणू क्रमवंत आणि सांतू भट उपभोगीत आणि तीन चतुर्थांश भाग राणू कोणी उपभोगीत असे. आणि हे भोगवटदार त्या कुळागराबद्दल प्रतिवर्षी गांवकरी यास एक बरगणी आणि साडेनऊ लेयाइस इतकी रक्कम देत असत. गांवकर प्रतिवर्षी साडेचार बरगणी देऊन सूर्यचंद्रादिकाचा धार्मिक विधी करीत असत.

* एक शेत "गुआनिचे आडे" नावाचे.

* केंकार नाईक याच्या शेत जमिनीचे ३॥ भाग. त्यातील एक भाग नारायण देवाच्या देवालयाचा असून ते शेत फक्त वायंगण पिकावळीचेच आहे.

* एक बागायत 'बायतोंड' नावाची, ही देवालयाची नमसी असून ती नरसू कामत आणि राम पडियार हे उपभोगीत असत. हे भोगवटदार या बागायतीचा वार्षिक फोर चार बरगिणी "आझोसिनी" देवालयास देत असत. व गांवकर एक बरगणी आणि दीड बाजारूक इतकी रक्कम प्रतिवर्षी देत.

* एक शेत जमीन, "आरोसकराची नमसी कुणगी" नावाची असून त्या शेतजमीनीचे भोगवटदार प्रतिवर्षी फोर म्हणून सहा गिंडे तेल देवालयास देतात व त्याशिवाय ग्रामसंस्थेत दोन बरगणी आणि १९॥ लेयाइस एवढी रक्कम देत असत.

* एक दुकान "जुमारीचो पसरो" नावाचे, प्रतिवर्षी देवालयास ९॥ गिंडे तेल देत आहे. या गावात काही वर्षापासून तीन दुकाने आहेत. एखादे वर्षी दोन दुकाने उरतात. तीन दुकाने असोत, दोन असोत किंवा फक्त एकच दुकान असो. पण कोणत्याही परिस्थितीत देवालयास वार्षिक ९ गिंडे तेल देत असत.

* "व्होडलें खाजन" नावाच्या शेत जमिनीचे फोरेर म्हणजे उपभोगणारे, प्रतिवर्षी सांतरीचें देवालय चुडतांनी छप्पर शाकारणी स्वखर्चाने करीत असत.

* "बोरी" नावाच्या शेतजमिनीचे भोगवटदार. प्रतिवर्षी स्वखर्चाने चुडताची शाकारणी ग्रामपुरुष व वैजेश्वर या देवालयाची करीत असत.

* "व्होडले दागु" नावाच्या शेताचे भोगवटदार प्रतिवर्षी धाडो देवालयाचे छप्पर चुडतानी शाकारणी स्वखर्चाने करून शिवाय आवश्यक तेही करीत असत.

* "सुर्प खाजन" नावाच्या शेताचे भोगवटदार हे प्रतिवर्षी भगवतीचे देवालय चुडतानी छप्पर शाकारणी व बाकी डागडुजी स्वखर्चाने करीत असत.

* "धाकटो दागु" नावाच्या शेताचे भोगवटदार ईश्वराचे देवालय छप्पर चुडतानी शाकारणी करून इतर जरूर ती सर्व डागडुजी स्वखर्चाने करीत असत.

* "व्होडली पोंडीची अर्ध" नावाच्या शेताचे भोगवटदार नारायण देवाचे देवालय छप्पर शाकारणी चुडतानी करून इतर डागडुजीही जरूर ती सर्व स्वखर्चाने करीत असत.

* "आसोल्प" शेताचे भोगवटदार "वेंजारिस्त" देवालयाचे छप्पर शाकारणी जरूरीप्रमाणे लाकूडही वापरून चुडतानी स्वखर्चाने करीत असत. आणि याकामी लागणारे मजूर व इतर सर्व खर्च या शेतीचे भोगवटदारच करीत असत.

* "व्हडले खाजन" नावाच्या शेत जमिनीत एक तुकडा किंवा भाग "वरको" नावाचा आहे. तो भाग या सबंध शेतीच्या भोगवटदारानी आपल्या देवकृत्याच्या खर्चासाठी सांतेरी देवालयास दिला आहे. नारळीच्या झाडासंबंधी लिहिले नाही.

* दागु कामत याच्या कुळागरातील नारळीचे झाड (माड) जोशी यास दिले आहे. दागु नाईक याच्या कुळागरातील नारळीची दोन झाडे (माड) जोशी व त्याचा बंधू मिळून दोघे इसम याना दिले आहेत. राम प्रभू याच्या बगीच्यातील नारळीची दोन झाडे (माड) जोशी यास दिली आहेत. मातो प्रभू याच्या बगीच्यातील एक झाड जोशी यास दिले आहे.

अने कामत आज खिरश्चन, याच्या बगीच्यातील नारळीचे एक झाड जोशी यास दिले आहे. वांठू शाटीं आणि मादु शाटीं याच्या बगीच्यातील नारळीची दोन झाडे जोशी यास दिली आहेत. देवगो नाईक याच्या बगीच्यातील नारळीचे एक झाड जोशी यास दिले आहे.

म्हाबळा पडियार याच्या बगीच्यातील नारळीचे एक झाड जोशी यास दिले आहे. गोर्गुला कामत याच्या बगीच्यातील नारळीची दोन झाडे जोशी यास दिली आहेत. रामु कामत याच्या बगीच्यातील नारळीचे एक झाड जोशी यास दिले आहे.

अंता भांडारी याच्या बगीच्यातील दुसरे नारळीचे झाड, गोर्ग्या कामत याच्या बगीच्यातील नारळीचे एक झाड, मर्तो शेणवीं याच्या घरात किंमत देऊन जोशी यास दिले आहे. कृष्ण कामत याच्या बगीच्यातील नारळीची दोन झाडे पैकी एकाची किंमत त्याच्या घरास देऊन व दुसरे झाड वेगळ्या बागायतीतील मिळून दोन झाडे जोशी यास दिली आहेत. गुआ नाईक याच्या बगीच्यातील नारळीची दोन झाडे जोशी यास दिली आहेत. गणू भांडारी याच्या बगीच्यातील नारळीचे एक झाड जोशी यास दिले आहे.

पदमा शेणवीं (इस्क्रीव्हांव) यांच्या बगीच्यातील दोन झाडे जोशी यास दिली आहेत. रवळू शेणवीं याच्या बगीच्यातील नारळीचे एक झाड जोशी यास दिले आहे. बना भांडारी याच्या बगीच्यातील नारळीचे वेगळे झाड जोशी यास दिले आहे. गोविंद प्रभू याच्या बगीच्यातील दोन झाडे नारळीची जोशी यास दिली आहेत.

रामू नाईक वारी याच्या बगीच्यातील नारळीचे एक झाड जोशी यास दिले आहे. अबा भांडारी याच्या बगीच्यातील नारळीचे एक झाड दिले आहे ते दाभोळी गावच्या सीमेजवळ नरसू नाईक याच्या बगीच्यातील नारळीचे एक झाड दिले आहे. सांतप्पा याच्या बगीच्यातील दुसरे नारळीचे झाड दिले आहे. म्हाबळा भांडारी याच्या बगीच्यातील नारळीची तीन झाडे जोशी यास दिली आहेत.

* मागे वर उल्लेखिलेल्या शेतजमिनीच्या भोगवटदारानी शेती जमिनी खाऱ्या पाण्याने भिजविल्याची माहिती दिली.

* म्हाबळा नाईक, "व्हडले खाजन" नावाच्या शेत जमिनीचा शेतकरी याने आपल्या धार्मिक रितीरिवाजाप्रमाणे शपथेने प्रमाण करून जज्ज साहेबाना सांगितले की, आपल्या माहितीत असलेल्याची आणि देवालयाच्या मालकीची जी जी जमीन होती, ती आपण माहिती दिली असून याशिवाय, आपणास माहिती

नाही त्या जमिनीचे भोगवटदारच त्याच्या जमिनीत काही भाग जर देवालयाच्या भोगवटीचे असतील तर ती माहिती तेच देऊ शकतील, असे त्याने साक्षीदारासमोर सांगितले. त्या नंतर तेथे हजर असलेल्यानी सांगितले.

* "करंबळाचे आक" नावाच्या शेताचा एक तुकडा, "शेत व्हांव" नावाच्या शेताचा एक तुकडा, "गुआरीचो वरको" नावाच्या शेताचा एक तुकडा.

* आणखी सांगितले की, फोरेरुस म्हणजे भोगवटदार प्रतिवर्षी देवालयास पंचवीस "ग्वालोइस" (कोंबडे?) अर्पण करीत असत.

* सांतेरी देवालयास प्रतिवर्षी तीन बरगणी फुलाची पूजा करण्यासाठी देत असत. त्याच प्रमाणे पंचवीस बांदी दोन बरगणी इतकी रक्कम देवालयास एक छत्री विकत आणण्यासाठी वसूल करीत असत.

* खाऱ्या पाण्याने भिजविलेल्या शेत जमिनीच्या वाटणीचे वेळी एका बकऱ्याचा बळी देत असत.

* फणसाची तीन झाडे असलेली, एक लहान जमीन, किंमत नसलेली.

* "सीटयाचे" नावाची जमीन याची किंमत २५ पताका व फोर तीन बरगण्या ठरविण्यात आला.

* "आनोसिनाची ठाण" नावाची जमीन कोणच भोगवट्यात आणित नसलेली चंडू कामत याच्या कुळागरात असलेली.

* सोमण याच्या कुळागरात असलेले अगदी लहान देवालय 'शामसीमा'

* म्हाबळा पडियार याच्या जमिनीत एक देवालय मोडक्या स्थितीत.

* विठ्ठल भांडारी याच्या कुळागरात एक लहानशे दगडी चिऱ्याचे घर जे मदोबा उपभोगित आहे.

* शेवटी सांखवाळ गावच्या गांवकार आणि इस्क्रीव्हांव (ग्रामलेखक) या सर्वानी प्रमाणपूर्वक शपथेवर सांगितले की, या पंचनाम्यात सादर केलेल्या शिवाय आणखी जमिनी देवालयाच्या किंवा त्यांच्या सेवेकऱ्याच्या नाहीत. ज्या वर उल्लेखिलेल्या आहेत, त्या देवालयाच्या 'नमशी' आहेत. हे ऐकून घेऊन जज्ज साहेबानी हा तेर्मु (पंचनामा) लिहिण्यास सांगितल्याप्रमाणे तो पेरू कोर्नेज, या इस्क्रीव्हांवाने लिहून त्यावर उल्लेखित जज्ज, भाषांतरकार आणि प्रारंभी उल्लेखिलेले, सर्वानी सह्या केल्या आहेत :- सांतू भांडारी, आझो शेणवीं, नरसू नाईक, म्हाबळा शेणवीं, कृष्ण नाईक, विठ्ठल भांडारी, देव भांडारी, अंता कामत, नरसू कामत, गुणू भांडारी, रामू शेणवीं, सांतू कामत, म्हाबळा नाईक, अनू शेणवीं, पद्मा शेणवीं, इस्क्रीव्हांव, गास्पार फ्राझ, बाल्ताझार दियस, जुवांव कुतीज, जोर्ज दे मिनेझिस, आंब्रोझियु दे सोझ.

मूळ पंचनामा जो पोर्तुगीज भाषेच्या जुन्या लिपीत सरकारी गोवा पुरातत्व खात्याच्या ऐतिहासिक दप्तरात आढळतो त्याची अस्सल कॉपी जरी येथे दिली, तरी सद्यःकालातील पिढीच्या वाचकाना ती वाचणे आणि समजून घेणे सोईस्कर नाही. शिवाय स्थलाभावामुळे ते अशक्य झाले. म्हणून जिज्ञासू वाचकाच्या उत्सुकतेसाठी शक्य तो मराठी भाषेत रूपांतर किंवा अनुवाद त्यातील महत्त्वाच्या गोष्टी सांभाळून देण्याचा प्रयत्न केलेला आहे. तो समग्र मजकूर बारकाईने वाचणाऱ्याना निदान इतकी तरी माहिती मिळू शकेल की, त्या देवस्थानातील प्रत्येक दैवताच्या मालकीच्या जमिनी, त्याची नावे, कोण दैवताचे देवालय कोणत्या जमिनीत त्या प्राचीन काली होते, जमिनीच्या भोगवटदाराच्या जबाबदारीची प्रतिवार्षिक कर्तव्ये कोणती होती, प्रतिवार्षिक आंवळी भोजना सारखे उत्सव, दिंडी उत्सव, चारशे पंचवीस वर्षापूर्वीच्या कालातही होत असत, शेत जमिनीत खारे पाणी शिरलेल्या जमिनीची विभागणी, बकरा बळी देण्याचा प्रकार अशासारख्या चालीरिती सव्वाचार शतकापूर्वी चालू होत्या, आणि देवालयाच्या इमारतीची छप्परे कौलाशिवाय होती व ती प्रतिवर्षी चुडतानी शाकारणी करून सांभाळीत असत.

सार्वजनिक भोजनसंतर्पण त्यास लागणारे तांदूळ, नारळ, देवालयात दिवे प्रज्वलित करण्यासाठी तेलाची वार्षिक व्यवस्था, इतकेच नव्हे, तर संन्यासी, जोगी, अशा सत्पुरुषाच्या समाधीस्थानाकडे नंदादीपाची

व्यवस्था केली जाई, आणि हे सर्व, सबंध गावाच्या जमिनीच्या उत्पन्नातूनच गांवकरी, देवालयाची सर्व जबाबदारी व खर्च संपूर्णपणे करीत असत, याचे स्पष्ट पुरावे या पंचनाम्यात पाहून त्या प्राचीन कालची ही अशी कायम सुरळीतपणे चालणारी दैनंदिन व्यवस्था पाहून, तत्कालीन ग्रामीण जनतेची तारीफ करावी तितकी थोडीच असे वाटल्यास नवल नाही.

वेलिंग येथील श्रीलक्ष्मी-नृसिंह देवस्थानातील मुख्य दैवत आणि परिवार दैवते

वेलिंग गावात सदर देवस्थानातील मुख्य दैवत श्रीलक्ष्मी-नृसिंह हे असून श्रीसाधन-नृसिंह (पुरुष), श्रीपायक, भांडारी, श्रीब्रम्हा व श्रीमारुती ही परिवार दैवते आहेत.

शिबिकोत्सव

या देवस्थानात नियमितपणे प्रत्येक महिन्याच्या शुक्ल पक्षात, चतुर्दशी तिथी दिवशी रात्रौ दहा वाजता, शिबिकोत्सव (पालखी उत्सव) होत असतो. या उत्सवाच्या मिरवणुकीत पालखीची एकंदर नऊ पेणी (मुक्काम) होत असतात.

कौल प्रसाद

प्रसाद पूजा शिलेस लावतात, व ती करंबलीच्या झाडाच्या पानाचे तुकडे करून, ते प्रसाद त्या शिलेस बावन्न ठिकाणी लावतात. प्रत्येक महिन्याच्या शुक्ल आणि कृष्ण एकादशी दिवशी, अमावास्या तिथीस, कार्तिक महिन्याच्या शुक्ल प्रतिपदा आणि पौर्णिमा तिथी हे दिवशी, प्रसाद घेत नसतात.

सूर्य किंवा चंद्रग्रहणाच्या दिवशी, तसेच संक्रांती दिवशीही, प्रसाद घेण्याची वहिवाट नाही.

पालवी दैवते आणि त्यांची देवस्थाने

"श्रीशांतादुर्गा" गोठण आणि "श्रीविजयादुर्गा" केरी ही पालवी दैवते असून त्याची देवस्थाने अनुक्रमे गोठण आणि केरी या दोन गावात, फोंडा तालुक्यातच आहेत. श्रीलक्ष्मी-नृसिंह देवस्थानच्या कुळावी महाजनाना या दोनही पालवी देवस्थानाना भेट द्यावी लागते. कारण, ती तीनही दैवते आणि त्याची देवालये, प्राचीन काली सांखवाळ येथे असताना एकीत्रत होती. श्रीनृसिंह दैवतास अभिषेक केला म्हणजे गोठणास श्रीशांतादुर्गा देवीस आणि केरीस श्रीविजयादुर्गा देवीसही अभिषेक करण्याची वहिवाट आहे.

देवस्थानचे आद्य संस्थापक-कुळावी महाजन

स्थलांतर पूर्व काली, हे देवस्थान सांखवाळ येथे असताना, सांखवाळ ग्रामसंस्था पुरातन काली ज्या लोकानी स्थापन केली, त्याच लोकानी हे देवस्थान स्थापन करून त्या देवस्थानचा सर्व एकंदर खर्च त्या ग्रामसंस्थेच्या उत्पन्नातूनच होई. त्या ग्रामसंस्थेचे एकंदर आद्यसंस्थापक भागीदार गांवकर त्यांचे चौदा वांगड होते. त्या गांवकर कुटुंबाची तत्कालीन उपनावे सिनाय (शेणवीं), भांडारी, नाईक (नायक), कामोतीं (कामत), आणि पडियार अशी होती. ही माहिती त्या ग्रामसंस्थेच्या म्हणजे कोमुनिदादीच्या फार प्राचीन दप्तरातील कागदपत्रावरून कळते.

दैवते सांखवाळ येथून स्थलांतर करून तत्कालीन परकीय राज्यात फोंडा तालुक्यात नेली गेली. त्या भयानक संकट कालात, देवस्थानची सर्व मालमत्ता आणि उत्पन्न यावर तिलांजली देऊन यावे लागले. सांखवाळ ग्रामसंस्था किंवा कोमुनिदादीकडून या देवस्थानचा, वेलिंग येथे ते स्थापनकालापासून खर्च करण्याचे कायमचेच बंद झाले, आणि ज्या कुळावी महाजनानी ते दैवत वेलिंग येथे पुर्नस्थापना करून तेथे देवालय बांधले, त्याच कुळवी लोकावर देवस्थानचा एकंदर सर्व खर्च करण्याची जबाबदारी पडली आणि त्यानी अव्याहतपणे सोसली आणि ते सोसतच आहेत. ही वस्तुस्थिती उघडपणे, त्या देवस्थानची सद्यःस्थिती आणि तेथील आश्चर्यकारक आणि नेत्रदीपक विकास कार्य, नवीन इमारतीची बांधकामे इत्यादी सर्व पाहिल्यावर सहजपणे लक्षात येते.

या देवस्थानचे आद्यसंस्थापक महाजन फक्त गौंड सारस्वत ब्राम्हण, ज्यांचे गोत्र "शंख पिंग कुत्स" आहे तेच आहेत.

जुन्या कालीन, या देवस्थानच्या दप्तरातील कागदपत्रावरून, या देवस्थानच्या कुळावी महाजनांची उपनावे जी कळतात ती अशी. नायक – भांडारी – सांखोलकर – शंखावलीकर – संखवाळकर – शेणई – प्रभू – पडियार; पण आजच्या कालात उपनावाचे फेरफार स्थित्यंतरे, ज्या गावात वास्तव्य करून राहतात. तेच गावचे उपनाव, व्यवसाय, धंदा किंवा वतन यावरून उपनावाची ओळख अशा नानाविध प्रकारामुळे आणि विशेष करून हल्लीच्या कालात आपल्या देवस्थान किंवा कुटुंबाचे वांगडात दर्शीवलेल्या उपनावाचा वापर करण्याचे सध्याच्या पिढीने दुर्लक्षिल्यामुळे, त्याचे दुष्परिणाम अनेक ठिकाणी अनुभवास येऊ लागल्याची उदाहरणे दृष्टोत्पत्तीस येतात. सध्याच्या कालात त्या देवस्थानच्या दप्तरात जी नोंद आहे, त्या नोंदीनुसार खालील उपनावाचे गौंड सारस्वत ब्राम्हण ज्ञाती समाजाचे त्या देवस्थानचे कुळावी महाजन आहेत.

आचार्य – नायक – नायक दलाल – नायक सुकेरकर – शेणवीं – वळवटकर – नायक पानवेलकर – बोंडकार – भांडारी -- भांडारकर – भाडगांवकर – भट्ट – कुलकर्णी – मंगलोर – पडियार – प्रभू – साखोलकर – सोमपूरकर – तेंबूलकर – तळवडकर – उभयकर – उल्हाल – सांखोलकर – वेलिंगकर–वेणुगोपाल – अमनबोल – राव – सोमापूरकर – राखवालकर – साखळकर – अलदनगिरी – कुडियाडी– अमेंबल – हर्लीकर – मुजुमदार – सांखळकर – तेलवडकर – मंजेश्वर – शणेया – कुब्ला – कुमालकर शेणै – तळवडेकर – कुळकर्णी – तळवडेकर.

सांखवाळकर या उपनावाच्या महाजनात, शेणवीं सांखवाळकर, नायक सांखवाळकर, व कामत सांखवाळकर अशा वेगवेगळ्या नावाचे आढळतात.

देवस्थान मालकीच्या जमिनी

वेलिंग गावात श्रीलक्ष्मी-नृसिंह देवस्थानच्या मालकीच्या काही जमिनी आहेत त्या पुढीलप्रमाणे :–

१) प्रेदियु देनोमिनादु "बीरचे भाट."

२) प्रेदियु देनोमिपादु "स्थल कुटुंबण" ही जमीन फोंडा तालुक्याच्या फाझेंद ऑफिसात म्हणजे आजच्या तालुका रेव्हेन्यु ऑफिसात "मत्रीज श्रीदयाल दे वेलिंग" या बुकावर नंबर २५४ वर देवस्थानच्या नावावर रजिस्ट्रेशन केलेले आहे.

३) प्रेदियु देनोमिनादु "जोगळ्या भाट."

याशिवाय, वेलिंग गावच्या कोमुनिदादीतून म्हणजे ग्रामसंस्थेकडून या देवस्थानास वार्षिक हक्क या नावाने प्रतिवर्षी सोळा रुपये दहा पैसे ही रक्कम येत असते.

देवस्थानात प्रतिवार्षिक उत्सव

या देवस्थानात, गोमंतकातील प्रमुख देवस्थानात होत असतात त्याप्रमाणेच शिबिकोत्सव, रंगपूजा, वसंतपूजा, लालक्युत्सव, रथोत्सव, संतर्पण समाराधना वगैरे प्रतिवर्षी होत असतात. चैत्र महिन्यात पंचांग श्रवण, श्रीरामनवमी, वैशाख महिन्यात अक्षय्य तृतीया; भाद्रपद महिन्यात श्रीअनंत व्रतोत्सव; आश्विन महिन्यात नवरात्र मखरोत्सव; कार्तिक महिन्यात श्रीतुलसीविवाह, काला, गोपालकाला, रथोत्सव, दीपाराधना, दीपस्तंभ प्रज्वलित करणे, हरिजागर; मार्गशीर्ष महिन्यात श्रीदत्तजयंती उत्सव; माघ महिन्यात सुंवारी वादन, रथोत्सव, लालक्युत्सव; फाल्गुन; होलिकोत्सव. असे नानाविध कार्यक्रमासह उत्सव होत असतात, त्या सर्व उत्सवाची नोंद आणि ते कोणत्या महिन्यात साजरे केले जातात ही सविस्तर माहिती येथे स्थलाभावामुळे देणे कठीण आहे. या देवस्थानात दैनिक सदावर्त होण्याची कायम व्यवस्था केलेली आढळते हे विशेष होय.

श्रीसंस्थान गोकर्ण पर्तगाळी जीवोत्तम मठ आणि श्रीलक्ष्मी–नृसिंह देवस्थान

श्रीलक्ष्मी-नृसिंह देवस्थानच्या धार्मिक बाबीसंबंधी सर्व अधिकार श्रीसंस्थान गोकर्ण पर्तगाळी जीवोत्तम मठाचे श्रीस्वामी महाराज यांकडे असून त्यांनीच धार्मिक सर्व खटले किंवा अडचणीचा निवाडा करावयाचा आणि या देवस्थानच्या महाजनाकडून अक्षरशः पाळण्यात यावयाचा असतो. (देवस्थानच्या नियमावलीत म्हणजे कोंप्रोमिस्सांत कायदेशीरपणे अशा आशयाचे स्पष्ट कलम आहे. कलम ३३ पहा.)

श्रीमठ पर्तगाळ किंवा श्रीमठ कवळें येथील धर्माध्यक्ष श्रीस्वामी महाराजांची स्वारी या देवस्थानात पोचेल किंवा येईल त्यावेळी, त्यांना या देवस्थानची कारभारी मंडळी किंवा त्यांचे जागी असतील त्याने अगर देवस्थानचा पुजारी भटजी यानी, एकंदर मानमरातबाने वहिवाटीचे जागी, इलामत वाद्यगाद्यादि सरंजामासह सामोरे जाऊन त्या श्रीस्वामीजींचे श्रध्दापूर्वक योग्य त्या रितीने आदरातिथ्य केले जावे. असेही स्पष्ट कलम ३२ त्या उल्लेखित नियमावलीत आहे.

देवस्थानची घटना नियमावली

श्रीलक्ष्मी-नृसिंह, वेलिंग देवस्थानची घटना नियमावली, जिला कोंप्रोमिस्स् म्हणून म्हणतात, ती गोवा सरकारने आपल्या पोर्तारीय नंबर ५५३ हुकुमाने पास करून मंजूर केली आहे. आणि ती सरकारी गॅझेट बोलेती ऑफिसीयाल ता. १९ डिसेंबर सन १९११ सालच्या अंकात प्रसिध्द झालेली आहे. या नियमावलीची कॉपी पोर्तुगीज भाषेत, आणि तिचे मराठी भाषेत भाषांतर, मोडी लिपीत, त्या देवस्थानच्या दप्तरात आहे.

९

श्रीशांतादुर्गा शंखवाळेश्वरी देवस्थान

गोठण – वेलिंग



श्रीशांतादुर्गा संखवाळेश्वरी, गोठण, वेलिंग

श्रीशांतादुर्गा संखवाळेश्वरी देवालय, गोठण, वेलिंग

श्रीशांतादुर्गा शंखवाळेश्वरी देवस्थान

गोठण – वेलिंग – गोवा

गोमंतकात इसवी सनाच्या सोळाव्या शतकांत तत्कालीन पोर्तुगीज राज्यकर्त्यांनी खिरस्ती धर्म प्रसारासाठीं हिंदु धर्मीय जनतेचा जो असह्य छळ चालविला, त्यांत बळजबरीनें बाटाबाटी, देवालयांचा विध्वंस, देवतांच्या मुर्तींची मोडतोड, संपत्तीची लुटालूट, आगी लावणें अशा सारखे फार भयानक प्रकार त्यांनीं अंमलांत आणले. इतिहासांत हा काल अत्यंत हृदय द्रावक रितीनें वर्णिलेला आढळतो. अशा प्रसंगांत असतांना आमच्या पुण्यपुरुष पूर्वजांनीं आपल्या प्राणावर उदार होऊन आपली घरें दारें, धनदौलत, शेती बागायती, जडजवाहीर दागदागिने इतकेंच नव्हे तर आपली पत्नी मुलें यांचा मायापाश तोडून सर्वस्वावर पूर्ण तिलांजली आकस्मिकपणें कसलाच विचार न करतां देऊन, काळोख्या रात्रीच्या वेळीं आपल्या कुलदेवतांच्या मूर्ती किंवा प्रतिकें जें काय त्या भयानक प्रसंगांत हातांत घेऊन रानावनातून दरी, नद्या, डोंगर ओलांडून, पोर्तुगीज राज्य हद्दी बाहेर दुसऱ्या राज्यांत जाऊन तेथें त्या आपल्या प्राणापलीकडे प्रीय अशा कुलदेवतांची स्थापना करून नवीन देवालयें बांधलीं आणि अशा प्रकारें हिंदु धर्माचें रक्षण करून कुलदेवतें सांभाळल्यामुळें त्यांच्या पुढील पिढ्यांस लाभ झाला, आणि म्हणूनच त्यांचे आम्ही वंशज म्हणून अभिमानानें त्या कुलदेवतांचे कुळावी महाजन म्हणून त्या देवतांचे संरक्षण, व्यवस्थापनाची जबाबदारी ओळखून अधिकारही गाजवीत आहोंत, अशा कित्येक कुलदेवतांपैकींच प्राचीन काळीं सासष्टी तालुक्याच्या शंखावली किंवा शंखवाळ गावांत मूळ असलेले आणि त्या कालीं श्रीसांतेरी या नांवानें ओळखण्यांत येणारें आणि इ. सनाच्या सोळाव्या शतकांत स्थलांतर करून फोंडे तालुक्यातील वेलिंग गावांत गोठण वाड्यावर स्थापित झाल्यानंतर श्रीशांतादुर्गा शंखवाळेश्वरी देवस्थान या नांवानें ओळखण्यात येणारे हे एक होय. स्थलांतर कालांत फोंडा तालुका विजापूरच्या आदिलशाही राज्यांत पोर्तुगीज राज्य हद्दी बाहेर होता हें सांगण्याची गरज नसावी.

या देवस्थानाकडे जाण्यासाठीं इच्छुक प्रवाशानीं कोणत्या वाटेनें जावें ?

गोमंतकाची राजधानी पणजी शहर जिथें नदी किनाऱ्यावर बंदरांत मुंबईहून गोव्यांत येणारी प्रवासी वाहतुक करणारी आगबोट थांबते, त्या बंदर धक्यांपासून पणजी शहरापासून बाहेर गांवीं जाण्यासाठीं प्रवासी बसेस सुटण्याचा मोटार स्टँड आहे त्या बस स्टँडवर सिटीबस किंवा इतर प्रवासी बसमधून जातां येतें. पणजी बस स्टँडवरून फोंडा मार्गे मडगांवकडे प्रवासी वाहतूक करणाऱ्या नियमित बसेस आहेत. त्यांत बसून म्हार्दोळ गावांत बसेस स्टेशनावर थांबतात तेथें उतरायचें. म्हार्दोळपासून वेलिंग गावांत गोठण वाड्यावर देवालयाकडे जाण्यास डांबरीरस्ता आहे. तेथें देवालयाकडे पायवाटेनें जाणारास अर्धा तास लागतो. म्हार्दोळ मोटार स्टँडवर रिक्शा, मोटार सायकल, टॅक्सी अशी वाहनें असतात ती भाड्यानें वेलिंगकडे प्रवासी वाहतुक करतात. गोव्याबाहेरून रेल्वेनें मडगांव स्टेशनवर उतरून मडगांवहून पणजी शहराकडे फोंडामार्गे प्रवासी वाहतूक करणाऱ्या नियमित बसेस आहेत त्यातून प्रवास करून म्हार्दोळ मोटार स्टँडवर उतरून तेथून वेलिंग गोठणकडे पायवाटेनें किंवा रिक्शा, मोटार सायकल, टॅक्सीमधून जातां येतें पणजी शहरापासून म्हार्दोळ गांव २१ किलोमीटर अंतरावर आहे. म्हार्दोळ गांवच्या सीमेवरच वेलिंग हा गांव आहे. म्हार्दोळहून वेलिंग गांवाकडे जाण्याचा रस्ता प्रारंभीं जरा चढणीचा आहे. परंतु पांच दहा मिनिटें चढणीचा रस्ता ओलांडलाकीं पुढें देवालयापर्यंत रस्ता चांगला एका पातळीवर आहे.

स्थल वर्णन

श्रीशांतादुर्गा शंखवाळेश्वरी देवस्थान एका शांत आणि रम्य परिसरांत वसलेलें आहे. आसमंतांत प्रदेशांतील कुळागरें, झुळझुळ वाहणारे गोड पाण्याचे झरे, वनपुष्पांचा मधुर सुवास, सृष्टीदेवीने जिकडे

तिकडे पसरलेला तो नेत्रानंददायक हिरवागार गालिचा, गर्द झाडी, इत्यादि मनोरम सृष्टी सौंदर्य अवलोकन करून, ज्याचें अंतःकरण वेधून जात नाही असा मनुष्य विरळा !

त्या देवस्थानचा प्राकार, अग्रशाळा, महाद्वार, मंदिर शिल्प वगैरे वैशिष्ट्यपूर्ण आहेत. देवस्थान डांबरी रस्त्यापासून थोडें उंचवट्यावर असून महाद्वार रस्त्याच्याकडेसच जवळ आहे. त्यांतून प्रवेश केल्यावर प्राकारांत पोहचतां येतें. मुख्य देवालयाची इमारत श्रीशांतादुर्गा शंखवाळेश्वरी मंदिर आणि हें महाद्वार यामध्यें समोरासमोर दीपस्तंभ आणि किंचित डाव्या बाजूस श्रीतुलसी वृंदावन आहे. देवालय पूर्वाभिमूख असून देवालयांत प्रवेश करतांना प्रारंभीं सोंडियो (दर्शनी भाग), नंतर महाचौंक त्यापुढें प्रदक्षिणा सभोंवार असलेलें गर्भागार आहे. महाचौंकावरून पुढें मधोमध दिसणाऱ्या गर्भागाराच्या दरवाजांतून गर्भागारांत मुख्यासनावर विराजमान झालेल्या श्रीशांतादुर्गा शंखवाळेश्वरी देवीचें दर्शन घडतें. तें पाहून भक्तिभावानें आलेल्या प्रवाशास असा भास होतो कीं, श्रीदेवी आपल्या भक्ताचें कल्याण करून मनोप्सित शुभकामना सफल होण्याचा कृपाशीर्वाद देण्यास प्रसन्न मुद्रेनें उभी आहे आणि हा अनुभव त्या भक्त गणास येतांच तो सहाजिकच मनांतील सर्व मनस्तापआपोआप नाहीसे झालेले पाहून गहिवर अंतःकरणानें नतमस्तक होऊन आनंदाश्रु ढाळीत श्रीदेवीपुढे साष्टांग नमस्कार करून श्रीदेवीस टक लावून एक सारखा पहात राहिल्यास नवल करण्याचें कारण नाहीं.

गर्भागारांत उच्चासनावर श्रीशांतादुर्गा शंखवाळेश्वरी देवीची मूर्ती उभी असून ती पंचधातूंची आहे. उच्चासना सभोंवार सुंदर वैशिष्ट्यपूर्ण कारागिरी आणि चांदीनें मढविलेला मनोवेधक मंडप असून त्यांत ती श्रीदेवी फार शोभून दिसते. त्या मंडपात मुख्य देवीच्या मूर्तीजवळच पुढच्या बाजूस एका रांगेत तीन मूर्ती अगदी लहान अंदाजे सहा इंच उंचीच्या त्यांत श्रीलक्ष्मीनृसिंह एका बाजूकडे आणि श्रीविजयादुर्गा दुसऱ्या बाजूकडे आणि मधोमध श्रीगणपती पाषाणी मूर्ती असून या दोनही मूर्ती पंचधातूच्या आहेत. मंडपाखाली जमीनतळावरच पण मुख्यासनाच्या पायथ्यास टेंकून श्रीदेवीची लहान मूर्ती पंचधातूची असून याच मूर्तीस प्रसाद कौल लावतात. गर्भागारांत मुख्य देवीच्यामागें एक रोहिण मातीची आहे ती गर्भागाराबाहेरून दरवाजात राहिलेल्या मनुष्यास दिसत नाही. गर्भागाराची जमीन आणि महाचौंकाची जमीन शुभ्र संगमरवरी पाषाणाने मढविलेली असून, सोंडयो, सरवळ्या आणि प्रदक्षिणा जमीन सुबक टाईल्सने मढविलेली आहे. गर्भागाराच्या भिंती आणि प्रदक्षिणा भिंतीचे सुबक, चित्तवेधक आणि आल्हादकारक ज्या नमुन्याचे टाइल्स बसवून केलेले आहे ते इतके सुंदर काम पाहून खरो खरच मन प्रसन्न होऊनही आश्चर्य करण्यासारखे खचित आहे. महाचौंकाचा जीर्णोध्दार हल्लीच्याच वर्षांत झाल्यामुळें त्याचे खांब, कमानी, आणि वरचा भाग आधुनिक शिल्पकलेचें खास वैशिष्ट्य दाखवितो. एकंदरींत सर्व महाचौंक ऑईल पेंटिंग करून सजविलेला आहे.

देवालय इमारतीची बाहेरून रचना गर्भागार सभोंवार चौकोनी, त्यावरचें बांधकाम अष्टकोनी त्यावर एक हात उंचीचा दगडी कठडा आणि त्यावर छप्परही अष्टकोनीच सिमेंटच्या पत्र्यानीं मढविलेले आहे. मुख्य देवालयाच्या डाव्या बाजूकडे एक अग्रशाळा असून त्यांत प्रारंभीच्या भागांत देवालयाचे अर्चक पुजारी यांच्या निवासस्थानाची सोय केलेली आहे. देवालय इमारतीच्या दर्शनी भागास सोंडयावर तीन नयन मनोहर धूड आणि दोन गोपुरें असें दगडी बांधकाम केल्यामुळें देवालय मंदिराचा दर्शनी भाग फार सुशोभित आणि मनोरम दिसतो.

मुख्य देवालया मागच्या बाजूस प्राकाराच्या पलीकडे एका रांगेत आठ देवळ्या किंवा गर्भागारें आहेत. त्यांपैकीं सहा गर्भागारांत लिंगरूपांत पुरुषांची स्थापना आहे. एका गर्भागारांत श्रीग्रामपुरुषाची स्थापना आणि एका गर्भागारांत श्रीदंडपाणी किंवा क्षेत्राधिपतीची स्थापना आहे. श्रीदंडपाणीची मूर्ती उभी काळ्या पाषाणाची आहे. बाकी सर्व लिंगें काळ्या पाषाणाचींच आहेत आणि तें प्रत्येक लिंग वेगवेगळ्या गोत्राच्या पुरुषाची स्थापना दर्शक आहे. या देवळ्या किंवा पुरुषांच्या गर्भागारांच्या इमारतीच्या मागच्या बाजूस एका उंचवट्यावर एक पेड किंवा पार आणि तें पेड एका वृक्षाच्या मुळासभोंवार दगडी बांधकामाचें जुन्या कालीन आहे. तो वृक्ष आणि तें पेड तेथील स्थानिक देवचाराचें आहे आणि म्हणून प्रतिवर्षी त्या देवचाराचा बहुमान म्हणून त्या पेडाजवळ ठराविक दिवशीं भोगावळ रोंट वगैरे अर्पण करतात.

देवालयाच्या प्राकारा बाहेर देवालयाच्या डाव्या बाजूकडे या देवस्थानचा तलाव असून देवालयाकडे येताना तो तलाव रस्त्याच्या उजव्या बाजूकडे दिसतो.

प्रमुख दैवताची आनुषंगिक दैवतें

प्रमुख दैवत श्रीशांतादुर्गा शंखवाळेश्वरी देवी हें असून आनुषंगिक दैवतांचा उल्लेख त्या देवस्थानच्या घटना नियमावलीत केलेला आहे तो असा आहे :- १) श्रीग्रामपुरुष, २) श्रीदंडपाणी, ३) श्रीआदिसिंह पुरुष, (गोत्र वत्स), ४) श्रीअनंतसिंह पुरुष (गोत्र वत्स), ५) श्रीराम पुरुष (गोत्र वत्स), ६) श्रीमांडले पुरुष (गोत्र भारद्वाज), ७)) श्रीगोविंद पुरुष (गोत्र भारद्वाज), ८) श्रीक्षेत्रपाळ, ९) सांखळ्यो.

देवस्थानच्या कुळावी महाजनांचे वांगड आठ

१ **वत्स गोत्र** :- प्रभू देसाई- शेणवीं (कडकडे)- पडियार - नाईक - जांभ-कामत शंखवाळकर इत्यादि.

२ **काश्यप गोत्र** :- (देवस्थानच्या नियमावलींत उपनावांचा उल्लेख नाहीं).

३ **भारद्वाज गोत्र** :- प्रभू (आलवेंकार) - शेणवीं (शिरोडकार)- पुराणिक इत्यादि.

४ **कौंश अथवा कौशिक गोत्र** :- कामत शंखवाळकार.

५ **अत्रि गोत्र** :- (देवस्थानच्या नियमावलींत उपनावांचा उल्लेख नाहीं).

६ **कौंडिण्य गोत्र** :- पडियार.

७ **वशिष्ठ गोत्र** :- (देवस्थानच्या नियमावलींत उपनावांचा उल्लेख नाहीं).

८ **शंख गोत्र** :- पिंगळे - गुत्स - नायक - शेणवीं - पडियार, इत्यादि.

देवस्थानांत होणारे प्रमुख उत्सव

चैत्र :-

वर्षप्रतिपदा, शुक्ल पंचमी, पौर्णिमा, वद्य पंचमी या प्रत्येक तिथीरोजीं रात्रौं शिबिकोत्सव.

वैशाख :-

अक्षय्य तृतीया, शुक्ल पंचमी, वद्य पंचमी, या प्रत्येक तिथीरोजीं रात्रौं शिबिकोत्सव.

जेष्ठ :-

शुक्ल पंचमी, वद्य पंचमी, या प्रत्येक तिथीरोजीं रात्रौं शिबिकोत्सव.

आषाढ :-

शुक्ल पंचमी, वद्य पंचमी, या प्रत्येक तिथीरोजीं रात्रौं शिबिकोत्सव.

श्रावण :-

नागपंचमी, वद्य पंचमी या प्रत्येक तिथीरोजीं रात्रौं शिबिकोत्सव.

भाद्रपद :-

शुक्ल पंचमी, वद्य पंचमी, या प्रत्येक तिथीरोजीं रात्रौं शिबिकोत्सव.

आश्विन :-

शुक्ल पंचमी, वद्य पंचमी, या प्रत्येक तिथीरोजीं रात्रौं शिबिकोत्सव शिवाय नवरात्रांचे दिवशीं रात्रौं मखरोत्सव, विजयादशमी सीमोल्लंघन.

कार्तिक :-

शुक्ल पंचमी शिबिकोत्सव, शुक्ल १४ शी कालाउत्सव, वद्य ५ मी शिबिकोत्सव, वद्य १४ शी शिबिकोत्सव.

मार्गशीर्ष :–

शुक्ल पंचमी, शुक्ल अष्टमी, वद्य पंचमी प्रत्येक तिथीरोजीं रात्रौं शिबिकोत्सव.

पौष :–

शुक्ल पंचमी शिबिकोत्सव.

माघ :–

माघ शुक्ल पंचमी शिबिकोत्सव, **शुक्ल सप्तमी रथोत्सव,** वद्य पंचमी शिबिकोत्सव.

फाल्गुन :–

शुक्ल पंचमी आणि वद्य पंचमी तिथीरोजीं रात्रौं शिबिकोत्सव.

आश्विन महिन्यांत सीमोल्लंघनासाठीं विजयादशमी रोजीं संध्याकाळीं श्रींची पालखी जेथें जाते तेथें एकाच वेळीं तीन वेगवेगळ्या दैवतांच्या पालख्या एकत्र जमतात. पैकीं एक पालखी श्रीशांतादुर्गा शंखवाळेश्वरी देवीची, दुसरी पालखी श्रीलक्ष्मीनृसिंह देवाची आणि तिसरी पालखी श्रीवेताळेश्वराची. तेथें एकाच वेळीं त्या तीनही पालख्यांतील दैवतांची संबंधित अर्चक पुजारी पूजा करतात. समारंभ प्रेक्षणीय असतो.

श्रीशांतादुर्गा शंखवाळेश्वरी देवालयांत आश्विन शुक्ल प्रतिपदेपासून नवमीपर्यंत सपल्लव चंडी-पारायण आणि नवमी रोजीं हवन होत असतें. नंतर दोन तरंगांपैकीं एक श्रीदंडपाणी व दुसरें श्रीग्रामपुरुषाचें अशा या दोन तरंगांची पूजा उत्सव होत असतो.

आश्विन शुक्ल नवमी रोजीं तीन अवसर येतात. पैकीं एक अवसर पडियार पुरुषाचा तो एका पडि-यार उपनांवाच्या गौड सारस्वत ब्राम्हण ज्ञातीच्या इसमावर येतो. दुसरा अवसर गोविंद पुरुषाचा तो किन्नर-कारवार येथील तशाच ब्राम्हणावर येतो. आणि तिसरा अवसर आदि सिंह पुरुषाचा तो भटकळ येथील एका भटजी ब्राम्हणावर येतो. हे अवसर कौल देतांना नवमीच्या तिसऱ्या दिवशीं देतात आणि तो परकीय इसमास अग्रक्रमानें कौल देण्याची वहिवाट आहे.

प्रसाद कौल

गोमंतकांतील इतर देवालयांत चालू असल्याप्रमाणें याही देवस्थानांत प्रसाद कौल घेण्याची वहिवाट आहे. प्रसाद-कौल घेणें हा श्रध्देचा आणि विश्वासाचा प्रश्न आहे. कुटुंबांत नानाविध बरे वाईट प्रसंग येतातच अशा वेळीं मनुष्य भांबावून जात असल्यास नवल नव्हे. योग्यप्रकारें निर्णय घेणे दिसतें तितकें सोपें नव्हे. निर्णय घेतला तरी तो कुटुंबांत एकंदर मनुष्यांस पसंत पडेलच याची खात्री नाहीं. संकट काली तर परमेश्वराशिवाय दुसरा त्राता नाहीं. आजारपणांतही औषधें नानाविध उपचार तज्ञ डॉक्टर लोकांकडून करवून घेऊन दीर्घकाल पर्यंत आजार हटत नाहीं अशा वेळींही आता काय करावें हा प्रश्न उभा राहातो. मंगल प्रसंगीं वधुवरांची जन्मोटिपणें तपासून एकमेकांचें गुणमीलन ज्योतिषशास्त्रदृष्ट्या हितावह ठरलेले विवाह कालांतरानें बेबनाव मतवैचित्र्य वगैरे कारणांमुळें भविष्यकालांत अपयशी होऊ नये म्हणून आमच्या पूर्वजांनीं आपआपल्या कुलदैवताकडे आपलें मनोगत गाऱ्हाणें घालून विचार विनिमय करून प्रसाद-कौल घेण्याची वहिवाट परंपरेने चालत आलेली आहे. प्रसाद-कौल घेण्यासाठीं कोणीही कोणावरच बळजबरी किंवा आग्रह करीत नाहीं. मात्र आजच्या जमान्यांत प्रसाद-कौल म्हणजे एक थोतांड आणि सुशिक्षित मनुष्यांनी ते घेऊं नयेत असा प्रचार करणारी भाषणें करणारे लब्ध प्रति-ष्ठित पावलोपावलीं आढळतात. पण, मजा अशी कीं हींच माणसें आपल्या कामांत अडिअडचणी आलेल्या दिसतांच नानाविध देवालयांकडे धांव घेऊन प्रसाद-कौल घेण्यासाठीं अहमिहकेने पुढें येऊन चार चार दिवस एकसारखे प्रसाद घेण्यांत घालवितात हें चित्र उघडपणें गोमंतकांत सर्वत्र पहावयास मिळतें. असो. या देवस्थानांत प्रसाद-कौल घेण्यासाठीं प्रसाद पूजा लावतात ती मूर्ती पंचधातूंची असून ती गर्भा-गारात श्रीदेवीच्या मुख्यासनाच्या तळभागाकडे मुख्यासनाच्या पायथ्यास टेंकून आहे त्या मूर्तीस लावतात.

प्रसाद पूजा करंबलीच्या पानांचे तुकडे करून लावतात आणि ते एकंदर त्रेचाळीस (४३) ठिकाणीं लावतात. प्रसाद घेताना ती घेण्याची वेळ म्हणजे दुपारीं महापूजा झाल्यानंतर भोजनोत्तर प्रारंभ करून सूर्यास्तापर्यंत घेतात. प्रसाद वर्षाचे सबंध तीनशें साठही दिवस घेतां येत नाहींत. प्रसाद कोणत्या महिन्यांत कोणत्या तिथी रोजीं घेतां येत नाहींत याची नोंद मुद्दाम खालीं दिलेली आहे त्याची गरजूनीं दखलगिरी घेणें आवश्यक आहे. कारण प्रसाद घेण्यासाठीं मुद्दाम देवस्थानांत गेल्यावर आज प्रसाद होत नाहींत असें तेथें भटजीने सांगितले म्हणजे प्रसाद घेण्यासाठीं मुद्दाम गेलेल्या मनुष्याची निराशा होऊन मनस्ताप होऊं नये म्हणूनच ही माहिती खालीं दिली आहे.

कौल प्रसाद सबंध वर्षाच्या कोणत्या महिन्याच्या कोणत्या तिथी दिवशी घेता येत नाहीत त्याची नोंद

प्रत्येक महिन्याच्या शुक्ल आणि कृष्ण प्रतिपदा, शुक्ल आणि कृष्ण पंचमी, शुक्ल आणि कृष्ण एकादशी, पौर्णिमा आणि अमावास्या असे प्रत्येक महिन्याचे आठ दिवस प्रसाद घेतां येत नाहींत. याशिवाय, खालील महिन्यांच्या कोणत्या तिथी दिवशीं प्रसाद घेतां येत नाहींत त्याची माहिती अशी :–

वैशाख – अक्षय्य तृतीया.

आषाढ – शुक्ल दशमी, कर्क संक्रांतिचा दिवस.

श्रावण – सोमवार.

आश्विन – शुक्ल प्रतिपदेपासून कोजागिरी दिवसापर्यंत सोळा दिवस.

कार्तिक – शुक्ल चतुर्दशी वनभोजनाचा दिवस.

पौष – मकर संक्रांतिचा दिवस.

माघ – शुक्ल चतुर्थी, शुक्ल षष्ठी.

फाल्गुन – शुक्ल नवमीपासून कृष्ण पंचमीपर्यंत.

ग्रहण काल – चंद्र किंवा सूर्य ग्रहण कालाचे दिवशीं.

देवस्थानच्या मालकी हक्काच्या जमिनी

या देवस्थानच्या मालकी हक्काच्या तीन जमिनीतीनही बागायती वेलिंग गावांत गोठण वाड्यावर आहेत आणि त्यांचीं नांवें अशीं :–
"देवते भाट", "गुरव भाट" आणि "घणस भाट."

या शिवाय, सासष्टी तालुक्याच्या बाणावली गावांत या देवस्थानच्या मालकी हक्काची जमीन बागायत आहे तिचें नांव "देवते भाट" असें आहे.

स्थलांतर

वरील सर्व एकंदर अत्यावश्यक आणि गरजेची जी माहिती दिली आहे ती हें देवस्थान मूळ शंखावली गावांतून स्थलांतर करून फोंडें तालुक्याच्या वेलिंग गावांत गोठण वाड्यावर स्थापन झाल्यानंतरच्या कालांतील आहे. हे वाचकांना न सांगतां कळण्यासारखे आहे.

परंतु, प्रत्येक देवस्थानच्या कुळावी महाजनांस आणि त्यांतही स्थलांतरीत होऊन दुसरीकडे स्थापन झालेल्या देवस्थानच्या कुळावी महाजनांस हें आपलें देवस्थान मूळ कोठें, कोणत्या गांवीं, कशा स्वरूपांत, कशा परीस्थितींत वैभवांत होतें, तेथून स्थलांतर कां, कोणत्या कारणानें, कोणत्या कालीं येथें केलें गेलें, मूळ पूर्वीच्या जागीं कोणतीं दैवतें स्थापित होतीं, अतिप्राचीन पुराणकालांत शंखावली नगरीची परीस्थिती आणि धार्मिक महात्म्य काय होतें, स्थलांतर पूर्व कालांत हें देवस्थान शंखावली येथें अस-

ताना त्या देवस्थानच्या जमिनी मालकी हक्काच्या होत्या किंवा काय, आणि त्या असल्यास त्यांची ओळख मिळेल काय, वगैरे पौराणिक आणि ऐतिहासिक माहिती मिळावी याबद्दल फार उत्सुकताच नव्हे, तर उत्कंठताही असते, आणि ती तशी असणें गैर तर नव्हेच. उलट, स्वाभाविकच आणि रास्त आहे, हें ओळखून जास्तींत जास्त ती तशी माहिती संशोधनपूर्वक दीर्घ प्रयत्न करून येथें देण्याचा प्रयत्न केलेला आहे.

प्रारंभीच, येथें स्पष्ट केलें पाहिजे कीं, पुराण आणि प्राचीन इतिहासकालांत शंखावली येथें हीं देवस्थानें श्रीशांतादुर्गा, श्रीनृसिंह आणि श्रीविजयादुर्गा एकमेकांच्या अगदीं जवळ एकाच ठिकाणीं होतीं आणि त्यांची पौराणिक आणि ऐतिहासिक माहिती तीनही देवालयांची एकच सारखी असणें उघड असलें तरी, त्या प्रत्येक दैवताबद्दलचीं खास वैशिष्ट्यें वेगळी आहेतच. शंखवाळची पौराणिक व ऐतिहासिक माहिती "श्रीलक्ष्मी नृसिंह देवस्थान" या लेखांत आलेलीच आहे. त्यास अनुसरून शंखवाळीचें श्रीसांतेरी जिला आजच्या कालांत श्रीशांतादुर्गा शंखवाळेश्वरी म्हणून ओळखतात तें दैवत, श्रीविजयादुर्गा आणि श्रीनरसू ज्यास आजच्या कालांत श्रीलक्ष्मीनृसिंह दैवत म्हणून ओळखण्यांत येतें, हीं तीनही दैवतें फोंडें महालांत तत्कालीन आदिलशाही राज्यांत अनुक्रमें वेलिंग गावांत गोठण या वाड्यावर, केरी येथें आणि वेलिंग येथें स्थलांतरीत करून गेलीं आणि सध्याच्या कालांत तेथें देवालयें बांधून त्यांत स्थापित आहेत. दैवतें स्थलांतरीत करण्याचा भयानक प्रसंग, काल, वेळ लक्षांत घेतां केव्हां एकदां आपलें दैवत सुरक्षितपणें पोर्तुगीज राज्य सरहद्दीबाहेर पोंचेल एवढीच प्रामुख्यानें काळजी तें दैवत बरोबर घेऊन जाणाऱ्या माणसांवर होती हें लक्षांत घेणें आवश्यक आहे आणि म्हणून दैवत वाहविणारे इसम पोर्तुगीज राज्य सरहद्द ओलांडून दुसऱ्या परकीय राज्यांत पोंचतांच तें दैवत कोणत्या प्रशस्त सोईस्कर ठिकाणीं स्थापन करावें याचा विचार ठरेपर्यंत त्या दैवतास मध्यंतरी कोठेंतरी तात्पुरता मुक्काम करणें क्रमप्राप्तच होतें. या कारणामुळें श्रीविजयादुर्गा जी आज केरी गावांत अमरखेडें वाड्यावर स्थापिलेली दिसते, ती मध्यंतरीच्या कालांत कवळें गांवाच्या अगस्तीपूर किंवा आगापूर येथील श्रीमाधव देवाचे देवालयासमोर जो पाण्याचा तलाव आहे त्या तलावाच्या पाण्यांत लपवून ठेवली होती आणि नंतर ती केरीस स्थापन केली गेली आहे. तो वृत्तांत बराच साक्षात्कारी आहे. श्रीनरसू हें दैवत ज्याला आजच्या कालांत श्रीलक्ष्मीनृसिंह या नांवानें ओळखतात. आणि जें आज वेलिंग गावांत स्थापित आहे, तें दैवत शंखवाळीहून निघून थेट वेलिंग येथें न येतां मध्यंतरी मुक्काम जुवारी नदी-पलीकडे मडकई गांव आहे, त्या गांवच्या किनाऱ्यावरच्या एका करंजाळ नामक वाड्यावर एका जागेंत स्थलांतर करून राहिलें, आणि तेथून सध्याच्या वेलिंग गावांत सुयोग्य जागीं त्या दैवताची स्थापना करण्यांत आली. श्रीसांतेरी आजची श्रीशांतादुर्गा शंखवाळेश्वरी, शंखवाळ गावांतून वेलिंग येथें गोठण वाड्यावर आणून स्थापण्यांत त्या देवीचे कुळावी तत्कालीन महाजन यशस्वी झाले. या स्थलांतराविषयीं सविस्तर माहिती "श्रीलक्ष्मीनृसिंह" या लेखांत आलेली आहे.

अतिप्राचीन पुराण कालांत शंखावली नगरीची परिस्थिती आणि धार्मिक महात्म्य

श्रीसांतेरी देवस्थान (आतांचें श्रीशांतादुर्गा शंखवाळेश्वरी देवस्थान) इसवी सनाच्या सोळाव्या शतकाच्या पूर्वार्धापर्यंत सासष्टी तालुक्याच्या शंखावली गावांत मोठ्या वैभवात नांदत होतें. आजच्या कालांत या गावांस शंखवाळ या नांवानें ओळखत असले, तरी अति प्राचीन कालांत शंखावली नगर अशा नांवानें ओळखत असत. या अति प्राचीन कालांत या शंखावली नगरींचें माहात्म्य देवधर्माच्या बाबतीत काय होतें हें जाणून घेण्याची उत्सुकता जिज्ञासू वाचकांना असणें स्वाभाविक आहे, हें जाणून त्या संबंधी संशोधनपूर्वक शोधाशोध करतां जी माहिती उपलब्ध होऊं शकली, तीच जिज्ञासू वाचकांसमोर ठेवण्याचा प्रयत्न केलेला आहे.

•

भारतीय पुराणांच्या समृध्द परंपरांत स्कन्दपुराणांतर्गत सह्याद्रि खंडाचें स्थान फार वरचें आहे. प्राचीनतेच्या दृष्टीनें त्याची तुलना काशी, कांची, अवन्तिकेच्या तोलाची व मोलाची आहे. उत्तरेस भडोच पासून दक्षिणेस केरळमधील मोठ्या भागाचा समावेश असलेल्या सह्याद्रिच्या ह्या परिसरांत वास करणाऱ्या

ाचीन जाती, जमाती, त्यांचे आचार विचार व चालीरिती, त्यांचीं तीर्थक्षेत्रें व देवस्थानें इत्यादींचें विस्तारपूर्वक उल्लेख व त्याच बरोबर या निसर्गरम्य प्रदेशाचें सौंदर्यात्मक वर्णन, या साऱ्यामुळें या ग्रंथाला सांस्कृतिक, वाङ्मयीन तसेंच, इतिहास संशोधकांच्या दृष्टीनें वेगळें व आगळें असें सर्वांगीण महत्व आहे. अशा या महत्वपूर्ण ग्रंथांत, शंखावली माहात्म्यम्, शंखासूर वध, शंखावल्याख्यान कथनम्, कालान्तक वध, विजया माहात्म्यम् असे अध्याय मूळ संस्कृत भाषेंत आहेत. त्यांतील फक्त तीनच अध्यायांतील अत्यावश्यक भागाचें मराठी भाषेंत रूपांतर केलेलें आढळतें. त्यांतील शंखावली नगरीचें माहात्म्य, शंखासूर वध, शंखावलीची कथा, याची विशेष माहिती "श्रीलक्ष्मीनृसिंह देवस्थान" या लेखांत आलेलीच आहे.

स्थलांतर पूर्व कालांत हे देवस्थान सांखवाळ येथे असतांना त्या देवस्थानच्या मालकी हक्काच्या जमिनींची माहिती.

प्राचीन कालीं सासष्टी तालुक्याच्या सांखवाळ गावांत हें देवस्थान असतांना त्या देवस्थानच्या मालकी हक्काच्या जमिनी किती, कोणत्या, कशा तऱ्हेच्या होत्या, त्यांत शेती, बागायती, कुळागरें असावींत काय, आणि असल्यास त्याबद्दल कांहीं माहिती मिळेल काय, याबद्दल साद्यंत माहिती 'श्रीलक्ष्मीनृसिंह देवस्थान' या लेखांत जिज्ञासूंना मिळूं शकेल.

देवस्थानची घटना नियमावली

या देवस्थानची घटना नियमावली ज्यास कॉंप्रोमिस् या नांवानें ओळखतात ती नियमावली सरकारनें आपल्या ता. १३ एप्रिल १९७१ च्या हुकुमानें पास आणि मंजूर केली असून तीं गव्हर्नमेंट ग्यॅझेट नंबर ४ ता. २२ एप्रिल १९७१ च्या अंकांत प्रसिध्द झालेली आहे.

ताना त्या देवस्थानच्या जमिनी मालकी हक्काच्या होत्या किंवा काय, आणि त्या असल्यास त्यांची ओळख मिळेल काय, वगैरे पौराणिक आणि ऐतिहासिक माहिती मिळावी याबद्दल फार उत्सुकताच नव्हे, तर उत्कंठताही असते, आणि ती तशी असणें गैर तर नव्हेच. उलट, स्वाभाविकच आणि रास्त आहे, हें ओळखून जास्तींत जास्त ती तशी माहिती संशोधनपूर्वक दीर्घ प्रयत्न करून येथें देण्याचा प्रयत्न केलेला आहे.

प्रारंभीच, येथें स्पष्ट केलें पाहिजे कीं, पुराण आणि प्राचीन इतिहासकालांत शंखावली येथें हीं देवस्थानें श्रीशांतादुर्गा, श्रीनृसिंह आणि श्रीविजयादुर्गा एकमेकांच्या अगदीं जवळ एकाच ठिकाणीं होतीं आणि त्यांची पौराणिक आणि ऐतिहासिक माहिती तीनही देवालयांची एकच सारखी असणें उघड असलें तरी, त्या प्रत्येक दैवताबद्दलचीं खास वैशिष्ट्यें वेगळी आहेतच. शंखवाळची पौराणिक व ऐतिहासिक माहिती "श्रीलक्ष्मी नृसिंह देवस्थान" या लेखांत आलेलीच आहे. त्यास अनुसरून शंखवाळीचें श्रीसांतेरी जिला आजच्या कालांत श्रीशांतादुर्गा शंखवाळेश्वरी म्हणून ओळखतात तें दैवत, श्रीविजयादुर्गा आणि श्रीनरसू ज्यास आजच्या कालांत श्रीलक्ष्मीनृसिंह दैवत म्हणून ओळखण्यांत येतें, हीं तीनही दैवतें फोंडें महालांत तत्कालीन आदिलशाही राज्यांत अनुक्रमें वेलिंग गावांत गोठण या वाड्यावर, केरी येथें आणि वेलिंग येथें स्थलांतरीत करून गेलीं आणि सध्याच्या कालांत तेथें देवालयें बांधून त्यांत स्थापित आहेत. दैवतें स्थलांतरीत करण्याचा भयानक प्रसंग, काल, वेळ लक्षांत घेतां केव्हां एकदां आपलें दैवत सुरक्षितपणें पोर्तुगीज राज्य सरहद्दीबाहेर पोंचेल एवढीच प्रामुख्यानें काळजी तें दैवत बरोबर घेऊन जाणाऱ्या माणसांवर होती हें लक्षांत घेणें आवश्यक आहे आणि म्हणून दैवत वाहविणारे इसम पोर्तुगीज राज्य सरहद्द ओलांडून दुसऱ्या परकीय राज्यांत पोंचतांच तें दैवत कोणत्या प्रशस्त सोईस्कर ठिकाणीं स्थापन करावें याचा विचार ठरेपर्यंत त्या दैवतास मध्यंतरी कोठेतरी तात्पुरता मुक्काम करणें क्रमप्राप्तच होतें. या कारणामुळें श्रीविजयादुर्गा जी आज केरी गावांत अमरखेडें वाड्यावर स्थापिलेली दिसते, ती मध्यंतरीच्या कालांत कवळें गांवाच्या अगस्तीपूर किंवा आगापूर येथील श्रीमाधव देवाचे देवालयासमोर जो पाण्याचा तलाव आहे त्या तलावाच्या पाण्यांत लपवून ठेवली होती आणि नंतर ती केरीस स्थापन केली गेली आहे. तो वृत्तांत बराच साक्षात्कारी आहे. श्रीनरसू हें दैवत ज्याला आजच्या कालांत श्रीलक्ष्मीनृसिंह या नांवानें ओळखतात. आणि जें आज वेलिंग गावांत स्थापित आहे, तें दैवत शंखवाळीहून निघून थेट वेलिंग येथें न येतां मध्यंतरी मुक्काम जुवारी नदी-पलीकडे मडकई गांव आहे, त्या गांवच्या किनाऱ्यावरच्या एका करंजाळ नामक वाड्यावर एका जागेंत स्थलांतर करून राहिलें, आणि तेथून सध्याच्या वेलिंग गावांत सुयोग्य जागीं त्या दैवताची स्थापना करण्यांत आली. श्रीसांतेरी आजची श्रीशांतादुर्गा शंखवाळेश्वरी, शंखवाळ गावांतून वेलिंग येथें गोठण वाड्यावर आणून स्थापण्यांत त्या देवीचे कुळावी तत्कालीन महाजन यशस्वी झाले. या स्थलांतराविषयीं सविस्तर माहिती "श्रीलक्ष्मीनृसिंह" या लेखांत आलेली आहे.

अतिप्राचीन पुराण कालांत शंखावली नगरीची परिस्थिती आणि धार्मिक महात्म्य

श्रीसांतेरी देवस्थान (आतांचें श्रीशांतादुर्गा शंखवाळेश्वरी देवस्थान) इसवी सनाच्या सोळाव्या शतकाच्या पूर्वार्धापर्यंत सासष्टी तालुक्याच्या शंखावली गावांत मोठ्या वैभवात नांदत होतें. आजच्या कालांत या गावांस शंखवाळ या नांवानें ओळखत असले, तरी अति प्राचीन कालांत शंखावली नगर अशा नांवानें ओळखत असत. या अति प्राचीन कालांत या शंखावली नगरींचें माहात्म्य देवधर्माच्या बाबतीत काय होतें हें जाणून घेण्याची उत्सुकता जिज्ञासू वाचकांना असणें स्वाभाविक आहे, हें जाणून त्या संबंधी संशोधनपूर्वक शोधाशोध करतां जी माहिती उपलब्ध होऊं शकली, तीच जिज्ञासू वाचकांसमोर ठेवण्याचा प्रयत्न केलेला आहे.

भारतीय पुराणांच्या समृध्द परंपरांत स्कन्दपुराणांतर्गत सह्याद्रि खंडाचें स्थान फार वरचें आहे. प्राचीनतेच्या दृष्टीनें त्याची तुलना काशी, कांची, अवन्तिकेच्या तोलाची व मोलाची आहे. उत्तरेस भडोच पासून दक्षिणेस केरळमधील मोठ्या भागाचा समावेश असलेल्या सह्याद्रिच्या ह्या परिसरांत वास करणाऱ्या

प्राचीन जाती, जमाती, त्यांचे आचार विचार व चालीरिती, त्यांचीं तीर्थक्षेत्रें व देवस्थानें इत्यादींचें विस्तारपूर्वक उल्लेख व त्याच बरोबर या निसर्गरम्य प्रदेशाचें सौंदर्यात्मक वर्णन, या साऱ्यामुळें या ग्रंथाला सांस्कृतिक, वाङ्मयीन तसेंच, इतिहास संशोधकांच्या दृष्टीनें वेगळें व आगळें असें सर्वांगीण महत्व आहे. अशा या महत्वपूर्ण ग्रंथांत, शंखावली माहात्म्यम्, शंखासूर वध, शंखावल्याख्यान कथनम्, कालान्तक वध, विजया माहात्म्यम् असे अध्याय मूळ संस्कृत भाषेंत आहेत. त्यांतील फक्त तीनच अध्यायांतील अत्यावश्यक भागाचें मराठी भाषेंत रूपांतर केलेलें आढळतें. त्यांतील शंखावली नगरीचें माहात्म्य, शंखासूर वध, शंखावलीची कथा, याची विशेष माहिती "श्रीलक्ष्मीनृसिंह देवस्थान" या लेखांत आलेलीच आहे.

स्थलांतर पूर्व कालांत हे देवस्थान सांखवाळ येथे असतांना त्या देवस्थानच्या मालकी हक्काच्या जमिनींची माहिती.

प्राचीन कालीं सासष्टी तालुक्याच्या सांखवाळ गावांत हें देवस्थान असतांना त्या देवस्थानच्या मालकी हक्काच्या जमिनी किती, कोणत्या, कशा तऱ्हेच्या होत्या, त्यांत शेती, बागायती, कुळागरें असावींत काय, आणि असल्यास त्याबद्दल कांहीं माहिती मिळेल काय, याबद्दल साद्यंत माहिती 'श्रीलक्ष्मीनृसिंह देवस्थान' या लेखांत जिज्ञासूंना मिळूं शकेल.

देवस्थानची घटना नियमावली

या देवस्थानची घटना नियमावली ज्यास कॉंप्रोमिसु या नांवानें ओळखतात ती नियमावली सरकारनें आपल्या ता. १२ एप्रिल १९७१ च्या हुकुमानें पास आणि मंजूर केली असून तीं गव्हर्नमेंट ग्यॉझेट नंबर ४ ता. २२ एप्रिल १९७१ च्या अंकांत प्रसिध्द झालेली आहे.

६

श्रीविजयादुर्गा देवस्थान

केरी – फोंडा



श्रीविजयादुर्गा, केरी, फोंडा

श्रीविजयादुर्गा देवस्थान, केरी, फोंडा

श्रीविजयादुर्गा देवस्थान

केरी–फोंडा–गोवा

गोमंतकांत वेगवेगळ्या खास एकाच ज्ञातीसमाजाचीं जशीं कांहीं देवालयें आहेत, तशींच एकापेक्षां जास्त, पण वेगवेगळ्या ज्ञातीसमाजाची अनेक देवालयें आहेत. तीं सर्व देवालयें एका किंवा अनेक विशिष्ट ज्ञाती समाजाच्या मालकीचीं असलीं, तरी त्या समाज किंवा समाजांची मालकी फक्तच व्यवस्था पहाण्यापुरती, संरक्षण खर्चाची जबाबदारी वाहण्यापुरती आहे. इतर हिंदु धर्मीयांस त्या देवालयांत उपासना किंवा देवकृत्यें करविण्यास त्या त्या देवस्थानांतील धार्मिक रिती नियमांचें पालन करणारांस बंदी नाहीं. अशा खास एकाच ज्ञातीसमाज नियंत्रणाखालील देवालयांमध्यें पुढील देवालयांचा समावेश होतो. दैवज्ञ ब्राम्हण ज्ञाती समाजाचें श्रीकालिकादेवी देवस्थान (कांसारपाल), वैश्य ज्ञाती समाजाचें श्रीशांतादुर्गा देवस्थान (धारगळी), गुर्जर ज्ञाती समाजाचें श्रीलक्ष्मीनारायण देवस्थान (नार्वे), भंडारी ज्ञाती समाजाचें श्रीरुद्रेश्वर देवस्थान (हरवळें), ब्रम्हकर्मा-सुतार ज्ञाती समाजाचें श्रीराम-सीता देवस्थान (गिमोणें-पिळगांव), गावडा ज्ञाती समाजाचें श्रीमल्लिकार्जुन (गांवडोंगरें-काणकोण), नाभिक ज्ञाती समाजाचें श्रीगोमंतेश्वर देवस्थान (ब्रम्हपुरी-जुनें गोवें), क्षत्रिय राणे ज्ञाती समाजाचें श्रीपांडुरंग देवस्थान (विठ्ठलापूर-सांखळी), सारस्वत ज्ञाती समाजाचें श्रीदत्त देवस्थान (सांखळी), त्याचप्रमाणें एका पेक्षां जास्त ज्ञाती समाजांच्याही मालकीचीं अनेक देवालयें गोमंतकांत आहेत. अशा देवस्थानांपैकीं फोंडा तालुक्यांतील केरी गावांत असलेलें श्रीविजयादुर्गा देवस्थान होय. श्रीविजयादुर्गा आणि तिचीं अंगभूत दैवतें यांचे संस्थापक आणि विधायक अशा अधिकारास पात्र महाजन गौड सारस्वत, आणि द्राविड ह्या दोन्ही प्रकारचे ब्राम्हण आहेत.

श्रीविजयादुर्गा देवस्थान जें आज फोंडा तालुक्याच्या केरी या गावांत दिसतें आहे, तें इसवी सनाच्या सोळाव्या शतकाच्या मध्यापूर्वीं सासष्टी तालुक्याच्या शंखावली (सांखवाळ) गावांत स्थापित होतें. या देवस्थानबद्दलची प्राचीन पौराणिक, ऐतिहासिक माहिती तसेंच तें देवस्थान मूळ शंखावली गावांत असलेलें तेथून स्थलांतर करून सध्याच्या केरी गावांत केव्हां, कोणी, कोणत्या कारणांसाठीं, आणावें लागलें याबद्दलचा गतेतिहास "श्रीलक्ष्मीनृसिंह देवस्थान" या लेखांत दिलेला आहे. त्यांतील पुढील भाग असा :–

श्रीनाल अशी श्रींची एक संज्ञा असून त्यांचें तें मोठें स्थान आहे. कारण, तेथें वैकुंठदर्शनासाठीं श्री कामरूपानें राहते. तेव्हांपासून कमळासारखें श्रीनाल क्षेत्र हें लक्ष्मीचें व नारायणाचें उत्तम संकेतगृह झालें आहे. हे उपेन्द्रा, तें पवित्र क्षेत्र मनुष्यांना दुर्मिळ असें आहे. श्रीरमण हरीची जे पूजा करतात, ते पापी लोकसुध्दां कोट्यवधी जन्मांतील पापांतून मुक्त होतात.

अगस्त्य म्हणाले, हे साधो, श्रीनाल हें नांव त्या क्षेत्राला कसें प्राप्त झालें ? त्या श्रीनाल क्षेत्राचें श्रेष्ठ माहात्म्य कोणतें ? हें सर्व मला सांगा.

स्कंद म्हणाले, पूर्वीं सर्व कामना पूर्ण करणाऱ्या लक्ष्मीकांताच्या दर्शनासाठीं सप्तर्षींनीं फार मोठी तपश्चर्या केली. महाक्षेत्र श्रीनाल येथें भगवंताचे ठिकाणीं चित्त ठेवून व वायुभक्षण करून महाभाग कश्यपादि क्षेत्रसंन्याशांनी विष्णूची आराधना केली. हे मुने, याप्रमाणें त्या श्रीनाल महाक्षेत्रांत तपश्चर्या करण्यांत तीस हजार वर्षें निघून गेलीं. एकदां सायंकाळीं नित्य विधी आटोपल्यावर सर्व ऋषि आपसांत गोष्टी करीत बसले होते. इतक्यांत सुगंधी वारा सुटला. त्यामुळें आश्रमांतील वृक्ष कंपित झाले. आकाशांतून पुष्पवर्षाव होऊं लागला. त्यांचा सुगंध वाऱ्यामुळें सर्वत्र दरवळला. त्या सुगंधामुळें ऋषींचें मन संतुष्ट झालें. तो वारा गरुडाच्या शरिरापासून उत्पन्न झाला होता. हें काय आहे म्हणून विस्मित झालेले

मुनि चोहोंकडे पाहू लागले. तेव्हां त्यांना आकाशांत दुःख सागरांत बुडणाऱ्या भक्तांना आधार देणारा वरद विष्णु दिसला. तो गरुडावर बसला होता. त्याचें अतिशुध्द शरीर शंखचक्रमहापद्म यांनीं सुंदर दिसत होते. त्यानें पीतांबर परीधान केलें होतें. सुंदर कुंडलांमुळें त्याच्या मुखकमलाची शोभा अधिकच खुलून दिसत होती. श्री, तुष्टि, विभूति, पुष्टि व धृति यांनी त्याचें शरीर सुशोभित झालें होतें. अन्य दक्षकन्या त्याच्या चरणकमलांजवळ बसल्या होत्या. विष्णूचा वर्ण मेघाप्रमाणें सुंदर असून त्याच्या वक्षस्तलावर कौस्तुभ शोभत होता. प्रसन्नवेष, पूर्ण निर्दोष, दैत्येंद्राचा रोष असलेले, सर्व कार्यें पूर्ण केलेले असे शेषशायी विष्णु व त्रिनयन शंकर यांचा जयजयकार असो, असें म्हणून आनंदित मुनींनी त्यांना प्रणाम केला. तेथें ब्रम्हसुतांसह भवनाशक शंकर व इंद्रादि देव आले होते. गंधर्व, अप्सरा, यक्ष, किन्नर, सिध्द, गुह्यक, नारदादि मुनि सत्वर उपस्थित झाले. कश्यपादि तपोधन मुनींनीं विष्णूसह आलेल्या सर्व देवांची अनुग्रहासाठीं पूजा केली. वरदराज नारायण व अन्य देव यांनींही सर्व मुनींचा विविध द्रव्य विभूषणें देवून सत्कार केला. श्रीविष्णूनें प्रमुख मुनींना दिव्य तेज देण्यासाठीं आपल्या सुवासिक व सुंदर कमलयुक्त हस्तानें स्पर्श केला. त्या सुनाल कमलाचा स्पर्श होतांच ते तपस्वी सप्तर्षी हजारों सूर्यासारखे तेजस्वी दिसले. हे कलशोभ्दवा, तेव्हांपासून परशुरामाच्या या भूमीवर तें क्षेत्र श्रीनाल या नांवानें प्रसिध्द झालें. महाक्षेत्र श्रीनालवासी भगवान् विष्णु क्षत्रिय पुरुषांचे सर्व पाप नाश करीत आहे. नंतर सूर्यवत् तेजस्वी, तपानें प्रकाशमान व शुध्द अशा कश्यपादि तपस्वींना उद्देशून भगवान् विष्णु म्हणाले :

ऋषिहो, तुम्ही आपल्या तपानें मला संतुष्ट केलें आहे. मी तुम्हांला इच्छित वर देतो. कारण तुमचें अंतःकरण शुध्द झालें आहे. ब्राम्हण हें माझें शरीर आहे. प्रिय विप्र माझ्या शरीरांत असतात. गाय हें माझें शाश्वत स्थान आहे. याहून श्रेष्ठ कोणी नाहीं. विद्या, तप, यौगिक बल व व्रत यांच्यामुळें ब्राम्हण मलाही पूज्य होत. त्यांच्याहून मोठें काय आहे ? ज्यांनीं आपल्या तपानें हें निर्माण केलें, ज्यांच्या सामर्थ्यानें मी सर्वांचें धारण पोषण करतो व ज्यांच्या कोपामुळें सर्व जळून जातें, त्यांच्याहून बलवत्तर कोण असू शकतो ? त्यांनीं तप केलें नाहीं तरी मी त्यांच्यावर प्रसन्न आहे. मग त्यांनीं तप, भक्ति, मनोनिग्रह व व्रत केल्यावर मी कां प्रसन्न होणार नाहीं ? म्हणून द्विज हो, तुम्हांला पाहिजे असेल, तें तुम्हीं मागून घ्या. निष्पाप मुनींनो, लवकर बोला.

ऋषि म्हणाले, हे दयानिधे, आपण सर्व लोकांना प्रमाण आहांत. कारण, निगम, आगम, सांख्य, तर्क, इतिहास, मीमांसा, योग व दुसरें ज्ञान हीं सर्व तुलाच प्रतिपादित असतात. म्हणून तुझें पादोदक हेंच सत्य आणि बाकी सर्व असत् व वृथा आहे. आपण सत्व गुणाधीश आहांत, असें शास्त्र सांगते, व हें सर्व लोकांना माहीत आहे. याहून मोठें शास्त्र तें कोणतें ? सर्व शास्त्र निर्णयांनीं दुसरें काय समजून घ्यावयाचें ? जर आपण आम्हांस वर देणारे व सर्व कांहीं देणारे भगवान् आहांत, तर हे रमापते नाथा, जें आम्हीं मागू तें द्या. आम्हीं जी तपश्चर्या केली, ती सफल झाली आहे. तुमचें चरणदर्शन झालें आहे. याहून मोठा लाभ तो कोणता ? आपले चरण या क्षेत्रांत सदैव असावे. आम्हीं या श्रेष्ठ तत्वाची आदरानें पूजा करूं ! आजपासून हें पवित्र क्षेत्र ऐश्चर्यदायक होवो । कमलाक्ष देवा, जेथें कमळास आपण हातांतील सुनाल कमळानें स्पर्श केला, त्याच अर्थाचें हें महाक्षेत्र व्हावें हा वर आम्हांस द्या.

स्कन्द म्हणाले, त्यांच्या त्या वचनास 'तथास्तु' असा वर देऊन श्रीपति जनार्दनानें तेथें आपलें सांनिध्य निश्चित केलें. हे मुने, सपत्नीक सप्तर्षीसुध्दां त्यांवर अनुग्रह करण्यासाठीं तेथेंच राहिले. तपश्चर्या करून व स्वतःच्या वंशाची उन्नति करून ते ऋषि अदृश्य गतीला गेले.

याप्रमाणें हें उत्तम माहात्म्य तुला सांगितले आहे. क्षेत्रमाहात्म्याचा हा परमपवित्र इतिहास भक्तीने ऐकणाऱ्या मनुष्यास पुनर्जन्म नाहीं.

कालांतकाचा वध, 'विजया' माहात्म्य

अगस्ति म्हणाले, हे स्कन्दा, ज्याच्या स्मरणानें पुरुषांची इच्छा सफल होते, तें पार्वती चरित्र मला सांगा.

स्कंद म्हणाले, ती शंकरप्रिया शांकरी समुद्र दर्शनासाठीं उत्सुक होऊन मांगिरीशाची आज्ञा घेऊन अघाशीहून निघाली. श्रम परिहार करणारे आश्रम पहात पहात ती सखींसह नदीच्या किनाऱ्यावर फिरू लागली. समुद्राकडे जाणारी ती नदीश्रेष्ठ अघाशीगंगा पाहून शंकराची भयहारिणी अर्धांगी पार्वती अत्यंत आनंदित होऊन म्हणाली, शंकर पति लाभल्यानें मीं या जगांत किती धन्य आहें ! कारण मुनिलोक ज्याचें सतत चिंतन करतात तो मदनारी यथेच्छ सुखानें माझ्याशीं रमलेला असतो, व या सत्संगामुळें जगांत माझी सर्वोत्तम कीर्ति झाली. त्यांची मीं अर्धांगी झाल्यें म्हणून लोक मला शर्वाणी समजतात. तपश्चर्ये-मुळेंच स्त्रियांना चांगला पति मिळतो, म्हणूनच मला शंकर पति मिळाला. अहो, जिचा पति साधु, दक्ष व सर्वगुणसंपन्न असतो ती स्त्री मोठी धन्य होय. म्हणून माझा पति शंकर असल्यानें मींही धन्य आहें. याप्रमाणें आनंदित होऊन ती नदीकिनारीं खेळत होती, व समुद्रावरून वाहणारा वारा तिला सुखवित होता.

हे मुने, याप्रमाणें ती शंकराचें चिंतन करीत करीत आनंदित होऊन सिध्दाश्रमात पोहोंचली. तेथें सिध्देश्वराच्या दर्शनानें तिला फारच संतोष झाला. सिध्देश्वरासमोर जाऊन तिनें सुंदर गायन केलें. सिध्देश्वराची पूजा करून त्याला नमस्कार केला व मंदिराच्या बाहेर येऊन ती सखींसह मांगीशचरणा-जवळ जाण्याच्या तयारींत होती, इतक्यांत पर्वतप्राय धिप्पाड शरीराचा एक कालांतक नांवाचा राक्षस सिध्दाश्रमावर हातांत नांगर घेऊन चाल करून आला. तो प्रेतवस्त्रधारी, धूम्रलोचन, धुलिधूसर, प्रेत-मालाधारी, सर्पधारी, दिसण्यांत भयानक होता. बाष्कलवंशांत जन्मलेला तो निळ्या मेघासारखा होता. त्यानें कित्येक गाई व कित्येक ब्राम्हण ठार केले. त्या राक्षसानें नांगराच्या फाळानें घरें मोडलीं, कित्येक स्त्रिया ठार केल्या व मुलेंही खाल्लीं. तेव्हां कांहीं ब्राम्हण शंकराला शरण गेले, व रक्षण कर, रक्षण कर, असें म्हणून त्यांनी त्याला दण्डवत प्रणाम केला. तेव्हां त्या ब्राम्हणांचें दुःखी वदन पाहून देवी त्यांना म्हणाली, विप्रहो, काय घडलें आहे तें सांगा. द्विज म्हणाले, हे श्रीशंकरा विशेष बोलण्यास अवकाश नाहीं, हे उमे दुःखितांचें रक्षण कर. महाभाग दुर्गे, आमच्यानें बोलवतही नाहीं. तेव्हां क्रुध्द शांभवीनें दैत्यवध करण्याचा निश्चय केला, व जेथें तो दैत्य होता तेथें ती गेली. तिथें एक वृक्ष उपटून त्याच्या छातीवर मारला. लगेच तो गतप्राण होऊन जमिनीवर संपूर्ण कोसळला. त्या महासुराचे डोळे, तोंड, नाक व कान यांमधून रक्त वाहत होतें. राक्षसाला ठार मारल्याचें पाहून ब्राम्हण आनंदित झाले. त्यांनीं स्तोत्रें म्हणून देवीची स्तुति केली. दुसऱ्या महात्म्यांनीं हर्षभरित होऊन वेदघोष केला.

देवी महेशानीस नमस्कार असो. सौम्या देवीस नमस्कार असो. जगाची प्रतिष्ठा जिच्यावर अव-लंबून आहे त्या दिव्य देवीस नमस्कार असो. हे देवी, मुनिजन भ्रमर होऊन तुझ्या चरणांचें चुंबन घेतात. लोकपालादि देवश्रेष्ठ तुला वंदन करतात. दैत्यांविषयींचा तुझा क्रोध हा एक प्रलयकाळचा महा-यज्ञ आहे. तूं एक (सुख) निधान आहेस. हे महारौद्र देवी, मला आपलें चरित्र सांग. तूं दिव्यरूपी कोण आहेस ? तुझें यथार्थ स्वरूप आम्हांस कळत नाहीं. हे कल्याणी, प्रसन्न हो. हे शंकरप्रिये, आम्हीं तुला नमस्कार करतों. महाशक्तिशाली व महाभयंकर अशा दैत्यराजाला तूं जिंकलेंस, यासाठीं हे इंद्र-वंदिते, तूं विजया आहेस. विजये, तूं मनोरमा या नांवानें प्रसिध्द आहेस. महेशानी, तूं ऋषिभय दूर करण्यासाठीं येथें रहा.

तेव्हां ती हृदयस्थ गंभीर देवी म्हणाली, विप्रहो, मीं तुम्हांस मनोवांछित वर देते आहें. मीं प्रसन्न असल्यावर त्रैलोक्यांत दुर्मिळ असें काय आहे ?

द्विज म्हणाले, आम्ही ऋषिवंशज तपस्वी तुला शरण आलों आहोंत. यासाठीं सदाशिवे, आमचें शरणागतांचें रक्षण कर. देवी, तूं वरदा आहेस. आम्हांस वरदान दे. हे देवी, सागराजवळ ही सुंदर शंखावली नगरी आहे. येथें हे अनघे, तूं आनंदानें रहा. तुझा पराक्रम प्रख्यात आहे. लोककल्याणासाठीं तूं येथेंच विजया व दुर्गा या नांवानें रहा. येथें दैत्यांची भीति नेहमींच असते. ती तूं दूर कर.

देवी म्हणाली, सर्वांच्या हितासाठीं मीं येथेंच वास करतें. जगांत विजया हें नांव प्रसिध्द होईल. हे द्विज पुत्रांनो, माझी भक्ति करून तुम्हीं येथेंच रहा. माझ्या सर्व स्त्री-पुरुष भक्तांच्या कामना मीं

नेहमींच सफल करणार. ज्यांच्या मुखीं जय मिळवून देणार विजया हें नांव असेल अशांच्या बांधवाना मी बंधनांतून मुक्त करीन, संग्राम, पर्वत व राष्ट्रीय संकट यामध्यें विजयासाठीं जो माझें नामस्मरण करील, त्याला निश्चित विजय मिळेल.

जो कोणी माझें नामामृत घेईल, त्याच्या सर्व आपत्ती लगेच दूर होतील. ज्यांच्या घरीं माझी पूजा होत असेल, त्या माणसांची भरभराट होईल. त्यांना चोर, अग्नि व शत्रू यांपासून भीत असणार नाहीं. याप्रमाणें वर देवून देवी तेथेंच अंतर्धान पावली.

त्या सतीनें त्या सिध्दाश्रमांत आपलें सान्निध्य निश्चित केलें व ती महागौरी भक्तांच्या इच्छा पूर्ण करण्यासाठीं विजया नांवानें राहूं लागली. देवीचें हें अत्यंत मनोहर आख्यान जो श्रवण करतो त्याला देवी संतुष्ट होऊन मनोवांछित फल देत असते.

वरील पौराणिक माहितीवरून श्रीविजयादुर्गा देवीचें आद्य स्थान शंखावली नगरींत होतें हें लक्षांत येतें आणि त्याजबरोबर त्या शंखावली नगरीचें पुराणकालांत केवढें मोठें श्रेष्ठत्व होतें याची ही जाणीव होते. आतां आपण त्यानंतरच्या ईतिहासकालाकडे वळूं.

ऐतिहासिक माहिती आणि शंखावळी नगरींतून फोंडा तालुक्यांत स्थलांतर होण्याचे कारण व स्थलांतर काल

शंखवाळीचे श्रीसांतेरी, श्रीविजयादुर्गा आणि श्रीनरसू ज्यास आजच्या कालात श्रीलक्ष्मीनृसिंह असें ओळखतात यांची ऐतिहासिक माहिती मागें 'श्रीलक्ष्मीनृसिंह देवस्थान' व 'श्रीशांतादुर्गा शंखवाळेश्वरी देवस्थान' या लेखांत आलेलीच आहे. तेव्हां विस्तारभयास्तव त्याची द्विरुक्ती करणें प्रशस्त नाही.

सांखवाळ येथें श्रीविजयादुर्गा देवस्थान असतांना त्या देवालयाच्या मालकी हक्काच्या जमिनी तेथें होत्या

प्राचीन कालीं हें देवस्थान सांखवाळ येथें असतांना, त्या गांवीं असलेल्या सर्व देवस्थानांच्या मालकी हक्काच्या जमिनी त्यांत शेती, बागायती, कुळागरेंही होतीं. गोवा सरकारच्या पुरातत्व खात्यांतील पोर्तुगीज कालीन इ. सनाच्या सोळाव्या शतकांतील कागदपत्र, हस्तलिखितें, वह्या बारकाईनें तपासून पहातां त्यांत ता. १७ मार्च १५६८ रोजीं केलेला पंचनामा सरकारी जज्जानें विधिपूर्वक केलेला मिळाला. त्या पंचनाम्यांत सांखवाळ गावांत असलेल्या सर्व देवालयांच्या जमिनींचा सविस्तरपणें आढावा घेतल्याचें स्पष्टपणें नजरेस आलें. हा पंचनामा तत्कालीन व्हॉइसराय याच्या हुकुमानें आणि त्यानींच नेमलेल्या आंब्रोझियु द सौझ नांवाच्या जज्जानें सांखवाळ गावांत येऊन तेथें त्या गांवचे तत्कालीन गांवकार, कुलकर्णी, इस्क्रीव्हांव (ग्रामसंस्थेचें लिखाण करणारे सेक्रेटरी), साक्षीदारांसह तेथील हिंदु व नवख्रिश्चन इत्यादि लोक जमवून त्या सर्वांकडून प्रत्येक धर्माच्या चालीरिती रिवाजाप्रमाणें त्या प्रत्येकाकडून आपल्यासमोर प्रमाणपूर्वक शपथ घेववून, त्या सर्वांकडून, त्या देवस्थानांच्या मालकी हक्काच्या सर्व जमिनी, तसेंच त्या देवस्थानांचे सर्व सेवेकरी, गुरव, जोगी, घाडी, धुमाळी, नेरगुडी, भटजी, सुतार, लोहार, चितार, कुंभार, धोबी, भंडारी, देवस्थानची हिलामत पताका वाहविणारे, कुळागरांत काम करणारे, देवतांच्या उत्सव मिरवणुकींत भाग घेणारे, देवालयांच्या इमारती-घरें यांची शाकारणी शिवणावळ करणारे कुंभार, नमशी नामक जमिनींचे भोगवटदार, नृत्यांगना, कलावंती, या सर्वांच्या भोगवटी खालीं असलेल्या, देवस्थानांच्या सर्व जमिनींची पूर्ण यादी एकंदर सर्व माहितीसह तो पंचनामा केलेला आहे.

तो पंचनामा तत्कालीन पोर्तुगीज लिपी भाषेंत आहे. तो समग्र मजकूर बारकाईनें वाचणाऱ्यांना निदान इतकी तरी माहिती मिळूं शकेल कीं, त्या देवस्थानांतील प्रत्येक दैवताच्या मालकीच्या जमिनी, त्यांचीं नांवें, कोण दैवताचें देवालय कोणत्या जमिनींत त्या प्राचीनकालीं होतें, जमिनींच्या भोगवटदारांच्या जबाबदारीचीं प्रतिवार्षिक कर्तव्यें कोणतीं होतीं, प्रतिवार्षिक आंवळी भोजनासारखे उत्सव,

दिंडी उत्सव, चारशें पंचवीस वर्षांपूर्वींच्या कालांतही होत असत. शेत जमिनींत खारें पाणी शिरलेल्या जमिनीची विभागणी, बकरा बळी देण्याचे प्रकार, अशासारख्या चालीरिती सदाचार शतकें वर्षांपूर्वीं चालू होत्या, आणि देवालयांच्या इमारतींचीं छप्परें कौलांशिवाय होतीं व तीं प्रतिवर्षीं चुडतांनी शाकारणी करून सांभाळीत असत.

सार्वजनिक भोजन संतर्पण त्यास लागणारे तांदूळ, नारळ, देवालयांत दिवे प्रज्वलित करण्यासाठीं तेलाची वार्षिक व्यवस्था, इतकेंच नव्हे, तर संन्यासी, जोगी, अशा सत्पुरुषांच्या समाधीस्थानाकडे नंदादीपाची व्यवस्था केली जाई, आणि हें सर्व सबंध गावांच्या जमिनीच्या उत्पन्नांतूनच गांवकरी, देवालयांची सर्व जबाबदारी व खर्च संपूर्णपणें करीत असत, याचे स्पष्ट पुरावे या पंचनाम्यांत पाहून, तत्कालीन ग्रामीण जनतेची तारीफ करावी तितकी थोडीच असें वाटल्यास नवल नाहीं.

तो समग्र पंचनामा मूळ भाषेंत आणि त्याचें मराठी भाषांतर इच्छा असूनही येथें स्थलाभावामुळें देणें अशक्य आहे. त्या देवस्थानांची प्राचीन ऐतिहासिक माहिती गोवा पुरातत्व खात्याच्या सरकारी दप्तरांत फार महत्वाची आणि चित्तवेधक आढळते. संबंधित देवस्थानांच्या कुळावी महाजनांनीं आपल्या देवस्थानच्या प्राचीन आणि अर्वाचीन संपूर्ण माहितीचें ज्ञान या आणि पुढच्या पिढ्यांस करून देण्याचा अभिनंदनीय उपक्रम करून त्या देवस्थानाच्या संपूर्ण माहितीचें एखादें स्पेशल वेगळेंच पुस्तक छापून प्रसिध्द केलें, तर त्या पुस्तकांत तो सबंध पंचनामा निदान त्याचें मराठी भाषांतर समावेश करण्याजोगा तो पंचनामा खचित फार महत्वाचा आहे. असो.

केरी येथील श्रीविजयादुर्गा देवस्थानांतील मुख्य दैवत आणि परिवार किंवा अंगभूत दैवतें

श्रीविजयादुर्गा देवी ही महिषासुरमर्दिनी अष्टभुजा पाषाणी मूर्ती हिची श्रुतिस्मृति पुराणोक्त विधीपूर्वक स्थापना इसवी सन १५६० सालचे सुमारास, गोमंतकांतील फोंडा तालुक्यांतील केरी गावांत, अमरखंडें नांवाच्या वाड्यांत झाली. त्यापूर्वीं हें दैवत आणि तिचें देवालय सासष्टी तालुक्यांतील शंखावली (सांखवाळ) नांवाच्या गावांत होतें. सांखवाळ गावांतून हें दैवत फोंडा तालुक्यांत कोणत्या सालीं, कोणत्या कारणांमुळें तत्कालीन आदिलशाहीच्या राज्यांत स्थलांतर करून आणावें लागलें याचा इतिहास सविस्तरपणें वरील माहितींत कथन केलेला आहे. केरी गावांत हें दैवत स्थापन करण्यापूर्वीं मध्यंतरीं प्रसंगानुरूप याच फोंडा तालुक्याच्या कवळें गावांतील अगस्तिपूर उर्फ आगापूर येथील श्रीमाधव देवालयाच्यासमोर जो तलाव आहे, त्या तलावाच्या पाण्यांत लपवून ठेवण्यांत आलें होतें. कारण, शंखावलीहून त्या भयानक प्रसंगांतून ती मूर्ती पळवून आणल्याने ती कोठें स्थापन करावी याचा विचार करून निर्णय ठरेपर्यंत ती मूर्ती कोठेंतरी नकळत सुरक्षित ठेवणे प्राप्तच होतें म्हणून, त्या तलावाच्या पाण्यांत बुडवून ठेविली असावी ही शक्यता नाकारतां येत नाही. त्यानंतर त्याच फोंडें महालांत केरी गावांत रहाणाऱ्या एका काश्यप गोत्री ब्राम्हणास एके दिवशीं स्वप्न पडलें तें असें की, "एक तेजःपुंज स्त्री त्याच्या समोर प्रकट होऊन बोलली कीं, "मीं तुझी कुलस्वामिनी आहें. मला एका भक्ताने आगापूर येथील तलावांत ठेविली आहे. मला वर काढून योग्य जागीं स्थापना करण्यास योग्य भक्त तूं आहेस. उद्यां सकाळीं उठतांच तुझ्या घरा समोरील केळीला पिकलेला घड दिसेल तो, आणि पलीकडील केतकीला फुलावयास आलेला गोंडा दिसेल तो काढून घेवून आगापूरच्या तलावांत सोडून मला अर्पण कर व आंत बुडी मारून माझी प्रतिमा हातास लागेल ती घेवून या गावीं आणून स्थापना कर."

या दृष्टांतानंतर पहाटेस जागृत होऊन त्यानें सूर्योदयीं आपलें स्नान संध्यादि कृत्य आटोपून पाहिलें, तों त्याला केळ्यांचा घड आणि केतकीचा गोंडा खराच दृष्टीस पडला. त्यानें श्रध्दापूर्वक तो घड व गोंडा काढून घेवून आगापुरास जाऊन, तेथील तलावांत सोडून देवून श्रीविजयादुर्गा देवीचें स्मरण करून बुडी मारली तो बरीच मोठी पाषाणाची मूर्ती त्याच्या हातांत आली ! ती त्यानें वर काढून आपल्या स्कंदावर धारण केली व थेट केरीचा मार्ग धरला. प्रस्तुतच्या देवालयामागे बरेंच जंगल होतें,

त्या ठिकाणीं पोंचतांच ती मूर्ती त्याला इतकी जड झाली कीं, पुढें एक पाऊलही चालवेना ! म्हणून त्यानें ती मूर्ती तेथेंच ठेविली व हें सर्व वर्तमान तेथील ग्रामस्थ अधिकारी यास निवेदन केलें. तें त्यांनी त्या ब्राम्हणाचें शील आणि सदाचरण इत्यादि पूर्व परिचित गुणाबद्दल आणि ह्या सर्व प्रत्यक्ष चमत्कारावरून खरें मानून अत्यंत भक्तिभावानें त्यादेवीची येथें स्थापना केली. लहानसें देवालय बांधिलें. ग्रामस्थांकडून श्रीदेवीच्या नैवेद्य नंदादीपादि कृत्यापुरती उत्पन्नाची जमीनही नेमून देण्यांत आली ती अद्यापही चालत आहे. ही गोष्ट सुमारें इ. सन १५६० सालीं घडली असा अंदाज मिळतो.

पुढें ह्या देवीचे कुलपरंपरेनें भक्त महाजन "लघाटे" या उपनांवाचे पुणें शहरांत पेशवाईचे वेळीं थोर नांव लौकिक मिळविलेले धनाढ्य गृहस्थ होते. त्यांनी तें देवालय बरेंच मोठें उभारून आपल्या वंशाला धन्य करून घेतलें. त्यानंतर, ह्या देवालयाचें गर्भागार व प्रदक्षिणा खेरीज करून बाकीचा समोरचा भाग जीर्ण झाल्यामुळें तो एका कर्नाटकस्थ सारस्वत महाजनाकडून पैसा घेवून गोमंतकांतील सारस्वत महाजनांनीं दुरुस्त केला. त्याचे मागोमाग देवालयाला सभामंडप असावा म्हणून केरी येथील श्रीदेवीचे परमभक्त व महाजन कै. वा. पांडुरंग रामचंद्र वैद्य यांनी आपल्या इष्टमित्र सज्जनांच्या सहाय्यानें बांधून शके १७९७ मार्गशीर्ष शुक्ल पंचमी शुक्रवार रोजीं श्रीदेवीस अर्पण केला. त्याच्यानंतर सावंतवाडीस रहाणारे कै. वा. माधवराव गोविंद धोपेश्वरकर यांनीं नगारखाना आणि गोपुराची इमारत स्वखर्चानें बांधून शके १८१९ माघ वद्य त्रयोदशी सोमवार दिवशीं श्रीदेवीस अर्पण केली. देवालयाच्या डाव्या बाजूची अग्रशाळा केरी येथील महाजन वैद्य कुटुंबीय आणि गोमंतकांतील श्रीदेवीचे महाजन यांनीं संयुक्तपणें मिळून तयार केली. सद्यःकालांत ही अग्रशाळा जीर्णावस्थेत पोंचली असल्यामुळें देवालयाच्या पाठीमागें एक नव्या नमुन्याची आकर्षक पध्दतीची अग्रशाळा हल्लींच बांधलेली दिसते. देवालय पूर्वाभिमुख असून देवालयासमोर जराश्या डाव्या बाजूकडे एक दीपस्तंभ सात मजली फार सुंदर आणि आधुनिक नमुन्याचा आकर्षक बांधलेला आणि उजव्या बाजूकडे एक श्रीतुलसी वृंदावन तेंही कलाकौशल्यपूर्ण बांधणीचें उभारलेलें दिसते.

श्रीविजयादुर्गा देवीची मूळ पाषाणी मूर्ती जीर्णावस्थेस पोंचल्यामुळें तिची नवीन पाषाणी मूर्ती करवून घेऊन तिची विधिवत प्रतिष्ठापना शके १८९९ वैशाख वद्य नवमी तारीख ११ मे १९७७ या मुहूर्तावर करण्यांत येऊन जीर्ण मूर्तीचें विसर्जन वर उल्लेखित श्रीतुलसी वृंदावनाखालीं करण्यांत आलें.

देवस्थानच्या प्रमुख श्रीदेवीचे अंगभूत दैवत

श्रीविजयादुर्गा हें मुख्य दैवत आणि तिचे अंगभूत दैवत श्रीक्षेत्रपाळ - श्रीदंडपाणी - श्रीव्याघ्र (वागरा) असे तीन नांवाने ओळखत असलेलें एकमेव असून या दैवताची स्थापना देवालया पुढें जो मंडप आहे त्याच्या शेवटीं डाव्या बाजूकडे एका गर्भागारांत आहे. मूळ मूर्ती जीर्ण झाल्यामुळें नवी पाषाणी मूर्ती करवून तिची प्रतिष्ठापना श्रीदेवीच्या नवीन मूर्ती प्रतिष्ठापना दिवशींच केली गेली. आणि जुनी जीर्ण मूर्ती नवीन मूर्ती स्थापना ज्या आसनावर केलेली दिसते, त्याच दगडी आसनाखालीं जमिनीत विसर्जन करण्यांत आली.

देवालयाचे संस्थापक-महाजन

श्रीविजयादुर्गा आणि तिची अंगभूत दैवतें यांचे संस्थापक आणि विधायक अशा अधिकारास पात्र महाजन गौड सारस्वत आणि द्राविड या दोन्ही ज्ञाती समाजांचे ब्राम्हण आहेत. त्यांची गोत्रें वत्स, भारद्वाज, काश्यप, अत्रि, कौंडिण्य, कौशिक आणि वासिष्ठ या सात गोत्रांचे सारस्वत (शेणवीं) यांना "सप्तगोत्री" वांगडाचे" असें म्हणतात. शंख पिंगकुत्स नामक एकाच गोत्राचे सारस्वत (शेणवीं) यांना "नायक" वांगडाचे म्हणतात. आणि काश्यप, कुत्स व भारद्वाज ह्या तीन गोत्रांचे कऱ्हाडे व पद्ये ह्यांना "भट्ट वांगडाचे" म्हणतात. याप्रमाणें तीन वांगड अथवा तीन वर्ग असून सर्व वर्गांच्या इसमांचे अधिकार व्यक्तिशः समान होत.

ह्या तीन वर्गांपैकी सप्तगोत्री महाजन हे श्रीविजयादुर्गा प्रमाणेंच श्रीशांतादुर्गा शंखवाळेश्वरी, गांव वेलिंग, महाल फोंडा, प्रांत गोवा या देवीचे कुळावी होत. आणि नायक वांगडी हे श्रीविजयादुर्गा, श्रीशांतादुर्गा शंखवाळेश्वरी आणि श्रीलक्ष्मीनृसिंह देवस्थान- वेलिंग येथील कुळावी होत- आणि तिसऱ्या वांगडाचे "भट्ट वांगडी" हे मात्र केवळ श्रीविजयादुर्गा देवीचे कुळावी होत.

उल्लेखित तीनही वर्गांतील इसमांचा महाजनपणाचा अधिकार पितृवंशपरंपरेनें आलेला असून तो तसा अव्याहतपणें पुढें चालवावयाचा आहे. मातृवंश परंपरेला हा मुळींच लागू होत नाहीं.

देवस्थानांच्या महाजनीय प्रचलित कायद्यानुसार या देवस्थानच्या महाजन व्यक्तींची यादी विधियुक्त तयार होऊन सरकारकडून संमत होऊन आलेली जी या देवस्थानच्या दफ्तरांत आहे. ती फक्त या देवस्थानची नियमावली तयार करण्याच्या कालीं गोमंतकांत ते कुळावी महाजन होते, त्यांची आहे, पण, या देवस्थानचे कुळावी महाजन जे गोव्याबाहेर आहेत, त्यांची नांवें त्या यादींत नाहीत. या देवस्थानच्या कुळावी महाजनांची कुटुंबें जी गोमंतकांत आहेत, त्यांचे सगोत्र तीनही वांगडांचे किंवा वर्गांचे आणखी महाजन गोमंतकाबाहेर हिंदुस्थानात पुष्कळच रहातात ते आपल्या सवडीनुरूप इकडे आपल्या कुलदैवताच्या देवस्थानातून येवून आणि तसेच आपल्या गांवाहून द्रव्यद्वारा आराधना करतात. ते ज्यावेळीं इकडे देवस्थानांत येतील, तेव्हां त्यांचीओळख पटल्यावर त्यांची नांवें देवस्थानच्या महाजनांच्या नांवांच्या यादींत नोंदवून घेणें आणि त्यांना गोमंतकांतील कुळावी महाजनांप्रमाणेंच अधिकारी मानणें अवश्य मानिलें आहे. (पहा :- श्रीविजयादुर्गा देवस्थानची नियमावली कोंप्रोमिस्, भाग पहिला कलम ४).

या देवस्थानचा महाजन समुदायाचा ठराव कायदेशीर ठरण्याकरितां वर उल्लेखित महाजनांचे यादींतील नांवाचे गोव्यांत रहाणारे आणि ज्यांचा देवस्थानच्या कोंप्रोमिस नियमावलींत कलम दुसरें वर्णन केलेल्यांतील तीन वर्गात समावेश होत असेल, ते इसम प्रत्यक्ष महाजन सभेस हजर असले पाहिजेत.

गोव्याबाहेरील महाजनांची नांवें कायदेशीरपणें देवस्थानच्या महाजनांच्या यादींत नोंदलेलीं असलीं व ते देवस्थानांत विरळ पोंचत असले तरी ज्यावेळीं त्या देवस्थानच्या प्राकारांत ते हजर असतील, त्या वेळच्या सभेंत त्यांना इतर सभासद महाजनांप्रमाणेंच अधिकारी समजण्यांत येतें.

या देवस्थानच्या संबंधित, कोणताहि ठराव करण्यास महाजनांची संख्या तिसापेक्षा जास्त असली पाहिजे; व त्या संख्येत वर उल्लेखित तीन वर्गांतील प्रत्येकीं दहापेक्षां कमी सभासद असतां कामा नयेत. तथापि, महत्वाच्या अडचणीमुळें एका वर्गाच्या सभासदास हजर होण्यास सवड नसली तर बाकीच्या दोन वर्गांच्या प्रत्येकीं पंधरापेक्षां जास्त सभासदांची जुळणी होऊन तीस सभासदांची भरती होईल तर त्यांचे एकवाक्यतेनें झालेला ठराव कायदेशीर मानण्यांत येतो. एका वर्गांत दुपक्ष होईल तर ज्या पक्षांत बहुमत असेल तो पक्ष कायदेशीर समजून ठराव होतो. एकंदर महाजनांत दुपक्ष झाला तर, तिन्ही वर्गांतून दोन वर्गांचे सभासद ज्या पक्षांत अनुकूल असतील तो पक्ष कायदेशीर समजून ठराव होतो व असा झालेला ठराव हेंच सर्व महाजनांचे मत समजतात.

ह्या देवस्थानचा कारभार पंच मंडळी जिला व्यवस्थापक कमिटी असें म्हणतात, ती महाजनांनीं निवडून द्यावयाची असते. या व्यवस्थापक कमिटीचा सभासद होण्याचा अधिकार पहिल्या व दुसऱ्या वर्गाच्या सर्व व्यक्तींस सारखा असून त्यांच्याच बरोबरीनें तिसऱ्या वर्गांतील वैद्य पानवेलकर ह्यांच्या कुळातील व्यक्तींसही तो अधिकार आहे. तिसऱ्या वर्गांतील इतरांस, व्यवस्थापक कमिटीचा सभासद होण्याचा अधिकार नाहीं; तथापि निवडणुक करण्याचा अधिकार सारखाच आहे. एकंदरीत तात्पर्य, कारभारी मंडळावर सभासद वैद्य पानवेलकर यांच्या कुटुंबावांचून बाकीचे भट्ट वांगडीयांस निवडणी करण्याचा अधिकार (मतें देण्याचा) आहे. पण, व्यवस्थापक कमिटींत उमेदवार होण्याचा अधिकार नाही असें समजतात. (पहा:- कोंप्रोमिस नियमावली कलम ८).

देवस्थानांत दैनंदिन अर्चन विधी आणि वार्षिक उत्सव

परंपरेनें चालत आलेल्या पध्दतीनुसार सूर्योदय समयीं सुस्नात ब्राम्हणाचे हस्तें निर्माल्य विसर्जन, रुद्रावर्तन व श्रीसूक्त पठनपूर्वक अभिषेक पूजा, दुपारीं महानैवेद्य समर्पणयुक्त पूजा, रात्रौं अष्टोपचार पूजा, नंदादीप ज्योति अहोरात्र प्रज्वलीत याप्रमाणें दैनिक कृत्यें- मुख्यासनीं चालत असलेल्या पूजा, अभिषेक, रुद्रावर्तनें, श्रीसूक्ताभिषेक, चंडिपाठ इत्यादि अनुष्ठानें आणि नैवेद्य, रंगपूजा, नंदादीप वगैरे उपचार कृत्यें वैदिक धर्मशास्त्र (श्रुति स्मृति पुराणोक्त) पध्दतीने पुरातन कालापासून चालत आहेत, ती करण्याचा अधिकार मुख्यत्वें देवस्थानांत वेतन देवून ठरविलेले ब्राम्हण (उपाध्याय व पुजारी) यांस आणि त्यांस अडचण होईल तर इतर सुशील ब्राम्हणास व ब्राम्हण वर्गांतील महाजनादि भक्तांस मात्र आहे. ब्राम्हणाशिवाय, इतर वर्णाचे हिंदु व परधर्मी लोकांस गर्भागारांत प्रवेश करण्याचा सुध्दां अधिकार नाही.

प्रत्येक महिन्याच्या शुक्ल आणि कृष्ण पक्षांत दशमी दर्शनी तिथी ज्या दिवशीं रात्रौं मिळत असेल, त्या दिवशीं रात्रौं, शिबिकोत्सव (पालखी). चैत्र महिन्यांत शुक्ल प्रतिपदा दिवशीं पंचांग श्रवण, आश्विन महिन्यांत शुक्ल प्रतिपदेपासून दशमी पर्यंत नवरात्रोत्सव दहा दिवस. आश्विन पौर्णिमा रोजीं कोजागिरी; आश्विन कृष्ण चतुर्दशीस श्रीलक्ष्मीपूजन; कोजागिरी पासून कार्तिक शुक्ल पौर्णिमा पर्यंत हरिजागर; मार्गशीर्ष महिन्यांत शुक्ल दशमी रोजीं रात्रौं नौका क्रीडन, दशावतार चरित्रात्मक काला (नाटकाचा एक प्रकार), दुसरे दिवशीं गवळण काला, स्तंभपूजा व रात्रौं जागर (फार प्राचीन पध्दतीचा एक नाटक भेद), मार्गशीर्ष पौर्णिमा रोजीं दुपारीं वनभोजन व रात्रौं लालखी वाहनांतून श्रींची मिरवणूक; माघ मासांत कृष्ण एकादशी पासून महाशिवरात्रीपर्यंत चार दिवस रात्रौं विविक्षिप्त प्रकारचें वाद्य, नृत्य आणि नाटक, शेवटच्या रात्रौं खांद्यावरील रथांतून श्रींची मिरवणूक, फाल्गुन कृष्ण प्रतिपदा दिवशी होलिकापूजन, दशमी दिवशीं शिमगा, इत्यादि उत्सव प्रतिवर्षीं होत असतात. या उत्सवांत खांद्यावरील गुड्यांचा रथोत्सव, हत्ती अंबारी वाहनांतून श्रींची मिरवणूक, नौकारोहण म्हणजे सांगडाचा उत्सव, हे फार प्रेक्षणीय असतात.

प्रत्येक महिन्याच्या शुक्ल आणि कृष्ण पक्षाच्या दशमी तिथीचा शिबिकोत्सव

प्रत्येक महिन्याच्या शुक्ल आणि कृष्ण पक्षाच्या दशमी तिथी रोजीं रात्रौं नियमितपणें, श्रीविजयादुर्गा देवीचा शिबिकोत्सव असतो. श्रीदेवीची उत्सवमूर्ती श्रृंगारून पालखींत बसवून पालखींतून मिरवणूक देवालया सभोंवार प्रदक्षिणा होत असते. त्यांत आठ पेणीं (मुक्काम) आठ दिशांकडे होत असतात, आणि पालखी बरोबर वैदिक ब्राम्हण अष्टकें म्हणतात.

देवस्थानांत प्रसाद-कौल घेण्याची वहिवाट आहे

गोमंतकांतील इतर देवस्थानांप्रमाणें याहि देवस्थानांत प्रसाद-कौल घेण्याची वहिवाट आहे. हे प्रसाद गर्भागारांतील श्रीदेवीच्या मुख्यासनाच्या खालच्या बाजूस पाषाणी जी शिला आहे त्या शिलेच्या दर्शनी बाजूस लावतात. प्रसाद पूजा एकंदर सत्तावीस ठिकाणी फुलांच्या कळ्या १८ आणि ९ पाकळ्या लावतात. या सर्व कळ्या आणि पाकळ्या तांबडी बटकुली झाडाच्या फुलांच्या लावतात. हे प्रसाद वर्षाच्या कोणत्या महिन्याच्या कोणत्या तिथी दिवशीं घेतां येत नाहीत, याची नोंद खाली दिली आहे. कारण, गरजू भाविकांस देवस्थानांत मुद्दाम प्रसाद-कौल घेण्याच्या इच्छेने आल्यानंतर तेथे जर कळले कीं, त्या दिवशीं प्रसाद-कौल घेतां येत नाहीत म्हणून, तर त्या गरजू भाविकाची ऐनवेळी फजिती आणि मनस्ताप होण्याचा प्रसंग अनुभवास येतो. असे घडू नये, यासाठीं, जर ही माहिती इच्छूकांस कळली, तर गैरसोय टळू शकते.

प्रत्येक महिन्याच्या शुक्ल आणि कृष्ण पक्षाच्या दशमी आणि एकादशी तिथी आणि अमावास्या असे पांच दिवस प्रसाद घेतां येत नाहीत हे, जमेस धरून खालील प्रमाणें ज्या दिवसांत प्रसाद घेतां येत नाहीत त्यांची नोंद दिली आहे.

चैत्र :-

शुक्ल प्रतिपदेपासून शुक्ल एकादशीपर्यंत श्रीरामनवरात्र, कृष्ण १० मी, कृष्ण ११ शी, अमावास्या.

वैशाख :-

शुक्ल ५ मी, शुक्ल १० मी, शुक्ल ११ शी, कृष्ण ८ मी, कृष्ण ९ मी, कृष्ण १० मी, कृष्ण ११ शी आणि अमावास्या

जेष्ठ :-

शुक्ल १० मी, शुक्ल ११ शी, कृष्ण १० मी, कृष्ण ११ शी, अमावास्या.

आषाढ :-

शुक्ल १० मी, कर्क संक्रांतीच्या दिवशी, शुक्ल ११शी, कृष्ण १० मी, कृष्ण ११ शी, अमावास्या.

श्रावण :-

शुक्ल १० मी, शुक्ल ११ शी, कृष्ण १० मी, कृष्ण ११ शी, अमावास्या.

भाद्रपद :-

शुक्ल १० मी, शुक्ल ११ शी, कृष्ण १० मी, कृष्ण ११ शी, अमावास्या.

आश्विन :-

शुक्ल प्रतिपदा ते पौर्णिमापर्यंत, कृष्ण १० मी, कृष्ण ११ शी, अमावास्या.

कार्तिक :-

शुक्ल १० मी, शुक्ल ११ शी, कृष्ण १० मी, कृष्ण ११ शी, अमावास्या.

मार्गशीर्ष :-

शुक्ल प्रतिपदा ते पौर्णिमापर्यंत त्यांत शुक्ल १० मीजत्रा, मुख्य उत्सव शुक्ल ११ शी स्तंभपूजा, कृष्ण १० मी, कृष्ण ११ शी, अमावास्या.

पौष :-

शुक्ल १० मी, मकर संक्रांतीचा दिवस, शुक्ल ११ शी, कृष्ण १० मी, कृष्ण ११ शी, अमावास्या.

माघ :-

शुक्ल १० मी, शुक्ल ११ शी, कृष्ण १० मी, कृष्ण ११ शी, महाशिवरात्र ते अमावास्या.

फाल्गुन :-

शुक्ल ९ मी ते पौर्णिमापर्यंत कृष्ण १० मी, कृष्ण ११ शी, अमावास्या.

वरील दिवसांशिवाय चंद्रग्रहण किंवा सूर्यग्रहण येईल, त्या दिवशीं प्रसाद-कौल घेत नसतात.

कायम उत्पन्न आणि तैनाती

द्राविड महाजनांपैकी वैद्य पानवेलकर यांच्या पूर्वजांनी अंदाजे सव्वा दोनशें वर्षांपूर्वीं किंवा त्यापेक्षाही अधिक प्राचीन कालापासून देवकृत्यांसाठी शिरिस्ता खंडानें केरी गावांत अमरखंडें वाड्यावर "निगळ" नामक ठिकाण नेमून दिलें असून त्या शिरिस्ता खंड उत्पन्नावर या देवस्थानांतील कांही कृत्यांचा खर्च चालत आलेला आहे. तसेंच वैद्य पानवेलकर वगैरे द्राविड महाजन यांनी केरी गावांत "आर्ल" वाड्यावर आगर ठिकाण "बाबू रामभट घरभाट" नांवाचें घेऊन दिले असून त्याच्या उत्पन्नांतून कांही वार्षिक उत्सव आणि देवकृत्यांच्या खर्चाची व्यवस्था होत असते.

केरी गांवच्या ग्रामस्थ मंडळीनीं म्हणजे कोमुनिदादीनें या देवस्थानास कांहीं इनामें दिलीं आहेत, तीं अशीं :- "आंदळें" नामक ठिकाण, "खंची होळी" नामक ठिकाण, "तळेंतील दिगी" नामक जिरात हीं तीन अमरखंडें वाड्यावर, आणि "तळेंतील दीग" नांवाचें जिरात सांतवाडें वाड्यावर अशीं चार इनामें

दिलीं आहेत; त्यांच्या उत्पन्नांतून देवस्थानांत नित्याभिषेक, नंदादीप, नित्य महानैवेद्य, संवत्सर प्रतिपदा दिवशीं पंचांगवाचन, विजयादशमी रोजीं सीमोल्लंघन, होलिका, व प्रतिदशमीस दीडशेर तेल इत्यादि खर्च चालतो.

अनेक भाविक महाजनांनीं या देवस्थानांत नित्यमहानैवेद्य, नंदादीप, नित्याभिषेक, ज्योत वगैरे कायम देवकृत्यांच्या खर्चाची व्यवस्था केलेली आहे.

केरी गांवच्या ग्रामसंस्थेनें कोमुनिदादीनें अशीं चार इनामें दिलेलीं त्यांचा वर उल्लेख केला आहे, तसेंच आपल्या वार्षिक खर्चाच्या यादींत, या देवस्थानांत प्रतिवर्षी होणाऱ्या महाशिवरात्री उत्सवांत एका रात्रीचा खर्च आणि मार्गशीर्ष शुक्ल दशमीच्या जत्रोत्सवांत अर्धा मण तेल आणि प्रति दशमीस मंडपांत दिवा लावणेस पावशेर तेल या खर्चाची नोंद त्या कोमुनिदादीच्या वार्षिक जमा खर्चाच्या वहींत नोंदलेली आहे.

या शिवाय, महाजन नायक अष्टवांगडी यांकडून या देवस्थानास प्रतिवर्षीं खर्चाचे भरपाईबद्दल एकतीस रुपये पंचवीस पैसे येत आहेत.

देवालयाच्या इमारतीची एकंदर रचना आणि स्वरूप

श्रीविजयादुर्गा देवीच्या देवालयाचें वर्णन साधारण कल्पना येण्यासाठीं करावयाचें झाल्यास तें खालील प्रमाणें करतां येईल.

देवालयाचें प्रमुख महाद्वार उंच कमानीचें असून त्यावर नगारखाना आहे. नगारखान्यास जोडून मागच्या भागीं विस्तिर्ण सभामंडप आहे. या सभामंडपाची उभारणी दगडी वाटोळे खांबे डाव्या बाजूकडे सात सात आणि उजव्या बाजूकडे सात सात यांवर केली असून त्यांवर दोन्ही बाजूंकडे लांकडी खांब आणि त्यांवर मंडपाचें छप्पर आहे. या भव्य मंडपांत देवालयाच्या बाजूस मध्यभागीं उंच ग्यॉलरी सारखा शेजा असून उत्सवाचे वेळीं श्रीदेवीची उत्सवमूर्ती त्या उंच शेज्यावर स्थानापन्न होण्याची व्यवस्था आहे. त्या मागें सोंडियो नंतर देवालयाचा महाचौक, सभोंवार सरवळी आणि त्यानंतर श्रींचें गर्भागार आणि त्या सभोंवार प्रदक्षिणा आहे. देवालयांतील सर्व जमीन शुभ्र संगमरवरी पाषाणानें मढविलेली असून, बाहेरील मंडपाची सर्व जमीन सिमेंट आणि सुबक मार्मोराद पध्दतीनें मढविलेली दिसते. गर्भागाराबाहेर प्रदक्षिणा आणि त्या बाहेर देवालय जमिन तळापासूनच्या भिंती चौकोनी आकारांत आहेत. गर्भगारावरचा भाग अष्टकोनी उंच धूड त्यावर घुमट गोलाकार आकृतीचा वरच्या बाजूकडे निमूळता होत गेलेला आणि त्या सर्वांवर कळस अशा स्वरूपांत सर्व बांधकाम दगडी आणि त्यावर चुना सिमेंट इत्यादिंचा गिलावा केलेला दिसतो. देवालय पूर्वाभिमूख आणि देवालयापुढें डावीकडे नवीन कला कौशल्यपूर्ण अष्टकोनी सात मजली दीपस्तंभ आणि उजवीकडे तसेंच श्रीतुलसीवृंदावन यांचा उल्लेख मागें केलेलाच आहे. देवालया पुढें असलेल्या मंडपाच्या बांधणीस एकशें अकरा वर्षे झालीं, आणि नगारखाना बांधणीस नव्वद वर्षे झालीं असलीं, तरी तीं दोन्हीं अद्याप चांगल्या स्थितींत आहेत. आधुनिक पध्दतीनें त्यांचा थोडाफार कायापालट झाला, तर कालमानाप्रमाणें त्यांची शोभा वाढू शकेल.

गर्भागारांतील मुख्यासनावरील मूर्ती

श्रीविजयादुर्गा जी गर्भागारांत मुख्यासनावर स्थापित आहे, ती मूर्ती काळ्या पाषाणाची असून तिची उंची अंदाजें अडीच हात आणि रुंदी एक हात असावी तीं मूर्ती अष्टभुजा महिषासुरमर्दिनी स्वरूपांत दिसते आणि फार मोहक आहे. तिच्या उजव्या हातांत : पहिल्या हातांत महिषासुराची शेंपटी, दुसऱ्या हातांत बाण, तिसऱ्या हातांत तलवार, आणि चवथ्या हातांत चक्र आहे; तसेंच, डाव्या हातांत : पहिल्या हातांत महिषासुराची शेंडी, दुसऱ्या हातांत ढाल, तिसऱ्या हातांत धनुष्य आणि चवथ्या हातांत शंख आहे. श्रीदेवीच्या दोन्ही पायांच्या पावलांजवळ महिषासूर आडव्या स्थितींत आहे. श्रीदेवीच्या दोन्ही बाजूंकडे खालीं, प्रत्येक बाजूस दोन दोन स्त्रिया आपल्या हातांत चंवऱ्या घेऊन श्रीदेवीच्या सेवेंत मग्न दिसतात. मुख्यासनावर मूर्ती तिच्या सभोंवार कला कौशल्यपूर्ण तयार केलेल्या रौप्य मंडपांत विराजमान झालेली

दिसते. रौप्य मंडपाच्या दर्शनी भागाच्या दोन्ही बाजूंस पितळधातूच्या सरमाळींचे दिवे चकचकीत रात्रंदिवस तेवत असतात. सकाळीं निर्माल्य विसर्जनानंतर नित्य नैमित्तिक पूजा अर्चा झाल्यावर दुपारीं महापूजेचेसाठीं श्रीदेवीस श्रृंगार केला जातो. मूळ पाषाणी मूर्तीस चांदीचें कवच, सोन्याचा मुखवटा, घालून भरजरी शालू पीतांबर वस्त्रें परिधान करून दागदागिने अलंकर आणि नंतर सुवासिक सुंदर फुलें पुष्पहार वगैरे घालून श्रृंगार पूर्ण झाल्यानंतर श्रीदेवीचें तें फार मनोहारी रूप पाहून अगदीं दर्शन संतोष आणि तन्मय झाल्याशिवाय रहात नाही. त्यानंतर धूप, दीप, महानैवेद्य समर्पण, पंचारती महा-आरती कर्पूरारती झाल्यावर मंत्रपुष्प गाऱ्हाणें प्रार्थना होतांच उपस्थित भक्तगणांस तीर्थप्रसादाचा लाभ होतो.

केरी गावांत श्रीविजयादुर्गा देवस्थानांत कोठून कसे जावे?

केरी हा गांव गोमंतकांत फोंडा तालुक्यांत आहे.गोमंतकांत गोमंतकाबाहेरून येणारे भक्तगण मुंबई-हून आल्यास आगबोटीनें पणजी बंदरांत उतरतात. बोटी धक्क्यापासून पणजी शहर मोटार स्टँडकडे जाण्यास प्रवासी बसेस धक्क्याजवळच सांपडतात त्यांतून पणजी मोटार स्टँडवर जातां येतें. पणजी शहर मोटार स्टँडवरून फोंडा येथें जाणाऱ्या प्रवासी बसेस असतात त्यांतून फोंडा येथे जाऊन मोटार स्टँडवर उतरावें. गोमंतकांत गोमंतकाबाहेरून रेल्वेनें येणाऱ्यानीं मडगांव रेल्वे स्टेशनावर उतरावें. मडगांव येथून पणजी शहराकडे फोंडा मार्गे जाणाऱ्या प्रवासी बसेस नियमित असतात, त्यांतून फोंडा येथें येवून मोटार स्टँडवर उतरावें. फोंडा मोटार स्टँडवरून प्रवासी बसेस सावईवेरें, वळवईकडे जाणाऱ्या असतात त्या बसेसमधून केरी गावांत उतरावें. केरी गावांत जेथें बसेस थांबतात, त्या जागेवर सरकारी सार्वजनिक बांधकाम खात्यानें जमीनतळावर सिमेंट कॉंक्रीटचा फलक बसविलेला आहे. कारण, त्या जागेवरून रस्त्याचे दोन फांटे दोन बाजूंकडे जातात. डाव्या बाजूचा रस्ता केरी येथील श्रीविजयादुर्गा देवस्थानकडे जातो, आणि उजव्या बाजूचा रस्ता सावईवेरें गावांकडे जातो. केरी गावांत उतरल्यावर डाव्या बाजूच्या रस्त्यानें पुढें पायवाटेनें जातांच अवघ्या दहा मिनिटांत श्रीविजयादुर्गा देवस्थानांत पोंहचतां येतें. सर्व रस्ता डांबरी आहे. केरी गावांत ज्या जागेवर प्रवासी बसेस थांबते आणि जेथें रस्त्यास दोन फांटे असल्यामुळें फलक बसविलेला आहे, ती जागा म्हणजे एक लहानसें श्रीमारुतीमंदिर एका अश्वत्थ (पिंपळ) वृक्षाच्या पारावर बांधलेलें आहे.

श्रीविजयादुर्गा देवस्थानची नियमावली (कोंप्रोमिसु)

या देवस्थानची कायदेशीर नियमावली जिला कोंप्रोमिसु या नांवानें ओळखण्यांत येतें, ती नियमावली सरकारनें आपल्या पोर्तारिय नंबर ४९९ ता. १९ जुलै सन १८९५ च्या हुकुमानें पास आणि मंजूर केली असून ती तत्कालीन बोलेतीं ओफिसियाल नंबर ७८ ता. २३ जुलै सन १८९५ आणि बोलेतीं ओफिसीआल नंबर ८८ तारीख १७ ऑगष्ट १८९५ या अंकांत प्रसिध्द झालेली आहे.

॥ ॐ नमो रुद्राय शान्ताय ब्रम्हणे परमात्मने ॥

७

श्रीनागेश देवस्थान

बांदिवडे

जुन्या काली ज्या वास्तुशिल्पकारानी ज्या देवस्थानाची कौशल्याने बांधणी करून देवालयासमोर तलाव बांधला, आणि त्या तलावाच्या पाण्यात देवालयाच्या गर्भागारातील दैवताचे प्रतिबिंब दिसण्याची व्यवस्था केली, आणि ही एक महान आश्चर्यकारक घटना प्रत्यक्षात उतरविली व हे आधुनिक स्थापत्य शिल्पकारास एक आव्हानच ठरविले ते गोमंतकातील बांदिवडे गावात असलेले श्रीनागेश देवस्थान

श्रीनागेश   श्रीनागेश. बांदिवडें, फोंडा

गर्भागारांतील अधिष्ठीत मूर्ती

श्रीनागेश देवालय, बांदिवडें, फोंडा

श्रीनागेश देवस्थान

बांदिवडे – गोवा

गोमंतकातील अंत्रुज किंवा फोंडा महालातील बांदिवडे या गावात फार प्राचीन काली, म्हणजे ज्या काली सारस्वत कुलोत्पन्न परशुरामाने त्रिहोत्रवासी व पंचगौडांतर्गत दहा ब्राम्हण आणून गोमंचल आणि त्याची पंचक्रोशी व कुशस्थल येथे त्यांची स्थापना केली, आणि गोमंत पर्वतावर त्रिहोत्रपुरातील प्रमुख देव श्रीमांगिरीश महादेव, श्रीमहालक्ष्मी, श्रीमहालसा, श्रीशांतादुर्गा, श्रीनागेश, श्रीसप्तकोटीश्वर इत्यादि पुष्कळ दैवता आणून स्थापना केल्या, त्याच काली बंदवाड ग्रामी म्हणजे आजच्या बांदिवडे गावात, या श्रीनागेश देवाची स्थापना झाली असली पाहिजे याची खात्री पटते. याचे कारण, ही घटना सह्याद्रि खंडात उत्तररहस्यामध्ये उल्लीखलेली खालीलप्रमाणे आहे.

आनीता भार्गवेणैव गोमंताख्ये च पर्वते ।
मांगिरीशो महादेवो महालक्ष्मीश्च महालसा ॥ ५२ ॥

शांतादुर्गा च **नागेशः** सप्तकोटीश्वरः शुभः ।
तथा च बहुला देवा आनीताः भार्गवेणच ॥ ५३ ॥

स्थापिता भक्तकार्यार्थं तत्रैव च शुभस्थले ।
इतिहासं मया प्रोक्तं सर्वधर्मपरायणम् ॥ ५४ ॥

आणि फार महत्वाची व विशेष उल्लेखनीय गोष्ट म्हणजे या श्रीनागेश देवस्थान स्थापनेस तत्कालीन त्या दैवताचे संस्थापक कौशिक (कौंस), वत्स आणि भारद्वाज गोत्रांचे गौड सारस्वत ब्राम्हण मंडळीस मिळालेला सुमुहूर्त फारच अप्रतिम आणि अद्वितीय असला पाहिजे. कारण त्या श्रीनागेश देवाची मूळ स्थापना बांदिवडेस जी एकदा केव्हा झाली, त्या दिवसापासून आजपर्यंत तरी त्या दैवताच्या स्थलांतरासंबंधी किंवा मोडतोड, पळवापळवी, अज्ञातवास अशा कोणत्याही प्रकारचे विघ्न किंवा संकट आले नाही, ही फारच समाधानाची गोष्ट आहे. या उलट, उल्लीखित सह्याद्रि खंडाच्या उत्तररहस्याच्या भागात श्रीमांगिरीश महादेव, श्रीमहालक्ष्मी, श्रीमहालसा, श्रीशांतादुर्गा, श्रीसप्तकोटीश्वर ज्यांची स्थापना वर्णिली आहे, त्या प्रत्येक दैवताचे स्थलांतर प्रारंभीच्या मूळस्थापना जागेपासून दुसरीकडे कालांतराने इसवी सनाच्या सोळाव्या शतकात गोमंतकात पोर्तुगीज कॅथोलिक धर्माच्या राज्यकर्त्यांनी, चालीवलेल्या हिंदु धर्मीयांच्या असह्य छळामुळे झालेले आहे आणि श्रीनागेश देवस्थान हे अपवाद ठरले असून, ते प्रारंभी ज्या गावात, ज्या जागी स्थापन झाले, तेथेच अद्याप कायम आहे. ही गोष्ट काही सामान्य नव्हे, म्हणूनच त्या दैवताच्या मूळ स्थापनेचा सुमुहूर्त फार अप्रतिम आणि अद्वितीय मानणे क्रमप्राप्त ठरते.

बंदिवाड ग्रामात (बांदिवडे गावात) श्रीनागेश देवाची स्थापना कधी झाली ?

श्रीनागेश देवाची स्थापना गोमंचल व त्याची पंचक्रोशी आणि कुशस्थल गोमंत पर्वतावरच्या भागात झाली, याबद्दल स्कंद पुराणांतर्गत सह्याद्रि खंडात उत्तररहस्यात माहिती आहे. ती माहिती वर दिली व ती स्थापनाही श्रीपरशुराम कालात झाली आहे, हे त्या माहितीबद्दल कळते. पण, प्रत्यक्षात तो स्कंद पुराणात उल्लीखलेल्या श्रीपरशुरामाचा काल कोणता, याबद्दल थोडीसी कल्पना वाचकांस यावी, या हेतूने तशी माहिती येथे देण्याचा प्रयत्न करू.

भारतीय विद्याभवन या संस्थेने भारतीयांच्या दृष्टिकोनातून भारताचा इतिहास प्रसिध्द केलेला आहे. त्याच्या प्रथम भागात डॉ. पुसाळकर यांनी Historical Traditions या सदरात प्रमुख व्यक्तींचे काल दिले असून त्यात :–

	इसवी सन पूर्वकाल
ययाति (देवयानीचा पति यदुवंशी)	२०००-२७५०
परशुराम	२५५०-२३५०
श्रीकृष्ण	१९५०-१४००
भारतीय युध्द	१४००-......

असे काल निश्चित केलेले दिसतात. अर्थात परशुरामाचा काल इतिहास दृष्ट्या अडीच हजार वर्षे म्हणजे आजपासून साडेचार हजार वर्षापूर्वीचा ठरतो.

पुराणाचा जो काल किंबहुना श्रीपरशुरामाचा जो काल, तोच काल स्कंद पुराणाचा असेच अनुमान काढणे भाग ठरते. भारतीय पुराणाच्या समृध्द परंपरात स्कन्द पुराणांतर्गत सह्याद्रि खंडाचे स्थान फार वरचे आहे. आणि सामान्यतः सह्याद्रिखंड हा पुराणग्रंथ अन्य पुराणांइतकाच प्राचीन आहे असे मानतात. सप्त-कोंकणात स्थायिक झालेल्या मानववंशावर लक्ष केंद्रित करणारा आणि भौगोलिक सामाजिक देवस्थानांचा व तीर्थस्थानांचा इतिहास सांगणारा हा एकमेव प्राचीन पुराणग्रंथ असून प्राचीनतेच्या दृष्टीने त्याची तुलना काशी, कांची, अवन्तिकेच्या तोलाची व मोलाची आहे.

श्रीपरशुरामाचा काल आजपासून साडेचार हजार वर्षापूर्वीचा ठरतो, हे इतिहास दृष्ट्या समजल्यानंतर आणि या श्रीपरशुरामाच्या कालात गोमन्तकात सारस्वत कुलोत्पन्नानी आपआपल्या कुलदैवतांची स्थापना ठिकठिकाणी केली आहे हे लक्षात घेतल्यानंतर त्या दैवतांच्या मूळ स्थापना कालाचे पुरातनत्व आपोआप सिध्द होते.

बांदिवाड ग्रामात श्रीनागेश दैवताची प्रारंभी मूळ स्थापना कोणत्या साली, कोणत्या महिना तिथीस झाली, याची निश्चित माहिती जरी अद्याप उपलब्ध नसली, तरी ती स्थापना अगदी खचितच, ज्या काली परशुरामाने उत्तरेकडील पंचगौडातील दशगोत्रांची सारस्वत कुले व त्यांची कुलदैवते आणून गोमंतकात स्थापिली, त्या परशुराम कालातच श्रीनागेश दैवताची स्थापना झाली आहे याबद्दल कोणतीच शंका नाही. आणि ही घटना परशुरामाचे गोमंतकातील अस्तित्व, सारस्वतांचे गोमंतकात आगमन आणि सारस्वतांच्या गोमंतकातील आगमनाच्या कालाशी संबंधित आहे हे उघडच आहे.

सरकारी प्राचीन ऐतिहासिक दप्तर, शिलालेख, ताम्रपट काय दर्शवितात ?

पणजी शहरात सरकारी ऐतिहासिक दप्तरखान्यांत लिव्रु दस मोंसोइस नंबर ९७ (LIVRO dts. Monocoes Numero 97) या नावाची एक हस्तलिखित चांगली मोठी वही आहे. या वहीच्या पृष्ठ ५६० वर असा उल्लेख लिहिलेला सांपडतो की, गोव्यातून तत्कालीन गोवा सरकारकडून पोर्तुगालच्या लिस्बन शहरात त्या सरकारकडे कांही ताम्रपट पाठविले आहेत आणि ते ताम्रपट 'सांतान' गावात जमिनीत गाडलेले मिळाले होते.

हे ताम्रपट लिस्बान येथे रवाना करताना, त्यासोबत त्या ताम्रपटावर जो मजकूर कोरलेला आढळत होता, त्या मजकुराचे पोर्तुगीज भाषेत भाषांतर करून पाठविल्याचाही उल्लेख त्यात असून ते भाषांतर तत्कालीन सरकारी भाषांतरकार कै. वा. बहुगुण कामत यांनी केल्याचेही त्यात नमूद आहे. उल्लेखित वहीच्या पृष्ठ ५६१ वर जी माहिती आढळते ती अशी :- तीन ताम्रपट एकमेकात भोक काढून ते एका वाटोळ्या आंगठीच्या आकाराच्या तारेवर गुंफलेले असून तीवर राजा त्रिभुवन मल्ल यांचा शिक्का आणि सिंहाचे चित्र आहे, व मजकूर चितारलेल्या जुन्या नंदिनगर नामक लिपी आणि संस्कृत भाषेत आहे. या ताम्रपटातील मजकुरात असा उल्लेख आहे की, शके १०२१ विक्रम संवत्सर, आषाढ शुध्द एकादशी, शनिवार (इ. स. १०९९ चा जून महिना) या कालात गोमंतकात फोंडा किंवा अंत्रुज तालुक्याच्या प्रियोळ गावात नागदेवार्य नावाचा वत्स गोत्री विद्वान ब्राम्हण होता व राजा त्रिभुवन मल्लाच्या नानाविध कार्यात

सहकार्य केल्यामुळे आणि आपल्या सद्‌गुणांमुळे तेथील सर्व जनतेस प्रिय होता. त्याने आपल्या या प्रियोळ गावातच श्रीनागेश्वर देवाचे देवालय उभारले होते.

राजा त्रिभुवन मल्ल शके १०२१ विक्रम संवत्सर, आषाढ शुक्ल एकादशी, दिवशी त्या प्रियोळ गावात असताना त्याने त्या प्रियोळ गावच्या श्रीनागेश्वर देवालयास दहा नाणी 'निष्क' नावाची, अर्पण केल्याचा त्यात स्पष्ट उल्लेख आहे. शिवाय, शेतजमीन, बागायतही श्रीनागेश्वर देवालयास दान केल्याचा उल्लेख त्यात आहे.

गोमंतकातील कदंब राजघराण्याचा इतिहास लक्षात घेता, गोमंतकात कदंब कुलातील राजानी राज्य केले. त्यात त्रिभुवनमल्ल नावाचा एकमेव राजा तेराव्या शतकाच्या पूर्वार्धात राज्य केल्याची माहिती मिळते. आणि कदंब कुलाची वंशावळ पाहता इसवी सन १०८० ते ११०० या कालात राजा गुहालदेव तिसरा याची राजकीर्द होती, असे त्या वंशावळीवरून सिध्द होते. राजा त्रिभुवन मल्ल नव्हे, असा निष्कर्ष निघतो. यात कसलीही आणि कोणाचीही यदाकदाचित चूक असली, तरी इतके मात्र खचित की, प्रियोळ गावात असलेल्या श्रीनागेश्वर देवालयास त्या दहा निष्क नाण्यांचे अर्पण तसेच शेत आणि बागायत जमिनीचे दान झालेले आहे. इतकेच नव्हे तर त्या ताम्रपटातील एकंदर मजकूर वाचून लक्षात घेता, त्यात प्रियोळ गावातील श्रीनागेश्वर देवालयास दान दिलेल्या जमिनीबद्दल कोणत्याच प्रकारचा सारा किंवा कर वसूल करू नये आणि त्या देवस्थानच्या भटजीस संरक्षण देण्याची सूचना त्या ताम्रपटातील मजकुरातच आहे.

या ताम्रपटातील मजकूर इतका स्पष्ट असताना, प्रियोळ गावातील श्रीनागेश्वर देवालयाचा किंवा दैवताचा सबंध बांदिवडे येथील श्रीनागेश दैवताशी आणि त्याच्या देवालयाशी लावण्यात येत असल्याचे लिखाण एकीकडे वाचावयास मिळाले. असा संबंध लावणे अगदी चुकीचेच नव्हे, तर ते जबाबदारी न ओळखता लिहिले असावे असे म्हणणे क्रमप्राप्त आहे. त्या चुकीच्या लिखाणात शके १०२१ विक्रम संवत्सर आषाढ शुध्द एकादशी (इ. सन १०९९ चा) कदंब कुलातील राजा त्रिभुवन मल्ल याचा एक **शिलालेख** (?) उपलब्ध आहे आणि त्यावरील मजकुरातील दैवताचा संबंध बांदिवडेच्या दैवताशी लावण्याचा प्रयत्न केलेला दिसतो.

गोमंतकात आता पर्यंत उपलब्ध झालेल्या नानाविध अनेक ताम्रपट, शिलालेख साधनांमध्ये एकही शिलालेख शके १०२१ विक्रम संवत्सराचा राजा त्रिभुवन मल्ल नावाने ओळखण्याचा उपलब्ध झालेला ऐकिवातही नाही. जो त्या तिथी, शक संवत्सराचा उपलब्ध झाला होता, तो शिलालेख नसून तो ताम्रपट आहे व तोही आजच्या कालात पोर्तुगालच्या लिस्बन शहरात असून, त्यावर असलेल्या मूळ मजकुराचे पोर्तुगीज भाषांतर तेवढेच, पणजीच्या सरकारी ऐतिहासिक दप्तरखान्यात लिव्रु द मोंसोंइस नंबर ९७ मध्ये पृष्ठ ५६१ वर आहे.

इतकी सविस्तर माहिती मुद्दाम येथे देण्याचे कारण यापुढे कधी काली, नजर चुकीने किंवा अनवधानाने का होईना, ताम्रपटा ऐवजी शिलालेख असा उल्लेख होऊ नये, आणि त्यामुळे जिज्ञासू अभ्यासूस पुढील कालात गोंधळ होणे शक्य असते, हे टाळण्यासाठीच ही माहिती देण्याचा सद्हेतूपूर्वक प्रयत्न केलेला आहे. त्यात दुसऱ्या लेखकाच्या लिखाणातील मुद्दाम चुका दाखवण्याचा मुळीच हेतू नाही किंवा लेखकाचा अनादर करण्याचाही नाही, हे येथे स्पष्ट करणे भाग आहे.

बांदिवडे गावात श्रीनागेश देवस्थानाचे अस्तित्व विजयनगरच्या राजवटीच्याही पुर्वीचे आहे याचा पुरावा

फोंडा तालुक्याच्या सावई-वेरे गावात उपलब्ध झालेल्या ताम्रपटात बंदिवाड ग्राम, श्रीनागनाथ या संबंधी उल्लेख केलेला आढळतो. हा ताम्रपट विम्नमंत्री याचा असून त्यावर शके १२७१ सांवरी संवत्सर, श्रावण बहुला अष्टमी, सोमवार असा आहे. पण, तो ताम्रपट ज्याने कोरला, त्याच्या नजरचुकीमुळे तो

दिवस तेथे लिहिला असावा, असे संशोधकांचे म्हणणे आहे. कारण, शके १२७१ हे वर्ष सांवरी नामक संवत्सराचे नसून, त्या पूर्व वर्षी म्हणजे शके १२७० साली सर्वश्वारी नामक संवत्सर होते. ताम्रपट कोरणाऱ्याने सर्वश्वारी ऐवजी सांवरी असा शब्द कोरला असावा. आणि ही चूक लक्षात घेता, तो ताम्रपट शके १२७० सर्वधारी नामसंवत्सर, श्रावण बहुला अष्टमी दिवसाचा आहे असे दिसते; व तसे झाल्यास इसवी सन १३४८, ता. १८ ऑगस्ट सोमवार हा दिवस त्या ताम्रपटाचा काल आहे.

या ताम्रपटात जो मजकूर आहे त्यावरून सदर दिवशी गोमंतकात विम्नमंत्री याची राजकीर्द चालू असता, खाटग्राम (खांडेपार) गावात श्रीगणनाथ देवाच्या देवालयात एक सभा झाली, त्या सभेत काही सवलती आणि हक्क सावई-वेरे येथील काही वाणी ज्ञाती समाजाच्या कुटुंबास आणि भविष्य कालातील त्यांच्या वंशजास सुपूर्त करण्याचा करार केलेला आढळतो. या कराराच्या मजकुरात श्रीगणनाथ, **वंदवाडग्राम**, तळिग्राम, श्रीगोवेनाथ, श्रीसपथनाथ, श्रीकपिलेस्वरू, **श्रीनागनाथ**, असे शब्द वाचावयास मिळतात. यावरून सिध्द होते की, त्याकाली म्हणजे शके १२७० (इ. स. १३४८) साली, बंदवाडग्राम आणि नागनाथ दैवत यांची प्रसिध्दी गोमंतकात होती, त्या काली बंदवाडग्रामातील दैवतास श्रीनागनाथ नावानेही संबोधिले जाई. त्या कालापूर्वीपासून गोमंतकातील अनेक दैवतांस 'नाथ' या प्रत्यय नामोच्चाराने ओळखत असल्यामुळे, येथे नाथ सांप्रदायी लोकांचा बराच प्रचार झाला असणे शक्य वाटते. गोमंतकात सोमनाथ, चंद्रनाथ, शिवनाथ, सिध्दनाथ, मंगनाथ, नागनाथ, गणनाथ सप्तनाथ किंवा सपथनाथ, गोवेनाथ, रामनाथ, मल्लिनाथ, कालनाथ, माधवनाथ, रवळनाथ, वंशनाथ, भवनाथ, विश्वनाथ, गोपिनाथ, चिंचणीनाथ, लोकनाथ, भूतनाथ, वाघनाथ, फुलनाथ, सितळनाथ, ब्रम्हनाथ, अजनाथ, हेमनाथ अशा अनेक नावाची दैवते होती, आणि त्यातील बरीचशी गोव्यात आजच्या कालातही ठिकठिकाणी आहे.

खुद्द श्रीनागेश देवस्थानात असलेला शिलालेख काय सांगतो ?

बांदिवडे येथे श्रीनागेश देवालयासमोर भिंतीत एक शिलालेख विजयनगर साम्राज्याच्या वीर प्रताप देवराय महाराय या राजाच्या, कारकिर्दीतील आहे. तो शिलालेख श्रीशालिवाहन शके १३३५ पौष बहुल ३० रोजीचा आहे. हा दिवस म्हणजे ता. २४ डिसेंबर सन १४१३ आहे. या साली गोमंतकात नंत्रण गोसावी हा प्रतिहस्त असताना, माईन शेणवी वागळे यानी 'वेद खंडिकेचे कुळागर' 'नागझरी मळो शेत' व गोलती वाड्यावरील "रुवो कुळागर" या जमिनी बांदिवडे येथील श्रीनागेश व श्रीमहालक्ष्मी या दैवतांस दिल्याचा उल्लेख या शिलालेखात आहे. कार्तिक पौर्णिमेच्या दिवशी श्रीनागेश देवालयात दीपमाळ लावणे व रात्री देवास गंध, धूप, दीप, तांदुळाचा उपहार, वडे किंवा घारिया, शाक व विडा, तसेच श्रीमहालक्ष्मी देवीस अभिषेक, गंध, धूप, दीप, तांदुळाचा उपहार प्रतिवर्षी समर्पण करावा व अखंड ज्योत उभय देवता सन्निध लावावी, अशी आज्ञा या शिलालेखात आहे. या शिलालेखावरून इसवी सन १४१३ सालापूर्वी श्रीनागेश देवस्थान बांदिवडे गावात होते हे सिध्द होते. सावई-वेरेच्या ताम्रपटातील उल्लेखावरून या देवस्थानचे अस्तित्व इ. स. १३४८ त होते याचा पुरावा मिळतो. आणि सांतान गावात मिळालेला ताम्रपट इसवी सन १०९९ सालचा असल्यामुळे आणि त्यात जो मजकूर आहे, तो सर्व प्रियोळ गावात असलेल्या श्रीनागेश्वर देवा संबंधाने असल्यामुळे आणि तो बांदिवडे गावातील श्रीनागेश देवस्थानाशी दूरान्वयानेही संबंधित नसल्यामुळे, तो ताम्रपट या बाबतीत जरी जमेस धरता येत नाही, तरी बांदिवडे येथील श्रीनागेश देवस्थान गोमंतकात पोर्तुगीजाच्या आगमनापूर्वी पासून अस्तित्वात असल्याचे सिध्द होते. पोर्तुगीज आफोंस द आल्बुकेर्क याने गोवाबेट (तिसवाडी) काबीज केली. ती इ. स. १५१० मध्ये. अंत्रुज प्रांत (फोंडा) पोर्तुगीज अधिसत्तेखाली आला, तो ता. १७ जानेवारी १७९१ च्या करारान्वये; सावई-वेरेचा ताम्रपट इ. सन १३४८ चा म्हणजे पोर्तुगीज लोक गोमंतकात प्रवेश करण्यापूर्वी १६२ वर्षांचा आहे.

वरील पौराणिक आणि ऐतिहासिक माहिती वरून बांदिवडे येथील श्रीनागेश देवस्थानाच्या पुरातनत्वाची कल्पना पूर्णपणे येऊ शकते. म्हणून आता ते देवस्थान बरोबर कोठे आहे, तेथील स्थलवर्णन आणि ते देवालय केव्हा, कोणी बांधले, याबद्दल काही माहिती घेऊ.

श्रीनागेश देवस्थानकडे जाण्याचे प्रवासी वाहतूक रस्ते

गोमंतकाबाहेरून गोव्यात येणाऱ्या प्रवासी यात्रेकरूंस विमानाने, रेल्वेने, आगबोटीने किंवा प्रवासी वाहतूक बसने, यापैकी कोणत्यातरी मार्गाने येता येते. विमानाने प्रवासी आला, तर त्याने गोव्यात दाभोळी विमानतळावर उतरावे लागते, व तेथून पणजी किंवा मडगांव शहराकडे बस किंवा मोटारीने गेले पाहिजे. रेल्वेने प्रवास करणाऱ्याने मडगांव रेल्वे स्टेशनवर उतरणे सोईस्कर आहे. आगबोटीने गोव्यात येणाऱ्याने पणजी बंदरातच उतरणे भाग आहे. आणि प्रवासी बस वाहतुकीने येणाऱ्यानी पणजी-बेळगांव हमरस्ता क्रमांक ४ अ वरील २६-२ जवळील फर्मागुडी बस थांब्याकडे उतरावे लागते. फर्मागुडी या स्थलापासून अंदाजे आठशे मिटर अंतरावर श्रीनागेश देवस्थानाकडे थेट जाणारा डांबरी रस्ता असून या रस्त्याला लागूनच देवस्थानच्या प्राकारात जाण्यासाठी भव्य कमानी दरवाजा आहे. त्यातून श्रीनागेश देवालयाकडे जावे लागते. प्रवासी इसम फर्मागुडीवर उतरला, तर तेथून श्रीनागेश देवालयाकडे जाण्यास पाहिजे त्यावेळी प्रवासी बस मिळत नसल्यामुळे यात्रेकरूने फर्मागुडी ते श्रीनागेश देवस्थानपर्यंत डांबरी रस्ता पायवाटेने अंतर तोडावे लागते. जाताना रस्ता चांगला व उतरणीचा आहे म्हणून, जास्तीत जास्त वीस मिनिटे वेळात तेथे पोचता येते. पण, प्रवासी यात्रेकरूत जर वयस्क माणसे, सामान वगैरे असल्यास आणि यात्रेकरू प्रवासी बसने पणजी किंवा मडगांवहून आल्यास त्याने फर्मागुडीवर न उतरता फोंडा स्थानकावरच उतरणे फार सोईचे आहे. कारण फोंडा बस स्थानकापासून श्रीनागेश देवालयाकडे जाणाऱ्या वारंवार प्रवासी बसेस, टेंपो, रिक्शा, टॅक्सी यापैकी प्रवाशांच्या सोईप्रमाणे मिळू शकतात. फोंडा बस स्थानकापासून श्रीनागेश देवस्थान चार किलोमिटर अंतरावर आहे.

श्रीनागेश स्थलवर्णन आणि त्या परिसराची माहिती

बांदिवडे गावात श्रीनागेश देवस्थान ज्या वाड्यावर आहे त्या वाड्यास **नागेशी** असे म्हणण्याचा परिपाठ आहे. हा परिसर अत्यंत रम्य असून सभोवार डोंगराच्या रांगानी परिवेष्ठित आहे. डोंगरात ठिकठिकाणी गोड पाण्याचे झरे, फोपळीच्या म्हणजे सुपारीच्या बागा ज्यास कुळागरे म्हणतात, आसपास हिरवीगार शेते, सृष्टीदेवीने जिकडे तिकडे पसरलेला तो नेत्रानंददायक हिरवागार गालिचा, डोंगरावर झाडी, वनपुष्पांचा मधुर सुवास इत्यादि मनोरम सृष्टीसौंदर्य अवलोकन करून आणि निसर्ग देवतेने आपला वरदहस्त ठेवल्याचे पाहून अंतःकरण वेधून जात नाही असा भाविक यात्रेकरू इसम विरळा ! अशा या नितांत रमणीय स्थानी स्वर्गस्थ देवदेवतानाही आपण वास्तव्य करावे, अशी इच्छा झाली आणि त्यामुळे प्रत्यक्ष भगवान् श्रीशंकरानी श्रीनागेश नावाने तेथे विराजमान होण्याचे खास आपल्या भक्तांसाठी पत्करिले, तर त्यात मुळीच आश्चर्य वाटण्याचे कारण नाही.

डांबरी रस्त्यास लागूनच असलेल्या देवस्थानच्या भव्य कमानी महाद्वारातून आत प्रवेश केल्यावर अवघ्या ७-८ मिटर अंतरावरच श्रीनागेश देवालयाची मागची बाजू दिसते. याचे कारण, हे देवालय पश्चिमाभिमुख असून ते अत्यंत टुमदार आणि व्यवस्थित असेच आहे. मंदिरात प्रवेश करण्याच्या पायऱ्या चढताच तेथे सोंड्यावर श्रीनंदिकेश्वराची पाषाणी मूर्ती, जिच्या गळ्यात घंटा आणि शोभिवंत अलंकारिक माळा कोरलेल्या दिसतात अशी, ठाण मांडून देवासमोर तोंड करून गोजिरवाण्या मुद्रेने बसलेली दिसते. मंदिराच्या प्रवेशद्वारातून आंत शिरल्यावर संगमरवरी पांढऱ्या शुभ्र रंगाचे पाषाण बसविलेला प्रशस्त चौक असून, त्या चौकाच्या उर्ध्व भागी खांबावरच्या बाजूस लांकडावर प्राचीन पध्दतीने चांगले सुबक कोरीव काम वाखाणण्यासारखे केलेले असून, त्यात एका बाजूस श्रीरामायणातील महत्वाच्या प्रसंगाचे देखावे आणि दुसऱ्या बाजूस अष्ट दिक्पाल व नानाविध देवतांच्या मूर्ती आकर्षकपणे कोरलेल्या दिसतात. हे देखावे आणि मूर्ती नानाविध रंगानी रंगविल्यामुळे तेथे लक्ष वेधून राहते.

श्रीनागेश देवाच्या गर्भागारात जाण्यापूर्वी, चौकाच्या उजव्या आणि डाव्या बाजूकडे पंचिष्ठ देवतापैकी वेगवेगळ्या व्यवीस्थत आणि सुशोभित गर्भागारात श्रीलक्ष्मीनारायण आणि श्रीगणपतीची स्थापना केली असून त्या दोनही गर्भागाराच्या जमिनी संगमरवरी शुभ्र पाषाणाने आणि भिंती शुभ्र लादीने मढविलेल्या आहेत. चौका नंतर श्रीच्या मुख्य गर्भागाराकडे जाणाऱ्या दरवाजातून आत शिरल्यावर डावीकडे

श्रीचे शयनगृह म्हणजे पलंगाची सुसज्ज, सुशोभित खोली आहे. त्यानंतर पुढे जाताच गर्भागाराभोवती प्रदक्षिणा आणि तिच्या भूभागास स्वच्छ पांढरे शुभ्र संगमरवरी पाषाण बसविलेले आहे. प्रदक्षिणे नंतर श्रीनागेश देवाचे गर्भागार असून त्यात मध्य भागी पिंडीकेसह शिवलिंग (श्रीनागेश महाराज) विराजमान आहेत. या शिवलिंगाच्या पिंडिकेचे मुख त्या श्रीशिवलिंगाचे दर्शन दरवाजातून घेणाऱ्या इसमाच्या डावे-कडील बाजूस म्हणजे उत्तर दिशेस आहे.

देवालय पश्चिमाभिमुख असल्यामुळे आणि श्रीशिवलिंगाची स्थापना करताना पिंडी उत्तर दिशे-कडेच तोंड करून बसविण्याची शास्त्रशुध्द पध्दत अवलंबावी लागते म्हणून, ती तशीच योग्य प्रकारे केलेली दिसते. श्रीचे हे गर्भागार फारच सुशोभित, मोहक, जमिनीस संगमरवरी शुभ्र पाषाण, भिंती पांढऱ्या शुभ्र लादीने मढविलेल्या, लिंगाच्या पाठीच्या भिंतीस उंचावर मधोमध कपाटाच्या आकाराचा चांदीचा देव्हारा, त्यात श्रीनागेश महाराजांची श्रृंगारलेली भव्य मनुष्य देहाच्या आकाराची मूर्ती, भरजरी पोषाखात हातात ढाल-तरवार, शिवलिंगच्या दोन्ही बाजूस सुशोभित, टांगलेले सरमाळीचे दिवे, तसेच गर्भागारातील मध्यभागी लिंगावर असलेले श्रीनागेश देवाचे सोने-चांदीचे कवच, त्यामागे कोरीव चांदीची प्रभावळ, नागफणासहीत, जवळच एक चांदीचा नंदी इत्यादि, तो थाट पाहून मनाला फार समाधान वाटते. येथे ताबडतोब यात्रेकरूंच्या नजरेत भरण्या सारखी महत्वाची गोष्ट म्हणजे गर्भागारातील जशी अवर्णनीय स्वच्छता दिसते तशी त्या प्रकारची त्या मानाने स्वच्छता इतर देवालयात दिसत नाही. ही सत्य वस्तु-स्थिती आहे. श्रीरामनाथ देवस्थानातही गर्भागारात वगैरे साधारणपणे अशीच स्वच्छता व टापटीप आहे.

गर्भागारात असलेले शिवलिंग श्रीनागेश, जमिनीच्या सपाटीपासून साधारण सहा इंच उंचीवर असल्यामुळे त्या लिंगावर रुद्राभिषेकादि पूजा करणारास जवळच बसून मनसोक्तपणे आणि सोईस्कर रित्या पूजा करता येते. दररोज प्रातःकाली लिंगावर असलेले कवच व प्रभावळ बाजूस ठेवून निर्माल्य विसर्जन झाल्यावर, चांदीचे अभिषेक पात्र टांगले जाते व त्यातून अभिषेकासाठी पाण्याच्या धारा बरोबर लिंगावर येतात. सकाळपासून दुपारचे ११॥ वाजेपर्यंत नित्य नैमित्तिक अभिषेकादि सर्व देवकृत्ये विधीयुक्त झाल्या-वर अभिषेक पात्र काढून, शिवलिंग पुसून महापूजेला प्रारंभ होत असतो. महानैवेद्य समर्पण, महाआरती, मंत्रपुष्पादि कार्यक्रम होऊन देवकृत्य स्थगित करून विश्रांती, संध्याकाळ प्रदोष काल वेळेपर्यंत असते. संध्याकाळी ६ ते ७ वाजेपर्यंत प्रदोषपूजा. त्यानंतर परत पंचोपचार पूजा, आरत्या वगैरे होऊन नंतर मंदिराचे सर्व दरवाजे बंद केले जातात.

या दैनंदिन कार्यक्रमात विशेष उत्सवाचा दिवस असल्यास फेर बदल केला जातो. दर आठवड्यास प्रति सोमवारी शिबिकोत्सव रात्रौ ८॥ ते ९॥ पर्यंत होत असतो. या शिबिकोत्सवात पालखीच्या मिर-वणुकीची एकंदर अकरा पेणी (मुक्काम) होतात. आणि ही मिरवणूक सोमसूत्री प्रदक्षिणा घेऊन होत असते. सोमसूत्री प्रदक्षिणा म्हणजे देवालयाच्या सभोंवार पालखी न फिरता प्रारंभी देवालयातून बाहेर निघाल्या नंतर उजवीकडून सोमसूत्रापर्यंत जाऊन, ते उल्लंघन न करता तेथूनच माघारी फिरते व देवा-लयाच्या डावीकडे तशीच सोमसूत्राच्या जागेपर्यंत जाऊन तेथून परत माघारी येते. मिरवणुकीत पालखी प्राकाराबाहेर नगारखान्याच्या कमानी दरवाजाखालच्या वाटेने श्रीकालभैरव देवाकडे जाते. तेथे एक पेणे होऊन, ती पालखी परत येताना वाटेत श्रीसौंदेकर राजघराण्याचा मोठा वाडा आहे त्या वाड्याच्या महाद्वारात श्री सौंदेकर राजघराण्याची मंडळी पालखीस आरती करवून घेण्यासाठी धूप, दीप, फुलांचे हार, फळे वगैरे ताटात घेऊन तयारीने सज्ज असते व पालखी राजवाड्याच्या दारात पोहोचताच, तेथे त्या राजघराण्यातर्फे देवस्थानाच्या वैदिक ब्राम्हण भटजीकडून पालखीस आरती करून त्यास प्रसाद दिला जातो, आणि पालखीची मिरवणूक प्राकारात प्रवेश करून आपल्या पारंपारिक वहिवाटीच्या जागी पेणी करून नंतर देवालयात येते.

मिरवणुकीत एकंदर अकराच पेणी करावयाची असतात व तशीच केली जातात. पण, वाटेत ती पालखी श्री सौंदेकर राजघराण्यातर्फे आरती स्विकारण्यासाठी थांबते, त्यामुळे पाहणाऱ्यास पालखीची एकंदर पेणी बारा होतात असा भास होतो. पालखीच्या प्रत्येक पेण्याचे वेळी श्रीनागेश देवाच्या स्तुतीपर मंगलाष्टके

पालखीबरोबर असणाऱ्या वैदिक ब्राम्हणांनी म्हणण्याची पूर्वापार पध्दत होती. ही अकरा मंगलाष्टके श्रीक्षेत्र महाशैल (माशेल) येथील वे. शा. सं. महाविद्वान सोयरू भट्टजी सुखठणकर कौशिक गोत्री यांनी रचिली होती. त्याच प्रमाणे प्रत्येक पालखी पेण्यात देवस्थानात असलेल्या सेवेकरी नृत्यांगना 'झुलवे' नावाचे काव्य श्रीनागेश देवाच्या स्तुतीचे म्हणत असत. जशी प्रति सोमवारी श्रीनागेश देवाची पालखी मिरवणूक होते, तशीच श्रीलक्ष्मीनारायण देवाची पालखी शिबिकोत्सव प्रत्येक दशमी तिथी रोजी आणि श्रीगणपतीदेवाचा शिबिकोत्सव प्रत्येक विनायकी शुक्ल चतुर्थी रोजी, रात्री होत असतो. या दोनही शिबिकोत्सवात मिरवणूक सोमसूत्री प्रदक्षिणा आणि श्रीनागेश देवाच्या पालखीस ज्या ठिकाणी पेणी (मुक्काम) करताना त्याच प्रमाणे याही उत्सवात करतात. श्रीलक्ष्मीनारायण देवाची पालखी चातुर्मासात बंद असते.

श्रीनागेश पंचिष्ठ आणि सहपरिवार दैवते

श्रीनागेश हे प्रमुख दैवत आणि त्याच्या पंचिष्ठ दैवतात श्रीलक्ष्मीनारायण, श्रीगणपती, श्रीरवळनाथ आणि श्रीवेताळ यांचा समावेश असून श्रीकराडा आणि श्रीपूर्वाचारी यांचा समावेश सहपरिवार दैवतात आहे.

जुन्या काली श्रीलक्ष्मीनारायणाचे वेगळे अलग देवालय श्रीनागेश देवालयाच्या डाव्या बाजूकडे होते. त्या देवालयातील मूर्ती कालांतराने भग्न झाली, म्हणून नवी मूर्ती शुभ्र संगमरवरी पाषाणाची करवून श्रीनागेश देवालयातच, चौकाच्या उजव्या बाजूकडे, स्पेशल गर्भागारात तिची सुप्रतिष्ठा इ. स. १९२९ साली मार्गशीर्ष शुक्ल दशमीच्या सुमुहूर्तावर करण्यात आली. तसेच श्रीगणपतीचेही वेगळे अलग देवालय तलावाच्या पलीकडे होते. तेथून तीच मूर्ती आणून श्रीनागेश मंदिरातच, चौकाच्या डाव्या बाजूकडे स्पेशल गर्भागारात, वरील दिवशीच म्हणजे मार्गशीर्ष शुक्ल दशमीच्या सुमुहूर्तावर इ. स. १९२९ सालीच सुप्रतिष्ठा केली गेली.

श्रीरवळनाथचे देवालय श्रीनागेश मंदिरापासून फर्मागुडी-कवळे रस्त्यावर थोड्याच अंतरावर आहे. आणि श्रीवेताळ हे दैवत श्रीरवळनाथ देवालयापासून थोड्याच अंतरावर आहे.

त्या श्रीवेताळ दैवतास नवीन देवालय बांधून त्यात नवी मूर्ती स्थापना शके १९०१ सिध्दार्थ संवत्सर, शनिवार ता. १९ मे १९७९ रोजी सुमुहूर्तावर विधीपूर्वक केली आहे. याशिवाय, श्रीकराडा आणि श्रीपूर्वाचारी या दोघांची वेगवेगळी आनुषंगिक देवालये आहेत. पैकी श्रीकराडा देवालय श्रीमहालक्ष्मी देवालयाच्या मागे असून, श्रीपूर्वाचारी देवालय 'व्हडर' नावाच्या वाड्यावर श्रीनागेश देवालयाच्या पश्चिमेस दोन किलोमीटर अंतरावर आहे.

या श्रीपूर्वाचाऱ्याच्या देवालयात एक शिवलिंग श्रीनागेश देवाची प्रतिकृती मानून आणि देवालया-समोर एका संन्याशाची समाधी आहे. हा संन्याशी मोठा श्रीनागेश भक्त होता व त्याची दृढ श्रध्दा श्रीनागेश देवावर होती.

श्रीपूर्वाचाऱ्याच्या देवालयात जे शिवलिंग आहे, ते त्या संन्याशाच्या उपास्य दैवताचे आहे. प्रतिवर्षी कार्तिक पौर्णिमेच्या महोत्सवात श्रीपूर्वाचारी दैवताची आणि श्रीनागेश देवाची भेट होत असते.

त्या दिवशी या श्रीपूर्वाचाऱ्याचा अवसर एका व्यक्तीवर येतो. त्या व्यक्तीस 'मुळी' या नावाने संबोधित असतात. अवसर आपल्या हातात एक लांब बांबू आणि त्या बांबूच्या शेवटच्या टोकास श्रीपूर्वाचाऱ्याची अगदी लहान मूर्ती घट्ट केलेली अशा प्रकारे तोबांबू घेऊन श्रीनागेश देवालयाकडे येऊन गर्भागारा-तील श्रीनागेश देवाच्या लिंगास – पिंडिकेस त्या बांबूचे टोक (जेथे श्रीपूर्वाचाऱ्याची मूर्ती घट्ट बसविलेली आहे) ती मूर्ती लिंगास स्पर्श करते, म्हणजे श्रीपूर्वाचारी याची भेट श्रीनागेश देवाकडे झाली, असा त्याचा अर्थ करतात. या श्रीपूर्वाचाऱ्याच्या आगमनास वाटेत श्रीकराडा दैवताकडून प्रतिबंध होऊ लागला म्हणून त्या श्रीकराडा दैवतास प्रतिवर्षी एक रंगपूजा बांधण्याचे आश्वासन देऊन त्याकडून प्रतिबंध होऊ नये अशी मागणी करून त्याची समजूत घालण्यात आली.

त्या काला पासून श्रीनागेश देवाची स्वारी त्या श्रीकराडा देवालयाकडे प्रतिवर्षी जाते व ही सर्व जत्रा 'टोंक्याची जत्रा' या नावाने फार सुप्रसिध्द असून ती प्रत्यक्षात श्रीमहालक्ष्मी देवस्थानच्या प्राकारात भरते. याचे कारण, श्रीकरडा दैवताचे देवालय श्रीमहालक्ष्मी देवीच्या देवालया पाठीमागे अवघ्या दहा पंधरा हाताच्या अंतरावर आहे.

देवस्थानांत असलेल्या प्राचीन जीर्ण मूर्ती

कोणत्याहि देवस्थानात कधी काळी स्थापन केलेल्या दैवताच्या मूर्ती कालांतराने जीर्ण होतात किंवा भग्न होतात. अशा परिस्थितीत त्या मूर्ती विसर्जन करून त्या जागी नवीन मूर्तीची सुप्रतिष्ठापना केली जाण्याची वहिवाट धर्मशास्त्र रुढीप्रमाणे अवलंबिली जाते. जुन्या मूर्तीचे विसर्जन परिस्थितीनुरूप महासागर, नदी, तलाव यामध्ये जसे सोईस्कर होईल, तसे केले जाते. या पध्दतीस अनुसरून श्रीनागेश देव-स्थानाच्या आसपास परिसरातील जुन्या काली जी दैवते जीर्णावस्थेत किंवा भग्नावस्थेत असल्यामुळे तत्कालीन संबंधितानी ती श्रीनागेश देवस्थानचा तलाव प्रशस्त असल्यामुळे त्या तलावात विसर्जन केली असावी असे वाटते.

हा तलाव कालांतराने दुरुस्ती, स्वच्छता त्या देवस्थानाने करणे क्रमप्राप्त होते व हे काम चालू असताना काही, मूर्ती पाण्याच्या तळाशी सांपडल्या आसाव्यात असे वाटते. त्या दैवतांच्या मूर्ती ज्या अवस्थेत सांपडल्या, त्याच अवस्थेत त्या देवस्थानात मुद्दाम काळजीपूर्वक सांभाळून संरक्षण करून ठेवलेल्या दिसतात. धार्मिक भावना असलेल्यास त्या मूर्ती जरी जीर्णावस्थेत दिसल्या, तरी त्या योग्य प्रकारे राखून संरक्षण करून ठेवणे ही एक प्रकारची धार्मिक जबाबदारी मानली जाते. शिवाय, त्या तशा मूर्ती देवस्थानातच सांपडल्यामुळे त्या देवस्थानाच्या आवाराबाहेर ठेवणेचे धाडस शक्यतो टाळतात. कारण न जाणो त्यामुळे काही दैविक बाधा झाली तर ? असा संशय येतो. इतकेच नव्हे तर मुख्य दैवताचा कौल प्रसाद घेऊनच त्याची योग्य व्यवस्था करण्याची वहिवाट जिकडे तिकडे पाहण्यात येते.

या देवस्थानात श्रीगणपती, श्रीशिवपार्वती, श्रीनारायण, श्रीलक्ष्मी या दैवतांच्या जीर्ण पाषाणी मूर्ती चांगल्या प्रकारे व्यवस्थितपणे राखून ठेवलेल्या दिसतात.

श्रीनागेश देवस्थानात प्रतिवर्षी होणारे महत्त्वाचे उत्सव

श्रीनागेश देवस्थानात प्रतिवर्षी नानाविध शिबिकोत्सव, अंबारीतून मिरवणूक, मकरोत्सव, मयुरासनोत्सव, लालखी उत्सव, नौकारोहण आणि महारथोत्सव असे उत्सव होतात. त्यात चैत्र पौर्णिमेचा महोत्सवाचा प्रारंभ चैत्र शुक्ल एकादशीस होऊन, चैत्र वद्य प्रतिपदेस पहांटेस महारथोत्सवाची आणि महापर्वणी महोत्सवाची सांगता होत असते.

आषाढ शुक्ल १० मी आणि कार्तिक शुक्ल दशमी अशा दोन वेळी श्रीमहालक्ष्मी देवीचे शुभागमन मोठ्या समारंभपूर्वक थाटाने या देवस्थानात होत असते.

कार्तिक पौर्णिमा (त्रिपुरारि पौर्णिमा) ही फार महत्वाची जत्रा, या जत्रेसच 'टोंक्याची जत्रा' म्हणतात आणि ती फार सुप्रसिध्द आहे. आणि याच जत्रेत श्रीपूर्वाचारीची भेट श्रीनागेश देवाकडे होते.

माघ महिन्यात महाशिवरात्री उत्सव, हे एक शिवालय असल्यामुळे, तो मोठ्या प्रमाणात होणे साहजिकच आहे.

श्रीनागेश देवाचे कुळावी महाजन आणि उपासक

श्रीनागेश हे दैवत कौशिक (कौंस), वत्स आणि भारद्वाज या तीन गोत्राच्या गौड सारस्वत ब्राम्हण ज्ञाती समाजाच्या, खाली नमूद केलेल्या उपनावाच्या कुटुंबाचे कुलदैवत आहे.

कौशिक गोत्रीय कुटुंबांची उपनावे :–

नायक प्रतापराव सरदेसाई, नायक गावणेकर, नायक गावकर, नायक धायमडकर, नायक नमशीकर, नायक भाटकार, नायक वीडये, नायक पलंग, नायक खंवटे, नायक बांदिवडेकर, नायक करमली, नायक कुराडे, नायक उल्हाळ, नायक हरकेल, नायक मणेल, नायक बेंग्रे, नायक हरेकर, नायक नंदगडकर, नायक रंगेन, नायक धोळबा, केळकर, जुंवळे, भट, उप्पोनी, चंद्रघटगी, शानभाग, शेणवी, शेणे, कोंचाडी, शेणवी केरकर, शेणवी प्रियोळकर, वेंकलराव, खोत, नायक पटबिद्रे, करमरकर, राव, गुणबाळ, नायक, वेणे नायक.

वत्स गोत्रीय कुटुंबांची उपनावे :–

शेणवी, कामत, कामत पानवेलकर, कामत अमेंबळ, शेणवी बोडके, मल्ल्या, कामत येळेकर, शिवकामत, कायकिणी, आसगेकर.

भारद्वाज गोत्रीय कुटुंबाचे उपनाव :–

प्रभू. याशिवाय धेंपे, धारसे ही घराणी या देवाचे उपासक आहेत. आणि ही घराणी गौड सारस्वत ब्राम्हण ज्ञातीची आहेत.

त्याच प्रमाणे दैवज्ञ ज्ञाती समाजातील उपासक घराण्यांची उपनावे :–

बांदोडकर, आचरेकर, मानकामे, हळगेकर.

मराठा ज्ञाती समाजातील उपासक घराण्यांची उपनावे :-

बोरकर, फडते, कुंडईकर, देसाई, जांबोटकर, कुडतरकर, जुवळी, मिठारी.

कुळावी महाजनांमध्ये स्मार्त आणि वैष्णव या दोनही सांप्रदायांचे कुळावी महाजन आहेत.

श्रीनागेश देवस्थानाचा जुन्या काली व्यवस्थापन कारभार आणि देवालयाच्या इमारतीचा जीर्णोद्धार कोणी केला !

श्रीनागेश देवालयाची इमारत टुमदार आणि मोहक तर आहेच. पण, तेथील तलाव इतका अप्रतिम आणि सर्वोत्कृष्ट आहे की, पर्यटक यात्रेकरू प्रेक्षकाची नुसत्या दर्शनानेच वृत्ती तल्लीन होते. सबंध गोमंतकातील कोणत्याही देवस्थानात असलेल्या तलावांपेक्षा या तलावाची श्रेष्ठता आणि वाखाणणी खचितच अवर्णनीय आहे. त्यात आणखी विशेष महत्वाची उल्लेखनीय गोष्ट अशी की, जुन्या काली ज्या वास्तुशिल्पकारांनी हा तलाव बांधला, त्यांचे कौशल्य इतके तारीफ करण्यासारखे आहे की, त्या तलावातील पाण्यात, देवालयाच्या गर्भागारातील श्रीनागेश दैवताच्या मूर्तीचे प्रतिबिंब व त्या मूर्तीच्या दोन्ही बाजूस पेटत असलेले सरमाळीचे दिवे, त्या तलावासमोर जो रस्ता श्रीमहालक्ष्मी देवीच्या देवालयाकडून या तलावाकडे येतो, त्या रस्त्यावरून येणाऱ्या वाटसरूस स्पष्टपणे दिसतात.

हे एक मोठेच नवल-आश्चर्य असून, ते आधुनिक वास्तुशास्त्र शिल्पकारांस एक आव्हानच आहे, असे समजावयास हरकत नाही. हे प्रतिबिंब त्या तलावाचे पाणी ज्यावेळी स्वच्छ आणि शांत असते, याच मोसमात विशेषे करून कार्तिक मार्गशीर्ष महिन्यात स्पष्ट दिसते.

वास्तविक देवालयाच्या गर्भागारात मुख्यासनावर असलेल्या श्रीनागेश देवाच्या शिवलिंग- पिंडिकेपासून त्या देवालयासमोर असलेल्या तलावाचा कांठ साधारणपणे एकशे चाळीस फूट अंतरावर आहे, आणि त्या तलावाच्या पाण्याच्या पातळीपासून देवालयाच्या चौकाची किंवा गर्भागारातील जमिनीची उंची अंदाजे पंधरा फूट आहे. इतक्या लांब अंतरावर गर्भागारांत असलेल्या मूर्तीचे आणि सरमाळीच्या दिव्यांचे प्रतिबिंब तलावाच्या पाण्यात दिसते कसे, याचे आश्चर्यच वाटते.

खरोखरच ही एक चमत्कारिक वस्तुस्थिती प्रत्यक्ष तेथे जाऊनच पाहण्यासारखी आहे. मात्र हे दृश्य पावसाळी मोसमात दिसत नाही आणि ते दृश्य श्रीमहालक्ष्मी देवालयाकडून येणाऱ्या रस्त्यावरूनच त्या तलावाकडे येताना पाण्यात दिसते.

जुन्या काली म्हणजे २७८ वर्षापूर्वी, हे देवस्थान अगदी लहान निकृष्टावस्थेत होते. या देवस्थानचा कारभार त्या काली कुंभारजुवे गावातील स्वर्गीय नारायण फोंडे कामत कुंभारजुवेकर हे पाहत असत. त्या घराण्यातील सर्व पुरुष मंडळी निवर्तल्यावर दोघी विधवा स्त्रिया, पैकी एक त्या श्री. नारायण फोंडे कामत कुंभारजुवेकर यांची सावित्री कामत नामक पत्नी आणि दुसरी तिची सून, या दोघीच विधवा हयात होत्या. आणि त्यांच्या वतीने कुंभारजुवे येथील श्री. वडिये उपनावाचे गृहस्थ देवस्थानाच्या व्यवस्थापनाचे काम पाहत असत. त्यानी शके १७०२ (इ. स. १७८०) साली वर उल्लीखित श्रीमती सावित्री कामत आणि तिची सून यांच्या खर्चाने प्रस्तुतचे श्रीनागेश देवालय बांधले होते. सदर कामत घराण्याच्या या दोन महिलांनंतर त्या देवस्थानचा कारभार त्या श्री. वडिये उपनावाच्या गृहस्थानी चालविला. त्यांच्या नंतर श्री. कामत पानवेलकर यांनी तो कारभार चालविला.

पुढे त्या देवस्थानात प्रतिवर्षी विजयादशमी रोजी श्रीनागेश देवासमोर चिठ्या घालून, ज्याच्या नावाची चिठी येईल, त्याने तो कारभार चालवावा असे सर्वानुमते ठरले. इ. सन १८३१ सालापर्यंत कोठीची किल्ली श्री. वडिये यांकडे होती. त्यापुढे प्रतिवर्षी चिठ्या घालून कारभार पाहण्याची पध्दती अंमलात आली. इ. सन १८७६ साली सरकारने देवस्थान विषयक कायदा केला आणि प्रत्येक देवस्थानच्या महाजन मंडळीने निवडणूक करून व्यवस्थापक कमिटी निवडावी असे ठरविल्यामुळे तशा पध्दतीने पुढे व्यवस्थापन होऊ लागले.

देवालया समोरील आणि उजवे बाजूची माडी असलेली अग्रशाळा (तलावावरील बाजूची) व त्यास लागून उजव्या बाजूची, आणि देवालया मागील उजवे बाजूची कठडा असलेली, या तीन ही अग्रशाळा श्रीनारबा कामत पानवेलकर मुक्काम पानवेल, श्री. व्यंकटेश नाईक ओडिये (वडिये) मुक्काम कुंभारजुवे आणि श्री. नारायण फोंडे कामत यांची विधवा श्रीमती सावित्री कामत, मुक्काम कुंभारजुवे, या तिघांनीही श्रीनृप शालिवाहन शके १७०३ प्लव नाम संवत्सरी नवीन बांधल्या होत्या. वरील तीनही अग्रशाळांचा जीर्णोध्दार श्री. पांडुरंग कामत पानवेलकर यांची विधवा श्रीमती गोपिकाबाई हिने श्रीशके १७९९ साली केला. त्याबद्दलचा उल्लेख त्या देवस्थानात एका लाकूड कामावर होता तो खालील प्रमाणे :–

"स्वीस्तश्री नृप शालिवाहन शके १७९९ ईश्वर नाम संवत्सरे, वैशाख वद्य १३ शी शुक्रवार ता. ११ वी माय सन १८७७ अद्य तिथौ अग्रशाळा जीर्णोध्दार; पर्णविल्लस्थ कामतो पन्न्मदभाभ्य कृत ॥"

देवालयाच्या पाठीवरील डावे बाजूची अग्रशाळा श्री. नारायण लक्ष्मण नाईक भाटकार यानी बांधली होती. व दुसरी श्री. सदाशिव नाईक गावणेकर यांनी व श्री देवालयाच्या डावी बाजूकडील श्री. रामचंद्र ताता नाईक गावणेकर व श्री. पांडुरंग नागोजी नाईक नमशीकर यांनी बांधली होती.

मुंबई येथील श्री. कृष्णाजी सगुण, यानी स्वतः या देवस्थानात वास्तव्य करून स्वखर्चाने पुष्कळ दुरुस्तीची कामे केली होती.

आजच्या कालात श्रीनागेश देवस्थानात चोहोबाजूनी आधुनिक पद्धतीने सौंदर्ययुक्त झालेले बांधकाम आणि नेत्रदीपक प्रगती फारच अवर्णनीय आणि प्रशंसनीय

देवस्थानातील वर उल्लीखित एकंदर अग्रशाळा अत्यंत जीर्णावस्थेत असल्यामुळे आणि गोवामुक्ती कालानंतर देवस्थानात यात्रेकरू, पर्यटक आणि कुळावी महाजन या सर्वांची गर्दी दिवसेंदिवस वाढत गेल्यामुळे, तसेच विवाहादि मंगलकार्ये आपल्या कुलदैवताच्या सान्नीध्य साजरा करावी अशी भावना वाढीस लागल्यामुळे, अर्थातच गरज आणि अत्यावश्यक सुखसोईच्या अभावी त्या जीर्ण अग्रशाळा हलवून त्या जागी नवीन आधुनीक पध्दतीने अग्रशाळा, जेवण्या राहण्याची सोय, आणि मंगल कार्यासाठी लागणारा हॉल यांची अत्यावश्यकता भासू लागली. यासाठी, देवस्थानची कुळावी महाजन मंडळी एकत्र येऊन, विचारवीनिमय करून जीर्णोध्दाराच्या कामासाठी पुढे सरसावली आणि देवस्थानात आज जे नवीन पध्दतीचे सुंदर वैशिष्ठ्यपूर्ण चोहोबाजूनी बांधकाम पूर्ण झालेले पाहत आहोत, त्यामुळे पूर्वीची परीस्थिती संपूर्णपणे

बदलून टाकलेली दिसते. असा कायापालट तेथे झाला असून, फारच अचंबा वाटण्यासारख्या सर्व सुख-सोईनी युक्त यात्रेकरूनिवासासाठी स्पेशल ब्लॉक, इलेक्ट्रीक दिवाबत्ती, पाण्याची सोय, स्नानगृहे, संडास इत्यादीनी परिपूर्ण अशा अग्रशाळा, आणि एक विस्तीर्ण मनाला आल्हाद देणारा हॉल, मंगलकार्ये साजरा करण्यासाठी फार सुशोभित बांधला असून, या सर्वामुळे व्रतबंध, विवाहादि कार्यक्रम करण्यासाठी सर्व सोई तेथे आहेत. देवालयाच्या मुख्य मंदिराची शोभा नानाविध प्रकारे फारच वाढविलेली दिसते. त्यातच आणखी तलावाची दुरुस्ती आणि नवीन दीपस्तंभ फार शोभिवंतपणे देवालयाच्या डाव्या बाजूकडे बांधलेला आहे.

नवीन बांधणीचा दीपस्तंभ आणि त्याचे शिल्प वैशिष्ट्य

विजयनगर कालीन शिलालेखात, श्रीनागेश देवस्थानात, त्या काली म्हणजे शके १३३५ (इ. स. १४१३) साली दीपस्तंभ होता, याचा स्पष्ट उल्लेख आहे. तो दीपस्तंभ किंवा दीपमाळ कालांतराने जमीनदोस्त झाला असावा. कारण, या अर्धशतकात तरी त्या देवस्थानात दीपस्तंभ नव्हता. ती उणीव दूर करण्यासाठी त्या देवस्थानाने तेथे नवा दीपस्तंभ उभारण्याचे ठरवून त्याचा शिलान्यास ता. २७ फेब्रुवारी १९७५ रोजी केला गेला आणि त्याचे बांधकाम पूर्ण होऊन श्रीमहालक्ष्मी देवीच्या चरणस्पर्शाने, कार्तिक शुक्ल दशमी शके १८९७ राक्षस नाम संवत्सर गुरुवार ता. १३ नवंबर १९७५ रोजी उद्‌घाटन झाले.

हा दीपस्तंभ, वास्तुशिल्प या दृष्टीने वैशिष्ठ्यपूर्ण असून ते आधुनिक आणि पुरातन यांचा संयोग दाखविणारा आहे. उंची सुमारे ३६ फूट असून, त्यास पाच मजले आहेत. तळमजल्यास सभोवार अष्टकोन-आठ चौकटीत खालील प्रमाणे देवतांची शास्त्रशुध्द पध्दतीने आठ सुंदर चित्रे कोरलेली आहेत.

पूर्वीदिशा-देवता इंद्र, आग्नेय दिशा-देवता अग्नि, दक्षिण दिशा-देवता यम, नैऋत्य दिशा- देवता निऋरिती, पश्चिम दिशा-देवतावरुण, वायव्य दिशा-देवता वायु, उत्तर दिशा-देवता सोम, आणि ईशान्य दिशा-देवता ईश्वर. अशी सुंदर चित्रे (मूर्ती) कोरलेली असून ती पध्दतशीर प्रकारे रंगविलेली आहेत.

या दीपस्तंभावर चारशे पणत्या (तेलाचे दिवे) पेटविण्याची व्यवस्था केली आहे. कारण, उल्लेखित प्राचीन शिलालेखात कार्तिक पौर्णिमेच्या दिवशी, दीपमालेशी पणतिया चारशे पेटवून दीपमाळ करावी अशी आज्ञा आहे.

त्याही प्राचीनकालीन आज्ञेस पाळा द्यावा, ही आता दीपस्तंभ बांधीवणाऱ्याची सद्हेतूपूर्वक भावना दिसते. या नव्या वास्तुशिल्पाचे कलाकार श्री. नवसो मुकुंद नारोजी, राहणार मोरजी-पेडणे येथील असून, या त्यांच्या कलावैशिष्ठ्यामुळे, श्रीनागेश देवस्थानचा तलाव हा गोव्यातील सर्व तलावापेक्षा चांगला प्रसिध्द असल्याची जी वाखाणणी करतात, त्याचबरोबर आता यापुढे श्रीनागेश देवस्थानचा दीपस्तंभ (खांब) हा वैशिष्ठ्यपूर्ण असल्याची प्रसिध्दी होणे नवल नव्हे.

वास्तविक श्रीमंगेश देवस्थानचा खांब (दीपस्तंभ), श्रीशांतादुर्गा देवस्थानचा घूड, श्रीनागेश देवस्थानचा तलाव, श्रीमहालक्ष्मी देवस्थानचा चौक याप्रमाणे प्रत्येक देवस्थानचे वेगळे असे एक खास वैशिष्ट्य आहे. मात्र, निश्चितपणे म्हणता येईल की, या कलापूर्ण दीपस्तंभामुळे त्या पुरातन देवस्थानचे सौंदर्य वाढले आहे. उल्लेखित शिलालेखात तेथे दीपस्तंभ होता याचा पुरावा असूनही सध्याच्या कालात तेथे दीपस्तंभ दिसत नव्हता, ही उणीव प्रयत्नपूर्वक दूर केल्याचे श्रेय त्या देवस्थानच्या अभिमानास खचितच आहे.

गोमंतकात आजच्या कालापर्यंत तरी कुठेच न झालेले असे फार मोठे धार्मिक अनुष्ठान 'अतिरुद्र स्वाहाकार' याच पुरातन देवस्थानात झाले!!!

श्रीशके १९०० माघ पौर्णिमा, रविवार ता. ११ फेब्रुवारी १९७९ ते माघ वद्य ७ मी सोमवार ता. १९ फेब्रुवारी १९७९ या नऊ दिवसात श्रीनागेश देवस्थानात "अतिरुद्र स्वाहाकार" नावाचे फार मोठे दुर्लभ अनुष्ठान झाले.

अशा प्रकारचे अनुष्ठान गोमंतकात आज पर्यंत तरी झाल्याचे ऐकिवात नाही.

या महायज्ञात वेदशास्त्र पारंगत अशा सुमारे पावणे दोनशे ब्रम्हवृंदांनी जातीने भाग घेतला होता हा अपूर्व आणि दुर्लभ सोहळा ज्या विराट समुदायाने दृढ श्रध्देने आणि अनन्यसाधारण भावनेने स्वतःच्या डोळ्यानी पाहून धन्योद्गार काढले आणि या जन्मात असा महायज्ञ अनुष्ठान पाहण्याचे भाग्य आणि पुण्य त्या श्रीनागेश महारुद्राच्या कृपेनेच मिळाले म्हणूनअक्षरशः पावन झालो, म्हणून कृतज्ञतेने डोळ्यातून आनंदाअश्रूंचा, मानसिक समाधानाचा, जयघोष ज्यांनी त्या देवस्थानात केला गेला, ते दृश्य खरोखरच अवर्णनीय असून ते लिहून आणि सांगून कल्पना येण्यासारखी नव्हे.

या नऊ दिवसात त्या देवस्थानात जे धार्मिक कार्यक्रम तज्ञ, पारंगत आणि अनुभवी वेदशास्त्रसंपन्न ब्रम्हवृंदांकडून झाले, श्रीरुद्रपठनादि कार्य ज्या स्वरयुक्त पध्दतीने स्पष्टपणे ऐकावयास मिळाले, ते तसे आजपर्यंत खचितच गोव्यात नानाविध मोठी जपानुष्ठाने झालेली पाहण्यात आली, पण तसे कोठेच अनुभवण्यात आले नाही.

तेथील पठन आणि देखावा पाहिल्यावर पुराणकालात ऋषीमुनी वेदाश्रम चालवीत, असे जे वाचीत आलो त्याची कल्पना डोळ्यांसमोर प्रत्यक्षात आल्याचा भास होई. तेथे उपस्थित प्रेक्षकात ज्याना शक्य होते, आणि तशा तयारी सामुग्रीने तेथे ते आले होते, त्यानी ते पठण, टेपरेकॉर्डवर टिपले.

खरोखरच हा नऊ दिवसांचा सर्व एकंदर कार्यक्रम समारंभ अत्यावश्यकपणे, गोमंतकीय देव-स्थानाच्या धार्मिक आणि सांस्कृतिक इतिहासात सुवर्णाक्षरांनी नोंदून ठेवण्यासारखाच होता. व त्या नऊ दिवसात तेथे झालेल्या सर्व यज्ञ-यागांची फिल्म घेऊन ठेवण्याचे कामही फार फार महत्वाचे ठरले असते. कारण, असे अभूतपूर्व कार्यक्रम उभ्या हयातीत पिढ्यानपिढ्या पाहण्यास मिळणे फारच कठीण, नव्हे दुर्लभच म्हटले पाहिजे.

त्या नऊ दिवसात तेथे घडलेल्या सर्व कार्यक्रमाचा खर्च सरासरी अंदाज करता, तीन लक्ष रुपयांच्या आसपास असलाच पाहिजे, असे जाणकाराचे मत आहे. परंतु पैसे कमी अधिक खर्च झाले, याला महत्व नाही. पण, तेथे ज्या रितीने व्यवस्थितपणे, काळजीपूर्वक, वक्तशीर आणि नियमितपणे, पध्दतशीर आणि सुयोग्य-रित्या, काम चाललेले पाहण्यास आले व तो पाहण्याचे भाग्य ज्याना लाभले ते खचितच उत्स्फूर्तीरित्या म्हणतील की, येथे प्रत्यक्ष श्रीकैलासनाथच अवतरले आहेत. म्हणूनच, असा महायज्ञयाग आम्ही प्रत्यक्षात पाहिला, हे स्वप्न नव्हे.

वरील नऊ दिवसात जी नानाविध अनुष्ठाने तेथे झाली, त्यांची सर्व नोंद देणे येथे अशक्यच. पण, जिज्ञासू वाचकास थोडी फार कल्पना येण्यासाठी, तसेच कालांतराने विसर पडू शकते म्हणून, आणि विशेष करून अशा अभूतपूर्व कार्याची संक्षिप्तात तरी नोंद करून ठेवल्यास भविष्य कालातील पिढीतील ऐति-हासिक घटनाच्या अभ्यासूस ती नोंद उपयुक्त ठरणे शक्य आहे, या हेतूने तशी नोंद येथे देण्याचा प्रयत्न आहे :- अयुत गणेश याग, चतुर्वेद पारायण, अतिरुद्र जपाभिषेक, त्रिदिनात्मक उदक शान्ति, नामजप-यज्ञ, ऋग्वेदसंहिता स्वाहाकार, अतिरुद्र स्वाहाकार, श्रीमद्भागवत व श्रीदेवीभागवत पारायण, महाविष्णुजप, लघुविष्णुयाग, यजुर्वेद संहिता स्वाहाकार, श्रीरवळनाथ याग, श्रीमहालक्ष्मी श्रीसूक्तविधानयाग, श्रीपूर्वा-चारी याग, श्रीवेताळ याग, श्रीगजान्तलक्ष्मीसूक्त जप.

अशी व इतर यज्ञ यागादि कर्मे होऊन नवव्या दिवशी सकाळी १०-२० ते ११-२० वाजण्याच्या दर-म्यान पूर्णाहुती झाली. आणि त्या नंतर सार्वजनिक प्रार्थना वगैरे सर्व धार्मिक विधी नियमानुसार झाले. प्रत्येक दिवशी प्रदोष पूजेचा कार्यक्रम भाविक आणि श्रध्दावान मनुष्यास तल्लीन करून सोडणारा होत असे. शिवाय, मंत्रजागर आणि महासंतर्पण चालू होते.

"एकादश महारुद्रैरतिरुद्रः प्रकीर्तितः
अतिपापहरो यस्माद दृष्टाऽ न्या नैव निष्कृतीः ॥"

सर्व पापांचा निःपात करण्यास अतिरुद्रासारखा दुसरा कोणताही इलाज नाही.

॥ ॐ नमो रुद्राय रामनाथाय शंभवे परमात्मने ॥

८

श्रीरामनाथ देवस्थान

रामनाथी – फोंडा

गोमंतकाच्या सासष्टी तालुक्यात इसवी सनाच्या सोळाव्या शतकात पोर्तुगीजानी हिंदूच्या ख्रिस्ती करणासाठी जी असह्य, अघोर आणि भयानक कृत्ये केली, त्यात त्याकाली लोटली येथील प्रमुख दैवत श्रीरामनाथाच्या देवालयाच्या इमारतीस इ. सन १५६७ साली रायतूरचा किल्लेदार कॅप्टन दियोगु रुद्रीगीस याने आग लावून विध्वंस करणाऱ्या कृत्याचा समावेश आहे. पण, त्या दैवताच्या तत्कालीन पुण्यवान कुळावी महाजनानी तांतडीने तिसवाडी येथे धांव घेऊन, सरकारी न्यायालयात त्या किल्लेदार कॅप्टनास खेचून, त्या विरुद्ध खटला चालवून, असामान्य धैर्य, शौर्य, आणि चिकाटीने कोणत्याच सरकारी यंत्रणेची, अधिकाऱ्यांची मुळीसुद्धा पर्वा न करता, त्या न्यायालयात संपूर्णपणे विजय मिळवून त्याच किल्लेदार कॅप्टनने स्वखर्चाने त्या देवालयाची ती इमारत बांधून देण्याबद्दल न्यायालयाकडून निकाल मिळविला, ते गोमंतकातील एकमेव पराक्रमी आणि ऐतिहासिक देवस्थान.



श्रीरामनाथ, बांदिवडें, फोंडा गर्भागारांतील मूर्ती

श्रीरामनाथ देवालय, बांदिवडें, फोंडा

श्रीरामनाथ देवस्थान

रामनाथी – फाडों गोवा

पुण्यभूमी गोमंतकात श्रीपरशुरामकालापासून जी नानाविध दैवतें स्थापन केलीं गेलीं आणि त्यांची देवालयें बांधण्यात आली, त्यांत लोटली या सासष्टी तालुक्याच्या गावात श्रीरामनाथ देवस्थानाचाही समावेश आहे. हे देवस्थान लोटली येथें बरोबर कोणत्या साली स्थापन केलें गेलें, याबद्दलचा नक्की पुरावा कोठेंच अद्याप पर्यंत तरी सांपडलेला नाही.

गोमंतकातील इतर देवालयांबद्दलची परीस्थितीही अशीच आहे. पण, एवढें निश्चितपणें सांगता येईल की, श्रीपरशुरामानें हे परशुरामक्षेत्र कोंकणपट्टीची वसाहत करण्याचें मनात आणून, तेथें यज्ञ–यागादिकर्मे पार पाडण्याच्या निमित्तानें त्रिहोत्रपूर (तिरहूत), येथून पंचगौडांतर्गत दशगोत्री वेद-वेदांगपारंगत विद्वान ब्राम्हण आणून त्यांची येथें स्थापना केली आणि येथें गोमंतकात स्थायिक झालेल्या ब्राम्हणाना अग्राहार म्हणून जे गाव मिळाले, तेंच गाव अर्थातच पुढें त्यांच्या वंशजांच्या सामाईक मालकीचें बनलें व त्या गावातील उत्पन्नाची विभागणी व्यवस्था समाधानकारित्या करता यावी, या उद्देशानें त्या त्या गावात ग्रामसंस्थांचा जन्म झाला.

गांवची सर्व जमीन ग्रामसंस्थेंच्या मालकीची झाल्यामुळें आणि त्या ग्रामसंस्थेंच्या आद्यसंस्थापकानीच आपल्या गावात देवालय स्थापून त्याची सर्व कायम व्यवस्था व खर्च त्या ग्रामसंस्थेंच्या उत्पन्नातून चालविण्याची खबरदारी घेतल्यामुळें, ग्रामसंस्थेचें आद्यसंस्थापक तेंच त्या गावात स्थापलेल्या देवालयाचें आद्य-संस्थापक झाले, हे उघडच आहे.

लोटली गावात ज्या काली तेथें वसाहत करून ग्रामसंस्था स्थापन केली, त्याच काली हे श्रीरामनाथ देव-स्थान लोटली येथें वत्स आणि कौंडिण्य गोत्रीय ब्राम्हण समूहाकडून स्थापन केलें गेलें असेंच मानणें क्रमप्राप्त आहे.

हा श्रीपरशुरामाचा काल ऐतिहासिक दृष्ट्या कोणता याची माहिती जाणून घेण्याचा प्रयत्न केल्यास त्यात असें आढळून येतें.

ऐतिहासिक दृष्ट्या श्रीपरशुरामाचा काल कोणता ?

युधिष्टिराचें आजोबा भीष्म, भीष्माचें गुरू परशुराम. भारतीय विद्याभवन या संस्थेनें भारतीयांच्या दृष्टीकोनातून भारताचा इतिहास प्रसिध्द केला आहे. त्याच्या प्रथम भागात डॉ. पुसाळकर यानी HISTORICAL TRADITIONS या सदरात प्रमुख व्यक्तींचे काल दिले आहेत ते असे पहा :– THE VEDIC AGE by Dr. Pusalkar पृष्ठ २७१ व पृष्ठ ३०१.

ययाति (देवयानीचा पति यदुवंशी)	इ. सन पूर्व काल	३०००–२७५०
परशुराम	,, ,, ,,	२५५०–२३५०
श्रीकृष्ण	,, ,, ,,	१९५०–१४००
भारतीय युध्द	,, ,, ,,	१४००–...

या वरून परशुरामाचा काल ऐतिहासक दृष्ट्या इ. सन पूर्वकाल अडीच हजार वर्षे म्हणजे आज–पासून साधारणपणे साडेचार हजार वर्षापूर्वीचा ठरतो असें म्हणावें लागेल.

श्रीपरशुरामानें गोमंतक पर्वताच्या आसमंतातील अष्टग्रामात अग्रहार देऊन स्थापना केली ती मठग्राम, वरेण्य (वेर्णे), कुडतरी, बाणावली, शंखावली, रायचुरी, **लोटली**, नागवें याना अष्टग्राम म्हणतात आणि एव्हापासूनच दक्षिण प्रांतात सारस्वत ब्राम्हणांचा प्रवेश; म्हणजे त्यापूर्वी एका परशुरामावाचून दुसरे सारस्वत ब्राम्हण कोणी नव्हते.

या वरून लोटली गाव अग्रहार मिळाल्यानंतर ज्या सारस्वत ब्राम्हणांनी तो लोटली गाव वसविला, तेथे ग्रामसंस्था स्थापन करून त्यात श्रीरामनाथ दैवताची स्थापना केली, तो काल कोणता असावा हे पाहू गेल्यास त्या कालास आज साडेचार हजार वर्षांपेक्षा कमी काल झाला आहे. पण निश्चितपणे ४२३१ वर्षे तरी खचितच झाली आहेत असे मानावे लागेल.

लोटली गावात ग्रामसंस्थेनेच हे देवालय स्थापन केल्यानंतर त्याचा सर्व खर्च त्या ग्रामसंस्थेच्याच उत्पन्नातून होणे क्रमप्राप्त होते व त्याप्रमाणे होई, यात संशय घेण्याचे कारण नाही.

लोटली ग्रामसंस्थेचे जे आद्यसंस्थापक तेच श्रीरामनाथ देवस्थानाचे आद्यसंस्थापक आणि त्या ग्रामसंस्थेच्या भाग धारकांच्या मालकीची जशी ती ग्रामसंस्था, तसेच ते देवालय, हे न सांगता समजू शकते. यामुळे, त्या ग्रामसंस्थेत जितके गट किंवा वांगड तितकेच गट किंवा वांगड या देवस्थानच्या महाजनांचे होते.

दशगोत्रांतर्गत वत्स आणि कौंडिण्य अशा ज्या दोन गोत्रांच्या गौड सारस्वत ब्राम्हणांनी लोटली ग्रामसंस्था स्थापन केली, त्याच दोन गोत्रांच्या लोटली येथील गौ. सा. ब्राम्हण गांवकारांचे हे देवालय असून तेच त्या देवालयाचे आद्यसंस्थापक कुळावी महाजन होते व आजही त्यांचेच वंशज परंपरेने आहेत.

गोमंतकात राज्यकर्त्यांच्या कालाची स्थित्यंतरें आणि त्यांमुळे प्रजेच्या धर्मस्वातंत्र्यावर अनिष्ट परिणाम,

गोमंतक हिंदुधर्मीय राजांच्या ताब्यात इ. स. १३१२ पर्यंत तरी होता, आणि म्हणून गोमंतकातील देवस्थाने किंवा ग्रामसंस्था यांच्या कारभारात धार्मिक स्वातंत्र्याच्या संदर्भात कोणताच व्यत्त्यय आला नाही. इ. स. १३१२ साली देवगिरीचे राज्य मुसलमानी राज्यसत्तेने निकालात काढल्यामुळे गोमंतकात जे कदंबराजे देवगिरीच्या यादवांचे मांडलीक म्हणून राज्य करीत होते, त्या कदंबाचा राजवंश या मुसलमानी राज्यसत्तेने गोव्यात येऊन नायनाट केला, आणि हिंदूंच्या देवालयांची मोडतोड व विध्वंस करून बेबंदशाही माजविली.

इ. सन १३६७ साली विजयनगरचे माधवाचार्य मंत्री, यांनी मुसलमान राज्यकर्त्यांना गोव्यातून हाकलून लावण्यात यश मिळविले. पण, परत गोमंतक प्रांत मुसलमान राजांच्या ताब्यात गेला, आणि तो. इ. स. १५१० च्या ता. २५ नवंबर पर्यंत त्यांकडे राहिला. ज्या दिवशी गोवा बेट पोर्तुगीजांनी आदिलखानाकडून जिंकून घेतले.

आदिलखानाच्या अंमलामध्ये गोवा बेटात हिंदूंची पुष्कळ देवालये होती. पण, त्या अंमलामध्ये हिंदुधर्मीय सरदार सर्व राज्यकारभार चालवीत असल्यामुळे देवालयास सर्व प्रकारे संरक्षण होते.

पोर्तुगीज सरदार आफोंस दे आल्बुकेर्क याने गोवा बेट इ. स. १५१० साली काबीज केल्यानंतर गोव्यातील प्रजेस आपल्या धर्म व चालीरितीप्रमाणे वागण्याचे पूर्ण स्वातंत्र्य देऊन तसा जाहिरनामा प्रसिध्द केला.

परत इ. स. १५२६ साली प्रसिध्द झालेल्या जाहिरनाम्यातही या अशाच धर्मस्वातंत्र्य हक्काचा पुनरुच्चार तत्कालीन पोर्तुगीज व्हॉइसराय आफोंस मेनीसय यांनी प्रसिध्द केला.

परंतु नंतर अवघ्या आठच वर्षांनी इ. सन १५३४ साली खिश्चन धर्मियांकरता म्हणून गोमंतकात बिशपची गादी स्थापन केली, आणि यामुळे गोमंतकाच्या प्रजेवर धार्मिक जुलमाच्या अत्याचारांस प्रारंभ केला गेला, पुढे हिंदु देवालयावर संक्रात सुरू झाली.

"ज्यांचे राज्य त्यांचा धर्म" हे तत्व गोमंतकाच्या राज्यकारणात त्यावेळी मुख्यतेकरून प्रमाण मानण्यात आले. इ. सन १५२६ साली धर्मस्वातंत्र्याबद्दल गोव्यात अभिवचन देऊन गोव्याचे व्हॉइसराय तेथे जाहीरनामा प्रसिध्द करतात ! पण इ. स. १५२२ सालातील ता. १२ जानेवारी रोजी बिशप दुमि याने पोर्तुगालच्या राजाला लिहिलेल्या एका पत्रावर जो मजकूर लिहिलेला आजच्या कालात उजेडात आलेला आहे, तो वाचल्यास गोव्याच्या अंतस्थ धार्मिक राजकारणावर चांगला प्रकाश पडतो. त्या पत्रात मजकूर असा आहे.

"Servico de Deos seria nesta sua ilha de Goa destruyrem se estes pagodes e fazerem nelas igrejas....e quem quer que quizesse viver na ilha fosse cristao e teria suas terras e casas como tem, e nao querendo, que se fosse da ilha....."

याचे मराठीत भाषांतर असे :-

"आपल्या या बेटातील देवालये पाडून त्या ठिकाणी चर्चे उभारली गेल्यास परमेश्वराची सेवा होईल. ज्या इसमास बेटात राहवयाचे असेल, त्याने खिरस्ती होऊन राहावे व असे केल्याने त्याला आपल्या येथील जमिनी व घरे मिळतील. पण, जो खिरस्ती धर्म स्विकारण्यास राजी नाही त्याने हे बेट सोडून जावे."

या अशा नमुन्याचे अंतस्थ कारस्थान खिश्चन धर्मगुरू बिशप दुमि आणि पोर्तुगालचे राजे यामध्ये चाललेले आणि बाहेरून गोव्याचे व्हॉइसराय धर्मस्वातंत्र्यांबद्दल पूर्ण स्वतंत्र्याचे अभिवचने देऊन जाहीरनामे काढीत !

पोर्तुगालचे राजे दो जुवांव तिसरे, यानी इ. स. १५४६ मध्ये असा हुकूम सोडला की, "गोव्यातील पाखंडी धर्म नष्ट करा. त्या धर्माची देवालये व मसिदी जमिनदोस्त करा. पाखंडी व हिंदु उत्सवास मनाई करा, व लाकूड, माती किंवा धातू यांच्या मूर्ती करणाऱ्यास कडक शासन करा." गोव्यातील हिंदुनी खिरस्ती धर्म स्विकारावा यासाठी सोळाव्या आणि सतराव्या शतकात पोर्तुगीजांनी केलेल्या कारवाया व कायदे किती जुलमी आणि अघोरीवृतीचे होते, याची कल्पनाच करवत नाही.

इ. सन १५४२ मध्ये गोव्यात सां फ्रासिक शाव्हियेर यांचे आगमन झाले. त्याचे पोर्तुगालच्या राजदरबारात फार वजन होते. शाव्हियेरच्या प्रेरणेने पाद्री मिंगेल व्हाज इ. सन १५४५ च्या जानेवारीत पोर्तुगालास गेला व तेथे एक वर्ष राहून त्या मुदतीत त्याने तेथील राजाकडून अनेक फर्माने हिंदु जनतेस बाटविण्यासाठी मिळवून तो गोव्यात परतला, त्या फर्मानामध्ये हिंदूस पूजेस बंदी, त्याना आपले धार्मिक उत्सव करू देऊ नये, पुराण कीर्तनास परवानगी नसावी, खिरस्ती धर्माच्या प्रसार कार्यास अडथळा आणणाऱ्या हिंदूस मिंगेल व्हाज याच्या इच्छेनुसार गोव्यातून हद्दपार करण्यात यावे, हिंदु धर्मियास सरकारी नोकऱ्या देऊ नयेत इत्यादि विषय होते. पण, त्यांचा वापर करण्याचे अधिकार राजाने गोव्याच्या गव्हर्नरच्या अनुज्ञेवर सोपविले होते.

गोव्याच्या बिशप आल्बुकेर्क नावाच्या धर्मगुरूने आपल्या ता. २८ जानेवारी १५४८ च्या पत्रात पोर्तुगालच्या राजास कळविले की, "जेझुइट पाद्री व आपण मिळून एक किंवा फार तर दोन वर्षात हे सर्व गोवा बेट खिरस्ती करू."

एवढ्या महत्वाकांक्षेनंतर सुध्दा इ. सन १६ व्या शतकाच्या मध्यापर्यंत हिंदूस मोठ्या संख्येने स्थलांतर करण्याजोगी दुर्घटना गोव्यात घडल्याची नोंद नाही.

हिंदुधर्मीयांच्या धर्मांतराबाबतच्या या अघोरी कायद्याविरुध्द हिंदु जनतेने शक्यतेप्रमाणे थोडीफार चळवळ केली, व गोवाबेट सोडूनही जाण्याचा धाक सरकारास घातला; पण, गव्हर्नराने त्यांच्या मागण्याकडे दुर्लक्ष तर केलेच, उलट हिंदु पुढाऱ्यास कडक शिक्षा करण्याची धमकी दिली.

गोव्याच्या व्हॉइसराय दाँ. कोंस्तांतिन् द ब्रागांस याची कारकीर्द ता. ८ सप्टेंबर १५५८ पासून ता. ७ सप्टेंबर १५६१ पर्यंत झाली. त्याने आणखी कायदे करून हिंदु प्रजेस खिरस्ती धर्मामध्ये आणण्यासाठी आटोकाट प्रयत्न केले, त्यामुळे अनेक हिंदूंचे धर्मांतर केले व कित्येकानी तेथून पळ काढला. ता. २ एप्रिल १५६० रोजी त्याने आपल्या देवाच्या सेवेसाठी सुमारे ४० हिंदु पुढाऱ्याना गोवा बेटातून हद्दपार करण्याचे फर्मान काढले, या चाळीस इसमात अडतीस सारस्वत ब्राम्हण व दोन वैश्य समाजातील होते. पोर्तुगीजांनी धर्मांतर विषयक केलेल्या कायद्यांमुळे गोव्यात हिंदुधर्मावर अक्षरशः अरिष्ट कोसळले.

सर्व ब्रांम्हण ज्ञातीच्या हिंदूस, लगेच अधिकारपदावरून काढण्यात आले. गव्हर्नर आपल्या राजवाड्याबाहेर सरताना त्यांच्याबरोबर घोड्यावर स्वार होऊन व चांदीच्या मुठीची तलवार घेऊन एक सारस्वत ब्राम्हण ज्ञातीचा सरदार सदोदित जात असे, त्यालाही गव्हर्नरने काढून टाकला. झेझुइटांनी इ. स. १५५७ साली पहिल्याच खेपेस ११० इसमास समूहाने बाप्तिस्मा देऊन बाटविण्यात आले. इ. सन १५५७ ते १५६० या तीन वर्षात हजारो हिंदूचे खिरस्तीकरण करण्यात आले.

या जुलमी व कायदे कठोर कृत्यांमुळे गोवाबेटातील खिरस्ती धर्मीयांची संख्या उत्तरोत्तर वाढतच गेली. पण त्याचबरोबर पुष्कळ स्वधर्माभिमानी हिंदूना गोवा बेटातून वैतागाने गोवा सोडून स्थलांतर करणे अपरिहार्य झाले.

याचा परिणाम काय झाला, याबद्दल मानुएल नुनिस नावाच्या पोर्तुगीज अधिकाऱ्याने गोव्यातून पोर्तुगालच्या राणीसाहेबांस एक पत्र लिहिलेले झेझुइट पाद्री व्हिकी यानी प्रसिध्द केले असून त्यावरून तत्कालीन हिंदु लोकांच्या परिस्थितीची चांगली जाणीव होण्यास मदत होते.

मानुएल नुनिस याने आपल्या पत्रात जे लिहिले, त्याचा आशय असा :– "हिंदु जनता खिरस्ती व्हावी यासाठी करण्यात आलेल्या गांजवणुकीमुळे या बेटातील हिंदु जनता पळून दुसऱ्या राज्यात गेली. गोवा बेट जवळजवळ निर्मनुष्य बनले आहे. पाद्री लोक हिंदूंचे खिरस्तीकरण दांडगाईने व अधिकाराच्या अतिक्रमणाने हाताळतात. व्हॉइसराय त्यांस मदत करतात. हिंदूंनी खिरस्ती धर्माचा स्विकार करावा म्हणून जेझुइट पाद्री त्यांस अनेक रितीने त्रास देतात, सक्तीने शेंड्या कापतात, त्यांस गोमांस भक्षण करवितात, त्यांच्या चालीरिती विरुध्द त्यांस वागण्यास बळजबरीने भाग पाडतात आणि याच कारणांमुळे बरेच हिंदु लोक पळून गेले...

दोमीनिक व फ्रांसिस्कन पाद्री यांनी आपल्या सर्मनमध्ये खिरस्ती करण्याच्या या पध्दतीवर ताशेरे झाडले तरी देखील व्हॉइसरायने हिंदूस हाकलून लावलेच. शेवटी, आपण करीत असलेले धर्मकार्य योग्य किंवा अयोग्य याचा विचार करण्यासाठी आणि त्यावर खिरस्ती धर्माधिकाऱ्याचे मत अजमावण्यासाठी कोंस्तांतिन् ब्रागांस या व्हॉइसरायने फ्रांसिस्कन, दोमिनिक व जेझुइट पंथांच्या पंडितांची एकच एक बैठक घेतली. परंतु त्या खिरस्ती धर्ममार्तडांनी व्हॉइसरायास सांगितले की, परिणामाकडे लक्ष देता सक्तीचा उपयोग करणे गैर नाही.

इ. स. १५६० साली गोव्यात इंक्विझिशन संस्था कोर्ट स्थापण्यात आली. वास्तवीक ही हिंदूसाठी स्थापलेली नव्हती. ती फक्त खिरस्ती लोकांकरिता स्थापलेली होती. पण, असे असूनही ती हिंदूंच्या कित्येक धार्मिक कृत्यांची दखल घेऊन या हिंदूंस शिक्षा करी. हिंदूंस कैद व आफ्रिका खंडातील मोसांबिक येथे हद्दपार करी.

गोवा शहराच्या ऱ्हासाचे एक प्रमुख कारण, इंक्विझीशन होय. या संस्थेच्या धार्मिक जाचामुळे बहुसंख्य हिंदु व्यापारी गोव्यातून पळून गेले. शहराचा व्यापार बसला. प्रसिध्द इतिहासकार श्री. पद्मनाभ मेनन यांनीही गोव्याच्या इंक्विझीशनमुळे कोंकणी ब्राम्हण मलबारमध्ये आले असे म्हटले आहे.

या धार्मिक छळामुळे हिंदु जनता शेजारच्या आदिलशहाच्या प्रदेशात, तसेच कर्नाटक मलबार येथे हिंदुराज्यामध्ये जाऊन राहिली. या अनुभवामुळे पोर्तुगीज राज्यकर्त्यांचे पित्त उतरण्यास प्रारंभ झाला. व गोव्याचे व्हॉइसराय कोंदि दे रेदोंद (१५६१ – १५६४) व त्यानंतर दों आंतांव दे नोरोंज (१५६४ – १५६८) या दोनही व्हॉइसरायानी मुद्दाम खास फर्माने काढून परराज्यात गेलेल्या हिंदुना सर्व प्रकारच्या धार्मिक स्वातंत्र्याची पूर्ण हमी देऊन परत गोव्यात येण्यास सांगितले. पण, एकदा विश्वास बुडाल्यानंतर परत विषाची परीक्षा कोण घेतो ? तरी पण अगदीच थोडे लोक परतले असावेत. (इंक्विझीशन ही संस्था ता. १६ जून १८१२ रोजीच्या राजाच्या हुकूमाने बरखास्त केली गेली.)

सासष्टी प्रांतात झेझुइट पंथाचे पाद्रीकडून धर्मप्रसार

गोवा बेटानंतर इ. सन १५६० साली झेझुइट पाद्री धर्मप्रसारार्थ सासष्टी प्रांतात गेले. बारदेश प्रांताचे खिरस्तीकरण फ्रांसिस्कन पंथाच्या पाद्रीवर सरकारने सोपविले. सासष्टी आणि बारदेश या दोन्ही प्रांतातील हिंदु देवालये इ. सन १५६० ते १५६७ या कालापर्यंत नष्ट करण्यात आली.

सुप्रसिध्द पोर्तुगीज बखरकार दियोगु दे कोंतु यानी लिहून ठेवल्यावरून कळते की, "आपली पुष्कळ देवालये उध्वस्त केल्याबद्दल फिरंग्याचा सूड घेण्यासाठी गोवेकर ब्राम्हण (सारस्वत) आदिलशहास सामील झाले व त्यास सासष्टीवर स्वारी करण्यास प्रेरणा दिली. सासष्टीत आलेल्या विजापूरकर यांचे मार्ग-दर्शन हे ब्राम्हण करीत. त्यानी फिरंग्याचे क्रूस जाळून टाकले. (Couto Decado VIII पृष्ठ २२१). मडगावचे चर्चही आदिलशहाच्या सैनिकांनी जाळले. पोर्तुगीज लोक सारस्वतांस ब्राम्हण म्हणत असत आणि द्रविड ब्राम्हणास भट असे नाव देत असत.

बाप्तिस्मा देऊन बाटविलेले हिंदु प्रायश्चित घेऊन स्वधर्मामध्ये परत आल्याचे पुरावे सतराव्या शतकात !!!

कोंदि दे लिंजारिस या व्हॉइसरायाने सासष्टीतील ब्राम्हणाचे सक्तीने धर्मांतर केले, असा आरोप खुद्द गोव्यातील पाद्रीनीच इ. सन १६४६ मध्ये केला होता. या व्हॉइसरायाच्या प्रयत्नाने एकाच खेपेस सासष्टीतील दीड हजार ब्राम्हणाना बाप्तिस्मा देऊन बाटविले. पण, त्यापैकी बहुतेक शेजारच्या राज्यात गेले व तेथे प्रायश्चित घेऊन स्वधर्मामध्ये परत आले. या पूर्वीची देखील गोवेकरातील शुध्दीची उदाहरणे आढळतात. (पहा :– Assento III pagina 476; Arquivo Portugues Oriental IV pagina 125)

वरील एकंदर ऐतिहासिक माहितीवरून कळून येते की, गोमंतकातील राजकीय स्थित्यंतरे आणि त्यामुळे हिंदुधर्मियांवर कोसळलेली अरिष्टे यांची कल्पनाच करवत नाही. आणि इ. स. १५६० साली जेझुइट पंथाचे पाद्री धर्मप्रसारार्थ सासष्टी तालुक्यात शिरल्यानंतर अवघ्या सात वर्षात त्यानी त्या तालुक्यातील एकंदर हिंदु देवालयांचा जसा विध्वंस केला तसाच हजारो लोकांस बळजबरीने बाटवून त्याचे खिरस्ती-करण केले हे सत्य नाकारता येत नाही.

पण, त्यातही निश्चितपणे अगदी त्याच झेझुइट पंथाच्या पाद्री लोकाच्याच गुप्त पत्रे आणि रिपोर्ट यावरून खात्रीपूर्वक सांगता येईल की, ते झेझुइट पंथाचे जे पाद्री लोक सासष्टीत धर्मप्रसारार्थ पहिल्यानेच प्रवेशले, ते ता. १ मे १५६० रोजी, आणि त्या दिवशी सासष्टीच्या कुठठाळी गावात त्यानी प्रवेश केला, तो त्या गावातील श्रीमंगेशदेवाच्या देवालयात. तो देव बाटविण्याच्या हेतूने.

पण, तेथे त्याना काय दिसले ? तर तेथे त्या देवालयाची फक्त इमारत होती ! आणि त्यात देव नव्हता ! हे त्यानी पाहून तेथे चौकशी करता त्याना कळून चुकले की, हे झेझुइट पंथाचे पाद्री धर्मप्रसारार्थ तेथे येण्याची चाहूल स्थानिक लोकास गुप्तपणे त्या आधीच लागल्यामुळे त्या देवाच्या कुळाव्यानी आपले देव या ता. १ मे, १५६० दिवसापूर्वीच एका काळोख्यारात्री अंधाराचा फायदा घेऊन, आकस्मिकपणे, प्रसंग ओळखून परराज्यात – आदिलशहाच्या राज्यात फोंडे प्रांतात स्थलांतर करून नेलेले आहेत !!!

हे सांगण्याचे कारण इतकेच की, ज्या जेझुइट पंथाच्या पाद्री लोकानी जी १५६०-१५६७ या कालात उध्वस्त केली ती सर्व देवालये म्हणजे ज्या काही देवालयातील प्रमुख दैवताचे स्थलांतर गुप्तपणे त्या त्या दैवताचे कुळावी महाजनांनी सासष्टी बाहेरच्या प्रांतात पार पाडून झाले होते.

पण, त्या मूळ जागेवरच देवालयाची इमारत होती व त्यात काही जड पाषाण मोठ्या वजनाच्या, ज्या अचानक आकस्मिकपणे रातोरात काळोखात सहजासहजी दूर ठिकाणी परराज्यात एक दोन इसमानी बरोबर घेऊन पळविणे प्रत्यक्षात आणि व्यवहार्यतः अशक्यच होते, त्या अवजड मूर्ती त्या इमारतीत तेथेच राहिल्या असणे साहजिक आहे.

रात्रीच्या काळोखाच्या अंधाराचा फायदा घेऊन आपले मुख्य दैवत गावापलीकडे, बाळगून बरोबर घेऊन स्थलांतर करून पळणारे लोक जाताना काय आपल्या दैवताच्या देवलयाची इमारत आणि त्यातील मोठ्या जड वजनाच्या पाषाणी मूर्ती आपल्याच हातानी मोडून टाकणार होते ? घरे दारे जमीन जुमला धन-संपत्ती ज्यांवर तिलांजली देऊन आपले दैवत घेऊन पळाले, ते आपल्यामागे काय घडणार ते घडो, परमेश्वरावर हारभार घालून गेले असणार हे व्यवहार ज्ञान न सांगताच कोणासही समजू शकते.

लोटली येथील श्रीरामनाथ दैवताचे स्थलांतर अशाच स्वरूपाचे, हे उघड नव्हे काय ?

लोटली येथील श्रीरामनाथ देवालयाची विध्वंसक दुःखदायक घटना जशी आतापर्यंत त्या देवस्थानाची माहिती अनेक वेळा, अनेक लेखात आणि पुस्तकात प्रसिध्द झालेली वाचण्यास मिळते, ती तशीच खरी असणे शक्य आहे काय ? याबद्दल जरा शांतपणे आणि निर्विकाररित्या, वस्तुस्थिती त्यावेळी कशी काय होती, त्या परिस्थितीत सांपडलेले इसम किंवा जनता, कर्तव्यबुध्द आणि आपल्या कुलदैवतासह आत्मसंरक्षण करण्यासाठी कोणती सावधगिरी शक्य तो घेणार होते, किंवा त्या दृष्टीने जास्तीत जास्त, किंवा कमीत कमी, काय करणार होते, काय करणे त्याना त्या संकटकाली शक्य होते, याचा आपण समतोल बुध्दीने व्यवहार्य दृष्ट्या आजच्या कालात विचार करण्यास अभ्यासू म्हणून तरी हरकत नसावी.

माझ्या या विधानाचा किंवा म्हणण्याचा विपर्यास, अर्थाचा अनर्थ कोणी करू नये किंवा यापूर्वी लोटली येथील श्रीरामनाथ प्राचीन दैवताच्या स्थलांतरासंबंधी ज्या तज्ञ, सुज्ञ आणि विचारवंत लेखकानी लिखाण करून प्रसिध्द झाले, त्या सर्वांचा मी आदर करूनही मला असे वाटते की, लोटली येथे श्रीरामनाथ देवालयाचे देवालय म्हणजे त्या देवालयाची इमारत रायतूर येथील किल्लेदार कॅप्टन दियोगु रोद्रिगीस याने किंवा त्याच्या हुकूमाने आग लावून इ. स. १५६७ साली भस्मसात केली, असे तत्कालीन ऐतिहासिक कागदपत्र व इतर पुराव्यांवरून कळते आणि ते खरे मानणे प्राप्त आहे.

तरी ही दुःखदायक घटना सासष्टी प्रांतात अचानकपणे, अशा घटनाबद्दल यापूर्वी तेथे त्या तालुक्यात, लोटली गावच्याही आसपासच्या गावात झाली नसताना, किंवा तशा कृत्यांचा मुळीच संशय किंवा सुगावा न लागताच झाली आहे हे मात्र मुळीसुध्दा खरे नव्हे. उलट, इ. स. १५६० सालापासूनच या अघोर कृत्यांस सासष्टीत प्रारंभ झाला आहे हे स्पष्ट आणि उघड आहे, हे कोणीही तत्कालीन ऐतिहासिक घटनांचा आणि वस्तुस्थितीचा अभ्यास करणाऱ्यास सहजासहजी कळू शकते यात संशय नाही.

इ. सन १५६० ता. १ मे या दिवशी झेझुइट पंथाचे लोक (पाद्री) सरकारी कुमकीसह आपल्या धर्म प्रसारार्थ सासष्टीत प्रवेशले हे जगजाहीर असून यात संशय किंवा दुमत नाही. त्या पाद्रीनी महा अघोर कृत्ये चालविण्याचा, बळजबरीने बाटाबाटी करण्याचा एकसारखा सपाटा चालविला, हे काही लपून राहिले नाही. हे सर्व पाहून जाहीरपणे घडलेल्या अनन्वित कृत्याची बातमी कळूनही लोटली गावचे श्रीरामनाथ देवस्थानचे स्थानिक कुळावी महाजन अगदी इ. सन १५६७ साल उजाडेपर्यंत, एवढा सात वर्षांचा दीर्घ-काळ आपल्या या देवतास लोटली येथून स्थलांतर न करता राहिले असावेत काय ?

ज्या कालात हिंदु लोक खिरस्ती धर्म स्विकारीत नाहीत म्हणून ज्या हिंदूंची बळजबरीने जिवंत जाळून राख केली, याची हजारो उदाहरणे जगजाहीर झाली, ज्या कालात इ. सन १५६० वर्षापूर्वी त्याच लोकांनी तिसवाडी तालुक्यात, गांवा बेटात संपूर्णपणे देवालये आणि देवतांच्या मूर्ती मोडून टाकल्या, आगी लावल्या याची माहिती आगीप्रमाणे सर्व तालुक्यात उफाळली, इ. सन १५६० वर्षाच्या अखेरीस आर्सबिशप दों गास्पार दे लेयांव पेरैर यानी आपल्या अंगावर झगझगीत पोषाख व डोक्यावर भव्य टोपी चढवून येथियोपियाचे पात्रियार्क व मोलक्काचे बिशप यांच्यासमोर "सांता फे" च्या इगर्जेत हर्ष-भराने टाळ्या पिटित पिटित ४०० पेक्षाही अधिक लोकाना बाप्तिस्मा देण्याचा समारंभ मोठ्या थाटाने उरकून घेतला, आणि "ह्यातील बहुतेक सर्व लोक सासष्टी महालातील होते."

अशा जाहीरपणे आक्रोश चाललेल्या घटनानंतर, त्या भयानक, काळीज थरथरणाऱ्या घटना-नंतर, ही परिस्थिती समजून उमजूनही लोटलीचे तत्कालिन रहिवासी कुळावी आपले प्राणापलीकडील मानलेले देवत सात वर्षे लोटली येथेच राहू देऊन आणि प्रत्यक्षात रायतूरचा किल्लेदार कॅप्टन दियोगु रोद्रिग्रीस इ. सन १५६७ साली मुख्य देवालयाच्या इमारतीस आग लावण्यास येईपर्यंत वाट पाहण्याचे धाडस किंवा अविचारीपणा केला असेल असे कोणासही, साधारण मनुष्यास मुळीच पटणार नाही असे वाटते.

आणि ते तसे धाडस किंवा अविचारीपणा केला असेल किंवा कशाही प्रकारे झालाच, अशी कल्पना म्हणून तात्पुरते जरी गृहीत धरलेच आणि अशा विचाराचा एखादा लेखक असला तर त्याला असेही वाटणे साहजिकच आहे की, ज्या किल्लेदार रायतूरच्या कॅप्टनने लोटली येथील देवालयाच्या प्रमुख इमारतीस, लोटली येथील गावकऱ्यानी आपला हुकूम मानला नाही याबद्दल आपला अपमान झाला, या क्रोधाने त्या देवालय इमारतीस आग लावण्यापूर्वी, त्याने त्या देवालयाच्या संबंधित जनतेस बोलावून आणून त्यांस अगाऊ सुचनाही दिली असावी की, 'सज्जन मित्र हो ! मी तुमच्या प्रमुख देवालयाच्या पुढच्याच भागास तेवढी आता आग लावणार आहे, आणि मागचा भाग तसाच शाबूत राखणार आहे यासाठी, तुम्ही तुमची प्रिय देवते जी त्या देवालय इमारतीत असतील, ती तुम्ही बैलगाडीवर घालून रासई येथे नदी किनारी न्या आणि होडीतून जुआरी नदी ओलांडून पैलतीरावर उतरवून नंतर तुम्ही तेथून विजापूर-करांच्या सत्तेतील बांदिवडे गावात नेऊन तेथे स्थापन करा.' असे त्या कॅप्टनने लोकाना सांगितले असावे असेही त्या लेखकास दिसल्यास ते नवल मानण्याचे कारण नाही !

मात्र वाचक अशा लिखाणाच्या लेखकाच्या तारतम्य बुध्दीबद्दल काय म्हणतील याचा विचार ज्याचा त्याने करावयाचा असल्याने तसा तो केला असेलही. त्याबद्दल इतरांस विवंचना करण्याचे कारण नाही. फार तर प्रत्येकाचा दृष्टिकोन असे म्हणून गप्प बसता येईल. मात्र प्रत्यक्षात ज्या लोकानी आणि ज्या कॅप्टनने लोटली येथील देवालयाबद्दल केलेल्या कृत्याची माहिती विश्वसनीय ऐतिहासिक कागदपत्रानुसार काय मिळते ते पाहू :–

'ओरियेंत कोंकीस्तादु' हा ग्रंथ म्हणजे इसवी सनाच्या सोळाव्या शतकात खिरस्ती धर्मवेड्या जेझुइट पंथाच्या पाद्रीनी गोमंतकात हिंदु धर्मियास बळजबरीने बाटवून त्यांचा छळ करून त्यांची देवालये मोडून आगी लावून देवतांचे मूर्तीभंजन केले होते, त्या पाद्रीनी आपल्या दैनिक कृत्याचा रिपोर्ट लिहून जी पत्रे गुप्तपणे पोर्तुगालास राजाकडे पाठीवली होती ती सर्व अस्सल पत्रे एकत्र करून तत्कालीन पोर्तुगीज राजाने सरकारी छापखान्यातच जशाची तशी इ. सन १७१० साली ग्रंथरूपाने छापली होती.

प्रारंभीच्या सोळाव्या शतकात ती पत्रे गुप्त अंतस्थ राजकीय पत्रव्यवहार म्हणून वाचण्यास मिळत नव्हती. पण, कालांतराने दीडशे वर्षांनंतर तेथील राजानेच ही सर्व गुप्तपत्रे छापून जो ग्रंथ प्रसिध्द केला, त्या ग्रंथाचे नाव "Oriente Comquistado A Jesu Christo pelos Padres de Companhia de Jesu de Provincia de Goa Lisboa 1710" असे आहे.

आजच्या शतकात हा ग्रंथ ऐतिहासिक अभ्यासूना वाचण्यास उपलब्ध झाल्यामुळे, त्या कालच्या गुप्त कृत्यांचा रिपोर्ट त्या झेझुइट पंथाच्या पाद्रीनीच, त्या काली आपल्या वरिष्ठांस कळविलेला वाचून त्या वेळच्या सर्व घटनांची तारीख वार बारीक सारीक माहिती अस्सल पत्रातूनच मिळाली असल्यामुळे तो ग्रंथ वाचून त्यात लोटली येथे श्रीरामनाथ देवस्थान असताना त्या बाटाबाटीच्या कालात प्रत्यक्षात कोणत्या दिवशी कोणा अधिकाऱ्याने काय कृत्य केले, याबद्दलचा जो मजकूर त्या ग्रंथात पोर्तुगीज भाषेत आहे त्याचे तात्पर्यार्थ भाषांतर दिले आहे. ते लक्ष्यपूर्वक वाचून वाचकानी आपले मत ठरविणे योग्य ठरेल.

(संदर्भ : ORIENTE CONQUISTADO, II PARTE, PAGINA 24 ANNO 1567)

'लगेच दुसऱ्या वर्षी १५६७ साली सासष्टीतील एकंदर देवालयाचा पूर्णपणे विध्वंस झाला. हे काम खालील प्रमाणे झाले.

रायतूर येथील किल्ल्याचा अधिकारी कॅप्टन दियोगु रुद्रिगीस नावाचा नामांकित शूर आणि बलाढ्य पोर्तुगीज होता. त्याचे नाव दियोगु फेर्नांदिस नव्हे जे तसे आपले इतर प्रकाशक लिहितात. त्याला फक्त 'बलाढ्य' याच नावाने संबोधिले पाहिजे होते. जसे आफ्रिकन लोक आफ्रिकेत गाजविलेल्या पराक्रमाबद्दल दोन शूर पराक्रमी इसमास म्हणत आहेत. त्याच काली रायतूर किल्ला आणि त्या सभोवती आसपास नीजकच्या गावासाठी व्हिगारियु ग्रामीण धर्माधिकारी म्हणून पाद्रि लुइस गोईस हा इसम होता व तो त्या पूर्वीचा पेरु कुलासु नावाच्या धर्माधिकारी याच्यानंतर त्या जागेवर रूजू होणार होता, आणि अशामुळे तो रायतूर गावाचा तिसरा धर्माधिकारी होय. रायतूर किल्ल्याच्या अधिकारी कॅप्टनने एक दिवस गावातील गांवकऱ्याना आपल्या भेटीस किल्ल्यात बोलावणे पाठीवले.

लोटली गावापासून रायतूरचा किल्ला अर्धकोस लांब अंतरावर आहे. लोटलीचे गांवकार रायतूरच्या किल्ल्यावर हजर झाले नाहीत हे पाहून त्या कॅप्टनने रायतूरच्या रहिवाशाना विचारले की, या गैर-हजेरीबद्दल त्याना काय शिक्षा द्यावी असे तुम्हास वाटते ? रायतूरच्या रहिवाशानी उत्तर दिले की, त्या लोकांच्या घरास आगी लावून टाका. लोकांच्या म्हणण्यास होकार देऊन किल्लेदार कॅप्टन म्हणाला, त्यांची घरे जाळण्यापेक्षा त्यांच्या लोटली येथील देवाचे मुख्य देवालय जाळून टाकलेले फारच बरे ! असे म्हणून, त्याने लगेच त्या लोटलीच्या प्रमुख देवालयास आग लावण्यास लावली.

आपल्याच देवालयाची इमारत किंवा देवालय जळून खाक होत असलेले दृश्य आपल्याच डोळ्यांनी पाहणे त्या लोकाना अगदी असह्य आणि फार फार दुःखदायक झाले. त्याचे वर्णनही केल्यास खरे वाटणार नाही. व या कृत्याचा सूड कसल्याच उपायानी घेणे त्याना अशक्य होते म्हणून, ते लोटलीचे हिंदु ताबडतोब गोवा बेटातील सरकारी न्यायालयाकडे धांव घेऊन आपली केस त्या कॅप्टन अधिकाऱ्याविरुध्द खटला उभारून चालीवली.

सरकारी न्यायालयाने आपल्या निकाल पत्रात त्या कॅप्टनला दोषी ठरवून फर्मीवले की, त्या कॅप्टननेच स्वखर्चाने ते देवालय पूर्ववत बांधून द्यावे. कॅप्टनने या निकालाविरुध्द वरीष्ठ न्यायालयात अपील सादर केले व मुद्दा मांडला की, 'हिंदु धर्मीयांचे देवालय बांधून देणे सध्या चालू असलेल्या देवाच्या कायद्याविरुध्द' आहे.

पण, मनातून या मुद्याने अपील आपल्यातर्फे होईलच याची खात्री नसल्याने या कॅप्टनने न्यायालयाने दिलेल्या निकालाची अंमलबजावणी होऊच नये या हेतूने आर्चीबिशप प्रिमाज हा उच्च धर्माधिकारी आणि आपल्या जेज्वइट कंपनीचा धर्माधिकारी या दोघांस संयुक्तपणे व्हॉइसराय दों आंतांव दे नोरोज याकडे पाठवून, आपण जे देवालय मोडले आहे ते फारच महत्वाचे कृत्य आहे हे पटवून देण्याची उपाय-योजना केली.

या दोनही पाद्री धर्माधिकाऱ्यानी हिंदूंचा देव सैतान, त्याला स्वतःच्या मालकी हक्काचे देवालय व जमिनी असणे शक्यच नाही व न्यायालयाने दिलेला निकाल अप्रशस्त आहे हे त्या व्हॉइसरायना पटविले आणि त्यानी मांडलेले मुद्दे व्हॉइसरायना ग्राह्य आणि सबळ वाटले.

त्यानी रायतूर किल्ल्याचा कॅप्टन दियोग रुद्रिगीस यास बोलावून आणले आणि त्यास फर्माविले की, सासष्टीला परत जाऊन तेथील जी देवालये जितकी सापडतील तेवढी सर्वच जाळून टाकावी आणि बाकी जसे तुझ्या इच्छेस येईल तसे करावे !

हा कॅप्टन आपल्या रायतूर किल्ल्यावर विजयोन्मदाने परत येऊन पाद्री लुईस द गोईस आणि सासष्टीच्या बाकी मिशनरी पाद्रीस कळविले की, आपण व्हॉईसराय दों आंतांव दे नोरोंज यांकडून पूर्ण संमती घेऊन आलो आहे. म्हणून त्यांच्या आणि नवीन ख्रिश्चन झालेल्या सर्वांच्या सहाय्याने फार मोठे महत्वाचे ईश्वराच्या किर्तीप्रसाराच्या महत्कार्याच्या कामास प्रारंभ केला.

रात्रीच्या शांत वेळी, हिंदू धर्मीय जनतेचे जमाव होण्याची शक्यता नाही अशी संधी पाहून, जे जे मिळेल ते ते देवालय मोडून, पाडून टाकले. व अशा प्रकारे २८० देवालयांच्या इमारती एकाच बरोबर मोडून टाकून आणि त्या इमारतींचे लांकूड सरकारी भांडारात जमा करून टाकले.

आणि आपणास जर न्यायालयाने एक देवालय जाळल्याबद्दल शिक्षा म्हणून परत ते बांधून देण्यास फर्माविले होते, तर आता धर्मनिष्ठ राजे दों सेबास्तियांव यांनी सर्व देवालये मोडून टाकण्याची परवानगी दिली इतकेच नव्हे, तर त्या मोडून टाकलेल्या देवालयांच्या जमिनीचे उत्पन्न बक्षिस म्हणून धर्म प्रसारकांच्या चरितार्थासाठी उपयोग करण्याचा हुकूम सोडला. हे उत्पन्न दहा हजार असुर्फ्यांचे असल्याने सासष्टीतील चर्चेस व पाद्री यांच्या करता सरकारला तीन हजार असुर्फ्यांपेक्षा अधिक खर्च करावा लागत नाही.'

वाचकानी हा सर्व मजकूर तत्कालीन देवालयाच्या इमारतीच्या विध्वंसक घटनेचा बारकाईने लक्षपूर्वक वाचल्यानंतर त्यातल्या विशेष ठळक माहितीचे ज्ञान जे होऊ शकते ते असेः–

१) कॅप्टन दियोग रुद्रिगीस रायतूरचा किल्लेदार याने लोटली येथील प्रमुख देवालयास आग लावली.

२) तेथील रहिवाशाना त्या कॅप्टनचा सूड घेणे अशक्य होते म्हणून त्या रहिवाशानी न्यायालयाकडे धांव घेऊन न्यायालयाकडून निकाल आपल्या हिती म्हणजे त्या कॅप्टननेच स्वखर्चाने ते देवालय पूर्ववत बांधून द्यावे असा निकाल मिळविला. ही गोष्ट त्याकाळी तर पूर्णपणे अशक्य कोटीतीलच; पण, हे काम श्रीरामनाथ देवस्थानच्या तत्कालीन महाजनानी ज्यानी हा खटला सुरू करून चालविण्याचे अतुलनीय आणि असामान्य धैर्य, निष्ठेने, चिकाटीने आणि पराक्रमाने कोणत्याहि सरकारी यंत्रणेची मुळीसुध्दा पर्वा न करता चालविले आणि निकाल लागेपर्यंत तडीस नेले, त्या पराक्रमी पुण्यवान कुळावी महाजनांचे गोव्यातील सर्व हिंदुधर्मीयानी आभार मानून धन्यवाद दिलेच पाहिजेत. इतकेच नव्हे तर त्यांचे दैनंदिन पुण्यस्मरण करणे हे मोठे भाग्यच समजावे लागेल, इतके हे कृत्य ज्या काली हिंदू लोकाना विशेषे करून बाटाबाटीच्या कामात अडथळा आणणाऱ्याना जिवंत जाळीत, त्या कालातीलच हे असामान्य धारिष्टच आहे, याची जाणीव घेणे बरे.

ज्या खिरस्तीधर्मीय न्यायमूर्तींनी हा निःपक्षपाती निकाल त्या काळी दिला, त्याची थोरवी, आणि न्यायनिष्ठूरता अतूलनीय हे कोणीही कबूल करील.

आता जरा भावनेचा प्रश्न मागे ठेऊन म्हणजे भावनावश न होता त्या सत्य ऐतिहासिक परीस्थितीकडे अभ्यासू आणि निर्विकार बुध्दीने पाहू.

जर त्या कॅप्टनने त्या देवालयास आग लावली, आणि तेथील लोकाना तेथे प्रतिकार करणे किंवा कृतीने त्वेषाने त्या कॅप्टनचा त्याच वेळी सूड घेणे अशक्य होतेच, हे अगदी पूर्णपणे खरेच हे सांगण्याची गरज नाही.

अशा वेळी त्या अघोर प्रसंगात त्या देवालयात, त्या आगीत शिरून तेथील प्रमुख दैवत लिंग व इतर दैवते मूर्ती वगैरे हलवून देवालयाबाहेर नेता येणे शक्य तरी होते काय ? आणि समजा आपल्या जीवावर उदार होऊन एखाद्याने त्या आगीत उडी घेतली असती, तर त्यास दैवत लगेच बाहेर आणता येणे शक्य होते काय ? आणि आणलेही असे जरी एखादे वेळी मानले, तरी तो कॅप्टन आणि धर्मवेडे जेझूइट पाद्री ती दैवते तेथून दूसरीकडे सूरक्षित ठिकाणी पळविण्यास त्यावेळी देते झाले असतील काय ?

ती दैवते त्या आक्रोश आकांताचे वेळी, त्या आगीच्या फोफाट्यात, त्या कॅप्टन व इतर आगलाव्याच्या उपस्थितीत बाहेर काढणे व पळविणे शक्यच नव्हते, आणि काढली अशी कल्पना केली तरी ते दूष्ट लोक ती भ्रष्टवून टाकणारच होते हे कोणी विचारवंत नाकारू शकतो काय ?

सासष्टीतील दैवतांच्या स्थलांतर कालास किंवाझेझूइट पंथाचे पाद्री लोक सरकारी कूमकीसह खिरस्ती धर्मप्रसारासाठी सासष्टीत जे पहिल्या प्रथमच प्रवेशले, ते इ. स. १५६० साली; या कालास आज ४२० वर्ष झाली हे खरे आहे. प्रत्येक देवालयाच्या कूळावी महाजनाच्या कूटूंबात परंपरेने काही ना काही, अवघ्या, अगदी फारच किंचित प्रमाणात का होईना, आपआपल्या देवालयाच्या बाबतीत काही दंतकथा किंवा साक्षात्कारी घटना चालीरिती वगैरे सारख्या बऱ्या वाईट गोष्टी ऐकत आजच्या पिढीपर्यंत आलेल्या दिसतात.

मग त्या दंतकथा, ऐकीव गोष्टी खऱ्या किंवा खोट्या, त्यात काही थोडे तरी सारस्य, विचार करण्या-सारखे आहे की काय, याची ही चौकशी किंवा शोध मग घेऊ.

याप्रमाणे लोटली गावातून बाटाबाटीच्या कारणाने श्रीरामनाथ दैवत आदिलशाहीच्या फोंडा तालूक्यात बांदिवडे गावात स्थलांतर करून आले आहे असे परंपरेने त्या कालापासून आजपर्यंत पूर्वजांच्या मूखोद्‌गत ऐकत आलो; लोटली येथे हे दैवत असताना त्या दैवताचा तेथे, तत्कालीन खिरश्चन धर्मीय बाटाबाटी करणाऱ्यानी भ्रष्टाचार केला, आणि नंतर हे दैवत स्थलांतर करून फोंडे तालूक्यात आणले गेले, असे किंवा अशा अर्थाचे कसलेच संशयास्पद सूध्दा वर्तमान कधीच, कोणीच, कोठेही ऐकलेले नाही, हे अगदी निश्चित-पणे खरे आहे.

या उलट गोवा बेटातील दैवते आणि सासष्टीतीलही काही दैवते त्या जूलमी खिरस्ती धर्मीयांच्या हातात सांपडून ती त्यानी भ्रष्ट करून मोडून विध्वंसन केली आहेत हे खरे असले तरी त्या लोकाच्या तावडीत सर्वच गावची सर्वच दैवते पडली नाहीत, हे अगदी निश्चितपणे आणि निसंशयपणे खात्रीलायक स्पष्ट पूराव्यावरून सांगता येते.

गोमंतकातील देवालयाचा बारकाईने, निर्विकारपणे सत्य वस्तूस्थितीचा अभ्यासू दृष्टीने विचार करता आणि ऐतिहासिक पूरावे, दाखले तसेच खिरस्ती धर्मात ओढण्याची शर्थ ज्यानी केली, त्यानीच आपल्या हस्ते गुप्त पत्रे लिहून ठेवली होती व जी आजच्या कालात उजेडात आल्यामूळे ती तपासून पाहता, अगदी

खात्रीपूर्वक नक्कीच सांगता येते की, गोवा बेट किंवा तिसवाडी तालुक्यांत जसा प्रहार सर्वच देवालयां- वर आकस्मिकपणे एका दमात घालण्यात येऊन देवालयातील देवते मोडून तोडून आणि देवालयांच्या इमारती जाळून किंवा पाडून, विध्वंस करून समूळ उच्छेद केला, तसा प्रकार एकाच दमाने सासष्टीत आणि बारदेशात केला नाही किंवा करणे शक्य झाले नाही.

याची कारणे अनेक आहेत. सासष्टी आणि बारदेशचे हिंदु लोकाना तीसवाडी तालुक्यात हिंदु जनतेचा आणि हिंदु देवालयांचा कसा काय विध्वंस केला गेला, याची त्याना पुरेपूर माहिती आगाऊ असल्यामुळे, खिस्ती धर्मप्रसाराचे पाद्री झेझुइट लोक सरकारी कुमकीसह सासष्टीत इ. स. १५६० साली प्रवेशल्यानंतर आता याही तालुक्यात काय भयानक परीस्थिती अपरिहार्यपणे ओढवणार याची जाणीव त्याना होऊन या संकटातून आपण आपल्या प्रमुख देवतांसह हळुवारपणे संशय व चाहूल लागू न देता, गुप्तपणे सासष्टी तालुक्याबाहेर कोठेतरी जाणे या विचारात आणि तयारीस ते लागले हे सांगावयास नकोच.

त्यात आणखी विशेष गुप्त गोष्ट वेगळी आहे, याबद्दल स्थलाभावामुळे किंवा विषयांतर नको म्हणून येथे चर्चा नको; पण, वाचक आणि अभ्यासूनी लक्षात घेणे जरूर आहे की, तिसवाडीत ज्या हिंदु लोकांचे बळजबरीने धर्मांतर केले गेले, त्यात जसे हिंदु तिसवाडीतच राहणारे होते, तसेच, सासष्टीत राह- णारे आणि व्यापार व इतर व्यवसाया निमित्ताने तिसवाडीत एक दिवस गेले, त्यावेळी त्याना आकस्मक- पणे वेढा घालवून बळजबरीने बाटविले गेले होते.

या दोन्ही तालुक्यातील हिंदु लोकात ज्याना आकस्मिकपणे बाटविले, त्यात श्रीमंगेश, श्रीशांतादुर्गा, श्रीरामनाथ अशा नानाविध देवतांचे कुळवी महाजन सापडले, आणि त्याचेच सख्खे भाऊ आईवडील इकडे तिकडे पळून गेल्यामुळे हिंदु धर्मात राहिले. याचे पुरावे आणि दाखलेही त्या त्या ग्रामसंस्था किंवा कोमुनिदादीच्या दप्तरात पहावयास मिळतात. बाटलेल्या लोकात काही इसम मूळ खिस्ती लोकांचा आपल्या जीवन चरितार्थासाठी विश्वास संपादून व्यवहार चालविण्याशिवाय त्या समूहात पुढील आयुष्य कंठणे अशक्य असल्यामुळे त्यानी तसा विश्वास संपादन केला होताच.

पण, मनातून त्याना स्वतःच्या बायका, मुलामुलीची व आई वडिलाची व आपल्या हिंदुधर्मकालीन कुलदेवतासंबंधी आत्यंतिक ओढ व रक्ताची माया होती, हे एकादा अज्ञ सुध्दा सांगू शकतो.

सासष्टीतील कोणत्या देवालयाबद्दल काय कारस्थान शिजत आहे याचे धागेदोरे, संशयास्पद हाल- चाली, या बाटलेल्या हिंदूपैकी केव्हा कोठे तरी चाहुल लागणे हे आश्चर्य नव्हे पण, आपण ही बातमी उघडपणे कळविल्यास आपणास देहांताचाच धोका आहे हे ते जाणत असले, तरी पत्रव्यवहार न करता युक्ती प्रयुक्तीने, असल्या भावी भयानक कारस्थानच्या काही तुरळक बातम्या किंवा संकेत, ते आपल्या कुलदेवताबदल संबंधित हिंदु कुळाव्याच्या कानात सावधगिरीसाठी घातल्याशिवाय राहतील की नाही, याचाही थोडाफार विचार करावयास नको काय ?

ते बाटून इतकी ४२० वर्षांचा काळ, म्हणजे चार शतकापेक्षा जास्त काळ उलटला असताना सुध्दा, परंपरेने इतक्या पिढ्या आजतागायत आपल्या पूर्वाश्रमीच्या कुलदेवतास अव्याहत आणि अखंडीतपणे, निष्ठेने, भक्तिभावनेने श्रध्देने, भजतात, प्रसाद घेतात, वार्षिक महापर्वणीस येऊन, आपल्या कुटुंबाच्या नावे 'तळी' म्हणजे साधारणपणे एक पायली भात किंवा तांदूळ, एक नारळ, त्यावर काही किरकोळ पैसे असे, आत देवालयात आणून देऊन देवाची आपणावर सदैव, कृपा दृष्टी असावी, अशी प्रार्थना गाऱ्हाणे करून जातात, ही सर्व सत्य वस्तुस्थिती आपण सध्याच्या कालात उघड्या डोळ्यानी पाहत असता, यांचेच पूर्वज जरी बळजबरीने बाटवून खिस्ती म्हणून वेगळावले, तरी मनाने, आपुलकीने त्या तशा भयानक विघातक काळात हेरगिरी अंतस्थ करून आपआपल्या कुलदेवताच्या कारभारी लोकाना गुप्तपणे त्या देवताच्या बाटाबाटी संबंधाने सुगावा लागल्यास, आणि लागताच तातडीने कोणत्याहि गुप्तमार्गे कळविल्याशिवाय खचित राहणार नाहीत हे स्पष्ट आहे.

आणि त्या तशा बातम्या मोठ्या कुशलतेने त्यानी कळविल्यामुळेच सासष्टीतील काही दैवतांचे स्थलांतर बाटाबाटीचे पाद्री लोकांची उपस्थिती त्या दैवतांच्या गावात होण्यापूर्वीच, त्या संबंधित दैवताच्या कुळाव्यानी घाई गडबडीत, सर्वस्वावर तिलांजली देऊन, सर्व आशा सोडून, पार पाडण्यात यशस्वी ठरले.

याचे नमुन्यादाखल स्पष्ट निस्संदिग्ध उदाहरण म्हणून कुठ्ठाळ गावातील, श्रीमंगेश दैवत त्याच्या कुळाव्यानी ता. १ मे १५६० दिवसापूर्वी अचानकपणे, रातोरात काळोख्या रात्रीत फोंडे तालुक्यात पळविले हे होय.

ते कुळावी काही एवढे महान् ज्योतिषी खचितच नव्हते की, त्याना भावी घटना तारीखवार समजू शकावी. त्याना त्याच कुळावी इसमाच्या एका कुटुंबातील धर्मांतर घडून ख्रिस्ती झालेल्या इसमाने हे विघ्न जवळच्या दिवसात कुठ्ठाळी गावावर धाड येण्याचे कारस्थान शिजत आहे असे कळविल्या शिवाय, हे अचानक स्थलांतर होण्याची घटना सहजासहजी होण्यासारखे काम नव्हे.

आणि याच चालीवर काही दैवतांचे पूर्वाश्रमीचे कुळावी, बाटलेले हिंदू, त्या ख्रिस्ती धर्म प्रचारकाना बाहेरून सहकार्य करून, विश्वास संपादून, गुप्तपणे ही हेरगिरी करून आपआपल्या दैवतासंबंधी बातम्या काढल्याशिवाय राहिले नाहीत व त्यामुळे तरी अंशतः काही दैवते त्या पाद्री लोकांच्या हातात सांपडण्यापूर्वी बचावली आणि त्या प्रमुख दैवतांचे स्थलांतर बाटविण्यापूर्वी पार पाडले आहे.

त्याची देवालये इमारती व फार जड पाषाणी मूर्ती ते काय खाकेत मारून नेणार होते ? आणि ही अशीच देवालये (प्रत्यक्षात त्यातील मुख्य दैवत स्थलांतर करून झाल्यानंतर) म्हणजे त्या देवालयाची इमारत व तेथे असलेल्या पाषाणी मूर्ती यांचाच त्यानी विध्वंस केला, आणि आपण एक देवालय किंवा अशी देवालये उध्वस्त करून विजय व आनंद मिळाल्याबद्दल वरिष्ठांकडून गौरव करून घेण्याचे समाधान मिळविले आहे, आणि हीच बहुतांशी वस्तुस्थिती आहे.

याबद्दल जर आणखी पुरावा पाहिजे, तर हे काय ते पहा :- गोवा बेट (तीसवाडी), सासष्टी आणि बारदेश या तीनच तालुक्यात हिंदूंच्या देवालयाचा विध्वंस आणि हिंदू धर्मीयांचे बाटाबाटीमुळे धर्मांतर झाले, आणि या क्रांती किंवा भयानक परिस्थितीमुळे या तीनही तालुक्यातील दैवतांचे त्या तालुक्याबाहेर स्थलांतर झाले आहे हे लक्षात घेऊन, स्थलांतर दैवतांची संख्या पाहता, ती संख्या किती तरी पटीने, स्थलांतर पूर्व काली दैवतांची संख्या जी होती, तिच्या फार कमी पटीने आहे, हे स्पष्ट निःसंशयपणे, पुराव्यानिशी कळते.

यासाठी, त्या सोळाव्या शतकात पोर्तुगीज धर्मप्रसारक लोकानी त्या तीन तालुक्यातील कोणत्या दैवतांची देवालये उध्वस्त केली, त्यांची पूर्ण यादीच जी गोव्याच्या ऐतिहासिक पोर्तुगीजकालीन, सरकारच्या दप्तरखान्यात आहे व जी त्या खात्याचे डारेक्टर कै. वा. डॉ. पांडुरंगबाब शेणवी पिसुर्लेकर या नामांकित इतिहासाचार्य यानी प्रसिध्द केलेली आहे. या यादीकडे तुलना करून तपासणाऱ्याच्या ध्यानी येण्यास वेळ लागत नाही.

हा वस्तुस्थितीदर्शक पुरावा हे स्पष्ट करतो की, सर्वच्या सर्व जरी खचित म्हणता येणे कठीण आहे, तरी काही दैवते, ज्यांच्या स्थलांतराबद्दल स्पष्ट उघड पुरावे आहेत ती, व आणखी काही ज्यांच्या बद्दल कागद पत्र किंवा लेखी पुरावे जरी आज वाचकासमोर मांडता येणारे उपलब्ध झाले नाहीत, तरी ज्या नानाविध तत्कालीन ऐतिहासिक घटनाचा बारकाईने अभ्यास करता, त्यातून सांगता येते की, काही दैवतांचे स्थलांतर त्याची बाटाबाटी होण्याची भावी घटना होण्यापूर्वीच त्या तालुक्याबाहेर झालेले आहे. आणि या अशाच प्रकारच्या दैवतात, लोटली येथील श्रीरामनाथ दैवताचा समावेश आहे यात शंका दिसत नाही.

लोटली येथील श्रीरामनाथ दैवताचे स्थलांतर इ. सन १५६७ म्हणजे ज्या वर्षी रायतूरच्या किल्लेदार कॅप्टनने दियोगु रोद्रिगीसने लोटली येथील देवालयाची इमारत आग लावून जाळली, त्यावेळी झाले

नसून, ते स्थलांतर इ. सन १५६० ता. १ मे दिवसानंतर किंवा आसपास त्याच साली बांदिवडे येथे झाले असलेच पाहिजे.

इ. सन १५६० साली झेझुइट पंथाचे पाद्री लोक धर्मप्रसारार्थ सरकारी कुमकीसह सासष्टीत उतरल्यानंतर इ. सन १५६७ साल उजाडेपर्यंत आणि त्या सालात लोटली येथे श्रीरामनाथाच्या देवालयाच्या इमारतीस रायतूरचा किल्लेदार कॅप्टन दियोगु रोद्रिगीस आग लावण्याचा प्रसंग प्रत्यक्षात येईपर्यंत, त्या देवालयाचे कुळावी आणि लोटलीचे रहिवाशी निर्धास्त, स्वस्थ, सात वर्षांचा काल पर्यंत राहिले असतील हे पूर्णपणे अशक्य कोटीतले आहे, असे कोणासही निःसंशयपणे वाटणे साहजिकच आहे आणि मला तरी निःसंशयपणे खचितच वाटते.

लोटली येथे देवस्थान असताना तेथे कोणकोणती दैवते होती ?

लोटली येथे हे देवस्थान असताना तेथे जी दैवते होती, याचा पुरावा मिळतो ती नावे अशी : श्रीरामनाथ, श्रीवेताळ, श्रीग्रामपुरुष, श्रीभगवती, श्रीसांतेरी, श्रीनारायण, श्रीकार्यसांतेरी, श्रीसिध्दनाथ, श्रीदेव आणि श्रीवामनियो, अशी एकंदर दहा दैवते होती. व त्या सर्वाचा खर्च लोटली गावची ग्रामसंस्था म्हणजे कोमुनिदाद त्या काली करी. याचा पुरावा लोटली कोमुनिदादीच्या प्राचीन दप्तरासंबंधित लिखाणात आहे.

लोटली गावच्या ग्रामसंस्थेत २५ वांगड ब्राम्हण ज्ञाती समाजाचेच होते, व त्यात "केणी" "शेणवी" "नाईक" उपनावाचे गावकार होते, अशी ही माहिती त्या दप्तरात आढळते. लोटली गावात वरगाव नामक वाड्यावर श्रीरामनाथ इत्यादि दैवतांची देवालये होती पण, सध्याच्या कालात त्या भागात पाहणी केल्यास निश्चितपणे अमुकच जागेवर श्रीरामनाथाचे देवालय होते हे सांगता येत नाही. देवालयाच्या इमारतीचे ओळखण्यासारखे अवशेष आता तेथे दिसत नाहीत.

श्रीरामनाथ देवस्थानात आजच्या कालात ज्या श्रीकामाक्षी देवीचा समावेश आहे त्या श्रीकामाक्षी देवीचे देवालय लोटली येथे श्रीरामनाथादि दैवतांची देवालये ज्या भागात वरगाव नामक वाड्यावर होती, तेथे नव्हते व ते तेथून अंदाजे दीड मैल अंतरावर 'वार्से' नामक वाड्यावर होते असे सांगतात. पण, तेथे पाहू गेल्यास त्या देवालयाचे अवशेष नाहीत. पण, त्या जागी खिस्ती धर्मीयांचे एक लहान चर्च आहे.

लोटली गावात ज्या ठिकाणी श्रीरामनाथ देवाचे देवालय असावे असा अंदाज केला जातो, त्या जागेवर तेथे त्या देवाच्या कुळावी भक्तगणानी एक श्रध्दापूर्वक चबुतरा सारखा, जमिनीपासून साधारणपणे दीड मिटर उंच, चौकोनी खांब आणि त्यावर एक हात लांब, एक हात रुंद आणि एक हात उंच अशा साधारणपणे आकाराची चोहोबाजूनी आरसे बसविलेली पोकळ पेटी असून त्यात नारळ, फुले व पितळेची समईवजा लामणदिव्यासारखी तेलाच्या दिव्याची सोय केलेली दिसते. त्या चबुतरा किंवा खांबावर "प्रसाद पेटी" अशी अक्षरे आहेत.

लोटली येथे श्रीरामनाथ देवालयाच्या आद्य स्थानात ओळख पटण्यासारखे काही अवशेष नाहीत. एक दोन काळ्या पाषाणाचे दगड तेथे दिसतात. त्या लोटली येथील श्रीरामनाथ देवालयात, त्याकाली एक काळ्या पाषाणाचा नंदी होता, तो त्या आद्य स्थानात असणे साहजिक आहे.

पण, नंतरच्या काळात गोमंतकातील ऐतिहासिक वस्तुसंग्रह जुन्या प्राचीन मूर्ती मोडतोड केलेल्याचा भरणा एका म्युझियमात जुने गोवे (ओल्ड गोवा) येथे 'बों झेझुस'च्या कन्वेंटमध्ये करण्यात आला आणि त्यात तो नंदी होता असा पुरावा आहे.

नंतरच्या कालात गोमंतकात "कोमिसांव पेर्मानेंती दे आर्कियोलोजिय" या नावाची सरकारने संस्था स्थापन करून त्यात ऐतिहासिक सर्व वस्तुसंग्रह असावा असे ठरवून, त्या कोमिसांव पेर्मानेंतीने संबंधित सर्व वस्तूंचा ताबा घ्यावा असे कायद्यानेच ठरविल्यामुळे बों झेझुसच्या म्युझियम मध्ये असलेल्या

वस्तूंच्या यादीसह रिपोर्ट ता. २४ फेब्रुवारी १९३६ रोजी त्या कोमिसांव तर्फे त्याच्या अध्यक्षसाहेबानी कं. वा. आंतोनिय् बेर्नार्द ब्रागांस पेरैर या पणजी हायकोर्ट जज्जानी गोव्याच्या सर गव्हर्नर जनरलाना सादर केला.

या रिपोर्टच्या यादीत काळ्या दगडाच्या वस्तूंचा नामनिर्देश असून Um boi de Loutulim de Salcete (एक बैल सासष्टीच्या लोटलीतील) असा उल्लेख त्यात आहे.

हा म्युझियम नंतर जुने गोवे येथेच म्युझियम 'सां. कायतान्' या कन्व्हेंट मध्ये नेण्यात आला आणि तो नंदी तेथे होता. सद्यः कालात तो त्या कन्व्हेंट मध्ये किंवा त्या म्युझियमच्या काही वस्तू जुने गोवे येथेच कन्व्हेंट "सां फ्रांसिस्क दे आस्सीज" येथे असलेल्या म्युझियमात स्थलांतर करून सरकारी म्युझियमातच आहेत त्यात असावा, किंवा आता गोवा सरकारने पुरातत्व विभागासाठी पणजी शहरात नवी मोठी इमारत बांधली असून, त्या नव्या स्पेशल इमारतीत सर्व ऐतिहासिक वस्तूचा एकत्र संग्रह असणे योग्य असे योजिल्यामुळे जुने गोवे येथील पुराण ऐतिहासिक प्राचीन वस्तू पणजी येथील नव्या इमारतीत स्थलांतर, हा लेख प्रसिध्द होईपर्यंतच्या कालात होतील किंवा कसे हे या घटकेस निश्चितपणे सांगता येत नाही.

बांदिवडे येथे श्रीरामनाथ देवस्थानात कोणती दैवते स्थापित आहेत ?

प्रमुख देवालयाच्या गर्भागारात मागच्या भिंतीस उच्चासनी मध्यभागी **श्रीलक्ष्मीनारायण**, गर्भागाराच्या मध्यभागी **श्रीरामनाथ** प्रमुख देवालयातील उजवीकडच्या मंदिरात गर्भागारात **श्रीकामाक्षी देवी**, आणि डावीकडच्या मंदिरात गर्भागारात **श्रीशांतादुर्गा देवी** व तिच्या उजव्या बाजूस गर्भागाराच्या बाहेर **श्रीसिध्दनाथ**.

प्रमुख देवालयाच्या बाहेर उजव्या बाजूकडे एक नवे सुंदर आकर्षक टुमदार मंदिर बांधले असून त्यात एकमेकाच्या शेजारी दोन गर्भागारे आहेत. त्यापैकी एकात **श्रीबेताळ** आणि दुसऱ्यात **श्रीकाळभैरव** आहे.

श्रीरामनाथ दैवताचे प्रमुख मंदिरात गर्भागाराच्या मध्यभागी श्रीशिवलिंग असून, बाकी इतर दैवतांच्या मूर्ती आहेत व त्या सर्वाची महापूजा करताना, त्या प्रत्येकावर चांदीचे कवच घालून शृंगार केला जातो. श्रीशिवलिंग आणि मूर्ती सर्व एकंदर काळ्या पाषाणाच्या आहेत. श्रीसिध्दनाथाचेही लिंगरूपी दैवत असून त्यावरही कवच घालतात.

श्रीनंदिकेश्वर दैवताचे स्थलांतर श्रीरामनाथ दैवताच्या लिंगाजवळच गर्भागारात

गोमंतकात ठिकठिकाणी जी शिवलिंगरूपी दैवते आणि त्यांची देवालये आहेत, त्या सर्वातच श्रीनंदीची स्थापना देवालयात श्रीशिवलिंगरूपी दैवताच्या समोरासमोरच केलेली आणि तीही पाषाणी नंदी स्थापना रूपात आढळते. खुद्द बांदिवडे येथेही श्रीनागेश देवस्थानात श्रीनागेश या श्रीशिवलिंगरूपी प्रमुख दैवताच्या समोरासमोर देवालयाच्या सोंड्यावर मध्यभागी भला मोठा गोजिरवाणा पाषाणी नंदी पुराणकाल दैवत स्थापना कालापासूनचा आहे.

तसाच पाषाणी नंदी, या श्रीरामनाथाच्या मूळ जुन्या देवालयातही पुरातन कालापासूनच होता. पण, इ. स. १९०५ साली नव्या देवालयाची इमारत बांधणी पूर्ण होऊन, त्यात शके १८२६ क्रोधी नामसंवत्सर फाल्गुन शुक्ल १० मी, गुरुवार ता. १६ मार्च १९०५ रोजी नवीन देवालयाच्या इमारतीचे उद्घाटन आणि त्यात पुनर्वसु या शुभनक्षत्र सुमुहूर्तावर या नूतन देवालयात श्रीरामनाथ, श्रीलक्ष्मीनारायण, श्रीशांतादुर्गा, श्रीकामाक्षी या दैवतांची मोठ्या थाटात प्रतिष्ठापना केली गेली, त्यावेळी श्रीरामनाथाच्या देवालयाच्या जुन्या इमारतीत जो पाषाणी नंदी होता, तो तेथून हलविला गेला, आणि त्या मूळ पाषाणी नंदी ऐवजी दुसरा पाषाणी नंदी, त्या मानाने अगदी लहान आकाराचा, गोजिरवाणा, प्रमुख गर्भागारात श्रीरामनाथ लिंगाच्या जवळच ठेवण्यात आला असून, त्यावर महापूजेचे वेळी चांदीचे सुंदर कवच घालण्यात येते.

त्यामुळे पाहणाऱ्याना तो नंदी चांदीचा आहे असा भास होतो. सध्या जी श्रीरामनाथ देवालयाची नवी भव्य इमारत इ. सन १९०५ साली उद्घाटन केलेली आपण पाहत आहोत, त्यापूर्वी श्रीरामनाथादि दैवतांची स्वतंत्र वेगवेगळी निरनिराळी मंदिरे त्याच ठिकाणी आसपास होती. श्रीकामाक्षी देवीचे देवालय सर्वाच्या उजवीकडे, त्याचे डावे बाजूस श्रीलक्ष्मीनारायणाचे देवालय व त्याच्या डावीकडे श्रीशांतादुर्गा व श्रीरामनाथ यांचे जोड देवालय अशी रचना होती. आणि या श्रीरामनाथाच्या देवालयात पाषाणी नंदीची स्थापना होती. प्रस्तुतच्या नव्या इमारतीत प्रमुख एकाच गर्भागारात मध्यभागी श्रीरामनाथ (लिंग) त्याच्या मागे उच्च स्थानी श्रीलक्ष्मीनारायण दैवतांची प्रतिष्ठापना केलेली असून, श्रीकामाक्षीदेवीची स्थापना त्याच देवालय इमारतीत उजवीकडील वेगळ्या स्पेशल गर्भागारात आणि श्रीशांतादुर्गा देवीची स्थापना त्याच मुख्य इमारतीच्या डाव्या बाजूकडील वेगळ्या स्पेशल गर्भागारात केलेली आहे. अशी ही सद्यःकालिन रचना आहे.

नूतन देवालय इमारतीपुढे भव्य कौशल्यपूर्ण आकर्षक नवा सभामंडप

आजच्या कालात देवालयापुढे जो भव्य, कलाकौशल्यपूर्ण सिमेंट काँक्रीटचा सभामंडप रंगमंचासह, महिला प्रेक्षकांसाठी बसण्यास गॅलरीच्या सोयीसह, आणि एवढ्या मोठ्या आकाराच्या सभामंडपात एकही खांब मध्ये नसताना ते बांधकाम दिसते आहे, ते बांधकाम अगदी चित्तवेधक, सुंदर, आकर्षक, असा तो एक आधुनिक शिल्पशास्त्राचा उत्कृष्ट नमुनाच म्हणावे लागेल. आणि असा एवढ्या आकाराचा, अशा नमुन्याचा सभा मंडप अद्यापपर्यंत तरी गोमंतकातील कोणत्याच देवस्थानात नाही. खुद्द श्रीरामनाथ देवस्थानातही त्या जागी प्रतिवर्षी प्रासंगिक मंडप उभारण्याची पध्दत होती. ही अडचण व उणीव दूर करण्याच्या सद्हेतूने, त्या दैवताच्या एका भाविक व श्रध्दावान कुळावी महाजन कुटुंबातील, पणजी शहरात राहणारे आज वै. वा. श्री. अनंत विश्वनाथ केणी, वै. वा. पुरुषोत्तम रामनाथ केणी आणि त्या दोघांचे बंधू यांनी आपल्या दिवंगत पूर्वजांच्या (श्री. पुंडलिक अंता केणी, श्री. रामनाथ अंता केणी आणि श्री. विश्वनाथ अंता केणी) यांच्या पुण्यस्मरणार्थ आणि त्यांच्या हयातीतील संकल्प पूर्तीसाठी, हा सभामंडप स्वखर्चाने बांधून घेऊन, श्रीरामनाथ दैवताच्या चरणी अर्पण केलेला आहे.

या सभामंडप बांधणीचा शिलान्यास इ. स. १९५० साली अक्षय्य तृतियेच्या शुभमुहूर्तावर श्रीगोकर्ण पर्तगाळी मठाधीश श्रीमत् द्वारकानाथतीर्थ श्रीपाद वडेरस्वामी महाराजांच्या शुभ आणि पवित्र हस्ते होऊन ते संपूर्ण बांधकाम, बरोबर एकाच वर्षाच्या आत पूर्ण करून घेण्यात येऊन, त्या सभामंडपाचे उद्घाटन इ. स. १९५१ च्या अक्षय तृतियेच्याच शुभमुहूर्तावर मोठ्या समारंभात पार पाडण्यात आले.

नगारखाना

या नगारखान्याची बांधणी इतर देवस्थानातील नगारखान्यापेक्षा जरा वैशिष्ट्यपूर्ण आहे. त्याची बांधणी पूर्ण झाल्यानंतर इ. स. १९३४ यावर्षी मे महिन्यात त्याचे उद्घाटन झाले. या बांधणीचा सर्व खर्च त्या देवस्थानचे श्रध्दावान कुळावी महाजन, राजकोट येथील बॅरिष्टर श्री. परशुरामराव मसुरेकर यानी स्वयंस्फूर्तीने केला.

सुसज्ज सर्व सुखसोयीयुक्त भव्य आकर्षक अग्रशाळा

जुन्या काली देवालयाच्या उजव्या बाजूकडे एक अग्रशाळा, कुंभारजुवे येथील त्या देवस्थानचे महाजन श्री. घोडेकार यानी, डाव्या बाजूकडे थोरले गोवे येथील महाजन श्री. जुंवारकर आणि त्यापुढील अग्रशाळा वेळ-सांव येथील महाजन श्री. मळये यांनी स्वखर्चाने बांधूनदेवस्थानास अर्पण केल्या होत्या. त्या अग्रशाळा कालांतराने फार जीर्णावस्थेस पोहोचल्या.

दिवसेंदिवस महाजन व यात्रेकरूंची गर्दी फार, यामुळे त्यांच्या वास्तव्यास फार अडचणी व गैरसोयी अनुभवू लागल्या, आणि नव्या अग्रशाळा बांधणीचीनिकटीची जरूरी भासू लागली.

देवस्थानचे महाजन एकत्र येऊन त्यानी देवस्थान आणि देवस्थानचे भाविक महाजन, भक्तगण यांच्या सांपत्तिक सहकार्याने श्रीरामनाथ देवालयाच्या तीनही बाजूनी भव्य, उंच, सुशोभित आणि सर्व सोयीयुक्त नमुनेदार अग्रशाळा बांधून त्यात मोठे हॉल, सभागृह यात्रेकरूसाठी वेगवेगळे स्पेशल वसतीसाठी ब्लॉक, मंगलकार्यासाठी लागणारे हॉल, स्नानादि कार्याची चोख व्यवस्था, पाणी आणि वीजेसह स्वैंपाक आणि भोजन समारंभासाठी आरामशीर हॉल, श्रीस्वामीजींचा देवस्थानात मुक्काम झाल्यास त्यांची वेगळी सर्व खास व्यवस्था आणि याशिवाय, प्राकाराच्या बाहेर वेगळी उपहारगृह, खाणावळ वगैरेची व्यवस्था, इतक्या बारकाईने केलेली आढळते की, कोणत्याही क्षणी कसलेही एक किंवा जास्त मंगलकार्य एकाच वेळी करता येतील.

धार्मिक, सामाजिक, सांस्कृतिक समारंभ सहजासहजी पार पाडण्यास सर्व अनुकूलता अशा प्रकारे सर्वच कायापालट त्या देवस्थानात केलेला दिसतो. या सर्वाशिवाय प्राकारात देवालयाच्या उजव्या बाजूकडे एक चांगली सोयीस्कर पध्दतीची यज्ञशाळा बांधलेली असून त्यात होमहवनादि यज्ञासाठी, शास्त्रोक्त पध्दतीने कुंड ही तयार आहे. आणि इतर सर्व असूनही सर्वकडे चोख व्यवस्था आणि टापटीप आणि मंदिरात व बाहेर उल्लेखनीय नेत्रदीपक स्वच्छता तेथे पाहण्यास मिळते. अशी स्वच्छता या श्रीरामनाथ देवस्थानात आणि श्रीनागेश देवस्थानात या दोन देवस्थानाशिवाय, त्या नमुन्याची इतरकडे कोठेच दिसत नाही ही सत्य वस्तुस्थिती आहे.

या साठी त्या दोनही देवस्थानातील सर्व सेवेकरी आणि त्यावर जातीने देखरेख ठेवून दक्षतेने काम करून घेण्याची जबाबदारी ओळखणारी व्यवस्थापक मंडळे, यांचे अभिनंदन कोणीही निर्विकार आणि निःपक्षपाती इसम, त्या देवालयास भेट देणारा आणि ही अशी सत्य वस्तुस्थिती अनुभवणारा खचितच केल्याशिवाय कसा राहील ?

देवालयाचे कुळावी महाजन कोण ?

या देवस्थानचे कुळावी महाजन वत्स आणि कौंडिण्य अशा दोनच गोत्रातील काही कुटुंबाचे, माध्व सांप्रदायी गौंड सारस्वत ब्राम्हण असून, त्यांच्या कुटुंबाची उपनावे खालील प्रमाणे आहेत :–

अवदी, आचार्य, कवळेकर, कळंगुटकर, कापडी, कांदोळकर, कामत, कारे, किर्तने, कुंकळ्येंकर, केणी, केणी खांडेकर, केणी रोबल, कोसंबे, खरंगटे, खोत, घोटिंग, घोडेकार, चित्ताल, जुवारकार, तळावलीकर, दलाल नाईक (नायक), नाईक बुर्ये, पापड, पै, पै आंगले, पै थोटे, पै बुडबुडे, पै भले, पै लोटलीकर, शेणै लोटलीकर, फोंस, बरड, बळि, बिचे (बिच्चू), बेणे, बोरकर, भट, भट मठकार, भट फोंडेकार, भंगे (भांगी), भांडये, मथा मळ्ये, मावजे, मावजेकर, मिर्ये, मुरकुंडे, (मुरकुंडी), राताबोले, विजींनकर, शेट्ये, शेणवीं शेट्ये, सडेकर, सरमळकर, सांकव, सांबारे (सांबारी), शेणवीं शिलिमखान, सुकरेकार, नाईक सुकरेकार, शानभाग, पै कोचीकर, शेणै, महाले, सिनकर, मसुरेकर इत्यादि असून शिवाय,

उपासक खालील उपनावाचे आहेत

द्रविड ब्राम्हण : बुखले (बखले), तोटेकार, करडे, खिणकार हे श्रीशांतादुर्गा देवीचे उपासक आणि,

दैवज्ञ ब्राम्हण : लोटलीकर (शेट लोटलीकर) हे श्रीरामनाथ व श्रीवेताळ देवाचे उपासक आहेत.

शिबिकोत्सव साप्ताहिक, पाक्षिक आणि मासिक

श्रीरामनाथ देवाची पालखी प्रती सोमवारी रात्रौ सुमारे ८॥ वाजता निघते व देवालया सभोवार प्रदक्षिणा करून परत देवालयात येत असते. मात्र नवरात्रातील सोमवारी ही पालखी निघत नाही.

श्रीलक्ष्मीनारायण देवाची पालखी प्रत्येक महिन्याच्या शुक्ल आणि वद्य १० मी दिवशी रात्रौ सुमारे ८॥ वाजता निघून देवालया सभोवार प्रदक्षिणा करून देवालयात परत येते.

पालखी खांद्यावरून वाहविण्याचे काम फक्त ब्राम्हण मंडळीनेच केले पाहिजे. चातुर्मासात ही पालखी निघत नाही.

श्रीशांतादुर्गा देवीची पालखी प्रत्येक महिन्याच्या शुक्ल आणि वद्य पंचमीस रात्रौ अंदाजे ८॥ वाजता निघून देवालया सभोवार प्रदक्षिणा घालून देवालयात परत येते. मात्र नवरात्रातील पंचमी रोजी ही पालखी निघत नाही.

श्रीकामाक्षी देवीची पालखी प्रती अमावास्ये रोजी रात्रौ अंदाजे ८॥ वाजता निघून देवालया सभोवार प्रदक्षिणा घालून देवालयात परत येते.

प्रत्येक दैवताच्या पालखीच्या उत्सवात देवालया सभोवार प्रदक्षिणा करताना वाटेत ८ पेणी (मुक्काम) करतात.

श्रीकामाक्षी देवीचे दर्शन श्रीपांडुरंगाच्या वेशात !!

प्रत्येक महिन्याच्या शुक्ल आणि कृष्ण पक्षाच्या एकादशी तिथी दिवशी श्रीकामाक्षी देवीच्या गर्भागारात आसनस्थ असलेल्या मूर्तीस पंढरीच्या श्रीपांडुरंगा सारखा वेश (पेहराव) श्रृंगार करून "कर कटावरि ध्यान" या रूपाने दर्शन घडते.

याबद्दल अशी आख्यायिका सांगतात की, या श्रीकामाक्षी देवीचा संस्थापक अग्निमुख शर्मा हा पंढरीचा वारकरी होता. तो नियमितपणे दर वर्षी पंढरपुरास आषाढी आणि कार्तिकी एकादशी यात्रेसाठी जात असे. वार्धक्यामुळे पुढे ही यात्रा व प्रवास करणे त्याला होईनासे झाले व तो तळमळू लागून त्या यात्रेच्या दिवशी अनन्य भावे श्रीविठ्ठल चिंतन. व भजन अहोरात्र करता करता, त्याला तेथेच झोप लागली व स्वप्नात श्रीपांडुरंगाने दर्शन दिले व सांगितले की, असा तळमळू नकोस. यापुढे अगत्याने प्रत्येक एकादशीसच मी तुला तुझ्या श्रीकामाक्षी देवीतूनच माझे दर्शन घडवीन, काळजी करू नकोस. त्याप्रमाणे त्याला खरोखरच दर्शन घडू लागले ! आणि तेव्हा पासून आता दर एकादशीस ते तसे भक्तगणास घडविण्याची प्रथा सुरू झाली आणि खरोखरच ते श्रीविठ्ठदर्शन भाविकांस फार मोहक दिसते.

या देवस्थानात महापर्वणी महोत्सव

या देवस्थानात वार्षिक महापर्वणी महोत्सव माघकृष्ण द्वादशीस सुरू होऊन फाल्गुन शुध्द द्वितीये पर्यंत चालतो. या महोत्सवात पालखी, लालखी अशा निरनिराळ्या वाहनातून दैवतांच्या मिरवणुकी होत असतात. त्यात महाशिवरात्रीच्या दुसऱ्या दिवशी पहाटेची व संध्याकाळची श्रीरामनाथ देवाच्या रथोत्सवाची मिरवणूक फार मजेदार असते. इतर अनेक कार्यक्रमाप्रमाणेच रात्रौंच्या वेळी नाट्य प्रयोग फार सुंदर असतात. फाल्गुन वद्य द्वितियेचे रात्री रौप्य शिबिकोत्सव चांगल्या नमुनेदार नक्षी कारागिरी केलेल्या रौप्य शिबिकेतून साजरा केला जातो.

प्रसाद

आपआपल्या कुलदैवतांकडून वेळ प्रसंगी काही अज्ञात गोष्टी संबंधी सल्ला घेण्याची वहिवाट श्रध्दावान लोकात आहे. हा सल्ला प्रसाद घेऊन ठरवितात.

असे प्रसाद घेण्याची वहिवाट या श्रीरामनाथ देवस्थानातही आहे. या देवस्थानात ही प्रसादपूजा करमल झाडाच्या पानाचे तुकडे करून लावतात. श्रीरामनाथ देवास प्रसाद लावताना ही प्रसाद पूजा करमल झाडाच्या हिरव्या म्हणजे न पिकलेल्या पानाचे तुकडे करून लावतात. आणि इतर दैवतास म्हणजे श्रीसांतेरी, श्रीकामाक्षी, किंवा श्रीवेताळ याना प्रसादपूजा करमल झाडाच्याच पानाचे, पण पिकलेल्या म्हणजे रंगाने पिवळी झालेल्या पानाचे तुकडे करून लावतात. तसेच, ही प्रसादपूजा श्रीरामनाथ देवास लावताना गर्भागारात

जे श्रीरामनाथ देवाचे लिंग प्रतिष्ठापित आहे. त्या लिंगाची जी खाली संगमरवरी शुभ्र पाषाणाची बैठक आहे, त्या बैठकीस पुढच्या दर्शनी भागास मधोमध लावतात, आणि त्या प्रसादपूजेस जे करमल झाडाच्या हिरव्या पानाचे तुकडे लावतात, ते एकंदर ५२ तुकडे ठरलेल्या ठिकीठिकाणी एक प्रमाणे ५२ ठिकाणी लावतात.

श्रीसांतेरी देवीस प्रसादपूजा एकंदर ४४ तुकडे, पिकलेल्या पानाचे, श्रीकामाक्षी देवीस एकंदर ५२ तुकडे, आणि श्रीवेताळ देवास एकंदर ४८ अशा प्रकारे पानाचे तुकडे वापरण्याची वहिवाट आहे.

प्रसादाची परिभाषा किंवा अर्थ खुलासेवार प्रत्येक पाकळी प्रसाद झाल्यावर, प्रसादपूजा लावणारे भटजी, पूर्वापार चालत आलेल्या अनुभवाप्रमाणे सांगतात. प्रसाद-कौल घेणे हा विषय ज्याच्या त्याच्या भावनेचा आणि श्रध्देचा आहे.

ज्यास दृढ श्रध्दा आणि पूर्ण विश्वास असेल, त्यास त्या प्रसादाची निश्चितपणे खात्रीपूर्वक प्रचिती येते. आणि ते तसे नसते, तर ते प्रसाद-कौल घेणाऱ्याची रीघ गर्दी वारंवार तेथे दिसते ती दिसली नसती हे उघड आहे.

त्या देवस्थानात हे प्रसाद शुक्ल आणि वद्य एकादशी. अमावास्या, वार्षिक सार्वजनिक महोत्सवाचे दिवस, चंद्र, किंवा सूर्य ग्रहणाचे दिवस खेरीज करून इतर दिवशी हे प्रसाद घेण्याची वहिवाट तेथे आहे.

सबंध वर्षात प्रसाद कोणकोणत्या तिथी महिन्यात घेण्याची वहिवाट नाही ते दिवस खाली दिले आहेत.

विशेश सूचना : श्रीरामनाथ देवास कोणत्याहि दिवशी ११ वाजल्यानंतर प्रसाद लावणे वर्ज्य.

प्रत्येक सोमवारी दुपारच्या महाआरतीपूर्वी सर्व देवास प्रसाद लावणे वर्ज्य.

प्रत्येक शुक्ल किंवा कृष्ण पंचमी दिवशी श्रीसांतेरी देवीस प्रसाद लावणे वर्ज्य.

खालील तिथी महिन्यात सर्वच दैवतास प्रसाद लावणे वर्ज्य आहे

चैत्र :

शुक्ल १ दा; ९ मी-११ शी; कृष्ण ७ मी; ११ शी; अमावास्या.

वैशाख :

शुक्ल ३ या; ११ शी; १४ शी; १५ मा; कृष्ण ११ शी; अमावास्या.

ज्येष्ठ :

शुक्ल ११ शी; कृष्ण २ या;, ११ शी; अमावास्या.

आषाढ :

शुक्ल १ कर्क संक्रांत, १५ मा; कृष्ण ११ शी; अमावास्या.

श्रावण :

शुक्ल ११ शी; १५ मा; कृष्ण पंचमी पासून एकादशीपर्यंत; अमावास्या.

भाद्रपद :

शुक्ल ३ या; ४ थी; ५ मी; ११ शी; १४ शी; कृष्ण ११ शी; अमावास्या.

आश्विन :

शुक्ल १ दा पासून १२ शी; पर्यंत; कृष्ण ११ शी; १४ शी; अमावास्या.

कार्तिक :

शुक्ल ११ शी; १२ शी; १४ शी; कृष्ण १ दा; २ या; ११ शी; अमावास्या.

मार्गशीर्ष ;

शुक्ल ११ शी; कृष्ण ११ शी; अमावास्या.

पौंष :

शुक्ल १० मी; ११ शी; १५ मा; मकर संक्रांत; कृष्ण ११ शी; अमावास्या.

माघ :

शुक्ल ११ शी; कृष्ण ११ शी पासून अमावास्या पर्यंत.

फाल्गुन :

शुक्ल १ दा; २ या; १० मी; ११ शी; १५ मा; कृष्ण १ दा पासून ६ ष्ठी पर्यंत; ११ शी; अमावास्या.

चंद्रग्रहण--सूर्यग्रहण, **दिवसात** प्रसाद घेणे वर्ज्य आहे.

देवस्थानची घटना नियमावली

या देवस्थानची घटना नियमावली जिला "कोंप्रोमिस" अशा नावाने ओळखण्यात येते, ती नियमावली पोर्तारीय नंबर १६३ ता. १४ जुलै १९०९ या सरकारी मंजुरी हुकुमाने पास होऊन ती गव्हर्नमेंट ग्यॉझेट-बोलेती ऑफिसियाल, नंबर ५४ ता. १९ जुलै १९०९ रोजीच्या अंकात प्रसिध्द झाली. नंतर त्यात काही दुरुस्ती फेरफार करून ती, पोर्तारीय नंबर ४१६९ ता. १० जानेवारी १९४६ या सरकारी हुकुमाने पास होऊन ती गव्हर्नमेंट ग्यॉझेट-बोलेती ऑफिसआल नंबर २ ता. १० जानेवारी १९४६ च्या अंकात प्रसिध्द झालेली आहे.

१

श्रीकामाक्षी देवस्थान

शिरोडें

काउराहून गोमंतकांत सासष्टीच्या राय गावांत येऊन प्रसन्न झालेली देवी जिचें नंतर फोंडा महालांत स्थलांतर होऊन शिरोडें येथे उदयास आलें तें सुप्रसिद्ध देवस्थान.



श्रीकामाक्षी, शिरोडा

श्रीकामाक्षी देवालय, शिरोडा

श्रीकामाक्षी देवस्थान

देवभूमी गोमंतकांत नानाविध देवदेवतांनी आपआपल्या भक्त रक्षणार्थ वेळप्रसंगीं अवतरून दुष्टांचें निर्दालन करून शांतता प्रस्थापित केली त्यांतीलच एक रै क्षेत्रवासी श्रीकामाक्षी देवी होय. रै म्हणजे सध्याचा राय हा गांव सासष्टी तालुक्यांतील आहे. श्रीकामाक्षी देवी आपल्या कोण भक्ताच्या कसल्या संकट निवारणासाठी आणि कोणाच्या निर्दालनासाठी कोणाला प्रसन्न झाली ही माहिती किंवा कथाभाग जिज्ञासू वाचकांस कळण्याची उत्सुकता असणें अगदी स्वाभाविकच आहे. ही माहिती फक्त स्कन्द पुराणाच्या सह्याद्री खंडांत आढळते. सह्याद्री परिसराचें, विशेषतः गोमंतकाचें, तीर्थक्षेत्र दृष्ट्या प्राचीन इतिहासाचें एकमेव साधन ह्या दृष्टीने, सह्याद्रि खंडाचें महत्त्व वादातीत आहे. त्यांत सह्याद्रिच्या परिसरांत वास करणाऱ्यांची माहिती आलेली असून, शिवाय, त्यांत प्राचीन समाजाच्या आचारविचारांची, चालीरितींची व देवस्थानांची विस्तारपूर्वक नोंद असल्याने या पौराणिक ग्रंथाला थोडेसें सांस्कृतिक इतिहासाचें स्वरूप प्राप्त झालें आहे. सप्तकोंकणांत स्थायिक झालेल्या मानववंशावर लक्ष केंद्रित करणारा आणि भौगोलिक, सामाजिक, देवस्थानांचा व तीर्थस्थानांचा इतिहास सांगणारा, हा एकमेव प्राचीन पुराणग्रंथ आहे. भारतीय पुराणांच्या समृध्द परंपरांत स्कंद पुराणांतर्गत सह्याद्रि खंडाचें स्थान फार वरचें आहे. प्राचीनतेच्या दृष्टीने त्याची तुलना काशी, कांची, अवन्तिकेच्या तोलाची व मोलाची आहे. या साऱ्यामुळे या ग्रंथाला सांस्कृतिक, वाङ्मयीन तसेंच इतिहास संशोधनाच्या दृष्टीने वेगळें व आगळें असें सर्वांगीण महत्व आहे. अशा या फार महत्वाच्या ग्रंथांत 'कामाक्षी माहात्म्यम्' असून त्याचे एकंदर चार अध्याय संस्कृत भाषेंत मूळ ग्रंथांत आहेत. आणि नंतरच्या कालांत त्यांचें मराठी भाषांतरही उपलब्ध आहे. स्कंद पुराणाचा काल इतिहासदृष्ट्या आजपासून साडेचार हजार वर्षांपूर्वीचा ठरतो असें त्याचा अभ्यासू दृष्टीनें विचार केलेल्या विद्वान नामवंतांचें मत आहे. सध्याच्या कालांत, श्रीकामाक्षी देवीचें देवालय फोंडा तालुक्याच्या शिरोडें गावांत आहे. तें देवालय मूळ सासष्टी तालुक्याच्या राय गावांत होतें तें इसवी सनाच्या सोळाव्या शतकांत फोंडा तालुक्याच्या तत्कालीन आदिलशाहीच्या राज्यांत स्थलांतर करून आणावें लागलें त्याचीं कारणें, तसेंच स्थलांतरपूर्व कालांत राय येथें तें देवस्थान असतांना तेथें कोणकोणत्या देवतांची स्थापना होती, आतां स्थलांतरानंतर शिरोडें येथें कोणकोणती देवतें स्थापित आहेत, वगैरे सर्व माहिती पुढें येईलच. पण, त्यापूर्वी 'कामाक्षी माहात्म्यम्' मधील चारही अध्यायांतील सविस्तरपणें माहिती येथें देणें स्थलाभावामुळें पूर्णपणें अशक्य आहे म्हणून, संक्षिप्तपणें अगदीं अत्यावश्यक तेवढीच माहिती वाचकांपुढें ठेवण्याचा प्रयत्न करूं.

एकदां नृपश्रेष्ठ अम्बरीषानें नारदमुनीला प्रश्न केला कीं, महिषासुरमर्दिनी ही कोणत्या देवीची शक्ती आहे ? रै हें क्षेत्र कसें निर्माण झालें ? आणि कामाक्षी कोण देवी आहे, हे मला सांग. अंबरीष राजाचे वचन ऐकून रै क्षेत्रवासी कामाक्षीची कथा सांगण्यास नारदाने आरंभ केला. नारद म्हणाला : क्षीराब्धीच्या पश्चिम तीरावर रै (सध्याचा राय) नांवाचा एक संपन्न गांव आहे. कुबेराच्या उपवनाप्रमाणें तें बेट शोभत होतें, कारण तें जगत्पति विष्णूचे अधिष्ठान होतें. तसेंच भवानीपति हर हे ईश्वर या नावानें व कमलापति हरि हे नारायण या नांवानें भक्तरक्षणार्थ तेथें वास करीत होते. त्यांचें रक्षण करण्यासाठी भैरव व पुरुष हे दोन बलवान दूतही तेथें रहात होते. त्या गावांत अग्निमुख नांवाचा एक श्रेष्ठ ब्राम्हण रहात असे. तो सहकुटुम्ब गृहस्थ धर्मांत तत्पर व तपस्वी होता. ह्या सत्यनिष्ठ व अजात-

शत्रू ब्राम्हणाला गुणाकार नांवाचा मुलगा होता. बालपणांत त्या पितृभक्त मुलाचा व्रतबंध झाला होता. तो अग्निमुख ब्राम्हण उच्छवृत्तीनें उपजीविका करून हरिहरांची पूजा-अर्चा करीत असे. विष्णुसूक्तें व सहस्त्रनाम यांचें पठन करून त्यानें नारायणाला संतुष्ट केलें. त्यामुळें, त्याला रमापति विष्णूचा साक्षात्कार होत असे. एकदां त्याचा पुत्र सीमधा व दर्भ आणण्यासाठी जवळच्या वनांत गेला होता. पण त्याला दर्भ, सीमधा मिळाल्या नाहीत म्हणून पित्राज्ञा प्रमाण मानून तो घोर वनांत गेला. त्या वनांत सिंह, वाघ, रानडुक्कर, माकडें वगैरे हिंस्र पशूंचा सुळसुळाट होता. पुष्कळ फिरून झाल्यावर भयभीत होऊन तो मंत्र म्हणत घराकडे येऊं लागला. तोंच त्याला एक महाबलवान दैत्य दिसला. तो महिषासुराचा कानीन पुत्र प्रीतमहिषासुरच होता. तो दैत्य दिसण्यांत भयानक होता. त्या विप्रपुत्र बाल गुणाकाराला लगेच त्या राक्षसानें आपल्या मांसगंधी मुखानें त्या बाळाचा घांस घेतला व त्याच्या दर्भसमिधा घराच्या आसपास टाकून दिल्या. मुलाचा पिता आपला मुलगा अजून घरीं कां आला नाही अशी चिंता करीत त्याच्या शोधासाठी वनांत गेला. जेथें दैत्य रहात असें तेथे तो पोंचला. पण तेथें त्याचा मुलगा दिसला नाही म्हणून त्यानें ह्या दर्भ-समिधा येथें कोणी टाकल्या ? माझा पुत्र गुणाकर तुला आढळला का ? अशी चौकशी त्या दैत्याकडे करतां, तो दैत्य त्या द्विजाला म्हणाला, द्विजोत्तमा,तुझा पुत्र मींच खाऊन टाकला व आतां तुलाही मीं खाऊन टाकतो. हे शब्द ऐकून अग्निमुख फार घाबरला व आक्रोश करीत पळत सुटला. त्याच्या मागून तो दैत्यही धांवू लागला; पण, शेवटीं त्या श्रेष्ठ ब्राम्हणानें मंत्र म्हणून व अन्य विविध उपायांनी त्या राक्षसाचें निवारण केलें. नंतर भयभीत झालेला तो ब्राम्हण हरिस्मरण करीत हरिहरांच्या जवळ आला. आपल्या सात्वीक भक्ताचें तें म्लान वदन पाहून हरिहर त्याला म्हणाले, 'विप्रेंद्रा, तूं आमचा भक्तराज आहेस मग एवढा दुःखी कां ? तुझें दुःख सांग.' अग्निमुख ब्राम्हण म्हणाला : देवा ! तू मला विमुख झालास. धर्मकार्यासाठीं समिधा आणण्यास मी माझ्या मुलास पाठीवलें असतां, त्याला आज महिषासुरानें खाऊन टाकलें, तो मलाही खाण्यास आला असतां, त्याला पाहून मी पळून आलो. म्हणून माझा पुत्र जिवंत व्हावा, दैत्याचा वध व्हावा व धर्मकर्माचें रक्षण व्हावें यासाठीं, तुम्हीं उपाय करावा.' हरिहर म्हणाले : 'विप्रा, निश्चिंत होऊन जा. तुझ्या पुत्रास बिलकूल अपाय होणार नाही. जेथें भक्तांचें कल्याण करणारी कामाक्षिका आहे, जेथें श्रीविष्णु-रुद्र इत्यादिकांचा वास आहे, त्या रैं क्षेत्रांत जाऊन सर्व भूतधात्री आदिमायेला महिषासुरवधासाठी प्रार्थना कर. आमच्या सांगण्यावरून देवीला कुशल विचारून तिच्यासह ये, म्हणजे तुझी इष्टसिध्दी होईल.' हें ऐकून अग्नीमुख ब्राम्हणाला जरा धीर आला व त्यानें अभयीसध्दीसाठीं हरिहरांची स्तुति करण्यास आरंभ केला. त्या हरिहरांची स्तुती करून कुलाधीश रमानाथ नारायणाचें स्मरण करीत तो कामाक्षिकेच्या क्षेत्रीं निघून गेला. कामाक्षी मंदिरांत जाऊन त्यानें देवीचें दर्शन घेतलें, सर्व वृत्तांत निवेदन केला व तिची स्तुति केली. सर्व देवांनीं तुला वंदन केलें आहे. हे स्तवनीय देवते, माझें कल्याण कर. कामाक्षी म्हणाली, 'द्विजोत्तमा, आपण सत्वर रैं ग्रामीं जाऊंया. मीं त्या दैत्याचा वध करीन व तुझा पुत्र देईन. तू भिऊं नकोस. ती देवी पुनः म्हणाली, ब्राम्हणा, तू पुढें जा. हरिहर जेथें वास करतात, त्या पर्वतावर मीं लगेच येईन. हें वर्तमान समजतांच सगळे लोक लगेच वरच्या जागी उभे राहिले. अंबरीष राजाही उपस्थितझाला. पुष्पवृष्टि झाली. वाद्यें वाजू लागलीं. भक्तलोक नेमानें देवीचे गुणगान करूं लागले. अशावेळीं काऊराहून देवी येऊं लागली. ती महेश्वरी देवी परगांवीं पोहोंचली, तेव्हां भैरवानें तिचा सत्कार करून तोही एक दिवस तेथें राहिला. दुसऱ्या दिवशीं महेश्वरीसह भैरवही निघण्यास तयार झाला तेव्हां जगदंबा कामाक्षी त्याला म्हणाली : हे भैरवोत्तमा, तूं विचारी आहेस, तूं आपल्याच गांवीं रहा. मी कांहीं कारणासाठीं परगांवीं जांत आहे. तें ऐकून भैरव म्हणाला, देवी जेथें आपण आहांत त्या गांवीं मी असतों, असें सर्व म्हणतात तें सत्य झालें पाहिजे. त्याची ती भक्ती पाहून कामाक्षी देवी, भैरव व अग्निमुख यांसह रैंक्षेत्रीं गेली. त्यावेळीं त्रैलोक्यांतील सर्व देवांनी हरिहरांसह

रैंक्षेत्रीं तिच्या स्वागतासाठीं उपस्थित राहून तिचा सत्कार केला. वाद्यें वाजू लागलीं. महोत्सव झाला. सर्वांनी तिचा जयजयकार केला. अशा रितीनें ती देवी रैं नगरांत राहिली. प्रबल होणाऱ्या या महादैत्याशीं मित्रसैन्याची मदत घेऊन युध्द केलें पाहिजे असा त्या बलवर्धिनी दुर्गेनें मनांत विचार केला. तिनें पातालवासी दैत्यांना युध्दाचें आव्हान देऊन नानाशस्त्रधारी सैन्याचा मंडलाकार व्यूह तयार केला. दुसऱ्या दिवशीं, हरि, हर, भैरव व द्विज यांसह सज्ज होऊन देवी वनांतील त्या बलवान दैत्याचा वध करण्यासाठी निघाली. तिनें बरोबर साडेतीन कोटी साठ भूतगण घेतले होते. त्यांची तोंडे तीक्ष्ण व भयानक होतीं. वाद्यांचा घोष चालला होता. अशा या जगदंबेला पहातांच तो महिषासुर धांवत आला. त्याच्यावर बलवर्धिनी कामाक्षीनें आपल्या सैन्यांत स्थिर राहून प्रहार केला. त्यामुळें भयभीत होऊन तो दैत्य शिवादेवीला शरण येऊन म्हणाला, हे कृपानेत्र अंबिके, माझें रक्षण कर. मी तुझा दास आहे. तुला शरण आलो आहे. त्याचे ते उद्‌गार हरिहरानी ऐकले व ते महिषासुराला म्हणाले, अग्निमुख ब्राम्हणाचा पुत्र लवकर त्याच्या स्वाधीन कर. कामाक्षी म्हणाली : तुझे प्राण तुला पाहिजे असल्यास अग्निमुख ब्राम्हणाचा पुत्र दे आणि ताबडतोब पूर्ववत पाताळांत निघून जा. तू मला शरण आला आहेस न पेक्षां तुझा वधच केला असता. हें ऐकून अग्निमुखाचा मुलगा आपल्या उदरांतून बाहेर टाकून दैत्य म्हणाला : हे अंबिके, हा मुलगा देऊन मी पाताळ मंदिरांत जातो. नंतर कामाक्षीच्या भक्तीमुळें तो आनंदी द्विजपुत्र हरिहर गुरूंना पुनः मिळाला. अग्निमुख इत्यादिकांनी देवीची स्तुति केली. जगन्माता कामाक्षीदेवीचे नयनही आनंदाने विकसित झाले. अग्निवक्त्र इत्यादिकांच्या स्तुतीमुळें देवी प्रसन्न झाली व तुमचें सर्वकाळ कल्याण असो, असा आशीर्वाद देऊन ती विष्णु शिवदेवांसह रैं नगरांत जाऊन दिव्य अष्टकेतन मंदिरांत राहिली व भैरवनाथ घंटांची लोखंडपट्टी जोडलेल्या सुंदर देवालयांत राहिला. त्याच्या केवळ गर्जनेनें सर्व संकटांचा नाश होतो. कामाक्षी म्हणाली, जेव्हां माझ्या भक्तांना चोर, प्रेत, पिशाच्च, इत्यादिकांचें भय उत्पन्न होईल, तेव्हां महाप्रतापी भैरवाच्या घंटानादानें त्यांचें तें भय नाश पावेल. त्यांचें संकट दूर करण्यासाठी साठ हजार गणांचें सान्निध्य असेल व साडेतीन कोटी भूतें सदैव येत रहातील, त्यामुळें भयनाश होईल. तेथें एक वस्तुस्थिती सांगणारें कुंड आहे. त्यावर सर्व संकटनाशिनी घंटापट्ट आहे. हें सर्व ऐकून अग्निमुखानें देवीला नमस्कार केला, आणि निर्भय व आनंदित होऊन पुत्रासह तो घरीं गेला. वरील सर्व कथानकावरून श्रीकामाक्षी देवी आपल्या अग्निमुख ब्राम्हण भक्ताच्या संकट निवारणार्थ आणि महिषासुराचा कानीन पुत्र दैत्य याच्या निर्दालनासाठीं, अग्निमुख ब्राम्हणाला प्रसन्न होऊन, काउराहून रैं नगरांत येऊन तेथें राहिली, ही माहिती कळते, व हा कथाभाग 'कामाक्षी माहात्म्यम्' च्या पहिल्या तीन अध्यायांत वर्णिलेला आहे. चवथा अध्याय महिषासुरमर्दिनी कशी झाली, आणि त्या देवीनें आपल्या त्रिशूळानें महिषासुर दैत्याचा वध केला या संबंधांत आहे. वाचकांस पौराणिक माहिती कळल्यानंतर श्रीकामाक्षी देवी सासष्टीच्या रैं नगरांत म्हणजे आतांचा राय हा गांव येथें असलेली फोंडा तालुक्याच्या शिरोडें गावांत कां कोणत्या कारणामुळें पोंचली, याची माहिती समजून घेण्यासाठीं गोमंतकाच्या गतेतिहासाकडे वळावें लागेल.

ऐतिहासिक माहिती

इसवी सनाच्या सोळाव्या शतकांत आफोंस दे आल्बुकेर्क नावाचा एक पोर्तुगीज सरदार पोर्तुगालहून आपल्याबरोबर कांहीं सैन्य व दारूगोळा घेऊन जलमार्गानें गोव्यांत येऊन पोंचला आणि त्यानें त्याकालचें गोवाबेट म्हणजे तिसवाडीवर हल्ला करून तें बेट ता. २५ फेब्रुवारी १५१० रोजीं आपल्या ताब्यांत घेतलें. पण लगेच त्यापूर्वीच्या राज्यकर्त्यांनें प्रतिहल्ला करून आफोंस दे आल्बुकेर्क यास येथून हाकलून लावलें. नंतर त्या आफोंस दे आल्बुकेर्कनें आपल्याबरोबर बरेंच जास्त आणखी सैन्य व दारूगोळा

भरपूर घेऊन गोवाबेटावर चाल केली, आणि शेवटी तें बेट आपल्या पूर्ण कबजांत घेऊन तेथें आपली सत्ता आणि राज्यकारभार सुरू केला. प्रजेचा आपणावर विश्वास बसावा म्हणून, त्यानें प्रजेस आश्वासन दिलें कीं, आपण कसलेच आणि कोणतेच त्रास तुम्हांला देणार नाहीं. इतकेंच नव्हे, तर तुमच्या धार्मिक बाबतींत आपण मुळींसुध्दां शिरकाव करणार नाहीं. तुम्ही निःशंक आणि निर्धास्तपणें निश्चिंत सुखानें रहावें. आणि खरोखरच इ. स. १५२२ साल पर्यंत, गोव्यांत आफोंस दे आल्बुकेर्क यानें हिंदु धर्मास बाधक होण्यासारखें कोणतेच कृत्य आपण होऊन केल्याचा पुरावा अद्यापपर्यंत तरी उघडकीस आलेला नाहीं त्यानंतर गोव्यांतील खिरस्ती धर्मगुरु मुख्य बिशप यानें पोर्तुगालास पत्र पाठवून पोर्तुगालच्या राजाकडे मागणी केली की, 'गोवा बेटांतील सर्व देवालयें मोडून टाकून त्या जागीं जर खिरस्ती देवांचे चर्चेस उभारले, तर त्यामुळें परमेश्वराची फार मोठी सेवा होईल. ज्या कोणास या गोवा बेटांत रहाण्याची इच्छा असेल त्यानें खिरस्ती धर्म स्वीकारून येथें रहावें. तरच, त्यास आपल्या जमिनी आणि घरें मिळतील. आणि जो कोणी खिरस्ती धर्म स्वीकारण्यास राजी नसेल त्यानें गोवा बेट सोडून बाहेर जावें.' हें पत्र ता. १२ जानेवारी १५२२ रोजीं लिहिलें गेलें. या पत्रांतील मागणीवरून कळून येतें कीं, त्या कालीं, क्यॉथोलिक मुख्य धर्माधिकारी धार्मिक राजकारणावर आपलें कसें मत देत असत, आणि राजाकडे कशी काय मागणी करत असत तें शेवटीं, राजानें मागणी मान्य करून अशी परिस्थिती निर्माण झाली कीं, गोवा बेटांतील हिंदूंचीं सर्व देवालयें ता. २८ जून १५४१ दिवसांपूर्वी मोडून टाकण्यांत आली, असा स्पष्ट उल्लेख एका सरकारी लिखाणांत आहे. इतकेंच नव्हे, तर तीं परत यापुढें केव्हांच उभारण्यांत येणार नाहींत असाही उल्लेख आहे. त्यापुढे इ. स. १५४३ सालीं इब्राहिम आदिलखान यानें सासष्टीं आणि बारदेस हे दोन तालुके पोर्तुगीजांच्या हवालीं केले.

इ. स. १५६० सालीं झेझुइट पंथाचे लोक आपल्या धर्म प्रसारासाठी आपल्याबरोबर सरकारी शिपायांची कुमक घेऊन सासष्टींत पहिल्यानेंच गेले, ते ता. १ मे रोजी आणि प्रथमतःच त्यांनीं पाय ठेविला तो कुठ्ठाळ गांवीं. सासष्टींत देवालयें फार मोठीही होतीं आणि सुन्दरही होती. पण, त्यांत बहुसंख्य देवालयाची छपरें नारळाच्या झाडांची म्हणजे माडाचीं चुडतें, तण, करड वगैरेनें आच्छादित होतें. यासाठीं, दरवर्षी पावसाच्या मोसमापूर्वी ती छपरें नियमितपणें दुरुस्ती, डागडुजी करणें, नवीन चुडतें, तण, करड वगैरे आवश्यकतेप्रमाणें वापरून पावसाच्या पाण्यापासून इमारत संरक्षित ठेवणें हें काम करणें भाग होतें. ही गोष्ट बारकाईनें झेझुइट पाद्रीनी लक्षांत आणून व्हॉइसरायकडे मागणी केली कीं, त्यानें ताबडतोब एक हुकूम जारी करावा कीं, यापुढें नवीन देवालयें बांधू नयेत. सध्या असलेल्या देवालयांच्या इमारतींची दुरुस्ती, डागडुजी, करण्यास सक्त मनाई वगैरे निर्बंध चालू करावे. व्हॉइसरायनें मागणी मान्य करून तसा हुकूम सर्वत्र जाहीर करून अंमलांतही आणला. हें महान संकट ओढवलें म्हणून सासष्टींतून शेंकडों हिंदु पणजी राजधानींत येऊन व्हॉइसरायची भेट घेण्यास गेले. त्यांतील दोघांची व्हॉइसरायनें मुलाखत घेतली. एका वृध्द ब्राम्हणानें व्हॉइसरायपुढें अक्षरशः साश्रू नयनांनी लोटांगण घातलें आणि त्यास सांगितलें : आमचे देव उन्हांत आणि पावसांत कसे बरें राहातील ? पण, त्याचा कांही एक उपयोग झाला नाही. उलट, गोव्याचे आर्चीबिशप, बरेचसे खिरस्तीधर्मीय अधिकारी, जज्ज वगैरे एकत्र व्हॉइसरायच्या पणजी येथील पॅलेसमध्यें जमा होऊन, त्यांनी ठरविलें कीं, हा हुकूम फार चांगला असल्यामुळें तो कायम कायदा होऊन ताबडतोब अंमलांत आणावा. कारण, त्याच्या अंमलबजावणीमुळें देवालयाचीं छपरें दुरुस्त न केल्यामुळें पावसानें ती भिजून आपोआपच इमारती मोडून जाणारच; आणि ही परिस्थिती डोळ्यांपुढें येतांच, हिंदुधर्मीय फार श्रध्दाळू असल्यामुळें आपआपले देव घेऊन पोर्तुगीज राज्याबाहेर मुसलमानांच्या राज्यात किंवा अन्य कुठेंतरी जातीलच,

आणि अनायासें ही कटकट आपोआप दूर होईल. आणि खरोखरच तसेंच झालें. व्हॉइसरायनें त्या हुकूमाची अंमलबजावणी जारी केली. देवालयाच्या इमारती पावसानें मोडणार ही परिस्थिती एका बाजूकडे तर दुसऱ्या बाजूस झेझुइट पाद्री सरकारी कुमक घेऊन खिरस्ती धर्माचा प्रसार बळजबरीनें बाटाबाटी, देवालयांचा व मूर्तींचा विध्वंस ही अशी भयानक परिस्थिती ओळखून आमचे त्या कालचे पूर्वज आपआपल्या जिवावर उदार होऊन, प्राण पणास लावून, आपल्या घरादारावर, जमिनींवर शेती बागायती सर्व इस्टेटीवरची आशा सोडून तिलांजली देवून आपआपल्या दैवताची मुख्य मूर्ती, लिंग, शालिग्राम, किंवा जें कांहीं त्या दैवताचें प्रतीक त्या महान् संकटसमयीं त्यांच्या हातांत मिळालें, बरोबर घेणें शक्य झालें, तें घेऊन ते रात्रीच्या समयीं, गुप्तपणें, कोणास चाहूल न देतां, रानांवनांतून धांवपळ करीत, वाट मिळेल तिकडे जाऊन ते आपले प्राणापलीकडे देवदुसऱ्या परकीय राज्यांत स्थलांतर करून नेऊन तेथें मोठ्या बिकट स्थितीत, त्या कालीं स्थापन करण्याचें दिव्य केलें म्हणूनच, ते देव सुरक्षित राहिले व त्या दैवतांचे कुळावी म्हणून, त्या पुण्यपुरुष पूर्वजांचे आम्हीं वंशज म्हणून धन्यता आजच्या कालांत मानीत आहोत. त्यांनी त्या कालीं केलेला आकस्मिकपणें हा महान स्वार्थत्याग याची कल्पनाही आज करवत नाही. असो. सासष्टी, बारदेस आणि त्यापूर्वी गोवाबेट म्हणजे तिसवाडी या तीनही तालुक्यांतील देवालयांचें त्या दैवतांचें जें दुसऱ्या राज्यांत स्थलांतर झालें, त्याची कारण मीमांसा थोडक्यांत ही अशी असून सासष्टी तालुक्यांतील दैवतांच्या स्थलांतराचा काल इ. स. १५६० ते इ. स. १५६७ पर्यन्तचा आहे आणि याच कालांत सासष्टीच्या रैं किंवा राय गांवातील श्रीकामाक्षीदेवी फोंडा तालुक्याच्या शिरोडें गावांत स्थलांतर करून आली आणि ते देवस्थान त्या जागीं आज सुव्यवस्थित स्थितींत आहे. रैं गांवांत हें देवस्थान असताना तेथें जी दैवतें आणि त्यांची देवालयें होतीं, तीं अशी :– रायेश्वर, कामख्या (कामाक्षी), भगवन्ती, नारायण, वाटेंबी. ही नांवें गोवा पुरातत्व खात्यांत इ. सनाच्या सोळाव्या शतकांत सासष्टींतील देवालयें मोडलेल्यांची जी यादी संबंधित कागदपत्रांतून कळते, त्यांत राय गावांतील मोडलेल्या देवालयांच्या नोंदीत वरील दैवतांचीं नांवें आहेत.

निसर्गरम्य स्थळांत श्रीकामाक्षी देवीचें देवालय आणि श्रीरायेश्वराचें मंदिर

श्रीकामाक्षी देवस्थान शिरोडें गांवांत ज्या वाड्यावर आहे, त्या स्थानास थळ (स्थळ) या नांवानें ओळखतात, आणि त्या स्थानास निसर्गरम्य व आल्हाद्दायक असेंच स्वरूप आहे हें तें पाहाणारांच्या नजरेंत लगेच येतें. श्रीकामाक्षी देवी रायहून स्थलांतर करून शिरोडें गावांत पोंचल्यावर ती व तिच्या बरोबर असलेले लोक 'वाजें' या वाड्यावर राहिले होते. पण, ती जागा तितकीशी सुरक्षित नसल्याचें त्यांना वाटलें. कारण, त्या जागेच्या पैलतीरावर पोर्तुगीजांचें सासष्टींतील लष्करी मुख्य ठाणें जो रायतुरचा किल्ला, तो जवळच होता म्हणून ती जागा धोक्याची आहे, असें वाटलें, आणि तें श्रीदेवीसह 'भरभट' वाड्यावर आले. पण, तीही जागा तितकीशी सुरक्षित नसल्याचें त्यांच्या लक्षांत आल्यामुळें त्यांनी ती जागा सोडून डोंगराच्या खिंडीवजा बिनवस्तीच्या ठिकाणी येऊन प्रस्तुतच्या जागीं श्रीकामाक्षीसह इतर दैवतांची स्थापना केली. श्रीकामाक्षी देवीचें देवालय पूर्वाभिमुख आणि सुन्दर आहे. त्या देवालयाच्या उजवीकडे श्रीरायेश्वराचें मंदिर आहे. फोंडा महालांतील प्रत्येक देवालयाचें एक खास असें वैशिष्ट्य आहे. श्रीमंगेश देवालयाचा खांब (दीपस्तंभ); श्रीशांतादुर्गा-कवळेंचा घूड, श्रीमहालसा देवीचें स्थळ, श्रीनागेशदेवाचा तलाव, त्याच मालिकेंतील श्रीकामाक्षी देवीचा गण (आश्रितांचा समूह) फार प्रसिध्द आहे. श्रीकामाक्षी देवालयाचा घूड बराच उंच असून त्या घुडाच्या वरच्या दोन मजलांसह सभोंवार गॅलरी आहे. त्यात गॅलरीवरून आजूबाजूच्या प्रदेशावर नजर फेंकली म्हणजे ती प्राकाराची रचना, आसपासची कुळागरें, डोंगराचा हिरवागार रम्य प्रदेश प्रेक्षकाला तन्मय करून सोडतो. श्रीकामाक्षी देवीच्या देवालयांत गर्भागारांत पट्टासनावर श्रीकामाक्षीदेवीची मूर्ती श्रीचें गण, चौक व गर्भागार यांच्या मधल्या दालनांत, श्रीवेताळ मूर्ती देवालयाचें महाद्वार आणि सभामंडप याच्या मधल्या दालनांत महाद्वाराच्या उजव्या बाजूस आहे. श्रीकालभैरव महा-

द्वाराच्या दुसऱ्या बाजूस आहे. श्रीरायेश्वर मंदिरांत श्रीरायेश्वर लिंग, श्रीलक्ष्मीनारायण मूर्ती, श्रीशांतादुर्गा मूर्ती, श्रीग्रामपुरुष लिंग, श्रीम्हाडेश्वर लिंग, अशीं दैवतें स्थापित आहेत. श्रीरायेश्वर, श्रीलक्ष्मीनारायण श्रीशांतादुर्गा, श्रीवेताळ आणि श्रीग्रामपुरुष ही मूळचीदैवतें असून श्रीकामाक्षी आणि श्रीकालभैरव ही दोन नंतरची आहेत.

शिरोडेंची 'दिवजांजत्रा' फार मोठी, सुप्रसिद्ध

या देवस्थानांत जत्रा हा महोत्सव विशेष महत्त्वाचा आहे. या महोत्सवास महाशिवरात्रीपासून प्रारंभ होऊन फाल्गुन शुक्ल दशमीस हा पूर्ण होतो. या उत्सवांत डोलारोत्सव, शिबिकोत्सव, लालखी उत्सव, खांद्यावरील रथोत्सव असे अनेक नानाविध कार्यक्रम असतात. माघ वद्य चतुर्दशीस रात्रौ श्रीरायेश्वर आणि श्रीकामाक्षीदेवी या उभय दैवतांची मिरवणूक जोडीने होत असते. फाल्गुन शुक्ल प्रतिपदेस दिवजांची मिरवणूक, श्रीरायेश्वर देवाची खांबावरील रथातून आणि श्रीकामाक्षी देवीची लालखीतून अशी जोडीने मिरवणूक शिरोडें येथील ग्रामदेव श्रीरवळनाथ या देवस्थानापर्यंत लव्याजम्यानिशी मोठ्या थाटांत जातें ही जत्रा "शिरोडेंची दिवजां जत्रा" या नांवाने मोठी सुप्रसिध्द आहे. या देवस्थानच्या कुळावी महाजन कुटुंबांत प्रतिवर्षी, श्रावण मासांतील रविवार श्रीकामाक्षी देवी प्रीत्यर्थ, आश्विन शुक्ल पंचमी श्रीशांतादुर्गा देवी प्रित्यर्थ, आणि माघ वद्य चतुर्दशी श्रीरायेश्वराप्रित्यर्थ सण पाळून देवकार्य केले जातें. या देवस्थानचे कुळावी महाजन कौशिक, वत्स आणि अत्रि या तीन गोत्रांचे माध्व सांप्रदायी गौड सारस्वत ब्राम्हण असून त्यांचे चौदा वांगड आहेत. त्यांची मूळ उपनांवे अशी :–

गोत्र कौशिक :– केणी, नाईक रायकार, पई फोंडेकार, पई रायकर, उजो, हळदुर्गा, पई धूकट, पई बीर, बाळगी, कोटी;

गोत्र अत्रि :– कामत भुडकुले

गोत्र वत्स :– आचारी.

या खेरीज श्रीशांतादुर्गा देवस्थान-कवळें येथील आठव्या वांगडाचें 'कौशिक' गोत्री कुळावी (श्रीधर पई, पुनरेकर इत्यादि उपनांवांचे) यांची पालवी देवी श्रीकामाक्षी देवी आहे. 'रायकार' उपनामक दैवज्ञ ब्राम्हणही या देवीचे निष्ठावंत भजक असून, प्राचीन वहिवाटीनुसार हे गर्भागारांत अभिषेक-पूजादि देव-कृत्य स्वतःच करीत आहेत. रायतूर, बोरी, शिरोडा, कवळें, मडकई, खांडेपार या गांवांतील ब्राम्हणेतरांचा मोठा समूह देवीस श्रध्दापूर्वक भजत असतो. पारोडे, कुडचडे, मळकर्णे, कुसमण, सांगे, सांवर्डे, खांडेपार, सावई-वेरे, धर्मापूर, मडगांव, चिंबल वगैरे गांवांतील पूर्व हिंदु, नंतर खिरस्त धर्मीय या देवीची भेट घेणे, नवस फेडणे, प्रसाद घेणे, अशी कृत्यें निष्ठापूर्वक करतात. तसेच, राय गांवचें कांही पूर्व हिंदु (नंतर बाटून झालेले खिरस्ती) लोकांचीही या देवीवर फार मोठी श्रध्दा आहे.

१०

श्रीकपिलेश्वर देवस्थान

कपिलेश्वरी – कवळें



श्रीकपिलेश्वर, कपिलेश्वरी, फोंडा



श्रीकपिलेश्वरी देवालय, फोंडा

श्रीकपिलेश्वर देवस्थान–
कपिलेश्वरी, कवळें, फोंडा, गोवा

श्रीकीपलेश्वर देवस्थान हें गोमंतकातील फोंडा तालुक्यांतील कवळें गावांत कपिलेश्वरीं नांवाच्या वाड्यावर फोंडा येथून दुर्भाट बंदराकडे जाणारा जो रस्ता आहे त्या रस्त्यावर डाव्या बाजूस, रस्त्याच्या सपाटीपासून ७/८ हात उंचीवर सपाट जमिनीवर आहे. उजवीकडे असलेल्या नारळी-फोफळीच्या बागांमुळें वातावरण रम्य आणि शांत दिसतें. श्रीकीपलेश्वराचें देवालय आकारानें फार मोठें किंवा अगदी लहानही नाहीं. मध्यम आकाराचें असलें तरी चांगलें आहे. त्या मानानें देवालयाच्या सभोंवारचा आकार विस्तीर्ण असून प्राकाबाहेर देवालयाच्या पुढच्या बाजूसमोर शुध्द पाण्याचा तलाव दगडी बांधणीचा आहे. पुराणकालीन लिखाणांत कपिलग्राम म्हणून ज्या गांवाचा उल्लेख सांपडतो, तोच गांव ह्या कवळें नांवानें सध्याच्या काळांत प्रसिध्द आहे. आणि ज्या वाड्यावर श्रीकीपलेश्वराचें देवालय आहे त्या वाड्यास कपिलेश्वरी या नांवानें ओळखतात. श्रीकीपलेश्वर दैवत हें एक शिवलिंग असून त्याची सध्याच्या जागीं स्थापना एका महान शिवभक्त कपिल नांवाच्या राजानें या कपिल गावांत केली आणि त्यानेंच या लिंगास तेथें स्थापना करतांना श्रीकीपलेश्वर नामाभिदान दिलें अशी आख्यायिका आहे. वास्तविक हें लिंग आणि देवालय सध्या ज्या जागेवर आहे ती सर्व जागा एका तलावानें व्यापलेली होती आणि त्या तलावांत सदासर्वकाळ विपुल प्रमाणांत शुभ्र कमलपुष्पें उगवत होतीं व त्या तलावांत हें शिव-लिंग होतें. साहजिकपणें त्या शिवलिंगावर सभोंवार नित्य उगवणारीं शुभ्र कमलपुष्पें आवरण करीत आणि म्हणून या कारणानेंच म्हणाना या शिवलिंगास त्या काली कमलेश्वर या नांवानें ओळखत. पुढें कालांतरानें त्या कपिल नांवाच्या राजास अशा स्थितींत तें दृष्टीस पडलें आणि तो महान शिव-भक्त असल्यानें त्यास इच्छा झाली की, या शिवलिंगाची स्थापना विधीपूर्वक योग्य प्रशस्त जागी करून तेथें व्यवस्थित असें मंदिरही असावें म्हणून त्यानें त्याप्रमाणें व्यवस्था केली. पण हा कपिल राजा कोणत्या राजवंशाचा, त्यानें गोमांतकावर राज्य केलें की काय व तें केलें असल्यास तें कोणत्या कालांत केलें, याचा शोध घेऊं गेल्यास तो उपलब्ध होऊं शकला नाहीं. मात्र त्या श्रीकीपलेश्वर दैवताची स्थापना ज्या कपिल ग्रामांत म्हणजे कवळें गावात आहे, तो गांव मूळ वसाहतीस येऊन त्या गांवची ग्रामसंस्था ज्या प्राचीन कालीं स्थापन झाली, त्या कालीं किंवा त्याही पूर्वकालीं झाली असली पाहिजे. याचें कारण, त्या कवळें ग्रामसंस्थेच्या वार्षिक खर्चाच्या कलमांत या दैवताबद्दल खर्चाचें कलम प्राचीन कालापासून आहे यावरून असा बोध होतो.

अंत्रुज महालांत आजच्या फोंडा तालुक्यांत खुद्द त्या कपिलग्राम किंवा कवळें गावांत जें श्रीशांतादुर्गा देवीचें सुविख्यात देवालय आहे तें देवालयही तेथें इ. सनाच्या सोळाव्या शतकांत सासष्टीच्या केळोशी गावातून स्थलांतर करून आहे. याचें कारण, त्या काली पोर्तुगीज राजसत्तेच्या कालांत ख्रिस्तीधर्म प्रसारक जेजुइट पंथाच्या पाद्रींनी जो बाटाबाटीचा कहर माजविला, त्यामुळें तिसवाडी, सासष्टी आणि बारदेश या तीनही पोर्तुगीज राजसत्तेखाली असलेल्या प्रदेशांत असलेली देवालयें, त्यांच्या कुळावी लोकांनी परराज्यांत स्थलांतर करून नेली. फोंडा तालुका त्याकाली पोर्तुगीज राजसत्तेबाहेर होता आणि तेथें आदिलशाहीची राज्यव्यवस्था होती, तरी तेथें राज्यकारभार प्रत्यक्षांत हिंदुधर्मीय सरदारांच्या पूर्णपणें हातात होता म्हणून या फोंडा तालुक्यांत अनेक देवालयें स्थलांतर करून आली. त्याप्रमाणें श्रीकीपलेश्वर देवस्थानही कुठून तरी स्थलांतर करून आलें असावें असावें असा समज पुष्कळ लोकांचा आहे आणि तसा समज झाला हें नवल वाटण्यासारखें कांही नाही. पण, प्रत्यक्षांत संशोधनपूर्वक अभ्यास करून खरी वस्तुस्थिती काय आहे याचा मागोवा घेता श्रीकीपलेश्वर देवस्थान व दैवत स्थलांतर करून आलेलें नाही, याचा स्पष्ट आणि बळकट पुरावा सांपडतो. शके १२७१ सांवरी संवत्सर श्रावण बहुल अष्टमी सोमवारचा ताम्रपट उपलब्ध आहे. बारकाईनें अभ्यास केलेल्यांस असें आढळून आलें की, प्रत्यक्षांत शके १२७१ हें साल

सांवरी नामक संवत्सराशी जुळत नाही पण, त्यापूर्ववर्षी म्हणजे शके १२७० साली सर्वधारी नामक संवत्सर होते आणि बरीच शक्यता वाटते की, हा ताम्रपट ज्या कारागीर इसमाने लिहिला म्हणजे ज्याने त्या ताम्रपटावर अक्षरे कोरली, त्याची नजरचूक या कामांत झाली असली पाहिजे असे स्पष्टच दिसते. कारण, शके १२७० साली सर्वधारी नाम संवत्सर असून त्या संवत्सराच्या श्रावण बहुल अष्टमीचा दिवस सोमवारी येतो. आणि त्या दिवशी ता. १८ ऑगष्ट सन १३४८ आहे. त्या ताम्रपटाचा मजकूर कानडी (हळेकन्नडी) लिपींत आढळतो. ही लिपी गोमंतकांत इ. सनाच्या आठव्या शतकांत वापरांत होती. या ताम्रपटात जो मजकूर कोरलेला आहे त्यावरून असे लक्षांत येते की, त्याकाली गोव्यावर विम्नमंत्री राज्य करीत असता खटग्राम (खांडेपार) या गावांत श्रीगणनाथ देवालयांत एक सभा भरली. त्या सभेत नाग सेटि, गोम सेटि, भयिर सेटि, कायिसेटि, लखु सेटि हे सर्व थोरले गोवे येथे रहाणारे; विठ्ठल सेटि, सात सेटि, सोम सेटि, वजर सेटि हे रहाणार नार्वे येथे. ते कृतज्ञता व्यक्त करण्यानिमित्ताने म्हणजे सावईवेरे येथील वाणी लक सेटि, सिवा चांद सेटि, सिवा इतर सेटि यांनी पूर्वी सोनारांकडे झालेल्या झगड्यांत किंवा तंट्यांत आपणास बरीच मदत आणि आश्रय दिल्याच्या कृतज्ञतेबद्दल सावईवेरेच्या त्या मंडळीस आणि त्यांच्या वंशजांस कांहीं सवलती आणि मानमरातब हक्क देण्यासाठी करार त्या सभेत चर्चिला व केला गेला. याशिवाय आणखी ठराव करून त्यांत असे ठरले की, कांही हक्क आणि मानमरातब गांवात धार्मिक उत्सवाचे वेळी विठ्ठल सेटि, केत सेटि, कपिल ग्राम (कवळे), बाळ सेटि, परिकरू विठ सेटि, सांत सेटि बांदिवडे येथील, यांस देण्याचे ठरले. हा ठराव कुलतलीग्राम (कुठ्ठाळ) येथील मांग शेणवी याने लिहिला. वगैरे मजकूर या ताम्रपटांत असून शेवटी हा करार पालन करण्याचे, शपथ घेऊन सर्वांनी मान्य केले आहे ती शपथ घेतांना, ज्या दैवतांची शपथ घेतली गेली, त्यांत 'गोवे नगराचे वोप श्रीगावेनाथ देउ नार्वे नगराचे वोप श्रीसपथनाथा देउ साकि वोप श्रीकपिले-स्वरू देउ श्रीकपिलेस्वर देउ श्रीनागनाथ देउ श्रीगणनाथ देउ श्रीगणनाथ देऊ' असे शब्द आहेत. वरील ताम्रपट शके १२७० म्हणजे इ. स. १३४८ सालचा असल्याने आणि त्या ताम्रपटांत श्रीकपिलेश्वर देवाचा उल्लेख आहे हे पाहिल्यानंतर त्यापूर्व कालांत ते देवस्थान तेथेच आहे. त्या कालास ६२५ वर्षे उलटून गेली आहेत हे उघडच दिसते, आणि गोव्यांत दैवतांचे स्थलांतर झाले ते पोर्तुगीज लोक गोव्यांत इ. स. १५१० साली आल्यानंतरच्या कालांत आणि या पुर्तुगीज प्रवेशास ४७३ वर्षे झाली असल्याने त्यापूर्वी बरीच वर्षे श्रीकपिलेश्वर देवस्थान आजच्या जागी होते याचा स्पष्ट पुरावा मिळतो. आणि म्हणून कपिल-ग्राम किंवा कवळेगांव ज्या वेळी मूळ वसाहतीस आणला गेला, त्या कालीच हे देवस्थान तेथे स्थापन केले असावे असे वाटते. कवळे गावांत इ. सनाच्या सोळाव्या शतकांत स्थलांतर करून आलेली श्रीशांतादुर्गा देवी नंतरच्या कालांतील आहे हे समजल्यानंतर श्रीकपिलेश्वर देवस्थानाच्या प्राचीनत्वाबद्दल खात्री पटते. आणि हे देवालय, बांदिवडेस श्रीनागेश, श्रीमहालक्ष्मी ही दैवते ज्या काली स्थापिली गेली, त्याच कालांत स्थापन झाले असावे असे वाटते.

या श्रीकपिलेश्वर देवस्थानांत प्रमुख दैवत श्रीकपिलेश्वर हे एक शिवलिंग असून त्याची दुपारी महाभिषेकादि पूजा झाल्यानंतर महाआरतीपूर्वी त्यावर श्रीकपिलेश्वराचे कवच म्हणजे चांदीची मूर्ती घालतात. ही मूर्ती इतकी सुंदर आणि प्रेक्षणीय आहे की ती पाहून खरोखरच मनाला प्रसन्नता लाभते. श्रीकपिलेश्वर या प्रमुख दैवताशिवाय या दैवताची आनुषंगिक अशी मानली जाणारी आणखी दैवते खालील नांवाची आहेत. श्रीगणपती हे दैवत श्रीकपिलेश्वराच्या देवालयासमोर तलावाजवळ एका लहान देवलीत उजव्या बाजूकडे आहे. श्रीभगवती दैवत कपिलेश्वरीहून श्रीवामनेश्वराच्या देवालयाकडे जाण्यां-साठी जो डांबरी रस्ता आहे त्या रस्त्याच्या, जातांना डाव्या बाजूकडे, एक लहानसे मंदिर नवीन बांधणीचे आहे त्यांत आहे. श्रीवेताळ हे दैवत कपिलेश्वरीहून दुर्भाटकडे जाणारा जो डांबरी रस्ता आहे. त्या रस्त्याच्या उजव्या बाजूकडे कवळे देवालयाकडे जाण्यासाठी जो रस्ता उतरणीवर आहे आणि त्या रस्त्याच्या सुरवातीस दोन्ही बाजूस दोन उंच दगडी खांब कवळे येथील श्रीशांतादुर्गा देवस्थानने बांधलेले आहेत त्या रस्त्याच्या उजवीकडे बऱ्याच खाली जमिनतळावर एका स्पेशल चांगल्या देवालयांत स्थापिलेले आहे. श्रीकमलेश्वर हे दैवत ढवळी येथे कोन वाड्यावर आहे. आणि श्रीगोविंद आणि श्रीरामेश्वर ही दैवते आगापूर येथे एका देवालयांत आहेत.

आगापूर येथे ही स्थापित असलेली श्रीमाधव, श्रीगोविंद आणि श्रीरामेश्वर जुन्या काली बाटाबाटीच्या भयानक कालांत सासष्टी प्रांताच्या रासई गांवांतून स्थलांतर करून आली आहेत आणि श्रीवेताळ हे ही सध्या कवळेंस असलेले दैवत बेतालभाटी या गांवातून स्थलांतर करून आले आहे असा समज या देवस्थानाच्या कुळावी जनाचा झाल्याचे पहाण्यांत येते. याबद्दल खरा प्रकार काय असावा म्हणून मुद्दाम गोवा सरकारच्या पुरातत्व खात्याच्या पोर्तुगीज कालीन दप्तरांत काय माहिती मिळते याचा शोध घेता इ. सनाच्या सोळाव्या शतकांत खिरस्ती धर्मीय पोर्तुगीज लोकांनी जी सासष्टीतील देवालये उध्वस्त केली त्याची यादी तपासून पहातां रासई गांवात त्रिविक्रम, नारायण, ईश्वर या तीन दैवतांची देवालये उध्वस्त केल्याचे आढळते. शिवाय, त्या गावांत श्रीमाधव श्री गोविंद आणि श्रीरामेश्वर या नांवाची दैवते होती असा कोणताच आधार मिळत नाही. याबद्दल खुलासा करून घेतां अशी माहिती मिळते की, रासई गांवात त्रिविक्रम नांवाने जे दैवत होते तेच दैवत स्थलांतरानंतर श्रीमाधव या नांवाने, नारायण नांवाचे जे दैवत होते ते स्थलांतरानंतर श्रीगोविंद या नांवाने, आणि ईश्वर हे दैवत स्थलांतरानंतर श्रीरामेश्वर या नांवाने आता आगापूर किंवा अगस्तीपूर या गांवांत स्थापन केलेली आहेत. मात्र जुनी नांवे बदलाचे कारण सांगू शकत नाहीत. श्रीवेताळ दैवताबद्दल अशी माहिती मिळते की, बाटाबाटी पूर्व कालात वेतालभाटी येथे असलेली जी श्रीवेताळ देवाची मूर्ती ती बाटाबाटीच्या धुमश्चक्रीत खिरस्ती धर्मीयांनी मूळस्थानावरून हलवून ती त्याच गावांत जे खिरश्चन धर्मीयांचे चर्च आहे, त्या चर्चसमध्ये रखवालदार अशा स्वरुपात ठेवलेली आहे, व तशी माहिती "बोस्केजु इस्तोरिकु दस कोमुनिदादीस" या पुस्तकांत पृष्ठ २९० वर त्या पुस्तकाचे लेखक फिलिप नेरी शाव्हियेर याने तसेच गाविनीत द लैतूर दस फोताइजस" भाग ४ था पृष्ठ २४० या पुस्तकांत पोर्तुगीज भाषेत आढळते, यावरून श्रीकपिलेश्वर देवस्थानच्या अनुषंगिक दैवतात जे श्रीवेताळ हे दैवत आहे त्या दैवताची पुनःप्रतिष्ठापना कवळेंस करण्याचे वेळी श्रीवेताळाची मूर्ती नवीन करून बसविली असावी असे वाटते.

श्रीकपिलेश्वर दैवत हे कपिलग्राम म्हणजे कवळे गांवचे ग्रामदैवत मानले जाते आणि ही वस्तुस्थिती निःसंशयपणे दर्शविते की कवळे गांव ज्या काली मूळ वसविला गेला आणि तेथे ग्रामसंस्था स्थापन केली गेली, त्याचवेळी हे ग्रामदैवत श्रीकपिलेश्वर स्थापन करून त्याच्या खर्चाची कांही कलमे त्या ग्रामसंस्थेच्या वार्षिक जमाखर्चाच्या अंदाज पत्रकांत समाविष्ट केली असली पाहिजेत. अर्थातच, श्रीकपिलेश्वर देवस्थानचे मूळ आद्यसंस्थापक कवळे गांवचे गांवकर आणि कुळकर्णी हे उघड आहे. आणि म्हणूनच, या कारणामुळे त्या देवस्थानच्या घटनानियमावलीत तसा स्पष्ट उल्लेख आहे व त्यांचे वेगवेगळे असे चार वांगड आहेत. पहिला वांगड भारद्वाज गोत्राचा, त्यांत ढवळकर उपनांवाच्या कुळाव्यांचा समावेश आहे. दुसरा वांगड जमदग्नि आणि वत्स गोत्राचा, त्यांत कुमारदेसकर उपनांवाच्या कुळाव्यांचा समावेश आहे. तिसरा वांगड कौशिक गोत्राचा. त्यांत बुकले किंवा बखले उपनांवाच्या कुळाव्यांचा समावेश होतो. आणि चवथा वांगड वत्स गोत्रीय कुळकर्णी कवळेकर उपनांवाच्या कुळाव्यांचा समावेश होतो. पहिल्या तीन वांगडांचे कुळावी पद्ये ब्राम्हण असून चवथ्या वांगडाचे कुळावी गौड सारस्वत ब्राम्हण आहेत.

देवस्थानांत साजरे होणारे प्रमुख उत्सव

पाक्षिक शिबिकोत्सव :- प्रत्येक महिन्याच्या शुक्ल पक्षांत पंचांगांत ज्या दिवशी प्रदोषः दर्शविलेला असतो त्या दिवशी आणि वद्य पक्षांत पंचांगांत ज्या दिवशी शिवरात्रीः दर्शवलेली असते, त्या दिवशी, रात्रौ ९ वाजतां शिबिकोत्सव सुरू होऊन श्रीकपिलेश्वर देवाची स्वारी पालखीत बसून पालखीची मिरवणूक देवालयांतून निघून देवालयासभोंवार फिरून, नंतर पालखी परत देवालयांत येते. पालखी निघतांना प्रारंभी देवालयांत प्रार्थना केली जाते ती अशी :-

नमः शिवाय सांबाय सगणाय ससूनवे सनंदिने सगंगाय सनागाय नमोनमः ॥ १ ॥ प्रातः काले शिवं द्रष्टवा निशिपापं व्यपोहति आजन्मकृत मध्दाहिन्मे सायाहन्मे सप्त जन्मां मेरू कांचन दत्तानां गवां कोटि शतैरपि पंच कोटी तुरंगाणां तत्फल शिवदर्शनात् ॥ २ ॥

प्रार्थना झाल्यावर पालखी देवालयाबाहेर येऊन प्रमुख प्रवेशद्वाराकडे मुक्काम (पेणे) केले जाते. हे पहिले पेणे असून या प्रमाणे सबंध मिरवणुकीत एकंदर नऊ पेणी केली जातात. प्रत्येक पेणे करतांच तेथे एक अष्टक म्हणण्यांत येते. याप्रमाणे नऊ पेण्यात नऊ अष्टके म्हटली जातात ती खालील प्रमाणे आहेत.

ॐ नमः शिवाय ।

प्रासादे कीपलेश्वरो विजयते ग्रामाधिपः शंकरो
भक्तानाम शुभ हरन् सवृषभो दाक्षायणी संयुतः
यस्यत्रीय कुले बभूव निपुणः संस्थापको ज्ञानवान्
सोयं रावण लिंग दान चतुरः कुर्यान्नृणां मंगलम्
स्वस्ति श्रीकीपलेश्वरा नमन हे साधावया उत्सवा
मत्रश्रेष्ठ 'नमः शिवाय' जपतां संतोष होतो शिवा
सातत्यें अभिषेक या प्रिय शिवा व्हाया तनू निर्मल
बोला 'श्रीकपिलेश्वरो विजयते' अत्यादरे मंगल ॥१॥

ऐन्द्र्यां मत्स्य पुरंदरश्च सुखदं तीर्थादिकं पल्वलं
मत्स्यावास युतं सुमज्जन करं गंगांभसा स्पर्धकं
लोकानामुपकारकं प्रतीदिनं स्नानार्थ मा विष्कृतं
शारीरस्य मलस्य नाशन करं कुर्यान्नृणां मंगलम्
वंदूं त्या 'कमलेश्वरा' समयी या एकांतवासप्रिया
या स्थानांत रथोत्सवी विहरतो भक्तांस तारावया
त्यागी हा परि इष्ट भोग इतरां देण्यापुढे पाउल
बोला 'श्रीकपिलेश्वरो विजयते' अत्यादरे मंगल ॥२॥

आग्नेयां ज्वलनस्तथा भगवती विघ्नेश्वरो देवराट
वर्षा ते नवरात्र कैण विधिना संपूजिता सौख्यदा
ज्येष्ठे मासि कृताहणो गणपतिः कृष्णे चतुर्थ्यां शुभं
आरण्यः कमलेश्वरो विजयते कुर्यान्नृणां मंगलम्
आहे या परिवारि जो 'गणपती' गाऊ तया मोरया
ग्रामी या वनमंदिरीं विलसतो निर्विघ्नता द्यावया
यात्राकालिं रथी बसूनि मिरवे तेव्हां दिसे उज्ज्वल
बोला 'श्रीकपिलेश्वरो विजयते' अत्यादरे मंगल ॥३॥

याम्यामस्य यमश्च तरुणौ बिल्वस्य वृक्षौ शुभौ
एतेऽधस्य विनाशकौ सुधनदौ शंभोश्च पूजार्थकौ
श्रीवृक्षस्य सुदर्शनेन मनुजः पापं सदा मुचते
स्पर्शो नैव तनु करोति विमलां कुर्यान्नृणां मंगलम्
विश्वाची जननी असे 'भगवती' या मंदिरी संगता
अन्यस्थानि वसे जरी तरि करूं या कालि तत्स्वागता
येथे उत्सवकालि दर्शन जिचे होते रथी उज्ज्वल
बोला 'श्रीकपिलेश्वरो विजयते' अत्यादरे मंगल ॥४॥

नैंऋत्यां दिशि निऋीत द्विजवरः शंभोश्च संस्थापकः
ब्रह्माणं प्रवदं ति यं बहुजना स्तप्ताद पद्मार्चकः
अश्वत्थस्यसु बुघ्नमाश्रित तनु नागद्वयालंकृतः
कुर्यातां कीपलस्य रक्षण करौ देवौं न्नृणां मंगलम्
'वेतालेश्वर' येथ संन्निध वसे ग्रामस्थ लोकाश्रय
'कौला' देउनि भक्त काम पुरवी कार्यी करी निर्भय
प्रार्थू त्या कीपलेश्वरा सह मुदें जो उत्सवाचे बल
बोला 'श्रीकीपलेश्वरो विजयते' अत्यादरे मंगल ॥५॥

वारुण्यां दिशि राजते वरुणराट यो माधवो भूसूः
श्रेष्ठे त्वाग्रिपुरे वसन् गरुडयुक रामेश्वरेणान्वितः
गोविंदेन सुभूषितः कमलया तस्मैंच दत्ता धरा
सो विष्णव युध धारको विजयते कुर्यान्नृणां मंगलम्
आहे अग्रिपुरांत 'माधव' तसा 'गोविंद' 'रामेश्वर'
यात्रेला शिबिकेंत ये बसुनियां तो माधवाख्येश्वर
वन्दू 'माधवदेव' तो तरुगत 'ब्रम्हा' नमू निष्कल
बोला 'श्रीकीपलेश्वरो विजयते' अत्यादरे मंगल ॥६॥

वायव्यां दिशि संस्थितश्च पवनो वेताल भाटिस्थितः
देवोयं सकलार्थ साधन करो वेताल रुद्रो महान्
निर्माल्यस्य निपातनात् कथयते संकेत मुद भासितं
प्रश्नं व्यक्त हितार्थ बोध न करं कुर्यान्नृणां मंगलम्
कोपे शंकर कामधेनु निचयी उच्छिष्ट फेनास्तव
ब्रम्हा त्या वृष देउनी कीरतसे त्या शांतवायास्तव
नानावर्णीहि नाक धेनु कीपला झाल्या तशा दुर्बल
बोला 'श्रीकीपलेश्वरो विजयते' अत्यादरे मंगल ॥७॥

औदिच्यां दिशिदुग्ध सागरभवः सोमस्तथा मारुतिः
लंकादाह पटुः सुपर्वत गृहो भक्तैक कल्पद्रुमः
अंजन्यातनयो जितेंद्रियचयः चित्तैक सीतापतिः
जानक्याविहितादरो विजयते कुर्यान्नृणां मंगलम्
स्वीकारी वृष तुष्ट होय कीपला गाईवरी शंकर
तेव्हां 'श्रीकीपलेश्वरे' ति पडले त्या नामही सुंदर
भोळा सांब परी खळांस नुरवी भक्तांपुढे कोमल
बोला 'श्रीकीपलेश्वरो विजयते' अत्यादरे मंगल ॥८॥

ऐशान्यां दिशि शंकरा विजयदा दुर्गा नृणां तारिणी
संसारो रिपुषटकयुकसुमहिष स्तस्यैवसानाशिनी
वैश्यस्यापि तपस्यया बहुविधं संपूजिता ज्ञानदा
राजन्यस्यीह राज्यदान निपुणा कुर्यान्नृणां मंगलम्
गर्जु सर्वीह उत्सवांत समयीं 'शंभो! शिवा! शंकरा!
अर्पू मंगल गीत भक्तिसुमने जोडोनी दोन्ही करा
द्याया सौख्य महाजनादि भजकां संपत्ति आयुर्बल
बोला 'श्रीकीपलेश्वरो विजयते' अत्यादरे मंगल ॥९॥

श्रीदत्तमहाराज, सांखळी गर्भागारांतील अधिष्ठीत मूर्ती



श्रीदत्तमहाराजांचे देवालय, सांखळी

श्रीदत्त देवस्थान

गोमंतकाच्या चतुःसीमा, क्षेत्रफळ आणि हिंदु धर्मीयांची लोकसंख्या लक्षात घेता, तसेच, त्याबरोबर देव आणि देवस्थान यांच्या संख्येचा विचार करता या भूमीस देवभूमी हे सार्थ नाव आहे हे कोणीही जसे मान्य करील, त्याचप्रमाणे या देवस्थानाच्या सभोवार आसमंतात जिकडे तिकडे सृष्टी देवीने पसरलेला तो नेत्रदीपक आणि आनंददायक हिरवागार शेतीचा गालिचा, वाऱ्याच्या झुळकेने झोके घेणारी उंच उंच फोफळीची झाडे, वनपुष्पांचा सुवास, गोड पाण्याचे झरे आणि तलाव, मनोरम सृष्टीसौंदर्य आणि निसर्ग देवता दूध सागराच्या रूपाने या देवभूमीवर सतत अभिषेक करीत असते. असा आल्हादकारक देखावा पाहिल्यानंतर स्वर्गीय देवतानाही हेवा वाटावा आणि या भूमीत आपले वास्तव्य असावे असे त्याना वाटले तर त्यात नवल ते कोणते ?

गोमंतकात लोकसमाजाची काही खास अशी देवालये आहेत

गोमंतकात काही लोकसमाजाची खास अशी देवालये आहेत. ती देवालये विशिष्ट समाजाची मालकी असली, तरी त्या समाजाची मालकी फक्त त्याच्या त्या देवालयाची व्यवस्था पाहण्यापुरती आहे. इतर लोकाना त्या देवालयात त्या त्या देवस्थानाच्या घटनात्मक आणि व्यवस्थापन नियमांचे पालन करून उपासना किंवा देवकृत्ये करविण्यास बंदी नाही. अशा समाज नियंत्रणाखालील देवालयांमध्ये प्रामुख्याने पुढील देवालयांचा समावेश होतो :—

नाभिक समाजाचे : श्रीगोमंतेश्वर-जुने गोवे, ब्रम्हपुरी.

गुर्जर समाजाचे : श्रीलक्ष्मीनारायण-नारवे.

दैवज्ञ समाजाचे : श्रीकालिकादेवी-कांसारपाल.

वैश्य समाजाचे : श्रीशांतादुर्गा-धारगळी.

ब्रम्हकर्मा (सुतार) समाजाचे : श्रीराम सीता–गिमोणे-पिळगाव.

भंडारी समाजाचे : श्रीरुद्रेश्वर-हरवळे.

गावडा समाजाचे : श्रीमल्लिकार्जुन-गावडोंगरे तालुका काणकोण.

क्षत्रिय राणे समाजाचे : श्रीपांडुरंग-विठ्ठलापूर--सांखळी.

सारस्वत समाजाचे : श्रीदत्त (दत्तवाडी) सांखळी.

या शिवायही आणखी देवालये अनेक गावात, त्या त्या गावच्या विशिष्ट लोकसमाजाची खास अशी आहेत. परंतु त्या सर्वांचा नामनिर्देश आज या लेखात स्थल संकोचामुळे करता येणे शक्य नाही.

सरकारमान्य घटनेनुसार श्रीदत्त देवस्थान सांखळी हे देशातील अखिल गौड सारस्वत ब्राम्हण वर्गाचे असून त्या ज्ञातीतील कुणाही सद्‌गृहस्थाला जो कायदेशीर दृष्ट्या प्रौढ असेल, त्यास देवस्थानच्या सदस्य किंवा महाजनाचा हक्क लाभतो. अर्थात त्या देवालयाचा महाजनवर्ग हा अन्य कुठल्याही देवालयापेक्षा जास्त असून व्यापक प्रतिनिधी असलेले गोव्यातील आणि कदाचित् उर्वरित भारतातील हे एकमेव देव-स्थान असावे.

गोमंतकाची राजधानी पणजीपासून सुमारे २०–२६ मैलावरील सांखळी हा गाव म्हापसे-मडगाव रस्त्या-वर आणि डिचोलीपासून सुमारे चार मैलावर वसलेला आहे. हा गांव सृष्टीसौंदर्याने नटलेला, आणि वीज, पाणी इत्यादी आधुनिक सोईनी पूर्ण आहे. गोव्यातील ही एक सुप्रसिध्द बाजारपेठ असल्यामुळे दर आठ-वड्यास सोमवारी येथे मोठा बाजार भरतो.

श्रीदत्तमंदिराशिवाय, या सांखळी गावात श्रीपांडुरंग तसेच श्रीमुरलीधर अशी आणखी दोन वेगवेगळी देवालयें आहेत. रस्त्याला लागूनच असलेल्या दगडी तटास एक भव्य महाद्वार आहे. त्यातून आत शिरताच डाव्या आणि उजव्या बाजूस अश्वत्थ वृक्षाचे पार आणि डावीकडे उंच नगारखाना आहे.

महाद्वारापासून समोरच्या रस्त्याने जाताच पुढे विस्तीर्ण मंडप असून त्यास संगमरवरी फरसबंदी आहे. पुढे काही पायऱ्या लागतात. तेथूनच गर्भागारातील शोभिवंत मूर्तीचे दर्शन घडते.

पायऱ्या चढून दरवाजातून आत गेल्यावर "सोंडियो" दालन लागते. सोंडियाच्या दारातून आत शिरताच भव्य चौक आहे. त्यावर कांचेच्या हंड्या, झुंबराची आकर्षक आरास पाहिल्यानंतर मन प्रसन्न होते. चौकाच्या पुढे दोन दरवाजे समोरासमोर असल्याने त्यातून श्रीदत्तमहाराजाची गर्भागारातील मुख्या-सनावरील मूर्ती नानाविध रंगाच्या उंची वस्त्रालंकारानी आणि सुवासिक फुलानी श्रृंगारलेली, तीन शीरे सहा हात अशी, दोन्ही बाजूस पितळेच्या चकचकीत सरमाळीच्या दिव्यांच्या प्रकाशात पाहून डोळ्यांचे अक्षरशः पारणे फिटते व ते दर्शन मिळाल्याचे पाहून धन्य झालो असे अचानकपणे सहजोद्‌गार मुखावाटे आपोआप निघतात.

या मूर्तीच्या आसनाच्या खालच्या थरावर श्रीदत्तमहाराजांची पंचधातूंची एकमुखी मूर्ती (उत्सवमूर्ती) आहे. या व वरच्या दोन्ही मुर्तीस रौप्य प्रभावळी आणि त्यांवर रौप्य मंडप आहे. देवालयात लख्ख प्रकाश, खेळती हवा, फार स्वच्छता व टापटीप असून विशेषतः कडक शिस्त हे या देवालयाचे खास वैशिष्ट्य आहे. देवालयाच्यामागे औदुंबरवृक्ष आणि त्यास पार असून त्यावर श्रीदत्तमहाराजाची एकमुखी जुनी पाषाणी मूर्ती आहे.

देवस्थानातील काही वैशिष्ट्ये

वक्तशीरपणा हे या देवस्थानचे एक प्रमूख वैशिष्ट्य असल्यामुळे सर्व एकंदर दैनंदिन कार्यक्रम व उत्सव अगदी घड्याळाच्या कांट्याबरहुकूम होत असतात. वेळ व नीतिनियमाचे कांटेखोरपणे पालन कर-ण्याची देवस्थानची शिस्त अनुकरण्या जोगी आहे. प्राकारात, देवालय परिसरात थुंकणे, लघुशंका करणे, पायात वहाणा घालून चालणे, कांदा, मासळी, मांस सारख्या निषिध्द वस्तू तेथे आणणे यांस पूर्ण मज्जाव आहे. देवालयात केरोसीन नेण्यास किंवा केरोसीनचे दिवे पेटविण्यास मनाई आहे.

देवालयात इ. स. १९६६ साली वीज घेण्यात आली आहे. गर्भागारात शुध्द तेलाचे आणि तुपाचे दिवे पेटत असतात. स्नान केलेले नसल्यास देवालयाच्या सोंड्यापुढे जाता येत नाही. निषिध्द आहार सेवन केलेला असल्यास देवालयात प्रवेश करता कामा नये. इतर देवालयात देवदर्शनोत्सुकांची वर्दी समजली जाणारी घंटा न वाजविण्याचा प्रघात या देवालयात आहे. तसेच चौकावर तबकातील तीर्थ प्रसादास शिवण्यास प्रतिबंध आहे. तीर्थ प्रसाद उपस्थित सर्व लोकानी मिळाल्याशिवाय मध्येंच उठून जाता येत नाही.

देवस्थानच्या घटनात्मक नियमावलीनुसार श्रीच्या गर्भागारात किंवा त्याच्या परिसरात जाण्याचा अधि-कार फक्त मौंजीबंधन झालेल्या महाजन मंडळीलाच आहे. शिवाय देवालयासन्निध असलेल्या विहिरीवर स्नान करूनच आणि सोवळेवस्त्र परिधान केल्यावरच एखाद्याला गर्भागाराच्या प्रदक्षिणेत वा परिसरात जाता येते. हे दत्तस्थान म्हणजे दिव्य, देवस्व, मांगल्य, शिस्त, शुचिर्भूतता, शांतता आणि सौंदर्याचा सुरेख संगम. प्राकारात प्रवेश करताना, मंदिरात शिरताना किंवा प्रदक्षिणा घालताना प्रत्येकाचे मन मोहरते, शरीर सुखावते, हृदय भक्तिभावाने भरून येते आणि विनम्रतेने मस्तक लवून आपोआप जोडल्या हातानी मुखावाटे उद्‌गार निघतात "दिव्यत्वाची जेथे प्रचिती तेथे कर माझे जुळती."

वरील मजकुरावरून श्रीक्षेत्र सांखळी येथील श्रीदत्त स्थानाची प्राथमिक ओळख वाचकाना होऊ शकेल. पण ते श्रीदत्त स्थान कोणत्या कारणाने केव्हा उदयास आले, श्रीदत्त महाराज आपल्या एका निस्सीम श्रध्दाळू भक्तासाठी श्रीक्षेत्र नरसोबावाडी येथून सांखळी येथे येऊन अवतरले, त्याची कारणमीमांसा, देवा-

लय बांधणी, मूर्ती प्रतिष्ठापना वगैरे सर्वांगीण माहिती वाचकापुढे ठेवण्यापूर्वी श्रीदत्तावतार कसा, कोणत्या कारणासाठी, कोणाची इच्छा पुरविण्यासाठी झाला, याबद्दल अत्यावश्यक अशी पौराणिक माहिती, तसेच गांव्यात प्राचीन काली, चार शतकापूर्वी, श्रीदत्त महाराजाचे एखादे तरी देवालय होते काय, याबद्दल ऐतिहासिक दृष्ट्या संशोधन पूर्वक काही माहिती मिळते की काय ते पाहू.

पौराणिक माहिती

ब्रह्मश्री नारदमुनीच्या इच्छापूर्तीसाठी भगवान् श्रीविष्णूचे आश्वासन

एकेकाळी महामुनी नारदास अशी इच्छा झाली की, आपण एकदा तरी प्रभूचे शुध्द सत्व स्वरूप पहावे आणि म्हणून त्यानी श्रीविष्णूची खडतर तपश्चर्या करून श्रीविष्णूस प्रसन्न करून घेतले. देव प्रसन्न होऊन, वर माग म्हणून सांगताच, नारदमुनीनी श्रीविष्णूकडे शुध्द सत्य स्वरूप पाहण्याची आपली इच्छा दर्शीविली.

श्रीविष्णूनी नारदास सांगितले की, तू माझा सर्वश्रेष्ठ परमभक्त असून केवळ जगाच्या कल्याणासाठीच तुझी ही मागणी आहे हे मी जाणतो. पण, सध्या मी रज-तम-सत्वादि गुणानी वेष्टित असून, या गुणाचा त्याग करून जर मी पूर्ण सत्वगुणी राहिलो तर माझ्याकडून असुर, दुष्ट, दुर्जनाचा संहार होऊ शकणार नाही. आणि ज्यावेळी एकाच तमोगुणानी वेष्टित होऊन आपण, ब्रम्हा आणि महेश अशा आम्ही तिन्ही देवता एकत्र येऊ, त्यावेळी नारदा तुला शुध्द सत्वरूपाचे दर्शन घडेल.

नारदमुनी आपली इच्छा तृप्ती केव्हा होईल, याची उत्कंठतेने वाट पाहत त्रिभुवनात हिंडत होते. त्यांच्या कानावर अत्रि आणि अनसूयेची कीर्ति गेली. अत्रिमुनीची पत्नी अनसूया ही अत्यंत महान् पतिव्रता व साध्वी स्त्री होती. ती आश्रमात पतीच्या सान्निध्यात राहून पतीची उत्तम प्रकारे सेवा करीत असे. तसेच आश्रमात येणाऱ्या प्रत्येक व्यक्तीचे, अतिथीचे, मोठ्या प्रेमाने व आदराने स्वागत करी. वेळी अवेळी आलेला पाहुणा अनसूयेच्या आश्रमातून कधी उपाशी पोटी गेला नाही किंवा रिक्त हस्ताने गेला नाही. तिचा हा आचार पाहून प्रत्यक्ष सूर्य सुध्दा तिला भिऊन वागे; अग्नि तिच्यापुढे शीतल होई, पवन तिच्यापुढे नम्र होई. तिच्या शापाच्या भयाने सारी पंचमहाभूते तिच्यापुढे थरथर कापत, एवढा तिच्या पतिव्रत्याचा प्रभाव !

पतीबद्दल तिच्या ठायी असलेली अनन्य भक्ती व लोकाबद्दल असलेला आत्यंतिक आदर, यामुळे तिचे नाव साध्वी व पतिव्रता स्त्री म्हणून सर्वतोमुखी झाले. ही वार्ता अर्थात नारदमुनीच्यासुध्दा कानावर गेल्याशिवाय राहिली नाही. नारदमुनीनी ही वार्ता वैकुंठाला जाऊन विष्णूची पत्नी लक्ष्मीला सांगितली. कैलासास जाऊन शंकराची पत्नी पार्वतीपुढे अनसूयेच्या पतिव्रत्याचे गुणगान गाइले. ब्रम्हलोकास जाऊन ब्रम्हदेवाची पत्नी सावित्रीपुढे तिच्या आदरातिथ्याविषयी धन्योद्गार काढले. तेव्हा साहीजकच त्याना या अनसूयेबद्दल मत्सर वाटू लागला.

ही अनसूया यःकश्चित मानव व आपण देवी. तेव्हा या अनसूयेचे वर्चस्व आपणावर उपयोगी नाही. तेव्हा हिचे सत्त्व हरण करावे असा त्यांच्या मनात विचार आला आणि हा विचार त्यानी आपापल्या पतीजवळ बोलून दाखीवला. तेव्हा त्या त्रैमूर्ती ब्रम्हा-विष्णु-महेश क्रोधाने संतप्त झाल्या आणि म्हणाल्या–

"ती पतिव्रता कशी आहे ते आम्ही पाहतो व तिचा व्रतभंग आम्ही जरूर करतो." अशी प्रतिज्ञा करून ते तिघे मिळून मृत्युलोकात यावयास निघाले.

त्या तिघानी ब्राम्हणाची रूपे घेतली. शुभ्र धोतर, अंगावर रेशमी उपरणे, यज्ञोपवीत, आणि हातात कमंडलू अशा थाटाने ते तिघे अत्रिमुनीच्या आश्रमात आले.

भर दुपारची वेळ ! ऊन मी म्हणत होते. अशा वेळी आपल्या आश्रमात आलेले ब्राम्हण अतिथी पाहून अनसूयेने त्याना मोठ्या आदराने बसावयास आसन दिले, त्यांचे चरण धुतले व भक्तिभावाने त्यांचे पूजन

केले. त्यांना पाटावर बसवून जेवण वाढले, पण तिला अतिथी म्हणाले– "आम्ही लांबून आलो असून, तुझे सुंदर स्वरूप पाहून आम्हांस इच्छा झाली आहे की, तू नग्न होऊन आम्हाला अन्न वाढावे."

हे वचन ऐकताच अनसूया चिंतन करीत मनात म्हणाली– 'हे कोणी कारणिक पुरुष माझे सत्व पाहण्यासाठी आले असावेत. याना जर विन्मुख पाठीवले तर माझ्या सत्वाची हानी होईल. माझे मन निर्मळ आहे. शिवाय, माझ्या पतीचे तपःसामर्थ्य माझ्या पाठीशी आहे' असे मनात आणून सती म्हणाली, "थांबा, तुमच्या इच्छेप्रमाणेच करित्ये."

एवढे बोलून अनसूया तात्काळ घरात गेली. त्यावेळी तिचे पति देवाजवळ ध्यानस्थ बसले होते. त्याना ही सारी कथा निवेदन केली. तेव्हा मुनीनी अंतर्ज्ञानाने हे सारे ओळखले व आपल्या पत्नीस एका पंचपात्रात गंगोदक देऊन म्हणाले,

"हे गंगोदक त्या अतिथीच्या अंगावर उडव व त्यांना इच्छा भोजन दे."

तेव्हा पतीच्या आज्ञेप्रमाणे ती तीर्थाची पंचपात्री हाती घेऊन अनसूया बाहेर आली, आणि हातातील गंगोदक त्या तिघावर उडविले. तो काय ? त्या गंगोदकाचा स्पर्श होताच ते तिघे अतिथी तत्काल बालक झाले ! लहान बालक ! अगदी लहान !! ती तीन गोजिरी बालके अनसूयेच्या पायाजवळ लोळू लागली. तेव्हा अनसूयेने तात्काल त्याना उचलून कडेवर घेतले आणि त्या अतिथीच्या इच्छेप्रमाणे–

कंचुकीसहित परिधान । फेडूनि ठेवी न लगता क्षण ।
नग्न होवोनिया जाण । बाळांजवळी बैसतसे ।
बाळे घेऊनि मांडीवरी । स्तनी लावी जेव्हा सुंदरी ।
पान्हा फुटला ते अवसरी । देखोनि सती आनंदे ॥

अशा तऱ्हेने गंगोदक उडविल्यावर त्या तिघा अतिथींची बालके झाली. ती बालके रडू लागली. तेव्हा त्याना भूक लागली असेल असे समजून अनसूयेने त्याना यथेच्छ स्तनपान करविले, त्यांची क्षुधा निवारण केली व त्याना पाळण्यात घालून थोपटून निजविले. असे या पातिव्रत्याचे फळ आहे.

नारदमुनीची स्वारी अत्रिमुनीच्या आश्रमात आली. मुनीनी त्याचे आदराने स्वागत केले आणि बसावयास आसन दिले. ब्रम्हश्री नारदानी ती तीन बालके पाहिली आणि त्या बालकाना त्यानी तत्काल ओळखिले. पण तेथे ते कांहींच बोलले नाहीत. अत्रिमुनीचा निरोप घेऊन ते स्वर्गलोकी आले व ही गोष्ट त्यानी लक्ष्मी, पार्वती आणि सावित्री याना सांगितली. तेव्हा त्या फार चिंताग्रस्त झाल्या. त्या तिघीनी नारदाला हात जोडून अशी विनंती केली की, हे मुनिवर आम्हाला त्या अत्रिमुनीच्या आश्रमात घेऊन चला, म्हणजे आम्ही आपापले भरतार (पति) परत शोधून घेऊन येऊ. तेव्हा नारदानी त्याना अत्रिमुनीचा आश्रम दाखविला.

इकडे त्या तिघी, त्या अनसूयेकडे गेल्या. तिची त्यानी करुणा भाकून झालेली सारी कथा निवेदन केली व अनसूयेची क्षमा मागितली. तेव्हा त्या अनसूयेस दया येऊन तिने हा वृत्तांत आपल्या पतीस सांगितला. तेव्हा अत्रिमुनीनी फिरून गंगोदक देऊन ते त्या बालकांवर शिंपडण्यास सांगितले. तेव्हा हातात तीर्थाची पंचपात्री घेऊन अनसूया बाहेर आली. त्या बालकांवर गंगोदक शिंपडले. तेव्हा ती बालके पूर्ववत देवस्वरूप झाली ब्रम्हा-विष्णु-महेश. इतक्यात, अत्रिमुनी बाहेर आले, त्यानी देवाना साष्टांग नमस्कार घातला.

त्यावेळी विष्णु, शंकर, ब्रम्हदेव प्रसन्न झाले व म्हणाले, "हे अनसूये, आम्ही तुजवर प्रसन्न झालो आहोत. इच्छित वर माग. तेव्हा अनसूयेने "तिघे बालक (ब्रम्हा-विष्णु-महेश) माझ्या घरी तीन मूर्ती एकरूप होऊन पुत्राप्रमाणे राहू देत." असा वर मागितला. तेव्हा 'तथास्तु' असे म्हणून देव अंतर्धान पावले आणि–

मांसामाजी मार्गेश्वर । उत्तम महिना प्रियकर ।
तिथीमाजी तिथी थोर । चतुर्दशी शुध्द पैं ।

वार बुधवार कृतिका नक्षत्र । ते दिनी ब्रम्हा विष्णू त्रिनेत्र ।
तिघे मिळोनी एकत्र । शुध्द सत्व निवडिले ॥

त्रैमूर्तींचे सत्व मिळोन । मूर्ति केली असे निर्माण ।
ठेविते झाले नामाभिदान । दत्तात्रेय अवधूत ॥

अशा तऱ्हेने मार्गशीर्ष शुक्ल चतुर्दशीच्या दिवशी श्रीदत्तात्रेयांचा जन्म झाला.

तीन शीरे, सहा हात आणि तेजस्वी अंगकांतीचे ते बालक पाहून सती अनसूयेला अत्यानंद झाला. ती स्त्री पतिव्रता खरोखर धन्य होय.

तेव्हांपासून आजतागायत मार्गशीर्ष शुक्ल पौर्णिमेला प्रदोषकाली श्रीदत्त जयंतीचा उत्सव प्रतिवर्षी साजरा होतो. जन्मदिवशी चतुर्दशीयुक्त पौर्णिमा होती.

अत्रि महामुनीच्या आश्रमातील बालके म्हणजे ब्रम्हा, विष्णु आणि महेश यांचे एकत्र झालेले स्वरूप आणि तेच महर्षि नारदाने इच्छिलेले देवाचे शुध्द सत्वस्वरूप, अर्थात देवाधिदेव श्रीगुरूदत्त महाराज होत.

ब्रम्हा-विष्णु-महेशानी श्रीदत्तावतार घेतला तो अत्रि व अनसूया यांच्या आश्रमात. म्हणून लौकिक दृष्ट्या अत्रिऋषी हे श्रीदत्तांचे पिताजी व अनसूया ही त्यांची माता समजली जाते. श्रीदत्ताच्या या माता-पित्याच्या नावाची फोड आध्यात्मिक दृष्ट्या पुढील प्रमाणे केलेली आढळते :–

"ज्याच्या ठिकाणी त्रिगुणही नाही तोच **'अ–त्रि'** आणि जिच्या ठिकाणी दोष दृष्टीच नाही तीच **अन्-असूया"**

दुसऱ्या एका ठिकाणी **अत्रि–अनसूया** हे दांपत्य म्हणजे जणू **ज्ञान** आणि **भक्ति, सत्य** आणि **क्षमा,** आणि **प्रीति** अशांचे दिव्य मिश्रण होते असे म्हटले आहे.

आणि तिसऱ्या एका ठिकाणी श्रीदत्तात्रेय म्हणजे मूर्तिमंत ज्ञानच होय. असे म्हटले आहे. **"अ-त्रि"** म्हणजे **त्रिगुणातीत भाव, "अन्-असूया"** म्हणजे **निर्मत्सर वृत्ति.** यांच्यापासूनच **ज्ञानाचा** जन्म होतो.

परमेश्वराच्या अनेक अवतारापैकी श्रीदत्ताचा अवतार हा या पृथ्वीवरील चिरकालचा अवतार आहे असे मानतात. कारण, "परित्राणाय साधुनां." इत्यादि भगवद् वचनाप्रमाणे त्याचे मत्स्यकूर्मादि अवतार हे त्या त्या काली विशिष्ट दुष्कृताचा नाश करून साधूंचे परित्राण करण्याकरिता आणि अधर्मात बुडालेल्या जगाचा उध्दार करून पुनः धर्म स्थापना करण्याकरिता झालेले असले, तरी ते कार्य संपल्यावर ते गुप्त झाले व त्यांची स्मृति तेवढी लोकात कायम राहिली आहे असे आपल्या जुन्या इतिहास-पुराणादि ग्रंथावरून दिसून येते.

पण, श्रीदत्तावतार हा कोणा विशिष्ट दुष्कृताचा नाश करण्यासाठी झाला नसून, अज्ञानरूपी अंधकाराचा नाश करून सर्वत्र ज्ञानरूपी प्रकाश पाडण्यासाठीच झालेला आहे आणि हे कार्य युगायुगात आणि हर एक पिढीत सतत चालूच राहवयाचे असल्याने परब्रम्हाने या अवताराच्या रूपाने एकदा जे मानुषी रूप घेतले, ते तसेच कायम आहे. व्यक्तिरूप अवतारामधील श्रीदत्तावतार त्याच दिव्य शरीराने आज अस्तित्वात आहे व तो कल्पान्तापर्यंत तसाच राहणार, म्हणून यास **'अविनाश अवतार'** अशीही संज्ञा आहे.

"श्रीरामकृष्णादि अवतारांचे कार्य मर्यादित कालाचे होते आणि म्हणून ते कार्य संपताच ते अवतार निजधामास गेले. पण श्रीगुरूदेवदत्ताचे कार्य तसे मर्यादित कालाचे नाही. रावण-कुंभकर्णादि असुर हे एका

जन्मातच लोकाना छळणारे होते. पण, काम-क्रोधादि असुर हे जन्मोजन्मी नित्य छळणारे आहेत. आणि सृष्टी अनंतकाळ राहणारी असल्यामुळे अनंतजीव राशीमध्ये अनंत मुमुक्षु उत्पन्न होणारे असतात. तेव्हा त्याचा अविद्या-अंधःकार नाहीसा करून, उध्दार करण्याचे कार्य अनंतकाल चालायचे, याच मूळ संकल्पाने श्रीदत्त अवतरले असल्यामुळे ते त्याच दिव्य देहाने आज वावरत आहेत."

श्रीदत्ताचे कार्य हे इतर अवताराप्रमाणेच दुहेरी आहे. हिरण्याक्ष-हिरण्यकशिपु, रावण-कुंभकर्ण, शिशुपाल-वक्रदंत यांचा नाश हे मुख्य प्रयोजन धरून इतर दैत्याचा नाश व भक्तजनाचा उध्दार ही इतर कार्येही त्या त्या अवतारानी केली आहेत. त्याप्रमाणे अज्ञानाचा नाश करून ज्ञान देणे हे श्रीगुरूदेवदत्तांचे मुख्य प्रयोजन असून भक्तांच्या इतर कामना पूर्ण करणे हेंहि त्यांचे अन्य कार्य आहे.

श्रीदत्तसांप्रदायाचे वैशिष्ट्य असे आहे की, यात श्रीदत्तमहाराजाशिवाय इतर देवताच्या किंवा आपापल्या कुलदेवताच्या अगर इत्तर उपास्य देवताच्या उपासनेलाही आडकाठी नाही. शैव, गाणपत्य, शाक्त इत्यादी पंथातील लोक आपापल्या दैवताची उपासना चालू ठेवून श्रीदत्तभक्त होऊ शकतात.

श्रीदत्त महाराजांची आराधना करताना समोर श्रीदत्त मूर्तीच असली पाहिजे असे नाही. पंचायतन पूजेत ज्याप्रमाणे मूर्तीऐवजी शाळिग्राम, बाण, नर्मदेतील तांबडे गोटे, स्फटिक इत्यादी प्रतिके चालतात, त्या प्रमाणेच श्रीदत्तगुरूच्या बाबतीत पादुकानीच काम भागते. किंबहुना मूर्तीपेक्षा पादुका हेच अनेक भाविकाना अधिक आकर्षक वाटते.

श्रीदत्तमहाराज ही देवता एकाच ठिकाणी वास करणारी नसून तिचा संचार सर्वत्र असतो. "प्रयागी प्रातःस्नान, पांचालेश्वरी अनुष्ठान, माध्यान्हीं करवीरपुरात भिक्षाटन, अस्तमानानंतर सह्याद्रीत प्रयाण, माहुरगडावर निद्रा" इत्यादी त्यांचा जो दिनक्रम सांगितलेला आहे, त्यावरून हा त्यांचा सार्वत्रिक संचारच सूचित केला आहे. "दत्त म्हणून उभे राहणे" या म्हणीतही ही देवता कुठे कोणत्या, स्वरूपात प्रकट होईल याचा नेम नाही, हेच ध्वनित केलेले असते.

अश्वत्थ व औदुंबर वृक्ष ही तर या देवतेची अगदी आवडीची स्थाने असून अनेक ठिकाणी या वृक्षाचे पार बांधून तिथे श्रींच्या पादुका स्थापन केल्याचे आढळून येते.

शेवटी सांगण्याचे तात्पर्य असे की, क्षेत्र लहान असो किंवा मोठे असो, श्रीदत्तमहाराज ही देवता माणसाचे ऐहिक ऐश्वर्य न पाहता त्याने अंतःकरण, दृढ श्रध्दा, निष्ठा पाहून तिथे जाते आणि वास्तव्य करीते. याचे प्रत्यक्ष उदाहरण आणि पुरावा पुढे श्रीक्षेत्र सांखळी येथे श्रीदत्तमहाराजांचे आगमन त्यांच्या कोणा भक्तासाठी झाले याबद्दलची माहिती वाचल्यानंतर कळेल.

ऐतिहासिक माहिती

गोमंतकात इसवी सनाच्या सोळाव्या शतकात सन १५१० साली खिरस्ती धर्मीय पोर्तुगीज लोकानी प्रवेश करून राज्य सत्ताही मिळविली. प्रारंभीच्या कालात जनतेस धार्मिक स्वातंत्र्य दिले. पण, पुढे ज्यांचे राज्य त्यांचा धर्म हे तत्व राज्यकारभारात सुरू झाले आणि त्यानुसार हिंदू धर्मीय लोकांचे बळजबरीने खिरस्तीकरण, देवालये उध्वस्त करणे वगैरे अनन्वित प्रकार झाले. त्या पोर्तुगीज राज्यकर्त्यांनी तिसवाडी, सासष्टी आणि बारदेश या महालातील सुमारे नऊशे देवालये इ. स. १५४० ते १५६७ ह्या कालात उध्वस्त केली. त्यांची यादी इतिहासाचार्य कै. वा. डॉ. पांडुरंगबाब सखाराम शेणवीं पिसुर्लेकर जे पोर्तुगीज अमदानीत आर्कीव्ह इस्तोरिकूचे डायरेक्टर होऊन गेले, त्यानी आपल्या हयातीत प्रसिध्द केली होती. परंतु, त्या यादीत श्रीदत्तात्रेयाचे एखादे देवालय आढळत नाहीं. परंतु त्यानी इतरत्र मजकूर लिहून प्रसिध्द केलेला आढळतो त्यात खालील माहिती मिळते.

"अपवादादाखल पोर्तुगीजांच्या पणजीतील ऐतिहासिक दप्तरात आम्हास एक उल्लेख आढळला तो असा :- केळोशी ह्या सासष्टीतील गावात "आंबसेत" नामक शेत आहे ते म्हाळू शेणवीं याने दत्तात्रेयाच्या देवालयास दिले होते.

"सदरहू पत्रावर १ सप्टेंबर १५८३ अशी तारीख आहे. त्यावरून केळोशी येथे स. १५६७ ह्या सालापूर्वी दत्तमंदिर होते असे उघड होते. साष्टीतील देवालयांचा सन १५६७ मध्ये पोर्तुगीजानी विध्वस्त केला व त्यानंतर तेथे देवालये बांधण्यास सरकारने बंदी घातली होती हे लोकविश्रुत आहे. गोव्यात सोळाव्या शतकामध्ये दत्तोपासक होते असे वाटण्यास आणखी एक आधार आहे. स. १५६९ च्या सुमारास गोवा बेटातील जेझुइटानी पोर्तुगीज भाषेत हिंदुच्या काही मराठी धार्मिक ग्रंथाचे संक्षेप केले होते. त्यातील एक ग्रंथ **'योगराज टिळक'** हा होता. ह्या ग्रंथास पोर्तुगीजमध्ये 'दत्तात्रेयाचा ग्रंथ' असे म्हटले आहे. प्रा. प्रियोळकरानी ह्या ग्रंथाची मुळ मराठी प्रत मिळवून स. १९५६ त प्रसिध्द केली आहे. त्यांच्या मते हा ग्रंथ दत्त सांप्रदायिक आहे. या ग्रंथाच्या तंजावर प्रतिमध्ये सदर समजुतीला पोषक अशी एक ओंवी शेवटी आहे.

गुरुशिष्याचा येकांतु । जो अनुवादला श्रीदत्तु ।
तें अमृतानंद सांगतु । योगराजकु ॥

वरील मजकूर किंवा उतारा इतिहासाचार्य डॉ. पांडुरंगबाब सखाराम शेणवीं पिसुर्लेकर यानी "आशीर्वाद" शीर्षकाखाली श्री. गुरुदास ब. लवंदे यानी श्रीक्षेत्र दत्तवाडी सांखळी (इतिहास) हे फार महत्वाचे, साद्यंत सविस्तर माहितीचे उपयुक्त पुस्तक, द्वितियावृत्ती मार्गशीर्ष शु. पौर्णिमा शके १८९१ मंगळवार दि. २३ डिसेंबर १९६९ लिहून प्रसिध्द झाले आहे त्या पुस्तकातून घेतलेला आहे.

यावरून गोमंतकात इ. स. १५६७ सालापूर्वी केळोशी गावांत श्रीदत्तमंदिर होते अशी माहिती मिळते. परंतु नऊशे देवालये जी उध्वस्त केलेली वर उल्लेखित यादीत आहेत, त्यात एकही श्रीदत्तात्रेयाचे देवालय दिसत नाही. यावरून त्याकाली श्रीदत्तमंदिरांचा प्रसार झालेला नसावा. आजच्या कालात गोमंतकात श्रीदत्तमंदिरांचा प्रसार फार मोठा दिसतो. आता सांखळी गावात श्रीदत्तमहाराजांचे देवालय केव्हा, कोणत्या कारणाने, कोणा भक्ताची इच्छा पूर्ण करण्यासाठी श्रीदत्तमहाराजांनी उभे कसे केले किंवा करविले हा मोठा चमत्कारच म्हणावा लागेल. आणि चमत्काराची सत्यता वाचकाना या पुढील मजकुरावरून निश्चितपणे पटेल.

सांखळी गावात श्रीदत्तदेवस्थान स्थापन होण्याच्या मुळाशी सांखळी येथील एका दत्तभक्ताचा नरसोबावाडीस तेथील काही व्यक्तीनी केलेला छळ हे एक प्रमूख कारण ?

साधारणपणे १०८ वर्षापूर्वीच्या सुमारास घडलेली ही कथा आणि त्या कथेतील अनुभव आजच्या कालातही सर्रास येत आहेतच. म्हणून, त्याबद्दल संशय घेण्याचे कारण तर नाहीच. उलट, ज्या कोणास खात्री करून घेऊन अनुभव पाहवयाची इच्छा असेल, त्याने नरसोबावाडीस जाऊन श्रीदत्त महाराजांची अनन्यभावे दृढ श्रध्दापूर्वक भक्तिभावाने अखंड सेवा अगत्यपूर्वक करावीच. आणि ही सेवा करणारा इसम गौंड सारस्वत असल्यास त्यास कसा काय अनुभव येतो, काही व्यक्तीकडून कशी काय वागणूक मिळते, हे समजेल. मात्र श्रीदत्तमहाराज हे आपल्या भक्ताची, त्याचे अंतःकरण पाहून इच्छित शुभमनकामना निश्चितपणे सफल करतातच, यात मुळीसुध्दा संशय किंवा शंका नाही.

सांखळी गावात त्या काली श्री. म्हाळू कामत नावाचे एक विठ्ठलभक्त राहत होते. त्यानी श्रीविठ्ठल भक्ति आणि सेवा करण्यासाठीच पंढरपूर क्षेत्रात सुमारे एक तप वास्तव्य केले. त्याचे सुपुत्र श्री. लक्ष्मण म्हाळू कामत आपल्या वडिलाप्रमाणेच फार देवभक्त असून ते श्रीदत्त भक्त भाविक आणि श्रध्दाळु असल्यामुळे प्रत्येक वर्षी श्रीक्षेत्र नरसोबावाडी येथे जाऊन श्रीगुरुचरित्राचे वाचन करणे आणि आपणास शक्य होईल त्याप्रमाणे मनोभावे श्रीदत्तमहाराजाची सेवा करणे हा त्यांचा कार्यक्रम नियमित आणि अव्याहतपणे चालला होता. पण श्री लक्ष्मण म्हाळू कामत हे जरी फार श्रध्दाळु आणि श्रीदत्त भक्त होते. तरी ते गौंड सारस्वत जातीचे असल्यामुळे श्रीक्षेत्र नरसोबावाडीचे काही लोक त्यांचा वेळोवेळी अपमान करीत असत आणि त्याच्या भजन-पूजनादी सेवेत विनाकारण व्यत्यय आणून सतावीत असत. असे असूनही निश्चय आणि निष्ठेच्या बळावर श्री लक्ष्मण म्हाळू कामत यानी आपण प्रतिवर्षी श्रीक्षेत्र नरसोबा-

वाडीस जाऊन तेथे श्रीदत्तमहाराजांच्या चरणी श्रीगुरुचरित्र वाचन सेवा आणि भजनादि कार्यक्रम मनोभावे करण्याचे व्रत चालूच ठेवून त्यात खंड पडू दिला नाही. एके दिवशी श्रीक्षेत्र नरसोबावाडीच्या देवालयाच्या ओरीत श्री लक्ष्मण म्हाळू कामत श्रीगुरुचरित्र वाचन करीत असता, तेथे काही तेथील व्यक्ती आल्या आणि कोणतेही कारण नसता त्याना अद्वातद्वा बोलून असह्य अशी काही दुरुत्तरे केली. या अकल्पित असह्य अपमानामुळे श्री लक्ष्मण म्हाळू कामत याना कमालीचे दुःख झाले, त्यांचे मन अत्यंत विषण्ण बनले आणि त्यांच्या नेत्रातून अखंड अश्रुपात होत असता त्यांच्या मुखातून अभावितपणेच उद्गार आले,

"हे सर्वसाक्षी, दयाघन गुरुमहाराजा ! तू सर्वज्ञ आहेस. आजचा माझा अपमान हा मी तुझाच अपमान समजतो."

आणि काय हा चमत्कार ! त्याच रात्रौ श्री लक्ष्मण म्हाळू कामत याना श्रीगुरुमहाराज स्वप्नात येऊन दृष्टांत दिला. त्यांच्या स्वप्नात एक तेजस्वी सिध्दपुरुष-काषापायांवर दंडहस्त कमली कमंडलु मेखळा। भस्मोद्धूलित केवडा शशिकळा रुद्राक्ष माळा गळा ॥ अशा वेशात येऊन म्हणाला : "भक्ता ! तू बिलकूल चिंता करू नकोस. तुझे सर्व मनोरथ पूर्ण होतील. लवकरच मी तुझ्या गावी येईन !"

हा दृष्टांत किंवा स्वप्न हे साधेसुधे किरकोळ नसून ते श्रीगुरुमहाराजांचे एक आश्वासन आहे हे श्री लक्ष्मण म्हाळू कामत यानी जाणले आणि त्यांचाआनंद अनावर आणि गगनात मावेनासा झाला. श्रीगुरुचरित्र सप्ताह वाचन सांगता करून नंतर अगदी प्रफुल्लीत अंतःकरणाने त्यानी सांखळी गावाकडे धाव घेतली.

श्रीक्षेत्र नरसोबावाडीत स्वप्नातून दृष्टांत आणि सांखळी गावात श्रीदत्तमहाराज येण्यासाठी सुसंगत व पूरक घटनाचा आरंभ

सांखळी येथील तात्कालीन गृहस्थ परलोकवासी श्री येसू शेणवी बोडके यांची पत्नी श्रीमती मथुराबाई याना आपल्या दिवंगत पतीच्या स्मरणार्थ म्हणा, किंवा आपल्या हस्ते एखादे धार्मिक सत्कृत्य किंवा पुण्यकर्म घडावे अशी इच्छा झाली म्हणून म्हणा, गावात कुठे तरी योग्य जागी एक औदुंबर वृक्षाचे रोपण करून त्यास पार बांधून त्या वृक्षाचे विधीयुक्त उद्यापन करावे असे वाटले आणि त्यानी आपले कुलपुरोहित वे. शा. सं. श्रीयुत रामेश्वर भट्ट पित्रे याकडे काही खर्चापोटी पैसे स्वाधीन करून हे काम सोपविले.

श्री रामेश्वर भटजीनी औदुंबर वृक्षाचे एक रोपटे आणून एका निर्जन आणि निरुपयोगी जागेत लावले (हीच जागा सध्याची श्रीदत्तमंदिराची जागा होय.) त्या औदुंबर वृक्षाच्या रोपट्यास दररोज पाणी घालण्याची कामगिरी श्री पांडू नाईक नावाच्या एका गृहस्थाच्या वृध्द आईने श्रध्दापूर्वक पत्करली होती.

काही कालाने तो औदुंबर वृक्ष पालवी फुटून टवटवीत झाल्यावर त्यास दगडी पार बांधकाम करण्यास सुरवात झाली. या कामाच्या खर्चासाठी प्रारंभी श्रीमती मथुराबाईनी वे. शा. सं. श्रीयुत रामेश्वर भट्ट पित्रे यांकडे खर्चासाठी दिलेले पैसे अपुरे म्हणून तो पार बांधून पूर्ण होणे शक्य नाही हे ओळखून श्री लक्ष्मण म्हाळू कामत यानी आपण होऊन श्री रामेश्वर भट्टजीकडे आणखी पैसे दिले आणि शुभ मुहूर्तावर पाराच्या पाया खोदण्याचे काम सुरू झाले. ते खोदकाम दोन चार हात खाली जाताच, खाली जमिनीत सोन्याचा एक अगदी लहान नाग, चांदीचा पादुकाचा एक जोड, एक श्रीमारुतीची आणि एक श्रीगणपतीची अशा पाषाणी दोन मूर्ती मिळाल्या. या वस्तू खोदताना मिळाल्याने शुभचिन्ह आणि श्रीदत्तमहाराजांचे अधिष्ठान असल्याचे संबंधित सर्व मंडळीस पटून ती मंडळी भक्ती भावाने भारावून गेली.

नागप्रतिमा भटजीनी आपणाकीरता नेली. पादुकाचा जोड यथावकाश देवासान्निध्य ठेवण्यात आला. श्रीमारुती आणि श्रीगणपती या पाषाणी मूर्ती विच्छिन्न झाल्यामुळे त्या नदी प्रवाहात सोडून देण्यात आल्या. औदुंबर पाराचे बांधकाम पूर्ण झाल्यावर श्रीशके १८०१ अभव नाम संवत्सर आश्विन कृष्ण द्वादशी या शुभ मुहूर्तावर त्याचे यथाशास्त्र उद्यापन झाले. सांखळी येथे श्रीदत्तदेवस्थान नंतरच्या कालात स्थापन होऊन त्यांची भरभराट आणि उत्कर्ष झाला, त्याचा आरंभीचा पाया म्हणजे हाच औदुंबर वृक्ष उद्यापन होय.

श्रीदत्त मंदिर देवालय इमारत बांधणीस प्रारंभ, बांधकामास लागणाऱ्या सामानाची प्राप्ती होण्यात दैवी चमत्कार आणि आश्चर्याने थक्क होणाऱ्या घटना

सांखळी येथील बाजारकर मंडळीतील श्री लक्ष्मण म्हाळू कामत, यांचे बंधू श्री वासू म्हाळू कामत, श्री गोविंद पैं कुंचेलकर, श्री यशवंत प्रभू आसगावकर, श्री विष्णु शेणवी शेट्ये, श्री मुकुंद शेणवी बोडके, श्री वासू बाबला शेणवी शेटये वगैरे सद्‌गृहस्थानी वर्गणी जमवून औदुंबर पारा शेजारीच सांप्रतचे गर्भागार बांधून काढले. बोरी येथील शिल्पकाराकडून स्थापनेसाठी श्रीदत्तमहाराजांची काळ्या पाषाणाची एकमुखी मूर्तीही करवून आणली. पण, एवढ्यावर ही मंडळी संतुष्ट नव्हती. बांधलेल्या गर्भगाराशिवाय तेथे एक भव्य असे मंदिर उभारावे अशी सर्वांचीच उत्कट इच्छा होती. आणि म्हणून त्या सर्वांनी त्या दृष्टीने प्रयत्न चालीवले आणि परमेश्वर कृपेने त्याना प्रतिसादही मिळू लागला.

सांखळी गावात आणि गोव्यात ठिकठिकाणी वर्गणी गोळा करण्यात आली. निधी गोळा करण्याचे हे काम विशेष करून श्री रामेश्वर पित्रे, श्री लक्ष्मण कामत, श्री नारायण शेणवी दुभाषी यांच्या देखरेखीखाली चालले. पणजी शहरातील श्रीमंत गिरीधर शेणवी धेंपे आणि बोरी येथील श्रीमंत नारायणराव सावकार या धनिक गृहस्थानी प्रत्येकी पाचशे रुपये दिले. आजच्या कालात ही रक्कम कुणालाही अल्पच वाटेल. पण, त्यावेळचे पाचशे रुपये म्हणजे आजच्या पन्नास हजाराच्या तोलामोलाचे निःसंशयपणे होते हे मुद्दाम लक्षात घेतले पाहिजे.

गोमंतकातील आणखी कित्येक सद्‌गृहस्थानी सढळ हस्ते द्रव्य सहाय्य दिले. वर उल्लीखित सर्वश्री शेट्ये, बोडके, कामत इत्यादी गृहस्थाच्या परिश्रमानेमंदिर उभारणीचे काम श्री नारायण मत दुभाषी यांच्या देखरेखीत अगदी समाधानकारकपणे व अत्यंत उत्साहात सुरू झाले.

श्रीनरसोबावाडी येथील श्रीदत्तमहाराजांचा परत दृष्टांत

श्री लक्ष्मण म्हाळू कामत हे श्रीक्षेत्र नरसोबावाडीस असताना तेथे एका रात्री त्यांच्या स्वप्नात श्रीदत्तमहाराजांनी दृष्टांत देऊन सांगितले होते की,"भक्ता ! तू बिलकूल चिंता करू नकोस, तुझे सर्व मनोरथ पूर्ण होतील. लवकरच मी तुझ्या गावी येईन." याबद्दल मागे सांगितलेच आहे. आता परत श्री लक्ष्मण म्हाळू कामत यांचे बंधू श्री वासू म्हाळू कामत याना एक स्वप्न पडले. स्वप्नात एक संन्यासी येऊन म्हणाला, "मी सह्य पर्वत ओलांडून आल्यामुळे फार थकलो आहे तरी मला विश्रांतीसाठी निवांत अशी जागा दाखव." यावर श्री वासू म्हाळू कामत यानी त्या संन्याशास श्रीविठ्ठल मंदिर दाखविले आणि सांगितले की, "तेथे ब्राम्हण मंडळीच्या घरी आपली सोय होईल."

तेव्हा त्या संन्याशाने उत्तर केले, "छे, तिकडे नको ! मला अगदी एकांत जागा पाहिजे." आणि औदुंबराच्या पाराच्या दिशेने अंगुली निर्देश करून ते म्हणाले, "तिकडे पोफळीच्या जागेकडे निवांत अशी जागा दिसते तिथे मी जातो." एवढे बोलून तो संन्यासी झपाझप औदुंबराच्या दिशेने गेला आणि क्षणार्धात अदृश्य झाला.

श्री वासू कामत याकडून ही गोष्ट त्याचे बंधू श्री लक्ष्मण कामत याना कळताच त्याना आपल्या नरसोबावाडी येथील नवसाची आठवण झाली. आणि तो संन्यासी दुसरा तिसरा कोणी नसून, साक्षात्

श्रीदत्तगुरूमहाराज होत याबद्दल सर्वांची खात्री झाली. देवालय बांधणीचीच जागा महाराजांनी पसंत केली आणि त्यामुळे सर्वांनाच अत्यानंद झाला.

देवालय इमारत बांधकामासाठी मजबूत जातीच्या दगडाची (चिरे) फार उणीव होती आणि आर्थिक पाठबळ मर्यादित प्रमाणात होते, अशा परिस्थितीत ध्यानी मनी नसलेल्या विलक्षण घटना आपोआप घडून येऊ लागल्या.

सांखळी गावात बाजारातील भागात जुन्या आमदानीतील एक किल्ला होता. तो जमीनदोस्त करून ती जागा साफ मोकळी करावी असे फर्मान तत्कालीन गोवा सरकारकडून मामलेदाराना आले. मामलेदारानी कायदेशीररित्या तो लिलावास काढला. किल्ल्याचे भलेभक्कम मजबूत दगड (चिरे) आयतेच मिळतील हे जाणून सांखळीकरानी किल्ला तीनशे रुपयाना लिलावात घेतला आणि त्याचे दगड देवालय इमारत बांधकामास वापरले. दगडाची गरज पूर्ण झाल्यावर गोवा सरकारचा मामलेदारास फेरहुकूम आला की, तो किल्ला पाडू नये. आहे त्या स्थितीतच तो राखावा! तेव्हा मामलेदारानी लिलांवदाराकडून किल्ला अडीचशे रुपयास परत घेतला. अशा रितीने देवालय इमारत बांधणीसाठी आवश्यक तितके दगड तर मिळालेच, आणि वर पैसेही परत मिळाले. यामुळे ही विलक्षण आश्चर्यकारक घडलेली घटना पाहून सर्वांच्या मुखातून आपोआप उद्‌गार निघाले. "श्रीदत्तमहाराजांची लीला अगाध आहे !"

दगड मिळून बांधकाम झाले खरे. पण, त्यापुढे लांकूड सामानाची अडचण होती, आणि ही गरज सहजासहजी दूर होणे कठीण. त्यातही पैशाचे पाठबळ अगदी बेताचेच, यामुळे, मंडळी चिंताग्रस्त झाली. आणि परमेश्वरावर भार घालून राहण्याशिवाय दुसरा उपाय नव्हता.

या सुमारास पोर्तुगालहून गोव्याचे गव्हर्नर जनरलच्या जाग्यावर श्री राफायेल आंद्रादि नावाचे युरोपियन नेमणूक होऊन ते गोव्यात पोचले होते. त्यानी गोव्यातील प्रमुख शहरे, महत्वाची गावे, म्युनिसिपालट्याना भेट देण्यासाठी दौरा काढला, आणि ते सांखळी गावात पोचले असताना, नागरिकांच्या शिष्टमंडळाने त्यांची भेट घेऊन त्याना देवालय बांधणीची साद्यंत हकीगत सांगितली. आणि लांकूड सामानाच्या आत्यंतिक गरजेसाठी सरकारी रानातील लांकूड पुरवून भागवावी अशी विनंती केली. त्यानी तत्काल ही विनंती मान्य करून जंगलाधिकाऱ्यास सुमारे तीस चाळीस झाडे देण्याबद्दल हुकूम दिला.

त्या हुकूमानुसार जंगलाधिकाऱ्याने देवालय इमारतीसाठी लांकूड आवश्यकतेप्रमाणे देण्याचा प्रयत्न केला. शिवाय श्री भास्कर शेणवीं दुभाषी यांकडे जप्ती केलेली एक बागायत होती, त्या बागायतीतील पाच सहा फणसाची झाडे त्यानी दिली. देवालयासमोर आणखी काही झाडे होती, या सर्वांचा वापर करून देवालयाच्या लांकूड सामानाची गरज पूर्णपणे भागली.

देवालय इमारतीचे हे लांकूड काम फोंडा तालुक्यातील बांदिवडे गावात पांडूरंगजी नावाचा एक कुशल सुतार होता, त्याच्या मार्गदर्शनाखाली करून घेण्यात आले.

ज्या गोमंतकात ख्रिस्ती धर्मीय पोर्तुगीज राजकर्त्यांनी एकेकाळी हिंदुधर्मीय लोकांच्या देवालयांचा विध्वंस केला, मूर्ती फोडल्या, त्याच गोमंतकात तीच ख्रिस्ती धर्मीय पोर्तुगीज राजसत्ता चालू असताना हिंदु देवालय इमारतीस लागणाऱ्या लाकडाचा सरकारकडून मोफत पुरवठा!

येथे वाचकाच्या माहितीसाठी मुद्दाम नमूद करावेसे वाटते की, गोव्याच्या गव्हर्नर जनरल श्री राफायेल आंद्रादि हा पोर्तुगीज राजवटीतील पोर्तुगालात आणि गोव्यात मोनाकींय म्हणजे राजघराण्याकडून राज्यकारभार चालू होता, त्या कालातील गव्हर्नर असून पोर्तुगाल राष्ट्राचा क्यॉथॉलिक (ख्रिस्ती) धर्म होता हे जगजाहीर आहे. गोव्यात जी रिपब्लीक पोर्तुगीज राज्यसत्ता चालू झाली होती, ती ता. ५ ऑक्टोबर

इ. स. १९१० सालापासून, कारण, त्याच तारखेस पोर्तुगालात मोनार्कीय उलटून रिपब्लिक जाहीर झाले होते आणि संबंध पोर्तुगाल राष्ट्र आणि त्याच्या वसाहतीतील नागरिकाना पूर्णपणे धार्मिक स्वातंत्र्याचे हक्क जारी झाले होते. त्यापूर्वी पोर्तुगाल राष्ट्राचा धर्म खिरस्ती (क्यॉथोलिक) असे सरकारने ठरविले होते.

एके काळी म्हणजे इ. स. १५४१ ते १५६७ च्या कालात गोव्यात पोर्तुगीज राजसत्ता चालू असताना "ज्याचे राज्य त्याचा धर्म" हे तत्त्व राजकारणात अंमलात आणून हिंदूधर्मीयांचे बळजबरीने खिरस्तीकरण, देवालये आणि त्यातील मूर्ती उध्वस्त करणे, असे अनन्वित छळ हिंदू धर्मीय जनतेने भोगले होते हे गतेतिहासावरून कळते. त्याच गोव्यात, पोर्तुगीज राज्यकर्त्यांचीच खिरस्तीधर्मीय राजवट आणि राजेशाही चालू असतानाच, गोव्याच्या गव्हर्नर जनरलनी हिंदूधर्मीय देवालय इमारतीस लागणारे लाकूड सरकारी जंगलातून मोफत पुरविण्याची तरतूद करावी, हा चमत्कार दैवी साक्षात्काराशिवाय होणे अशक्य नव्हे काय ?

श्रीदत्तमहाराजांच्या देवालय इमारतीच्या बांधकामात अपूर्व श्रमदान आणि परिश्रम श्रीगुरुभक्ती पायी भक्त सांखळीतील जनतेचे

सांखळी गावातील जनतेच्या अविश्रांत श्रमाचे प्रतिक हे देवालय. त्या जनतेने अक्षरशः तहान भूकेची पर्वा न करता स्वतः जातीने जीवापाड खपून मेहनत घेतली. किल्ल्याचे दगड व लाकूड स्वतःच्या डोक्यावरून वाहून नेले. सामानाच्या गाड्या स्वतः ओढल्या, भावना, दृढश्रध्दा आणि श्रीदत्तभक्तीच्या अपार प्रेमाने जाणीवपूर्वक केलेले हे श्रमदान होते. श्रीदत्तमहाराजांच्या देवालयाची इमारत आणि श्रीदत्तवाडीच्या पायाखाली सर्वकडे सांखळीच्या लोकांचे परिश्रम आहेत आणि त्यातूनच या देवालयाची भव्य वास्तू उभी झाली. बांधकामास एकंदर खर्च साडेआठ हजार रुपये झाला.

मुद्दाम येथे विशेष लक्षात घेण्यासारखा चमत्कार म्हणजे त्या देवालयाच्या बांधकामास प्रारंभ होऊन ते देवालय संपूर्णपणे तयार होईपर्यंत कुणालाही साधी किरकोळ जखम किंवा दुखापतसुध्दा न होता हे एवढे मोठे काम अगदी निर्विघ्नपणे पार पडले.

प्रतिष्ठापना मूर्ती मिळण्यातही फार मोठा दैवी चमत्कार!

देवालयाची इमारत पूर्णपणे तयार झाली आणि मूर्ती प्रतिष्ठापनेचा विचार होऊन बोरी येथील शिल्पकाराकडून श्रीदत्तमहाराजांची एकमुखी कूर्मासनस्थ काळ्या पाषाणाची मूर्ती आणण्यांत आली. पण, प्रतिष्ठापनेच्या दिवशी ऐनमुहूर्तावर ती तपासून पाहता त्यात काही दोष आढळून आल्यामुळे स्थापनाकार्य अर्थातच पुढे ढकलावे लागले. ही मूर्ती एक मुखी काळ्या पाषाणाची नंतर देवालयामागील औदुंबर पारावर ठेवण्यात आली व ती तेथेच आहे.

शुभ्र संगमरवरी पाषाणाची नवी मूर्ती आणावी असे ठरून श्री पित्रेशास्त्री आणि श्री लक्ष्मण म्हाळू कामत यानी त्यासाठी वर्गणी गोळा केली, ती दोन-अडीचशे रुपये भरली. ही रक्कम घेऊन मूर्ती खरेदी करण्यासाठी ते दोघे मुंबईस गेले आणि त्यांचा मुक्काम श्री चिंतामणराव वालावलीकर यांकडे राहिला.

दुसऱ्या दिवशी श्री पित्रेशास्त्री, श्री लक्ष्मण म्हाळू कामत यानी आपल्या बरोबर श्री चिंतामणराव वालावलीकर याना घेऊन कित्येक मूर्तीकाराकडे गेले. पण, त्याकडे पाहिलेल्या मूर्ती यांच्या पसंतीस उतरल्या नाहीत. शेवटी एका मूर्तीकाराकडे असलेल्या मूर्तीने त्यांचे मन आकर्षून घेतले. शिल्पकाराने त्या मूर्तीची किंमत आठशे रुपये सांगितली. त्यांच्याकडे तर अवघेच दोन-अडीचशे रुपये होते म्हणून त्यानी शिल्पकारास आपली सर्व हकीगत सांगितली. पण, तो मूर्तीकार तेवढ्या रकमेस मूर्ती देण्यास तयार होईना. त्यामुळे हे तिघे अत्यंत खिन्न आणि उदासीन होऊन आपल्या बिऱ्हाडी परतले आणि आता यापुढे काय विचार करावा याची विवंचना करू लागले.

दुसऱ्याच दिवशी, त्या शिल्पकाराचा नोकर या तिघाना शोधीत शोधीत श्री चिंतामणरावांच्या घरी आला आणि आपल्या मालकाने त्याना लवकर बोलाविले असल्याचे त्याना सांगितले. त्या प्रमाणे श्री

पित्रेशास्त्री आणि श्री लक्ष्मण कामत हे दोघे त्या शिल्पकाराकडे गेले असता त्याने सांगितले की, "रात्री माझ्या स्वप्नात एक तेजस्वी साधू येऊन ती मूर्ती विनाविलंब आपणास देण्याचा आदेश त्याने मला दिला आहे. वास्तविक ही मूर्ती मी नेपाळ महाराजांच्या सांगण्यावरून केली होती. पण, त्यांचे आकस्मिकरित्या निधन झाल्यामुळे ती इथेच राहिली होती. यात मला दैवी सूत्र असावे असे दिसते. तरी श्रीदत्तगुरूंच्या प्रसादादाखल तुम्ही काही द्या, पण एकदा मूर्ती घेऊन जाण्याची कृपा करावी."

या तिघानी पूर्वी सांगितल्याप्रमाणे रक्कम देऊन ती मूर्ती घेतली. शिवाय, त्या मूर्तीकाराने मोफत तयार करून दिलेला पादुकाचा सुंदर जोड घेतला आणि श्रीदत्तमहाराजांच्या अगाध लीलेचे कौतुक करीत हर्षभरीत आनंदाने ते दोघेजण सांखळी गावात परतले. पणजीहून होडीने मूर्तीसह ते सांखळीस पोहोचले, त्यावेळी साखळी बंदरावर मूर्तीच्या स्वागतासाठी शेकडो लोक उपस्थित होते. तेथून वाजत गाजत मिरवणुकीने मूर्ती श्री बोडके यांच्या घरी ठेवण्यात आली. अशा रितीने मूर्ती मिळण्यात फार मोठी दैवी चमत्कार घडला.

या नव्या मूर्तीचा महिमा अगाध।

ही नवी मूर्ती श्री बोडके यांच्या घरात असतानाच तिच्या दिव्य साक्षात्काराची प्रचिती येऊ लागली.

श्री अनंत शेणवी बोडके यांची पत्नी हिला कधी काळी कुणी पिशाच्चाने पछाडले होते. परंतु घरातील मंडळीस त्याबद्दल कल्पनाच नव्हती. ती जे काही वेडेवाकडे चाळे करी, ते मेंदूच्या विकारामुळे होत अशी त्यांची समजूत होती. नवी मूर्ती घरात येताच एक आश्चर्यकारक प्रकार घडला ! त्या श्री अनंत शेणवी बोडके यांच्या पत्नीच्या अंगातील पिशाच्च एकदम बेफाम होऊन आणि त्या अवस्थेत ती त्वेषाने बोलू लागली :- "या तीन तोंडी पुरुषामुळे माझ्या अंगाची अगदी लाही लाही होत आहे, त्याकडे मला बघवत सुध्दा नाही. करिता त्यास ताबडतोब दूर न्या ! इथून दूर करा !" असे म्हणून घुमून खवळून ती बेशुध्द पडली आणि पिशाच्चापासून कायमची मुक्त झाली !

नव्या मूर्तीचा एवढा मोठा साक्षात्कार पाहून भक्तजनाचे ऊर भरून आले.

प्रतिष्ठापनेचा दिवस उजाडला. यजमान श्री विष्णू विठ्ठल शेणवी शेट्ये सकाळीच स्नान करून यज्ञकंकण बांधण्यास सिध्द झाले. वे. शा. सं. रंगाचार्य बुवा भट्ट शास्त्री, वे. शा. सं. सोयरू भट्ट सुखठणकर, वे. शा. सं. रामेश्वर शास्त्री दशग्रंथी, वे. शा. सं. कृष्णा शास्त्री महाले, वे. शा. सं. गणेश शास्त्री सुखठणकर, वे. शा. सं. रामेश्वर शास्त्री दशग्रंथी, वे. शा. शंकर भट्ट शास्त्री करंडे, वे. शा. सं. कृष्ण भट्ट शास्त्री बांदकर, वे. शा. सं. नारायण भट्ट शास्त्री हळदुर्के, वे. शा. सं. श्रीरंग भट्ट कामत, वे. शा. सं. विठ्ठल शास्त्री कामत, वे. शा. सं. वामन नायक करंडे शास्त्री, वे. शा. सं. नारायण भट्ट शास्त्री, दशग्रंथी इत्यादि विद्वान शास्त्री मंडळीनी मोठ्या उत्साहाने प्रतिष्ठापनेच्या वैदिक कार्यास प्रारंभ केला.

स्थापनाकार्य वासुदेवी प्रयोगानुसार पंचकुंडी विधानाने झाले. वैदिक विधी चित्रभानु संवत्सर शके १८०४ चैत्र शुक्ल पौर्णिमा पासून चैत्र वद्य द्वितिया बुधवार दि. ५ एप्रिल इसवी सन १८८२ पर्यंत चालले. या दिवशी दुपारी वेदमंत्रांच्या पवित्र घोषात आणि मंगल वाद्यांच्या गजरात श्रीदत्तमहाराजांची सुंदर त्रिमुखी मूर्ती आसनावर विराजीत झाली.

श्रीपादुकाचीही याच वेळी स्थापना झाली. परिवार देवता म्हणून श्रीच्या डाव्या बाजूस श्रीगणपती, उजव्या बाजूस श्रीमारुती व पार्श्वभागी श्रीअन्नपूर्णा देवीची स्थापना झाली. श्रीसन्निध्द बाण, शालिग्राम, नर्मदा गणपती आणि सुंदर नंदी ठेवण्यात आला.

स्थापना कार्य अत्यंत थाटामाटात आणि अत्यंत निर्विघ्नपणे पार पडले. गोमंतकाच्या कानाकोपऱ्यातून सुमारे सात आठ हजार लोकाचा समुदाय जमला होता. स्थापना झाल्यावर सर्वानी श्रीचे दर्शन घेऊन ओवाळणी केली. "काणिक" म्हणून श्रीच्या समोर असलेल्या ताटात यथाशक्ती प्रत्येकाने पैसे घातले आणि तीर्थ प्रसाद घेतला. यानंतर अन्नसंतपर्ण झाले. गुरे जलचर वगैरेंना अन्नदान देण्यात आले. रात्री देवालयात भजन, पुराण, कीर्तन वगैरे कार्यक्रम झाले आणि पुढे दोन तीन दिवस हा सोहळा चालूच होता.

अशा प्रकारे श्रीदत्तमहाराजांच्या इच्छा प्रेरणेमुळे सांखळी गावात स्मशानभूमी सारख्या एका निर्जनस्थळी एक भव्य देवालय उभे राहिले आणि श्रीनरसोबावाडीस श्री लक्ष्मण म्हाळू कामत याना स्वप्नात दृष्टांत देऊन जे श्रीदत्तमहाराजानी आश्वासन दिले होते की, 'भक्ता ! तू बिलकुल चिंता करू नकोस. तुझे सर्व मनोरथ पूर्ण होतील. लवकरच मी तुझ्या गावी येईन.' ते आश्वासन पूर्ण करून श्रीदत्त-महाराज सांखळी गावी येऊन राहिले. श्रीदत्तभक्ती आणि दृढश्रध्दा याची कशी काय प्रचिती येते हे या घटनेवरून दिसून येते.

श्रीदत्तमहाराजानी आपल्या अगाध लीलेने दाखविलेले सर्व साक्षात्काराचा अगदी संक्षिप्तपणे सुध्दा उल्लेख करण्याचे मनात आणले तर त्यासाठी एक वेगळाच ग्रंथ लिहावा लागेल, परंतु खालील दोनच गोष्टीचा उल्लेख करून इतराचा स्थलाभावामुळे करणे अशक्य आहे.

शके १८९१ श्रावण शुक्ल अष्टमी, गुरुवार ता. २१ ऑगष्ट १९६९ पहाटेच्या सुमारास म्हणजे बुधवार-गुरुवार रात्री, श्रीदत्तमहाराजांच्या देवालयात चोरी होऊन त्यात पंचधातूची उत्सवमूर्ती, चांदीच्या चंवऱ्या, भालदार काठ्या व आणखी काही चांदीची भांडी मिळून सुमारे आठ दहा हजार रुपये किमतीचा ऐवज नेण्यात आला. मालमत्तेबद्दल कुणाला विशेष फिकीर वाटली नाही. पण, श्रीची उत्सव मूर्तीच चोरीस गेल्यामुळे लोकात तीव्र धक्का बसला. कारण त्या मूर्तीच्या स्वरूपात लोकाची श्रध्दाच जणू चोरीस गेली असे प्रत्येकास वाटले. प्रत्येकाच्या डोळ्यातून अश्रुधारा दिसू लागल्या ! जेवणाचा घास गोड लागेनासा झाला. फक्त, ती मूर्ती परत मिळावी, हाच ध्यास सर्वांना लागला. गोमंतकात या कालात पुष्कळ देवा-लयात चोऱ्या झाल्या होत्या आणि बहुताशी त्याचा शोध लागला नव्हता, म्हणूनच तर फार काळजी व दुःख वाटत होते.

गुरुवारी रात्री जनतेने देवालयात जमून श्रीकडे प्रार्थना करून गाऱ्हाणे घातले की, दुरावलेली मूर्ती परत देवालयात यावी. याबाबत काही दैविक मार्गानी प्रश्नाची उत्तरे काढण्यात आली. त्यावेळी आपण प्रयत्नरत रहा, यश निश्चित आहे असे उत्तर मिळाले. त्यामुळे उत्साहीत होऊन लोकानी रात्री बेरात्री जंगल, नदी, नाले पालथे घातले. मूर्ती खचित मिळेल असा विश्वास वाटत होता म्हणून लोकानी शोधाशोध चालूच ठेविली. ता. २७ बुधवारी देवालयात शुध्दीकरण विधी करण्याचे ठरले. गुरुवारी चोरी झाली होती. त्यानंतर शुक्रवार, शनिवार आणि रविवार असे तीन दिवस उलटले तरी चोरीचा धागाही सापडेना. पण चोरी झाल्याच्या चौथ्या दिवशी सोमवारी पहिला धागा सापडला.

सांखळीहून सुमारे १०-१२ मैलावर असलेले नानोडे या गावी सोमवार सकाळी एका लोखंडाच्या खाणी-वरील एका निर्जन झोपडीत कुणा मजुरास चांदीची एक पादुका सापडली. त्याच दिवशी त्या खाणीवर आलेल्या कंपनीच्या अधिकाऱ्याने सदर माहिती पोलीसाना कळविली.

श्रींस कौल लावले असता, आपण शुध्दीकरणापूर्वी तुम्हास मूर्तीचे दर्शन देतो असे सांगितले. चोरी झाल्याच्या बरोबर सहावे दिवशी म्हणजे शुध्दीकरण विधी दिनी बुधवारी पहाटेस सांखळीहून सुमारे १२-१४ मैलावर असलेल्या महाराष्ट्र-गोवा सरहद्द नजीकच्या दोडामार्ग या ठिकाणी पोलीस चौकीपासून काही अंतरावर श्रीदत्तमहाराजांच्या उत्सव मूर्तीचे दर्शन घडविले. सर्वत्र आनंदी आनंद झाला. आणि थोड्या दिवसापूर्वीपासून डोळ्यात दुःखाश्रूच्या धारा दिसत होत्या त्याचे रूपांतर आनंदाश्रूत झाले, सर्वांची अंतः-करणे उचंबळून आली आणि ही किमया पाहून सर्व लोक श्रीदत्तमहाराजांचे चरणी नतमस्तक झाले. नंतर या उत्सव मूर्तीचे देवालयात प्रचंड मिरवणुकीनशी रविवार ता. १२ आक्टोबर १९६९ आश्विन शुक्ल प्रतिपदा शके १८९१ दिवशी संध्याकाळी मोठ्या उत्साहात सुस्वागत करण्यात आले.

जाज्वल्य प्रचीतीचा आणखी एक अनुभव

"श्रीसंस्थान दत्तवाडी सांखळी (इतिहास)" लेखक : श्रीयुत गुरुदास ज. लवंदे पुस्तकाचे प्रथम प्रका-शन डिसेंबर १९६६ मध्ये मार्गशीर्ष शुक्ल पौर्णिमा शके १८८८ मध्ये झाले. या पुस्तकावर सुरुवातीलाच

देवालयातील गर्भागारात असलेल्या श्रीदत्तमहाराजांच्या मूर्तीचा फोटो छापलेला आहे. जवळ जवळ दीड वर्षापूर्वी सदर फोटोने पणजी शहरातील एका प्रतिष्ठित घराण्यातील घरंदाज महिलेच्या अंगावर कित्येक वर्षे सुप्तावस्थेत असलेल्या एका पिशाच्चाला उघडकीस आणले ! काही वर्षापासून ती मीहला अनारोग्याने पछाडली होती आणि तिला औषधोपचारानी काही गुण येत नव्हता. एक दिवस योगायोगाने सदर मीहलेची दृष्टी पुस्तकावरील श्रीदत्तमहाराजांच्या फोटोकडे जाताच ती घूमू खुवळू लागली आणि तिच्यावरच्या पिशाच्चाने त्यांच्या घरातील काही जुन्या गोष्टींचे दाखले सांगितले.

या प्रकाराने सर्व मंडळी आश्चर्याने थक्क होऊन त्यानी भक्तीभावाने श्रीदत्तमहाराजांचे चरणी हात जोडले. केवढी मोठी जाज्वल्य प्रचीती ही ! या पाहण्यास लहान घटनेचे महत्व फार मोठे आहे.

देव भावाचा भुकेला. भक्तीभाव, निष्ठा आणि दृढश्रध्दा असलेल्या भक्तास या श्रीक्षेत्र सांखळी येथे जे अनुभव येतात आणि मनोरथ पूर्ण होतात, त्याची गणना नाही. श्रीदत्तमहाराजांचे दैवत अत्यंत जागृत व साक्षात्कारी आहे. ज्यानी ज्यानी त्या स्थलात राहून निष्ठापूर्वक सेवा केली त्या सर्वास महाराजांनी आपल्या कृपाप्रसादाने आज पर्यंत हजारो दुःखी कष्टी जीवाना, रुग्णाईत, पीडीत, तसेच भूत, प्रेत, पिशाच्च, समंधबाधा झालेल्याना पूर्णपणे बरे केलेले आहे. तसेच, असंख्य लोकाना स्वप्नात व प्रत्यक्षात दृष्टांत देऊन आपल्या साक्षात्कार, चमत्काराच्या अनेक, अगाध, अतर्क्य, अघटित घटनानी पडताळा आणून दिला आहे.

सध्याच्या कालात व्याधी उपाधीतून सुटण्यासाठी कित्येक सेवेकरी महाराजांची अनन्यभावे, श्रध्देने, निष्ठेने, रात्रं-दिवस सेवा करीत असलेले तेथे पाहण्यात येतात.

श्रीदत्त देवस्थानात नानाविध कार्यासाठी हजारो लोकानी सेवा कार्य केले हे खरेच पण, त्यातही खालील सेवाकार्याचा उल्लेख करावाच लागेल.

सांखळी येथे श्रीदत्तमहाराजांच्या देवालयाच्या इमारती बांधकामात प्रारंभापासून ते पूर्णत्वास पावेपर्यंत सांखळी गावातील जनतेने अक्षरशः तहान भूकेची पर्वा न करता स्वतः जातीने जीवापाड खपून श्रमदान करून परीश्रम केले आणि त्यातूनच देवालयाची भव्य वास्तू उभी झाली हे मागे सांगितलेच आहे. देवालय बांधून पूर्ण झाल्यानंतर देवालयात सेवा, दैनंदिन पूजा अर्चा करणारे वैदिक ब्राम्हण, भटजी, पुजारी याना देवालयासन्निध त्यांची निवासस्थाने असल्याशिवाय काम सुरळीत आणि नियीमत चालणे अशक्यच होते. ही अडचण तांतडीने लक्षात घेऊन, मुंबई येथील एक सद्गृहस्थ दत्तभक्त श्री शांताराम नारायण दाभोळकर यानी स्वखुषीने या देवस्थानात देवालयाच्या उजव्या बाजूस उंचवट्यावर सर्व गरजेच्या सोयीनी युक्त अशी बरीच लांब अग्रशाळा बांधून वरील अडचण दूर केली व आणखीही बऱ्याच अडचणी त्या बांधकामामुळे दूर होऊन, देवस्थानात श्रध्दावान भाविक येत असतात, त्यांच्याही गैरसोयी दूर होण्यास महत्वाची मदत झाली. श्री शांतारामराव दाभोळकर यानी आपल्या हयातीत देवाने आपणास दिलेल्या धनाचा उपयोग नानाविध सामाजिक, धार्मिक आणि सार्वजनिक कार्यासाठी सढळ हाताने केला असला, तरी ते फार दत्तभक्त असल्याने श्रीदत्तदेवस्थानात कोणत्याही कामात पैशाची अडचण येऊ देत नसत व तशी संधी कधीच वाया न घालता श्रीदत्तमहाराजांचे चरणी सेवाभावे आपणास पैसे खर्च करण्याची सुद्बुध्दि दिल्याबद्दल धन्यता मानून श्रीगुरुदेवदत्त महाराजाचे चरणी विनम्र भावाने आभार मानून कृतार्थ होत.

अशाच प्रकारे, पणजी, शहरातील 'शेणवी धेंपे' हे परंपरेने चालत आलेले दानशूर घराणे या श्रीदत्त देवस्थानात अपार श्रध्देने प्रतिवर्षी हजारो रुपये खर्च करून मार्गशीर्ष महिन्यात श्रीदत्तजयंतीचा महोत्सव मोठा थाटात साजरा करण्यात आपल्या धनाचा सदुपयोग करून महान् पुण्याची आणि श्रीगुरूदेवदत्तमहाराजांची सदैव आपल्या सर्व कुटुंबावर कृपादृष्टी असावी अशी इच्छा धरून मनोभावे सेवा करीत असल्याचे पाहण्यात येते.

श्रीदत्तनवरात्रात रात्रौं कथा कीर्तन करणारा हरिदास मुद्दाम नामांकित असा शोधून आमंत्रित असतो. श्रीदत्तजयंतीच्या दुसऱ्या दिवशी दुपारी, महानैवेद्य प्रसाद संतर्पण, भोजनास सहस्त्रावधी लोकांच्या पंक्ती एकसारख्या भरून तृप्त होतात ! पाच हजार लोक तरी खचित या महाप्रसादाचे सेवन करतातच.

त्यात पती-पत्नी दंपत्ती भोजन किती हजार हे त्या श्रीदत्तमहाराजांसच ठाऊक ! आजच्या कालात असे सहस्त्रावधी लोकाना पक्वान्नांसह तृप्त होईपर्यंत भोजन समारंभ पार पाडणे किती कठिण, कष्टप्रद आणि महान् खर्चाचे आहे हे सर्वांनाच माहित आहे. पण हा समारंभ अगदी सुव्यवस्थितपणे त्या श्रीदत्तमहाराजांच्या कृपेमुळेच सुरळित चालत आलेला आहे. आणि आश्चर्याची घटना म्हणजे ही महाप्रसादाची सेवा मार्गशीर्ष वद्य प्रतिपदा (श्रीदत्तजयंतीच्या दुसऱ्या दिवशी) "शेणवीं धेंपे" या घराण्याकडून होत असते. त्या घराण्यातील वैं. वासी विष्णु गिरिधर शेणवीं धेंपे यानीच ही सेवा सुरू केली होती. त्यांचे निधन याच तिथीस झाल्यामुळे, हा सोहळा भोजन समारंभही त्यांचे श्राध्दाचेच दिवशी श्रीदत्त देवस्थानात योगायोगाने घडून येतो. हे पाहिल्यावर सहजासहजी आपोआप तोंडातून उद्‌गार येतात, "धन्य ते धेंपे कुटुंब आणि धन्य तो पुण्यात्मा.'

अशा या महान् साक्षात्कारी देवालय स्थापनेस चैत्र वद्य द्वितीया शके १९०४ तारीख १० एप्रिल १९८२ या दिवशी शंभर वर्ष पूर्ण झाली आहेत. त्यानिमित्ताने श्रीसंस्थान दत्तवाडी शताब्दी महोत्सव समिती स्थापन होऊन त्या समितीने त्यावेळी महाजन भक्ताना जे आवाहन केले होते, तसेच शताब्दी सोहळ्यानिमित्त जी अनुष्ठाने झाली त्यांची माहिती अशी :-

॥ श्री गुरुदेव दत्त प्रसन्न ॥

काषाय वस्त्रं करदंड धारिणं । कमंडलुं पद्म करेण शंखं ॥
चक्रं गदा भूषित भूषणाढ्यम् । श्रीपाद राजं शरणं प्रपद्ये ॥१॥

औदुंबरः कल्पवृक्षः कामधेनुश्च संगमः ।
चिंतामणिः गुरोः पादौ दुर्लभौ भुवनत्रये ॥ २ ॥

कृते जनार्दनो देव स्त्रेतायां रघुनंदनः ।
द्वापारे रामकृष्णोच्च कलौ श्रीपाद वल्लभ ॥ ३ ॥

श्री संस्थान दत्तवाडी शताब्दी महोत्सव समिती

सांखळी, गोंवा ४०३ ५०५

महाजन भक्ताना आवाहन

स. न. वि. वि.

महाशय,

श्रीक्षेत्र दत्तवाडी, सांखळी गोंवा येथील जागृत दत्त मंदिराच्या **स्थापनेस येत्या चैत्र व॥ २ या शके १९०४ दिनांक १० एप्रिल १९८२ या दिवशी शंभर वर्षे पूर्ण होतात**, ही आम्हा सारस्वताना व सर्व भक्तजनाना अत्यंत अभिमानाची गोष्ट आहे. या दैवताची व मंदिराची महती देशभर सर्वश्रुत आहे. देवस्थानच्या पवित्र व प्रासादिक परिसरात पाऊल ठेवणाऱ्या व वास्तव्य करून राहिलेल्या प्रत्येक भक्ताला भौतिक मोहजालातून सुटका होऊन अध्यात्मिक साधनेचा अनुभव व मनःशांती प्राप्त झाल्यावाचून राहत नाही. असाध्य रोगांपासून अनेक खडतर समस्या सोडविण्याच्या दिव्य चमत्कारीक घटनाबद्दल या देवस्थानची ख्याती आहे. अत्यंत प्रतिकूल परिस्थितीत अशा या मंदिराची ज्या संस्थापकांनी, स्थापना केली, त्यांचे कार्य अधिक जोमाने पुढे नेणे हे आमचे आद्य कर्तव्य असे आम्ही मानतो.

देवस्थानच्या घटनेप्रमाणे, भारतातील समस्त सारस्वत समाज, त्यांच्या कौटूंबिक दैवता खेरीज या मंदिराचा महाजन आहे

कॅक अभिमानी भक्तांच्या मनात हा शताब्दी सोहळा भव्य प्रकारे साजरा करावा असे आले. तीच गुरू प्रेरणा असे मानून, संस्थान कमिटीने महाजन भक्तांची सर्वसाधारण बैठक आयोजित केली (४ जुलै १९८१) व या बैठकीत महोत्सव मोठ्या प्रमाणावर साजरा करावा असा निर्णय घेण्यात आला व महोत्सवाचा आराखडा व इतर आनुषंगिक गोष्टी ठरविण्यात आल्या. तदनुसार निरनिराळ्या कमिट्यांची स्थापना झाली (२ ऑगष्ट १९८१).

सदर शताब्दी महोत्सव येत्या चैत्र शु॥ १० मी. शनिवार दि. ३ एप्रिल १९८२ ते चैत्र, कृ॥ २ या शनिवार दि. १० एप्रिल १९८२ पर्यंत साजरा होणार आहे. महोत्सवास श्री गोकर्ण पर्तगाळ मठाधीश, श्रीमत् विद्याधिराजतीर्थ स्वामी महाराज, श्री कैवल्य मठाधीश, श्रीमत् सच्चिदानंद स्वामी महाराज या उभयतांचे सान्निध्य, आशीर्वाद व मार्गदर्शन लाभणार आहे. श्री काशीमठाधीश श्रीमत् सुधींद्रतीर्थ स्वामी महाराजांच्या उपस्थितीचाही लाभ मिळेल अशी आशा आहे.

महोत्सवाचा एकंदर तपशीलवार कार्यक्रम योग्य वेळी आपणास सादर केला जाईल. तत्पूर्वी ढोबळ मानाने बांधलेल्या अंदाजाप्रमाणे, **महोत्सवाचा खर्च व महोत्सवाच्या निमित्ताने करण्यात येणारी मंदिराची दुरुस्ती, शताब्दी महोत्सवाचे स्मारक व इतर गोष्टी यांचा नियोजित खर्च रु. ५,२०,००० येईल असा अंदाज आहे.** यातील अर्धा अधिक खर्च मंदिर दुरुस्ती, स्मारक अशा कायम स्वरूपाच्या गोष्टींवर होणार आहे.

बहुतेक कामे फेब्रुवारी १९८२ पर्यंत निर्धाराने पुरी केली जातील. या महान् कार्यात सहभागी होण्यासाठी आपल्या देणग्या आपण समितीस त्वरीत पाठवाव्या व श्रीगुरुमहाराजांच्या कृपाप्रसादास पात्र व्हावे, अशी आपणापाशी कळकळीची विनंती आहे.

श्रीगुरुमहाराजांच्या कृपाप्रसादाने, व श्रीस्वामीत्रयीच्या आशीर्वादाने तसेच आपणा सर्वांच्या सहकार्याने हे प्रचंड कार्य सुरळीत पार पडेल असा ठाम विश्वास आहे. आपल्या सहभागाची अपेक्षा करीत आहो.

आ. न.

श्रीसंस्थान दत्तवाडी शताब्दी महोत्सव समिती, सांखळी

मिती, श्रावण शु॥ ६ ष्ठी शके १९०३

सांखळी, गुरुवार दि. ६ ऑगष्ट १९८१

श्री क्षेत्र दत्तवाडी, सांखळी, गोवा

शताब्दी सोहळ्यानिमित्तचे अनुष्टान

श्री शके १९४० दुंदुभिनामसंवत्सर, चैत्र शुक्ल दशमी शनिवार ता. ३ एप्रिल १९८२ पासून, चैत्र कृष्ण द्वितीया, शनिवार ता. १० एप्रिल १९८२ पर्यंत श्रीदत्तात्रय देवसंनिधी करणेचे अनुष्ठान

ब्रम्हणस्पतिसूक्त, जपहोम

महाविष्णु, पुरुषसुक्त, विष्णुसुक्त जपहोम

महारुद्र, रुद्रसुक्त जपहोम

गणपति अथर्वशीर्ष गणपतिसुक्त जपहोम

सौरसुक्त जपहोम

भूमिकादेवीस शतचंडीजप
नवग्रह वास्तु शांति
दत्तनवाक्षर मंत्र जपहोम (ॐ ॐदं दत्तात्रेयाय नमः)
शतकलशाभिषेक
नित्य पंचविंशतीकलशाभिषेक पूर्वक महापूजा
श्रीसूक्त जपहोम
मन्युसूक्त जपहोम
७ श्रीगुरु चरित्र सप्ताह

शताब्दी सोहळ्या निमित्ताने श्रीदत्तदेवस्थाना समोरच्या बाजूस उभारलेले स्मारक शिल्प

श्रीदत्तमंदिराच्या शताब्दी महोत्सवाच्या निमित्तानं मंदिराच्या आवारात एखादं रमणीय स्मारक-शिल्प उभारावं अशी महोत्सव समितीची इच्छा झाली आणि तें मूर्त स्वरूपात आणण्यासाठी आराखडा तयार करणं जरुरीचं होतं. या प्रसंगाला साजेशा शिल्पाची कल्पना सुचविण्याची संबंधितानी श्री कवीवर्य बाळकृष्ण भगवंत शेणवीं बोरकर यांकडे मागणी केली. सांखळीच्या श्रीदत्तमहाराजांचाच हा आदेश आला आहे असें कवीवर्य बा. भ. बोरकर यानी मानलें आणि ते म्हणाले, "मंदिराच्या आवारातील डावीकडील कोपऱ्याला अर्धचंद्राकृती कृत्रिम तलाव तयार करता येत असेल तर त्याच्या अंतररेषेला जोडून एक उतार असलेला उंचवटा बांधावा. त्याच्या पायथ्याशी संगमरवरी छोट्या चबुतऱ्यावर शुभ्र संगमरवरी पादुका बसवाव्या. पादुका म्हटल्या की, त्या श्रीदत्तगुरुच्या हा संकेत हिंदु मनात जागा असतोच. उंचवट्याच्या उतारावर एक कपिला वाकून त्या पादुकाना हुंगते आहे असें दाखवावें ती कपिला आहे हें स्पष्ट जाणवावें, यासाठी ती काळ्या संगमरवरची असावी. श्रीदत्तमहाराजांच्या कोणत्याहि चित्रात गाय असतेच, ती पृथ्वीचें प्रतीक मानली जाते. गाईबरोबर चार कुत्रेही श्रीदत्तमहाराजां समोर असतात, ते वेदाचे द्योतक आहेत. ते श्रीदत्तमहाराजांचे निष्ठावंत सेवक असून नेहमी त्यांच्याआवतीभोवती असतात. हे कुत्रे पादुकाच्या आवती भोवती चार वेगवेगळ्या पवित्र्यात दाखवावे. अर्थातसंगमरवरातच. मात्र ते वेगवेगळ्या जातीचे दिसले पाहिजेत, आकर्षक दिसले पाहिजेत आणि तरीहीअस्सल भारतीय वाटले पाहिजेत."

संबंधिताना ही शिल्पकल्पना एकदम पसंत पडली, आणि त्यानी त्याच्या भावार्थावर उचित प्रकाश पाडील आणि हे मंदिराच्या शताब्दि महोत्सवाचें स्मृतिचिन्ह आहे असा बोध होईल असा श्लोक आम्हाला तुमच्याकडून हवा आहे तो योग्य ठिकाणी संगमरवरात कोरून आम्ही बसवू असें संबंधितानी कवीवर्य बोरकर याना सांगितलें. श्री बोरकरानी होकार देऊन, ठीक आहे असें सांगितलें व श्लोक लिहून दुसऱ्या दिवशीच त्यानी इच्छूकाकडे दिला तो श्लोक असा :-

श्रीदत्ता ! तव पादुका स्थिर जिथे तीर्थे तिथे वोळती ।
चारी वेद सुणे बनून जवळी त्याच्याच रेंगाळती ॥
पृथ्वी होउनि कामधेनु कपिला त्यांची युती हुंगते ।
पुण्यक्षेत्र-शताब्दि-शिल्पकृति ही कीर्ती तुझी सांगते ॥ १ ॥

कवीवर्य बोरकरानी सुचविल्याप्रमाणे स्मारक शिल्प मूर्त स्वरूपात उभें राहिलें आहे,

श्रीक्षेत्र सांखळी येथील श्रीदत्तमहाराजांच्या देवालयात प्रतिवर्षी होणारे महत्वाचे उत्सव

चैत्र

शु. १ (वर्ष प्रतिपदा) रात्रौं रौप्य शिबिकोत्सव.
शु. ९ (रामनवमी) रात्रौं शिबिकोत्सव.
शु. १५ रात्रौं शिबिकोत्सव.
व. २ (वर्धापन दिन) दुपारी अन्नसंतर्पण, रात्रौं शिबिकोत्सव.
व. १३ (अक्कलकोट स्वामी पुण्यतिथी) रात्रौं रौप्य शिबिकोत्सव.

वैशाख

शु. ३ (अक्षय्य तृतीया) रात्रौं शिबिकोत्सव, वसंत पूजा

शु. १५ रात्रौं शिबिकोत्सव.

ज्येष्ठ

शु. १५ रात्रौं शिबिकोत्सव.

आश्विन

शु. १० (दसरा) संध्याकाळी सीमोल्लंघनासह रौप्य शिबिकोत्सव.

शु. १५ (कोजागिरी) रात्रौं शिबिकोत्सव.

व. १२ (गुरुद्वादशी) दुपारी अन्नसंतर्पण, रात्रौं रौप्य शिबिकोत्सव.

व. ३० (लक्ष्मीपूजन) रात्रौं शिबिकोत्सव.

कार्तिक

शु. १० रात्रौं शिबिकोत्सव.

शु. ११ रात्रौं शिबिकोत्सव.

शु. १४ (वैकुंठ चतुर्दशी) रात्रौं शिबिकोत्सव.

शु. १५ (त्रिपुरी पौर्णिमा) रात्रौं शिबिकोत्सव.

मार्गशीर्ष

शु. १५ (दत्तजयंती) संध्याकाळी दत्तजन्मोत्सव, रात्रौं रौप्य शिबिकोत्सव.

व. १ दुपारी अन्नसंतर्पण, रात्रौं ललित कार्यक्रम.

व. २ रात्रौं शिबिकोत्सव.

पौष

शु. २ या (नृसिंह सरस्वती जयंती) रात्रौं शिबिकोत्सव

शु. १५ रात्रौं शिबिकोत्सव.

माघ

शु. ७ (रथसप्तमी) रात्रौं शिबिकोत्सव.

शु. १५ रात्रौं शिबिकोत्सव.

व. १ (गुरु प्रतिपदा) दुपारी अन्नसंतर्पण, रात्रौं रौप्य शिबिकोत्सव.

व. २ संध्याकाळी शांतापारावरील पेण्यासह शिबिकोत्सव

व. १४ (महाशिवरात्र) रात्रौं चतुःप्रहरी पूजा झाल्यावर पहाटे शिबिकोत्सव.

व. ३० संध्याकाळी शिबिकोत्सव.

फाल्गुन

शु. १५ रात्रौं शिबिकोत्सव.

देवस्थानात होणाऱ्या शिबिकोत्सवाची माहिती

श्रीक्षेत्र सांखळी येथे श्रीदत्तमहाराजांच्या देवस्थानात उत्सव प्रसंगी आणि प्रत्येक पौर्णिमेस शिबिकोत्सव होत असतो. रात्रौं १०॥ वाजता पालखी देवालयाबाहेर निघते, आणि देवालयाची प्रदक्षिणा करून देवालयात परत येते. ज्येष्ठ पौर्णिमेचा शिबिकोत्सव हा चातुर्मास पूर्व शेवटचा शिबिकोत्सव. त्यानंतर आषाढ ते भाद्रपद हे तीन महिने शिबिकोत्सव होत नाही. आश्विन शुक्ल दशमी-विजयादशमी पासून शिबिकोत्सवास प्रारंभ होतो.

गुरुद्वादशी, गुरुप्रतिपदा, श्रीदत्तजयंती, वर्धापन दिन या उत्सव दिवशी रौप्य शिबिकेतून आणि अन्य उत्सवात लाकडी शिबिकेतून श्रीची मिरवणूक होत असते. रंगीबेरंगी वस्त्रानी व सोन्या चांदीच्या गोंड्यानी पालखी श्रृंगारण्यात येते. गर्भागारात श्रीच्या त्रिमुखी मूर्तीच्या आसनाखाली असलेली श्रीची एकमुखी पंचधातूंची मूर्ती ज्या मूर्तीस उत्सव मूर्ती म्हणतात ती मूर्ती शिबिकेत बसते. नंतर तिची पूजा झाल्यावर शिबिका प्रदक्षिणेस बाहेर निघते.

पालखी बरोबर दोन इसम चांदीने मढविलेल्या 'भालदार' काठ्या हातात घेऊन अंगावर तांबड्या लोकरी वस्त्राचा पट्टा चढवून असतात आणि त्याशिवाय इतर आणखी इसम अबदागीर, छत्र, चवऱ्या वगैरे घेऊन पालखीबरोबर लवाजमा असतो. महाजन मंडळीच पालखी वाहविण्याचे काम करतात. देवालयाभोवती पालखीची प्रदक्षिणा करताना वाटेत एकंदर नऊ पेणी (मुक्काम) होतात.

पहिले पेणे मंडपात होत असते. दुसरे पेणे चौघड्याच्या इमारतीजवळ असलेल्या अश्वत्थाच्या पाराजवळ होते. तिसरे पेणे देवालयाच्या डाव्या बाजूकडील द्वाराच्या थोड्या अलिकडे होते. चौथे पेणे देवालयाच्या डाव्या बाजूच्या द्वाराजवळ होते. पाचवे पेणे देवालयामागे असलेल्या औदुंबर पाराजवळ होते.

सहावे पेणे देवालयाच्या उजव्या बाजूकडील द्वाराजवळ होते. सातवे पेणे उजव्या बाजूच्या द्वाराच्या जरासे पुढे होते. आठवे पेणे देवालयासमोर असलेल्या दीपस्तंभाजवळ होत असते आणि नववे पेणे परत सभामंडपात होत असते. पालखी प्रदक्षिणा करताना 'दत्त हा ब्रम्हचारी ब्रम्हचारी । त्रिभुवनात ज्यांची फेरी ॥, धन्य धन्य हो प्रदक्षिणा सद्‌गुरुरायाची । जाहली त्वरा सुरवरा विमान उतरायाची ॥' ही प्रदक्षिणा पदे म्हणण्यात येतात. पालखी थांबल्यावर अष्टक म्हणण्यात येते. प्रत्येक पेण्याच्या वेळी एक पद व एक अष्टक म्हणण्यात येते. नऊही पेणी व त्याची पदे आणि अष्टके वेगवेगळी असतात. ती म्हणून झाल्यावर उत्सव मूर्तीवरून श्रीफलाने निंबलोण उतरविण्यात येते. त्यानंतर त्या समयी निंबलोण पद म्हणतात.

पालखी देवालयातील चौकावर येते. उत्सव मूर्ती पालखीतून काढून आसनावर ठेवीपर्यंत 'धावा' म्हणतात. त्यानंतर आरत्या करण्यास प्रारंभ होतो. आरत्या करून होताच नित्य भजन होऊन उपस्थित मंडळीस तीर्थप्रसाद देण्यात येतो.

देवालयाचा दैनंदिन कार्यक्रम

दररोज पहाटे ५ वाजता चौघडा वादन आणि त्यानंतर सकाळी ६ वाजता निर्माल्य विसर्जन. ११ वाजता परत चौघडा वाजण्यास सुरवात होते. श्रीच्या महापूजेस रुद्राभिषेकाने प्रारंभ होतो. सर्व परिवार देवता आणि पादुकाचीही पूजा होते. मूर्ती वस्त्रालंकार आणि सुवासिक सुंदर फुलानी सजविण्यात आल्यावर १२॥ वाजता आरत्या आणि महानैवेद्य होतो. नंतर तीर्थ प्रसाद झाल्यावर सेवेकऱ्यास महानैवेद्यातून माधुकरी देण्यात येते. नंतर गर्भागाराचा दरवाजा दुपारी तीन पर्यंत बंद असतो.

तीन वाजता गर्भागारातील दिवे पुनः प्रज्वलीत करण्यात येतात. दर द्वादशी तिथीस आरत्या आणि महानैवेद्य दुपारी ११ वाजता होत असतो. सायंकाळी ५॥ वाजता नौबत आणि ६॥ ते ७॥ पर्यंत धुपारत व सायंकाळच्या आरत्या होतात. त्यानंतर मंत्रपुष्प होऊन भजनास प्रारंभ होतो, आणि उपस्थितांस तीर्थप्रसाद देण्यात येतो. भजनाचे वेळी चौकावरील आसनावर वस्त्र घालण्यात येते, त्यास श्रीचे न्यायासन म्हणतात. श्रीदत्त महाराज भजन ऐकण्यासाठी आसनावर स्थानापन्न होत असतात अशी यामागे भावना आहे. भजन संपल्यावर शेजारत्या, विडा, प्रार्थना वगैरे झाल्यावर ८॥-८॥। च्या दरम्यान देवालयाचे दरवाजे बंद होतात.

सुप्रसिद्ध आणि वैशिष्ट्यपूर्ण उत्सव श्रीदत्तजयंती

श्रीक्षेत्र सांखळी येथील श्रीदत्तमहाराजांच्या देवालयात सर्वात मुख्य आणि सुप्रसिध्द महोत्सव म्हणजे मार्गशीर्ष पौर्णिमेला होणारा श्रीदत्तजयंतीचा उत्सव होय. या देवस्थानात होणारा हा प्रमुख उत्सव म्हणजे गोमंतकातील सुप्रसिध्द आणि वैशिष्ट्यपूर्ण उत्सव आहे. मार्गशुक्ल सप्तमी पासून श्रीदत्त नवरात्राने या महोत्सवास प्रारंभ होत असतो. दररोज रात्री ९ वाजण्याच्या सुमारास कीर्तने होतात. पौर्णिमेच्या दिवशी सकाळी भक्त भाविकाकडून देवास अभिषेक, लघुरुद्र वगैरे करण्यात येतात. दुपारी तीनच्या सुमारास कीर्तनास आरंभ होतो. पाच-सव्वापाच वाजता श्रीदत्त जन्माचा सोहळा होतो. चौकावर एका सुशोभित मखरात श्रीदत्तमहाराजांची उत्सवमूर्ती स्थानापन्न होत असते, आणि पाळण्यात बालदत्तमूर्ती ठेवण्यात येऊन पाळणा म्हणतात. त्यापूर्वी उपस्थित लोकाना गुलाल मिश्रित पुष्प पाकळ्या वाटण्यात येतात. चौघडा, फटाक्यांच्या गजरात श्रीदत्त जन्म झाल्यावर लोक पुष्प पाकळ्या त्या देवावर उधळतात. नंतर उपस्थिताना सुंठवडा वाटण्यात येतो. दर्शनोत्सुक लोक देवदर्शन घेताना द्रव्याने ओवाळणी "काणिक" करतात. रात्रौ १० वाजता रौप्य शिबिकेतून श्रीची मोठ्या थाटात मिरवणूक निघते. उपस्थिताना तीर्थ प्रसाद वाटण्यात येतो. दुसऱ्या दिवशी म्हणजे मार्गशीर्ष वद्य प्रतिपदा दिवशी दुपारी अन्नसंतर्पण व रात्रौ ९ वाजता "ललीत" (नाटकाचा जुन्या कालीन प्रकार) होत असते. हे ललीत इतके आकर्षक आणि तन्मय करणारे असते की, त्याचे वर्णन करून कल्पनेत येणारे नव्हे. एकदा ते ललीत पाहिलेला प्रेक्षक दर-

वर्षी नेमाने मुद्दाम हजर राहण्याचा प्रयत्न करीत असतो. नंतर आशीर्वाद प्रदान झाल्यावर श्रीदत्तजयंती उत्सवाची सांगता होते.

या उत्सवासाठी गोव्यातूनच नव्हे तर कारवार, कोंकण भागातील पुष्कळच लोक येतात. हजारो लोकांची गर्दी असते. इतर देवस्थानातील उत्सवात नाटके व जुगारादि प्रकाराना या देवस्थानात मुळीच थारा नसतो, हे ही या देवस्थानाचे वैशिष्ट्यच समजले जाते.

उत्सव सांगता झाल्यावर म्हणजे मार्गशीर्ष वद्य द्वितीया तिथीस देवालयात अर्चाशुध्दी होत असते, आणि आठ दहा दिवसाच्या जागरणा निमित्त श्रींस काढा देण्यात येतो. हा काढा इतका सुवासिक आणि रुचकर असतो की, त्यावर माहितगार भक्तजन अक्षरशः उड्या घेऊन त्या नैवेद्याच्या काढ्यातील एक पळीभर काढा आपणास मिळावा यासाठी प्रयत्नशील असतात.

श्रीक्षेत्र सांखळी येथील श्रीदत्तमहाराजांच्या देवालयाचा आणि त्या देवस्थानचा संपूर्ण सविस्तर सर्वांगीण इतिहास समजून घेण्याची इच्छा असलेल्यानी मुद्दाम "श्रीक्षेत्र दत्तवाडी सांखळी" (इतिहास) लेखक श्री गुरुदास ज. लवंदे हे पुस्तक वाचावे. त्या देवस्थानाची बारीक सारीक सविस्तर माहिती श्री लवंदे यानी प्रयत्नपूर्वक गोळा करून आणि संकलन करून श्रीदत्त भक्तासाठी फार मोठी सेवा करून ठेविली असल्याने त्यांचे अभिनंदन करून उपकार मानावे तेवढे थोडेच असे स्पष्ट उद्गार ते पुस्तक वाचल्यानंतर तोंडून सहज बाहेर येतात. वरील लिखाणात त्या पुस्तकाचाही मला फार उपयोग झाला म्हणून मी कृतज्ञतापूर्वक नमूद करून त्यांचे आभार मानतो. शेवटी संत तुकाराम महाराजानी जी मागणी केली तीच मी मनोभावे आणि श्रध्दापूर्वक करून वाचकांचा निरोप घेतो.

नमन माझें गुरुराया । महाराज दत्तात्रेया ।
तुझी अवधूत मूर्ति । माझ्या जीवाची विश्रांती ॥
माझ्या जीवींचें सांकडें । कोण उगवील कोडें ।
अनसूया सुता । तुका म्हणे पाव आतां ॥१॥

१२

श्रीपांडुरंग देवस्थान

विठ्ठलापूर – सांखळी

श्रीपांडुरंग श्रीपांडुरंगदेवस्थान, सांखळी



श्रीपांडुरंग – रुक्मिणी – सत्यभामा गर्भागारांतील अधिष्ठीत मूर्ती

श्रीपांडुरंगाचे देवालय, विठलापूर, सांखळी

पंढरपूरचा श्रीपांडुरंग गोमंतकांत ?!

आणि

तो देव कां, कसा, केव्हां आला ?

पंढरपूर हे क्षेत्र अतिपवित्र अखिल भारतीय हिंदू धर्मीयांचे भक्तिस्थान आहे. मग तो हिंदू कोणत्याही धर्मपंथाचा असो, सांप्रदायाचा असो किंवा समाजाचाही असो. आणि त्या क्षेत्रातील दैवत श्रीपांडुरंग होय. त्या दैवताला कांही भक्तगण विठ्ठल किंवा विठोबा असेही म्हणतात. त्या क्षेत्राला साधुसंतानी म्हणून ठेवलेच आहे.

काशी वाराणसी पाहिली द्वारका । परी पंढरीची सर नाही एका ॥

सर्वसाधुसंतांनी पंढरपूरचे महात्म्य अशा प्रकारे वर्णिलेले असतानासुध्दा सर्वत्र भारतात ठिकठिकाणी श्रीविठ्ठल-रखुमाईची अनेक मंदिरे आहेत खरी, परंतु तेथे श्रीविठ्ठल आणि श्री रखुमाई अशी एकत्र जोडीने किंवा श्रीविठ्ठल आणि त्याच्या उजव्या डाव्या बाजूंकडे राई रखुमाई अशा मूर्ती एकाच पीठासनावर, एकाच मंदिरांत आहेत.

पंढरपुरांत मात्र अशा एकच जोडीने एकाच पीठासनावर एकाच देवालयांत विठ्ठल रखुमाई मूर्ती नसून श्रीपांडुरंगाचे देवालय वेगळे आणि श्रीरखुमाईचे देवालय वेगळे असे वैशिष्ट्य आहे. अर्थातच पंढरपुरांत जाऊन श्रीविठ्ठल-रखुमाईचे दर्शन घेण्यासाठी जातो, तर त्यांची अलग वेगवेगळी देवालयें कां ? ही शंका किंवा संशय कोणासही येणें साहजिकच आहे आणि म्हणून हे असे का व्हावें याचा प्रश्न भाविक यात्रेकरू आपल्या मनाशीच कुतुहलाने करूं लागल्यास नवल मानण्याचे कारण नाही.

पंढरपूरांत श्रीपांडुरंगाचे वेगळे आणि श्रीरखुमाईचे वेगळे देवालय कां ?

पंढरपूरचे श्रीविठ्ठल मंदीर हे मूळ दिगंबर जैनांचे होते व देवालयांत जी श्रीविठ्ठलाची मूर्ती आहे ती जैनांचे तीर्थंकर श्री. १००८ नेमिनाथ भगवान यांची होती त्याप्रमाणें तेथे एकटीच मूर्ती आहे. जैनामध्ये देवाची मूर्ती एकच पुरुष मूर्ती असते त्याच्या शेजारी स्त्री दैवतांच्या मूर्ती नसतात. परंतु पंढरपूरच्या या श्रीविठ्ठलमूर्तीसंबंधी एका जैन ग्रंथांत वेगळीच माहिती असल्याचे वाचावयास मिळतें. या ग्रंथाचे नांव आहे कालिकाचार्य कथा. ती माहिती अशी की इ. सन ७८ साली शककर्ता शालिवाहन महाराष्ट्रांत राज्य करीत असताना त्याचा मुख्य प्रधान रामचंद्र सदाशिव नावाचा इसम होता. पंढरपूरजवळ डिंडिख अरण्यात दरोडेखोर रहात होते. त्या सर्व दरोडेखोरांचा समूळ नायनाट करण्याची मोहीम राजाच्या आज्ञेवरून त्या मुख्य प्रधानाने आपल्या हातात घेऊन त्या दरोडेखोरांस निकालांत काढलें. पण, काही दरोडेखोर अद्याप चुकून कोठेही उरले असावेत, अशी शंका येऊन त्या मुख्य प्रधानाने त्या अरण्यात शोधाशोध चालविली असतां त्याच अरण्यांत श्रीविठ्ठलाची मूर्ती त्यास सापडली. त्या मुख्य प्रधानास हा फार मोठा लाभ आणि महत्वाचा शुभशकूनच आहे असे वाटून त्याने राजाच्या परवानगीने चंद्रभागेच्या तीरावर एक सुंदर देवालय बांधून त्यांत त्या श्रीविठ्ठलमूर्तीची विधीपूर्वक प्राणप्रतिष्ठा करून तेथे स्थापना केली. राजाने त्यास देवालयाच्या मालकीची आणि पूजेचीही सनद लिहून दिली.

शिव-विष्णु अभेद-हरिहरांत मुळीं भेद नाहीच

पंढरपूरच्या श्रीपांडुरंगाच्या मूर्तीची अशी एक विशेषता सांगतात की त्या मूर्तीत श्रीविठ्ठलाने आपल्या डोक्यावर श्रीशिवलिंग स्थापन केले आहे. वारकरी पंथांतील लोकांचे म्हणणे असे की अशारीतीने शिवाबद्दल

विष्णूनें आदर प्रकट केला आहे. शिव-विष्णु-उपासना भेदांतील तीव्रता ह्यामुळें कमी झाल्याचे निदर्शनास येते. व्रत एकादशी वार सोमवारी उपवास करण्याचा प्रघात वारकरी लोकांतही आहे. अशामुळें पंढरपूरच्या विठ्ठलास विष्णुरूपी मानतात आणि त्यानें आपल्या डोक्यावर शिवलिंग स्थापन केल्यामुळें शिव-विष्णु अभेद आहेत याला आणखी पुरावा नको. यांत आणखी विशेषेंकरून आणि बारकाईनें लक्षात घेण्यासारखी गोष्ट अशी की, श्रीविष्णु दैवताला पांडुरंग नांव नाही व पांडुरंग हें नांव फक्तच श्रीशिवाला आहे हें एका श्रीशिवसहस्त्र नामावलींत छापील पुस्तकांत, **श्रीमंगेश देवस्थानांत** चालू असलेल्या श्री शिवसहस्त्र नामावलीत पहावयास मिळेल. त्या सहस्त्र नामावलीवर क्रमांक ८०४ वर ॐ पांडुरंगायनमः असें नांव आहे. यावरून असें म्हणता येईल की, पंढरपुरांत मूर्ती श्रीविठ्ठलाची आहे आणि तिच्या डोक्यावर असलेल्या लिंगरूपी श्रीशिवाचें नांव श्रीपांडुरंग आहे. कोठेंही शिवलिंग असलें, तरी त्या लिंगासभोंवार असलेली पिंडिका शालिग्राम शिला श्रीविष्णुरूपी मानतात व मध्यें असलेलें लिंग श्रीशिवाचें प्रतीक मानतात हा प्रघात आहे. याचा अर्थच असा की, शिव-विष्णु एकरूप आणि अभेद आहेत. शिवाय; श्रीशिवलीलामृत, अध्याय ११ वा रुद्राध्याय मध्यें तर स्पष्टपणें ११६ व्या ओवीमध्यें सांगितलें आहे की, 'शिवथोर विष्णु लहान । हरि विशेष हर गौण । ऐसें म्हणती जे त्यां लागून । आणोनि नरकी घालावे ॥' यामुळें शिव विष्णूमध्यें कोण थोर ही शंका किंवा कल्पनाही येऊं नये.

श्री विठ्ठलानें आपल्या डोक्यावर श्रीशिवलिंग स्थापन केलें आहे असें मानणारे जसे भक्तगण आहेत तसेंच श्रीविठ्ठलाचा मुकूटच लिंगासारखा भासला असावा आणि तो मुकूट आहे लिंग नव्हे असेंही म्हणणारे आहेत. त्यांच्या मते 'कानडा हा विठ्ठल कर्नाटकू' ह्या आधारानें हे दैवत आणि तत्पूर्वीची महाराष्ट्रांतील संस्कृती कानडी, तेलगू परंपरेची स्पष्टपणे दिसून येते. तिकडील मूर्तीच्या उभट मुकूटाचें श्री पांडुरंगाच्या शिरोभागाशी साम्य दिसते आणि अशा मूर्ती दक्षिणेत अनेक आहेत. श्रीपांडुरंगाला पगडी घातल्यावर आंतचा मुकूट लिंगासारखा भासू लागतो हा भास फार जुना असला, तरी त्याची उत्पत्ती पाहिली पाहिजे असें त्यांचें मत दिसते. कांहीही असलें तरी शिव-विष्णु अभेदाचें महत्व कमी लेखण्याचा दोन्ही मतांच्या भक्तगणांचा मुळीच उद्देश नाही हे सांगायलाच नको.

पंढरपूरची वारी १८८६ वर्षांची

वारकरी संप्रदाय हा पंढरपूरच्या श्रीपांडुरंगाच्या उपासनेचा पंथ आहे. वारी या शब्दाचा मूळ अर्थ येरझारा असा आहे. एखाद्या दैवताच्या दर्शनास नियमानें वारंवार जाणें म्हणजे यात्रा करणें अशा अर्थानें वारकरी हा शब्द रूढ झाला आणि हा जरी सामान्य अर्थ असला, तरी वारकरी पंथाच्या महनीय स्थानामुळें 'वारकरी' हा शब्द पंढरपूरच्या श्रीपांडुरंगाच्या दर्शनास नियमानें जाणाऱ्या व्यक्तीसच विशिष्ट अर्थानें वापरला जातो ही वस्तुस्थिती आहे. पंढरीची वारी किती जुनी आहे, ती कोणी केव्हांपासून सुरू केली हे जाणून घेणें महत्त्वाचें आहे.

पंढरपूर क्षेत्रांतील समस्त उत्पात समितीचे एक नेते वेदमूर्ती श्री. प्र. द. उत्पात यांनी पंढरीच्या आषाढी वारीची परंपरा किती जुनी आहे या संबंधी एकदां जी माहिती सांगितल्याचें वाचनांत आलें त्यावरून असें दिसते की, श्रीशके पांचमध्यें शालिवाहनानें आपला प्रधान रामचंद्रपंत याला पंढरपूरच्या जंगलमय भागाचा बंदोबस्त करण्याची आज्ञा दिली होती. काही काळ राहिल्यानंतर त्या स्थानाचें माहात्म्य वाढवावें असें त्यांना वाटूं लागलें म्हणून त्यानी शके अकरामध्यें निरनिराळ्या गावांना आज्ञापत्रें पाठवून आषाढी एकादशीला पंढरीला येण्यास कळविलें. लोकांनी यावें म्हणून यात्रेस येणाऱ्यांच्या वाटखर्चाची व रहाण्या-जेवणाची व्यवस्था होईल असेंही त्यानी कळविलें. शालिवाहन शके अकरामध्यें श्री. रामचंद्रपंतानी ही आषाढवारीची प्रथा चालू केली व गेली सुमारें १९०० वर्षे अखंडपणें भक्तिरसाचा दीप तेवत ठेवीत चालू आहे. संतश्रेष्ठ ज्ञानोबा आणि तुकारामाच्या पालख्या पंढरपुरास नेण्याची प्रथा सुरू झाल्यापासून तर दुधात साखर पडावी त्याप्रमाणे आषाढी वारीचें महत्व वाढलें. आषाढी ही पंढरीची मूळ वारी आहे. कार्तिकी वारीची प्रथा श्रीज्ञानदेवांनी चालू केली व संत तुकोबांच्यापासून महिना वारीची प्रथा चालू झाली.

श्रीक्षेत्र पंढरपूर येथील महापूजेचा पूर्वेतिहास कोणता ?

पंढरपुरात प्रतिवर्षी आषाढी व कार्तिकी यात्रेच्या वेळी सरकारतर्फे श्रीपांडुरंगाची महापूजा करण्याची प्रथा होती ती हल्लीच इ. स. १९७२ सालापासून स्थगित झाल्याचे वृत्तपत्रीय बातम्यांवरून कळते. पण, पुरातन कालापासून त्या महापूजेचा इतिहास काय असावा हे फारसे कोणास माहित असावे की काय याबद्दल शंका आहे.

पंढरपूर हे गांव ब्रिटिश राज्यसत्तेच्या अमदानीत मराठी राज्यांत होते व महापूजेचा हक्क सातार्‍याच्या छत्रपती घराण्याकडे होता व तो खर्च सातारच्या राज्याच्या खजिन्यांतून होत असे. सातारचे राज्य १८४८ मध्ये खालसा होईपर्यंत ही महापूजा सातारच्या राजामार्फत कोणीतरी हिंदू धर्मीय अधिकारी जाऊन करीत असें. ब्रिटीश राज्य झाल्यावर, म्हणजे इंग्रजी राज्यांत सातारा संस्थानचा राज्यकारभार समाविष्ट झाल्यावर पंढरपूरच्या महापूजेचा खर्च सातारा कलेक्टरच्या खजिन्यातून होऊं लागला. कारण, या काली पंढरपूर तालुका सातारा जिल्ह्याचा भाग होता. पुढे पंढरपूर सोलापूर जिल्ह्यात सामील झाले आणि महापूजेचा खर्च सोलापूर कलेक्टरच्या खजिन्यातून होऊं लागला व मराठी राज्यात राजाची पूजा म्हणून गणली जात असलेली महापूजा सोलापूर कलेक्टर कचेरीमार्फत होऊं लागून सातारचे घराणे सदर पूजेच्या प्रथेतून बाजूला पडलें. ब्रिटीश अमदानीत व भारताच्या स्वातंत्र्यानंतरही श्रीपांडुरंगाची पूजा सरकारतर्फे होत होती. यावरून श्रीविठ्ठलाची महापूजा व निधर्मी राज्य यांचा कांहीही संबंध नाही असे वाटणे साहजिकच आहे. महाराष्ट्र राज्याचे मान्यवर महाशय मंत्री श्रध्दावान आहेत. तसेच जगाच्या उत्पत्ती बरोबरच टीकाकार उत्पन्न झाले हे कोण जाणत नाही ? पण, टीका कोण करतो व ती कां करतो, तसेच ती टीका रास्त आहे की काय हे राज्यकर्त्यांनी पाहावयाचे असते. माजी राष्ट्राध्यक्ष श्री. राजेन्द्रबाबूनी श्रीसोमनाथाची पूजा केली असल्याचेही प्रसिध्द झालें होते. राज्यकर्त्यांना भगवंताचे अधिष्ठान पाहिजेच. श्रीशिवछत्रपतीना श्रीतुळजा भवानीचे होतेच हा इतिहास आहे. इ. सन १९७३ त ओटावामध्ये कनेडियन पार्लमेंटमधील आपले भाषण भारताच्या माननीय प्रधानमंत्री श्रीमती इंदिरा गांधी यांनी वेदांतील मंत्र म्हणून पुरे केले हे वर्तमान त्यावेळी वाचून मन हरखून गेले. आमच्या माननीय महामंत्री याच सेक्युलरवादी धर्मनिरपेक्ष राजवटीतल्याच ना ? त्या टीकेला जुमानीत नाहीत. कारण, ती टीका कोण करतात, ती कां करतात, आणि ती रास्त आहे काय हे आमच्या प्रधानमंत्री विचारपूर्वक तपासून आपले धोरण ठरवितात. असो. शेवटी पंढरीच्या श्रीपांडुरंगाची महापूजा कोणी करावी, सरकारने करावी की करू नये, याबाबत वेगवेगळे विचार जरी व्यक्त झाले व तसे विचार या पुढेही व्यक्त होण्याची शक्यता नाकारता येत नाही, हे जरीं खरे असले, तरी त्या भगवंताचाही विचार या महापूजेच्या बाबतीत कांही तरी असावा अशी शंका येणें शक्य आहे. म्हणून आमच्या सारख्या अज्ञ मानवानी याबाबतीत विचार करून काय उपयोग ? जें, जसे त्या भगवंतास योग्य वाटले, वाटते आणि वाटेल तसे घडले, घडते आणि घडून येईल असे त्याच्या भक्त गणांनी मानणें योग्य ठरते असे नाही का वाटत ?

श्रीक्षेत्र पंढरपूर येथील श्रीविठोबाचे देवस्थानाशी गौड सारस्वत ब्राम्हणांचा पुरातन कालापासून संबंध

श्रीक्षेत्र पंढरपूर येथील श्रीविठोबाचे देवस्थानाशी गौड सारस्वत ब्राम्हणांचा पुरातन कालापासून संबंध असल्याचे इतिहासावरून स्पष्ट आणि निसंधिग्धपणें दिसते. देवगिरीच्या यादव राज घराण्यांतील शेवटचा पराक्रमी राजा रामदेवराय यांचेकडे दिवाण असलेले प्रसिध्द हेमाद्रि उर्फ हेमाडपंत यानी इ. स. १२६४ ते १२७४ पर्यंत दहा वर्षांत निरनिराळ्या लोकांकडून द्रव्यनिधी जमवून पंढरपूर येथील श्रीविठोबा देवस्थानाचा जीर्णोध्दार केला. या कामी त्याना समस्त दाक्षिणात्य गौड सारस्वत ब्राम्हण मंडळींनी-लाड-तेलंग-कोर्णिक-द्रव्वी प्रभृती- द्रव्य देऊन सहाय्य केल्याचा उल्लेख पंढरपूर येथें श्रीविठ्ठलमंदिरांत असलेल्या ८४ शीच्या शिलालेखात नाववार नमूद आहे. हा शिलालेख पंढरपूर येथें श्रीविठ्ठल देवस्थानात चवर्‍यांशी खांब म्हणून प्रसिध्द आहे.

पंढरपूरच्या श्रीपंढरीनाथांचे गोमंतकात आगमन

चौदाव्या शतकात श्रीपंढरीनाथ पंढरीहून गोव्यांत आले. राणे वंशातील एक सत्पुरुष दरवर्षी पंढरीला भक्तीभावाने वारीसाठी येत असे. पुढे वृध्दावस्थेमुळे त्यांचे शरीर थकले. त्यावेळी त्यांनी एकदा श्री विठ्ठलाची करुणा भाकून अखेरचा निरोप घेतला. त्यांची अनन्य भक्ती पाहून श्रीपांडुरंग प्रसन्न होऊन त्या राणे वंशातील सत्पुरुषास स्वप्नात दृष्टांत दिला. 'भक्ता ऊठ ! काळजी करूं नकोस. माझा वियोग तुला होऊ नये म्हणून मी तुजबरोबर येण्यास सिध्द आहे; पहाटेस माझ्या उत्सवमूर्ती घेऊन तू सत्वर प्रयाण कर'. याप्रमाणें दृष्टांत झाल्यावर राणे वंशातील ते सत्पुरुष जागृत झाले. त्याना या प्रकाराचे आश्चर्य वाटले व परमानंद झाला. त्याच भरात काळोख्या रात्री ते मंदिराकडे गेले! पहातात तो मंदिराचे दरवाजे उघडे ! आंत जाऊन धडधडत्या चित्तानें त्या सत्पुरुषाने उत्सव मूर्तींना प्रणाम केला व श्री राई रखुमाईसह श्रीविठ्ठलाची मूर्ती उचलून त्वरेने तेथून मार्गस्थ झाले. त्यांच्या थकलेल्या शरीरांत अमाप उत्साह संचारला व ते अल्पावधीत बरेच दूरचे अंतर कापून पुढें गेले. ते सत्पुरुष उत्तरेकडचे असल्याने त्यांचा संशय येऊन पंढरपूरच्या बडव्यानी उत्तरेकडे शोध सुरू केला. परंतु त्या सत्पुरुषास गोमंतकांतील सांखळी महालांतील यात्रेकरू वाटेत भेटले आणि त्यांचा दक्षिणेकडे प्रवास सुरू झाला त्यामुळे वाटेत विशेष त्रास झाला नाही. बेळगाव चोर्ले घाट मार्गे सत्पुरुष मूर्तींसह गोमंतकांत साखळीस आले. प्रारंभी त्या मूर्ती काही वर्षे रानावनातच राहिल्या, शके १४१० म्हणजे इ. स. १४८८ वर्षी श्री पंढरीनाथांच्या प्रेरणेने सध्याच्या ठिकाणी मंदीर उभे राहिले. त्या ठिकाणी पूर्वी किल्ला असून श्रीकालभैरव व श्रीभगवती ही दैवते होती व ती दैवते सध्याही आहेत. चैत्र शुक्ल दशमीला मंदिरात मूर्तींची स्थापना झाली. राणे घराण्यास साखळी महालाचे आधिपत्य मिळाले व ते घराणे सांखळीस स्थायिक झालें आणि त्या घराण्याच्या देखरेखीखाली श्रीपांडुरंगाची पूजा अर्चा सुरू झाली. श्रीपांडुरंगाच्या कृपेने सत्तरीत राणे घराण्याचा वंशविस्तार वाढून ते ठिकठिकाणी स्थायिक झाले. कालांतराने या मंदिरास जीर्णावस्था प्राप्त झाली. त्यावेळी श्रीपांडुरंगाच्या कृपेने या घराण्यातील एक सुकन्या श्रीमती साळूबाई ही ग्वाल्हेर संस्थानच्या शिंदे महाराजांची महाराणी गजराजा शिंदे झाली. श्री. पंढरीनाथांनी तिला अशा थोर सम्राज्ञी पदाला पोंचवून तिच्या करवी आपले मंदीर इ. स. १९२०-२५ च्या सुमारास भक्कम आणि सुंदर असे बांधून घेतले. हेच सध्याचे मंदिर आहे आणि ते उत्तर हिंदुस्थानी पध्दतीच्या बांधणीचे असून गोमंतकात त्या पध्दतीचे दुसरे देवालय अद्याप तरी नाही. श्रीमती साळूबाई महाराणीनी श्रीपांडुरंग देवासाठी सुवर्ण-रौप्यजडीत अशी पालखी, अबदागीर, छत्रचामरे इत्यादी उत्कृष्ट राजभोग अर्पण केले. नित्य पूजा चर्चा, नैवेद्य, पुराण, दिवाबत्ती, त्रिकाल चौघडा इत्यादी नित्य खर्चासाठी कायम फंड देऊन व्यवस्था केली. श्रीपंढरीनाथांच्या कृपाप्रसादाने महाराणीच्या थोर पदास पावलेली ती मूळ राणे घराण्यांतील सुकन्या श्रीमती साळूबाई मोठी धन्य आणि पुण्यवान म्हणणे क्रमप्राप्त आहे. या देवस्थानचा प्रतिवार्षिक महोत्सव चैत्र शुध्द दशमीला सुरू होऊन पौर्णिमेपर्यंत चालतो. पंढरपूरला जाऊन तिथें नवस बोलून आलेले परंतु पुढें पंढरपूरला जाऊन नवस फेडूं न शकणारे श्रध्दाळू सांखळीला येऊन भक्तीभावाने नवस फेडून धन्य होतात. श्रीपंढरीनाथांनी तसा दृष्टांत देऊन ही सवलत त्यांच्या गरीब भक्तांसाठी देऊन ठेवलेली आहे.

(पहा :- सांखळी येथील आनंददायी चैत्री उत्सव शीर्षकाचा लेख. लेखक श्री गोविंद पुंडलीक पित्रे दै. गोमंतक, रविवार ता. २४-४-१९७५, या लेखांतील श्री पंढरीहून गोव्यांत कसे आले याबद्दल कथा पंढरीनाथ भाग, आख्यायिका किंवा माहितीचा उपयोग या लेखाच्या शेवटच्या प्रकरणांत केला असल्यामुळें त्या लेखाचे सन्मान्य लेखक आणि प्रकाशक यांचे आभार मानण्याचे गोड कर्तव्य करीत आहे- वि. ना. शे. धुमे)

१३

श्रीदेव राधाकृष्ण मुरलीधर देवस्थान

सांखळी

:

इसवी सनाच्या सोळाव्या शतकाच्या उत्तरार्धात, ख्रिस्ती धर्मीय राज्यकर्त्या पोर्तुगीज राजेशाहीच्या अमदानीत, गोमंतकांतील हिंदु धर्मीयांच्या देवस्थानांचा विध्वंस केला गेला, देवालयांस आगी लावल्या, दैवतांच्या मूर्ती फोडल्या, त्याच पोर्तुगीज राज्यकर्त्यांच्या कारकिर्दीत, इसवी सनाच्या विसाव्या शतकाच्या उत्तरार्धात, हिंदु देवालयाच्या कायम मंडप बांधणीच्या एकंदर खर्चाच्या पन्नास टक्के खर्च गोमंतकाच्या पोर्तुगीज गव्हर्नर जनरलनें सरकारतर्फे देण्याची सत्य घटना ज्या देवालयाबद्दल घडली, तेच हे श्रीक्षेत्र सांखळी येथील गोकुळवाडीत असलेले श्रीदेव राधाकृष्ण मुरलीधर देवस्थान.



श्रीराधाकृष्ण मुरलीधर, गर्भागारांतील अधिष्ठीत मूर्ती सांखळी, गोवा

श्रीराधाकृष्ण मुरलीधर देवालय सांखळी, गोवा

श्रीदेव राधाकृष्ण मुरलीधर देवस्थान

गोमांतकांतील अनेक देवस्थानं नानाविध ज्ञाती समाजांनी स्थापन केलेली आहेत. त्यांत कांही देवालयं खास एकाच ज्ञाती समाजांची जशीं आहेत तशीच काही देवस्थानं एकापेक्षां जास्त वेगवेगळे ज्ञाती-समाज एकत्र येऊन त्यानी एकत्र देवालयं स्थापन केलेलींही आढळतात.

फक्त खास एकाच ज्ञाती समाजाची अशी देवालयं कोणती याचे प्रत्यक्षांत नमुन्यासाठी उदाहरण म्हणून पहावयाचे झाल्यास खालील देवालयं पहाता येईल.

– येळें जुनें गोवें (ओल्ड गोवा) येथील श्रीगोमंतेश्वर देवस्थान फक्त नाभिक ज्ञाती समाजाचे आहे.

– कांसारपाल येथील श्रीदेवी कालिका तथा महामाया कालंबा देवस्थान फक्त हिंदु आर्य ब्रम्हवृंद दैवज्ञ (सोनार) ज्ञाती समाजाचे आहे.

– गिमोणे येथील श्रीरामचंद्र तथा रघुनाथ देवस्थान विश्वकर्मा (सुतार) ज्ञाती समाजाचेंच आहे.

– हरवळे येथील श्रीरुद्रेश्वर देवस्थान फक्त शूद्र ज्ञातीसमाज 'नाईक भांडारी' उपनावाच्या कुळाव्याचे आहे.

– धारगळीचे श्रीशांतादुर्गा देवस्थान फक्त वैश्य वर्णीय ज्ञातीसमाजाचे आहे.

– कारापूर येथील श्रीविठ्ठल देवस्थान सत्तरीचे क्षत्रीय ज्ञातीसमाज 'राणे सरदेसाई' यांचेंच आहे.

– नानोडे येथील श्रीव्यंकटेश देवस्थान हे फक्त देवदासी (कलावन्त) ज्ञाती समाजाचे आहे.

– सांखळी येथील श्रीदत्तात्रेय देवस्थान फक्त गौंड सारस्वत ब्राम्हण ज्ञाती समाजाचे आहे.

श्रीक्षेत्र सांखळी येथे चिरेखणीजवळ मळाकडील जागेत गोकुळवाडींत जे श्रीदेव राधाकृष्ण मुरलीधर देवस्थान आहे, ते देवस्थान श्रीशके १८२७ चैत्र शुक्ल पंचमी सोमवार म्हणजे तारीख १० एप्रिल १९०५ या शुभ मुहूर्ताच्या दिवशी, सांखळी गावांतील वैश्य ज्ञाती समाजाने स्थापन केलेले असून त्या देवालयात प्रमुख दैवत म्हणून श्रीराधाकृष्ण मुरलीधर दैवतांची संगमरवरी शुभ्र पाषाणी मूर्ती स्थापन केलेली आहे. हे देवस्थान सांखळी-वाळपई या हमरस्त्यांच्या उजव्या बाजूकडे अंदाजे दहा हजार चौरस मीटर अशा जागेत असून त्याची रचना आणि उंची जरी फोंडा तालुक्यातील प्रमुख देवालयासारखी नसली तरी हे देवालय आणि त्यासभोंवारचा सृष्टीसौंदर्याचा परिसर पाहिल्यानंतर मनाला फार प्रसन्नता लाभते. या सांखळी क्षेत्रात आणखी दोन देवालयं मोठी सुप्रसिध्द, आकर्षक, रमणीय अशी आहेत आणि ती म्हणजे श्रीदत्तात्रय देवस्थान श्रीदत्तवाडीत आणि श्रीविठ्ठल तथा पांडुरंग देवस्थान श्रीविठ्ठलपुरात आणि त्यांची ख्यातीही फार मोठी आहे. ती देवस्थानंही वेगवेगळ्या ज्ञाती समाजानी स्थापन केलेली आहेत.

श्रीदेव राधाकृष्ण देवस्थान कसे उदयास आले ?

इसवी सन १९०२ साली अक्कलकोटचे एक श्री. महादेवशास्त्री नावाचे बुवा या सांखळी क्षेत्रांत येवून पोचले. सध्या ज्या जागी हे देवालय उभे आहे, त्या जागेत वास्तव्य करून तेथेच ईशीचिंतन, भक्तिसेवा आणि साधना करून ते बुवा आपला वेळ घालवीत असत. त्यांच्या या भक्तिसेवेकडे सांखळी गावांतील वैश्य ज्ञाती समाजांतील भाविक मंडळी आकर्षिली गेली आणि पुढे त्या शास्त्रीबुवांच्या प्रेरणेने, त्या ज्ञाती-समाजानें, त्या जागेच्या परीसरांत, एका लहानशा वास्तूत श्रीशिवलिंग आणि श्रीदत्तमहाराजांच्या पादुका या दोन्हींची स्थापना इ. स. १९०२ साली केली. ही स्थापना त्या काळी ज्या वास्तूत केली, त्या वास्तूस सद्यः-

कालांत श्रीमहादेवाचे देवालय म्हणून ओळखतात. पुढें या वैश्य ज्ञाती समाजाने इ. सन १९०५ साली त्याच परिसरांत योग्य प्रकारे मंदिर उभारणी करून त्यांत श्रीराधाकृष्ण मुरलीधर दैवताची विधीपूर्वक स्थापना केली, आणि हें प्रमुख दैवत मानून आनुषंगिक दैवतें म्हणून वर उल्लेखिलेली आणि इ. स. १९०३ साली स्थापन केलेली जी दैवतें श्रीशिवलिंग (महादेव) आणि श्रीदत्तमहाराजांच्या पादुका, त्या देवस्थानात समाविष्ट केली. श्रीराधाकृष्ण मुरलीधर देवस्थान जरी सांखळी येथील वैश्य ज्ञाती समाजाच्या मंडळीनी स्थापन केले असलें, तरी स्थानिक दैवज्ञ ब्राम्हण ज्ञाती (सोनार) समाजाचे लोकही या देव–स्थानचे महाजन आहेत अशी माहिती त्या देवस्थानच्या घटना नियमावलींत आहे.

या देवस्थापनेची व्यवस्था देवालय इमारत वगैरे इ. सन १९०५ साली झाली खरी, पण देवालय इमारती-समोर जी मंडप उभारणीची अत्यावश्यक जरूरी होती, तो मंडप उभारला नव्हता, व म्हणून प्रतिवर्षी जरूरीच्या कार्यक्रमांसाठी तात्पुरता मंडप तेथें उभारावा लागे. ही परिस्थिती दूर करण्याच्या हेतूने, त्या देवस्थानच्या व्यवस्थापकानी पुढाकार घेऊन इ. स. १९६० सालीं देवालय इमारतीपुढें मुख्य इमारतीस जोडूनच एक भव्य आणि सोईस्कर मंडप अंदाजे सातशें लोकांस बसण्यास मिळेल एवढ्या आकाराचा उभारण्याचें काम हाती घेऊन तें पूर्णत्वास नेले. त्यासाठी मंडप उभारणी बांधकामाचा खर्च साधारणपणे चाळीस हजार रुपयांपर्यंत गेला आणि **त्या एकंदर खर्चाच्या पन्नास टक्के रक्कम तत्कालीन गोवा सरकारच्या पोर्तुगीज राजवटीच्या खिरस्तीधर्मीय युरोपियन गव्हर्नर जनरलने आपल्या पोर्तुगीज सरकार–तर्फे त्या देवस्थानास दिली. ही घटना गोमांतकांतील हिंदू देवालयांच्या संबंधांत ऐतिहासिक दृष्ट्या फार महत्वाची आणि संस्मरणीय तर खचित आहे.** इसवी सनाच्या सोळाव्या शतकांत गोमांतकांत पोर्तुगीजांनी 'ज्यांचे राज्य त्यांचा धर्म' हें एकच तत्व डोळ्यांपुढे ठेवून त्याखाली हिंदूधर्मीयांचा मनस्वी छळ केला, दैवतांचे मूर्तीभंजन केलें. देवालयांच्या इमारतीस आगी लावल्या, देवालयें मोडून त्यांचें लाकूड आपल्या इतर उपयोगास आणलें. ही अमानुष क्रूरता आणि धर्मांधता गतेतिहास कधींच लपवूं शकत नाही. पण, त्या अमानुष कृत्यामुळें पोर्तुगीज राज्यावर त्याकाळी झालेले दुष्परिणाम, गोमांतकीयांचा देशत्याग, हिंदू दैवतांचे दुसऱ्या परकीय राज्यांत स्थलांतर, गोमांतकांतील जमिनी शेती बागायती, पडीक, नापिक राहिल्या, व्यापार धंदा थंड, या सर्वांमुळें कर व उत्पन्नच नाही. या अशा अनुभवामुळें पोर्तुगीज राज्यकर्त्यांचा नक्षा उतरला. आपण अवलंबिलेलें धोरण साफ चुकीचें आणि राज्यनाशास कारणी–भूत असल्याचे त्यास पटलें, आणि या अशा अनुभवामुळें त्याकडून कालांतराने तें धोरण बदललें गेलें, हिंदू धर्मीयांस नानाविध प्रकारे धार्मिक स्वतंत्रता अबाधित रहाणारी ग्यारंटी आणि त्या धोरणाचे कायदे जारी झाले. कांही कालाने इ. स. १९१० साली पोर्तुगीज राजेशाही कायमचीच नष्ट होऊन रिपब्लिक सत्ता स्थापन झाली, आणि या रिपब्लिक सत्तेमुळेच हिंदूधर्मीयांस उत्कर्षाचे दिवस आले. समानता प्रस्थापित झाली आणि त्याच पोर्तुगीज राज्यकर्त्यांनी, त्याच गोमंतकात, त्याच हिंदूधर्मीय देवस्थानांसाठी नानाविध प्रकारे सवलती आणि सहानुभूतीचे धोरण स्वीकारून ते प्रत्यक्षांत कृतीने अंमलातही आणले. **या गोष्टींचीही दखलगिरी गोमंतकाच्या धार्मिक इतिहासांत घ्यावीच लागेल. 'कालाय तस्मै नमः' म्हणतात तें हेंच.**

या देवस्थानांत इतर देवस्थानांप्रमाणेच प्रतिवार्षिक उत्सव साजरे केले जातात. पण त्यांतही चैत्र शुक्ल प्रतिपदा, चैत्र शुक्ल पंचमी (वर्धापन दिन), वैशाख कृष्ण चतुर्दशी, श्रीनृसिंह जयंती, श्रावण महिन्यात श्रीगोकुळाष्टमी, भाद्रपद महिन्यात श्रीगणेश चतुर्थी, आश्विन महिन्यात विजया दशमी, एकादशीस सप्ताह, नरक चतुर्दशी, कार्तिक महिन्यात श्रीतुलसीविवाह, श्रीवैकुंठ चतुर्दशी आणि माघ शुक्ल एकादशीस काला उत्सव असे प्रतिवार्षिक उत्सव साजरे केले जातात. त्याच प्रमाणे या देवस्थानात नियमितपणे शिबिकोत्सव प्रति महिन्याच्या शुक्ल अष्टमी रोजी साजरा केला जातो, पण तो कार्तिक ते जेष्ठ मास पर्यंतच; पावसाळा मोसमात होत नसतो. हे देवस्थान सांखळी येथील वैश्य समाजाने स्थापिले आहे असे असूनही त्या देवस्थानचे महाजन वैश्य समाजाशिवाय सांखळी येथील दैवज्ञ ब्राम्हण (सोनार) ज्ञाती समाजाचेही आहेत हे त्या देवस्थानच्या घटना नियमावलीत नमूद आहे. त्या घटना नियमावलीच्या कलम चार मध्ये स्पष्टपणे नमूद आहे की हिंदू धर्मीय असलेल्या कोणत्याहि ज्ञाती समाजाच्या इसमाने त्या देवालयात भक्तीभावनेने श्रध्देने प्रार्थना करणे, देणग्या श्रीचरणी अर्पण करणे, मग त्या पैशाच्या रूपात, दागदागिन्यात किंवा कोणत्याहि मौलीक किंमतीत असोत अशा गोष्टीस पूर्ण मोकळीक आहे. पण अशा

सवलती दिल्या असल्या म्हणून त्या व्यक्तीस कोणत्याच प्रकारे देवस्थानच्या महाजन संस्थेवर किंवा महाजन म्हणून मानून घेण्याचा हक्क अधिकार कदापि असणार नाही.

देवस्थानची घटना नियमावली सरकारने पोर्तारीय नंबर ४०४ तारीख २३ मार्च १९२६ या हुकमाने पास केली असून ती सरकारी ग्याझेत बोलेंतीं ऑफिसीयाल नंबर ४९ तारीख १८ जून १९२६ च्या अंकात प्रसिध्द झाली आहे. आणि त्या घटना नियमावलींच्या शेवटीं त्या देवस्थानच्या तत्कालीन महाजनाच्या संपूर्ण नावाची यादी दिली असून त्या यादीत एकंदर २१५ इसमांची नांवें आढळतात. त्यांतील फक्त उपनांवें खाली दिलेली आहेत. ती बहुतेक वैश्य आणि सोनार (दैवज्ञ ब्राम्हण) या ज्ञाती समाजांतील असावींत असें वाटतें. पण, त्या महाजनांच्या नांवाच्या यादींत अनुक्रम नंबर १८२ वर रामदास गोकुळदास गुजीर हें नांव वाचावयास मिळते. हे सदगृहस्थ वैश्य किंवा सोनार या दोनही ज्ञाती समाजातील नाहीत परंतु, असें असूनही त्यांचे नांव त्या यादींत आढळतें आणि याचें कारण, या भाविक सद्गृहस्थानें देवता स्थापनाकाली श्रीराधाकृष्ण मुरलीधर दैवताची मूर्ती स्वखर्चानें त्या काळी दिली असावी आणि म्हणूनच त्या गुजीर ज्ञाती समाजाच्या या श्रध्दावान भाविकास त्या देवस्थानच्या संस्थापकांनी तो मान स्वखुषीने दिला असण्याची संभाव्य शक्यता वाटल्यास नवल नव्हे. उल्लेखित यादींत खालील प्रमाणें उपनांवाचे महाजन आहेत :

"कळंगुटकर – काणेकर – गोंयकार – पिंगे – मोरसकर – नार्वेकर – पोकळे – मापारी – कारेकर – पेडणेकर-सांगोडकर– इंदे – शिरोडकर –पांगम–कर्पे–वेर्णेकर – कुरतरकर – पुजारी – नेवगी – डांगी – शेटिये – चोडणेकर – मालवणकर – उसपकार – तेली – वेलिंगकार – शिरसाट – मेरकर - गाड – गांठो – वाडकर – दांतिये – मणेरकर – पावसकर – सोलापूरकर – बोर्डेकर – बोंगे – हणजुणकर."

१४

श्रीदेवी शर्वाणी

आणि

श्रीवेताळ साळगावकर

अडवलपाल – डिचोली



श्रीदेवीशर्वाणी, अडवलपाल

श्रीदेवी शर्वाणी आणि श्रीवेताळ साळगावकर देवस्थान

गोमंतकातील डिचोली तालुक्याच्या अडवलपाल या गावात आज श्रीदेवी शर्वाणी व श्रीवेताळ साळगावकर या दैवताचे जे देवस्थान आहे ते इसवी सनाच्या १६ व्या शतकाच्या मध्यापर्यंत बार्देश तालुक्यातील साळगाव येथे होते ज्या काळात तेथे ग्रामसंस्था स्थापन होऊन वसाहत स्थिरस्थावर झाली. या काळी तत्कालीन पध्दतीनुसार तेथे ग्रामदैवत म्हणून वरील दैवतांची मूळ स्थापना झाली त्याचा सर्व एकंदर खर्च त्या ग्रामसंस्थेकडून केला जात असे. इसवी सन १५१० मध्ये गोवा बेट किंवा तिसवाडी पोर्तुगीजांनीं आदिलखानाकडून जिंकून घेतले. पुढे इ. सन १५४२ मध्ये सासष्टी व बारदेश हे प्रदेश इब्राहिम आदिलखानाने श्री कृष्ण शेणवींयांच्या मध्यस्थीने पोर्तुगीजास बहाल केले. इ. स. १५६६ पर्यंत गोवा बेटाचें संपूर्ण खिरस्तीकरण झाले होते. इ. स. १५६० मध्ये जेजुइट पंथाचे लोक आपल्या धर्म प्रसारार्थ सासष्टींत प्रथमतःच गेले आणि त्यांनीं त्या प्रदेशात मूर्ती भंजन, देवालयांची मोडतोड आणि आगी लावणे आणि बळजबरीने बाटाबाटी करून कहर माजविला. तेथील लोकांनीं आपल्या शक्यते-प्रमाणे आपापल्या दैवतांचे स्थलांतर सासष्टीच्या हद्दीबाहेर इतर राज्यांत केले असल्यामुळे जेथे दैवतांच्या मूर्ती राहिल्या नाहीत अशी दोनशें ऐंशी पेक्षां जास्त देवालयाच्या इमारती इ. स. १५६७ च्या पुर्वार्धापर्यंत पोर्तुगीजांनी पाडून टाकल्या. सासष्टीत चाललेले हे मूर्तीभंजनाचे कार्य पाहून बारदेशमधील फ्रांसिस्कन पाद्री यांस आपणही तसेच करावे असे वाटून त्यानी बारदेशमधील हिंदुच्या सर्व देवालयाच्या नासधुसीस आरंभ केला. व याची चाहूल लागताच तेथील हिंदुधर्मीयाना आपापली दैवते स्थलांतर करून पोर्तुगीज राज्याच्या सरहद्दीबाहेर सुरक्षित स्थळी नेली आणि यापैकीच बारदेश तालुक्याच्या साळ-गावातील दैवताचे स्थलांतर त्यांच्या कुळाव्यानी डिचोलीच्या अडवलपाल गावांत केले. कारण त्याकाळी डिचोली तालुका पोर्तुगीज लोकांच्या ताब्यात नव्हता. बारदेश तालुक्यातील देवालयाच्या मूर्तीशिवाय राहिलेल्या इमारती पोर्तुगीजांनी इ. स. १५६७ पर्यंत मोडून टाकल्या. Fr. Paulo de Trindade Con quista Spiritual de Oriente; Wicki Documenta VII Pagina 396. पोर्तुगीजांनी उध्वस्त केलेल्या बारदेश तालुक्यांतील हिंदु देवालयाची नोंदणी पोर्तुगीज कालीन सरकारी ऐतिहासिक दप्तरखान्यांतील कागदपत्रावरून केलेली आढळते त्यातील देवालयांची यादी अपूर्ण आहे हे खरे असले तरी त्यात साळगावातील वेताळ देवालयाची इमारत उध्वस्त केल्याची माहिती मिळते आणि यावरून त्या देवालयात स्थलांतर पुर्वकालांत श्रीदेवी शर्वाणी व श्रीवेताळ ही दैवते असावीत कारण ज्या कुळाव्यानी त्या दैवतांचे स्थलांतर करून अडवलपाल येथे नव्याने स्थापना केली ती स्थापना करतांना ती दैवते सांळगाव येथे असताना ज्या पध्दतीने स्थापन केलेली होती. तीच पध्दती लक्षात घेवूनच त्याप्रमाणेच वागले असणार हे स्वाभाविकपणे वाटते. स्थलांतरानंतर अडवलपाल येथे दैवतांची स्थापना जी केलेली आजतागायत आपण पहातो, त्याही स्थापनेत मुख्य किंवा प्रमुख दैवत श्रीदेवी शर्वाणी आणि श्रीवेताळ हीच असून त्याशिवाय आनुषंगीक दैवते म्हणून श्रीमहादेव, श्रीरवळनाथ, श्रीसांतेरी, श्रीदामोदर, श्रीपुरमार, श्रीपुरवंश श्रीभुलेश्वर यांची स्थापना केलेली आढळते. यापैकी श्रीमहादेव (लिंग) श्रीरवळनाथ (मूर्ती) श्रीसांतेरी (मूर्ती) श्रीदामोदर (पाषाण) श्रीपुरमार (लिंग) श्रीपुरवंश (पाषाण) श्रीभुलेश्वर (पाषाण) या स्वरूपात आहेत. या दैवताशिवाय पांच वेगवेगळ्या कुटुंबांचे पांच वेगवेगळे कुळपुरुष यांची स्थापना केलेली आढळते. त्यांची नांवे अशी – बाप, सोमनाथ, मत्सर, ब्राम्हण आणि बालवश, पैंकी पहिल्या तीन कुलपुरुषांची प्रतिके पाषाण स्वरूपात, चवथ्याचे पाषाण आणि पांचव्याचे पाषाणी मूर्ती स्वरूपात असून त्या प्रत्येकाच्या लहान देवळ्या मुख्य देवालयासंभोवती आहेत.

धार्मिक उत्सव

देवस्थानांतील देवतांची दैनिक पुजा अर्चा, महानैवेद्य, नंदादीप वगैरे शिवाय जे महत्वाचे उत्सव म्हणून मानले जातात ते असे :- कार्तिक अमावास्येला दिवजांची जत्रा असते. हा उत्सव प्रेक्षणीय आहे. मार्गशीर्ष शुक्ल तृतीयेला काला व त्याचे दुसरे दिवशी गोंळणकाला; मार्गशीर्ष शुक्ल तृतीये नंतर जो पहिला रविवार किंवा बुधवार येईल या दिवशी महाखेत्र नांवाचा कार्यक्रम असतो. मार्गशीर्ष शुक्ल एकादशी रोजीं पालखी उत्सव, मार्गशीर्ष पौर्णिमा रोजीं श्रीदेवी शर्वाणीचा पालखी उत्सव तसेंच फाल्गुन शुक्ल पंचमी दिवशी श्रीदेवीशर्वाणीच्या स्थापना दिवसानिमित्त पालखी उत्सव आणि फाल्गुन पौर्णिमेला होळी उत्सव असे उत्सव त्या देवस्थानांत होत असतात.

देवस्थानचे कुळावी महाजन

देवस्थान ज्या कुटुंबांनीं स्थापन केलें व स्थापन कालापासून आजतागायत त्या देवस्थानचे संरक्षण डागडुजी, दैनंदिन खर्च वगैरेची सर्व जोखीम आणि जबाबदारी ज्या कुळावी कुटुंबांनीं केली. ती सर्व कुटुंबे त्या देवालयांची महाजन कुटुंबे म्हणून मानण्यांत येतात, त्यांची उपनांवे अशी आहेत प्रभू साळगांवकर, नाईक साळगांवकर, शेणवी साळगांवकर, धोंड साळगांवकर आणि पेठकर साळगांवकर याप्रमाणे वेगवेगळ्या पांच उपनांवाच्या महाजन सदस्यांचा समावेश आहे. या देवस्थानांत सर्व महाजनांस, हिंदु चालीरितीच्या नियमावलीत म्हणजे कोदिगु दुस उझुस इ कोस्तुमीस दुस हिंदुस नावाच्या कोदिगास नमुद असलेल्या प्रमाणे सारखे अधिकार आहेत असे स्पष्ट कलम त्या देवस्थानच्या घटनात्मक नियमावलीच्या कलम नंबर तीन मध्ये उधृत केलेले आहे. या देवस्थानची घटनात्मक नियमावली सरकारी ऑर्डर तारीख १३ ऑक्टोबर १९६६ नुसार पास झाली असून ती नियमावली (कोंप्रोमिस्सु) गव्हर्नमेंट गॅझेट बोलेती ऑफिसीयाल सेरिया पहिली, नंबर ३१ तारीख तीन नोव्हेंबर १९६६ च्या अंकात प्रसिध्द झालेली आहे. त्या नियमावलीची एकंदर कलमे चोवीस असून त्या नियमावलीस जोडून त्या देवस्थानच्या तत्कालीन महाजनांची नोंद नांवनिशीसह प्रसिध्द केलेली आढळते. त्या नोंदीत एकंदर महाजन संख्या ८११ असून खाली तारीख १४ सप्टेंबर १९६६ हीआहे. त्या नोंदी नांवनिशी प्रमाणे क्रमांक १ ते क्रमांक ५४ पर्यंत प्रभू साळगांवकर, क्रमांक ५५ ते क्रमांक १८५ नाईक साळगांवकर, क्रमांक १८६ ते क्रमांक २६५ शेणवी साळगांवकर, क्रमांक २६६ ते क्रमांक ४७७ धोंड साळगांवकर आणि क्रमांक ४७८ ते ८११ पेठकर साळगांवकर या उपनांवाचे महाजन इसमांची नांवे त्यांत उल्लेखिलेली आहेत. या देवस्थानच्या महाजनांत दोन समाजांचा एकत्र समूह नांदत असून यांत पेठकर साळगांवकर खेरीज इतर प्रभू साळगांवकर, नाईक साळगांवकर, शेणवी साळगांवकर, धोंडे साळगांवकर हे गौडसारस्वत ब्राम्हण ज्ञाती समाजाचे आहेत. गोमंतकांतील देवस्थानांचा वस्तुस्थितीनुसार अभ्यास करता असे आढळून येते की गोमंतकांतील सर्वच देवस्थाने एकाच तऱ्हेची नाहीत त्यांत नानाविध प्रकार त्यांच्या मूळ संस्थापनेच्या कालापासूनच दिसून येतात. कांही देवस्थाने कोणत्या तरी एका विशिष्ट ज्ञाती समाजाने स्थापना केलेली, कांही देवस्थाने एका पेक्षा जास्त वेगवेगळ्या ज्ञाती समाजाने संयुक्तरित्या स्थापन केलेली, कांही देवस्थाने ठराविक कुटुंबांनी स्थापन केलेली अशा व याही शिवाय वेगळ्या प्रकारचीही बारकाईने अभ्यासूस आढळतात. हा विषय सांस्कृतिक ऐतिहासिक संशोधनाचा आहे.

१८

श्रीचंद्रेश्वर – भूतनाथ देवस्थान

पारोडे – केंपे

॥ श्री चंद्रेश्वर ॥



॥ श्री भूतनाथ ॥

श्री चंद्रेश्वर – भूतनाथ देवस्थान

पारोडे, केपें - गोवा.

श्रीचंद्रेश्वर - भूतनाथ देवस्थान

अखिल भरतखंडात जशी विविध ठिकाणी द्वादश ज्योर्तीलिंगे या सुप्रसिध्द नावाने महान प्राचीन कालापासून यात्रास्थाने म्हणून ओळखण्यात येऊन त्या त्या क्षेत्रांत प्रतिवर्षी कोणत्याही एका महिन्याच्या ठरावीक तिथी दिवशी महायात्रा भरत असते, तशीच या पुण्यभूमी गोमंतकांत अनेक ठिकाणी होती आणि आहेत. याचे पुरावे पुराण-इतिहास कालापासूनचे असल्याने त्याबद्दल आता आश्चर्य करण्यासारखे काहीच नाही.

द्वादश ज्योर्तीलिंगापैकी एक श्रेष्ठ जे काशी—वाराणसी या तीर्थक्षेत्रांत श्रीविश्वेश (श्रीकाशी-विश्वनाथ) या नावाने हिंदु धर्मियांचे परमपवित्र श्रीगंगा भागीरथी तीरावर आहे आणि सबंध वर्षाचे एकंदर दिवसात असंख्य यात्रेकरू या महान पवित्र तीर्थ स्नानासाठी तेथे जाऊन आपआपल्या पातकांचा नाश करून पुण्य मिळविल्याचे आणि इह जन्माचे सार्थक झाल्याचे मानलेले ऐकून आणि पहात आहेत तसाच काहीसा प्रकार इतिहास कालात गोमांचल पर्वतावर त्या काली असलेल्या ब्रम्हपुरीतील श्रीगोमंतेश्वर दैवताचे आणि तेथील तीर्थ क्षेत्राचे महात्म्य होते आणि त्या पवित्र तीर्थ क्षेत्रावर अहोरात्र भाविक यात्रेकरूंचे थव्यांचे थवे गोव्याबाहेरील भारतांतून लोटतच असत. आणि हे चित्र पाहून, न जाणो कोणेही एके दिवशीं आपल्या या गोवा राज्यावर हे लोक आकस्मिकपणे चाल करून आल्यास आपण हे राज्य गमावून बसू असा मनीं मानसीं ध्यास घेऊन भयाने तत्कालिन राज्यकर्ते धर्मवेडे खिरस्ती धर्मीय पोर्तुगीजांनी त्या श्रीगोमंतेश्वर दैवतासह तेथील तीर्थक्षेत्राचा संपूर्ण विध्वंस करून त्यांत गोमांस, हाडें इत्यादि अपवित्र वस्तूंचे ढीग घालून गाडून पुरून टाकले होते. हा इतिहास काही आतां नव्यानेच वाचकांसमोर येत आहे असा भाग नसून हा इतिहास जगजाहीरपणे चार शतके वर्षापासून सर्वांस माहीत आहेच, आणि आतां फक्त या चालू शतकांत गेल्या पन्नास वर्षामागे त्या जागीं गोवा सरकारच्या पुरातत्व खात्याने उत्खनन करून जमिनीत गाडलेलें गर्भागार, तीर्थस्नानाची मुख्य जागा वगैरे उजेडात आणली गेली व ते उत्खनन पुढे बंदच राहिलें, इतकेच काय ते. सांगण्याचा मुख्य विषय म्हणजे या पुण्यभूमीत जी अतिप्राचीन अनेक शिवस्थाने लिंगरूपात होती व आजही आहेत त्यातीलच एका शिवस्थानाची ओळख वाचकांस करून देणे आणि जे प्राचीन शिवस्थान सासष्टी तालुक्यात असूनही ज्या तालुक्यात इ. सनाच्या सोळाव्या शतकात खिरस्ती धर्मवेड्यानी हिंदूंची बाटाबाटी बळजबरीने केली, देवालयांच्या इमारती मोडून जाळून विध्वंस केल्या, मूर्ती फोडल्या त्याच काली त्याच तालुक्यात असलेले जे शिवस्थान त्यांच्या तावडीत सापडले गेले नाही ते पारोडा येथे उंच पर्वतावर आणि रम्य स्थळी असलेले.

श्रीचंद्रेश्वर - भूतनाथ देवस्थान

हे दैवत आणि त्याच्या देवस्थानाबद्दल पुराणकालापासून आजतागायत संशोधनपूर्वक आणि सविस्तरपणे माहिती शक्य ती प्रसिध्द करणे, पृष्ठ संख्या मर्यादा लक्षांत घेता ते शक्य होत नाही म्हणून शक्यतो आटोपशीर ती माहिती लिहिणे भाग आहे आणि त्यास अत्यावश्यक म्हणून गरजेपुरताच पौराणिक आणि ऐतिहासिक दृष्ट्या थोडासा तरी विचार करावे लागेल.

पौराणिक माहिती

भारतीय पुराणांच्या समृध्द परंपरात स्कंदपुराणांतर्गत सह्याद्रिखंडाचे स्थान फार वरचे आणि प्राचीनतेच्या दृष्टीनेही त्याची तुलना काशी, कांची, अवन्तिकेच्या तोलाची व मोलाची असून त्यात सह्याद्रिच्या परिसरातील तीर्थक्षेत्रे व देवस्थाने इत्यादिंचे उल्लेख विस्तारपूर्वक व इतर फार महत्वपूर्ण माहिती असल्याने या ग्रंथाला सांस्कृतिक वाङमयीन तसेच इतिहास संशोधनाच्या दृष्टीने वेगळे व आगळे सर्वांगीण महत्व आहे. आणि या पुराणाच्या सह्याद्रि खंडात चंद्रचुड (चंद्रेश्वर) माहात्म्य, चंद्रचुडाचा

प्रादुर्भाव, तीर्थप्रशंसा, अंबष्ठचरित्र, कपिलतीर्थ, सोमतीर्थ, सिध्ददारा तीर्थाचे महात्म्य, पर्वताचे उपाख्यान वगैरे विषय आहेत. पण सध्या फक्तच त्या श्रीचंद्रेश्वर पर्वत आणि चंद्रेश्वर महालिंगापुरती अल्पशी माहिती घेऊ.

ह्याच पर्वताच्या पश्चिमेला मालती नांवाची नदी आहे. तपस्वी लोक तिचे सेवन करतात. गंगा नदीचे सेवन करावे त्याप्रमाणे कर्मनिष्ट, अग्नीहोत्री व श्रेयस्कर असे व्रतस्थ या नदीतीर्थाचे सेवन करतात. मालती नदीत स्नान केल्याने सर्व ब्राम्हण मत्सरहीन होऊन सूर्याप्रमाणे तेजस्वी होतात. या नदीत सदैव स्नान करून धूर्जटीचें दर्शन घ्यावें. त्यामुळे मनुष्यात योगिदुर्लभ स्नान प्राप्त होते. अनेक पापांनी दूषित झालेल्या सर्व लोकांना पवित्र करण्यासाठीच हे तीर्थ जगात निर्माण केले आहे. ऋषि म्हणाले, दूर अंतरावरून सुध्दा एकदाच चंद्रचूड दर्शन घेऊन त्यास नमस्कार केल्यास मनुष्य सर्व क्षुद्र पापांतून मुक्त होतो यांत संशय नाही. या पर्वतरूपी शंकरास प्रदक्षिणा केल्यास मनुष्य पृथ्वीवरील सर्व पापांतून मुक्त होतो. जो मौन धारण करून कुशावतीत स्नान करील व पवित्र होऊन अगस्त्यरूपी शिवाची व वृषभध्वज देवेश्वराची पूजा करील त्याला सहस्त्र अश्वमेध यज्ञ केल्याचे श्रेय निश्चित मिळेल. पण मृत्युलोकांत दैवाधीन असलेल्या मानवास पंचक्रोश परिमाण असलेल्या या चंद्रचूड महालिंगाची माहिती नाही. ह्या क्षेत्रांतील मानव पर्वतरूपी महालिंगाला प्रदक्षिणा करून केवळ एकदांच देवालयास प्रदक्षिणा करील, तर तो निश्चित रुद्ररूप होईल. या क्षेत्रांत सतत राहून सर्व कर्माचा त्याग केलेल्या मनुष्यास नरकवास भोगावा लागत नाही. या पर्वतोत्तमावर राहून गंगेंत स्नान केल्यास मनुष्याला श्रेष्ठ गति लाभते. त्याला शरीरिक कर्माचें फळ भोगावे लागत नाही. ही प्राचीन दिव्य कथा ऐकून सर्व ऋषि ह्या पर्वताच्या सभोंवार राहूं लागले. हें सर्वश्रेष्ठ आख्यान जो नेहमी श्रवण करील त्याला पुत्रपौत्रादि प्राप्त होऊन आता तो चंद्रचूड कृपेने शिवपदी जाईल. वरील मराठी भाषांतर मूळ संस्कृत अध्याय आठवा, चंद्रचूड (चंद्रेश्वर) महात्म्य, स्कंदपुराणान्तर्गत सह्याद्रि खंड मधील आहे. आणि या एवढ्यात मजकुरावरून श्रीचंद्रेश्वर महालिंग आणि श्रीचंद्रेश्वर पर्वत याबद्दलची महती जी स्कन्दाने सांगितली, तीच वाचकांस समजल्यानंतर पौराणिक माहितीबद्दल अत्यावश्यक थोडी फार कल्पना येऊं शकते.

कुशावती नदी आणि श्रीचंद्रेश्वर देवाच्या प्रकटतेची कारण मिमांसा

ब्रम्हदेवाच्या चरण कमलापासून उत्पन्न झालेली, अत्यंत पवित्र, देवतास्वरूप व ऋषिजनप्रिय अशा या नदीचे कुशवती हें नांव सार्थ आहे. एकदां पुष्कळ काळपर्यंत पर्जन्यवृष्टी झालीच नाही. त्यामुळें फार मोठा दुष्काळ पडला म्हणून सर्व ऋषींनी त्या नदीची स्तुती केली आणि देवस्तुती करीत राहिले हे पार्वतीपते शंकरा, तू विनीत भक्तांचे दुःख दूर करणारा आहेस. हे जगन्नाथ कैलासपते, हे चंद्रशेखर जगदगुरो महादेवा आम्ही सर्व लोक दुःखाने गांजलो आहोंत. तू आमचे रक्षण कर या प्रमाणे स्तुती केल्यावर अधाविनाशी महादेवाने कित्येक योजन उंच असें पर्वतप्राय रूप धारण केले तो त्यांच्या समोर उभा राहिला. त्या शिवमंदिरात विविध रत्नें चमकत होतीं. फारच भव्य असें तें मंदिर चंद्रकांतीनें उजळले होतें. व अनुपम सुंदर होतें. महादेव मेघ गंभीर वाणीनें मुनीश्रेष्ठांना उद्देशून म्हणाला, माझ्या शरीरापासून उत्पन्न झालेल्या पाण्याने तुमची उपजिविका होईल. तसेच चंद्रसंपर्काने सेवलेल्या पाण्यामुळें तुमचा पापनाश होऊन जीवनही समृध्द होईल (श्रीचंद्रेश्वर माहात्म्य अध्याय पहिल्यांतील हा मजकूर संक्षिप्तात घेतला आहे. त्याबद्दल कुशवती नदीचा उगम आणि श्रीचंद्रेश्वर देवाची प्रकटता यांची कारण मिमांसा कळूं शकते.)

ऐतिहासिक माहिती

गोमंतकांत प्राचीन काली जी शेंकडों दैवतांची देवालयें इतर तालुक्यांत होतीं, त्याच प्रमाणे सासष्टी तालुक्यांतील होती, तीं इ. सन १५६०-१५६७ या कालावधींत पोर्तुगीजानी नष्ट केली त्यात पर्वतावरील श्रीचंद्रेश्वर देवस्थान अति उंच शिखरावर असल्यामुळे आणि तेथे चढणीची पायवाट गुळगुळीत आणि सुळसुळीत आणि काळ्या पाषाणी वाटोळ्या गोळ्यासारख्या दगडांची असल्यामुळे त्या जागी चढून जाणे

कठीण म्हणून असेल, किंवा त्या पर्वतावर गेल्यास खालीं त्या पर्वतास वेढा घालून वर गेलेल्यास कोंडून मारण्याच्या धोक्यास बळी पडणे संभवनीय आहे असे वाटल्यावरून असेलही, त्यानी पर्वतावर जाण्याचे टाळले असावे आणि म्हणून ते देवालय त्या खिरस्तलोकांच्या तावडीत सांपडले नसावे. प्रत्यक्षात उंच पर्वतावरील देवालय त्याच्या तावडीत जरी पडले नाही, तरी त्या देवालयाबद्दलची चीड आणि द्वेषभावना त्यांच्या मनांतील त्वेषाने उसळून आली नाही असे नव्हे, ती आलीच म्हणून त्या देवालयाच्या मालकी हक्काच्या उत्पन्नांच्या जमीनी त्यानी हिरावून बळकावून घेतल्या याचे स्पष्ट पुरावे गेल्या चाळीस वर्षांमागे या लेखकांस एका संशोधनांत मिळाले आहेत. त्याचा थोडासा उल्लेख केल्यास वाचकांस थोडीफार कल्पना येऊं शकते. पारोडा हा सबंध गांव पोर्तुगीजांनी बळकाविल्यानंतर काही शतकांनी त्या गांवचे वेगवेगळे भाग पाडून ते भाग जाहीर लिलांवावर लिलांव पध्दतीने विक्री करून सरकारने आपल्या गरजेसाठी पैसा जमां केला. या विक्रीं केलेल्या अनेक भागांपैकी एक भाग श्री. सौंदेकर राजाने विकत घेतला. एक भाग श्रीमंगेश देवस्थानने विकत घेतला किंवा विकत घेणे त्यास भाग पडले असावे. त्या प्रत्येक भागात शेतजमीन, बागायत वगैरे होती. श्रीमंगेश देवस्थानने विकत घेतलेल्या भागांतील काहीं जमिनीबद्दल पुरातन माहितीचा शोध संशोधनात्मक दृष्ट्या घेता घेतां, असे पुरावे मिळाले की, बाटाबाटी पूर्व कालांत पारोडा गांवच्या सर्व जमिनी श्रीचंद्रेश्वर देवाच्या मालकी हक्काच्या असाव्यात किंवा ग्रामसंस्थेच्या असल्यातरी, त्या जमिनीचे उत्पन्न कांही भाग श्रीचंद्रेश्वर देवाच्या नानाविध सेवेकऱ्यांच्या उदरनिर्वाहासाठी जुन्याकाली ठरविलेला असावा. कारण, त्या संशोधनात एका शेतजमिनीच्या तुकड्याबद्दल अशी माहिती उपलब्ध झाली कीं त्या शेतजमिनीच्या तुकड्याचे उत्पन्न श्रीचंद्रेश्वर देवाच्या प्रत्येक उत्सवास पालखी मिरवणुकीत व इतर उत्सव प्रसंगी एक नाभिक इसम जो आरसा उत्सव मूर्तीस समोर राहून दाखवी, त्या इसमास या सेवेसाठी, त्या शेत जमीनीच्या तुकड्याच्या वार्षिक पिकामधून एक भाग त्या सेवेसाठी वेतन म्हणून जाण्याची पध्दत होती. या वस्तुस्थितीमुळे लक्षांत आले की, पारोडा गांवच्या जमीनीच्या उत्पन्नाचा हिस्सा श्रीचंद्रेश्वर देवाच्या सेवेकऱ्याच्या चरितार्थासाठी नेमलेला होता, व नंतरच्या कालांत या जमिनी किंवा तो गांवच पोर्तुगीजांनी बळकाविल्यामुळे श्रीचंद्रेश्वर देवस्थानास व त्याच्या सेवेकऱ्यांस येणारे उत्पन्न बुडाले. असो.

गोमंतकांत श्रीचंद्रेश्वर दैवताची स्थापना ठिकठिकाणी कोणत्या कालांत, कोणत्या राजवटीत झाली असावी, याबद्दल खात्री पुराव्याच्या माहितीचा अभाव

पारोडे येथील श्रीचंद्रेश्वर भूतनाथ दैवतांबद्दल उल्लेख इसवी सनाच्या पांचव्या किंवा सहाव्या शतकांतील एका ताम्रपटात त्या दैवतांस भोजराजा पृथ्वीमल्लवर्मा या राजाने वतन दिल्याबद्दलचा आहे आणि या राजाची राजधानी बांदिवडे येथे असावी, अशा अर्थाचा मजकूर वाचनांत आला. पण ज्या लिखाणांत हा मजकूर आहे, त्यांत हा ताम्रपट कोणत्या सालांतील, तो ताम्रपट सध्या कोठे आहे, किंवा तो त्या लिखाणाच्या लेखकास कोठे वाचावयास मिळाला आणि त्या ताम्रपटांतील समग्र मजकूर काय आहे, निदान त्या ताम्रपटाच्या अस्तित्वाची माहिती कोठे, कशी उपलब्ध झाली, याबद्दल त्या लिखाणांत कांहीच नसल्याने त्याबद्दल कांहीच सांगता येत नाही. गोवा सरकारच्या पुरातत्व खात्याने गोवा मुक्तीपूर्व कालांत ज्ञात असलेल्या शिलालेख, ताम्रपट, विरागळ, नाणी, तसबिरी इत्यादि ऐतिहासिक संशोधनांच्या साधनांची ओळख जनतेस करून दिलेली आहे. पण, त्यात इ. सनाच्या पांचव्या किंवा सहाव्या शतकांतील ताम्रपटाची प्रसिध्दी, माहिती किंवा कॉपी असल्याची मला तरी पाहाण्यास मिळाली नाही.

श्री. पाद्री हेरास यानी केलेल्या एका लिखाणात चंद्रपूर (चांदर) ही राजधानी इ. सनाच्या ७ व्या शतकांत चालुक्य घराण्याचा राजा चंद्रादित्य याने स्थापिली असल्याचे त्या राजाच्या एका शिलालेखांत आणि तो शिलालेख (त्यांच्या म्हणण्याप्रमाणे) श्रीचंद्रेश्वर देवालय – पर्वतावर असून तो त्या देवालय इमारत बांधणी काल स्मारकाचा आहे. अशा अर्थाच्या मजकूराचे विधान त्यानी आपल्या लिखाणांत केल्याचे पाहिल्यानंतर त्या विधानाची सत्यता पडताळून पाहाण्यासाठी कांही ऐतिहासिक संशोधन करणाऱ्या अधिकारी व्यक्तींनी मुद्दाम पर्वतावर जाऊन श्रीचंद्रेश्वर देवालयास भेट दिली व तेथे कसून चौकशी करून शोधून पहाता तेथे कोणताच शिलालेख नसल्याची खात्री करून घेतल्याचे प्रसिध्द झाले.

आणि म्हणून त्या विधानात काही तथ्य नसल्याची खात्री पटली आणि तो तसा शिलालेख ही एक निव्वळ कल्पनेने केलेला अंदाज असावा असे वाटले. याला आणखी एक कारण असे की, चंद्रादित्य नांवाचा एक राजा कोंकणात होऊन गेला, त्याचा काल इ. स. ६५५-६५९ असा आहे. पण तो राजा जन्मास येण्यापूर्वी पासूनही चंद्रपूर (चांदर) हे सुप्रसिध्द होते याचे पुरावे मिळाले असल्याचे कै. डॉ. पांडुरंगबाबा शेणवी पिसुर्लेकर गोवा पुरातत्व खात्याचे डायरेक्टर यांनी आपल्या एका ऐतिहासिक लिखाणात नमूद केलेले आहे (पहा. १५०० वर्षापूर्वीचा गोमंतक.)

गोमंतकांत, पारोडा या गावाशिवाय प्राचीन काली आणखी कोणत्याही गावांत दुसरीकडे श्रीचंद्रेश्वर नांवाचे दैवत आणि देवालय होते की काय, याचा शोध घेऊं गेल्यास मडगाव येथे चंद्रनाथ आणि कुठ्ठाळ येथेही चंद्रनाथ दैवत आणि त्यांचे देवालय होते याचे पुरावे मिळतात. पण या दोनही चंद्रनाथांचा पारोडा येथील पर्वतावरील श्रीचंद्रेश्वर दैवताशी संबंध नाही. ती दैवते आजच्या कालांत जशी मडगाव व कुठ्ठाळ येथे नाहीत, तशी त्या गावातील इतर दैवते स्थलांतर करून दुसऱ्या गांवात गेली, तेथेही आजच्या कालांत चंद्रनाथ दैवत स्थापिलेले दिसत नाही. पण,

गोमंतकात आजच्या कालांत श्रीचंद्रेश्वर दैवत आणखी कोठे स्थापित आहे की काय ?

सांगे तालुक्यांत विचुंद्रे गावांत श्रीचंद्रेश्वर दैवताची स्थापना व त्याचे देवालय आहे. त्याचप्रमाणे सांखळी तालुक्यांत पाळी गावांत श्रीचंद्रेश्वर देवस्थान-कोठंबी (पाळी) येथे श्रीचंद्रेश्वर लिंग स्थापित असून येथे हल्लीच तीन वर्षापूर्वी नूतन लिंग प्रतिष्ठापना यज्ञ ता. १२ एप्रिल १९७८ ते ता. १६ एप्रिल १९७८ या पाच दिवसात झाला. कोठंबी-पाळी-सांखळी येथे या श्रीचंद्रेश्वर लिंगाची मूळ प्रारंभी स्थापना केव्हा झाली, आणि ती कोणी केली याबाबत कसलाच लेखी पुरावा अद्यापपर्यंत तरी उपलब्ध झालेला नाही. अशी एक दंतकथा सांगतात की, केपे तालुक्यातील कोठंबी गावातील एकेकाळी आपसांतील भांडणा-मुळे किंवा आपसांत एकमेकांच्या विचारात न पटल्यामुळे कांही लोक त्या गावांतून स्थलांतर करून सांखळी तालुक्यात यांनी नवी प्रतिकोठंबी स्थापली, आणि खरोखरच आता तेथे कोठंबी आहे. त्याच दंतकथेत असेंही सांगतात कीं, "चवथ्या शतकांतील चंद्रेश्वर सासष्टीतून भतग्रामी आला, कोठंबीची प्रतिकोठंबी झाली;" पण, अद्याप पर्यंत सांखळी तालुक्याच्या कोठंबी गावांतील इसम केपे तालुक्याच्या कोठंबी गावांत एक रात्र वास्तव्य करण्यास घाबरतो, असें ऐकिवांत आहे. पण, त्यावर आजच्या कालात कोणाचा विश्वास बसेल असे वाटत नाही. दंतकथा, आख्यायिका बाजूला सारून खरा इतिहास लिहायचा, तर अस्सल साधने जमवून निष्कर्ष काढले पाहिजेत. यासाठी, चवथ्या शतकांतील चंद्रेश्वर, आणि तो सासष्टीतून भतग्रामी आला असल्यास केव्हां धाबद्दल अस्सल साधनांच्या अभावी निश्चितपणे निष्कर्ष काढणे योग्य वाटत नाही.

पोर्तुगालचे ख्रिस्ती धर्मीय राजे व त्यांचे गोव्यातील प्रतिनिधी गव्हर्नर जनरल यांच्या धोरणात आमुलाग्र बदल, हिंदु प्रजाजनांच्या न्याय मागण्यास संमती देणारे कायदे जारी, आणि तशी कृती, पण गोव्यातील सर्वोच्च ख्रिस्ती धर्माधिकाऱ्यांकडून या धोरणास आंतून सुरूंग लावणारे प्रकार

इ. स. १५६० सालीं गोमंतकात जें त्रिबुनाल द इंक्विझिसांव स्थापले होतें, त्या संस्थेने गोव्यात आपल्या अधिकाराचें अतिक्रमण आणि हिंदु धर्मीय प्रजाजनांचा केलेला अनन्वित छळ लक्षांत घेऊन, पोर्तुगालच्या राजाच्या कार्त रीजय नामक ता. १६ जून १८१२ च्या हुकुमाने तें त्रिबुनाल द इंक्विझिसांव, कायमचेंच नष्ट करण्यात आलें आणि हिंदु धर्मीय जनतेस आपापल्या धार्मिक रितीरिवाजाप्रमाणे वागण्याचे व कार्यक्रम करण्याचे सर्व हक्क त्या हुकुमाने अबाधित ठेवण्यात आले. पोर्तुगीज सरकारचें हें धोरण लक्षांत घेऊन इ. सन १८१८ साली गोव्याचे ख्रिस्ती धर्मीय युरोपिअन गव्हर्नर व्हॉइसराय कोंदि द रियु पार्द्रु यानी गोव्याचे उच्च धर्माधिकारी आर्चीबशप सां गाल्दिनु यांचा विरोधी सल्ला मुळीच न मानता पणजी शहरांत हिंदुधर्मीयांस नवीन देवस्थान स्थापण्यास आणि देवालयाची इमारत बांधण्यास पूर्ण संमती आणि परवानगीचा लेखी हुकुम दिला.

गोव्याचे सर्वोच्च धर्माधिकारी आपले हुकूम पाद्री लोकांस देऊन शक्य त्या रितीने ठिकठिकाणी हिंदूच्या धार्मिक कार्यक्रमांस अप्रत्यक्षपणे जोरदार अडचणीचे प्रकार तयार करून त्रास देण्यास अहर्निश झटतच राहिले. मडगांव येथील खिरस्ती धर्मीयच पण एक तडफदार मतवादी श्री. बेर्नाद्द फ्रांसिस्क, दे कोस्त यांनी एक लेखमाला मडगांव येथे त्या काली प्रसिध्द होणाऱ्या "उल्त्रामार" या वृत्तपत्रांत सुरू केली. गोव्याचे तत्कालीन गव्हर्नर जनरल जुआकीं जुझे माशाद यानी राजकारभारांत उदारमतवादी आणि न्याय धोरण अंमलांत आणले आणि विनाकारण निरपराधी हिन्दू प्रजाजनास न पिळण्याचे धोरण अवलंबिले. असे असून सुध्दां, गोव्यातील खिरस्ती उच्च धर्माधिकारी यांची कृत्ये हिन्दू धर्मीयांस ज्या ज्या रितीने अपमान कारक घटना मुद्दाम घडवितां येईल, त्या तशा प्रकारच्या घटना, अंमलात आणण्याचा सपाटा चालविला म्हटले तरी चालेल. याचे उदाहरण म्हणून दाखवायचे झाल्यास काणकोण तालुक्याच्या लोलये गावांत, फोंडा तालुक्याच्या शिरोडे गावांत, केपे तालुक्याच्या असोळडे गावांत हिन्दूच्या देवालयांच्या जवळ आसपासच्या अंतरावर नवीनच कपेल किंवा चर्च उभारून भावी कालांत तंटे बखेडे मुद्दाम उत्पन्न करण्याच्या दुष्ट हेतूने प्रयत्नशील राहिले. हिन्दू धर्मीयांनी सर्व परीस्थिती कथन करून विनंती, तक्रारी अर्ज केले. पण जिथे बुध्दिपुरस्सरच कार्य चालते तिथे तक्रारी विनंती अर्जाचा उपयोग काय होणार हा ? प्रकार एवढ्यावरच थांबला नाही ! खिरश्चन पाद्री, नवीन काबिजादीच्या गावांत खिरस्ती धर्मीयांची प्रेतयात्रा त्यांच्या दफन भूमीकडे – स्मशानाकडे नेतांना ते प्रेत मुद्दाम वाटेत हिन्दू देवालयासमोर ठेवून तेथे कांही वेळ मुक्काम (पेणे) करून कोणतेही कारण निमित्त-मात्रास शोधून हिन्दूधर्मीय लोकांकडे तंटेबखेडे उत्पन्न करून देवस्थानांस अपमानी कृत्ये करूं लागले ! हिन्दू मठांचे स्वामी गोमंतकांत आपल्या संचारासाठी फिरतांना त्यांच्याबरोबर परंपरेने चालत आलेली रितीरिवाजा प्रमाणे चवऱ्या मोर्चेलें इत्यादि धार्मिक लवाजम्याची निशाणी हक्क चिन्हे वाहविण्याची बंदी करण्याची अरेरावी किंवा मदांधशाहीचे प्रकार दिसूं लागले ! त्यापुढेंही जावून कुंभारजुवे, नेरूल, शिरोडे या गावात हिन्दू दैवतांच्या उत्सव मिरवणुकी कार्यक्रमांत विघातक कृत्ये करून दैवतांच्या उत्सव मिर-वणुकी वाटेतच बन्द पाडण्याच्या कृत्यांपर्यंत मजल पोंचली ! पुरातन कालापासून प्रति वर्षी पारोडा येथे पर्वतावरील श्रीचंद्रेश्वर देवाची पालखी मिरवणुकीने निघून ती गावांत मोठ्या उत्सवांत वाजत गाजत फिरत असे, ती मिरवणुक आणि श्रीचंद्रेश्वर देवाची पालखी, गोव्याचे खिरस्ती धर्मीय धर्मगुरू, गोंवा गव्हर्नमेंट कौन्सिलचे अध्यक्षपदावर असल्याची संधी आणि राज्यकारभार सुत्रें हातीं असल्याची वेळ सांधून, ती पुरातन कालापासून अखंडपणे चालत आलेली, पोर्तुगीज लोक गोव्यांत प्रवेश करण्यापूर्व कालापासून चालत आलेली, ती

श्रीचंद्रेश्वर देवाची दसरा उत्सवाची पालखी मिरवणूक भर रस्त्यांतच अडविली !!!

आणि ती अडवून ठेवण्याचे कारण म्हणून सांगितलें की, ज्या रस्त्यावरून ही पालखी जाते, त्या रस्त्याच्या एका बाजूच्या कांहीशा अंतरावर गेल्या ४० किंवा ७० वर्षांमागे बांधलेले एक चर्च आहे. त्या चर्चचा अपमान या मिरवणुकीमुळे होतो ! पण, हे चर्च तेथे बांधण्यापूर्वकालाच्या शेकडो वर्षापासून आणि बांधल्यानंतरच्या कालानंतरही साधारणपणे पाऊण शतक वर्षाचा दीर्घ काल ती पालखी व मिरवणुक त्याच रस्त्यावरून नियमित आणि अखंडपणे चालू असता आताच हा नवा शोध कां म्हणून यावा ? वगैरे सर्व बाजू मांडल्या. तक्रारी विनंती अर्ज झाले, मिरवणूक शांत आणि स्तब्धपणे कसलाच गाजावजा न करता नेण्याचे स्वतःच हिंदूनी बंधन घालून घेण्याचेही मान्य केले, पण काही एक मान्य न करता बंदी हुकूम-गव्हर्नमेंटचा अमलात आणला गेला ! आणि या बंदीमुळे त्या पालखी मिरवणुकीची, हिंदू धर्मीयांची कशी काय परीस्थिती शोचनीय झाली, याची कल्पना आणि सविस्तर वृत्तांत किती दुःखदायक आणि धक्का देणारा असला पाहिजे, हे स्मरणातसुध्दा न आणणे बरे. आलेल्या संकटास सामोरे गेल्याशिवाय निर्वाह तर नाहीच, या कारणाने, श्रीचंद्रेश्वर देवस्थानच्या महाजनानी गोवा गव्हर्नमेंटच्या या हुकुमाविरुध्द अपील करून पोर्तुगालच्या राजधानीच्या लिस्बन शहरातील सर्वोच्च न्यायालय सुप्रेमु त्रिबुनाल आदमिनी-स्त्रातिव्ह कोर्टात सादर केले. पण तेथे त्या अपीलाची फाइल निद्रावस्थेत पडून राहिली ! श्रीचंद्रेश्वर देवस्थानच्या महाजनानी तारेने पोर्तुगालच्या वसाहत मंत्र्यांचे या परीस्थितीकडे लक्ष वेधून मागणी केली, त्याची मागणी अगदी न्यायाची असल्याचे अभ्यासपूर्वक ठरवून तातडीने आपला हुकूम गोव्याचे गव्हर्नर

जनरल श्री. नोव्हाईस यास कळवून बंदी हुकूम रद्द करून उत्सव व मिरवणूक चालू करण्याचा हुकूम दिला ! पण, हे गव्हर्नर साहेब त्या वरिष्ठ हुकूमाची अंमलबजावणी करण्यासाठी भयाने चालढकल करू लागले ! हे गव्हर्नर गोव्यातून गेले, आणि त्यांच्या जागी नवे गव्हर्नर श्री. ऑर्त इ कोस्त नावाचे आले. त्यानी हिंदु धर्मीयांची मागणी खरोखरच न्यायाची असल्याची अभ्यासून खात्री करवून घेऊन, आपला निकाल हिंदु धर्मीयांच्या हिती दिला. पण, नंतर त्याच गव्हर्नरने ख्रिस्ती धर्मीयांच्या दडपणास बळी पडून आपला दिलेला हुकूम परत फिरवून रद्द केला !.... आता अशा परिस्थितीमुळे काय करावे असा महादारूण प्रसंग हिंदु धर्मीयांवर ओढवला. अशा वेळी सासष्टीं तालुक्याच्या न्यायालयाचे न्यायाधीश जज्ज, एक युरोपियन, फार प्रामाणिक मोकळ्या मनाचे, उदारमतवादी, रिपब्लीकन विचारांचे, थोर कायदेपंडित दोतोर जुझे मानुयेल कोंवर्सेरू दे कोस्त हे होते. त्याकडे सर्व हिंदुधर्मीयानी धांव घेतली. आणि त्याकडे आपले सविस्तर माहितीसह लेखी गाऱ्हाणे, पोर्तुगाल राष्ट्राच्या पार्लमेंटास सादर करण्याची व्यवस्था कोणाही कडून तरी करवून घेण्याची विनंती केली. आणि या जज्ज साहेबानी सहानुभूती पूर्वक ते लेखी गाऱ्हाणे पोर्तुगालच्या पार्लमेंटाचे एक सभासद रिपब्लीकन मताचे आणि पक्षाचे नामांकित अध्वर्यु दोतोर आंतोनियु जुझे द आल्मेंद यांस या गाऱ्हाण्याकडे लक्ष देण्याची मागणी करून ते त्यांच्याकडे रवाना केले. पार्लमेंटचे सभासद उल्लेखित दोतोर आल्मेंद यानी फार सहानुभूतीने प्रयत्नपूर्वक हे प्रकरण इतक्या चांगल्या प्रकारे घसास लावले की, त्यांनी स्वतः पार्लमेंटांत या पालखी उत्सवाचा व त्यांवर अन्यायकारकपणे बंदी घालण्याचा सविस्तर साद्यंत इतिहासच पोर्तुगालच्या त्या पार्लमेंटपुढे म्हणण्यापेक्षा सर्व राष्ट्रापुढेच मांडला आणि जे जाहीरपणे त्या पार्लमेंटात भाषण त्यांनी केले, ते न भूतो न भविष्यति असे केलेच, पण त्या भाषणांत स्पष्टपणे असे दर्शीवले की,पोर्तुगीज राष्ट्राचा अमल जो एकेकाळी हिंदुस्थानात कालिकतपासून अरबस्थान किनाऱ्यापर्यंत लांब पोचला होता, तो अशा हिंदु धर्म छळाच्या धोरणांचा अवलंब केल्यामुळेच सध्या गोवा, दमण व दीव एवढ्या लहान भागात कमी कमी होऊन राहिला आहे हे स्पष्टपणे आमच्या राजकारणाच्या योग्य धोरणाचा अभाव नव्हे काय ? शेवटी त्यांनी आपल्या भाषणात हिंदुधर्मीयांस ख्रिस्तीधर्मीयाप्रमाणेच पूर्ण धर्मस्वातंत्र्य मिळावे अशी विनंती केली हे समग्र भाषण ज्यास पोर्तुगीज भाषेचे ज्ञान आहे त्या जिज्ञासूंना वाचण्याची इच्छा असल्यास 'दियारियु दे सेस्सोइस' नावाने पार्लमेंट सभेचा वृत्तांत जशाचा तसा प्रसिध्द केला जात असे, त्यावर वाचावयास मिळतो. शिवाय, त्याचे मराठी भाषांतरही करून घेणारास ते सर्व ऐतिहासिक भाषण फारच महत्वाचे, आजच्या कालांत सुध्दां बोधप्रद ठरूं शकेल. पार्लमेंटात हे भाषण झाल्यावर गोव्यात चालले आहे तरी काय ? याचा साक्षात्कार सर्व पोर्तुगालासच झाला म्हटले तरी चालेल. त्यानंतर सुप्रीम कोर्टात धोरत पडलेली अपीलाची फाईल जागी झाली. सुप्रीम कोर्टाने अपील मंजूर केले व श्रीचंद्रेश्वर देवस्थानच्या महाजनांस संपूर्णपणे न्याय देऊन निकाल दिला. हा निकाल (आकोर्देग) गोव्यात सरकारी गॅझेट बोलेती ओफिसियाल या राजपत्रांत संपूर्णपणे ता. १६ सप्टेंबर १९१० च्या अंकात प्रसिध्द झाला असून ऐतिहासिक घटनांची आवड असलेल्यानी, जिज्ञासूनी, तो मुद्दामच वाचावा. ज्या देपुताद्खासदारांनी हे प्रकरण घसास लावून पार्लमेंटांत आपल्या ओजस्वी भाषणाने सबंध पोर्तुगालजागा केला तेच दोतोर आल्मेंद पोर्तुगालांत लगेच ता. ५ ऑक्टोबर १९१० रोजी पुकारलेल्या रिपब्लीकन राष्ट्राचे पहिलेच राष्ट्रपती झाले. सुप्रीम कोर्टात त्या कोर्टाचे जज्ज ख्यातनाम प्रोफेसर दे दिरेतु (मानवी हक्क विषयाचे प्राध्यापक) ज्यांनी हे निकालपत्र अभ्यासून लिहिले ते श्री. आबेल दे आंद्राद व ज्यांचा मसुदा सुप्रीम कोर्टाने मान्य करून आपला निकाल दिला, तेच पुढे त्या रिपब्लीकन राष्ट्राच्या मंत्रीमंडळाचे प्रधानमंत्री झाले. गोमंतकातील सासष्टी तालुक्याचे न्यायाधीश दोतोर कोंवर्सेरू दे कोस्त ज्यानी श्रीचंद्रेश्वर देवस्थानच्या महाजनांचे लेखी म्हणणे पोर्तुगालाच्या पार्लमेंटास सादर करविण्याचे फार परिश्रम करून त्या पार्लमेंटच्या एका उदार मतवादी सभासदामार्फत काम करून घेतले, ते जज्ज पोर्तुगालांत रिपब्लीकन राष्ट्र म्हणून पुकारतांच त्या राष्ट्राचे गोमंतकांत पहिलेच गव्हर्नर जनरल म्हणून मंत्रीमंडळाने त्यांची नेमणूक केली. अशा ध्यानीमनीं कधी स्वप्नांतही न योजलेल्या साक्षात्कारी अनुभवाच्या घटना मूर्त स्वरूपांत अवतरल्याचें पाहून, विस्तवाशी खेळ करणारांस हा अनुभव पुरेसा झाला, म्हणून श्रीचंद्रेश्वर देवाच्या श्रध्दावान् भक्तगणांनी थोरवी वर्णिली तर तें गैर कसें म्हणतां येईल ?

रिपब्लीकन राष्ट्र म्हणून उदयास आल्यानंतर हिंदु धर्मीयांस स्वर्गीय आनंद होणाऱ्या कोणत्या घटना घडल्या ?

पोर्तुगालात ता. ५ ऑक्टोबर १९१० रोजी रिपब्लीकन राष्ट्राचा उदय झाल्यामुळें त्या राष्ट्रास स्वतःचा राष्ट्रीय धर्म नाहीं असें पुकारण्यात येऊन निधर्मीय राष्ट्र म्हणजे कोणत्याही धर्माबद्दल पूर्णपणे अलिप्त असें कायदेशीरपणे संमत करण्यात आले. रिपब्लीकन राजसत्ता अंमलांत येतांच, जेते आणि जीत हे शब्द व कल्पना पूर्णपणे गाडले गेल्याची ग्वाही देण्यात आली. सरकारी नोकरशाहीत, न्यायालयात, आणि सर्व राज्यकारभारांत उच्चपदे उपभोगण्याचा हक्क संपूर्णपणे हिंदु धर्मीयांसही, खिरस्ती धर्मीयां-प्रमाणेंच समान मानण्यात आला. हिंदु धर्मीयांचे धार्मिक स्वातंत्र्याचे हक्क पूर्णपणे अबाधित राखण्यात आले. हिंदु धर्मपीठांचे धर्मगुरू, स्वामी आणि मठ--संस्थाने यांचे हक्क सुरक्षित करून स्वामींचा संचार खिरस्ती धर्मीय बिशप, पात्रीयार्क प्रमाणेंच समान हक्क मान्य केला गेला. इतकेंच नव्हे, तर रिपब्लीकन सत्तेच्या राजवटीच्या कालापासून हिंदु धर्मीय प्रजाजन, त्यांची देवालये, मठ संस्थाने यांच्या संरक्षित हक्कांबद्दल आणि त्यांस नानाविध सवलती देऊन कायदे जारी झाले, त्यांची अंमलबजावणी होऊ लागली, आणि अशा नानाविध कायद्यांच्या अंमलबजावणीमुळेंच हिंदुधर्मीय समाजात धार्मिक, सामाजिक, शैक्षणिक आणि राजकीय बाबतींत स्वातंत्र्य मिळालें म्हणून त्या हिंदुधर्मीय समाजांत प्राथमिक तसेंच उच्च शिक्षणाचे प्रोफेसर, नामांकित वकील, डॉक्टर, न्यायाधीश, हायकोर्ट न्यायाधीश, सेक्रेतार जेराल (चीफ सेक्रेटरी), नगराध्यक्ष, आमदार, खासदार, तार, पोस्ट, कस्टम खात्यांचे डायरेक्टर, मामलेदार, पोलीस खात्यांत, महत्वाच्या मिलिटरी हुद्यावर, शिक्षण, आरोग्य खात्याचे अधिकारी, इन्स्पेक्टर अशा सर्वत्र ठिकाणी हिंदु धर्मीयांस उच्चपदे मिळाली व घोडदौड सुरू झाली. या हिंदु धर्मीय प्रजाजनांच्या सर्वांगीण उत्कर्षाचे मूळ व प्रगती फक्तच पोर्तुगालच्या रिपब्लीकन राज्यसत्तेनंतरच झाली आणि तीही पोर्तुगीज युरोपीयन सत्ताधाऱ्यांनीं हिंदु धर्मीय लोकांचा जवळून परिचय करून घेऊन त्यांच्यावर निर्विकारपणे सहानुभूतीस ते पात्र असल्याची खात्री करून घेऊनच उदार धोरण ठेवल्यामुळेंच; याकडे दुर्लक्ष करून चालणार नाही. रिपब्लीकन राष्ट्र म्हणून पुकारताच लगेच गोमंतकात हिन्दुधर्मीयानी जो आनंदोत्सव साजरा केला आणि त्यानंतर पहिला वाढदिवस एक वर्षानंतर साजरा केला त्या उत्स्फूर्त आनंद महोत्सवाची कल्पनाही केल्यास ते अवर्णनीयच ठरेल. त्यावेळी हिन्दु धर्मीयांनी माडांस (नारळीच्या झाडांसही) प्रत्यक्षात नानाविध रंगाचे दिवे लावले होते हे कळल्यानंतर आणि त्या काली आजच्या कालासारखी विजेच्या दिव्यांची सोय नव्हती हे लक्षांत घेतां त्या रोषणाईची कल्पना आणि महत्त्व ध्यानी येईल आणि हिन्दुधर्मीयानी जीवापाड परिश्रम-कष्ट सोसून आनंद महोत्सव करणे सकारण आणि सहाजिकच होते.

पोर्तुगालच्या खिरस्ती धर्मीय युरोपियन राज्यकर्त्यांनी गोमंतकांत हिंदुधर्मीयांची देवालये उध्वस्त केली त्याच खिरस्ती धर्मीय पोर्तुगीज युरोपियन राज्यकर्त्यांनी त्यांच्याच राज्यसत्तेच्या राजवटीत त्याच गोमंतकांत, त्याच हिन्दुधर्मीयांची नवीन देवालये बांधण्याचे हुकूम खिरस्ती धर्माधिकाऱ्यांच्या विरुध्द सल्ल्यास न जुमानता द्यावे आणि त्यापुढेही हिंदु देवालये इमारतीस भव्य सभामंडप बांधण्याच्या खर्चाचा सिंहाचा वाटा त्याच सरकारच्या पैशानी उचलावा, हा चमत्कार जगाच्या इतिहासात सांपडेल की काय हा संशय आहे. पण या देवभूमी गोमांतकांत तो चमत्कार प्रत्यक्षात पहावयास मिळाला म्हणूनच याला देवभूमी म्हणतात.

ज्या गोमंतकांत इ. सनाच्या सोळाव्या शतकात खिरस्ती धर्मीय पोर्तुगीज राज्यकर्त्यांनी आपले राज्य येथे कायमचे टिकले पाहिजे तर येथील सर्व प्रजाजन खिरस्ती धर्मीय झाल्यासच ते टिकेल. अशा अविवेकी समजाने गोव्यांत हिंदु धर्मीयांचे बळजबरीने धर्मांतर करून त्यांच्या दैवतांचा, देवालयांचा विध्वंस केला, पण त्यामुळे प्रजाजनांनी पळ काढला व दैवतांचे स्थलांतर केले, त्यामुळे राज्य ओसाड पडले, व्यापार बुडाला, उत्पन्न नाहीसे झाले, पोर्तुगीज राज्यकर्त्यांच्या कपाळास किंवा मेन्दुस चढलेले पित्त अनुभवांमुळे खाली उतरले, आणि नंतर खिरस्ती धर्माचा बळजबरीने प्रसार करणारास गोव्यातून कायमचे हद्दपार केले, हिन्दु धर्मीयांना जाचक असलेले सर्व कायदे रद्द केले त्याच खिरस्ती पोर्तुगीज राज्यकर्त्यांनी हिन्दु धर्मीयांस नवीन देवालये बांधण्यास कायदेशीर संमती लेखी परवानगी हुकूम दिला

आणि तोही खिरस्ती उच्च धर्माधिकाऱ्याची विरोधी सल्ल्याची तमी न बाळगितां (उदाहरण म्हणून पणजी शहरांतील श्रीमहालक्ष्मी देवीचें नवीन देवालय इ. स. १८१८ साली बांधलेले दाखीवता येईल) त्याच्या-नंतरच्या बऱ्याच वर्षानी सांखळी येथील श्रीराधाकृष्ण मुरलीधर देवालयाचा भव्य सभामंडप नव्यानेच इ. सन १९६० साली बांधला गेला, आणि त्या बांधणीस हजारो रुपये खर्च झाला हे तो मंडप पहाणारांस कळते. पैकी, पन्नास टक्के खर्च त्यावेळी पोर्तुगीज सरकारच्या युरोपिअन गव्हर्नर जनरलने त्या मंडप खर्चाचा सोसला आहे हे त्या देवस्थानच्या तत्कालिन व्यवस्थापन समितीकडे चौकशी करणारांस कळू शकते व तसे त्यानी प्रसिध्दही केलेलेच असल्याने त्याबद्दल शंका घेण्यास कारण नाही. अशी उदाहरणे आहेत! तसेच, हिन्दु देवस्थाने, मठ संस्थाने यांचे सर्व हक्क कायम राखण्यास व त्यास न्याय निकाल देण्याचे प्रकार गोव्यातील युरोपियन गव्हर्नर जनरलनीच नव्हे तर पोर्तुगालच्या कॅथोलिक खिरस्तीधर्मीय खुद्द राजेसाहेबानी तेथे राजेशाहीची (मोनार्कीय) सत्ता चाललेली असताना दिलेले, तसेच सर्वोच्च न्यायालयानीही दिलेले हिन्दुधर्मीय मठसंस्थानांच्या हिताकडे पक्षपात न करतां दिलेले गतकालांतील अनेक पहावयास मिळतात. तात्पर्य: कालाय तस्मै नमः

सध्याच्या कालात श्रीचंद्रेश्वर भूतनाथ देवस्थानांत कोणती दैवते स्थापित आहेत?

मुख्य दैवत श्रीचंद्रेश्वर (शिवलिंग) शिवाय श्रीभूतनाथ, श्रीसिध्दभैरव, कालभैरव आणि श्रीशंख भैरव ही पांच दैवते त्या देवस्थानांत पर्वतावर स्थापिली असून त्या शिवाय श्रीमुलगुडी नामक दैवत केपे तालुक्याच्या आमोणें गांवात आहे.

साप्ताहिक आणि वार्षिक महत्वाचे उत्सव

प्रत्येक सोमवारी रात्रौ नियमितपणे श्रीचंद्रेश्वर देवाचा शिबिकोत्सव देवालयासभोवार प्रदक्षिणा मिरवणुकीने होत असून त्यात ठराविक ११ ठिकाणी पेणी (मुक्काम) होत असतात. वार्षिक उत्सव श्रीरामनवमी, श्रीअनंत चतुर्दशी, नवरात्रांत मखरोत्सव, दसरा, हरिजागर, कार्तिक पौर्णिमा, श्रीदत्त जयंती, श्रीमहाशिवरात्र असे महत्वाचे उत्सव होत असले तरी मुख्य महोत्सव चैत्र पौर्णिमेचा महारथोत्सव असून त्याचा प्रारंभ चैत्र शुक्ल ११ शीस होऊन चैत्र वद्य प्रतिपदेस सांगता होत असते. या महारथोत्सवास गोव्यांतील आणि गोव्याबाहेरील यात्रेकरूंची मोठी यात्रा जमते. या देवस्थानचा शिमगोत्सव फाल्गुन वद्य ११ शीस प्रारंभ होऊन अमावास्यापर्यंत सांगता होत असते पण हा उत्सव आमोणे गांवात मुलगुडी कटो या स्थानी साजरा केला जातो.

देवस्थानचे कुळावी महाजन

या देवस्थानचे आद्य संस्थापक पारोडे गावांतील देसाई. पहिले सहा वांगड देसाई १) शेळडे गांवचे देसाई, २) कुसमण गांवचे देसाई, ३) अवेडे गांवचे देसाई, ४) कोठंबी गांवचे देसाई, ५) शेळवण गांवचे देसाई, ६) असोळडे गांवचे देसाई.

सातवा वांगड "नाडकर्णी" गौड सारस्वत ब्राम्हण. यांत पहिले कुटुंब नाडकर्णी, तलवडकर, कुडचडकार, आणि मळकर्णेकार.

दुसरे कुटुंब :– नाडकर्णी शेळडेकार असोळडेकार, आणि व्होडारकार.

तिसरे कुटुंब :– कोठंबकार, रेगे आणि शिरवईकर.

या देवस्थानांत हिंदुधर्मीय धर्मशास्त्र कायद्यांनुसार ज्यांस देवकृत्ये उत्सव करण्यास मुभा असते अशांस, त्या देवस्थानांत पूर्वापार चालत आलेल्या रिती रिवाज आणि वहिवाटीस पाळा दिल्यास देवकृत्ये व उत्सव करण्यास अडचण नसते.

देवस्थानची घटनात्मक नियमावली

या देवस्थानाची घटनात्मक नियमावली (कोंप्रोमिस) पोर्तारीय नंबर १०९ ता. १३ मार्च १९१६ या सरकारी हुकुमान्वयें मंजूर झाली असून ती सरकारी राजपत्र बोलेती ऑफीसियाल नंबर २१ ची पुरवणी वर ता. १५ मार्च १९१६ रोजी प्रसिध्द झालेली आहे.

१६

श्रीशांतादुर्गा चामुंडेश्वरी कुडतरी महामाया देवस्थान

अवेडे – केपें

श्रीशांतादुर्गा, कुडतरी महामाया अवेडे, केपें

श्रीशांतादुर्गा चांमुडेश्वरी कुडतरी महामाया देवस्थान, अवेडे, केपें

श्रीशांतादुर्गा चामुंडेश्वरी कुडतरी महामाया देवस्थान

'श्रीशांतादुर्गा–चामुंडेश्वरी कुडतरी महामाया' नांवाने आजच्या कालांत, गोमंतकात, केंपे तालुक्यांतील अवेडे गावांत, घुडो नामक वाड्यावर जे स्थापित असलेले देवस्थान पहात आहोंत, ते देवस्थान इसवी सनाच्या सोळाव्या शतकाच्या सन १५६० सालापर्यंत तरी, सासष्टीच्या कुडतरी गावांत सांदीवल किंवा सांदेल्व नामक वाड्यावर खचितच होते, यात मुळीसुध्दा शंका नाही; आणि तेथेंच त्याची मूळ स्थापना केली होती. परंतु, इ. सनाच्या सोळाव्या शतकांत गोव्यावर जे धार्मिक भयंकर संकट ओढवले, त्या संकटांतून सहिसलामत निसटून जाण्यासाठी, त्या देवस्थानच्या तत्कालीन भक्तगणांनी आणि कुळावी महाजनांनी आपली ती कुडतरी येथील प्राणापलीकडे जपलेली दैवते श्रीसांतेरी, श्रीचामुंडेश्वरी - श्रीलक्ष्मी नारायण-श्रीरवळनाथ-श्रीगणपती इत्यादि सासष्टीच्या कुडतरी गावांतून हलवून तत्कालीन परकीय राजसत्तेच्या चंद्रवाडीच्या शेळवण गावांत, आणि कांही कालानंतर तेथूनही ती केंपे तालुक्याच्या अवेडे गावांत, घुडो वाड्यावर स्थलांतर करून तेथे स्थापना करून मोकळे झाले, आणि तेथेच आजतागायत ते देवस्थान 'श्रीशांतादुर्गा-चामुंडेश्वरी कुडतरी महामाया' या नांवाने उभे आहे.

मूळ स्थापना कुडतरी येथे झालेली, आणि देवस्थान सुस्थितीत चाललेले असे असताना, ते देवस्थान केंपे तालुक्यांतील अवेडे गावांत स्थलांतर करून कां नेण्यात आले, त्यासाठी कोणती अपरिहार्य कारणे उद्‌भवली, आणि या स्थलांतराचा नक्की काल कोणता, कुडतरी येथें हे देवस्थान असताना तेथे कोणती दैवते स्थापित होती, त्या देवस्थानास मालकी हक्काची जमीनजुमला होती की नाही, असल्यास ती जमीन किंवा जमिनी कोठे गेल्या, त्यांचे काय झाले, त्यातील कोणत्या जमिनीत किंवा जागेवर श्रीसांतेरीचे (आजच्या श्रीशांतादुर्गेचे) देवालय होते, आजच्या कालात तेथे काय आहे कांही अवशेष सापडणे शक्य आहे काय, अशासारखी माहिती आपणास समजावी, ही फार उत्सुकता त्या देवस्थानच्या भाविक, श्रध्दावान कुळावी महाजनांच्या सध्याच्या पिढीतील जिज्ञासू लोकांस असणे स्वाभाविक आहे. गोव्यांतील हिंदु देवालयांच्या स्थलांतराचा समग्र इतिहास लिहावयाचा झाला, तर त्यासाठी हजारोंनी पृष्ठे लिहूनही तो संपूर्ण होणे जसे कठीण आहे, तसेच तो इतिहास लिहिणेचे काम साधे, सोपे नसून त्यासाठी अभ्यासू निःपक्षपाती, तज्ज्ञ, पोर्तुगीज जुन्या काळातील लिपी आणि भाषेचे ज्ञान असलेले, कामाची जबाबदारी ओळखून लिखाण करणारे इतिहासकारच हवेत, हे येथे स्पष्ट करुण्याची जरूरी नसावी. इसवी सनाच्या सोळाव्या शतकांत गोमंतकांत तत्कालीन राज्यकर्त्यांनी गोव्यांतील हिंदूचे खिरस्तीकरण केले. ते खिरस्तीकरण करण्याचा त्यांचा एकमेव हेतू म्हणजे राज्यकर्त्यांच्या खिरस्ती धर्माची सर्व प्रजा एकदाची खिरस्ती धर्मीय झाली म्हणजे आपल्या राज्यास धोका नाही. आणखी शिवाय, खिरस्तीधर्माचा कमाल प्रसार करून जितके जास्त खिरस्तीधर्मीय बनतील, त्यांचा मुलूखही आपल्या राज्यात विलीन करणे सुलभपणे घडून येऊन आपल्या राज्याचा विस्तार सहज होईल, अशी त्यांची विचारसरणी होती. आणि पुढेही 'ज्यांचे राज्य त्यांचा धर्म' हेच तत्व प्रामुख्याने त्यांनी राजकारणात सुरू केले. एकंदरीत त्या काळातील सर्व परीस्थितीची सविस्तर कल्पना येण्यासारखे लिखाण येथे विस्तारभयास्तव करणे शक्य नसल्याने वाचकांस जास्तीत जास्त तत्कालीन परीस्थिती, ज्यावरून कळून येईल, अशाच घटनांचा संक्षिप्तपणे का होईना, उल्लेख करून कुडतरी गांवातून देवालयाचे स्थलांतर अवेडे येथे कां, कोणत्या भयानक प्रसंगात, करावे लागले आणि ते कोणत्या कालात, याची माहिती देण्याचा प्रयत्न करण्यापूर्वी गोव्यातील तत्कालीन राजकीय स्थित्यंतराचा आढावा घेतल्याशिवाय ती माहिती आजच्या पिढीस समजणे कठीण होईल म्हणून तो आढावा घेणे क्रमप्राप्त ठरते.

इसवी सनाच्या सोळाव्या शतकात गोव्याचे राजकीय स्थित्यंतर

इ. स. १५१० साली, पोर्तुगालहून आफोंस दे आल्बुकेर्क नांवाचा पोर्तुगीज सरदार आपल्याबरोबर सैन्य घेऊन जलमार्गे गोव्यात येऊन पोहोचला, आणि त्याने आदिलखानाकडून गोवा बेट म्हणजे तिसवाडी जिंकून आपल्या स्वाधीन घेतले. गोव्यातील जनता त्यापूर्वी मुसलमानांच्या जाचांस फारच कंटाळून गेली

होती, म्हणून ह्या कामीं गोवेकर हिंदूनी त्यास भरपूर सहाय्य केले हे प्रसिध्द आहे. आल्बुकेर्कच्या कारकिर्दीत हिंदूस जबाबदारीच्या अधिकारपदावर पोर्तुगीजांनी नेमले होते. आल्बुकेर्कच्या नंतरदेखील काही काल इ. स. १५४७ सालपर्यंत गोव्यात मोठमोठ्या हुद्यावर गोवेकर हिंदूच होते. ह्यापैकी सरठाणेदार कृष्ण शेणवी, चोडणेचे लखू नाईक, थोरल्या नेवऱ्याचे गांपू शेणवी, गोवे शहरातील अनू शेणवी मोने, कृष्ण शेणवी याचा मुलगा दादाजी शेणवी, ही नांवे पोर्तुगीजांच्या इतिहासात ठळकपणे आढळतात. इ. स. १५४७ साली, विजापूरकरांची, अंत्रुज आणि सासष्टी या दोन तालुक्यावर स्वारी झाली, त्यावेळी दादाजी शेणवी याने दोन हजार पायदळाचे नेतृत्व करून पोर्तुगीज फिरंग्याच्या बाजूने फोंडे येथे शत्रूंशी मुकाबला केला होता. दादाजीस तत्कालीन पोर्तुगीज कागदपत्रात 'गोवेकर हिंदूंच्या पायदळाचा कॅप्टन' असे म्हटलेले आहे. दादाजीच्या तुकडीमध्ये हिंदू होते.

आफोंस दे आल्बुकेर्क याने गोवा बेट जिंकून घेतल्यानंतर सर्व हिंदू जनतेस पूर्ण आश्वासन दिले की, आपण प्रजेस कोणत्याच बाबतीत, कोणासच, कसलेच त्रास मुळीच देणार नाही. तुम्ही सर्व येथे सुखाने निःशंकपणे रहा. तुम्हास धार्मिक स्वातंत्र्यही खचित राहील. आपण त्यात ढवळाढवळ करणार नाही, तुम्ही आदिलखानाच्या राजवटीत जे कर त्यास देत असत, तेच तितकेच कर आपणास दिल्यास पुरे. अशा रितीने काही वर्षे गेली. नंतर पोर्तुगालहून एक खिरस्ती धर्माधिकारी बिशप दूमि नावाचा गोव्यात येऊन पोचला. त्याने येथील सर्व जनतेचे आणि परिस्थितीचे निरीक्षण केले आणि त्याने आपण होऊन ता. १२ जानेवारी १५२२ रोजी पोर्तुगालच्या राजेसाहेबास एक पत्र लिहिले. त्या पत्रात खालील मजकूर त्याने लिहिला होता.

'आपल्या या गोवा बेटातील देवालये पाडून त्या ठिकाणी चर्चेस उभारली गेल्यास परमेश्वराची सेवा होईल. ज्या इसमास ह्या बेटात राहावयाचे असेल, त्याने खिरस्ती धर्मीय होऊन रहावे व असे केल्याने त्याला आपल्या जमिनी व घरे मिळतील. पण, जो खिरस्ती धर्म स्वीकारण्यास तयार नाही, त्याने हे बेट सोडून जावे.'

'खिरस्ती धर्माधिकारी बिशप, याने लिहिलेल्या या पत्रातील मजकुराचा परिणाम पोर्तुगालच्या राजेसाहेबांच्या मनावर झाला असावा. आणि त्यानुसार पोर्तुगालहून गोव्यात खिरस्तीधर्म प्रसार करण्यासाठी, हिंदुधर्मीय लोकांचे खिरस्तीकरण करून त्या जागी खिरस्तीधर्मीयांच्या चर्चेस उभारणाऱ्या झेझुइट पंथाच्या पाद्री लोकांस गोव्यात आणण्याचे कार्य सुरू झाले. फ्रांसिस्क, पाइस नावाच्या पोर्तुगीज अधिकाऱ्याने इ. सन १५९५ साली 'तोंबु' नांवाचा एक ग्रंथ लिहिला आहे. त्यात त्याने असे सांगितले आहे की, पोर्तुगालच्या राजाच्या आज्ञेनुसार गोवा बेटातील सर्व देवालये इ. सन १५४० साली पाडण्यात आली. गोवा बेटातील हिंदूंची सर्व देवालये ता. २८ जून १५४१ पूर्वी नष्ट करण्यात आली, असे या तारखेच्या एका सरकारी लेखांत ती देवालये जमीनदोस्त करण्यात आल्याचा स्पष्ट उल्लेख असून या लेखामध्ये म्हटले आहे की, 'ह्या बेटातील सर्व देवालये मोडण्यात आली असून ती पुन्हा केव्हाच उभारण्यात येणार नाहीत.'

पोर्तुगीज पाद्री मिंगेल व्हाज ह्याच्या ता. ६ जानेवारी १५४३ च्या पत्रात असा मजकूर आहे की, 'माझ्या सोबत पुष्कळ वर्षापासून ह्या भागात नाविक शिपाई फाबियांव गोंसाल्व्हिस हा सरकारी नोकरी करीत आहे. त्याच्या हस्ते गोव्यामध्ये असलेली सर्व देवालये पाडण्यात आली. ('गोव्यामध्ये' या शब्दाचा अर्थ गोवा बेटामध्ये असा वाचकांनी लक्षात घ्यावा.) पाद्री व्हिगार व्हाज याने हिंदूंची देवालये उद्ध्वस्त केली, या गोष्टीस मार्ती आकोंसु दे मेलु याच्या ता. ६ नोव्हेंबर १५४१ पत्रावरूनही दुजोरा मिळतो.'

सासष्टीत खिरस्ती धर्म प्रसार प्रत्यक्षात केव्हां सुरू झाला ?

इसवी सन १५६० ता. १ मे रोजी, जेजुइट पंथाचे लोक आपल्या धर्मप्रसारार्थ सासष्टींत प्रथमतःच गेले आणि कुठ्ठाळ गावच्या भूमीवर त्यांनी प्रथमतःच पाय ठेवले, आणि त्या गावातील श्रीमंगेश देवाच्या देवालयात त्यांनी प्रवेश केला. पण, त्या दिवशी, त्या देवालयात त्यांना देवाचे लिंग किंवा मूर्ती सापडली नाही म्हणून त्यांचा जळफळाट झाला. त्यांस तेथे चौकशी अंती

कळले की, त्या देवालयाच्या कुळावी लोकांस गुप्तपणे बातमी मिळाली होती की, झेझुइट पंथाचे लोक आपल्या धर्मप्रसारासाठी सासष्टींत धाड घालण्यास येण्याच्या तयारीत सज्ज आहेत, आणि ते सरकारी आरमार कुमकेसह येत आहेत. अशा स्थितीत येणे अल्यास ते प्रारंभी कुठ्ठाळ गावच्या तीरावरच म्हणजे गोवा बेटाच्या पैलतीरावरच येणार आहेत, हे निश्चितच, असे अंदाजून त्या लोकांनी आपला देव श्रीमंगेश तातडीने, गुप्तपणे, रातोरात, तेथून हलवून पोर्तुगीज राज्यसरहद्दीबाहेरच्या राज्यात अंत्रुज प्रांताच्या फोंडा तालुक्यात, प्रियोळ गावात, स्थलांतर करून नेला आणि त्यामुळे त्या देवालयाची इमारत देवाशिवाय त्यास सापडली असे त्या झेझुइट पाद्री लोकांनी आपल्या दैनंदिन अहवालात नमूद करून ठेवलेला गुप्तपत्रव्यवहार पोर्तुगालास पाठविलेला, नंतरच्या कालात तेथे जो प्रसिध्द झाला, आणि उजेडात आला, त्यावरून कळते. आपल्या हातात त्या देवालयाची इमारत देवाशिवाय सापडली म्हणून त्यांचा राग आणि त्वेष अनावर झाला, आणि त्यांनी व्हॉइसरायाकडे त्या देवालयाची इमारत आपणास तेथे चर्च स्थापण्यासाठी द्यावी, अशी मागणी केली. त्या व्हॉइसरायाने ही मागणी मान्य करून ती इमारत त्यास दिलीच आणि शिवाय, त्याबरोबर त्या देवालयाच्या मालकीच्या ज्या जमिनी होत्या, त्याही त्यांच्या स्वाधीन त्या चर्चच्या दैनंदिन खर्चासाठी सुपूर्त केल्या. झेझुइट पंथाचे खिरस्ती धर्म प्रसारक सासष्टीत पोचण्याची चाहूल कुठ्ठाळ गावच्या लोकास आगाऊ लागल्याने त्यांनी आपला देव दुसऱ्या राज्यात पळवून तातडीने नेला ही बातमी कुठ्ठाळ गावाच्या सीमेशेजारील गावात वायुवेगाने कळल्याशिवाय राहिली नाही. आणि हे आकस्मिक भयानक संकट ओळखून कुठ्ठाळच्या लोकांनी जसे केले, ते तसेच केल्याशिवाय दुसरा उपायच नाही, आणि किंचित्सुध्दा वेळ दवडिल्यास आपले देव, त्या झेझुइट पाद्रींच्या तावडीत सापडून मूर्तीचा विध्वंस बाटाबाटीचा प्रसंग ओढवणारच, हे जाणून आसपासच्या गावातील लोकांनीही आपआपली दैवते घेऊन, दुसऱ्या राज्यात पलायन केले, याचे स्पष्ट पुरावे सापडतात. बहुतेक देवालयातील प्रमुख दैवते किंवा त्यांची प्रतीके जी त्या भयानक संकटकाली, आकस्मिकपणे, रातोरात दाट काळोखात, रानावनांतून वाट काढून बरोबर घेऊन दुसऱ्या राज्यांत वाहून नेणे शक्य होते, तीच घेऊन, आपल्या प्राणावर उदार होऊन, सर्वस्वावर तिलांजली देवून ते पळाले. म्हणूनच, आजच्या काळात जी दैवते आणि त्यांची नवीन देवालये ज्याना आपण भक्तीभावाने भजत आहोत, ती आम्हास त्या आमच्या पुण्यपूर्वजांच्या स्वार्थत्यागाचे फल म्हणून मिळाली आहेत. त्यांनी प्राणावर उदार होऊन जमीनजुमला, संपत्ती, घरेदारे, दागदागिने या सर्वांचा थोडाही विचार न करता, ती दैवते बरोबर घेऊन पळाले नसते, तर ते आमचे देव आम्हांस मिळालेच नसते. शिवाय, आमच्या प्रत्येकाच्या गळ्यात क्रूस दिसला असता, हे त्रिवार सत्य आहे. आजच्या काळात असे दिव्य करणारे चुकूनही सापडतील काय, याचा थोडासा जरी विचार केला, तरी तत्कालीन स्वार्थत्यागाचे मोल करताच येणार नाही. पोर्तुगीज इतिहासकारांनी तत्कालीन वस्तुस्थितीचे साद्यंत सविस्तर वर्णन जे केले आणि ग्रंथ लिहिलेले आढळतात, ते वर्णन त्यांच्या दृष्टीकोनातून, त्यांच्या मते, अगदी बरोबर आहे. त्यांनी ते लिखाण ज्या काळी केले होते, ते गोव्याच्या हिंदु किंवा इतरास समजण्यासाठी केलेले नव्हते. ते लिखाण म्हणजे गोव्यात त्याकाळी खिरस्तीधर्म प्रसार ज्या लोकांनी केला, व तो करताना ज्या ज्या घटना घडल्या किंवा घडविल्या, त्या सर्वांचा दैनंदिन अहवाल किंवा रिपोर्ट ते गुप्तपणे पोर्तुगालास पाठवीत असत. त्यात न घडलेल्या गोष्टी किंवा असत्य माहिती लिहून पाठविण्याची गरज नव्हती. कारण नव्हते, आणि तसे करूनही त्यास कसला फायदाही नव्हता. त्यांच्या दृष्टीकोनातून त्यांनी जे त्यात लिहिले, ते आम्हास आजच्या काळात, जरी सबळ आणि निःसंदिग्ध पुराव्यानुसार खरे वाटले नाही तरी त्यांच्या किंवा ज्यास त्यातील सत्य वस्तुस्थितीची धार्मिक बाबींची माहिती असणे शक्य नव्हती आणि नाही, त्यास जे सत्य वाटले, तेच त्यांनी लिहून ठेविले आहे. आणि ते तसे त्यांनी करण्यात चूक केली आहे असे मानता येणार नाही हे जे सारासार विचार करणारे अभ्यासू असतील त्यास हे विधान पूर्णपणे पटल्याशिवाय रहाणार नाही असा विश्वास वाटतो. याबद्दल उदाहरण म्हणून दाखवावयाचे झाल्यास तत्कालीन वस्तुस्थितीचे वर्णन करणारे सर्व ग्रंथ, कागदपत्र वगैरे ते प्रत्यक्ष झेझुइट पंथाच्या पाद्री लोकांनी लिहिलेले असोत, किंवा इतर इतिहासकारांनी लिहिलेले असोत, त्या सर्वात देवालयांच्या बाबतीत असे लिहिलेले आढळते आणि ते विशेषेकरून सासष्टीतील देवालयांबद्दल असून, लिहिलेले कागदपत्र इसवी सन १५६७ चे किंवा त्या आसपासच्या सालाचे आहेत. नमुन्यासाठी मूळ पोर्तुगीज लिखाणाचा मजकूर रूपांतर मराठीत केलेला :–

'व्हिसरईने रायतूरचा किल्लेदार दियोग् फर्नांदिस यास ह्या बाबतीत काय करावयाचे ते लिहून कळविले. ता. ८ मार्च १५६७ रोजी कॅप्टन दियोग् फर्नांदिस काही लोकांस घेऊन वेरणेस गेला व तेथील महालसेचे देवालय मोडून सदर देवालयाच्या तुळ्या ताब्यात घेतल्या. ह्या प्रसंगी तेथे काही झेझुइट उपस्थित होते. त्यांनी महालसेची मूर्ती फोडून टाकली. इतर मूर्ती हिंदूंनी नेल्या...' उल्लेखित कॅप्टनने पुन्हा वेरणेस येऊन ते देवालय मोठ्या प्रयत्नाने जमीनदोस्त केले. या जागेजवळ आज त्या देवालयाचा फक्त भव्य तलाव राहिला आहे. म्हाळसादेवीचे देवालय नष्ट केल्यावर कॅप्टन दियोग् फर्नांदिस याने सासष्टीतील इतर देवालयेही उद्‌ध्वस्त केली. उपरिनिर्दिष्ट कॅप्टन दियोग् फर्नांदिस ता. १७ मार्च सन १५६७ च्या पत्रात लिहितो :

'आज सोमवार ता. १७ मार्च रोजी सांखवाळ ह्या गावी मी गेलो. तेथील बंदराजवळ असलेले देवालय व धाड, परममंद, नारायण, भगवंती, ईश्वर, अझोसिनी व नरसिंह यांची देवालये मोडून टाकली सांखवाळचे मोठे देवालय म्हणजे सांतेरीचे. त्या देवालयाचे लाकूड चांगले आहे. झेझुइटाच्या मठातील पाद्र्यांस कळवा की, सासष्टीतील देवालयांपैकी तीनचतुर्थांश देवालये नष्ट करण्यात आली आहेत.'

ता. ६ एप्रिल १५६७ च्या पत्रात रायतूरच्या किल्ल्याचा कॅप्टन दियोग् फर्नांदिस लिहितो :– 'काल ता. ५ रोजी मी ह्या किल्ल्यातून मध्यरात्री निघून सार्जेंड येथे गेलो. तेथील दोन देवालयास आग लावली.. मग वेरड्यांस जाऊन तेथील देवालय जाळले. वाटेत कुंकळ्ळी हा गांव लागला. तेथील देवालयहि जाळून टाकले. आंबेलीचे देवालय व आणखी एका देवालयाची अशीच स्थिती केली. तेथून निघालो आणि चिकोळ्णच्या देवालयास आग लावून दिली. चिंचिणीचे देवालय फार मोठे होते. तेही मी जाळले. काल ता. ५ एप्रिलपर्यंत सासष्टींतील अठ्ठावन गांवातील देवालये तेथील मूर्तींसह मी मोडून टाकली. मुरगांवची मशीदही जमीनदोस्त करण्यात आली. इसवी सन १५६७ त सासष्टींतील दोनशे ऐंशीवर मोठी देवालये पोर्तुगीजांनी पाडली. कवळशी येथील 'बाबलवीर'च्या थडग्याचीही त्यांनी त्याच साली वाट लावली. केळोशी येथील श्रीशांतादुर्गेचे देवालय अन् शेणवी मोने नामक नामांकित व्यापाऱ्याने बांधले होते, ते देवालय ह्याच साली कॅप्टन दियोग् फर्नांदीसाने जाळून टाकले... वगैरे वगैरे.'

वरील माहिती व्हिकी नामक इतिहासकाराने इटलीच्या रोम शहरांत जो प्रचंड ग्रंथ 'दोकुमेंता इंदिका' नांवाने प्रसिध्द केलेला आहे, त्या ग्रंथाच्या भाग सातवा यामध्ये आढळते. त्याचे संक्षिप्तांत मराठी भाषेत रूपांतर वर त्रोटक आणि अत्यावश्यक गरजेपुरते दिले आहे. आणि ते देण्याचा मुद्दाम हेतू असा की, वाचकांनी ते लक्षपूर्वक वाचल्यानंतर प्रथमदर्शनी तरी निश्चितपणे वाचकांचा समज होऊन चुकतो की, या देवालयास आग लावली, ते देवालय मोडून टाकले, ते देवालय जमीनदोस्त केले, मूर्ती फोडल्या, इतर मूर्ती हिंदूनी नेल्या, असा प्रकार निदान एकाच बरोबर अठ्ठावन निरनिराळ्या वेगवेगळ्या गावांत झाला, तेव्हां त्या प्रत्येक देवालयांत त्या त्या देवालयातील स्थापित अधिष्ठित दैवत ते देवालय जाळून टाकताना, मोडून टाकताना, जमीनदोस्त करताना खचित होते, असा समज होतो आणि वाचकांचा तसा समज होणे सहाजिकच ठरते, यात संशय नाही. आता ही वस्तुस्थिती ज्या तत्कालीन ती कृत्ये करणाऱ्यांनी आपआपल्या कागदपत्रात लिहून पाठविली, तीही त्यांच्या दृष्टीने खोटी नव्हे. इतके लक्षात घेतल्यावर, वाचकांनी स्वतःशीच मनन करून सारासार बुध्दीचा वापर करून ठरविले पाहिजे की, कोणत्याही एका गावातील देवालय त्यातील दैवतासह जर खरोखरच मोडून टाकलेले दिसले, किंवा जाळलेले कळले, तर त्या गावाच्या शेजारच्या गावातील देवालयांचे कुळावी भक्तगण, तसेच आसपासच्या गावातील देवालयाचे कुळावी महाजन, कोणतीच हालचाल मुळीच न करतां या गंभीर आणि भयानक संकटाची जाणीव न घेता आकाशाकडे तोंड करून चणे चुरमुरे खात स्वस्थ बसून, ते देवालये मोडणारे आणि आगी लावणारे लोक, आपल्या गावात येऊन तोच प्रकार आपल्या देवालयाचा करीपर्यंत वाट पाहात राहिले असतील की काय ? किंवा त्या संकटकाली आपल्या हातात जे मुख्य दैवत, त्यांचे प्रतीक किंवा लहान मूर्ती जी पळत असताना हातात मावेल, उचलून वाहिवणे शक्य होईल, ते घेऊन स्थलांतर, मिळेल त्या वाटेने केले असेल ? याचा विचार करावयास नको काय ? आणि त्यांनी जर तसे केले नसते, तर आजच्या



श्रीचांमुडेश्वरी, कुडतरी महामाया देवस्थान,

कालात जी दैवतें स्थलांतर झालेली आपण पाहात आहोत, त्यास भजत आहोत, ज्यांची आज मोठमोठी देवालयें दिसत आहेत, ती दैवतें, कोठून आली ? ती दैवतें त्यांची मूळ देवालयें मोडताना, आग लावताना जर त्या देवालयात असती, तर ती बाटवून आम्हास परत मिळाली असती काय ? तर खरी वस्तुस्थिती निश्चितपणेच वेगळी आहे आणि ती सप्रमाण पुराव्यांसह केव्हाही पडताळून पहाता येईल आणि तेही त्याच खिस्ती धर्म प्रसारकांनी आपल्याच कागदपत्रात गुप्तपणे लिहून ठेवलेल्या मजकुरावरूनच, हे मुद्दाम लक्षात घेणे फार जरुरीचे आहे.

या प्रकरणाच्या प्रारंभी मागे सांगितलेच आहे की, झेझुइट पंथाचे खिस्ती धर्मप्रसारक लोक सासष्टींत प्रथमतःच जे गेले, ते ता. १ मे १५६० या दिवशी, आणि ते उतरले कुठ्ठाळ गावच्या भूमीत, आणि तेथे ते श्रीमंगेश देवाच्या देवालयात जाताच, त्या देवालयाची इमारत देवाशिवाय त्यांना सापडली, आणि चौकशी करता त्यास कळले की, त्या देवाच्या कुळावी लोकांनी, या खिस्ती धर्मप्रसारक लोकांच्या आगमनाची त्यास चाहूल लागल्यामुळे ते आपला देव घेऊन आकस्मिकपणे दुसऱ्या राज्यामध्ये पळाले होते. हा अनुभव जर त्या खिस्ती धर्मप्रसारक लोकांस प्रारंभीच पहिल्यानेच पाय ठेविलेल्या कुठ्ठाळ गावांत आला, आणि ही घटना त्याच खिस्ती धर्मप्रसारक लोकांनी आपल्या गुप्त पत्रव्यवहारांत नमूद करून ठेवलेली आजच्या कालांत तो गुप्त पत्रव्यवहार उजेडात आल्यामुळे कळली, तर कुठ्ठाळ गांवाच्या शेजारी आणि त्या आसपास असलेल्या गांवातील देवालयांच्या कुळावी महाजनांनी तो भयानक संकटकाल ओळखून कुठ्ठाळकरांचा कित्ता गिरवून आपआपले देवदैवतें परकीय राज्यात पळवून नेल्याशिवाय राहिले नाहीत, हे निश्चितपणे, व्यवहारज्ञान असलेल्या लोकांस वेगळे सांगण्याची मुळीसुध्दा गरज नसावी. आणि तसे प्रत्येक गावांतील लोकांनी खचितच केले असलेच पाहिजे. कारण, त्या लोकांस, त्या संकटकाली दुसरा कसलाच उपाय नव्हता. त्यांच्या मागे त्या त्या गावांत राहिल्या त्या देवाशिवाय देवालयांच्या इमारती, व त्यात असलेल्या कांही पाषाणी वजनदार मूर्ती ज्या, त्या संकटकाली उचलून धांवपळीने आपल्याबरोबर नेणे अगदीच अशक्य होते म्हणून त्या जेथल्या तेथेच रहाणे भागच होते. असे असूनही कांहीनी त्या तशा मूर्ती वाहून नेणे अशक्य तर होतेच, यासाठी, जवळपास असलेल्या विहिरी, तलाव, ओढे म्हणजे खोल पाण्याचा आश्रय जेथे जेथे त्यास मिळाला, तेथे तेथे, त्या मूर्ती बुडवून टाकून त्या खिस्ती धर्मप्रसारकांच्या हातात सापडू न देण्यासाठी, ही व्यवस्था केली. याचेही पुरावे, आजच्या कालांत, चारशे पंचवीस वर्षांचा दीर्घकाल त्यावर उलटून गेल्यानंतरही, संशोधन करणाऱ्यांस, त्या ओसाड बुजलेल्या विहिरीत, तलावांत वगैरे अनेक ठिकाणी त्या तशा मूर्ती सापडलेली उदाहरणे आहेतच, हे जगजाहीर आहे. खिस्ती धर्मप्रसारकांनी जे लिहिलेले आढळते, ती देवालयें म्हणजे त्यात दैवतें नसलेल्या रिकाम्या देवालयांच्या इमारती, आणि त्यांनी मूर्ती फोडल्या, मोडल्या, म्हणून जे लिहिले, त्या मूर्ती मुख्य दैवतांच्या नसून त्या द्वारपालादिकांच्या किंवा तत्सम आहेत. काही मूर्ती पाषाणाच्या फार वजनी असल्यामुळे त्या स्थलांतर करून नेणे फार कठीण असतानासुध्दा, त्या दैवतांच्या भाविक महाजनांनी त्याही स्थलांतर करून नेलेली उदाहरणे कांही कमी नाहीत. खुद्द अवेडे गांवात श्रीशांतादुर्गा, – चामुंडेश्वरी ज्याकाळी देवस्थान स्थापन झाले, तेव्हा तेथे स्थापन केलेल्या श्रीशांतादुर्गा, श्रीचामुंडेश्वरी, श्रीलक्ष्मीनारायण, श्रीरवळनाथ दैवतांच्या मूर्ती मूळ कुडतरी येथीलच होत्या व त्यातील श्रीनारायणाची मूर्ती अद्यापही तेथे देवालयात स्थापित आहे व इतर तीन मूर्ती जीर्ण झाल्यामुळे त्या नवीन करवून त्यांची प्रतिष्ठापना इ. स. १९७१ साली झाली व जीर्ण मूर्तीचे विसर्जन झाले. चिंबल गांवची श्रीभगवतीची मूर्ती मये येथे स्थलांतर केलेली व नंतर माशेलात स्थापन केलेली अद्याप माशेलात आहे. हळदोणे येथील श्रीभगवतीची मूर्ती खांडोळे येथे स्थलांतर केलेली अद्याप खांडोळे येथे आहे. याचबरोबर कांही पाषाणी मूर्ती जमिनीत त्या काली आकांताने गुप्तपणे पुरून टाकलेल्या नंतरच्या कालांत उत्खनन झाले आणि कोणाच्या तरी हातात पडलेल्या गोवा आर्किओलोजिकल खात्याच्या म्युझियममध्ये अद्याप पहाण्यात मिळतात. या मूर्ती त्या काली खिस्ती धर्मप्रसारक लोकांच्या नजरेस पडलेल्या नाहीत. कारण, त्या त्यास दिसल्या असत्या, तर त्यांनी त्या फोडून टाकल्यांच असत्या. हे सर्व बारकाईने आणि अभ्यासू वृत्तीने पाहिल्यानंतर स्पष्टपणे कळते की, त्या आमच्या पूर्वजांनी त्या संकटकाली जी दैवतें घेऊन तत्कालीन पोर्तुगीज सरहद्दीबाहेर परकीय राज्यांत नेणे शक्य होते, तेथे ती दैवतें नेऊन स्थापन करून, नवीन देवालयें

बांधली, ज्या मूर्ती पाषाणीजड वजनी म्हणून स्थलांतर करतांना बरोबर नेता येणे शक्य नव्हते, त्या फार जड मूर्ती किंवा इतर मूर्ती धातूच्या - विहिरी, तलाव, ओढे वगैरेंच्या पाण्यात बुडवून टाकल्या, कांही जमिनीत पुरून टाकल्या व ज्या हलविणे व उचलून नेणे अगदी कठीण त्या जागच्या जागी राहिल्या आणि तसे होणे क्रमप्राप्तच, हे सांगणे नकोच. आणि ती देवालये म्हणण्यापेक्षा सत्य वस्तुस्थिती डोळसपणे लक्षांत घेऊन मूळ देवालयांच्या रिकाम्या इमारती व तेथे राहिलेल्या पाषाणी वजनी मूर्तीच त्या खिरस्ती धर्मप्रसारक लोकांनी त्वेषाने मोडून टाकून, देवालये मोडून टाकल्याचे, जाळून टाकल्याचे, जमीनदोस्त केल्याचे आणि देवादिकांच्या मूर्ती फोडून विध्वंस केल्याचे, त्यांच्या दृष्टीने त्यांनी आपले त्यांच्या समजाप्रमाणे, मानसिक समाधान करून घेतले. हा त्या सर्व त्यांच्या एकंदर पत्रव्यवहारांतील समग्र मजकुराचा, शोधक बुध्दीने आणि उपलब्ध पुराव्यांसहीत काढलेला खरा अर्थ आहे आणि त्यांत मुळीसुध्दा संशय येण्याचे किंवा शंका घेण्याचे कारण नाही हे निश्चितपणे खात्रीपूर्वक सांगता येते. वरील एकंदर माहिती समजून घेतल्यानंतर वाचकांच्या ध्यानांत आले असेलच की, मूळ कुडतरी येथे असलेले हे देवालय चंद्रवाडी येथील शेळवण गावात कोणत्या परीस्थितीत आणि कोणत्या अपरिहार्य कारणामुळे स्थलांतर करून न्यावे लागले आणि पुढे कालांतराने तेथूनही अवेडे येथे नेऊन आजच्या जागी स्थापन करावे लागले ते, आता त्या कुडतरी येथून जे मूळ स्थलांतर शेळवण येथे झाले, स्थलांतराचा काल कोणता ते पाहू.

खिरस्ती धर्माचे प्रसारक झेझुइट पंथाचे लोक सासष्टींत प्रथमच या कामासाठी जे शिरले, ते ता. १ मे १५६० रोजी, हे जसे त्यांच्याच पत्रावरून कळत असल्याचे मागे सांगितले. त्याचप्रमाणे सासष्टींतील दोनशेएंशीपेक्षा जास्त, मोठी देवालये पोर्तुगीजांनी पाडून टाकण्याचे काम इसवी सन १५६७ या सालात केल्याचेही दाखविले आहे. म्हणजे सासष्टींतील देवालयांच्या विध्वंसाचे कार्य इ. स. १५६० ते १५६७ या सात वर्षांच्या अवधीत झाले आहे हे जरी सिध्द झाले असले, तरी दैवतांच्या स्थलांतराचा काल हा इ. सनाच्या १५६० सालाच्या ता. १ मे नंतरच्या सहामाहीतच अपरिहार्यपणे झाला असला पाहिजे. कारण, कुठूठाळ गावांतील लोकांनी आपले दैवत जर ता. १ मे १५६० दिवसापूर्वी त्या गावातून स्थलांतर केलेले खिरस्ती धर्मप्रसारकांस त्यादिवशी तेथे पोहचल्यावेळी कळले, तर प्रत्यक्षात हे लोकच जर सासष्टींतील एका कुठूठाळ गावात त्या कार्यास आरंभ करण्यास उतरलेले पाहिले, तर आणखी मग आसपासच्या गावातील लोक हिंदुधर्मीय, आपआपली दैवते स्थलांतर करून पळविण्यास वेळ दवडणार नाहीत हे सहज कळण्यासारखे आहे. म्हणून स्थलांतराचा काल इ. सन १५६० सालाची दुसरी सहामाही हे निर्विवादपणे मान्य करावे लागेल-

स्थलांतर पूर्वेकालीं कुडतरी येथे कोणती दैवते होती ?

जुन्या काली म्हणजे इसवी सन १५६० सालापूर्वी कुडतरी येथे देवस्थान असताना तेथे स्थापन असलेल्या दैवतांची नावे जी गोवा पुरातत्व खाते किंवा आर्किव्ह इस्तोरिकुच्या जुन्या कागदपत्रावरून उपलब्ध आहेत, ती अशी आहेत :-

सांतेरी - नारायण - चंडेश्वरी - क्षेत्रपाल - सांतुलीयो - रवळनाथ - चंद्रनाथ - दुर्गादेवी - भगवती - केंसनाथ.

पण, इतिहासाचार्य कै. वा. डॉ. पांडुरंगबाब सखाराम शेणवीं पिसुर्लेकर जे आर्किव्ह इस्तोरिकुचे डायरेक्टर होऊन गेले, त्यांनी 'पोर्तुगीजांनी उद्ध्वस्त केलेली सासष्टींतील देवालये' या शीर्षकाखाली सासष्टींतील प्रत्येक गांवाचे नांव आणि त्यापुढे उद्ध्वस्त केलेल्या देवालयाच्या दैवताचे नाव लिहून यादी मराठीत प्रसिध्द केलेली त्यांच्या लिखाणात असलेली पाहाता ती नावे अशी आढळतात :-

कुडतरी : सांतेरी, नारायण, चंडेश्वरी, क्षेत्रपाळ, सांतुलीयो, रवळनाथ, चंद्रनाथ, दुर्गादेवी, भगवंती (भगवती), सोलवेंश्वर, महेश्वर, गणेश, केंसनाथ.

वरील दोन्ही यादीतील दैवतांचे निरीक्षण करता कै. वा. डॉ. पिसुर्लेकर यांनी मराठीत प्रसिध्द केलेल्या नावांच्या यादीत तीन अधिक नांवांची भर आहे व ती नावे सोलवेश्वर, महेश्वर, गणेश ही होत.

कुडतरीस हे देवस्थान असताना कुडतरी गावाचे साधारण स्वरूप काय असावे याबद्दल शोध घेता इ. स. १८५२ साली प्रसिध्द झालेल्या 'मोस्केज् इस्तोरिकुदस कोमुनिदादिस' लेखक : फिलीप नेरी शाहियेर, या पोर्तुगीज भाषेत लिहिलेल्या पुस्तकात जी माहिती मिळते, ती पाहाता कुडतरी गावात एकंदर सदतीस वाडे होते यावरून या गावाचे क्षेत्रफळ किती मोठे होते याची कल्पना येते. या कुडतरी गावाच्या क्षेत्रफळात पाच सरोवरे, पाच तलाव, अठरा गोड्या पाण्याच्या 'झरी' फार चांगल्या होत्या. त्यापैकी सात 'झरी' इतक्या चांगल्या होत्या म्हणून त्या 'झरी'च्या पाण्यात स्नान करून तृप्ती अनुभवण्यासाठी विशेषेकरून उन्हाळ्यात, लोकांची रीघ लागत असे. त्या सर्व एकंदर 'झरी'पैकी एक 'झरी' अगदी अत्युत्तम होती व तिचे नाव मुगाली असे होते. इतर नावे त्या सात 'झरी'ची अशी होती :- तांबिते, सिंदोले, वागुले, रूंबोर्द, सुकोले, बांदोला आणि माफुटी- जी पाच सरोवरे होती त्यातील (रालयतळे) रालेतळे उर्फ रायतळे नावाचे जे होते, त्याचा लौकिक आणि महत्व मोठे होते. त्याचा आकारही फार मोठा होता आणि ते ज्या जागेत होते, त्या जागेचे नाव सांदिवल किंवा सांदेल्व असे होते. उल्लेखित सरोवरच्या मध्यभागी एक लहानसे बेट किंवा जमिनीचा उंचवटा आहे. त्या बेटावर एकेकाळी त्या गावच्या प्रतिष्ठित पराक्रमी देसाई यांच्या मालकीचे एक घर किंवा बंगला, सहल, विश्रांती वगैरेसाठीचा होता अशी आख्यायिका होती. प्राचीन काली श्रीसांतेरीचे जे देवालय होते तेही त्या सांदिवल किंवा सांदेल्व नावाच्या जागेतच होते. त्या रालेतळे उर्फ रायतळे सरोवराच्या केंद्राच्या मध्यस्थळी दोन खांब पोकळ नळासारखे उभे होते. आणि त्यांचा उपयोग सरोवराच्या पाण्याची पातळी, तसेच पाऊस कमी झाला किंवा अधिक झाला, याचे मोजमाप घेऊन त्याप्रमाणे वायंगण पिकाची जमीन किती ठेवावी हे ठरविले जाई. याशिवाय, त्या सरोवराचे पाणी उन्हाळ्यात वायंगण पिकाच्या शेती जमिनीवर पोचविण्यासाठी ब्रॉझ धातूचे दोन नळ सरोवरापासून शेती जमिनीपर्यंत जमिनीतून नेलेले होते. प्राचीनकाली श्रीसांतेरीचे जे देवालय होते, ते सांदिवल किंवा सांदेल्व नावाच्या जागेवरच खचित होते याचा पुरावा त्या देवालयाचा तलाव (तळी) अद्याप त्या जागेवर दृष्टीस पडतो.

यावरून समजते पोर्तुगीजकालीन राजवटीत ज्या ऐतिहासिक कागदपत्र सरकारी संग्रहालयास आर्कीव्हु इस्तोरिकु नावाने ओळखत असत, त्या संग्रहालयास आजच्या कालात गोवा पुरातत्व खाते या नावाने ओळखण्यात येते. या सरकारी दप्तरखान्यात सासष्टी तालुक्यातून दैवतांचे स्थलांतर परकीय राज्यात झाल्यानंतर ती दैवते आणि त्यांची देवालये ज्या ज्या गावी होती त्या प्रत्येक गावात तत्कालीन व्हॉइसरायाच्या हुकुमावरून जज्ज स्वतःच जाऊन, त्या जज्जाबरोबर सासष्टी तालुक्यातील कोर्टातील सेक्रेटरी वगैरे जरुर ते सरकारी कर्मचारी हजर राहून, शिवाय, त्या त्या गावातील स्थानिक कुलकर्णी ग्रामसंस्थेचे अधिकारी, गावचे माहितगार आणि प्रत्येक देवालयाच्या मालकीच्या जमिनीचे भोगवटदार वगैरे सर्व लोकांस एकत्र जमवून त्या सर्वांसमक्ष देवालयांच्या मालकीच्या सर्व जमिनी, इमारती वगैरेंचा पंचनामा कायदेशीरपणे केलेला त्या सरकारी दप्तरात आढळतो. प्रत्येक गावातील देवालयांच्या जमिनींचा पंचनामा वेगवेगळा असून तो अर्थातच वेगवेगळ्या दिवशी. हे सांगण्याची जरुरी नसावी. कुडतरी गावातील देवालयांच्या मालकीच्या जमिनीचे मोजमाप असलेला पंचनामा ता. २८ फेब्रुवारी १६२० साली केलेला आढळतो. आणि त्या पंचनाम्यात गास्दार मोरैर नावाचा इस्क्रीव्हांव दु पुब्लिकु ज्युदिसियाल दस तेन्हस दे सालसेत, या हुद्याच्या अधिकाऱ्याने सेक्रेटरी म्हणजे लेखकाचे काम केलेले आहे. या पंचनाम्यात ज्या जमिनीत प्राचीनकाळी म्हणजे दैवतांच्या स्थलांतरपूर्वकाली, श्रीसांतेरीचे देवालय होते, त्या जमिनींचे मोजमाप व ती जमीन कोणत्या जागेवर होती याची कल्पना येण्याइतकी माहिती आहे, म्हणून त्या पंचनाम्यातील जरुरीपुरता अत्यावश्यक तेवढाच भाग जशाचा तसा पंचनाम्यात असलेल्या लिपी भाषेतच कॉपी करून खाली दिला आहे.

'Hum chao em que estava o pagode Santeri que possuiam os servidores do di to pagode que parte da banda do norte com propriedade

hunorcarachem batta da aldeia, tem de cumprido desta banda quarenta e dous bambus da medicao da palmeira e dois oitavos. E da banda do sul parte com a elevada E Zior tem de cumprido desta banda trinta e sete bambus e hum oitavo. E no meio quarenta edous bambus. Largura.—Da banda da leste parte com a serra da aldeia temde largura desta banda vinte quatro bambus E da banda de Este parte coma varzea Varade tem de largura dasta banda vinte e dous bambus E no meiovinte e tres bambus e sete oitavos.

Este chao fica emcabessado em Salvador Antao filho de defunto Antonic Antao com o foro adeante declarado.'

मुख्य दैवत आणि सपरिवार दैवते

मुख्य दैवते श्रीशांतादुर्गा आणि श्रीचामुंडेश्वरी कुडतरी महामाया ही असून ही दैवते प्रमुख देवालयात एकमेकांच्या शेजारी, पण, दोन वेगवेगळ्या गर्भागारांत, आणि श्रीशांतादुर्गा देवीच्या उजवीकडे श्रीचामुंडेश्वरी अशी स्थापित आहेत. श्रीउदंगी हे दैवत येथे देवस्थान स्थापनापूर्वकालीचे असून त्या दैवताची स्थापना प्रमुख देवालयासमोरच वेगळ्या स्वतंत्र लहान टुमदार देवालयांत केलेली आहे. श्रीलक्ष्मी नारायण, श्रीगणपती, श्रीसिध्देश्वर, श्रीग्रामपुरुष, श्रीरवळनाथ, श्रीजल्मी, श्रीम्हारांगण आणि श्रीप्रसाद लिंग या दैवतांची स्थापना खालीलप्रमाणे आहे. श्रीलक्ष्मीनारायण, श्रीगणपती, श्रीसिध्देश्वर, श्रीग्रामपुरुष ही चारही दैवते प्रमुख देवालयाच्या उजव्या बाजूच्या भागांत स्थापित आहेत. श्रीरवळनाथाची स्थापना प्रमुख देवालयांच्या डाव्या बाजूस स्वतंत्र देवालयात केलेली आहे. श्रीजल्मीची स्थापना प्रमुख देवालयाच्या बाहेरच्या भिंतीस उजवीकडे एका लहानशा दगडी देव्हाऱ्यांत केलेली आहे. श्रीम्हारांगण हे दैवत श्रीउदंगीच्या देवालयासमोर आहे. आणि श्रीप्रसाद लिंग प्रमुख देवालयात चौकावरच्या डाव्या बाजूस असून ते शुध्द पितळ धातूचे चकाकीत आहे. श्रीशांतादुर्गा, श्रीचामुंडेश्वरी, श्रीलक्ष्मी-नारायण, श्रीगणपती, श्रीरवळनाथ ही दैवते काळ्या पाषाणी मूर्ती स्वरूपांत, श्रीसिध्देश्वर आणि श्रीग्रामपुरुष काळ्या पाषाणी लिंग स्वरूपांत आणि श्रीउदंगी रोहिणी रूपांत व तेथे पाषाणी नाग पांचफणाचा अशा रितीने त्या दैवतांची स्थापना केलेली दिसते. इतर दैवते म्हणजे श्रीजल्मी, श्रीम्हारांगण पाषाण रूपांत आहेत. याशिवाय, प्रमुख देवालया-समोरच चार पांच हात अंतरावर एक दगडी बैठक जमिनीपासून दोन हात उंच असून त्यावर एक शिला पाषाणी एक हात लांबीची आणि एक फूट रुंदीची आहे. आणि त्या पाषाणी शिलेवर दोन चरण (पावले) एकीकडे, आणि त्यांच्या शेजारीच आणखी दोन चरण (पावले) त्या पाषाणी शिलेस कोरून उमटविलेली दिसतात. आणि हे चरण प्रमुख दैवतांचे आहेत असे त्या देवस्थानांत सांगतात.

कांही दैवतांचा जीर्णोद्धार

श्रीशांतादुर्गा, श्रीचामुंडेश्वरी आणि श्रीरवळनाथ या तीन मूर्ती कालांतराने अति जीर्णावस्थेत पोचल्या-मुळे त्यांचा जीर्णोध्दार करणे अपरिहार्य झाले. मूळ कुडतरीस असलेली ही दैवते शेळवणास आणून स्थापन केलेली व नंतर तेथून स्थलांतर करून अवेडे येथे आणलेली होती. ती येथे आणताना श्रीगणपती दैवत न आणता ती मूर्ती आणि दोन लिंगे शेळवणासच राहिली, ती शेळवणास अद्यापही पहाण्यांत येत असून त्या जागेशेजारीच सध्याच्या कालांत, तेथे नवीन देवालय बांधून त्यांत श्रीसांतेरी देवीची स्थापना केली आहे. श्रींचा प्रसाद कौल निरोप घेऊन अवेडे येथील देवस्थानांत जीर्ण झालेल्या उल्लेखित तीन मूर्ती आणि येथे नव्याने स्थापन करण्यासाठी श्रीगणपती मिळून चार काळ्या पाषाणाच्या फार सुबक मूर्ती करवून घेऊन त्या सर्वांची शास्त्रशुध्द विधीपूर्वक पुनर्स्थापना यज्ञयागादि कर्मांसहित अभूतपूर्व थाटात, मंगलमय सोहळ्यात, शके १८९२ विरोधी कृत नाम संवत्सर चैत्र शुक्ल पंचमीयुक्त षष्ठी, शुक्रवार दिनांक १६ एप्रिल १९७१ दिवशी, मूळ नक्षत्राच्या शुभमुहुर्तावर करण्यात आली. हा सुप्रतिष्ठापना सोहळा समारंभ धार्मिक विधींसह दिनांक १४ एप्रिल १९७१ रोजी प्रारंभ होऊन सतत सहा दिवस चालू राहून

त्याची सांगता दिनांक १९ एप्रिल १९७१ रोजी सोमवारी मोठ्या आनंदोत्सवात करण्यात आली. पाषाणाच्या नवीन मूर्ती बनविणारे शिल्पकार श्री. गोपाळ शेणै मुक्काम कार्कळ (कर्नाटक) हे होत.

देवस्थान स्वतःच्या भोगवटीच्या जमिनीत

'श्रीशांतादुर्गा चामुंडेश्वरी कुडतरी महामाया' या देवस्थानचे मुख्य देवालय, सपरिवार देवतांची देवालये, अग्रशाळा वगैरे इमारती ज्या जागेत आहेत, त्या जागेस 'कुर्तरा-घुडो-कुटुंबण' गांव अवेडे, फ्रेगेझीय पारोडा, कोंसेल्यु (तालुका) केपे, अशा नावाने ओळखण्यात येते, व ही जमीन त्या देवस्थानच्या भोगवटीत असून त्याचे क्षेत्रफळ चोपन्नहजार शंभर चौरस मिटर आहे. हल्लीच गोव्यात, सरकारने भू-मापन सुरू केले आणि त्यात उल्लेखित जमीनीचे सर्व्हे नंबर एक आणि पंच्चावन्न अशी नोंद असल्याचे कळते.

देवस्थानात प्रतिवार्षिक नियमित उत्सव

चैत्र :

शुक्ल प्रतिपदा, नूतन संवत्सर प्रतिपदा, वद्य षष्ठी : स्मारकोत्सव.

वैशाख :

शुक्ल पौर्णिमा : वसंतोत्सव

श्रावण :

प्रत्येक रविवारी : रंगपूजा आणि शिबिकोत्सव

आश्विन :

शुक्ल प्रतिपदा : नवरात्रोत्सव प्रारंभ, घटस्थापना, शुक्ल महानवमी : घट उत्थापन (विसर्जन), रात्रौ खांब नेसवणे, रंगपूजा, नवरात्रोत्सव समाप्ती, आरती, इत्यादि. शुक्ल दशमी – विजयादशमी : संध्याकाळी ६ वाजता सीमोल्लंघन, शमी आणि शस्त्रपूजन कौलकरार इत्यादि. शुक्ल पौर्णिमा : कोजागिरी, दुपारी ब्राम्हण – सुवासिनी – कुमारिका संतर्पण, रात्रौ रंगपूजा, शिबिकोत्सव, कौलकरार इत्यादी.

कार्तिक :

शुक्ल द्वादशी : श्रीतुलसीविवाह, शुक्ल पौर्णिमा : दीपस्तंभ प्रज्वलीत करणे.

पौष :

शुक्ल त्रयोदशी : प्रमुख जत्रोत्सव प्रारंभ, रात्रौ शिबिकोत्सव, काला, नाटक. शुक्ल चतुर्दशी : रात्रौ शिबिकोत्सव, नंतर नाटक (जत्रोत्सव दुसरा दिवस) शुक्ल पौर्णिमा : रात्रौ पावणी, नंतर शिबिकोत्सव, नाटक, जत्रोत्सव सांगता.

फाल्गुन :

शुक्ल पौर्णिमा : होलीकोत्सव.

प्रसाद – कौल

या देवस्थानात प्रसाद-कौल लावण्याची वहिवाट आहे. श्रीप्रसाद लिंगास ही प्रसाद-पूजा तुंब्याच्या पांढऱ्या फुलांची लावतात आणि ती प्रसाद-पूजा त्या श्रीप्रसाद लिंगास उजव्या बाजूस तशीच डाव्या बाजूसही एकाच बरोबर लावतात. त्यामुळे एकाच वेळी, एकाच बरोबर दोन इसमास प्रसाद-कौल घेण्याची येथे वहिवाट आहे.

श्रीचामुंडेश्वरी किंवा चामुंडा शक्ती देवीची उत्पत्तीसंबंधी माहिती

श्रीशिवशंकरानी एकशेनव्वद मातृकांचा मातृगण उत्पन्न केला. ती एकशेनव्वद मातृकांची नावे स्थलाभावामुळे येथे अशक्य आहे. श्रीविष्णुनिर्मित मातृका येणेप्रमाणे :- घंटाकर्णी, त्रैलोक्य मोहिनी, सर्वसत्वशंकरी, चक्र हृदया, व्योमचारिणी, रवीखिनी, लेखिनी, कालसंकोर्षिणी.

सप्तमातृका म्हणून ओळखण्यात येते, त्या सप्तमातृकांची नावे आणि ती प्रत्येक मातृका कोणापासून उत्पत्ती, याची माहिती अशी :- ब्रम्हापासून ब्राम्ही, महेश्वरापासून माहेश्वरी, कुमार स्कंदापासून कौमारी, विष्णूपासून वैष्णवी, वराहापासून वाराही, इंद्रापासून ऐंद्री आणि यमापासून निघाली ती चामुंडा शक्ति होय.

वरील माहिती जिज्ञासू भाविकास फार उपयुक्त आहे, असे वाटल्यावरून, अत्यावश्यक तेवढी येथे देण्याचा प्रयत्न केलेला आहे. ही आणि इतर सविस्तर माहिती 'आदिशक्तीचे विश्वस्वरूप अर्थात देवीकोश' या ग्रंथाच्या दुसऱ्या खंडांत आहे. या ग्रंथाचे लेखक श्री. प्रल्हाद कृष्ण प्रभूदेसाई, श्री. शि. ह. धुपकर आणि श्री. बा. बा. भागवत असून प्रकाशक : 'ग्रंथ संशोधन प्रकाशन मंडळ टिळक, महाराष्ट्र विद्यापीठ,' पुणे २ आहे.

सद्यःकालात कुडतरी येथे प्राचीनकाली श्रीसांतेरी देवालयाच्या इमारतीच्या पायाचे अवशेष दिसतात, आणि त्या देवालयापुढील तत्कालीन तलावही आहे. श्रीचामुंडा देवीच्या देवालयाची जागा बहुतांशी चर्चच्या इमारतबांधणीने व्यापिली असावी असा अंदाज देवालयांच्या मालकीच्या जमिनी चर्चच्या खर्चासाठी, आणि देवालयाच्या सेवेकरांच्या जमिनी नवखिरस्त्यांसाठी बहाल करण्याचे धोरण त्याकाली होते. त्या सर्व जमिनींची नोंद येथे विस्तार भयास्तव दिली नाही. असो.

१७

श्रीभगवती चिंबलकरीण देवस्थान

माशेल – वरगांव



श्रीभगवती चिंबलकरीण, माशेल

श्रीभगवती चिंबलकरीण देवालय, माशेल

श्रीभगवती चिंबलकरीण देवस्थान

श्रीभगवती चिंबलकरीण हे देवस्थान जे आजच्या काळात फोंडा तालुक्याच्या माशेल-वरगांव या गावांत आपण स्थापित असलेले पहात आहोत, ते देवालय इ. सनाच्या सोळाव्या शतकाच्या आरंभीच्या काळात तत्कालीन गोवा बेटाच्या किंवा तीसवाडीच्या चिंबल गावांत स्थापित होते, आणि ते इ. सनाच्या १५४० सालापूर्वी तत्कालीन राजकर्त्यांनी चालविलेल्या धार्मिक धोरणामुळे चिंबलहून स्थलांतर करून त्या राजकर्त्यांच्या राज्य सरहद्दीबाहेर डिचोली तालुक्याच्या मये गावांत नेण्यात आले, आणि तेथून शके १६७३ म्हणजे इ. स. १७५१ साली, सध्याच्या श्रीक्षेत्र माशेल येथे आणून स्थापण्यात आले. ते तेथे आजतागायत सुस्थितीत असलेले पाहात आहोत. मूळ चिंबल गावांत स्थापित असलेले हे देवालय तेथून स्थलांतर करण्याची गरज कोणती, कारणे काय आणि परीस्थिती कशी काय उद्‌भवली, याची माहिती त्या देवालयाच्या भाविक कुळावी महाजनांस, इतर भक्तजनांस आणि विशेषकरून सध्याच्या पिढीच्या लोकांस, जिज्ञासूंस समजून घेण्याची उत्सुकता दिवसें दिवस लागल्याचे दिसते.

गोमंतकांतील तिसवाडी म्हणजे तत्कालीन गोवा बेट, बारदेश आणि सासष्ट या तीन वेगवेगळ्या तालुक्यातील देवालयांचे स्थलांतर झाले, ते जरी इसवी सनाच्या सोळाव्या शतकांतच झाले आहे, तरी गोवा बेटांतील देवालयांच्या स्थलांतराचा काळ वेगळा म्हणजे खिरस्तीकरणाच्या प्रारंभीचा असून त्यावेळी घडलेल्या घटनाही जितक्या आकस्मिक तितक्या भयानकही होत्या. कोणत्या दिवशी कोणत्या गावांत कोणती भयानक घटना घडेल याचा नेम नव्हता. आणि त्याचे वर्णनही करणे फार दुःखःदायक असल्याने येथे फक्त अत्यंत गरजेच्या अत्यावश्यक कल्पना घेण्यापुरताच गोष्टींचा समावेश केला असून त्यावरूनच वाचकांस श्रीभगवती देवस्थानचे मूळ चिंबल येथील स्थानावरून स्थलांतर कां करावे लागले, याची माहिती मिळू शकेल. पोर्तुगीज सरकारचा आफोंस दे आल्बुकेर्क नांवाचा सरदार पोर्तुगालहून जलमार्गे सैन्यासह गोव्यात येऊन पोचला आणि त्याने गोव्यात राज्यकारभार करीत असलेल्या आदिलखानाकडून गोवा बेट इ. स. १५१० साली जिंकून घेतले. आदिलखानाच्या या गोवा बेटात हिंदूची पुष्कळ देवालये होती. आफोंस दे आल्बुकेर्कने गोवा बेट आपल्या ताब्यात घेतल्यानंतर तेथील जनतेस आपण होऊन पूर्ण आश्वासन दिले की, आपण जनतेस कोणत्याच बाबतीत कसलेच त्रास देणार नाही, ही खात्री बाळगावी. आदिलखानास जे जितके कर तुम्ही देत होता, ते तितकेच कर मला दिल्यास पुरे. धार्मिक बाबतीत तुम्हाला संपूर्ण स्वातंत्र्य राहील व त्यात आपण कोणतीच ढवळाढवळ करणार नाही. तुम्ही सुखाने रहावे. याप्रमाणे खरोखरच काही काल लोटला आणि प्रजेस दिसले की, आपण त्या आदिलखानाच्या जाचांतून एकदा मुक्त झालो आणि सुखाने दिवस कंठण्याचा आपणास लाभ झाला. पुढे गोव्यात पोर्तुगालहून खिरस्ती धर्मीय बिशप दूमि नांवाचा धर्माधिकारी येथे येऊन पोचला. त्याने गोवा बेटातील एकंदर जनतेची सर्वांगीण माहिती निरीक्षली आणि ता. १२ जानेवारी १५२२ दिवशी पोर्तुगालच्या राजेसाहेबांस त्यानी एक पत्र लिहून पाठविले. त्या पत्रांत असा मजकूर होता-

"आपल्या या गोवा बेटांतील देवालये मोडून त्या ठिकाणी चर्चेस उभारल्या गेल्यास, देवाची सेवा होईल आणि ज्या इसमांस या गोवा बेटांत राहावयाचे असेल, त्याने खिरस्ती धर्मीय होऊन रहावे व असे केल्याने त्यास आपल्या येथील जमीनी, घरे मिळतील. पण जो इसम खिरस्तीधर्म स्वीकारण्यास राजी नाही, त्याने हे बेट सोडून जावे." या पत्रांतील मजकुराचा परिणाम राजे साहेबांवर झाला असावा. कारण, पुढे "ज्यांचे राज्य त्यांचा धर्म" हे तत्त्व गोव्याच्या राजकारणांत त्यावेळी प्रमाण मानण्यात आले.

वास्तविक इ. स. १५१० साली पोर्तुगीजांनी गोवे शहर जिंकून घेतले त्या कामी, गोवेकर हिंदूनी त्यात भरपूर सहाय्य केले हे प्रसिध्द आहे. आफोंस दे आल्बुकेर्कच्या कारकिर्दीत हिंदूस जबाबदारीच्या अधिकारपदावर पोर्तुगीजांनी नेमले होते. आफोंस दे अल्बुकेर्कच्या नंतर देखील कांही काळ इ. स. १५४७

पर्यंत, गोव्यात मोठ्या मोठ्या हुद्यांवर गोवेकर हिंदूच होते. त्यापैकी, सरठाणेदार कृष्ण शेणवी, चोडणेचे लखू नाईक, थोरल्या नेवऱ्याचे गोपू शेणवी, गोवे शहरातील अनू शेणवी मोने, कृष्ण शेणवी यांचा मुलगा दादाजी शेणवी, ही नांवे पोर्तुगीजांच्या इतिहासात ठळकपणे आढळतात. इ. स. १५४७ साली विजापूरकरांची अंत्रूज व सासष्टी ह्या तालुक्यावर स्वारी झाली असतां दादाजी शेणवी याने दोन हजार पायदळाचे नेतृत्व करून फिरंगी पोर्तुगीजांच्या बाजूने शत्रूशी फोंडे येथे मुकाबला केला. दादाजी शेणवी यास तत्कालीन पोर्तुगीज कागदपत्रांत 'गोवेकर हिंदूच्या पायदळाचा कॅप्टन' असे म्हटलेले आहे. दादाजी शेणवी याच्या तुकडीमध्ये हिंदू होते.

अशी परीस्थती असूनही गोवा बेटांतील हिंदूची सर्व देवालये ता. २८ जून १५४१ पूर्वी नष्ट करण्यांत आली, असे ह्या तारखेच्या एका सरकारी लेखांत, ती देवालये जमीनदोस्त करण्यांत आल्याचा स्पष्ट उल्लेख आहे. ह्या लेखामध्ये म्हटले आहे की, 'ह्या बेटांतील सर्व देवालये मोडण्यांत आली असून ती पुन्हां केव्हांच उभारण्यांत येणार नाहीत.' फ्रांसिस्कू पाइस या पोर्तुगीज अधिकाऱ्याने इ. स. १५९५ साली 'तोंबू' नामक एक ग्रंथ लिहिला आहे. त्यांत असे सांगितले आहे की, 'पोर्तुगालच्या राजाच्या आज्ञेनुसार गोवा बेटांतील सर्व देवालये इ. सन १५४० त पाडण्यांत आली.'

या माहितीवरून इतके सिध्द झाले की, पोर्तुगीज लोकांनी गोवा बेट इ. स. १५१० साली काबीज केल्यानंतर तीस वर्षांनी त्या बेटावर असलेली हिंदू देवालये पाडण्यांत आली. ही सर्व देवालये अर्थातच सर्वच गावांतील सर्वच देवालये एकाच बरोबर एकाच दिवशी पाडलेली नाहीत आणि तसे करणेही शक्य नव्हते. गोवा बेट किंवा तिसवाडी या राजकीय क्षेत्रात चोडण, दिवाडी या बेटांचाही समावेश होता आणि अद्यापही तो तसाच आहे. जुने गोवे (ओल्ड गोवा) येथे त्या काळी ब्रम्हपुरी होती. आज श्रीकाशी क्षेत्रांत जसे श्रीकाशी विश्वनाथचे मंदिर असून ते महान पुण्यकारक तीर्थक्षेत्र मानले जाते. आणि जेथे दररोजच हजारो यात्रेकरूं येतात त्याचप्रमाणे, किंवा त्याही पेक्षा जास्त प्रमाणांत, यात्रेकरूंची सतत रीघ गोमंचल क्षेत्रात त्याकाली. ख्यातनाम असलेल्या आणि महान पुण्यक्षेत्र मानून तीर्थस्नान करून पावन होणाऱ्या ब्रम्हपुरीतील श्रीगोमंतेश्वर-शंकराच्या दर्शनार्थ होत असे म्हणून त्या तीर्थस्थानांत अशी गर्दी वाढत राहिल्यास न जाणो एक दिवस हे लोक आकस्मिकपणे आपल्या त्या जुने गोवे राजधानीवर हल्ला करून काबीज करतील आणि आपला विश्वासघात करतील हा संशय किंवा धोका पोर्तुगीज राज्यकर्त्यांच्या मनात होता व हे हिंदूचे धर्मस्थान शक्य तो लवकर नष्ट केलेच पाहिजे, यावर त्यांची जशी दृष्टी होती तसेच दिवाडी बेटावर असलेले श्री सप्तकोटीश्वर हे सुप्रसिध्द मंदिर, चोडण येथे असलेली श्रीदेवकीकृष्ण व इतर दैवतांची देवालये यांवर नजर होती व ती उध्वस्त करणे, जाळणे, मोडणे, हिंदूच्या बळजबरीने बाटाबाटी करणेचे दैनंदिन कार्य तर चालूच असून देवालयाच्या इमारतीवर त्या पाडण्याची सुरवात जशी कर्णोपकर्णी एका गावांतून दुसऱ्या गांवाच्या जनतेस कळू लागली तशी आसपासच्या गावांतील जनता या भयानक प्रसंगाचा ध्यास घेऊन कोणास चाहूल लागू न देता, रात्रीच्या काळोखांत, ती जनता आपले दैवत, गुप्त आणि अचानकपणे, आपल्या गावांतून पोर्तुगीज राज्यसत्तेबाहेरच्या गावांत, कोठे, कोणाच्या आश्रयाच्या आधारांत, स्थलांतर करून पळवावे याचा विचार करू लागली. श्रीभगवती देवस्थान चिंबल येथे होते. चिंबल हा गांव आजच्या काळांत जे पणजी शहर राजधानी आहे, ते शहर नव्हते, तो सबंध गांव ताळगांव नांवाचा होता. पणजी शहरापासून जुने गोवे या तत्कालीन राजधानीकडे जाण्यासाठी जो सध्या राजमार्ग आहे, त्या राजमार्गाच्या उजवीकडे चिंबल गांव असून त्या गावांत जाण्यासाठी रस्ता पणजीहून येणारा राजमार्ग पाटो रायबंदरच्या सुरवातीसच आहे तेथे सुरू होऊन सरळ चिंबल गावांकडे जातो. अर्थातच चिंबल गांव सध्याच्या पणजी शहर आणि जुने गोवे यांमध्ये असून पणजीहून येताना रायबंदरच्या उजवीकडे आहे. रायबंदरच्या डाव्या बाजूस नदी आहे आणि त्या नदीच्या पैलतीराकडे चोडण, त्यापुढे दिवाडी अशी बेटे त्या नदीतीराजवळच आहेत. चोडण दिवाडी, ताळगांव येथे असलेल्या देवालयांवर धाड सुरू झाली व ती आता पसरतच रहाणार आहे, याबद्दल खात्री असल्याने या प्रसंगातून निसटण्यासाठी चिंबल येथील श्रीभगवती देवस्थानाच्या भाविक कुळावी भक्तगणांनी आपले दैवत गुप्तपणे अचानक तत्काळ तेथून हलवून पोर्तुगीज राज्यसरहद्दीबाहेरच्या राज्यात डिचोली

(भतग्राम) च्या मये गावांत स्थलांतर करून तेथे स्थापन करून मोकळे झाले. या स्थलांतराचा नक्की दिवस सन अद्याप उपलब्ध नसला, तरी हे स्थलांतर इ. स. १५४० साला पूर्वीच निश्चितपणेच झाले यात संशय नाहीच, याचे स्पष्ट आणि उघड कारण म्हणजे, जर ते तसे स्थलांतर झाले नसते तर ते दैवत त्या खिरस्ती धर्म प्रसारकांच्या बाटाबाटी करणाऱ्यांच्या तावडीत सापडून ते डिचोलीच्या मय गावांत नेण्यास मिळणार नव्हते. मुख्य दैवत श्रीभगवती चिंबलहून मये गांवी नेऊन स्थापिल्यानंतर मागे चिंबल येथे राहिले ते श्रीभगवतीचे देवालय इमारत मूर्ती किंवा दैवताशिवाय हे सांगण्याची गरज नसावी. खिरस्ती धर्मप्रसार आणि बाटाबाटी करणारे जेझुइट पंथाचे लोक जेव्हां चिंबल गावांत पोंचले तेव्हां त्यांच्या तावडीत सांपडले ते मूर्ती किंवा दैवताशिवाय देवालयाची इमारत. ती त्या लोकांनी व्देषाने मोडून टाकली आणि नंतरच्या काळांत त्या जागेवर खिरस्ती धर्मीयांचे चर्च बांधून टाकले. पण, अद्यापही त्या जागेवर प्राचीन काळच्या श्रीभगवती देवालयाचे अवशेष तलाव वगैरेचे आहेतच. पोर्तुगाल राष्ट्रात राजघराणे आणि राजेशाहीची राज्यसत्ता होती आणि राष्ट्राचा सरकारी धर्म कॅथॉलिक मानण्यांत येई. पण, नंतरच्या कालांत उदारमतवाद्यांनी पोर्तुगालांतील राजेशाहीची सत्ता उलथून पाडून रिपब्लिकन सत्ता दिनांक ५ ऑक्टोबर सन १९१० या दिवशी सुरू केली. पोर्तुगाल राष्ट्राच्या सर्व जनतेस वसाहतींच्या जनतेसही रिपब्लिक राज्यपध्दतीचा लाभ झाला. राष्ट्राने आपला कॅथॉलिक धर्म म्हणून त्यापूर्वी मानत आलेला संपूर्णपणे धिःकारून सर्व धर्मास पूर्ण स्वातंत्र्य दिले. रिपब्लिकन राजवट पोर्तुगालांत सुरू झालेली त्याच दिवशी गोव्यांत व इतर पोर्तुगीज वसाहतींत सुरू झाल्यामुळे गोव्यात हिंदू धर्मीय लोकांनी जो महान् आनंदोत्सव ज्या पध्दतीने बेहोष प्रकारे साजरा केला त्याला इतिहासांत त्या काळी तोड नव्हती.

रिपब्लिकन पध्दतीमुळे सर्व नागरीकांस मग तो खुद्द पोर्तुगीज युरोपियन असो, इंडियन हिंदू, मुसलमान, खिरश्चन असो, किंवा आफ्रिकन निग्रो असो एकंदर सर्व पोर्तुगीज राष्ट्राच्या सर्व नागरिकांस एकच कायदा, समानता, आणि बंधुभाव ही त्रिसूत्री सुरू झाली, पूर्ण धार्मिक स्वातंत्र्य मिळाले याचा परिणाम गोमंतकात सामाजिक, शैक्षणिक आणि धार्मिक बाबतीत हिंदू जनतेच्या जीवनांत फार मोठ्या प्रगतीस प्रारंभ झाला. आणि प्रगतीचा वेगही लक्षणीय दिसू लागला. रिपब्लिकन सत्ता सुरू होण्यापूर्व कालांत गोमंतकांतील देवालयांतील दैवतांच्या पालखीची मिरवणूक उत्सव दिवशींही जी रस्त्यावरून निघणे फारच अडचणीचे होते व एखादे चर्च किंवा कपेल वाटेत असल्यास त्या समोरून मार्गावरच्या वाटेने ती मिरवणूक जाण्यास प्रतिबंध होई, तीच दैवतांची पालखी मिरवणूक मुक्तपणे कोणताही प्रतिकार किंवा अडचणीं शिवाय, राजरस्त्यांवरून संचार करणेचे स्वातंत्र्य हिंदू धर्मीय जनतेस रिपब्लिकन सुरू झाल्यानंतर उपभोगण्यास मिळाले. कोणासच कसलाच त्रास होईनासा झाला. फक्त शांतता आणि सुव्यवस्था राखण्याची काळजी आणि जबाबदारी जनतेत सर्वच धर्मीयांनी पाळणे अत्यावश्यक होते. सरकार फक्त शांतताभंग सहन करीत नसे व तो झाल्यासच त्यांत हस्तक्षेप शांतता प्रस्थापित करण्यापुरताच करी, पण तोही अत्यंत काळजीपूर्वक आणि कोणत्याहि धार्मिक भावनांस यत्किंचितसुध्दां न दुखवितां. या अशा धोरणामुळे हिंदू धर्मीय जनतेत सरकारचा विश्वास तर बसलाच, शिवाय संरक्षणाची एक प्रकारे हमीच मिळाली. हे पाहून देवालयांतील दैवतांचे उत्सव, मिरवणुकी वगैरे सर्व कार्यक्रम आपआपल्या धार्मिक पुरातन चाली रितींप्रमाणे अंमलांत येण्यास प्रारंभ झाला. श्रीभगवती चिंबलकरीण देवीची पालखी श्रीक्षेत्र माशेल येथून प्रतिवर्षी चैत्र महिन्यांत पौर्णिमेनंतर येणाऱ्या पहिल्या सोमवारी निघून मिरवणुकीने आपल्या मूळ गांवी चिंबल येथे येऊन जेथे तिचे प्राचीन काली देवालय होते - पण तेथे आज चर्च आहे, त्या जागेच्या समोरच्या एका प्रशस्त स्थळी तेथे गावकऱ्यांनी उभारलेल्या मंडपात ती पालखी स्थानापन्न होणे, साधारणपणे एक पंधरवाडा त्या गावात त्या पालखीचा उत्सव नानाविध कार्यक्रमांनुसार होणे, गावांतील हिंदूधर्मीयांकडून पूजा, आरती, ओंटी, काणूक इत्यादी स्वीकारून ते दिवस मोठ्या आनंदोत्सवांत घालीवणे, ही सर्व परीस्थिती गोमंतकांत रिपब्लिक सत्ता इ. सन १९१० साली सुरू झाल्यानंतरच घडून आली आणि ती अव्याहतपणे आज पर्यंत चालू आहे. प्रीतवर्षी हा उत्सव मोठ्या थाटात साजरा होत असून चिंबल, रायबंदर आणि पानवेल या तीनही सलग गांवांतील सर्व हिंदू जनता या उत्सवाच्या दिवसात बेहोष आनंदांत घालवीत

असते. जिकडे तिकडे रात्रौं रंगीबेरंगी नानाविध दिव्यांची रोषणाई, रंगी कागदांची तोरणे. पताका, वनपुष्पानी सुशोभीत केलेल्या ताज्या बांबूच्या कमानी ठिकठिकाणी उभारलेल्या, घरांच्या प्रवेश दारांत घातलेल्या रांगोळ्या, या सर्वामुळे एका मोठ्या सणाचे वातावरणच निर्माण केलेले दिसते. माशेलांतील आपल्या देवालयांतून मिरवणुकीने निघालेली ही पालखी आणि त्यांत श्रीभगवती देवीची शृंगारित उत्सवमूर्ती थेट चिंबल येथे आपल्या मूळ स्थानानजिक खास उभारलेल्या ज्या मंडपांत येऊन प्रारंभींच स्थानापन्न होत असते, त्या मंडपास 'व्हडलो माटोव' या नांवाने ओळखतात. व्हडलो माटोव हे कोंकणी भाषेत नांव असून त्याचा अर्थ मराठींत थोरला मंडप असा आहे. या मंडपांत दोन दिवस उत्सवाचे कार्यक्रम झाल्यानंतर तेथून ती पालखी दुसऱ्या "कुंकळ्येकर माटव" नांवाने ओळखण्यात येणाऱ्या मंडपांत जाऊन तेथे स्थानापन्न होते. त्या मंडपातील उत्सवाचे कार्यक्रम पूर्ण दोन दिवसांत होतांच पुढे 'शिरेंत माटव' नांवाने ओळखण्यांत येणाऱ्या मंडपांत जाऊन तेथे एक दिवस उत्सवाचे कार्यक्रम होतात. नंतर तेथून ती पालखी 'गावांत माटव' नांवाने ओळखण्यांत येणाऱ्या मंडपांत जाऊन तेथे दोन दिवस उत्सवाचे कार्यक्रम होत असतात. त्या नंतर, ती पालखी 'खोर्न वाडा माटव' पाटो येथे येऊन तेथे स्थानापन्न झाल्यावर तेथे तीन दिवस उत्सवांतील कार्यक्रम साजरे केलेले पाहाण्यांत येते. हे कार्यक्रम पूर्ण झाल्यानंतर ती पालखी 'फोंडवे माटव' नांवाच्या मंडपांत रायबंदर येथे येऊन त्या मंडपांत दोन दिवस उत्सवानिमित्त कार्यक्रम होतात. आणि त्यांची पूर्तता झाल्यावर ती पालखी 'पानवेल माटव' नांवाने संबोधित असलेल्या मंडपात पानवेल गावांत स्थानापन्न होऊन, तीन दिवस उत्सवांच्या कार्यक्रमांचा स्वीकार करते. अशा एकंदर सात ठिकाणी खास उभारलेल्या अशा उल्लेखित सात वाड्यांवरील वेगवेगळ्या मंडपांत त्या त्या वाड्यावरील लहान मुलांपासून वृध्दांपर्यंत सर्व जनता ती देवी भगवती आपल्या मूळ गांवी येऊन आपल्या ग्रामस्थांस मायेने दर्शन देऊन कृतार्थ करून कृपाछत्र ठेवल्याची खात्री मनांत ती सर्व जनता बाळगिते, आणि याचप्रमाणे त्या देवीने प्रतिवर्षी आपल्या या मूळ स्थानी येऊन, सर्वांना आनंदांत ठेवावे अशी खास प्रार्थना ती जनता करीत असल्याचेही पाहाण्यांत येते. एकंदरींत या श्रीदेवी भगवतीचे चिंबल येथे वास्तव्य, संचार, घरोघर स्वीकारीत असलेली पूजा, आरती, काणूक, ओट्या, वाद्य आणि फटाकड्यांचा कडकडाट, वगैरे सोहळा फार अवर्णनीय असून भावना प्रधान जनतेचे अंतःकरण आनंदाने उन्मळून आल्यास नवल नव्हे. हा सर्व उत्सव सांगता झाल्यानंतर ती पालखी परत आपल्या देवालयांत श्रीक्षेत्र माशेल येथे येऊन पोंहोचते आणि अशा या पध्दतीने हा प्रतिवार्षिक उत्सव नियमितपणे साजरा केला जातो. माशेलांतून चिंबल येथे येताना ही पालखी वाटेत वायंगिणी येथे देवचारांचे स्थान म्हणून ओळखण्यात येते ते हमरस्त्यावरच डावीकडे एक लहान टुमदार सिमेंट कॉंक्रीटचा देव्हारा व त्यात एक पाषाणी जुन्याकालीन नंदी आहे तेच ते स्थान मानले जाते, तेथेच थांबते, व तेथे त्या पालखीतील श्रीदेवी भगवतीस आरती करून नंतर ती पालखी पुढे वाटचाल करते व त्याच वायंगिणी गांवात हमरस्त्यानजिकच असलेल्या कामत वाघ यांच्या घराण्याकडून आरतीचा स्वीकार करून पुढे "कामत पानवेलकर" यांच्या वाड्यामागे असलेल्या डोंगरी रस्त्यावरून थेट चिंबल गांवी येऊन आपल्या मूळ स्थानानजिक खास उभारलेल्या "व्हडलो माटोव" नावाच्या मंडपात स्थानापन्न होत असते. या जागेच्या समोर एक तलाव अद्याप आहे तो तलाव त्या श्रीदेवीचे देवालय प्राचीन काली चिंबल येथे असताना त्या देवालयासमोर जो तलाव त्या काली होता, तोच हा तलाव तेथे अजून असून त्या तलावावर ती पालखी नेऊन तेथे श्रीदेवी भगवतीस आरती केली जाते. माशेलांतून श्रीदेवी भगवती आपल्या मूळ स्थानी चिंबल गावांत संचार करण्यासाठी येण्याची वहिवाट इ. स. १९२० साली झाली आणि ती अद्याप अव्याहतपणे चालू असून प्रतिवर्षी हा उत्सव होतो. माशेलांत या देवस्थानांत प्रत्येक महिन्याच्या शुक्ल नवमीस रात्रौं ९ वाजता शिबिकोत्सव साजरा केला जातो, आणि प्रतिवार्षिक पर्वणी उत्सव काला हा मार्गशीर्ष शुक्ल नवमी रोजी होत असतो. या देवस्थानचे प्रमुख दैवत श्रीभगवती देवी हे असून, शिवाय, लक्ष्मीनारायण आणि श्रीनागेश ही आनुषंगीक दैवते आहेत. गोव्यांतील इतर देवस्थानांप्रमाणे याही देवस्थानांत प्रसाद कौल घेण्याची वहिवाट आहे. प्रसाद कौल घेतांना ती प्रसाद पूजा एका पंचधातूंच्या श्रीदेवीच्या मूर्तीस करंबळी वृक्षाच्या पानांच्या तुकड्यांची बांधली जाण्याची पध्दती आहे. मुद्दाम लक्षांत घेण्यासारखी हृदयस्पर्शी कृती या देवस्थानांत पहाण्यांत येते ती अशी की, प्राचीन काली गोव्यांत खिरस्तीकरणाच्या भयानक प्रसंगांत चिंबल येथून या श्रीभगवती देवीस स्थलांतर करून मये येथे जाऊन त्या गांवी कांही काल

वास्तव्य करून रहावे लागले होते. त्या घटनेच्या स्मरणार्थ मये येथील श्रीलईराई देवीच्या प्रतिवार्षिक जत्रा महोत्सवाच्या दिवशी वैशाख शुक्ल पंचमीच्या रोजी माशेल येथून श्रीभगवती देवीकडून फुलांनी भरलेले ताट मये येथे श्रीलईराई देवीस पाठविले जाते. किती गोड आठवण ही! श्रीभगवती देवस्थानचे, हे देवस्थान प्राचीन काली मूळ तिसवाडी तालुक्याच्या चिंबल गावांत असतानापासूनचे मूळ संस्थापक कुळावी महाजन त्या गांवचे प्राचीन कालचे गांवकार चिंबलकर ज्यांचे उपनांव आजच्या कालांत चिमुलकर गौड सारस्वत ब्राम्हण असे आहे ते होत. नंतरच्या कालांत त्या देवस्थानच्या महत्वाच्या कार्यात ज्यानी सहकार्य केले त्यांसही त्या देवस्थानच्या कारभारांत भाग घेण्याचा अधिकार मान्य केला गेला याबद्दल विशेष माहिती स्थलाभावामुळे येथे देणे अशक्य आहे. ती सर्व माहिती या देवस्थानची घटना नियमावली सरकारने पास केली असून त्या नियमावलीस "कोंप्रोमिस" या नावाने ओळखण्यात येते. तो कोंप्रोमिस; पोर्तारिया नंबर १०८ तारीख २२ एप्रिल सन १९१० च्या सरकारी हुकुमाने पास झाला व मंजुरी मिळून तो सरकारी गॅझेट बोलेती ऑफिसीयाल नंबर ९३ ता. २७ ऑक्टोबर १९१० पुरवणीवर प्रसिध्द झालेला आहे त्यावर वाचावयास मिळतो.

१८

श्रीधाकटी वनदेवी देवस्थान

मुळगांव – डिचोली



श्रीधाकटी वनदेवी, मुळगांव, डिचोली

श्रीधाकटी वनदेवी देवालय, मुळगांव, डिचोली

श्रीधाकटी वनदेवी देवस्थान मुळगांव-गोवा

श्रीधाकटी वनदेवी हें देवस्थान सांप्रतच्या कालांत गोमंतकांत डिचोली तालुक्याच्या मुळगांव-गांवांत स्थापित आहे. गोमंतकाची राजधानी जें पणजी शहर तेथून मुळगांव येथें जाण्यासाठीं प्रवासी वाहतूक करणाऱ्या बसेस पणजी शहरापासून सत्तरी वाळपई पर्यंत जाणाऱ्या आहेत त्यांतून जाऊन वाटेंत मुळगांवीं या देवस्थानजवळ उतरतां येतें. हमरस्त्याच्या उजवीकडे हें देवस्थान अगदीं जवळच असल्यानें, प्रवाशांस कसलीच अडचण भासत नाहीं.

प्राचीन काली हें देवस्थान कोठे होते. तेथून स्थलांतर केव्हां झाले आणि त्या स्थलांतराची कारणे कोणती?

इसवी सनाच्या सोळाव्या शतकांत गोमंतकांतील तत्कालीन राज्यकर्त्यांनीं गोव्याचें ख्रिस्तीकरण आरंभिलें होतें. कारण, 'ज्याचें राज्य त्यांचा धर्म' हें तत्व गोव्याच्या राजकारणांत त्यावेळी प्रमाण मानण्यांत येई या तत्वानुसार, गोवा बेटांतील हिंदूंचीं सर्व देवालयें ता. २८ जून १५४१ पूर्वीं नष्ट करण्यांत आलीं. कारण, ह्या तारखेच्या एका सरकारी लेखांत तीं देवालयें जमीनदोस्त केल्याचा स्पष्ट उल्लेख आहे. फ्रांसिस्क पाइस ह्या पोर्तुगीज अधिकाऱ्यानें इ. स. १५९५ सालीं 'तोंबु' नामक एक ग्रंथ लिहिला आहे. त्यांत असें सांगितलें आहे कीं, पोर्तुगालच्या राजाच्या आज्ञेनुसार गोवा बेटांतील सर्व देवालयें सन १५४० त पाडण्यांत आलीं (तोंबु जेराल पृष्ट ६७). उल्लेखित तोंबु जरी पन्नास वर्षांनंतर लिहिला गेला असला तरी त्यांतील माहिती सरकारी कागदपत्रांवर आधारलेली आहे हें लक्षांत ठेविलें पाहिजे. पण सन १५४० सालापूर्वींही पोर्तुगीज अमदानींत गोवा बेटांतील कांहीं देवालयें जमीनदोस्त करण्यांत आलीं होतीं इसवी सन १५४० त सासष्टी व बारदेस हे प्रदेश आदिलखानानें पोर्तुगीजांस बहाल केले. इ. स. १५६६ पर्यंत गोवा बेटाचें संपूर्ण ख्रिस्तीकरण झालें होतें. इ. स. १५६० त झेझुइट पंथाचे लोक आपल्या धर्मप्रसारार्थ सासष्टींत प्रथमतःच गेले. झेझुइट पाद्रींच्या विनंतीवरून व्हॉइसरायनें ता. २० डिसेंबर १५६२ रोजीं आज्ञा केली कीं, हिंदूनीं नवीन देवालयें बांधूं नयेत किंवा असलेल्या देवालयांची दुरुस्ती किंवा डागडुजी करूं नये. (Wicki, Documenta Indica, VI Pagina 671.) या आज्ञापत्राची सासष्टींतील हिंदु पुढाऱ्यांस रायतूरच्या किल्ल्यांत ता. १४ जानेवारी १५६६ रोजीं जाणीव देण्यांत आली. तसेंच, ता. २७ फेब्रुआरी १५६६ रोजीं बारदेसमध्येंही हें फर्मान जाहीर करण्यांत आलें. (Roteiro Pagina 77 डॉ. पांडुरंगराव सखाराम शेणवीं पिसुर्लेंकर कृत). या फर्मानाविरुध्द हिंदूनीं शक्तीनुसार चळवळ करून पाहिली पण त्यांत यश आलें नाहीं. अशी ही परिस्थिती मनांत आणून सासष्टींतील कित्येक देवालयांच्या कुळाव्यांनीं देवाचा कौल घेऊन आपआपल्या देवालयांतील प्रमुख दैवतांचें, लिंगाचें किंवा प्रमुख दैवताच्या प्रतिकाचें, शेजारच्या आदिलखानाच्या प्रदेशांत किंवा दक्षिणेंतील हिंदु राज्यांमध्यें स्थलांतर केलें. आदिलखानाचें राज्य मुसलमानाचें जरी असलें तरी तेथें हिंदूंस बरेंच स्वातंत्र्य होतें. कारण, त्या प्रदेशांतील देसाई व गांवकार हे हिंदूच होते. सासष्टींत चाललेलें ख्रिस्तीकरणाचें कार्य पाहून बारदेसमधील फ्रांसिस्कन पाद्री लोकांस आपणही तसेंच करावें असें वाटून त्यांनीं बारदेसमध्यें असाच प्रकार सुरू करण्याचें ठरविलें. याचा सुगावा लागून तेथील कांहीं हिंदूनीं आपआपलीं दैवतें म्हणजे देवालयांतील प्रमुख दैवत, त्याच्या मूर्ती किंवा प्रतिकें स्थलांतर करून रातोरात दुसऱ्या प्रदेशांत, पोर्तुगीज राज्याच्या हद्दीबाहेर नेऊन स्थापण्यांत यश मिळविलें. अशा दैवतांपैकींच श्रीधाकटी वनदेवी हें दैवत होय. हें दैवत प्राचीन कालीं म्हणजे इसवी सनाच्या १५६७ सालापूर्वी बारदेसच्या शिरोडें गावांत ज्यागावांस आज "सेरुला" म्हणून ओळखण्यात येतें त्या गावांत होतें. तेथून हें दैवत श्रीधाकटी वनदेवी आणि श्रीनारायण हीं दोनही दैवतें अडवलपाल या गावांत, तात्पुरत्या कालांत मुक्काम करून राहिलीं आणि तेथून नंतर स्थलांतर करून मुळगांव (डिचोली तालुका) येथें आणून तेथें कायमची स्थापण्यांत आलीं असून सद्यः कालांत सुस्थितींत तेथें आहेत व त्या जागेस शिरोडवाडी हें नामाभिदान नंतरच्या कालांत देण्यांत आलें.

स्थलांतर पूर्व कालांत हे देवस्थान शिरोडे येथे असताना तेथे कोणती दैवतें होती ?

प्राचीन कालीं बारदेसच्या शिरोडें गावांत हें देवस्थान असतांना तेथें जीं दैवतें होतीं त्याची माहिती गोवा सरकारच्या पुरातत्व खात्यांत पोर्तुगीज कालीन जें ऐतिहासिक दप्तर आहे त्यांत आढळते. त्या कालीं सेरुला गावांत जीं दैवतें होतीं तीं अशी :- (सेरुला या गावांस शिरोडें म्हणून ओळखत हें या पूर्वींच सांगितलें आहे.) वेताळ – नारायण – धाकटी वनदेवता – रवळनाथ – व्हडली वनदेवता – सिध्दनाथ – म्हालकमी (महालक्ष्मी) – ग्रामपुरुष – सोमनाथ – वीर – कालपुरुष – क्षेत्रपाल – सांतेरी – नागनाथ – मल्लिनाथ – भगवती – महाकाली आणि गोपेश्वर.

श्रीवेताळ देवस्थानच्या मालकीहक्काची एक शेतजमीन तत्कालीन व्हॉइसरायनें ता. १७ नवंबर १५६६ च्या फर्मानानें शिरोडें येथील नवख्रिस्ती इसमास इनाम दिल्याची माहिती मिळते. त्यावरून बारदेसांतील देवालयें इ. स. १५६७ पूर्वी स्थलांतर करून दुसऱ्या राज्यांत नेलीं होतीं आणि त्यांत शिरोडें येथील वेताळ देवालयाचा समावेश होता हें सिध्द होतें.

दों येंरिकी या पोर्तुगालच्या राजानें दोआसांव (दानपत्र) ता. २० ऑगष्ट १५८० रोजीं करून शिरोडें येथें असलेल्या श्रीवेताळ देवस्थानच्या मालकी हक्काची एक शेतजमीन "मुळाआरव" नांवाची रेइसमाग – बारदेसवेरें येथील चर्चसाठीं दिल्याचीही माहिती मिळते.

आजच्या कालांत मुळगांव येथें श्रीधाकटी वनदेवी हें देवस्थान आणि देवालय फार विस्तीर्ण नसलें तरी टुमदार आणि आकर्षक स्वरूपाचें आहे.

देवस्थानच्या महाजनांचे एकंदर वांगड किती आणि त्यांची उपनांवे गोत्रसह कोणती ?

या देवस्थानच्या महाजनांचे एकंदर सात वांगड असून त्यांतील महाजनांचीं उपनांवें संबंधित गोत्रसह अशीं आहेत :

१) पडवळ, देसाई शिरोडकर, गोत्र "काश्यप."

२) प्रभू कापडी शिरोडकर, गोत्र "अत्रि."

३) कामत भांगले शिरोडकर, गोत्र "वसिष्ठ."

४) धोंड शिरोडकर, गोत्र "भारद्वाज."

५) राय शिरोडकर, गोत्र "कास्य."

६) शेटये शिरोडकर (डांगी आणि खोत), गोत्र "हर्ष."

७) कांसारा शिरोडकर किंवा पाडोळकर.

प्रतिवार्षिक महत्वाचे उत्सव

चैत्र महिना –

अमावास्या रोजीं शिबिकोत्सव.

श्रावण महिना –

पहिला मंगळवार "कापडी" उपनांवाच्या महाजनांकडून.

दुसरा मंगळवार "कामत भांगले" उपनांवाच्या महाजनांकडून.

तिसरा मंगळवार "शेटये शिरोडकर" उपनांवाच्या महाजनांकडून.

चवथा मंगळवार "धोंड" उपनांवाच्या महाजनांकडून.पंचांगांत ज्या वर्षी श्रावण महिन्यांत पांच मंगळ वार येतील त्यावर्षीं.

पांचवा मंगळवार रोजीं पूजा कोणाही महाजनानें करतां येईल असें त्या देवस्थानच्या नियमावलीच्या नियम नववा नंबर तीन मध्यें दर्शीवलेलें आहे. या नियमानुसार पांचवा मंगळवार श्री. मधुकर धोंड आणि श्री. मनोहर धोंड हे बंधुद्वय स्वखुषीनें साजरा करतात.

आश्विन महिना –

शुक्ल प्रतिपदा दिवशीं प्रारंभ होऊन शुक्ल नवमी पर्यंत श्रीदुर्गानवरात्र साजरा होऊन दशमी रोजीं विजयादशमीचा शिबिकोत्सव.

कार्तिक महिना –

शुक्ल द्वादशी रोजीं श्रीतुलसी विवाह, आणि **अमावास्या रोजीं जत्रा महोत्सव** शिबिकोत्सव, रथोत्सव, नाटकें, पेणीं यांकडून जागर, दीपस्तंभ प्रज्वलित करणें, पुराण, कीर्तन, नृत्यांगनांकडून गायन, नृत्य इत्यादि नानाविध आकर्षक कार्यक्रम.

माघ महिना –

अमावास्या रोजीं शिबिकोत्सव.

फाल्गुन महिना –

वद्य द्वितिया रोजीं होलिकोत्सव, गडे पडणें, सुंवारी वादन वगैरे परंपरेनें चालत आलेल्या वेळीं पध्दतीनुसार कार्यक्रम होत असतात.

प्रसाद–कौल

गोमंतकांतील इतर देवस्थानांप्रमाणें याही देवस्थानांत प्रसाद-कौल घेण्याची पध्दत आहे. वर्षाच्या कांहीं ठराविक दिवसांत ते प्रसाद-कौल घेत नसतात. या देवस्थानांत कोणत्या दिवशीं प्रसाद-कौल घेण्यांत येत नसतात त्या दिवसांची नोंद मुद्दाम खालीं दिली आहे. कारण, कोणताही इच्छूक गरजू त्या देवस्थानांत मुद्दाम प्रसाद-कौल घेण्यासाठीं जाऊन तेथें त्याला आज प्रसाद-कौल होत नाहींत असें कळल्यानंतर तो निराश होऊन त्याला आपल्या घरीं परतावें लागतें. असे प्रसंग अनुभवास येऊं नयेत म्हणूनच ज्या दिवशीं प्रसाद-कौल घेण्यास मिळत नाहींत ते दिवस खालीं दिलेले आहेत. श्रीधाकटी वनदेवी जी गर्भागारांत मुख्यासनावर विराजमान आहे, तिलाच म्हणजे त्याच मूर्तीस प्रसाद पूजा लावतात. ही प्रसाद पूजा करंबळी वृक्षाच्या पानांच्या तुकड्यांची लावतात, आणि हे पानाचे तुकडे एकंदर चवेचाळीस ठिकाणीं लावण्याची पध्दत असून ते खालील ठिकाणी लावतात.

मूर्तीबाहेर प्रभावळी आहेंत पैकीं एक प्रभावळ बाहेर व दुसरी आंत आहे.

बाहेरील प्रभावळीस मूर्तीच्या उजवीकडे ११ आणि डावीकडे ११

आंतील प्रभावळीस मूर्तीच्या उजवीकडे ५ आणि डावीकडे ५

बाहेरील मुठीस मूर्तीच्या उजवीकडे १ आणि डावीकडे १

आंतील मुठीस मूर्तीच्या उजवीकडे १ आणि डावीकडे १

उजवा कान १ डावा कान १

छाती उजवीकडे १ डावीकडे १

जांगा : उजव्या १ डाव्या १

कीर्तिमुख १

पूर्वास १

प्रसाद घेतां येत नाहींत ते दिवस असे :-

चैत्र -

शुक्ल ११ शी, पौर्णिमा, वद्य ११ शी, अमावास्या.

वैशाख -

शुक्ल ११ शी, पौर्णिमा, वद्य ११ शी, अमावास्या.

जेष्ठ -

शुक्ल ११ शी, पौर्णिमा, वद्य ११ शी, अमावास्या, कर्क संक्रांतीचा दिवस.

आषाढ -

शुक्ल ११ शी, पौर्णिमा, वद्य ११ शी, अमावास्या.

श्रावण -

प्रत्येक मंगळवार, शुक्ल ११ शी, पौर्णिमा, वद्य ११ शी, अमावास्या.

भाद्रपद -

शुक्ल ११ शी, पौर्णिमा, वद्य ११ शी, अमावास्या.

आश्विन -

शुक्ल प्रतिपदा घटस्थापनेपासून शुक्ल ११ शी पर्यंत, पौर्णिमा, वद्य ११ शी, अमावास्या.

कार्तिक -

शुक्ल ११ शी, पौर्णिमा, वद्य ११ शी, अमावास्या.

मार्गशीर्ष -

शुक्ल प्रतिपदा, द्वितिया, एकादशी, पौर्णिमा, वद्य ११ शी, अमावास्या.

पौष -

शुक्ल ११ शी, पौर्णिमा, वद्य ११ शी, अमावास्या, मकरसंक्रांतीचा दिवस.

माघ -

शुक्ल ११ शी, पौर्णिमा, वद्य ११ शी, अमावास्या.

फाल्गुन -

शुक्ल ११ शी, पौर्णिमा ते अमावास्या पर्यंत.

या शिवाय चंद्रग्रहण, सूर्यग्रहण येईल त्या दिवशीं प्रसाद घेत नाहींत. ज्या दिवशीं प्रसाद-कौल घेण्याची पध्दत आहे, त्या दिवशीं सकाळीं देवपूजा झाल्यापासून म्हणजे अंदाजें सकाळीं १० वाजल्यानंतर ते रात्रौं ८ वाजेपर्यंत प्रसाद-कौल घेण्यांत येतात.

१९

श्रीपरशुराम देवस्थान

पैंगीण

:

सप्तकोंकणांची अधिष्ठात्री मंगलदेवता प्रतिष्ठापना केलेलें
अखिल गोमंतकांतील एकमेव, पैंगीण येथे असलेले



श्रीपरशुराम, पैंगिणी

श्रीपरशुराम देवस्थान, पैंगिणी

श्रीपरशुराम देवस्थान

सत्व, रज व तम या त्रिगुणांनीं युक्त अशा परमेश्वरी शक्तींपैकी विश्वाचें पालन करणाऱ्या सात्विक शक्तींची देवता भगवान् श्रीविष्णु यांचा सहावा अवतार, कैलासपती श्रीशंकरांचा महान् श्रेष्ठ भक्त म्हणून शिव विष्णूचें अद्वैत, 'अग्रतश्चतुरो वेदः' व 'पृष्ठतःसशरं धनुः' अशी ज्याची दिव्य मूर्ति, म्हणून ब्राम्ह व क्षात्र या दोन तेजांचा सुन्दर संगम, सह्याद्रीच्या अपरान्त भागाचा अर्थात सप्त कोंकणांचा निर्माता, स्वयंनिर्मित भूमींत स्वयंप्रेरित जमातींचा संस्थापक, दुर्बलांचा रक्षणकर्ता इत्यादि विशिष्ट गुणामुळें पुराणप्रसिध्द श्रीपरशुराम, ही कोंकणाची अधिष्ठात्री मंगलदेवता होय. आणि त्या मंगल-देवतेचें देवालय कोंकणाच्या या गोमन्तकांत, एकमेव पैंगिण येथें फार सुप्रसिध्द, प्राचीन कालापासून आहे.

ऐतिहासिक दृष्टया श्रीपरशुरामाचा काळ कोणता ?

भारतीय विद्याभवन या संस्थेनें भारतीयांच्या दृष्टीकोनांतून भारताचा इतिहास प्रसिध्द केला आहे. त्याच्या प्रथम भागांत डॉ. पुसाळकर यांनी Historical Traditions या सदरांत प्रमुख व्यक्तींचे काल दिले आहेत, त्यांत परशुरामाचा काल इतिहास दृष्ट्या अडीच हजार वर्षे म्हणजे आजपासून साडेचार हजार वर्षापूर्वीचा ठरतो.

श्रीपरशुरामावताराची संक्षिप्त अत्यावश्यक माहिती

पवित्र नर्मदातीरावर भृगुकुलोत्पन्न जमदग्नी ऋषीच्या आश्रमांत श्रीपरशुरामाचा जन्म त्रेता आणि द्वापार यांच्या संधिकालांत वैशाख शुक्ल तृतीयेला म्हणजे अक्षय्य तृतीयेला झाला. याच कारणामुळें भारतीय पंचांगकर्त्यांनीं पंचांगांत प्रतिवर्षीं त्या तिथी दिवशीं 'श्रीपरशुराम जयंती' म्हणून नोंद दिलेली आढळते. उपनयनानंतर श्रीपरशुराम शालग्राम पर्वतावर जाऊन त्यानें काश्यपाकडून मंत्रोपदेश घेतला. त्याची धनुर्विद्येवर विशेष भक्ति होती. गंधमादन पर्वतावर जाऊन श्रीशंकराची आराधना करून सर्व प्रकारचीं अस्त्रें व परशुही त्याने मिळविला. या परशूचे वैशिष्ट्य म्हणजे त्याची धार कधींच बोथट होत नसे.

तो पृथ्वीचा सर्वसत्ताधीश झाला, म्हणून त्यानें तीनदा पृथ्वी प्रदक्षिणा करून अश्वमेध यज्ञ केला. यज्ञाच्या अखेरीस श्रीपरशुरामाने दक्षिणा म्हणून समस्तभूमीचें दानोदक कश्यपाच्या हातावर सोडलें. कश्यप परशुरामास म्हणाला कीं, तूं समस्तभूमी मला दान केल्यामुळें तुला येथे रहाण्याचा अधिकार नाही. कश्यपाचे म्हणणे ऐकून परशुराम महेंद्रगिरीवर वास्तव्याला गेला. तेथे तो रहात असतां, त्याने समुद्र हटवून स्वतःचे परशुरामक्षेत्र निर्माण केले. सह्याद्रीच्या उत्तर टोंकावर साल्हेरचा डोंगर आहे तेथे एक मध्ययुगीन गड असून त्याच्या एका टोंकावर श्रीपरशुरामाचे मंदिर आहे. मंदिराच्या उत्तरेस शंभर हात अंतरावर मनुष्याच्या पावलांच्या चौपट आकाराची दोन पावले खोदलेली आढळतात. बाण मारताना मनुष्य ज्या पवित्र्यात पावले ठेवील, त्या पवित्र्यातच त्याची योजना केलेली दिसते. या ठिकाणी उभा राहून परशुरामाने समुद्रावर बाण मारला व समुद्र मागे हटविला असे सांगतात. तसेच दक्षिणेस सह्याद्रीच्या अंतिम टोंकाला तिवितांकूर जिल्ह्यात महेंद्रगिरी नांवाचा डोंगर आहे. हे श्रीपरशुरामाचे कायमचे वासस्थान आहे असे मानतात. त्र्यंबकेश्वर येथील पर्वतावरून तसेच भीमांशंकरहून धनुष्यावर दोन दोन शर ठेवून श्रीपरशुरामाने भयंकर पाशुपतास्त्र समुद्रावर सोडले, त्यामुळे सहा योजने लांब समुद्र शुष्क होऊन तेवढा भूभाग मोकळा झाला. अशारीतीने भार्गवरामाने सात वेळा शरसंधान करून सात प्रदेश निर्माण केले. सह्याद्रीच्या पश्चिमेकडील याच प्रदेशाला अपरांत अशीही संज्ञा आहे. याबद्दल सह्याद्रीखंडात खालीलप्रमाणे उल्लेख सापडतो :–

"केरलाश्च तुलुंगाश्च तथा सौराष्ट्र वासिनः ॥ ४७ ॥
कोंकणाः करहाटाश्च करनाटाश्च बर्बराः ॥
इत्येते सप्तदेशा वै कोंकणाः परिकीर्तिताः ॥ ४८ ॥"

श्रीपरशुराम ही असामान्य शक्तीची अलौकिक व्यक्ति पुराणकालात होऊन गेली. श्रीपरशुरामाला श्रीविष्णूच्या अवतारात व सप्तचिरंजीवांत स्थान मिळाले आहे. अपरांतातील अनार्य व त्यांचे स्थानिक पुरोहित यांच्या आर्यीकरणाचा पायंडा श्रीपरशुरामानेच घातला. अपरांत प्रदेश कृषीयोग्य करून त्या ठिकाणी त्याने वसाहती स्थापन केल्या. गोमंतक ही वसाहत श्रीपरशुरामानेच वसविली. थोडक्यात सांगावयाचे झाल्यास श्रीपरशुरामाने संस्कृतीसंवर्धनाचे महान कार्य केले.

श्रीपरशुरामाने उत्तरेकडील त्रिहोत्र (तिरहुत) देशातून आपले आप्त दहा सारस्वत ब्राम्हण ऋषी गोमंतकात आणून गोमंतक पर्वताच्या आसमंतातील अष्टग्रामात अग्रहारें देऊन त्यांची स्थापना केली. श्रीपरशुरामकालीन जुना काल वगळून अर्वाचीन कालाचा विचार जरी लक्षात आणला, तरी कमींत कमी दोन हजार वर्षांपासून सारस्वत ब्राम्हणांची दक्षिणोत्तर भारतभूमींत ज्या ज्या मुख्य ठिकाणी विशेष वस्ती आहे, त्यांत गोमंतकामध्ये मडगांव, पणजी, म्हापसे, सांखळी, डिचोली, महाशैल, कुंकळ्ळी, फोंडा किंवा अन्त्रुज महाल, काणकोण, पेडर्णेमहाल, बारदेश प्रांत, पंचमहाल अशा ठिकाणी आहे. यापैकींच काणकोण तालुक्याच्या पैंगिण गावात श्रीपरशुराम देवस्थानची स्थापना आहे. या देवस्थानाची स्थापना, बरोबर कोणत्या काली झाली, याबद्दल जरी शके, मास, तिथी, वार, तारीख निश्चितपणे आज सांगणें कठीण आहे, तरी इतके मात्र सांगता येईल कीं, पैंगिण गांव वसविण्याचे काली, तेथे जी ग्रामसंस्था जिला आपण नंतरच्या चार शतकात कोमुनिदाद या नांवाने संबोधित आलो, त्या ग्रामसंस्थेच्या स्थापनाकालांतच, तेथे तें पैंगिण गांव ज्यांनी वसविले आणि पैंगिण ग्रामसंस्था ज्यांनी स्थापिली, त्यांनीच हे श्रीपरशुराम देवस्थान स्थापिले यांत संशय नाही. याचा एक पुरावा म्हणजे या देवस्थानचे महाजन म्हणजे त्या पैंगिण ग्राम संस्थेचे सभासद गौडसारस्वत ब्राम्हण ज्ञातीसमाजाचे वशिष्ठ गोत्राचे, ज्यांची उपनांवे "फळ" आणि "प्रभू" अशी आहेत आणि त्या ग्रामसंस्था किंवा कोमुनिदादीत "देसाई" आणि "गांवकार" या दोन गटांचा समावेश असून त्या पैंगिणकोमुनिदादीच्या उत्पन्नांतून या देवस्थानच्या खर्चासाठी पुरातन कालापासून २३१ रुपये ७ आणे ९ पै ही वार्षिक रक्कम देण्याची व्यवस्था अव्याहतपणें चालू आहे.

प्रमुख दैवत आणि परिवार दैवते

प्रमुख दैवत श्रीपरशुराम; त्याच्या समोरासमोर श्रीपुरुषोत्तम, डाव्या बाजूस श्रीक्षेत्रपाळ किंवा चक्र असून, पंचिष्ठ दैवतें खालीलप्रमाणे आहेत.

श्रीदुर्गादेवी, श्रीआदिपुरुष, श्रीवेताळ, श्रीनारायणदेव, श्रीभगवती देवी, श्रीशिवेश्वर, श्रीदुधेश्वर श्रीमोनादेवी, श्रीबाबर, श्रीकोळपुरुष, श्रीढुंगेश्वर.

देवस्थानचे वार्षिक उत्पन्न

या देवस्थानचें वार्षिक उत्पन्न कायम स्वरूपाचे म्हणजे, पैंगिण ग्रामसंस्था (कोमुनिदाद) जी रक्कम आपल्या उत्पन्नातून देत असते तें, आणि शिवाय लोलिये-पोळे ही ग्रामसंस्था तसेंच, सौंधेकर राजघराणे वार्षिक वतने देतात तें; परंतु या तीनहीकडून येणाऱ्या रकमेंतून देवस्थानचा वार्षिक खर्च भागणें पूर्णपणें अशक्यच. म्हणून या देवस्थानचे संस्थापक महाजन याकामी झीज सोसून सर्व खर्च करीत असतात.

पैंगिण येथील चित्तवेधक आणि अंगावर शहारे आणणारी "गड्यांची जत्रा"

श्रीपरशुराम या प्रमुख दैवताच्या पंचिष्ठ दैवतांपैकी जे एक श्रीवेताळ नांवाचे दैवत आहे त्या श्रीवेताळ देवालयासमोर दर तीन वर्षांनी, नियमितपणें एक मोठी सुप्रसिध्द जत्रा भरते जिला "गड्यांची

जत्रा" या नांवाने ओळखतात. पैंगिण, लोलयें आणि खरंगाळ या तीन गांवांचें श्रीवेताळ हे जागृत दैवत मानले जाते. आणि त्याला खूष करण्यासाठी "टका" आणि "**गड्यांची जत्रा**" अशा नांवाचे दोन वैशिष्ट्यपूर्ण उत्सव दर तीन वर्षांनी या श्रीवेताळ देवालयासमोर साजरे केले जातात. गड्यांच्या जत्रेच्या पूर्व वर्षी "टका" नांवाचा उत्सव करून त्याच्या दुसऱ्या वर्षी "गड्यांची जत्रा" याप्रमाणे क्रम असतो.

"टका नांवाचा उत्सव म्हणजे प्रत्यक्षात कार्यक्रम कोणता ?

भक्त मंडळी, सेवेकरी, महाजन इत्यादि सर्व लव्याजम्यासह लोलयें, पैंगीण, खरंगाळ आदि गांवातून हिंडून सर्व देवदेवतांना पाचारण करतात. श्रीवेताळ देवाच्या स्वारीत एका व्यक्तीस श्रीवेताळाचा काळ्या रंगाचा झगा, अलंकार, फेटा, फुलांच्या माळा, हातात जलवार देऊन श्री वेताळ देवाचें प्रतिक निर्माण करतात. त्याला अग्रभागी ठेवून त्याच्यामागें तरंगें, छत्र्या घेऊन वेळीप, गडे, वाजंत्री, सेवेकरी, भक्तगण, महाजन आणि इतर लोक जात असतात. प्रत्येक ठिकाणी टक्याचें वाचन केले जाते. टक्याचें वाचन म्हणजे असे की, त्या देवस्थानात फार पुरातन कालापासून एक लांबलचक कापडावर सुई व रंगीत सुत यांच्या सहाय्याने लिहिलेला म्हणजे काशिद्याप्रमाणे काढलेला एक लेख आहे, तो लेख वाचतात. हा लेख म्हणजे त्यात फक्त तीन ओळी मजकूर गूढ आणि सांकेतिक आहे. जिज्ञासू वाचकांच्या माहितीसाठी त्या मजकुराची कॉपी अशी ;–

पहिली ओळ :– श्री गडि खांब गडिंचा मेडा गडि अंक टंक सुंक चवर गादि गादियेवर पडगादि दावु पाच्छावु मलरावु स्थापना चारि सोन्याच्या वाटियेवरी रुपेचा गोळा बावन्न बंदाचा पाट परिमळा उत्धरती पांचसें सतियां

दुसरी ओळ :– ची महिमा काळि गादि पांढरी साती तिही भुवीची उपरि सुवर्णाचा कलश गुत्ती मसरांटी गजागण बेतुराणा बोलावून आणिला माणिकेसी खांब घातला बारा रायाचा झुंजार बारा राय खांडिचे खांडस्थळि के

तिसरी ओळ :– ले तेरावे राजाचा अंकणा घडि येक सिंह भैरपाळ शरणागता रक्षपाळ आले गेले याचा प्रतिपाळ उल्लंघुनि धाडिता बळी आश्रमांचा आंबला पोटिचे देती पण पाठिचे राखती शरणागता वज्रपंजरा श्रीशके १७४५ सु.

या "टक्या"तच शेवटी पुढीलप्रमाणे नोंद केलेली आहे :–

"श्रीसंस्थान गोकर्ण पर्तगाळी जीवोत्तम मठाधीश श्रीमत्परमपूज्य श्रीमदानंदतीर्थ श्रीपादवडेर स्वामी यांनी पैंगीण ग्रामचा खंडेराय वेताळ याचा नूतन टका करवून घेतला. याचा दाखलाही लोलयें, पैंगीण, खरंगाळ तीन ग्राम मौंजे प्रांत काणकोण राज्याधिकारी अर्ज सेर्जत मो कोमेंदांत यांचे कारकिर्दीत तसेंच फिरंगी विजरै यांचे राज्यात वास्तव्य असणार यांस सादर होणे बद्दल लिहिलें आहे. श्री शके १७४५ सुभानु सं. चैत्र कृ. २ या सोमवार."

टक्यावर असलेली ही नोंद लक्षात घेता मूळ प्राचीन टका जीर्ण झाल्यामुळे श्री शके १७४५ सुभानु संवत्सर चैत्र कृष्ण २ या सोमवार रोजी, गौड सारस्वत ब्राम्हणांच्या माध्व सांप्रदायाचे श्रीसंस्थान गोकर्ण पर्तगाळी मठाधिपती श्रीमदानंदतीर्थ श्रीपादवडेर स्वामी महाराजांनी नूतन टका करवून घेतला आहे याची माहिती मिळते. हा नूतन केलेला "टका" ६३ इंच लांब आणि ५५ इंच रुंद असून त्याच्या एका भागावर शिरोभागी तीन ओळीत लिहिलेला लेख, त्याखाली म्हणजे टक्याच्या मध्यभागी श्रीवेताळाचे चित्र आणि त्याच्या चारही बाजूंवर बऱ्याच आकृती काढण्यात आल्या आहेत. सध्या चालू असलेला टका हा शके १७४५ साली नूतन तयार करवून घेतला, म्हणजे त्या पूर्वीच्या जुन्या टक्याबरहुकूम करण्यात आला. पण, तो जुना टका केव्हा, कोणीं, कोठें केला किंवा करविला होता याचा उल्लेख किंवा माहिती मिळत नाही. –

“गड्यांची जत्रा” म्हणजे प्रत्यक्षात महत्वाचा कार्यक्रम कोणता ?

“गडे” म्हणजे काही पुरुष श्रीवेताळाच्या भक्तगणांपैकीच असतात. श्रध्दापूर्वक आचरण ठेवून त्या जत्रेच्या दिवशी उपवास केलेल्यांपैकी चार “गड्यांना” विधिपूर्वक स्नान घालण्यात येत असतानाच, श्रीवेताळाच्या टक्याचे वाचन केले जाते. स्नान आटोपताच या स्नान घातलेल्या गड्यांना श्रीवेताळाच्या मूर्तीसमोर पाठमोरे उभे करून त्यांच्या पाठीच्या चामडीला कमरेजवळ दोन-दोन “गरे” म्हणजे लोखंडी दाभणासारख्या जाड, एका टोकाकडे वाकविलेल्या सुया टोंचतात. या चार गड्यांत एक प्रमुख गडा ज्याला ‘म्हालगडा’ म्हणतात, त्याला आणखी एक ज्यादा गरा टोंचला जातो. चारही गड्यांस गरे टोंचून झाल्या-नंतर हे गडे श्रीवेताळासमोर नाचत असतात. श्रीवेताळाच्या देवालयासमोर अन्दाजे ४५ ते ५० फूट उंचीच्या दोन लांकडी खांबांवर एक माची आणि तेथे एक रहाट लांकडी बांधलेले असते. गरे टोंचून घेतलेले ते चार गडे हातात फुलांच्या माळा, गळ्यांत माळा, कपाळास कुंकवाचा बरा मोठा टिळा, एका हातात रुमाल, डोक्यास नंगी तरवार किंवा खड्ग अशा वेशात असतात. त्या चारही गड्यांस शिडीच्या सहाय्याने वर नेऊन त्या उंच खांबावरील रहाटास चार बाजूनी रहाटाच्या प्रत्येक बाजूस एक याप्रमाणे उपरण्यांच्या वस्त्रांनी घट्ट बांधतात आणि नंतर ते रहाट या चार गड्यांसह बराच वेळ गरगरां फिरवतात. त्या खांबाच्या मुळाशी अफाट जनसागर जमलेला असतो. या जनसागरांतील प्रत्येक इसमाचे हृदय धडधडायला लागते. ते रहाट फिरवतानाचे दृष्य पाहून तर अंगात थरथरू लागते, कांपरे भरते. “म्हालगडा” त्यावेळी खालील जनसमुदायांतील त्या त्या संबंधित गांवातील मानकऱ्यांस उद्देशून “लोलयेंकार आले ?” “पैंगीणकर आले ?” “खरगाळकार आले ?” “झालेसमाधान ?” असे विचारतो. लगेच त्याला संबंधित लोकांकडून होकार मिळाल्यानंतर आणखी एकदां ते रहाट फिरवून त्या गड्यांस खाली उतरविले जाते, आणि परत त्याच रहाटास गडे बांधलेल्या प्रत्येक जागीं एक, याप्रमाणे चार बाजूस चार कोंबडे बांधून ते रहाट कोंबड्यांसह उंचावरून, या रहाटाच्या खालीं, दोन्हीं लाकडी खांबाजवळ रहाटाचा एक फार मोठा दगड आहे, त्या दगडावर फेकून दिले जाते. म्हणजे त्या ग्रामदैवतास संतुष्ट करण्यासाठी रहाटास चार कोंबडे बांधून त्यांचा बळी देण्यात येतो असे मानतात. प्राचीन काली चारही गड्यांसह तो रहाट त्या (दगडावर) शिळेवर टाकून नरबळी देत असावे असे वाटते.

मुद्दाम लक्षात घेण्यासारखी फार महत्त्वाची गोष्ट म्हणजे त्या गड्यांच्या बायका (पत्नी) त्या जत्रेस येत नसतात आणि तुलसी-वृंदावनात आपली नथ (नाकांत घालण्याचा सौभाग्याचा अलंकार) ठेवून आपला पती सुखरूप स्वगृही परत येईपर्यंत तुलशी-वृंदावनाजवळ बसून राहून देवाची आराधना करतात.

गड्यांच्या जत्रेसंबंधीं प्राचीन कालापासून परंपरेने मुखोद्गत झालेली आख्यायिका.

आख्यायिका, दंतकथा,, बाजूला सारून खरा इतिहास लिहायचा तर अस्सल साधने जमवून निष्कर्ष काढले पाहिजेत. आणि या आख्यायिका आणि दंतकथा इतिहास कशा बनतात याकडेही बारकाईने लक्ष देऊन अभ्यासले पाहिजे. पैंगीण येथील “गड्यांची जत्रा” संबंधीची आख्यायिका जाणून घेऊन यापूर्वी उल्लेख केलेल्या टक्यांतील तीन ओळीत असलेला मजकूर गूढ व सांकेतिक भाषेत असल्यामुळे त्याचा उलगडा व संशोधन झाले, तरच त्या गड्यांच्या जत्रेचा उगम व कारणे प्रकाशात येऊं शकणे शक्य आहे. यादृष्टीने सुप्रसिध्द संशोधक डॉ. वि. रा. प्रभू देसाई यांनी ‘पंचयग्राम’ (पैंगीण) येथील वेताळाचा ‘टका’ या शीर्षकाखाली एक लेख नागपूर येथील हिंदु धर्म संस्कृती मंदिराने प्रसिध्द केलेल्या “स्मृतिगंध” नावाच्या एका पुस्तकांत लिहून प्रसिध्द झाल्याची माहिती मिळाली. पण, तो मूळ लेख अद्याप वाचावयास मिळाला नाही. डॉ. प्रभू देसाई नामांकित विद्वान संशोधक असल्यामुळे त्यांनी त्या लेखात टक्यांतील त्या गूढ आणि सांकेतिक भाषेत असलेल्या मजकुराचा उलगडा केला असणे शक्य आहे. पण, त्याबद्दल मला खात्रीपूर्वक सांगवत नाही; परंतु वाचकांस माहिती मिळावी म्हणून ती आख्यायिका कोणती याची चौकशी करता खालीलप्रमाणे माहिती मिळाली.

“श्रीवेताळ हा पैंगीण गांवांत तेराव्या शतकात येऊन तेथे स्थायिक झाला. त्यापूर्वी त्याने बारा राज्यें पादाक्रांत केली होती. पैंगीण हे गांव त्याचे तेरावे राज्य. तो या गांवी आल्यानंतर पैंगीण गांवचा नागू

वेळीप, (ज्याला नागा जाण असेही म्हणत) नांवाच्या कुणब्याने त्या वेताळाचे अचाट सामर्थ्य जाणून हा वेताळ आतां पैंगीण गांवही पादाक्रांत करणार ही त्याला कल्पना आली, आणि आपण काही तरी हिकमत लढवून युक्ती-प्रयुक्ती आणि कौशल्याने त्याचा बंदोबस्त केला पाहिजे, हे मनात आणून त्याच्याकडे गोड गोड भाषेत बोलून त्याला भुरळ पाडली, आणि त्याच्याकडून एकदाचे अभयतेचे वचन घेतले. अभयतेचें वचन देण्यासाठी त्या वचनाच्या मोबदल्यात वेताळाने नागू वेळीप याजकडे पोटातील गर्भ, दोन पायांचा प्राणी एक, आणि दहा पायांचा प्राणी एक आपणास मिळावा अशी अट घातली. नागू वेळीप हा इसम मोठा हुशार, मुत्सद्दी आणि तर्कटी असावा असे वाटतें. वेताळ पूर्णपणे अभयतेचे वचन देवून झाला याची त्या नागू वेळीपनें खात्री करवून घेऊन, त्या वेताळाला आतां पोटातील गर्भाऐवजी पोफळीच्या झाडाचा गर्भ, दोन पायांचा प्राणी म्हणून एक कोंबडा आणि दहा पायांचा प्राणी म्हणून एक खेकडा दिला !" या नागू वेळीपाने वेताळास त्याच्याकडून अभयतेचे वचन मिळविण्यासाठी, 'गड्यांच्या जत्रे' चें आश्वासन दिले असावे कारण, त्या जत्रेचा जो कार्यक्रम व त्याची माहिती वर दिली आहे त्यांत रहाटास चार "गडे" बांधून ते रहाट गरगरां फिरवून एका शिळेवर भिरकावून देत व अशा रितीनें त्या चार गडे इसमांचा प्रत्यक्षात नरबळी प्राचीन काली देण्याची पध्दत असावी. परंतु, आतां त्या नरबळींऐवजी, कोंबड्यांचा बळी देत असल्याचें दिसते. त्या वेताळाला भुलवून अभयतेचें वचन मिळविणाऱ्या त्या नागू वेळीप उर्फ नाना जाण या फार हुशार आणि मुत्सद्दीचें स्मारक गांवकऱ्यांनी उभारले आणि तें स्मारक त्या श्रीवेताळ देवालयाजवळच आहे.

वरील आख्यायिकेंत तो वेताळ पैंगीण गावांत तेराव्या शतकांत आला, व तेथें तो येण्यापूर्वी त्याने बारा राज्यें पादाक्रांत केली होती व पैंगीण हे तेरावें राज्य तो पादाक्रांत करू पाहात होता, याबद्दल म्हणजे तेराव्या शतकांत वेताळ तेथें येऊन स्थायिक झाला हे अनुमान कशावरून काढण्यात आले ? याबद्दल ती आख्यायिका सांगणारे कांहीच सांगू शकत नाहीत. श्रीपरशुराम देवस्थानांतील पंचिष्ठ दैवतांत श्रीवेताळ देवाची गणना आहे. म्हणजे हें देवस्थान तेराव्या शतकांत स्थापन झाले असावें म्हणून कसें मानावें ? पैंगीण गांव आणि त्या गांवची ग्राम-संस्था तेराव्या शतकापूर्वी खचित असल्याशिवाय, त्या गांवकऱ्यांनी आपल्या गांवात श्रीपरशुराम देवस्थान स्थापन करून त्या ग्राम संस्थेच्या उत्पन्नातून या देवस्थानचा वार्षिक खर्च कसा करणे शक्य आहे ? हे असे आणि याच्या उलटही प्रश्न उद्‌भवूं शकतात-कसे ही असो. त्या गड्यांच्या जत्रेला फार प्राचीन परंपरा आहे हे सिध्द होतें आणि त्या जत्रेचा संबंध त्या टका नामक लेखांतील मजकुराशीं आहे यांत संशय दिसत नाही.

श्रीपरशुराम देवस्थानची घटना नियमावली, देवस्थानांच्या कायद्यानुसार सरकारने पोर्तारीय नंबर १०१६ ता. ७ मे १९३० या हुकुमानें मंजूर केली असून ती गव्हर्नमेंट ग्यॅझेट-बोलेतीं ओफीसियाल नंबर ९० ता. ११ नवंबर १९३० च्या अंकात प्रसिध्द झालेली आढळते.

शेवटी, येथे मुद्दाम नमूद करून ठेवण्यासारखी गोष्ट म्हणजे अखिल गोमंतकात, प्राचीन कालापासून आजतागायत, काणकोण तालुक्यातील पैंगीण गांवात असलेल्या श्रीपरशुराम देवालयाशिवाय इतर कोठेंच दुसरीकडे श्रीपरशुरामाचे देवालय असल्याचे ऐकिवात नाही. पोर्तुगीज लोकांनी गोमंतकात प्रवेश केल्यानंतर इ. सनाच्या १६ व्या शतकात जुन्या काबिजादींतील तिसवाडी, सासष्टी आणि बारदेश या तीन तालुक्यांतील शेंकडों देवस्थाने जमीनदोस्त केलेल्यांची यादी गोवा सरकारच्या ऐतिहासिक दप्तरखान्यांतील कै. वा. डॉ. पांडुरंगबाब शेणवीं पिसुर्लेकर यांनी प्रसिध्द केलेली आहे. ती यादी वाचल्यानंतर त्यातही गोमंतकात कोणत्याच गांवी श्रीपरशुरामाचे देवालय असल्याचा उल्लेख नाही. प्राचीन कालीं काणकोण तालुक्याच्या पैंगीण गांवातील वसिष्ठ गोत्राच्या गौड सारस्वत ब्राम्हणांनी सप्तकोंकणांच्या अधिष्ठात्री मंगलदेवता श्रीपरशुरामाची सुप्रतिष्ठापना आपल्या गावांत करून देवालय बांधले ही घटना ऐतिहासिक आणि सांस्कृतिक दृष्ट्या फार महत्वाची, स्वाभिमानत्वाची द्योतक खचितच आहे. आणि म्हणून त्या देवस्थानच्या प्राचीन संस्थापकांच्या पुण्यस्मृतीस माझे विनम्र अभिवादन.

२०

श्रीदेवी महामाया काळंबा

अथवा

श्रीदेवी कालिका देवस्थान

कांसरपाल – लाठंबारसे

श्रीदेवी कालिका, कांसरपाल

श्रीदेवी महामाया काळंबा अथवा श्रीदेवी कालिका देवस्थान

कांसरपाल – लाठंबारसें – डिचोली

अखिल गोमंतकांत जीं अनेक दैवतें आणि त्यांचीं देवालयें ठिकठिकाणीं आहेत, त्यांत अशींही देवालयें आहेत कीं तें देवालय खास विशिष्ट फक्त एकाच ज्ञातीसमाजाचेंच आहे. या प्रमाणें गोमंतकांत नानाविध ज्ञाती समाजांचीं जीं देवालयें आढळतात त्यांत आर्य ब्रम्हवृंद दैवज्ञ सुवर्ण काम करणारे सोनार यांचेंच खास असें स्पेशल देवालय डिचोली तालुक्याच्या लाठंबारसें गावांत संस्थान कांसरपाल येथील श्रीदेवी महामाया काळंबा अथवा श्रीदेवीकालिका देवीचें देवालय असून या देवालयाची स्थापना कालाची नक्की तिथी, महिना, शके जरी स्पष्ट पुराव्या अभावीं देतां येणें आज अशक्य असलें, तरी निश्चितपणें खचित सांगतां येईल कीं, शके १२५८ श्रीनल संवत्सर चैत्र महिन्यापूर्वीं म्हणजे आजपासून पांचशें एकावन्न वर्षापूर्वी बराच काल हें श्रीकालिका देवीचें दैवत आणि तिचें देवालय कांसरपाल येथें होतें याचा निसंधिग्ध पुरावा आहे.

म्हापसें-गोवा येथें एका कांसार कुटुंबाच्या घरांत, संस्कृत आणि मराठी भाषेंत मजकूर असलेले तांब्याचे तीन पत्रे (ताम्रपट) असल्याची माहिती ब्रिटीश लष्कराचे मेजर श्री. जॉर्ज ले ग्रां जाकोब (George Le Grand Jacob) यांनी इ. स. १८५० सालीं प्रथम उजेडांत आणली. कोंकणचे विद्वान इतिहास संशोधक श्री. बांबर्डेकर यांनींही ह्या ताम्रपटांतील मजकूर इ. स. १८५५ सालीं प्रसिध्द केला. हा मजकूर गोव्याच्या इतिहासाचा अभ्यास करणारांनीं लक्षांत घेण्यासारखा आहे. या ताम्रपटांतील मजकुराचा सारांश असा :–

काश्यप गोत्राचा जान्हवी नदीच्या कांठावर रहाणारा देवशर्मा नांवाचा ब्राम्हण, मुसलमानांच्या आक्रमणामुळें पळून कोंकणांत आला, व इंदुला गावांत स्थापित झाला. कोंकणच्या राजानें त्याला सन्मानित केलें. कांहीं कालानंतर श्रीकणकेश्वर श्रीदेव शंकराच्या कृपेनें त्या ब्राम्हणास राज्यप्राप्ती झाली आणि संततीही झाली. ही संतती आपल्या शौर्यामुळें व गुणांमुळें प्रीसध्दीस आली. या संततीपैंकीं जगदेवाला उगी नांवाचा मुलगा झाला. त्याला माइनदेव नांवाचा मुलगा जन्मास आला. या मुलानें आपल्या राज्याचें शत्रूराजांपासून संरक्षण केलें आणि कोंकणच्या सिंहासनावर विजयादित्य राजाच्या श्रीमंत्रीभुवपमल्ल नांवाच्या मुलाला प्रस्थापित केलें. श्रीमन्मंग महिपतीला भैरवभूपती नांवाचा मुलगा झाला. या मुलानें कोंकणच्या दक्षिण समुद्र किनाऱ्यावर शांतता प्रस्थापित केली. भैरवभूपतीनंतर कांयू देवाचा मुलगा श्रीशंकराची उपासना करून कांसरपालला गेला. आणि कांसार महाजनांच्या देखत "वरडें" नांवाची नमशी श्रीनल संवत्सर शके १२५८ चैत्र महिन्यांत दिली.

रूप शेट्टीला लक्ष्मण शेट्टी नांवाचा मुलगा श्रीकालिका देवीच्या कृपेनें जन्मला. त्याला हा ताम्रपट देण्यांत आला. ह्या गांवाच्या सीमा खालील प्रमाणें आहेत :

पूर्वेस चिपोली, उत्तरेस चांदेल, दक्षिणेस वझरी, आणि पश्चिमेस बारखंड.

वरील मजकुरावरून इतकें तरी लक्षांत येण्यास मदत होते कीं, शके १२५८ श्रीनल संवत्सराच्या चैत्र मासांत लिहिलेल्या किंवा कोरलेल्या एका ताम्रपटांत रूप शेट्टीला लक्ष्मण शेट्टी नांवाचा मुलगा श्रीकालिका देवीच्या कृपेनें जन्मला असा उल्लेख आहे. तसेंच, कांयू देवाचा मुलगा कांसरपालला गेला आणि "वरडें" नांवाची नमशी त्या शके १२५८ साली दिली. म्हणजे त्या श्रीशके १२५८ पूर्वीं, श्रीकालिकादेवी आणि कांसरपाल गांव यांचा उल्लेख त्या ताम्रपटांत आढळल्यामुळें त्या दैवताची, देवालयाची आणि कांसरपाल स्थलाची प्राचीनता शके १२५८ सालापूर्वींची तरी खचित आहे यांत संशय नाही.

वरील ताम्रपट आणि त्यांतील मजकूर येथें देण्याचें एकमेव कारण फक्त देवालयाची प्राचीनता दाखविण्यासाठींच असून, या शिवाय दुसरा कसलाच हेतू नाहीं. कारण, या गांवाचें नांव कासर + पाल = तलाव असलेलें शहर असें आहे.

इसवी सनाच्या सोळाव्या शतकांत तत्कालीन राज्यकर्ते पोर्तुगीज फिरंगी खिस्ती धर्मीय गोमंतकांत खिस्तीकरणाची मोहीम सुरू करून हिंदू धर्मीय लोकांचा बळजबरीनें असह्य छळ चालविला, त्यांच्या देवालयांचा विध्वंस केला, मूर्तीभंजन केलें खरें. परंतु या खिस्ती करण्याच्या मोहिमेंत तिसवाडी, सासष्टी आणि बारदेस हे तीन तालुके शिवाय त्यांकडे भतग्राम वगैरे त्यांच्या तत्कालीन राज्यहद्दींत सांपडले नाहींत. डिचोली, सत्तरी हे तालुके पोर्तुगिजांच्या कबज्यांत आले ते इ. सन १७८१ सालीं व कांसरपाल डिचोली तालुक्यांत असल्यामुळें तेथें खिस्तीकरणाची मोहीम प्रवेश करूं शकली नाहीं व ती साधारणपणे इ. स. १६०० साल पर्यंत नामशेष झाली होती म्हटल्यास चालेल. अशा परिस्थितीमुळें कासरपाल येथील श्रीकालिका देवस्थानला त्या खिस्ती करणाची झळ कशीच पोंहोचणें अशक्यच होतें. आणि तसें झालें नसतें तर तिसवाडी, सासष्टी आणि बारदेस या तीन तालुक्यांतील देवालयांची जी स्थिती झाली आणि खिस्तीकरणाच्या भयामुळे त्या देवालयांचे स्थलांतर तत्कालीन पोर्तुगीज राज्य सर-हद्दीबाहेर परकीय राज्यांत करावें लागलें, त्याच प्रमाणें श्रीकालिका देवस्थानचें स्थलांतर करणें अपरिहार्यच ठरलें असते. पोर्तुगीज सत्तेच्या काळांत अनेक देवालयांचीं स्थित्यंतरें झालीं. परंतु, श्रीकालिका देवस्थानचें पांचशें वर्षापूर्व कालचें वास्तुशिल्प आणि पाषाणी मूर्ती अजूनही आहे त्याच स्थितींत सुव्यवस्थित आणि सुरक्षित आहे हें मुद्दाम लक्षांत घेतलें पाहिजे. हें देवस्थान फक्त आर्य ब्रम्हवृंद दैवज्ञ सुवर्ण काम करणारे सोनार ज्ञाती समाजाचेंच खास असें स्पेशल असल्याचें प्रारंभीं सांगितलें आहे तरी या देवस्थानांत हिंदूधर्मीय कोणासही मज्जाव कधींच नव्हता, आणि आज ही नाहीं. सर्वसामान्य प्रचलित धार्मिक निर्बंधांशिवाय दुसरें कसलेंच बंधन नाहीं. देवस्थान धर्म-कार्याच्या दृष्टीनें पूर्णपणें सार्वजनिक आहे. ज्या प्रमाणें गोमंतकांतील इतर देवालयें जशीं हिंदू धर्मीयांस कोणासही मज्जाव कधींच नव्हता आणि आजही नाहीं, अशा प्रकारचीं आहेत, त्याच प्रमाणें याही देवस्थान व्यवस्थापनांत अशी कायदेशीरपणें सोय केलेली आहे कीं, इतर ज्ञातीचे हिंदू यांना देवालयाच्या गर्भागाराबाहेर आपलीं भजनी कृत्यें करण्यास, त्याच प्रमाणें देवीस हरएक नजराणे देण्यास कोणत्याच तऱ्हेची मनाई नाहीं. मात्र त्यांना महाजन मानण्याचा अथवा देवालयाच्या व्यवस्थेंत समा-विष्ट होण्याचा हक्क मिळणार नाहीं. (पहा :- त्या देवस्थानची घटना नियमावली नियम दुसरा, पोटकलम क). आणि अशी सोय आणि व्यवस्था गोमंतकांतील इतर ज्ञाती समाजांची जीं खास वेगवेगळीं स्पेशल देवालयें आहेत, त्याही देवालयांच्या बाबतींत, त्या त्या संबंधित ज्ञाती समाजानें, आपआपल्या देवस्थानाच्या घटना नियमावलींत कायदेशीरपणें केल्याचें अभ्यासूंस पहावयास मिळतें.

पौराणिक माहिती

भरत खंडांत श्रीदेवीचीं अनेक प्रसिध्द श्रध्दास्थानें आहेत. या पुण्यभूमी आणि देवभूमी गोमं-तकांतही थोडीं थोडकीं श्रीदेवीचीं सुप्रसिध्द श्रध्दास्थानें नाहीत असे नाही. पुष्कळच आणि नामांकित जाज्वल्य अशीं श्रीदेवीची स्थानें गोमंतकांत खचितच आहेत. श्रीकालिका देवीचीं दोन देवालयें खुद्द या डिचोली तालुक्यांत आहेत. पैकीं एक कासरपाल येथें आणि दुसरें वन या गावांत आहे.
आतां कालिका संबंधीं पुराणांत कोठें काय माहिती मिळते ती जाणून घेण्याचा प्रयत्न करूं.

महाभारतांत असा उल्लेख आढळतो कीं, कालिका ही दक्षप्रजापतीची कन्या आणि कश्यप ऋषीची पत्नी. विष्णु पुराण म्हणतें कीं, कालिका व तिची बहीण पुलोमा या दोघींना कश्यपापासून साठ हजार दानव झाले, कालिकेपासून ज्यांची उत्पत्ती झाली, ते कालकेय अथवा कालखंज दैत्य या नांवाने प्रसिध्द झाले. आणि पुलोमा पासून जे उत्पन्न झाले, त्यांना पौलमा असें नांव मिळालें. (डॉसन पृष्ट १४०). या दोघांचेंही मूळ स्थान इराण, अगर त्याच्या आसपासच्या भागांत होते. आणि रावणाचे पूर्वजही त्याच भागांत होते. या संबंधांत जास्त संशोधन केल्यास इराणी लोकांचा देव असूर आणि आर्यांचे हे असूर यांचा संबंध

काय हें प्रस्थापित करतां येईल. याच कालिकेला कोण वैश्वानर दानवाची कन्या असेंही मानतात, तर तिला मारीच असूराची पत्नी म्हणून ओळखतात. पण, हें खरें वाटत नाहीं. कारण, कश्यपाचें दुसरें एक नांव मारिच ऋषी असें असल्यानें ती कश्यपाचीच पत्नी होय. मारीच नांवामुळें हा घोटाळा झाला असावा (चित्राव, प्राचीन चरित्र कोश पृष्ट ११७).

कालिमठ हें पीठ हिमालयाच्या पर्वत राजीवर केदारनाथाच्या आसपास मंदाकिनी नदीच्या तीरावर आहे. समुद्र सपाटीपासून सुमारें नऊ सहस्त्र फूट उंचावर भारतामधील हें प्रमुख शक्तिपीठ आहे. येथील मंदिरांत महाकाली, महालक्ष्मी व महासरस्वतीच्या मूर्ती असून देवालय खडकाळ भागांत आहे व तें बरेंच विस्तीर्ण आहे. या ठिकाणीं देवांनीं तप करून महाकालिका प्रसन्न करून घेतल्यावर तिनें रक्तबीज दैत्याचा नाश केला. येथें चैत्र ते आश्विन नवरात्रांमध्यें यात्रा भरते आणि यज्ञ-कुंडामध्यें स-पाद आहुतीनें हवन केलें जातें. रक्तबीज वधाच्या कारणामुळें या ठिकाणाला कालिमठ हें नांव आलेलें आहे. या रक्तबीज वधाच्या प्रसंगीं महाकाली उत्पन्न झाली आणि तिनें दैत्याचा नाश कोणत्या प्रकारानें होईल हें सांगून देवांना मार्गदर्शन केलें. तिच्यामुळें या ठिकाणाला कालीमठ हें नांव प्राप्त आहे. महाकालीची मूर्ती शवारूढ आहे. कालीमठापासून दोन मैलांवर कोटिमहेश्वरी देवीचें स्थान आहे. या ठिकाणीं यात्रिक आपल्या पितरांना पिंडदान व तर्पण करतात. ("कल्याण", शक्ति-अंक पृष्ट ६७४). वरील माहिती आदिशक्तीचें विश्वस्वरूप (देवी कोश) खंड पहिला, पृष्ट २७९-२८० मध्यें आहे. शिर्षक : कालिका (कालीमठ) –

श्रीदुर्गा सप्तशती कथासार मध्ये श्रीकालिकेच्या जन्माची कथा दिली आहे ती अशी

शंभर वर्षांच्या लढाईत महिषासूर दैत्यानें देवांचा पराभव केल्यानंतर पराजित देव ब्रम्हदेवासह भगवान श्रीशंकर व श्रीविष्णूकडे जाऊन त्यानीं ही हकीकत त्यांना कळविली. ते त्याना शरण गेले व महिषासुराच्या वधाची विनंती केली. ही वार्ता ऐकून श्रीशंकर व श्रीविष्णू संतप्त झाले. विष्णूच्या मुखां-तून, शंकराच्या व इतर देवांच्या शरीरांतून तेज निघून तें एकीत्रत झालें. त्याचें रूपांतर एका रूपवान स्वरूप सुंदरीमध्यें झालें. शंकराच्या तेजानें तिचें मुख उत्पन्न झालें. अग्नीच्या तेजानें डोळे, वायूच्या तेजानें कान, प्रजापतीच्या तेजानें दांत, संधेच्या तेजानें भुवया, यमाच्या तेजानें केंस, चंद्राच्या तेजानें चंद्राप्रमाणें सुंदर गोलाकार स्तन, विष्णूच्या तेजानें भुजा, इंद्राच्या तेजानें शरिराचा मध्यभाग, कुबेराच्या तेजानें नासिका, पृथ्वीच्या तेजानें कुल्ले, वरुणाच्या तेजानें पोटऱ्या, व मांड्या सूर्याच्या तेजानें बोटें व ब्रम्हदेवाच्या तेजानें तळवे बनले. इतरही अवयवांनिरनिराळ्या देवतांच्या तेजापासून बनले.

नंतर शंकरानें ह्या कल्याणमयी कालिका देवीला त्रिशूळ दिला. विष्णूनें चक्र, ब्रम्हदेवानें कमंडलू, इंद्राने वज्र, यमानें दंड, प्रजापतीनें स्फटिकांची माळ, वरुणानें शंख व पाश, अग्नीनें शक्ती, वायूनें धनुष्यबाण, सूर्यानें तेज, व काळानें ढाल व तलवार दिली. देवीचें वाहन सिंह हिमालयानें दिला.

श्रीकालिकेच्या इच्छामात्रेंकरून रणभूमीवर हजारों गण निर्माण झाले. त्यांच्या सहाय्यानें देवीनें दैत्यांचा नाश केला. महिषासुराचे सेनापती चिक्षूर, चामर, उदग्र, कचूमर, बाष्कल, ताम्र, अंधक, उग्रवीर्य, महाहनु, बिडाल, दुर्धर, दुर्मुख ह्यांना ठार केले. या नंतर महिषासूर रेड्याच्या रूपानें रणां-गणांतील देवीच्या सैन्यावर हल्ला करूं लागला. शिंगावर मोठमोठे पर्वत घेऊन महिषासूर रेडा ते फेकू लागला. हें पाहातांच श्रीकालिकेनें आपल्या पाशानें त्याला बांधलें. त्याक्षणीं, त्यानें सिंहाचें रूप घेतलें. तो हल्ला करणार इतक्यांत त्याचें मस्तक उडविण्यास देवी उद्युक्त झाली. त्या क्षणीं त्यानें ढाल-तलवारीसहित मानवी रूप घेतलें. देवीनें बाणांचा वर्षाव करतांच, त्यानें हत्तीचें रूप घेतलें. देवीनें त्याची सोंड कापली तेव्हां त्यानें पुन्हा रेड्याचें रूप धारण केलें. अशा प्रकारें त्याला खेळवून देवीनें त्याचा वध केला. देवीच्या हातानें मृत्यू आल्यानें त्याला सायुज्य मुक्ती मिळाली."

कालिका म्हणजे काली. कालाचा प्रारंभ तिच्यापासून झाला म्हणून ती काली. कालिका किंवा काली हें नांव उच्चारतांच, आपल्या डोळ्यांसमोर उभी रहाते ती अष्टभुजा म्हणजे जिला आठ हात आहेत

ती, जीभ बाहेर आलेली, राक्षसाचें शीर हातांत धरलेली, गळ्यांत रुंडमाळ घातलेली अतिशय उग्र चेहऱ्याची मूर्ती जशी कलकत्यांतील कालीघाटावर काली मंदिरांतील श्रीकालिमाता आहे, त्या अक्राळ विक्राळ स्वरूपाची. परंतु, श्रीकालिका स्तोत्रांत तिच्या उग्र स्वरूपाचें वर्णन केलेलें असलें तरी, तें गोमंतकांत असलेल्या श्रीकालिका देवीस तें लागू पडत नाहीं. कारण, ती श्रीकालिका देवी गोमंतकांत आल्यावर शांत सौम्य बनली असून, तिचे कमल नयन, चंद्रवदन, असें स्वरूप भक्तगणांस पहाण्याचें भाग्य लाभलेलें स्पष्टपणें दिसतें. गोमंतकांतील या कासरपाल देवस्थानांत जी श्रीकालिका मूर्ती गर्भागारांत मुख्यासनावर दिसते, त्या श्रीकालिका देवीच्या चेहऱ्यावरील भाव एवढे सुस्पष्ट, उठावदार आणि जिवंत दिसतात कीं, तिच्या मूर्तिमंत जागृततेची मनोमन खात्री कोणासही पटते. विशेषेंकरून माध्यान्हकालीं महापूजेनंतर या मूर्तीस श्रृंगार करून तिच्या जवळ कांचोळी मूर्ती म्हणजे मूळ पीठावर असलेल्या पाषाणी मूर्तीसच रौप्य कवच घालून भरजरी शालू परिधान करून मौलिक दागदागिने, सुवासिक फुलांचे रंगीबेरंगी हार घालून महाआरती केल्यानंतर ही मूर्ती पहाणारास, असा आभास होतो कीं, श्रीकालिका देवी जणूं काय आपणाकडे पाहात असून ती प्रसन्न मुद्रेनें आपणास "तुझ्या सर्व शुभ मनकामना खचित पूर्ण होतील तूं निश्चिंत रहा" असा शुभाशीर्वाद आणि अभयवचन देत आहे. आणि खरोखरच श्रीदेवीवर दृढ अढळ श्रध्दा आणि निष्ठा असलेल्या भक्तास तसा प्रत्यय येतो.

कासरपाल येथील श्रीकालिका देवालयाकडे जाणारास मार्गदर्शन

पणजी या गोव्याच्या राजधानींतून कासरपाल येथें श्रीकालिका देवालयाकडे जाण्यासाठीं गोवा-मुंबई या हमरस्त्यावरून जाण्यास साधारणतः अंतर चाळीस किलोमिटर आहे. गोव्याच्या सरहद्दीवरील दोडामार्ग या गावांपासून दोन किलोमिटर अंतरावर मुंबई-गोवा हमरस्त्यावर श्रीकालिका देवस्थान असून या रस्त्यापासून बसस्टॉपजवळून एक डांबरी रस्ता साळ या गावांकडे जातो, त्या रस्त्यानें एक फर्लांग वाटचाल करून डाव्या बाजूकडील जाणाऱ्या डांबरी रस्त्यानें गेल्याबरोबर, अवघ्या पांच मिनिटांत आपण श्रीकालिका देवालयाच्या पायथ्याशीं पोंचतों. बस स्टॉप पासून साधारणपणें पंचवीस पावलें पुढें गेल्यावर देवालयाच्या भव्य प्रवेशद्वारासमोर दुसरा डांबरी रस्ता दिसतो. प्रवेश द्वारांतून या डांबरी रस्त्यावरून थेट देवालयाकडे जातां येतें, आणि हाच रस्ता विशेष रहदारीचा आहे. हें भव्य प्रवेश महाद्वार मोठ्या कल्पक चातुर्यानें बांधलेलें दिसतें. या प्रवेशद्वाराची कमान दोन बाजूंस जे दोन हत्ती आहेत, त्यांनीं उचलून धरलेली आहे. या कमानीवर उर्ध्व भागीं आसनस्थ असलेल्या ऋषीमुनींनी डोळे, कान आणि तोंड आपआपल्या हातांनीं झांकलेलें दिसतें जणूं काय त्या प्रवेशद्वारांतून आंत प्रवेश करणाऱ्या इसमास आगाऊ सल्ला देतात कीं, बाबा रे ! डोळे असून वाईट गोष्टी पाहूं नको. कान असून वाईट गोष्टी ऐकूं नको. आणि तोंड असून वाईट गोष्टी बोलूं नको. एका प्रकारें शहाण्या आणि विचारी माणसानें हा धोक्याचा इशारा ऋषीमुनींनी आगाऊ दिल्यामुळे त्या ऋषी-मुनींचे आणि ती कमान उभारणाऱ्या कल्पक हुशार चतुर स्थापत्य कलाकाराचें अभिनंदन करून आभार मानावयास हवेंतच.

ह्या प्रवेशद्वारांतून एक फर्लांगभर लांबीचा डांबरी रस्ता अगदीं सरळ उंचवट्यावर गेलेला दिसतो आणि त्याच्या शेवटीं देवालयाचा घुमट वर आलेला दिसतो. हें देवालय जरासें चढावावर आहे खरें, पण एकदम टेकडी किंवा डोंगर असें समजण्याचें कारण नाहीं.

देवालयाच्या दिशेनें आपण वाटचाल करूं लागतांच थोडेसें अंतर चालून गेल्यावर वाटेंत आपणास छोटासा पूल बांधलेला आणि त्या खालीं एक ओढा वाहत असल्याचा आढळतो, तो ओलांडल्यावर थोडासा चढाव सुरू होतो. सावकाश चालून गेल्यास दम लागण्याची भीती नाहीं न पेक्षां, माथ्यावर पोंहोंचेपर्यंत दमायाला येतें. परंतु, एवढी वाटचाल करून शेवटीं आपणासमोर त्या देवस्थानाचें भव्य आणि विहंगम आकर्षक दर्शन झाल्यामुळें वाटचालीमुळें आलेला थकवा जिथेंच्या तिथें पार लयास जातो.

श्रीकालिका देवस्थान पूर्वाभिमुख आहे. आपल्या समोर दिसते ती मंदिराची उजवीकडची बाजू जी वरपासून खालींपर्यंत उतरत जाणारी बाजू. मंदिराच्या प्राकारांत प्रवेश करण्यापूर्वीं उजव्या बाजूस

आंवळी आणि आपट्याचें झाड आणि बाजूला देव्हाऱ्यासारखी मोकळी जागा आहे. या ठिकाणीं, प्रतिवर्षी, श्रीकालिका देवी एकव वेळ आवळी भोजनासाठीं येऊन जाते. डाव्या बाजूकडे श्रीभूमिका देवीचें देवालय असून ती श्रीभूमिका देवी वर उल्लेखित मोकळ्या जागेंत प्रतिवर्षी काल्याचा उत्सव आणि शिमगा या दोनच वेळीं उत्सवांसाठीं येऊन जाते. उजव्या बाजूकडे एक अग्रशाळा आहे तिच्या बाजूला श्रीरवळनाथाचें देवालय आणि एक विहिर आहे. त्या शेजारीं पर्यटक पांतस्थांना पिण्याच्या पाण्याची सोय केलेली दिसते. जरासें पुढें जातांच बगिचा डाव्या बाजूकडे दिसतो त्या बगिच्यात सभोंवार कठडा किंवा भींत आहे. आतां आपणास देवालयाच्या भव्य सभामंडपांत उजव्या अंगानें प्रवेश करतां येतो. या सभामंडपाच्या दोनही बाजूंनीं प्रवेशद्वारें, तसेंच पुढच्या दर्शनी बाजूंनींही प्रवेशद्वारें आहेत. श्रीकालिका देवालयांत जाण्याचें प्रवेशद्वार बरेंच उंचावर असून पंधरा पायऱ्या चढून वर जावें लागतें. या पायऱ्या चढून जातांना अर्थातच आपल्या पाठीमागें सभामंडप, रंगमंच आणि नगारखाना असल्याचें दृश्य दिसतें. या देवस्थानांत सभामंडपाहून देवालय उंचावर असल्याचें पर्यटकाच्या लक्षांत येण्यास वेळ लागत नाहीं. प्रत्यक्षांत देवालयांत पोंचल्यावर प्रवेश करतांच जो चौकोनी हॉल आहे तेथें देवस्थानचीं वाद्यें ढोल, नगारा, तासे इत्यादि असून हा हॉल जमिनीस फरशी बसविलेली, चोहों-बाजूनीं बसण्यासाठीं कट्ट्याची व्यवस्था आहे. या चौकोनी हॉलांतून पुढें पांच पायऱ्या चढून गेल्यावर एक लांब हॉल आहे. त्या हॉलाच्या दक्षिण-उत्तर दोहों बाजूंनीं असलेले चौकोनी उंच खांब आणि त्यांवर लांकडी छत आहे. याच लांब हॉलास देवालयाचा “चौक” म्हणतात. या चौकाच्या चोहोंबाजूंस सरवळी आहे आणि दक्षिण उत्तर बाजूंच्या भिंतींस चांगल्या प्रशस्त खिडक्या आहेत. त्यामुळें प्रकाश आणि हवा आंत येण्यास मदत होते. चौकाची जमीन संगमरवरी पाषाण बसविलेली असून छतास पंखे आणि हंड्या लावलेल्यामुळें सर्व प्रकारें मनास आल्हाद देणारें वातावरण निर्माण झालेलें अनुभवास येतें.

चौक सुरू होण्याच्या जागेकडे छतास मोठमोठ्या घंटा लोंबकळतात. त्यांतील घंटा वाजवून दर्शनाची पूर्व सूचना देण्याची वहिवाट आहे. घंटा वाजवून पुढें चौकावरून चालून जातांच पुढें श्रीकालिका देवीच्या समोर पोंचतो. तेथेंच चांदीच्या पत्र्यानें मढविलेलें सुंदर प्रवेशद्वार असून त्याच्या दोन्ही बाजूंस द्वारपाल आहेत. ह्या प्रवेशद्वाराच्या आंत तीन फूट रुंदीची मोकळी जागा आहे आणि त्यापुढें श्रीदेवीचें गर्भागार चौकोनी प्रशस्त आहे. चौक आणि गर्भागार यांमध्यें प्रदक्षिणा घेण्यासाठीं सरवळी आहे. गर्भागारास दोन दरवाजे असून बाहेरच्या अंगाचा दरवाजा चांदीच्या नक्षीदार पत्र्यानें मढविलेला आणि दुसरा दरवाजा लांकडी मजबूत आहे.

गर्भागारांतील मुख्यासनावर विराजमान झालेल्या श्रीकालिका देवीचे दर्शन

गर्भागारांत मुख्यासनावर जी अधिष्ठित श्रीकालिका देवीची मूर्ती आहे, ती मूर्ती काळ्या पाषाणाची असून चतुर्भूज आहे. तिच्या डाव्या हातांत वरच्या हातांत त्रिशूल, खालच्या हातांत मधपात्र, आणि उजव्या हातांत वरच्या हातांत कमल आणि खालच्या हातांत खड्ग अशा स्वरूपांत ती मूर्ती सकाळच्या वेळीं अभिषेकादि देवकृत्यें चालू असतांना आपणास दिसते. मूर्तीच्या पायाजवळ सिंह कोरलेला असून, त्याच्या खाली मध्यभागीं तीन मायापुरुष कोरलेले आहेत. ही पाषाणी मूर्ती या स्वरूपांत सकाळच्या वेळीं तिच्यावर अभिषेकादि देवकृत्यें चालू असतांनाच पहावयास मिळते. कारण हीं देवकृत्यें झाल्यावर दुपारीं महापूजेचे वेळी श्रृंगार केला जातो आणि त्यावेळी (मूळ पाषाणी मूर्तीसमोर तिला टेकून कांचोळी मूर्ती) कवच, मुकुट, नानाविध दागदागिने, महावस्त्र रेशमी जरी शालू किंवा पीतांबर परिधान करून त्यावर सुवासिक फुलांचे रंगीबेरंगी हार घातले जातात. त्यामुळें श्रृंगार आणि सुशोभितपणाच्या सोईसाठीं मूळ पाषाणी मूर्तीचें ज्या प्रमाणें दर्शन घडतें त्यांत बारकाईनें पहाणारास थोडेसे फेरफार झाल्याचें महापूजेनंतर त्या मूर्तीस पहाणारास दिसतें. म्हणजे मूर्तीच्या उजव्या हातांत खालच्या तलवार आणि डाव्या हातांत खालच्या ढाल अशा स्वरूपांत ती मूर्ती श्रृंगार केल्यानंतर पहावयास मिळते. एकंदरीत श्रृंगार केलेली ती मूर्ती मुख्यासनावर पाहून मनाला फार समाधान वाटतें. मूर्ती अगदीं

सुंदर, मोहक, आकर्षक आणि शांत असल्यामुळें पहाणाराचें मन भक्तिभावानें उचंबळून येतें. श्रृंगार केलेली ही मूर्ती ज्या मुख्यासनावर विराजमान दिसते, त्या मुख्यासनासभोंवार फार सुंदर नक्षीकाम केलेला संपूर्ण चांदीचा मंडप असून मूर्तीच्या पाठीमागें चांदीचीच प्रभावळ आहे आणि त्या प्रभावळीचें नक्षीदार काम मनोवेधक आहे. मुख्यासनाचा जो चौंथरा आहे त्याच्या पायाशीं आणखी एक मूर्ती छोटीशी श्रीदेवीचीच आहे. पण, ती पितळ धातूची आहे. चांदीच्या मंडपाच्या डाव्या आणि उजव्या बाजूकडे वरून खालीं दीपमाळा लोंबकळतात त्या दीपमाळांतील दिवे प्रज्वलित असल्यामुळें त्या प्रकाशामुळें तो चांदीचा मंडप आणि त्यांत स्थानापन्न झालेली श्रीदेवी, अगदीं मनोहारी दिसते. श्रीदेवीचें दर्शन घेऊन फिरून देवालयाबाहेर यावयाचें असल्यानें चौकावरून पायऱ्या उतरून पुन्हा आपण सभामंडपांत यावें लागतें. सभामंडपांतून पुढें गेल्यावर भव्य स्टेज दिसते, तेथें नाट्य प्रयोग आणि इतर समारंभ होण्याची सोय आहे. त्या स्टेजच्या वर नगारखाना आहे. तेथें दिवसांतून तीन वेळां चौघडा वाजतो. स्टेजच्या खालच्या बाजूस देवस्थानच्या व्यवस्थापक कमिटीचें कार्यालय आहे. सभामंडपांतून दोन्ही बाजूंकडे असलेल्या पायऱ्या उतरून खालीं प्राकारांत आणि व्यवस्थापक कमिटी कार्यालयांत जातां येतें. या कार्यालयासमोर भव्य कठडा आणि खालीं उतरण्यासाठीं गोलाकार चौदा पायऱ्या आहेत त्या उतरल्यानंतर तळाशीं साळ रस्त्यापासून आलेला डांबरी रस्ता येऊन मिळतो.

देवालयाच्या डाव्या बाजूकडे जी अग्रशाळा दिसते, तिच्या बाजूला भोजन मंडप आणि वरच्या भागांत श्रीहेगडेश्वर देवताचें मंदिर आहे. उजव्या बाजूकडे खालच्या टोंकाला आणखी एक उंच अग्रशाळा असून मागच्या बाजूस बगिचा आहे. या बगिच्यांत उजवीकडे दोन घुमट्या किंवा ज्यांस मंदिरें म्हणतांही येईल त्यांत श्रीरवळनाथ आणि श्रीशेटयो ही दैवतें आहेत. हीं दोन दैवतें तसेंच वर उल्लेखित श्रीहेगडेश्वर हीं दैवतें श्रीदेवीच्या परिवार दैवतांत समावेश केलेलीं आहेत. श्रीशेटयो दैवत घोड्यावर बसलेला दिसतो. देवालयाच्या पाठीमागें उंच जागीं पाण्याची टांकी बांधलेली असून त्या टाकींत नव्या तलावाचें पाणी पंपानें पाइपद्वारा आणून सोडण्याची व्यवस्था केलेली दिसते.

मुख्य प्रवेशद्वार रस्त्यावर आहे हें मागें सांगितलेंच आहे. त्या प्रवेशद्वारापासून निघालेला डांबरी रस्ता प्राकाराच्या प्रवेशद्वाराला बगल देऊन देवालयाच्या पाठीमागून थेट जुन्या तलावापर्यंत जातो हा जुना तलाव ज्यांत डोंगरांतून येणाऱ्या झऱ्याचें पाणी उंचावरून पडतें आणि हे पाणी रुचकर असल्याची ग्वाही तेथें देतात म्हणून त्या देवस्थानांत आलेली महाजन मंडळी आणि भक्तजन मुद्दाम त्या झऱ्याखालीं जाऊन स्नान करतात आणि सुखावतात. या जुन्या तलावाकडे प्रतिवर्षीं श्रीदेवी फक्तच एकच वेळीं गंगापूजनासाठीं फाल्गून महिन्यांत अमावास्या तिथी रोजीं येत असते.

गोमंतकांतील इतर देवालयांमध्यें गर्भागारावर मनोरा उंच आणि त्यावर घूड आणि कांहीं देवालयांच्या घुडावर कळस असल्याचें पहाण्यांत येतें. त्याच प्रमाणें, याही देवालयाच्या गर्भागारावर उंच मनोरा अष्टकोनी आकाराचा त्यावर घूड आणि त्यावर सोन्याचा कळस बसविलेला असून त्यावर विजेच्या दिव्याची प्रकाश झोत पडण्याची व्यवस्था केलेली असल्यामुळें रात्रीच्या वेळींही हा सुवर्ण कलश चकाकतो.

मुख्य देवालयाच्या आसपास पंचायतनांतील दैवतांच्या देवळ्या म्हणजे लहान मंदिरें आहेत. पंचायतन दैवतें ज्यांस आनुषंगिक दैवतें म्हणूनही संबोधण्यांत येतें, तीं दैवतें म्हणजे श्रीदेवी भूमिका, श्रीपालनाथ, श्रीरवळनाथ आणि श्रीशेटयो अशीं चार दैवतें या देवस्थानचीं पंचायतन दैवतें होत. या देवस्थानांत इ. स. १९६५ सालीं सहस्त्रचंडी महोत्सव झाला. त्यावेळीं श्रीभूमिका देवी वगळून इतर तीन पंचायतन दैवतांचा जीर्णोध्दार करण्यांत आला आणि जुन्या मूर्तींचें विसर्जन करून त्या जागीं विधिपूर्वक नवीन मूर्ती प्रतिष्ठापना केल्या गेल्या आहेत.

एकंदरींत या देवालयाची रचना आणि विशिष्ट तऱ्हेनें बांधकामाची रचना पाहातां, गोमंतकांत या पध्दतीचें देवालय हें एकमेव असावें असें वाटतें.

देवस्थानांत होणारे नियमित वार्षिक उत्सव

प्रत्येक महिन्याच्या शुक्ल पक्षांतील चतुर्दशीचा दिवस श्रीकालिका देवीची पर्वणीची आणि उत्सवाची तिथी या देवस्थानांत मानतात. त्या **प्रत्येक शुक्ल चतुर्दशीला या देवस्थानांत रात्रौं ९॥ वाजतां शिबिकोत्सव होत असतो.** या प्रमाणें वर्षाच्या बारा महिन्यांतील बारा शुक्ल चतुर्दशीचे दिवशीं रात्रौं शिबिकोत्सव म्हणजे पालखींतून श्रीकालिकादेवीची मिरवणूक होत असते. या मिरवणुकींत ठराविक जागीं पालखी थांबते त्यास पेणी म्हणतात. सबंध मिरवणुकींत एकंदरींत अकरा पेणीं होतात म्हणजे ठराविक अकरा ठिकाणीं पालखी थोडा वेळ थांबते. पालखी थांबली कीं, त्या ठिकाणीं देवस्थानचे भटजी पालखीबरोबर सोबत करणारे मंगलाष्टकें म्हणतात. नंतर कलावंतींचें गाणें व नृत्य होत असतें तें पूर्ण होतांच देवस्थानचा सेवेकरी काटकार 'पार्वतीपते हरहर महादेव' असा घोष करतो व नंतर पालखी उचलून पुढें मिरवणुकीनें जात असते. मिरवणुकींत पालखीपुढें सनई, सूर्त, तासे, ढोल वगैरे मंगलवाद्यें वाजत असतात. तसेंच तोरणें, पताका, अबदागीर, छत्री वगैरे लवाजमा घेतलेले सेवेकरी पालखी समवेत मागेंपुढें आपआपल्या रितीरिवाजाप्रमाणें पुढें मागें चालत असतात. शिपाई, काटकार, भाविण, नृत्यांगना, कलावंती, वाजंत्री, मशालजी, पखवाजी अर्चक, हिलामतदार इत्यादि सेवेकरी जसे पालखी बरोबर असतात, त्याचप्रमाणें देवस्थानचें व्यवस्थापक मंडळ, पालखी उत्सवाचा कारभारी महाजन आणि उत्सवास हजर राहिलेले महाजन कुळावी आणि इतर भक्तजन, मिरवणुकींत भाग घेतात. पालखी उत्सवाचा कारभारी महाजन चांदीचें उदपात्र (धुपाटणें) आपल्या हातांत घेऊन तें हलवीत पालखीसोबत चालत असतो. आणि काटकाराच्या हातांत चांदीच्या पत्र्यानें मढविलेली महालदारकाठी असते व तो पालखी समोर उभा राहून नियंत्रण करीत असतो. पालखीची मिरवणूक पूर्ण झाल्यावर पालखी देवालयांत परत येते. पायऱ्यांपर्यंत आली म्हणजे सर्व उपस्थित महाजन मंडळी धुळभेट घेतात नंतर अर्चक श्रीदेवीस नारळ ओंवाळून चव्हाट्यावर फोडण्यांत येतो. त्यानंतर पालखी चौंकावर आणून ठेवण्यांत येते. कारभारी महाजनाच्या हस्तें महाआरती, मंत्रपुष्प, आशीर्वाद घेणें दक्षणा वाटणी वगैरे होतांच श्रींचा सेवक श्रींच्या हातांतील फुलांचा तुरा आणि श्रीफळ हातांत घेऊन उपस्थित समुदायासमोर उभा राहून तुरा आणि श्रीफलाचा लिलांव पुकारतो. जास्तींत जास्त रक्कम बोलणाऱ्यास सर्वांसमक्ष तो तुरा आणि श्रीफळ बहाल केलें जातें. नंतर भाविकांनीं आणलेली फळफळावळ आणि खण वगैरेंचा लिलांव होत असतो आणि लिलावांची सर्व रक्कम लगेच श्रींच्या भांडारांत जमा होते. त्यानंतर नैवेद्य वांटतात. तो वांटीत असतांना कलावंतींचें गाणें होत असतें आणि नैवेद्य वांटून संपल्याबरोबर अर्चक कलावंतींस विडा देतात आणि त्या दिवसाचा कार्यक्रम पूर्ण झाल्याचें जाहीर करतो. इतकें होतांच उपस्थित भाविक आपआपल्या निवासस्थानीं जाण्यास निघतात आणि देवालयाचे दरवाजे बंद केले जातात. असा हा कार्यक्रम प्रत्येक महिन्याच्या शुक्ल चतुर्दशी रोजीं शिबिकोत्सवानिमित्तानें साजरा होत असतो.

श्रावण महिना –

या महिन्यांतील सोमवार आणि मंगळवार मग ते पंचांगांत चार किंवा पांच येवोत, ते मोठ्या उत्सवांत साजरे केले जातात.

आश्विन महिना –

या महिन्यांत शुक्ल प्रतिपदा रोजीं घटस्थापना आणि नित्य नैमित्तिक धार्मिक कृत्यें सतत शुक्ल दशमी पर्यंत चालू असतात. शुक्ल पंचमी रोजीं रात्रौं महोत्सवास प्रारंभ होऊन तो महानवमी रात्रौंपर्यंत चालू असतो. शुक्ल दशमी दसरा रोजीं सीमोल्लंघनासाठीं पालखी दुपारीं तीन वाजतां निघून आपट्याच्या झाडाजवळ आवळी भोजनाच्या जागेपर्यंत मिरवणुकीनें जाते. तेथें चालीरितीनुसार धार्मिक कृत्यें सांगता करून पालखी देवालयाभोंवतीं पेणीं करीत देवालयांत प्रवेश करते आणि आरती वगैरे करून उत्सव पूर्ण होतो.

मार्गशीर्ष महिना –

या महिन्याच्या पौर्णिमा दिवशीं काला उत्सव साजरा करतात. सकाळीं दररोजचे नित्याचे कार्यक्रम झाल्यानंतर श्रीकालिका देवीची पालखी श्रीदेवी भूमिका देवालयापर्यंत मिरवणुकीनें जाते. वाटेंत या मिरवणुकींत एकंदर तेरा पेणीं करतात. पालखी श्रीदेवी भूमिका देवालयाकडे पोंचतांच तेथें धार्मिक कृत्यें करून ती पालखी परत येते, व श्रीदेवीस शेजावर बसविली जाते. तिच्या समोर रात्रीं नाटकाचा कार्यक्रम पार पाडला जातो आणि दुसऱ्या दिवशीं दुपारीं तेथें गवळण काला सांगता होईपर्यंत श्रीदेवी शेजावर रहाते. नंतर श्रीदेवी पालखींत बसून गंगास्नानास जाते आणि तेथून परत आल्यावर आरती नैवेद्य वांटणी होऊन कार्यक्रम पुरा होतो.

गवळणकाल्याच्या दुसऱ्या दिवशीं आंवळी भोजनासाठीं श्रींची पालखी दुपारीं बारा वाजतां निघून आंवळी भोजनाच्या जागीं जाते. तेथें आंवळी पूजन, हवन, ब्राम्हण सुवासिनी संतर्पण करून रात्रीं पालखी देवालयांत आल्यावर पुराण, कीर्तन, आरती, नैवेद्य वांटणी होऊन कार्यक्रम सांगता केला जातो.

माघ महिना –

वर्धापनदिनानिमित्त पालखी उत्सव; शुक्ल सप्तमी रोजीं विजय रथोत्सव.

फाल्गुन महिना –

या देवस्थानांत सर्वांत मोठा आणि महत्वाचा उत्सव म्हणजे शिमगोत्सव. हा उत्सव फाल्गुन वद्य दशमी-पासून सुरू होऊन पुढच्या वर्षाच्या चैत्र वद्य द्वितिया पर्यंत सात रात्री शिशिरोत्सव साजरा करतात. दशमीच्या दिवशीं श्रीदेवीस पिवळ्या रंगाचें वस्त्रपरिधान करून (त्यास प्रचारांत हळदुलें म्हणतात म्हणजे हळदीच्या रंगाचें या अर्थानें) आणि श्रीभूमिका देवालयांत परंपरेनें चालत आलेल्या पध्दती-प्रमाणें धार्मिक कृत्यें करून सुंवारी वादन करतात व श्रीगणपती देवास आवाहन केलें जातें. अमावास्येच्या दिवशीं म्हणजे सहाव्या दिवशीं उत्सव करणारा कारभारी महाजन, त्याच्या बरोबर सुंवारी वाजविणारे, हिलामत घेतलेले आणि इतर सर्व परिवार सोबत करून, तलावावर भिंवरी नेऊन तेथे गंगापूजन करतात.

गोमंतकांत फक्त या एकमेव देवालयांत फार जुन्या कालापासून भिंवरीचा कार्यक्रम चालू असलेला पहाण्यांत येतो

भिंवरीची मिरवणुक अगदीं पहाण्यासारखी असते. भिंवरीबरोबर महिला नटूनथटून मिरवणुकींत सहभागी होतात. फाल्गुन वद्य दशमीपासून सातव्या दिवशीं म्हणजे चैत्र शुक्ल प्रतिपदा नविन वर्षारंभ संवत्सर प्रतिपदा दिवशीं गृहयज्ञ, श्रीमहादेवी प्रीत्यर्थ ब्राम्हण सुवासिनी संतर्पण करून रात्रीं संवत्सर फल वाचन, पंचांग श्रवण, सुंवारी वादन, दीपस्तंभाजवळ पालखीची पूजा झाल्यानंतर श्रीदेवी पालखींतून लालखी वाहनांत बसविली जाते आणि ती लालखी मिरवणुकीनें वाटेंत पेणी करीत श्रीभूमिका देवालया-पर्यंत जात असते. तेथें धार्मिक विधी संपादून परत ती लालखी येतांना, देवालयासमोर थांबते. लालखीं-तून उतरून श्रीदेवी पालखींत स्थानापन्न होऊन देवालयांत येते.

आठव्या दिवशीं चैत्र शुक्ल द्वितिया रोजीं गुडयांचा रथ त्यांत श्रीदेवी आरूढ होऊन श्रीभूमिका देवालयापर्यंत जाते आणि तेथून परत फिरून तो रथ देवालयाच्या पायऱ्यांच्या पायथ्यापर्यंत आणून तेथें सामुदायिक गाऱ्हाणें प्रार्थना झाल्यावर अर्चक श्रीदेवीस प्रारंभीं गुलाल समर्पण करतो. नंतर तेथें उपस्थित असलेले महाजन धुळभेट घेऊन श्रीदेवीवर गुलाल समर्पण करून झाल्यावर चव्हाट्यावर नारळ फोडला जातो. जनसमुदाय एकमेकास गुलाल लावण्याचा आनंद उपभोगित असतो. त्या दिवशीं रात्रीं शेवटचा दिवस असल्यानें संध्याकाळी उत्सवाचाकारभारी महाजन यानें श्रीदेवीची पूजा करून आरती, नैवेद्य वांटणी, कलावंतींचें गायन नृत्य झाल्यावर या उत्सवाची सांगता होते. या शिमगा उत्सवास शिशिरोत्सव नांवानें हल्लींच्या कालांत संबोधण्यात येतें.

या शिशिरोत्सवांत फाल्गून वद्य द्वादशी, त्रयोदशी, चतुर्दशी आणि अमावास्या या चारही रोजीं रात्रौं श्रीकालिका देवीची पालखींतून मिरवणूक आणि चैत्र शुक्ल प्रतिपदा दिवशींही शिबिकोत्सव होत असतोच. शिवाय, त्या त्रयोदशी, चतुर्दशी, अमावास्या, तसेंच चैत्र शुक्ल प्रतिपदा रोजीं रात्रौं नाटकांचे कार्यक्रम असतात. देवस्थानांत हाच उत्सव मोठा आणि महत्वाचा मानत असल्यामुळें या दिवसांत देवालय, प्राकार वगैरेंकडे रंगीबेरंगी विजेच्या दिव्यांची व्यवस्था, खास बँड वाद्य, आणि निमंत्रित कलावंतींचें गायन व नृत्य आणि रात्रौं चित्रविचित्र रंगीबेरंगी आकर्षक दारूसामान या सर्वांमुळें देवस्थानांत अलोट गर्दी असली तर नवल नव्हे.

प्रसाद – कौल

गोमंतकांतील इतर बहुतेक सर्व देवस्थानांत असलेल्या पध्दतीप्रमाणें याही देवस्थानांत प्रसाद-कौल घेण्याची वहिवाट आहे. प्रसाद-कौल म्हणजे संसारिक माणूस नानाविध बऱ्या वाईट प्रसंगांत सांपडल्याशिवाय रहाणें अशक्यच, आणि त्या प्रसंगांत भूत-भविष्य-वर्तमान जाणून योग्य मार्गदर्शन आपणास मिळावें, हा सर्वांसच हेतू असतो. आणि हें मार्गदर्शन आपणास आपल्या कुलदैवताकडून मिळविण्याचा सल्ला आपल्या पूर्वजांनीं आजपावेतों परंपरेनें पिढ्यान पिढ्या दिल्याप्रमाणें चालत आलेला आहे. ज्याला श्रध्दा आणि विश्वास असेल त्या भाविकास अचूकपणें या प्रसाद कौला प्रमाणें वर्तन ठेवल्यास निश्चितपणें प्रत्यय येतो आणि या अनुभवामुळें भाविक लोक या प्रसाद कौलाकडे वळतात ही सत्य वस्तुस्थिती आहे. श्रीकालिका देवीची पाषाणीमूर्ती गर्भागारांत मुख्यासनावर जी प्रतिष्ठित आहे, त्या मुख्यासनाच्या खालीं जमीनतळावर आणखी एक दुसरी मूर्ती श्रीदेवीची स्थापन केलेली आहे त्या मूर्तीलाच प्रसाद लावून कौल घेतला जातो. ही मूर्ती आकारानें लहान असून तिला एक प्रभावळ आहे. दुपारीं महानैवेद्य होऊन महापूजा झाल्यानंतर अर्चक भटजी हे प्रसाद लावतात हे प्रसाद सूर्यास्तापर्यंत नौबत सायंकाळची झडेपर्यंत घेण्यांत येतात. हे प्रसाद मूर्तीच्या अंगावर आणि मूर्तीच्या प्रभावळीस ठरलेल्या विशिष्ट जागीं लावतात. हे जे प्रसाद लावतात. ते नागरकुडा म्हणून झाड आहे त्या झाडाच्या पानांचे चौकोनी तुकडे प्रसाद लावणारा अर्चक भटजी करून ठेवून नंतर ते तुकडे मूर्तीस आणि प्रभावळीस ठराविक ठिकाणीं लावतात आणि हे तुकडे लावून पूर्ण होतांच, जो भाविक इसम प्रसाद कौल घेण्यास तेथें हजर झालेला असतो, त्यानें त्या प्रसाद लावलेल्या अर्चक भटजीस आपल्या कोणत्या अडचणी आहेत आणि त्या अडचणी परिहारार्थ श्रीदेवीचें मार्गदर्शन हवें हें सांगणें प्राप्त आहे. तें भाविकाकडून अर्चक भटजीनें समजून घेतल्यानंतर तो अर्चक भटजी त्या भाविकाचे नांवें श्रीदेवीस मोठ्या नम्रतेनें प्रार्थना करून त्या भाविकाचें कुलदैवत, पालवीदैवत, ग्रामदैवत, त्याचे वाडवडील पूर्वज आणि श्रीकालिकादेवी पंचायतन दैवतांसह सर्वांची दया त्या भाविकावर असावी, अशी विनंती सादर करून प्रसाद मागतो. हा आरंभींचा प्रसाद झाल्यावर इच्छित प्रश्नांची मागणी करून प्रसाद मागतात. आणि ही सर्व प्रश्नांचीं उत्तरें मिळाल्यानंतर शेवटीं सर्वार्थी राखण म्हणून एक प्रसाद मागण्याची वहिवाट आहे. आणि या अशा पध्दतीनें सर्व साधारणपणें प्रसाद घेण्याची रिती असते. प्रसाद मागणी केल्यानंतर मूर्तीच्या अंगावरील किंवा प्रभावळीवरील कोणत्या तरी जागेवरील पानांचा तुकडा खाली पडतो. त्याचा सांकेतिक अर्थ त्या अर्चक भटजी, ज्यानें ते प्रसाद लाविले आहेत, त्यास अनुभवानें माहित असतो तो अर्थ इच्छूक भाविकानें समजून घेऊन त्याप्रमाणें हे प्रसाद घ्यावयाचे असतात. प्रत्येक देवालयांत जे प्रसाद कौल घेतात. त्या सर्व देवालयांतील प्रसादांची सांकेतिक भाषा एकच, एकाचसारखी नसते हें मुद्दाम लक्षांत ठेवणे जरुरीचें आहे. तसेंच, हे प्रसाद घेण्याचे दिवस सबंध वर्षाचे सर्वच दिवशीं घेतां येत नाहींत. प्रत्येक देवालयांत प्रसाद कोणत्या महिन्यांत कोणत्या तिथी दिवशीं घेतां येत नाहींत हें पूर्वापार ठरलेलें असतें म्हणून, हे प्रसाद घेऊं इच्छिणारांनीं आगाऊ ही अत्यावश्यक जरुरीची माहिती जाणून घेऊन नंतरच प्रसाद घेण्यासाठीं त्या देवस्थानांत हजर रहाणें योग्य आणि सोईस्कर होऊं शकतें. असें न केल्यास गरजू इच्छूक भाविक प्रसाद घेण्यासाठी त्या देवळांत आकस्मिकपणें गेल्यास, आणि तेथें पोंचल्यावर जर त्या दिवशीं देवालयांत प्रसाद घेतां येत नाहींत असें कळलें, तर तो भाविक इच्छूक

निराश होऊन विनाकारण मनस्ताप झाल्याच्या अवस्थेंत परत फिरावें लागणें क्रमप्राप्तच ठरतें. यासाठीं तसा प्रसंग अनुभवास येऊं नये ही खबरदारी आगाऊ घेणें अपरिहार्य आहे.

या देवस्थानांत सर्व साधारणपणें प्रत्येक महिन्याच्या शुक्ल आणि कृष्ण (वद्य) पक्षांतील एकादशी, अमावास्या आणि उत्सवाचे दिवशीं कोणासच प्रसाद लावतां येत नाहींत हें स्थूल मानानें लक्षांत ठेवणें अगत्याचें आहे.

प्रत्येक ज्ञाती समाजाचींच खास स्पेशल वेगळीं देवालयें गोमंतकांत आहेत काय ?

या लिखाणाच्या प्रारंभींच असें सूचित केलें होतें कीं, गोमंतकांत अशींही कांहीं देवालयें आहेत कीं तीं खास, विशिष्ट, स्पेशल फक्त एकाच ज्ञाती समाजाचींच आहेत म्हणून; आणि वाचकांस एखादे-वेळीं अशी शंका येऊं शकते कीं, गोमंतकांत आर्य ब्रम्हवृंद दैवज्ञ सुवर्णकाम करणारे सोनार या ज्ञातीसमाजाचेंच जसें एकमेव वेंगळेंच स्पेशल देवालय कासरपाल येथें श्रीकालिका देवीचें आहे तसें इतर ज्ञाती समाजांचे त्यांचेच असें वेगळें खास असें देवालय खरोखरच आहे कीं काय ? ही शंका दूर करण्यासाठींच तशीं देवालयें दाखवून देणें क्रमप्राप्त म्हणून खालील माहिती देणें अत्यावश्यक ठरतें.

दैवज्ञ ब्राम्हण ज्ञाती समाजाचेंच जसें खास स्पेशल वेगळें देवालय कासरपाल येथें श्रीकालिका देवीचें आहे, तसेंच वैश्य ज्ञातीसमाजाचें खास असें श्रीशांतादुर्गा देवस्थान (धारगळी), गुर्जर ज्ञाती-समाजाचेंच श्रीलक्ष्मीनारायण देवस्थान (नावें), भंडारी ज्ञातीसमाजाचेंच श्रीरुद्रेश्वर देवस्थान (हरवळें), ब्रम्हकर्मा सुतार ज्ञातीसमाजाचेंच श्रीराम-सीता देवस्थान (गिमोणें-पिळगांव), गावडा ज्ञातीसमाजाचेंच श्रीमल्लिकार्जुन देवस्थान (गांवडोंगरें-काणकोण), नाभिक ज्ञातीसमाजाचेंच श्रीगोमंतेश्वर देवस्थान (ब्रम्हपुरी-जुनें गोवें), क्षत्रिय राणे ज्ञातीसमाजाचेंच श्रीपांडुरंग देवस्थान (विठ्ठलापूर-सांखळी), सारस्वत ज्ञातीसमाजाचेंच श्रीदत्त देवस्थान (सांखळी) अशीं हीं देवालयें उदाहरण किंवा नमुन्यासाठीं दाखवितां येईल. जिज्ञासूनीं त्या त्या देवस्थानची घटना नियमावली (कोंप्रोमिस्) स्वतः वाचून पाहून सत्यता पटवून घेतली तर कोणत्याच प्रकारच्या शंकेस वावच रहाणार नाहीं.

२१

श्रीकालभैरव देवस्थान

धारगळ – पेडणे

श्रीकालभैरवाची मूर्ती, धारगळ, पेडणे

श्रीकालभैरवाचे देवालय, धारगळ, पेडणे

श्रीकालभैरव देवस्थान

धारगळ – पेडणे

गोमंतकांत आजच्या कालांत, जीं ठिकठिकाणीं हिंदू धर्मीयांचीं श्रध्दास्थानें, देवालयें आपण पहातो, तीं इसवी सनाच्या सोळाव्या शतकांत, सन १५४० ते १५६७ या कालापूर्वी बहुतांशीं आजच्या जागीं नव्हतीं. आजच्या जागीं तीं मूळ आपल्या ठिकाणाहून स्थलांतर करुन आणली आहेत आणि त्याचें कारण गोमंतकांत इ. सनाच्या सोळाव्या शतकांत जी राजकीय परिस्थिती उद्भवली आणि तत्कालीन राज्यकर्त्यांनीं "ज्यांचें राज्य त्यांचा धर्म" हें तत्व डोळ्यांपुढें ठेवून राजकारण चालीवलें, त्याचें रूपांतर गोमंतकांत हिंदू धर्मीयांचें बळजबरीनें खिरस्तीकरण, हिंदू देवालयांचा विध्वंस आणि दैवतांच्या मूर्तींची मोडतोड सामुदायिकरीत्या चालविली गेली. या अशा भयानक संकटांतून निसटून परराज्यांत गुप्तपणें पलायन केल्याशिवाय आणखी दुसरा उपाय नाही हें ओळखून तत्कालीन हिंदू धर्मीयांनीं आपआपली दैवतें त्यांच्या प्रमुख मूर्ती किंवा प्रतिकें जें काय त्या संकटकालीं हातांत घेऊन रात्रींच्या काळोखात गुप्तपणें रानावनांतून वाटचाल करून परराज्यांत नेऊन सुयोग्य ठिकाणीं हिंदू सरदारांचा जेथें जेथें आश्रय मिळण्याची शक्यता वाटली, तेथें तेथें, स्थापन करून मोकळे झाले. हें दिव्य त्या कालीं, आमच्या महान पूर्वजांनीं आपआपला जीव धोक्यांत घालून, आपलें घरदार, मालमत्ता, शेती, बागायती, धनधान्य, दागदागिने, सर्व ऐश्वर्यावर तिलांजली देवून, आपलीं बायकामुलें कुटुंबियांचा प्रेमपाश तोडून, पाषाणी हृदय करून, फक्तच आपलें दैवत आणि धर्म सांभाळण्याचें एकमेव ध्येय पत्करून, कार्य तडीस नेण्यात न भूतो न भविष्यती असा स्वार्थत्याग केला, म्हणूनच आम्हीं त्या पुण्य पुरुषांचे वंशज म्हणून आम्हांस त्या दैवतांस भक्तीभावानें भजण्याचें दुर्लभ भाग्य लाभलें. नपेक्षा आमच्या गळ्यात करूझ लोंबकळलेलें दिसणार होतें हें सांगण्याची गरजच नाही.

त्या संकट कालाचें वर्णन आणि घडलेल्या घटनांची नोंद वाचणारांचें सर्व अंग थरथरून कंप सुटतो इतकें तें भयानक आहे. असो. अशा प्रसंगांत जीं असंख्य देवालयें सांपडलीं, त्यापैकींच श्रीकालभैरव हें देवस्थान होय. त्या भयानक प्रसंगांत देवालयांचा विध्वंस करतांना जशी मोडतोड केली त्याचबरोबर त्या इमारतीस आगी लावून त्यांत असलेल्या सर्वस्वाची राखरांगोळी मुद्दाम केली गेली, आणि त्यात अर्थातच धर्मग्रंथ, पुराणग्रंथ, देवस्थानांचे सर्व दप्तर जाळून भस्मसात् केल्यामुळें प्राचीन कालीन ऐतिहासिक घटनांचा शोध घेणें अशक्य होऊन बसलें. परंतु, त्या साधनांच्या अभावीं जें कांहीं तत्कालीन जिवंत असलेल्या पिढीच्या लोकांच्या मुखांतून परंपरेनें आपआपल्या पिढीच्या लोकांस मुखोद्गत पध्दतीनें श्रवण, पठण करून ऐकवीत राहिल्यामुळें आजच्या पिढीच्या लोकांच्या माहितींत आलें, त्याची दखलगिरी घेऊन संशोधन आणि संकलन करून अभ्यास करून शक्याशक्यता पडताळून त्या त्या जागीं जाऊन प्रत्यक्ष वस्तुस्थिती, कांहीं अवशेष सांपडल्यास ते पाहून, एकंदर माहितीचा तात्पर्यार्थ नोंद करून ठेवणें एवढें तरी कार्य केल्यास त्या परिश्रमपूर्वक कार्याचा उपयोग कांहीं प्रमाणात तरी भविष्यकालांत जिज्ञासू, अभ्यासू आणि गरजूंस खचितच निःसंशयपणें मार्गदर्शनासाठी तरी होऊ शकतो. प्राचीन दप्तर जाळून गेल्यामुळें आणि सद्यःकालीं जें जास्तीत जास्त काय हातीं लागेल त्या सर्वांचा बारकाईनें शोध घेऊन टिपून घेऊन नोंद करून ठेवली नाही तर भविष्यकालांत पुढील पिढ्यांस मागील घटनांचा शोध लागणें कठीणच हें वेगळें सांगायला नकोच. यासाठी, त्या दृष्टीनें सर्व टिपणांची नोंद घेणें सार्वजनिक हिताच्या दृष्टीनें अत्यावश्यक ठरतें.

दंतकथा नव्हे ? इतिहास !

अशा माहितीचें संशोधन आणि संकलन करून ठेवलें तर त्यास दंतकथा म्हणून संबोधून त्यांस कसलीच किंमत नाही असें भाष्य करणारे समाजांत कमी विद्वान नाहींत, पण त्याकडे पूर्णतः दुर्लक्ष करून

परिश्रमपूर्वक संशोधन आणि संकलनाचें काम अभ्यासू दृष्टीनें सेवाभावानें मनःपूर्वक चालू ठेवणें अगत्याचें आहे. मोठमोठे नामांकित जागतिक कीर्तीचे संशोधक इतिहासकार या सर्वांचे प्रामाणिक मत म्हणून लिहून ठेवलेलें आढळतें कीं, एके काळीं ज्यास दंतकथा म्हणत, त्याच दंतकथा शेवटी इतिहास ठरतो. संशोधन अभ्यासपूर्वक चालू ठेवल्यानें इतिहासातील विधानें एखादेवेळीं भविष्यकालांत उपलब्ध झालेल्या स्पष्ट पुराव्यांनुसार बदलणेंही क्रमप्राप्त झाल्याचीं उदाहरणें सांपडतात.

प्राचीन कालीं म्हणजे इसवी सनाच्या सोळाव्या शतकापूर्वी श्रीकालभैरवाचें देवस्थान तिसवाडी तालुक्याच्या दीपवती किंवा दिवाडी बेटांत होतें. गोमंतकांत इ. सन १५१० सालीं ख्रिस्ती धर्मीय पोर्तुगीज लोकांचा प्रवेश होऊन ते राज्यकर्ते होण्यापूर्वी मुसलमानांचा अंमल गोव्यांत होता. त्यांनींही हिंदुधर्मीयांची अनेक श्रध्दास्थानें आणि देवालयें जमीनदोस्त केल्याचें इतिहासांत सापडतें. पण, नंतरच्या कालांत परत हीं देवालयें नव्यानें बांधून पूर्ववत ठेवण्याचें काम हिंदु धर्मीयांनी तडीस नेलें होतें. इ. सनाच्या १५४० सालांत, ख्रिस्ती धर्मीय पोर्तुगीज राज्यकर्त्यांनी गोवा बेट, (तिसवाडी) दिवाडी वगैरे बेटांवरील हिंदुधर्मीयांचीं देवालयें जमीनदोस्त करण्याचा सपाटा चालविला. त्यावेळीं दिवाडी येथें असलेली सर्व देवालयें विध्वंस करून टाकण्यांत आलीं.

अंतरींचा श्रद्धादीप तेवत राहिला !

विध्वंस केलेल्या देवालयांची यादी पोर्तुगीज कालीन ऐतिहासिक दप्तरांत असलेली कै. वा. इतिहासाचार्य डॉ. पांडुरंगबाब सखाराम शेणवीं पिसुर्लेकर यांनीं प्रसिध्द केलेली आहे. त्या यादींत दिवाडी बेटांत असलेलीं आणि पोर्तुगीजांनीं विध्वंस केलेलीं देवालयें म्हणून खालील देवालयांचा उल्लेख आहे :– ग्रामपुरुष – नारायण – भैरांव – रवळनाथ – देवता – सप्तनाथ – सटी – भगवती – बावकादेवी – वशनाथ – वीर – कापरीदेव – ग्रामपुरुस – रवळनाथ – सांतेरी – रवळनाथ – गणेश – भैरांव – मस्कनासिणी – मोक्या – निर्गुण.

वरील यादींत, भैरांव म्हणून जें नांव आहे, तें श्रीकालभैरवाचें होय. वरील उल्लेखित देवालयें मोडून टाकल्याची जी नोंद आहे, तिचा अर्थ ती दैवतें ज्या ज्या देवालयाच्या इमारतींत पूर्वी होतीं, त्या इमारती मोडून टाकल्या. तीं देवालयें मोडून टाकण्याचा अनर्थ होणार, तो चुकविणें आपल्या हातांत नाहीं, याची खात्री असल्यामुळें त्या अनर्थाचा सुगावा लागतांक्षणींच, त्या त्या दैवतांच्या कुळावी भाविकांनीं अचानक, गुप्तपणें, आपआपल्या दैवतांच्या मुख्य मूर्ती किंवा त्यांचीं प्रतिकें जीं उचलून रात्रीच्या काळोखांत आपल्याबरोबर घेऊन पायवाटचाल करणें शक्य होतें. तीं घेऊन ते कुळावी केव्हांच दिवाडी बेटाबाहेर निसटले होते व त्या मूर्ती किंवा त्यांची प्रतिकें दुसऱ्या राज्यांत नेऊन तेथें स्थिरावून त्यांची तेथें प्रतिष्ठापना केली. मुळच्या देवालय इमारतींत असलेल्या जड पाषाणी वगैरे मूर्ती, या संकटकालांत बरोबर घेवून जाणें प्रत्यक्षांत अशक्य होतें म्हणून, त्यांनीं त्या मूर्ती कांहीं विहिरींत बुडवून टाकल्या व कांहीं जमिनींत पुरून टाकल्या म्हणून हल्लींच्या कालांत त्या उत्खननांत तसेंच विहिरी नदींतही पुष्कळकडे सांपडल्याचीं उदाहरणें आहेतच.

अशा प्रकारें दिवाडी येथून श्रीकालभैरव आणि सप्तनाथ म्हणजे श्रीसप्तकोटीश्वर हीं दैवतें नार्वेस स्थलांतर करून नेण्यांत आलीं. तेथें आजच्या कालांत जें सुप्रसिध्द श्रीसप्तकोटीश्वराचें देवालय आहे, त्याच परिसरांत, त्याची स्थापना करण्यांत आली परंतु, त्या दैवताच्या कुळावी लोकांची निवास व्यवस्था कायमची कशी कोठे करावी याच्या शोधांत ते विचारांत होतेच. शेवटीं त्यांनी आपली वसाहत बारदेश तालुक्यांतील कोलवाळ या गावीं उभारुली आणि तेथें व्यवस्थितपणें नार्वेहून आपलें कुलदैवत श्रीकालभैरव श्रीसप्तकोटीश्वरसह स्थलांतर करून कोलवाळ येथें त्या दैवतांची स्थापना करून देवालय बांधणी केली आणि दिवसेंदिवस तेथें त्या दैवताची उर्जितावस्था आणि भरभराट होत गेली. देवालयाच्या मालकी हक्काच्या जमिनी शेती बागायती बऱ्याच प्रमाणांत झाल्या. वार्षिक उत्पन्नही बरेंच वाढलें आणि त्यामुळें देवस्थानांत देवकृत्यें, उत्सवादि कार्यक्रमांमुळें नांवलौकीक वाढीस

लागला. कळ्वावी लोकांशिवाय भाविक भक्तजनाची ये - जा वर्दळ सुरू झाली. देवस्थानांत तलावासारखीं महत्वाची बांधकामें, गोड पाण्याचा झरा असल्यामुळें त्या झऱ्याच्या ठिकाणी पाणी पिण्यासाठीं योग्य व्यवस्था आणि स्नान करण्यासाठींही जरुरीप्रमाणें सोय करण्यांत आली एकंदरींत देवस्थानचा नांवलौकिक बराच वाढला आणि भाविक लोकांची त्या जागीं गर्दी दिसू लागली.

कोलवाळ येथें श्रीकालभैरव हे देवस्थान असतांना त्या देवस्थानाच्या मालकी हक्काच्या आणि भोगवट्याच्या ज्या जमिनी होत्या त्या खालील प्रमाणे :-

१) एक जमीन "वीरांचें भाट" शिरोळी वाड्यावर असलेलें.

२) एक जमीन "वोंवळीचें भाट" सांताक्रुझ वाड्यावर असलेलें.

३) एक जमीन "रावणांची राई".

४) एक जमीन "जोंश्याचें व्हांव" सिनेयालें खाजन शेतांत असलेली.

५) शेत जमीन "रवळनाथाचें व्हांव" शिनैयाले खाजन शेतीत असलेली.

६) शेत "भैंरावांची नमशी".

७) शेत "रवळनाथाचें व्हांव" जुंवां खाजन शेतीत असलेलें.

८) शेत "दादाचो कुणगो" माझावेलो कांतर शेतींत असलेलें.

९) शेत "पाटाचो वरील" माझावेलो कांतर शेतींत असलेलें.

१०) शेत "व्हांवा" गुंगाझन शेतींत असलेलें.

११) शेत "वीराचें आगळ" मुळाघ शेतींत असलेलें.

१२) शेत "सालुलेचें आगळ" मुळाघ शेतींत असलेलें.

१३) शेत "गुझोलाचें आगळ" मुळाध शेतींत असलेलें.

१४) शेत "जोशाचो वकोंं" आणि "मिरांबीचें आगळ" दोन्ही एकमेकास एकत्र झालेलीं कारापाटो शेतींत असलेलीं.

१५) शेत "सांतीची कोंडी" चांफ्याकळ शेतींत असलेलें.

१६) शेत 'रवळनाथाचें व्हांव" मालो कांतर शेतींत असलेलें.

१७) शेत "माल्देपुरुषाचें व्हांव" माले कांतर शेतींत असलेलें.

१८) शेत "रवळनाथाची नमशी."

१९) शेत "भैंरांवांची नमशी"

२०) शेत "जांभूळीचें आगळ" सिलाप्र शेतींत असलेलें.

२१) शेत "माल्देपुरुषाचें आगळ" माझावेलो पाटो शेतींत असलेलें.

२२) शेत "रामनाथाचें आगळ" माझावेलो पाटो शेतींत असलेलें.

२३) शेत "मुकारियाचें आगळ" योवन खाजन शेतींत असलेलें.

२४) शेत "कालांदिची बांदोर्न" गांव खाजन शेतींत असलेलें.

२५) शेत "वाडोल शेत" चांफ्याकळ गांवकारी यांच्या शेतींत असलेलें.

२६) शेत "माल्देपुरुषाचें व्हांव" युवों खाजन शेतींत असलेलें.

२७) शेत 'कुंभार कुणगो" माझावेलो पाटो शेतींत असलेलें.

२८) बागायत "रवळनाथाचें भाट."

वरील माहिती सरकारी गोवा पुरातत्व खात्याच्या पोर्तुगीज कालीन ऐतिहासिक दप्तरांत "फोराल दे बारदेस" नांवाचें जें हस्तलिखित आहे त्यांत आढळते. कोलवाळ गांवांत श्रीकालभैरव देवस्थान होतें त्याचें पेडणे तालुक्यांतील धारगळ गावांत स्थलांतर झाल्यानंतर, त्या देवस्थानच्या मालकी हक्काच्या

आणि भोगवट्याच्या ज्या जमिनी होत्या, त्यांचा सरकारने पंचनामा केला होता. त्यांत हीं नावें पृष्ट १०९ ते पृष्ट १३६ पर्यंत असलेल्या मजकुरांत आढळतात. मूळ मजकूर हस्तलिखितांत असून तो जुन्या कालीन रोमन लिपींतील तत्कालीन पोर्तुगीज भाषेंत आहे. त्याची जशाची तशी येथें नक्कल करून दिली तर ती सध्याच्या कालांत वाचकांस सोपेपणी वाचण्यास अडचणी येणार. शिवाय, स्थलाभावामुळें देता येत नाहीं. यासाठीं, तीं नांवें मराठी भाषेंत रूपांतर करून जुळवून घेवून दिलीं आहेंत. त्यामुळें यथार्थ कल्पना येऊं शकेल.

कोलवाळ येथे श्रीकालभैरव देवस्थान असतांना तेथें आणखी देवालयें होतीं, ती अशीं : रवळनाथ – रामनाथ – धाड – गौतम. या देवालयांच्या इमारती, पोर्तुगीज राजवटींत बारदेश तालुक्यांत खिरस्तीकरणाची मोहीम चालवून विध्वंस केल्या गेल्याची यादी तत्कालीन सरकारी ऐतिहासिक दप्तरांत आहे. त्या यादीवरून कळते. बारदेश तालुक्यांत हें खिरस्तीकरण फरांसिस्कन पंथीय पाद्री लोकांनी चालविलें आणि त्याचा काल इ. सन १५६० ते १५६७ असा आहे.

हें खिरस्तीकरण करण्याची मोहीम बारदेश तालुक्यांत सुरू झाली आणि तिचा अंमल म्हापसें गांवात पोंचल्याची चाहूल लागतांच, हा दारूण प्रसंग आतां नक्कीच जवळच असलेल्या कोलवाळ गांवावर आल्याशिवाय राहणारा नाहीं, हें ओळखून श्रीकालभैरव दैवताच्या कुळावी महाजनांनीं आपलें प्रमुख दैवत जें कालभैरव आणि सहपरिवार दैवतें, कोलवाळ गांवांतून हालवून त्यांचें स्थलांतर भोंसले यांच्या राज्यक्षेत्रांत धारगळ गावांत करून तेथें त्या दैवतांची स्थापना केली. आणि आजच्या कालापर्यंत तीं दैवतें आणि देवस्थान सुस्थितींत त्या धारगळ गांवात असून तो गांव आज पेडणें तालुक्याच्या हद्दींत संभवतो.

वरील माहितीवरून निश्चितपणें मानतां येईल की, श्रीकालभैरव देवस्थानचें स्थलांतर बारदेश तालुक्याच्या कोलवाळ गांवांतून पेडणे तालुक्याच्या धारगळ गांवात इसवी सनाच्या सोळाव्या शतकात, सन १५६० ते १५६७ च्या सालांच्या अवधींत, तत्कालीन खिरस्तीकरणाच्या मोहिमेच्या भयानें झालें आहे.

धारगळ येथें देवालयस्थापना झाल्यानंतर प्रतिष्ठापना केलेलीं दैवतें

प्रमुख दैवत श्रीकालभैरव असून सहपरिवार किंवा पंचिष्ठ दैवतें खालीलप्रमाणें त्या देवालयाच्या परिसरांत विधीपूर्वक स्थापन केलेलीं आहेंत.श्रीसप्तकोटीश्वर आणि मूळ पुरुष – म्हाल शर्मा.

श्रीरवळनाथ.
श्रीसांतेरी.
श्रीमहालक्ष्मी.

श्रीकालभैरव देवस्थान ज्यांनी स्थापिलें ते आद्य संस्थापक गौड सारस्वत ब्राम्हण ज्ञातीचे, गौतम गोत्राचे असून ते कोलवाळ ग्रामसंस्था म्हणजे कोमुनिदादीचे गांवकार सभासद दुसऱ्या आणि तिसऱ्या क्रमांकाचे मत हक्कदारीचे आहेत, असें स्पष्टपणें त्या देवस्थानच्या घटना नियमावलीवरून कळते.

या आद्य संस्थापकांचीं उपनांवे : शेणवीं महात्मे, शेणवीं कोलवाळकर, शेणवीं खाजनये व शेणवीं मेणकूरकर अशी आहेत.

हें देवस्थान कोलवाळ गांवात असतांना त्या कालीं ,सर्व आद्य संस्थापकाचें उपनांव "शेणवीं कोलवाळकर" असेंच ओळखण्यांत येई नंतरच्या कालांतपरीस्थितीनुरूप देवस्थानचें स्थलांतर जसें धारगळ येथें झालें, तसेंच आद्य संस्थापक आणि त्यांच्या वंशजांचे स्थलांतर गोव्याच्या इतर भागांत व तसेंच गोमंतकाबाहेरही झालें. उदाहरणार्थ रत्नागिरी या गोमंतकाबाहेरील जिल्ह्यांत निरोखें, ओरस, वरवडे, ही गांवें असून त्या गांवात वास्तव्य कायमचे करून तेथें स्थायिक झालेले आपआपलीं उपनांवें निरोखेकर,

ओरसकर, वरवडेकर अशीं लावलेलीं पहाण्यांत येतें. गोमंतकांत अनेक तालुक्यांत असलेल्यापैकीं शेणवीं कोलवाळकर, शेणवीं महात्मे, शेणवीं खाजीनयें अशीं उपनांवें वापरणारे मुळ शेणवीं कोलवाळकरच होत. ह्या शिवाय म्हापसें येथील पानकर कुटुंबिय श्रीकालभैरव आपले कुलदैवत मानतात. कायसुव व कोलवाळ येथील कांहीं नाईक कुटुंबीय श्रीरवळनाथ हे आपलें कुलदैवत मानतात.

देवस्थानच्या मालकी हक्काच्या जमिनी

१) "कुटुंबण कोलवाळकर" नांवानें ओळखण्यांत येणारी जमीन धारगळ गांवात तळें या वाड्यावर आहे. त्या जमिनींत देवालयें इमारती, देवालय सेवेकऱ्यांस निवासस्थानें असून ही सर्व जमीन, बागायत, निवासस्थानें, घरें, इत्यादि वेगवेगळ्या भागांत पेडणें तालुक्याच्या रेव्हेन्यु आफिसांत धारगळ गांवच्या मात्रीज प्रेदियालच्या रजिष्टर वहीवर या नांवावर नंबर ३४४७–३४४८–३४४९–३४५१–३४५४ ३४५५ – ३४५६ – ३४५८ – ३४५९ – ३४६० – ३४६१ –३४६२ – ३४६३ – ३४६५ या नंबरवर आहे. गोवामुक्ती कालानंतर गोमंतकांत भूमापन किंवा सर्व्हे सरकारकडून करण्यांत आली त्यांत, पेडणे तालुका धारगळ गांवच्या सर्व्हेत वरील जमीन सर्व्हे नंबर२१० सब-डिव्हीजन नंबर ५ वर रजिष्टर नोंद केलेली आढळते.

२) "फोंडे खाजन" नांवाची शेत जमीन मेणकुरें गांव, डिचोली तालुका, येथें असून त्या जमीनीचें क्षेत्रफळ १५००० चौरस मिटर आहे. ही शेतजमीन नवीन सर्व्हेमध्ये डिचोली तालुका गांव मेणकुरेच्या सर्व्हेमध्ये नंबर ७६ सब डिव्हीजन नंबर १ ते २६ वर रजिष्टर नोंद केलेली आढळते.

३) "शेणवीं महात्मे" कुटुंबियांनी श्री. नारायण रामकृष्ण शेणवीं महात्मे यांचे वारसदार वंशज यांनी देवालयांत श्रावणी सोमवारी देवकृत्यें करण्यासाठीं अर्पण केलेल्या जमिनी :– "गाळू उर्फ कुळणा" खुर्सावाडो, गांव कोलवाळ, तालुका बारदेश येथें असलेली

४) "शंभूचें भाटलें" तळीवाडा, गांव धारगळ, देवालयाचे जमिनी शेजारीं.

मूर्तीचे वर्णन

१. श्रीकालभैरव

श्रीकालभैरवाची मूर्ति अंदाजे तीन फूट उंचीची आहे. मूर्ति चतुर्भूज दिगंबर असून खालच्या उजव्या हातांत कमल, वरच्या उजव्या हातांत डमरू, वरच्या डाव्या हातांत त्रिशूल आणि खालच्या डाव्या हातांत पानपात्र (किंवा भिक्षापात्र) आहे. तसेंच खालच्या डाव्या हातांत लटकलेलें ब्रम्हकपाल आहे. वाहन कुत्रा शेजारी दोन पायांवर उभा असून ब्रम्हकपलांतून गळणारे रुधिर प्राशन करीत आहे. कानांत कर्णभूषणें, गळ्यांत रूंडमाळा आणि कमरेंत घंटा आहेत. डोक्यावर जटामुकूट आहे. मूर्तिच्या पायांजवळ उजव्या बाजूला एक आणि डाव्या बाजूला दोन नमस्कार करीत असलेल्या लहान द्विभूज मूर्ति आहेत. श्रींची मूर्ति प्रमाणबध्द आणि देखणी आहे.

२. श्रीरवळनाथ

श्रीरवळनाथाची मूर्ति अंदाजे अडीच फूट उंचीची आहे. मूर्ति चतुर्भूज मुकुट धारण केलेली असून तिच्या उजव्या खालच्या हातांत "तलवार", उजव्या वरच्या हातांत "त्रिशूल" असून डाव्या वरच्या हातांत "डमरु" आणि डाव्या खालच्या हातांत पानपात्र आहे. गळ्यामध्ये रुंडमाळा आहे. पायांकडे डाव्या बाजूला घागरी घेतलेल्या सेविका आहेत तर उजव्या बाजूला वाहन घोडा आहे.

३. श्रीमहालक्ष्मी

श्रीमहालक्ष्मीची मूर्ति दहा इंच उंच, पद्मासनस्थ चतुर्भूज असून खालच्या उजव्या हातांत तलवार व उजव्या वरच्या हातांत परशू आहे. डाव्या वरच्या हातांत कमळ आणि डाव्या खालच्या हातांत सुरापात्र आहे.

४. श्रीसप्तकोटीश्वर

श्रीसप्तकोटीश्वराचे लिंग एक फूट उंचीचे असून सहा इंच रुंद आहे. तसेंच ते गोल नसून चौरस आहे.

५. श्रीसांतेरी

श्रीसांतेरी हे जवळ जवळ सहा फूट उंचीचे वारुळ असून गर्भगृहाचा अर्धा भाग त्याने व्यापलेला आहे. उरलेल्या अर्ध्या भागांत पितळेचे पांच कलश स्थापन केलेले आहेत.

प्रतिवार्षिक देवस्थानांत होणारे महत्वाचे उत्सव

चैत्र महिना

चैत्र महिन्याच्या शुक्ल ९ मीला श्रीरामनवमी साजरी होते. ह्या उत्सवाची सुरुवात श्रीमती चंदाबाई कोलवाळकर ह्यांनी केली. त्यांनी वेगळ्या ठेवलेल्या देणगीतून व स्वतः खर्च करून त्यांच्या कुटुंबीय मंडळीने श्रीरामनवमी चालू ठेवली आहे. कथापुराण पूजा अर्चा यांन्वयें ती साजरी केली जाते.

श्रावण महिना

श्रावण महिन्यांतील प्रत्येक सोमवारी सकाळी पंचायतन अभिषेक-नैवेद्य व रात्रीं पुराण कीर्तनाचा कार्यक्रम असतो. पहिला सोमवार वैं. रघुवीर प्रभु कोलवाळकर यांच्या कुटुंबियांकडून साजरा केला जातो व रात्री गाऱ्हाणें "मणें पोरोब कोलवाळकर" ह्या नांवाने घातले जाते. दुसरा व चौथा सोमवार अनुक्रमें कै. दत्ता हरि महात्मे व श्री. श्रीपाद यशवंत कोलवाळकर यांच्यातर्फे त्याच पध्दतीने संपन्न होतो. तिसऱ्या श्रावणी सोमवारी मात्र पुन्हा रात्रीं पूजा पुराण कीर्तन व समाराधना असते व हा सोमवार "भाऊ महात्मे" (नारायण रामकृष्ण) यांच्या नांवाने त्यांची कुटुंबीय मंडळी साजरा करतात.

आश्विन महिना

चाळीस वर्षांपूर्वी दसऱ्याचा उत्सव शु. पंचमी ते चतुर्दशी असा दहा दिवस चालत होता व दिवाळीला 'कौल' दिला जात असे. सध्या दसऱ्याचा उत्सव शु. द्वादशी ते कृष्ण प्रतिपदेपर्यंत साजरा होतो. द्वादशीला रात्रीं सर्व देवांना गाऱ्हाणे घालून श्रीरवळनाथ, भूतनाथ व कालभैरव अशी तीन 'तरंगें' नेसवतात. त्रयोदशीला पहाटे "सीमोल्लंघन" होऊन तरंगे परत येतात. पौर्णिमेला थोरल्या धारगळीतील माऊली, रवळनाथ व भूतनाथ ह्या तीन तरंगांच्या भेटीला जातात व एका विशिष्ट जागेत सहा तरंगे एकमेकांना भेटतात. ह्या कार्यक्रमाला "मेळामेळ" असे म्हणतात व तो पाहायला शेंकडो लोक एकत्र येतात. प्रतिपदेला संध्याकाळी "कौल" झाल्यावर दसऱ्याच्या उत्सवाची सांगता होते.

कार्तिक महिना

पूर्वीपासून कालभैरव जयंती कार्तिक वद्य अष्टमीला पंचायतन अभिषेक नैवेद्याने पार पडत होती. त्या करतां कांही रक्कम महात्मे कुटुंबियांकडे श्रीमती श्यामा कोलवाळकर यांनी सुपूर्द केली होती व त्याच्या व्याजातून कालभैरव जयंतीचा खर्च चालत होता. त्यावेळच्या संस्थान कमिटीने सन १९७६ साली १४ नोव्हेंबर रोजी जयंतीला "उत्सवाचे" रूप दिले. आता दरवर्षी गोमंतकांतील सर्व महाजन व भक्त-गण मंडळी तसेंच बाहेरील कांही मंडळी हजर असतात. सकाळी लघुरूद्र, पंचायतन अभिषेक, नैवेद्य व समाराधना झाल्यावर दुपारी भक्तगणाची सभा, नंतर पुराण, कीर्तन, आरती व तीर्थप्रसाद झाल्यावर उत्सवाची सांगता होते. रात्रीं कोलवाळकर नाईक बंधूतर्फे नाटक सादर केले जाते. तसेंच कार्तिक वद्य अमवास्येला "दिवजांची जत्रा" साजरी होते. देवस्थानांतील तीनही दीपस्तंभ पणत्यांनी पेटवले जातात. नवविवाहीत वधू-वर किंवा लग्न होऊन पहिल्याच वर्षी देवाला आलेले जोडपे हातांत दिवे किंवा "दिवजां" घेऊन कालभैरव, सप्तकोटीश्वर व रवळनाथ यांच्या मंदिराला तीन प्रदक्षिणा घालतात. रात्री कांयसूवकर नाईक बंधूतर्फे नाटक सादर करण्यांत येते.

श्रीरवळनाथाची मूर्ती व तरंगाचे हात



श्रीकालभैरव देवस्थान, धारगळ, पेडणे

श्रीसप्तकोटीश्वराचे लिंग,



श्रीकालभैरव देवस्थान धारगळ, पेडणे

कौल प्रसाद

गोमंतकांतील बहुतेक देवस्थानांप्रमाणें याही देवस्थानांत प्रसाद कौल घेण्यासाठी देवस्थानचे कळावी महाजन आणि श्रध्दाळू भक्तजन बहुसंख्येनें येतात. श्रीकालभैरव दैवताकडे प्रसाद घेण्याची वहिवाट आहे. कौल-प्रसाद श्रीकालभैरव मुख्य मूर्तीसच लावतात व ते प्रसाद पटकळीच्या फुलांच्या कळ्यांचे एकंदर २१ ठिकाणी लावतात. मूर्तीच्या डाव्या बाजूची तिसरी किंवा पांचवी कळी प्रसाद झाला तर उत्तम प्रसाद झाला असें मानतात.

खालील दिवसांत कौल घेण्याची वहिवाट नाही

प्रत्येक शुक्रवार – एकादशी (स्मार्त) – अमावास्या – गुढी पाडवा – नागपंचमी – नारळी पौर्णिमा – श्रावणी सोमवार – श्रीगणेश चतुर्थी – सबंध आश्विन महिना – श्रीकालभैरव जयंती कार्तिक वद्य अष्टमी – शिमगोत्सव – फाल्गुन शुक्ल पौर्णिमा ते कृष्ण षष्ठीपर्यंत. श्रीसप्तकोटीश्वर लिंग ला सुरय तांदुळांचा कौल – प्रसाद लावतात. प्रत्येक बाजूला फक्त अकरा तांदूळ लावतात. पण हे काल – प्रसाद फक्तच श्रीसंस्थानचेच घेतात. खाजगी व्यक्तीविषयक घेण्याची वहिवाट नाहीं. श्रीरवळनाथाकडेहि प्रसाद घेण्यास पुष्कळ भाविक येतात.

देवस्थानची सर्वांगीण सुधारणा

कोणतेंहि देवस्थान गोमंतकांत सद्यःकालीन परिस्थितीत सुव्यवस्थितपणें चालविणें बाहेरून वरवर पहाणारास दिसतें तितकें सोपें नव्हे आणि याची सत्यता अनुभव घेतल्याशिवाय पटणार नाहीं हेंही तितकेंच खरें आहे. देवस्थानांत दैवतांची दैनंदिन पूजा-अर्चा, नंदादीप, महानैवेद्य इतर व्यवस्था, इमारतींची देखभाल, डागडुजी रंगसफेती, संरक्षण आणि साफसफाई इतकें तरी अत्यावश्यकपणें, वेळच्यावेळीं, नियमितपणें केल्याशिवाय राहता येणार नाहीं आणि हें इतकें तरी जोखीम घेऊन पार पाडण्यास त्या देवस्थानच्या व्यवस्थापक किंवा कार्यकारी मंडळाची कशी काय त्रेधा उडते, याचा प्रत्यय तें काम केलेल्यांसच अनुभवानें येतो. देवस्थानास पूर्वापार, येणारीं वार्षिक उत्पन्नें आज त्या त्या देवस्थानास मिळतात कीं नाहीं, याचा अनुभव घेतल्याशिवाय कसें कळणार ? देवालयाचा दैनंदिन अत्यावश्यक खर्च करण्यासाठीं, देवस्थानचें उत्पन्न नियमितपणें व्यवस्थापक कीमटीकडे कोणत्याही कारणामुळें आलें नाहीं तर व्यवस्थापक कीमटीला काय करणें शक्य आहे, याचा विचार अग्रक्रमानें व्हायला हवा. वारंवार स्थानिक वा बाहेरगांवच्या कळावी महाजनांकडे या किंवा त्या निमित्तानें देणगी किंवा मदतीची मागणी केली तरी सदासर्वकाल असा प्रकार चालूच शकत नाहीं हें सर्वांसच माहीत असल्यामुळें तें विस्तारपूर्वक येथें नमूद करण्याचें कारण नाहीं. असें असूनहि या दहा वर्षांच्या कालांत, श्रीकालभैरव देवस्थानाच्या व्यवस्थापक कीमट्यांनीं, फारच परिश्रम घेऊन कळावी महाजन आणि श्रध्दाळू भक्तजन यांचे सक्रीय सहाय्य मिळवून सर्वांच्या विश्वासास पात्र होऊन, देवस्थानाचा जो विकास प्रत्यक्षांत मूर्त स्वरूपात घडवून आणला, तो पाहता देवस्थानाचा संपूर्ण कायापालट झालेला दिसतो. त्या सर्व विकास कामांचा, सुधारणांचा परामर्ष सविस्तरपणें येथें स्थलाभावामुळें घेणें अशक्य आहे. यासाठीं वाचकांस थोडीतरी कल्पना यावी म्हणून त्यांची जुजबी नोंद खालीं देणें क्रमप्राप्तच ठरतें.

१) हमरस्त्यापासून देवालयाच्या प्राकाराच्या आंत जाण्यासाठीं रस्त्याचें रुंदीकरण श्रमदानानें करण्यात आलें व हें काम दि. १८ डिसेंबर १९७६ रोजी पूर्णपणें तडीस नेण्यात आलें.

२) श्रीसप्तकोटीश्वराच्या मंदिरासमोर सभामंडपाची आकर्षक बांधणी करून त्याचा उद्घाटन समारंभ गोवा, दमण आणि दीव सरकारच्या तत्कालीन मुख्यमंत्री श्रीमती सौ. शशिकलाताई काकोडकर यांच्या हस्ते ता. ४ डिसेंबर १९७७ रोजी शुभ मुहूर्तावर पार पाडण्यात आला.

३) अग्रशाळा बांधणी करून तिचा उद्घाटन समारंभ उद्योगपती श्री. वासुदेवराव व. शेणवीं धेंपे यांच्या हस्तें ता. २२ नवंबर १९७८ रोजी शुभमुहूर्तावर केला गेला.

४) प्रवेश महाद्वाराच्या सुबक आणि आकर्षक नमुन्याच्या बांधणीचें काम पूर्ण करून त्याचा उद्घाटन समारंभ श्रीगौडपादाचार्य संस्थान कैवल्यपूर (कवळें) मठाधीश श्रीमत् सच्चिदानंद सरस्वती स्वामी महाराज यांच्या पवित्र हस्तें ता. २९ नवंबर १९८० च्या शुभमुहूर्तावर साजरा करण्यांत आला.

५) सर्व देवालयें मंदिरांच्या गर्भागारांच्या भिंतींस फरशी बसवून देवतांच्या बैठकीस पाषाण बसवून सुधारणा इ. स. १९८१ सालीं केली गेली.

६) सर्व देवालयांच्या इमारतींची अंतर्बाह्य सुबक आणि मनोवेधक रंगसफेती.

७) देवस्थानांत प्रतिवर्षी नाटकांचे कार्यक्रम होतात. त्यासाठीं, सुयोग्यरीत्या पटांगण आणि रंगमंचाची बांधणी. या कामाचा कोनशिला समारंभ गोव्याचे माजी उद्योगमंत्री श्री. अनंत न. नायक यांच्या हस्तें ता. ५ डिसेंबर १९८५ रोजी साजरा करण्यांत आला.

८) देवस्थानांत अन्नसंतर्पण समाराधना उत्सव प्रसंगी होत असतात. त्यासाठीं स्टेनलेस स्टील धातूची दोनशें ताटें, प्याले व वाट्यांची सोय महाजनांच्या देणगीतून केली गेली.

९) देवस्थानच्या उत्सव प्रसंगी सभा बैठकीसाठीं खुर्च्यांची गरज म्हणून खुर्च्या स्टीलच्या महाजनांच्या देणगीतून खरेदी करून अडचण दूर केली.

इतक्याच कामांसाठीं सर्व प्रकारची दक्षता, मेहनत आणि काटकसर करूनसुध्दां आजच्या दरानें एकंदर दोन लाख रुपयांपेक्षां जास्त खर्च आला आणि ही सर्व रक्कम एकंदर श्रीकालभैरव देवाच्या कुळावी महाजनांनीं या दहा वर्षांच्या कालांत देणगी रूपानें कार्यकारी कमिटीच्या स्वाधीन उदार मनानें आणि श्रध्दापूर्वक केली म्हणूनच इतकें नेत्रदीपक विकास कार्य आणि कायापालट त्या देवस्थानांत घडून आला हें खरें असलें तरी, ही रक्कम जमवून अपार कष्ट आणि झीज सोसून हें विकास कार्य चिकाटीनें तडीस ज्या कार्यकारी मंडळीनें नेलें, ती मंडळी खरोखरच अभिनंदनास पात्र तर आहेच शिवाय, त्या मंडळीने सेवाभावें केलेलें हें कार्य त्या देवस्थानच्या दप्तरांत नमूद करून ठेवल्यास भावी पिढ्यांस मार्गदर्शन आणि उत्तेजन मिळण्यास कारणीभूत ठरेल.

देवस्थानची घटना नियमावली (कोंप्रोमिस)

या देवस्थानची घटना नियमावली (कोंप्रोमिस) सरकारने आपल्या पोर्तारीय नंबर ७९२ तारीख २९ डिसेंबर १९२७ या हुकुमाने पास करून तिची कायदेशीर अंमलबजावणी करण्यासाठीं ती बोलेती ओफिसियाल नंबर १५ तारीख २१ फेब्रुवारी १९२८ या सरकारी ग्याझेटमध्यें प्रसिध्द झालेली आहे. त्यांत त्या देवस्थानच्या तत्कालीन कांही कुळावी महाजनांचीं नांवेंही प्रसिध्द झालेलीं असून तीं एकंदर ५५ आहेत.

पौराणिक कथाभाग

श्रीकालभैरव दैवत केव्हां, कोणत्या कार्यकारणासाठीं अवतरले, अवतरल्यानंतर त्या दैवतानें कोणते महत्वपूर्ण कार्य तडीस नेलें, तें दैवत महापुण्यक्षेत्र जें काशी, त्या क्षेत्राचा एकमेव रक्षक म्हणून काशीक्षेत्रांत कसें राहिलें, त्या कालभैरवाचें केवळ नामस्मरण केल्यानें आणि कथा ऐकून तिचें नित्य पठण केल्यानें मोठीं पापें भस्म होऊन सर्व विघ्नेंही दूर कशीं होतात, हा कथाभाग षडाननानें अगस्ति मुनीला मोठ्या रसाळ वाणीनें श्रीकाशीखंडांत सांगितलेला आढळतो. श्रीकाशीखंड या महान ग्रंथाचा कर्ता शिवदास गोमा कवी हा असून मूळ श्रीकाशीखंड भारतीय अठरा महापुराणांपैकीं स्कंदपुराणांतील भाग आहे. हें सर्वांत श्रेष्ठ मानलें जातें. या पृथ्वीवर श्रीकाशीखंड हें नवखंडात्मक पृथ्वीहून निराळें असें दहावें खंड भगवान श्रीशंकरानीं निर्माण केलें.

हल्लीं वाचकांचा कल संस्कृत भाषा वा ओवी बध्द पद्य रचनेपेक्षां गद्य रचनेकडे झुकला आहे. त्यांची इच्छातृप्ती होण्यासाठी, हा कथाभाग स्थलाभावामुळें अगदीं नाइलाजानें संक्षिप्त स्वरूपांत आणि अगदीं थोड्या मजकुरांत खालीं देत आहोंत.

श्रीकालभैरवाचा जन्म

अगस्तिमुनींनीं कार्तिक स्वामीला विचारिलें कीं, त्या पुण्यभूमींत श्रीकालभैरवाची उत्पत्ती कशी झाली हें मला सांगा.

तेव्हां कार्तिक स्वामी सांगू लागले : पूर्वी एकदां त्रैलोक्यांत एक चमत्कार घडला. तो म्हणजे शिवाची इच्छा जी माया हिनें ब्रम्हादिकांना भुलवलें. तेव्हां मोठा प्रलय झाला. ब्रम्हदेव व विष्णु यांची बुध्दि फिरली. अशा तऱ्हेची विचित्र बुध्दि झाल्यानें सर्व सिध्दि असाध्य होऊन बसल्या. त्यामुळें त्यांना गर्व चढला. नित्याचा शुध्द सत्यमार्ग नाहींसा झाला. दोन्ही पक्षांत तंटा वादावादीला सुरुवात झाली. ब्रम्हदेव म्हणू लागला. या त्रैलोक्याची उत्पत्ती माझ्यापासून झाली आहे, त्यामुळें तुम्हां सर्वात मींच श्रेष्ठ आहें.

इकडे विष्णु म्हणूं लागला : अरे ! सृष्टीची निर्मिती तुझ्यापासून झाली असली तरी, तुझ्यासकट सर्वांना माझा आधार आहे. तेव्हां तुझ्यापेक्षां मींच श्रेष्ठ आहें.

अशा तऱ्हेनें दोघेही ठामपणें आपली बाजू मांडण्याचा प्रयत्न करीत होते. इतक्यांत नारदमुनी तेथें पोंचले. त्यांचें भांडण पाहून त्यांना नमस्कार करून नारदमुनी म्हणाले :– आतां ब्रम्हकल्पाची संख्या पुरी झाल्यानें विनाशकाल आला आहे, म्हणून तुम्हांला अशी विपरित बुध्दि आठवली. माझें ऐकाल तर, तुम्ही बद्रिकाश्रमाला जा. तेथें जे महामुनी आहेत, ते तुम्हांला ब्रम्हाचें खरें स्वरुप समजावून सांगतील व तुमच्या वादाचा निकाल करतील. मग तुमच्यांत कोण श्रेष्ठ हें आपोआपच कळेल.

नारदमुनींचें हें म्हणणें त्या दोघांनाहि पटलें. त्याप्रमाणें ते बद्रिकाश्रमास गेले. तेथें ब्रम्हस्वरूपांत विलीन झालेले मोठमोठे ऋषीमुनी वसिष्ठ, नामदेव, अत्रि, मार्कंडेय बकदाल्भ्य, दधिची, मरिची, पिप्पलायन, बसले होते. हे सर्व मोक्षमार्गाचे महावीर म्हणून समजले जातात. त्यांना पहातांच श्रीविष्णु म्हणाले :– तुम्हीं आम्हाला परब्रम्हाचें स्वरुप सांगा. आजपर्यंत युगानुयुगें तुम्हीं तप केलें आहे, तेव्हां तुम्हांला ब्रम्हाचें स्वरुप कसें दिसलें तें सांगा. विष्णूचें का ब्रम्हदेवाचें. केवळ हें समजून घेण्यासाठी आम्हीं मुद्दाम येथें आलों आहोंत.

नारदमुनींचा सल्ला ! ऋषी–मुनींचा निर्णय !

हें ऐकतांच ते महामुनी अत्रि, दधिची, आपआपसांत चर्चा करू लागले. ते म्हणूं लागले :– आतां ब्रम्हकल्पाची मुदत भरली आहे. ब्रम्हकल्प हा ज्याचा केवळ एक क्षण, हरीचा अंत तो ज्याचा दिवस, जो वेदांना अगोचर, तसेंच पुष्कळ ब्रम्हांडाची केवळ क्षणमात्रांत उलथापालथ करण्याचा ज्याचा खेळ, तो कुणालाहि चटकन् न समजणारा निर्गुण असा ईश्वर म्हणजे शंकरच होय. पण, हें यांना आतां कसें सांगायचें असा पेंचप्रसंग आल्यावर मग अत्रि पुढें झाले आणि म्हणाले :– या तुमच्या बोलण्यावरून मला एकच गोष्ट स्वच्छ दिसते कीं, तुमची बुध्दि चळली आहे. त्या महदादि शिवइच्छेनें तुम्हांला कसें भुलविलें तें तिचें तीच जाणे. कांही समजत नाहीं.

विचारलेल्या प्रश्नाचे सरळ उत्तर न देतां अत्रि हे कांही तरी सांगत आहेत असें पाहून श्रीविष्णु म्हणाले :– अहो, कमाल आहे. तुम्हीं तपांत एवढा संपूर्ण जन्म घालीवला तरी अजून तुम्हांला साधें ब्रम्ह-स्वरूप समजत नाही. अहो ! विष्णुतत्व सोडून उगाचच तें शिवतत्व जपण्यांत व्यर्थ वेळ कां घालीवता ?

तें विचित्र बोलणें ऐकतांच मार्कंडेय मुनींनी तोंड उघडलें. ते म्हणाले :– तुला ब्रम्हस्वरूपच हवें ना. ऐक तर मग. अनंत ब्रम्हांडे व्यापून असंख्य प्रलय झाले तरीहि अचल असणारे केवळ एक शिवस्वरूपच आहे. हा वेदांचा सिध्दांत आहे. तेव्हां तुम्हीं त्यांच्याकडे जाऊन 'तुम्हीं ब्रम्ह' असें लिहून आणा. म्हणजे तुम्हींच ब्रम्ह, हें तुमचें म्हणणें आम्हीं मान्य करूं.

हें ऐकतांच रागारागानें विष्णु आणि ब्रम्हदेव मेरूपर्वताच्या ईशान्येला असलेल्या वेदपुरीला गेले. तेथें पोहोंचताच त्यांनी प्रथम वेदांची भेट घेतली आणि त्यांनाहि ब्रम्हदेवानें आपली शंका विचारली. ऋग्वेद म्हणाला, शंकराची जी इच्छा, जी महदादिमाया तिनें तुम्हांला उत्पन्न करून तुमच्याकडून सृष्टीकार्य करीवलें. विष्णु आणखीनच रागावला व म्हणाला, तुम्हांला ब्रम्ह कळतच नाही.

तेव्हां ऋग्वेदानें त्यांना यजुर्वेदाकडे पाठविलें. यजुर्वेदाला विष्णूनें तोच प्रश्न विचारला, तेव्हां तोहि विष्णूला समाधानकारक उत्तर देऊं शकला नाही. मग त्यानें त्यांना सामवेदाकडे पाठविलें. विष्णूनें तोच प्रश्न विचारला. तेव्हां सामवेदानें पहिल्या दोघांचेच अनुकरण केलें आणि विष्णु व ब्रम्हदेवास अथर्ववेदाकडे पाठविलें. तो म्हणाला, मी त्या तिघांपेक्षां वेगळें काय सांगणार. कारण ब्रम्हस्वरूप खरें खुरें तसेंच आहे. विष्णु म्हणाला, तू पण त्यांच्याच माळेंतील. तुलाहि खरें ब्रम्ह कळतच नाही. तेव्हां अथर्ववेदानें त्या दोघांना आपल्या पित्याकडे ओंकाराकडे जाण्यास सांगितलें.

ते ओंकाराकडे गेले तेव्हां तो ओंकार प्रणव त्यांना साक्षात् परमात्मा शिवाप्रमाणेंच भासला. ओंकार म्हणजे ज्ञानाचा उध्दवच होय किंवा वेदांना निर्माण करणारी शिवइच्छाच, जिला त्रिपदा म्हणतात. तीच म्हटल्यास चालेल.

ॐकार ! वेदांचा निर्माता !

विष्णूनें तिलाहि तोच प्रश्न विचारतांच त्रिपदा म्हणजेच गायत्री म्हणाली. वेदांनी तुला सांगितलेलें बरोबर आहे. विष्णु व ब्रम्हदेव हे मायेपासूनच झालेले आहे. त्यांचा मायेसह संहार होऊं शकतो. पण, परमात्मास्वरूप मात्र अचल, निरंतर असतें. पुढें ती असेंहि म्हणाली, सर्व कांहीं त्या साक्षात् शिवाच्या हातांत आहे. त्याचें स्वरुप कोणालाहि समजत नाही. एवढेंच काय पण मी त्याच्या मुकुटांत असते पण, मलाहि तो अगम्यच आहे.

हें सर्व ऐकून ते म्हणाले, तुम्हांला कोणालाहि निर्गुण ब्रम्ह समजतच नाहीं. हा चाललेला सर्व प्रकार त्या सर्वव्यापी शंकराला समजतच होता. विष्णूचें व ब्रम्हदेवाचें बोलणें ऐकून शंकराला भयंकर राग आला व त्यानें आपला उजवा हात झाडला. त्या क्षणींच त्याच्या हातापासून महाकाळ निर्माण झाला तोच हा कालभैरव होय.

हा कालभैरव उत्पन्न होतांच शिवाच्या आज्ञेसाठी हात जोडून उभा राहिला तेव्हा शंकरानें त्याला विष्णूनें आणि ब्रम्हदेवानें चालीवलेला सर्व प्रकार सांगितला व म्हणाला, अशा तर्‍हेनें विष्णु व ब्रम्हदेवानें ऋषी, वेद, आणि गायत्री, या सर्वांचा धिःकार करून अपमान केला आहे त्या दोघांना स्वतःविषयीं फारच गर्व चढलेला दिसतो. ती त्रिपदा माझी पूर्ण इच्छा आहे. तिनेंच देवांची उत्पत्ती केली. तिचाहि असा धडधडीत अपमान याचा अर्थ काय ? तेव्हां आतां तूं वेदपुरीस जाऊन चारीहि वेदांची स्थापना कर. त्रिपदेला आश्वासन दे, व आतांपर्यंत चालत आल्याप्रमाणेंच सृष्टीक्रम चालू ठेव.

ही आज्ञा होतांच कालभैरव शंकराचा आशीर्वाद घेऊन तेथून निघाला तो थेट वेदपुरीला विष्णु व ब्रम्हदेव वादविवाद करीत होते त्यांच्यामध्यें जाऊन उभा राहिला. त्याला असा अचानक येऊन उभा राहिलेला पाहून त्यांनीं त्याला विचारलें, असा एकदम आमच्या मध्ये आलास. तूं आहेस तरी कोण ? तेव्हां तो म्हणाला : त्रिभुवनांत जे असे वाद घालतात त्यांच्यात खरें काय व खोटें कोण तें मला

समजतें. हें ऐकतांच त्या दोघांना फार आनंद झाला. मग त्यांनी आजपर्यंत इतक्या जणांना विचारलेला तोच प्रश्न कालभैरवाला विचारला. त्याचें उत्तर ऐकण्यासाठी दोघेहि अगदी आतुर झाले होते. कालभैरव म्हणाला, 'हात्तीच्या' अरे, यासाठीं दोघे भांडत होतांत काय ? तुमच्या प्रश्नाचें उत्तर माझ्या नखाच्या अग्रावर आहे. तुम्हां दोघांत श्रेष्ठ कोण हें मी सहज सांगू शकेन. आतां मी सांगतों तें ऐका. नारायणा ! तूं माझे पाय पहाण्यासाठीं पार सप्तपाताळांत जा आणि ब्रम्हदेवा ! तूं माझा मुकुट पहाण्यासाठीं आकाशांत जा. मुकुट एकवीसाव्या स्वर्गात आहे तर चरण पादुका सप्तपाताळांत आहेत. आतां जो लवकर पाहून येईल तो श्रेष्ठ ठरेल.

कालभैरवाचा सल्ला मानणारे ब्रम्हा-विष्णु

कालभैरवाचें म्हणणे त्या दोघांना एकदम पटलें. मग त्याच्या सांगण्याप्रमाणें ब्रम्हदेव आकाशांत आणि विष्णु पाताळांत गेले.

इकडे विष्णु पाताळांत कालभैरवाचे पाय शोधतां शोधतां थकून गेला. पायांचा पत्ता लागत नव्हता. विचार करीत चालतां चालतां त्याला अचानक सिध्दिबुध्दीचा पति पाताळकंद दिसला. तो आपल्या कमला-सनावर शंकराचें ध्यान करीत बसला होता. त्याला पाहून विष्णूनें त्याची कोण, काय, वगैरे चौकशी सुरू केली. तेव्हां तो म्हणाला :- मी शिववृंद आहे. माझें नांव पाताळकंद आहे. मलाच गणपती असेंहि म्हणतात. मी नित्य परब्रम्हस्वरूप जपत असतो. तें निर्गुण अगम्य भासणारें ब्रम्ह मला कळले आहे.

मग पाताळकंदानेंहि त्याची चौकशी केली तेव्हां वादापासूनची सर्व सविस्तर हकिगत सांगितली. तें ऐकून गणपतीला हसूं आवरलें नाहीं. त्याला विष्णूचे म्हणणे खरें वाटेना. तो म्हणाला, तू कोण आहेस ती खरी हकिगत मला सांग. तेव्हां विष्णु म्हणाला, मी महाविष्णु आहे. येथपर्यंत त्या काल-भैरवाचे पाय शोधीत आलों आहें. आतां मात्र अगदी थकलों आहें.

यावर गणपतीनें विचारिलें :- तू कोणता महाविष्णु ? गणपतीचा हा विचित्र प्रश्न ऐकतांच, या त्रैलोक्यांत माझ्याशिवाय आणखी किती नारायण आहेत, अशी त्याच्या मनांत शंका आली. गणपतीच्या प्रश्नावर तो विचार करीत होता.

इतक्यांत त्याने दुसरा प्रश्न विचारला. तो म्हणाला :- तुला अशा तऱ्हेनें पादुकांच्या शोधार्थ निघाल्यास किती दिवस झाले ? यावर विष्णु म्हणाला :- आज लक्ष कोटी युगें उलटली तरीहि मी असा पाताळांत वेड्यासारखा प्रवास करीतच आहे. तेव्हां पाताळकंद त्याला म्हणाला : तुझा हा उद्योग व्यर्थ आहे. आतां उगीच जीव श्रमवू नकोस. मी अजून येथेंच शिवाचे ध्यान करीत बसलो आहे. तुला अजून अनुग्रह झाला नाहीं, मोठे अजब आहे. तुला गुरुमंत्र नाहींच व वेदशास्त्रेंहि मान्य नाहींत. म्हणजे मला वाटतें कीं तू महदादि मायेच्या मोहनास्त्रांत गुंतला आहेस.

पाताळकंदाने गुरूमंत्र दिला !

पाताळकंदाच्या म्हणण्याचा विष्णूनें खूप विचार केला व मग त्याच्यापासून गुरूमंत्र घेऊन शिवाचा दास होण्यास तयार झाला. अशा तऱ्हेने विष्णूचे मन पालटून त्याचा गर्व गेला, व मायेचा पडदा दूर झाला. मग त्यानें पाताळकंदाची खूप स्तुति केली. पाताळकंदानेंहि त्याला अभय वर दिला व शिवाचें स्वरूप समजावून सांगितले.

तो म्हणाला :- तो जगज्जेता विश्वंभर, त्रैलोक्य व्यापून राहिला आहे. त्याचा महिमा काय वर्णावा ! तो अगाध व अनुपमेय आहे. ज्याप्रमाणे नद्यांमध्ये गंगा, समुद्रांमध्ये क्षीरसागर, नगरांमध्यें काशी, त्याच-प्रमाणे तो स्वयंभू आहे. तो विश्वव्यापक शंकर सर्वात श्रेष्ठ आहे.

अशा तऱ्हेने पाताळकंद विष्णूचा गुरू झाला, व त्याने त्याला उपदेश करून मंत्र दिला. मंत्र जपतांच विष्णूला शिवाच्या पादुका आपल्या हृदयांत दिसल्या. मग त्यानें पाताळकंदाचे स्तवन केलें. अशा तऱ्हेनें विष्णूची शंका दूर झाली व त्यानें परत येऊन मोठ्या नम्रतेनें कालभैरवाला नमस्कार केला.

इकडे स्वर्गात मुकुट शोधण्यासाठीं गेलेला ब्रम्हदेवही विष्णुसारखाच प्रवास करीत राहिला. अशा तऱ्हेनें फिरतां फिरतां ब्रम्हकल्पाची संख्या पूर्ण झाली. तेथें कामधेनु व केतकी या दोघींनी त्याला पाहिले. जगन्माता समजली जाणारी त्रिपदा गायत्री ही ब्रम्हदेवाची माता. तिने आपल्या पुत्राला लगेच ओळखलें व त्याला कुठे जातोस म्हणून विचारिलें.

ब्रम्हदेवानें तिला आतांपर्यंत घडलेला सर्व वृत्तांत सांगितला. तो ऐकून ती म्हणाली :– अरे बापरे ! म्हणजे ब्रम्हकल्प झाला तेव्हां तूं एक ब्रम्हांड चालत आलास. अशीं असंख्य ब्रम्हांडे ज्याच्या गणतींतहि नाहींत, जगाची उलथापालथ करणें हा ज्याचा हाताचा मळ आहे, तो विश्वंभर शिव कोणाला कळणें शक्य आहे काय ? आतां पर्यंत अनेक ब्रम्हदेव आमच्या समोरच याच मार्गानें तूं सांगतोस त्या प्रमाणें मुकुटाचा शोध घेण्यासाठीं गेले, ते गेलेच, परत आले नाहींत. अशा तऱ्हेनें ज्यासाठी जायचे तें न करतां परतहि यायचें नाहीं, तर मग जायचें तरी कशाला ?

ब्रम्हदेवालाहि दुर्बुद्धी आठवली !

तें ऐकतांच ब्रम्हदेव काळजींत पडला. गेलों तर मागच्याच सारखी स्थिती होणार व गेलों नाहीं तर विष्णु आपल्यापेक्षां श्रेष्ठ ठरणार. असे विचार मनांत येतांच त्यानें एक युक्ती केली. मुकुट न पाहातांच खोटें सांगायचें त्यानें ठरविलें. मग त्यानें कामधेनु म्हणजेच गायत्रीची प्रार्थना केली. मी तिन्ही त्रिकाळ तुझाच जप करतो. तूं माझ्याच बाजूनें साक्ष दे. कामधेनु म्हणाली, अशी खोटी साक्ष देणें म्हणजे महापाप आहे. त्यासाठीं महादुःखें भोगावीं लागतात. तेव्हां तूं म्हणतोस तशी खोटी साक्ष द्यायला माझें मन धजत नाहीं.

तेव्हां ब्रम्हदेव म्हणाला :– अग, तुझें ऐकशेंआठ वेळां नामस्मरण केलें म्हणजे प्राणी दोषमुक्त होतो. मग, तुला स्वतःला कुठला दोष लागणार ?

अशा तऱ्हेनें तिची समजूत घालून युक्तीयुक्तींनें ब्रम्हदेवानें तिला अनुकूल करून घेतली. मग तो केतकीलाही साक्षी म्हणून आपल्या बरोबर घेऊन कालभैरवाकडे गेला तेथें पाहतो तर विष्णु आधींच येऊन कालभैरवाच्या डाव्या बाजूस बसला होता.

तें पाहून त्याला अतिशय वाईट वाटलें. पण तें मनांतच ठेवून तो कालभैरवाला म्हणाला, तुम्हीं सांगितल्याप्रमाणें मी मुकुट पाहून आलो. या दोघींना विचारा तेव्हां कालभैरवानें गायत्रीला विचारिलें. काय ग, खरें असेल तें सांग. यानें मुकुट पाहिला कीं नाहीं ?

गायत्रीनें आणि केतकीनें ठरल्याप्रमाणें साक्ष दिली. तें ऐकून कालभैरव प्रलयकालच्या वडवानलाप्रमाणे भडकून उठला. त्याचा तो भयंकर राग पाहून संपूर्ण ब्रम्हांड गोल थरथरां कांपूं लागला. श्रीविष्णुची तर घाबरून गाळणच उडाली. तो पळूनच गेला. इतक्यांत कालभैरवानें आपल्या डाव्या हाताच्या नखानें ब्रम्हदेवाचें शिर उडविलें. मग त्यानें गायत्रीला शाप दिला. तूं खोटे बोललीस म्हणून आतां तुझें तोंड अपवित्र होईल. तुझ्या जिभेला कांटे असतील. पण, तुझें गोमय, गोमूत्र व दुध पवित्र राहतील. तूं निरनिराळ्या रंगाची होशील. त्याचप्रमाणें ही केतकिहि कोणीं शंकराच्या मस्तकावर वहाणार नाहीं. आणि तिच्या सर्व अंगावर कांटे निर्माण होतील.

अशा तऱ्हेनें खोटे वागल्यामुळें त्या दोघींना भयंकर शाप मिळाले आणि ब्रम्हदेव नष्ट झाला. मग तेथें प्रत्यक्ष शंकर प्रकट झाला. त्याच्या बरोबर नंदी, मणिमंत, शैल गोकर्ण, विघ्नहंत, घंटाकर्ण, शंख,

किर्तिमुख, वीरभद्र हे गणीहि होते. तेथें पडलेले ब्रम्हदेवाचे प्रेत सर्वांनी पाहिलें. तें पाहतांच शंकराला दया आली. तो कालभैरवाला म्हणाला :– तू याला उगाचच मारलेंस. ब्रम्हहत्या म्हणजे मोठे पाप आहे हें तुला माहीत नाहीं काय ? आतां तुझे पाप संपेपर्यंत ही ब्रम्हहत्या नित्य तुझ्या बरोबर राहील.

कालभैरवाला अतिउत्साह नडला !

हें ऐकतांच कालभैरव तेथें क्षणभरीहि न रहातां तीर्थाटनास निघाला. तो गेल्यावर मग शंकरानें ब्रम्हदेवाला उठविण्यासाठी पाणी मंत्रून तें त्याच्या अंगावर शिंपडलें, त्याबरोबर तो सजीव झाला. मग वीरभद्रानें डमरू घेऊन शिवमंत्र जपला तेव्हा ब्रम्हदेवाला एकाएकीं चार तोंडें निर्माण झाली. शंकराच्या कृपादृष्टीनें आपल्याला पुन्हा जीवन मिळालें व चार तोंडेंहि मिळालीं असें पाहून ब्रम्हदेवानें शंकराची पुष्कळ स्तुति केली. मग त्यानें शंकराला नमस्कार करून आपले सर्व अपराध कबूल केले. अशा तऱ्हेने विष्णु व ब्रम्हदेवाच्या वादाचा शेवट झाला.

इकडे शंकराच्या पाया पडून कालभैरव जो निघाला तो थेट पाताळांत गेला. तेथें त्यानें भोगावतीचें स्नान केलें. व हाटकेश्वराची मनोभावें पूजा केली. त्यानंतर त्यानें स्वर्गातील सर्व तीर्थांचें दर्शन घेतलें. नंतर अतिशय पवित्र अशा मंदाकिनीचें स्नान करून तारकेश्वराची यथासांग पूजा केली व तो वैकुंठाला गेला.

वैकुंठाला कालभैरवास पहातांच श्रीविष्णुस मागची सर्व घटना आठवली. ती त्यानें लक्ष्मीला सांगितली. कालभैरव म्हणजे साक्षात् शंकरच आला, असें समजून त्या उभयतांनीं त्याचा मोठा सन्मान केला. त्याला नमस्कार केला व षोडषोपचारांनीं पूजादि केली. मग श्रीविष्णु म्हणाला :– तुझ्या केवळ नामस्मरणानें सहस्त्रावधी ब्रम्हहत्या जळून जातात. मग तुझ्या पाठीमागें ब्रम्हहत्या लागली हें आश्चर्यच आहे.

मग तीं पुन्हा कालभैरवाच्या पायां पडलीं व त्यांचें स्तवन केलें तें पाहून कालभैरव म्हणाला : मी तुमची ही शुध्द भक्ति पाहून समाधान पावलों आहे. महादैत्यांना वठणीवर आणण्यासाठीं मी तुला अद्‌भूत शक्ति देत आहे. युध्दांत नेहमीं तुझाच जय होईल व सर्व सिध्दींवर तुझें वर्चस्व राहील.

अशा तऱ्हेचा वर देऊन कालभैरव निघून गेला. तेव्हां त्या उभयतांनीं ब्रम्हहत्या नांवाची अक्राळ विक्राळ कृत्या त्याच्या मागें जात असलेली पाहिली. मनुष्याच्या तोंडांचीं कुंडलें तिने कानांत घातलीं होतीं व तशाच तोंडांची माळ गळ्यांत घातली होती.

अशी ती भयंकर दिसणारी धिप्पाड कृत्या पहातांच विष्णूनें तिला थांबविलें व ती कोण, भैरवाच्या मागें कां, वगैरे विचारिलें. तेव्हा ती म्हणाली, मी ब्रम्हहत्या आहे. या भैरवाच्या संगतीनें माझा उध्दार होईल. असें सांगून शंकरानें मला त्याच्याबरोबर राहण्यास सांगितलें आहे.

मग ती कालभैरवाच्या मागें मृत्युलोकांत गेली. तेथील सर्व तीर्थे करून कालभैरव, प्रसिध्द अशा सेतुबंध रामेश्वरास गेला. अशीं अनेक पवित्र तीर्थे केलीं तरीहि ब्रम्हहत्या त्याची पाठ सोडीना. शेवटीं तो आनंदवनाला गेला. तेथें जातांच ब्रम्हहत्या कांपूं लागली. तें पाहून त्याला आनंद झाला. त्याच्या हातचे ब्रम्हकमळ गळून गेलें व त्याबरोबर ब्रम्हहत्याहि गंगेंत पडली. मग भैरवानें त्या आनंदातच गंगास्नान केलें व विश्वनाथाला नमस्कार करून तो तपःश्चर्येस बसला. तेथें त्यानें आठ लक्ष संवत्सरपर्यंत कठोर तपाचरण केलें. तेव्हां शंकरानें प्रकट होऊन त्याला प्रत्यक्ष दर्शन दिले. त्याचे अनुष्ठान पाहून शंकर प्रसन्न झाला. व त्याला त्याने वर दिला.

"आतां तुझ्या मागची ब्रम्हहत्या गेली. त्यामुळें तू निर्दोष झालास. आजपासून काशीचा रक्षक म्हणून मी तुला नेमत आहें. मी सांगेन त्याला काशीला आणत जा."

शंकराचा असा वर मिळाल्यावर कालभैरव काशीला राहिला. त्याचें केवळ नामस्मरण केल्यानें व ही कथा ऐकून तिचें नित्य पठण केल्यानें मोठीं पापेंहि भस्म होऊन सर्व विघ्नें दूर होतात. अशा तऱ्हेनें षडाननानें अगस्ति मुनीला कालभैरवाची कथा मोठ्या रसाळ वाणीनें सांगितलेली श्रीकाशी खंडांत वर्णिलेली आढळते.

शेवटीं

नमः काशीनिवासाय नमो दण्डक वासिने ।
नमोऽनंत प्रबोधाय भैरवाय नमोनमः ॥

२२

श्रीनवदुर्गा देवस्थान

हडकोळण – फोंडा



श्रीनवदुर्गा, हडकोळण

श्रीनवदुर्गा देवालय, हडकोळण

श्रीनवदुर्गा देवस्थान

हडकोळण – फोंडा – गोवा

गोमंतकांत प्राचीन काली ज्या गांवच्या जत्रेत एका उंच लाकडी खांबावरील टोकास बैलगाडीच्या चाकाएवढे चाक बसवून त्या चाकास खालच्या बाजूने चोहीकडे चार माणसे त्यांच्या पाठीच्या चामडीस लोखंडी धारदार टोकाचे गरे टोचून त्या माणसांस लोंबकळत ठेवून ते चाक लांब दोरीने गरागरा फिरवून त्या लांकडी उंच खांबाच्या मुळाशी गगनभेदी आवाज काढणारी रणवाद्ये मोठमोठे नगारे, तासे वाजवून 'गऱ्यांची जत्रा' साजरी करीत असत, आणि इ. स. १८४४ साली हा कार्यक्रम स्वतः डोळ्यांनी पाहून हा एक मनुष्यवधाचाच प्रकार तत्कालीन पोर्तुगीज गव्हर्नर साहेबांनी मानून लगेच हुकुम देवून हा कार्यक्रम कायमचा बंद केल्याचे सरकारी ऐतिहासिक दप्तरांत लेखी पुराव्यावरून स्पष्टपणे कळते आणि त्याच गांवच्या जत्रेत प्रतिवर्षी एका रेड्याचा बळी देण्याचा कार्यक्रम आजच्या कालापर्यंत चालत आलेला आहे ते गांव, तेथील प्रमुख देवालय श्रीनवदुर्गा मंदिराचा हा संक्षिप्त इतिहास आहे.

फोंडा तालुक्यातील हडकोळण गावात असलेले श्रीनवदुर्गा देवालय

गोव्यातील जत्रांसह लोकपरंपरेचा अभ्यास करण्यासाठी, तरुणानी संशोधन कार्य हाती घ्यावे, पूर्वीच्या काळचे सांस्कृतिक, सामाजिक जीवन याचा यथोचित अर्थ लावण्यासाठी आणि हस्त ऐवजाच्या दृष्टीने त्याला मोठे महत्व असल्याचे सांगून लोकपरंपरेचे हे क्षेत्र म्हणजे इतिहासतज्ञ आणि लेखकांसाठी 'ज्ञानाचा मोठा ठेवा' आहे कारण, गोव्यांतील लोकपरंपरा पध्दती आणि देवस्थानांच्या जत्रा यांचा परस्पराशी जवळचा संबंध असून ते सृजनशील लेखक आणि कलाकारांसाठी एक आव्हान आहे. त्यांच्या या कार्यामुळे या परंपरागत बारशाचे महत्व भावी पिढीसमोर आणणे शक्य होईल' असे आवाहन गोवा सरकारचे सन्माननीय माहिती मंत्री श्री. वैकुंठराव देसाई यांनी शेल्डे येथील श्रीसांतेरी श्रीशांतादुर्गा मंदिराच्या १२ दिवसांच्या जत्रोत्सवा निमित्ताने आयोजित करण्यांत आलेल्या समारंभात, प्रमुख पाहुणे म्हणून बोलताना केले असल्याचे वृत्तपत्रातून प्रसिध्द झाले होते (दै. राष्ट्रमत, सोमवार ता. ३ मार्च १९८६).

खरोखरच, मंत्री महाशयांनी केलेले हे जाहीर आवाहन अतिशय मोलाचे, फार महत्वाचे, आत्यंतिक गरजेचे आणि उत्कृष्ट दर्जाचे आहे यांत संशय नसल्याने स्वागतार्ह आहे हे कोणीही म्हणू शकेल. पण आजच्या तरुणास हे संशोधन कार्य हाती घेण्याचे आवाहन करण्यापूर्वी माहिती मंत्र्यांनी थोडीशी माहिती किंवा कानोसा घेऊन यापूर्वी या आणि अशा प्रकारचे गोव्यांत ज्यांनी ज्यानी संशोधन करण्याचे मनःपूर्वक आणि परिश्रमपूर्वक कार्य करण्यात आपली हयात खर्च केली, त्यास या कार्यात कोणता कसकसा अनुभव आला, अडचणी काय आहेत, त्या खऱ्या किंवा खोट्या, वगैरे साधक बाधक गोष्टींबद्दल चौकशी माहिती घेऊन जर त्या अडीअडचणी दूर करण्याचा प्रयत्न करून हे तरुणास आवाहन केले असते, तर त्यामुळे प्रत्यक्षात फलनिष्पत्ती होण्यास सहाय्यभूत ठरले असते. अद्याप वेळ गेलेली नाही. असो. मंत्रीमहाशयांनी जाहीररित्या केलेल्या आवाहनाचा पूर्ण आदर करून आज हा लेख वाचकांपुढे सादर करीत आहोत. आणि या लेखात जी माहिती दिली आहे, ती संशोधन करून अस्सल कागदपत्र सरकारी ऐतिहासिक प्राचीन दप्तरातून उपलब्ध झालेल्या पुराव्यांसह दिली असल्याने, त्याच्या सत्यत्वाबद्दल शंका येण्याचेही कारण नाही. आणि त्या माहितीवरून गोव्यातील जत्रांसह लोकपरंपरेचे दर्शन जिज्ञासू आणि अभ्यासू वाचकांस होऊ शकेल.

गोव्यातील बहुतेक सर्वच देवस्थानांत लहान मोठ्या प्रमाणात त्या त्या देवस्थानाचे वार्षिक जत्रोत्सव होतात. त्यातील सर्वच देवस्थानात जरी म्हणता येणार नाही, तरी त्यातील अवघ्या थोड्या तरी देवस्थाना-

तील जत्रांतून अंधश्रध्दा जोपासलेली आजच्या कालातही आढळून येते. भूताखेतांना, देवचारांना, वेताळ, रवळनाथ नांवाने ओळखण्यांत येणाऱ्या देवतांना, खूष ठेवण्यासाठी म्हणा, किंवा त्यांच्या भक्तांनी त्याकडे नवस केलेले फेडण्याच्या निमित्त कारणानेम्हणा, बकरा, कोंबडा अशा निष्पाप जनावरांना बळी देण्याचे प्रकार चालू असतात. रेड्याचा बळी देण्याचा कार्यक्रम हडकोळण येथे प्रतिवार्षिक जत्रोत्सवांत पार पाडला जातो. आम्ही आजच्या कालात ज्या गोष्टीस अंधश्रध्दा म्हणून संबोधित आहोत, आणि निष्पाप जनावरांचा बळी देण्याचा प्रकार पहात आहोत, तो प्रकार फार प्राचीन काळी जत्रेच्या वेळी प्रत्येक वर्षी मनुष्याचा बळी देण्याचा प्रघात असावा, आणि पुढे पुढे मनुष्याचा बळी देणे फार कठीण आणि अशक्यच झाल्यामुळे त्या ऐवजी एखाद्या जनावराचा बळी देवून ही रुढी चालू ठेवून मनुष्यावरील संकट टाळून वेळ मारून नेणेचा प्रकार असावा, असे वाटणारे कथाभाग काही कमी नाहीत. जनावरांचे बळी देतांना, त्यात बकरा, कोंबडा यांची निवड केली तशी वाघ, सिंह लांडगा अशा हिंस्त्र पशूंची निवड केलेली नाही, हेही लक्षात घेण्यासारखे आहे. हल्लीच्या पन्नास वर्षाच्या कालांत कोंबडा, बकरा अशा जनावरांचे बळी ज्या देवस्थानांत पूर्वापार देण्याची पध्दती होती, ती बंद करून काही देवस्थानांत कोहळा हे फळ छेदून त्याचा बळी देण्याची रुढीसुरू केलेली दिसते.

हडकोळण गांवाची संक्षिप्त ऐतिहासिक माहिती आणि
हडकोळणचा शके १६१० विभवनाम संवत्सर म्हणजे इ. सन १६८८ चा शिलालेख

गोव्याची राजधानी पणजी शहरांतून मडगांवी फोंडामार्गे जातांना, वाटेंत भाणस्तारीचा पूल लागतो. तो पूल संपताच स्टँडवर प्रवासी उतरला म्हणजे तेथेच डावीकडे जवळच भाणस्तारीस दर आठवड्याच्या शुक्रवारी मोठा बाजार भरण्याची जी जागा आहे त्या जागेपासून जरासे पुढे गेल्यावर उजवीकडून जाणारा रस्ता हडकोळण गांवच्या टेकडीवर जातो. भाणस्तारीहून फार तर अवघ्या दोन मैलावरील हा गांव, रस्ता वळणे घेत घेत हडकोळणच्या श्रीनवदुर्गा देवालयाजवळ येऊन थांबतो. त्यापूर्वी वाटेत लागते श्रीबेताळाचे देवालय. श्रीबेताळाच्या शेजारीच माणसाएवढ्या आकाराची श्रीबेताळाप्रमाणेच श्रीवेताळाची प्रचंड दगडी मूर्ती. श्रीबेताळ व वेताळ दोघांचीही नजर देवालयासमोरच्याच काळ्या भव्य दगडावर रोखलेली ! या देवालयाकडे येणाऱ्या रस्त्यावर उजव्या बाजूस एका झाडाजवळ एक शिलालेख होता, व तो शिलालेख गोवामुक्तीकालानंतरही त्या जागी होता पण, तो शिलालेख सध्याच्या कालांत त्याजागी दिसत नाही. गोवा पुरातत्व खात्याने तो तेथून हलवून आपल्या संरक्षित जागी नेऊन ठेवला असावा की काय हे मला माहित नाही. पण, त्या शिलालेखावर जो मजकूर होता, त्याची कॉपी खालीलप्रमाणे :

श्रीगणेशायनमः

१) श्रीलक्ष्मी प्रसन्न ॥ स्वस्ति श्रीनृपशालीवाहन शके ॥
२) १६१० वर्ष । वर्तमान विभव नाम संवत्सर चैत्र शुध्द
३) प्रतिपदा गुरुवासर गोमंतक, प्रांत अनंतउर्ज देश
४) क्षत्रियकुळावतंस राजा शंभु छत्रपति यांचे आज्ञानुव-
५) र्ती राजश्री धर्माजी नागनाथ मुख्य देशाधिकारी प्रां-
६) त मामले फोंडा याप्रीत तिम नायकाचे पुत्र सा-
७) म नायक याहि विनीति कील जे पुर्वि मुसलमाना-
८) च्या राज्यामध्ये तरि अनंतउर्जीस लोकास आंगभा-
९) डे घेत नव्हते तेणेकरून व्यावहारिक लोके सुखें
१०) येत तेणेकरून राजगृहि हासिल होय जाता हे
११) हिंदुराज्य जाहाले पासोन आंगभाडे घेऊ लागले तेणेकरुीन राजगृहि
१२) हासिलासि धका बैसला त्यासि ते कृपाळु होउन आंगभाडे उरपासि जाव

१३) दुड्वा अर्धकोसी चौंदा दुड् घेत आहेति मना करावे पण काहि राज-
१४) गृहि आदाय होईल ऐसि विज्ञापना कील ते प्रमाण जाणून
१५) भाणस्तीर व पारवगीव व मांदुस कुडींचि येथिल आंगभाडे सोडी-
१६) ले पूढें याप्रमाणें सकळांहि चालवावें सहसा धर्मकृत्यास नाश क-
१७) रु नये कोत्तल त्यासि महापातक आहे ॥ श्लोक ॥ श्वकृतं वापरे-
१८) णापी धर्मकृत्यं कृतं नरः ॥ यो नाशयति पापात्मा स याति
१९) नरकान् बहून् ॥ १ ॥ लोभान्मत्सरतो वापि धर्मकार्यस्य
२०) दुस्यकः ॥ यो नरः स महापापी विष्टायां जायते क्रीम ॥ २ ॥
२१) दाल पाळनयोर्सध्ये दानात् स्त्रेयोनुपालनं ॥ दानात् स्वर्गमवा-
२२) प्तोति पाळणादच्युतं पदं ॥ या धर्मकार्या समस्ति मान देवावे

वरील शिलालेखातील मजकूर बारकाईने वाचणारास त्यातील मतितार्थ पूर्णपणे सध्याच्या पिढीतील वाचकास कळेलच असे सांगता येत नाही. म्हणून त्या शिलालेखातील मजकुराचा गरजेपुरता सारांश इत्यादि, खाली देण्याचा प्रयत्न केला आहे.

हा शिलालेख श्रीशालिवाहन शके १६१० विभव नाम संवत्सर म्हणजे इसवी सनाच्या १६८८ सालचा, चैत्र शुक्ल प्रतिपदा सोमवार दिवशीचा, गोव्यातील अनंतउर्ज म्हणजे अंत्रुज – फोंडा महालात क्षत्रिय कुळा-तील राजा शंभू छत्रपति यांचे आज्ञा हुकुमानुसार श्री. धर्माजी नागनाथ हे गव्हर्नर असता त्यांचे पुढे हजर होऊन तिम नायक याचा पुत्र साम नायक याने विनंती केली की, येथे मुसलमानांची राज्यकर्त्यांची राजवट चालू असताना अंत्रुजच्या लोकाकडून तारी-होडीचे प्रवासी भाडे घेण्याची पध्दत नव्हती त्यामुळे व्यावहारीक लोक सुखाने येत जात असत आणि तत्कालीन सरकारास बराच फायदा होत असे. लोकांच्या येण्या-जाण्यामुळे व्यापार उदीम वाढीस लागून उर्जितावस्था प्राप्त झाली होती. आता येथे हिंदु राज्य झाल्या-पासून आंगभाडे म्हणजे प्रत्येक माणसामागे तारी-होडीने जलप्रवास नदीतून एकातीरावरून दुसऱ्या पैल-तीरावर करण्यास भाडे घेऊ लागले त्याचा परिणाम या राज्याच्या उत्पन्नास धक्का बसला तरी आपण कृपाळू होऊन हे तारी-भाडे जे पुरुष प्रवाशी याकडून सात दुड् आणि स्त्री प्रवाशीकडून चौंदा दुड् घेण्याची सध्याची पध्दत रद्द करावी म्हणजे त्यामुळे लोकांची रहदारी फार वाढून सरकारास व्यापार उदीमामुळे उत्पन्न जास्त मिळेल. गव्हर्नर साहेब श्री. धर्माजी नागनाथ यांनी ही विनंती लक्षात घेऊन भाणस्तारीची तार, तिवरेंची तार आणि कुंडई मानशीकडील तार या तीनही तारीवर तार-भाडे रद्द करून प्रवास मोफत होण्याची व्यवस्था केली. हा सारांश त्या शिलालेखातील मजकुराचा आहे.

'दुड्' हे सर्वात अगदी कमी प्रतीचे नाणे गोमंतकात इ. सनाच्या १७ व्या शतकात चलनात होते. १०० दुड् म्हणजे एक तांग, १० तांगे म्हणजे १ रुपया अशी त्याकाळी त्या नाण्याची किंमत होती.

शिलालेखाच्या मजकुरात 'हिंदु राज्य जाहाले पासून' असा उल्लेख आहे. त्याचा मतितार्थ असा :- हिंदु राज्याचा प्रारंभ, फोंडा महाल शिवाजी राजाने ता. १ मे सन १६७५ रोजी काबीज केला त्या दिवसा-पासून. त्यापूर्वी फोंडा महाल विजापूरकरांची मुसलमानी राजवटीखाली होता आणि या राजवटीचा फोंडा महालाचा शेवटचा गव्हर्नर महमुदखान होता. आणि त्यानंतर हिंदु राज्याचे राजवटीत शिवाजी-महाराजानी फोंडा महालाचा पहिला गव्हर्नर जो नेमला त्याचे नांव धर्माजी नागनाथ असे होते.

वरील माहितीवरून हडकोळण गावच्या व त्या आसपासच्या परिसरातील गांवाची राजकीय परी-स्थिती आणि राजकीय अंमल कोणाचा केव्हापासूनचा सुरू होता याची थोडीशी तरी कल्पना वाचकास येण्यास सहाय्यभूत ठरेल असे वाटते.

आता यापुढे त्या गावात प्रतिवर्षी जत्रेच्या वेळी प्राचीन काली म्हणजे इ. सन १८४४ सालापूर्वी आणि गोमंतकात पोर्तुगीज लोक इ. सन १५१० साली प्रवेश करण्यापूर्वीपासूनही 'गऱ्यांची जत्रा' या नावाने गाजलेल्या जत्रेच्या कार्यक्रमाची माहिती वाचकापुढे ठेवण्याचा प्रयत्न करू.

हडकोळण गावांत प्राचीन काली प्रतिवर्षी 'गऱ्यांची जत्रा' होत होती, ती इ. सन १८४४ सालानंतर बंद केली गेली

प्राचीन कालापासून चालत आलेल्या, विशेषकरून नवीन काबिजादीत असलेल्या देवालयांच्या प्रतिवार्षिक जत्रोत्सवाचे वेळी जे नानाविध धार्मिक म्हणून कार्यक्रम पार पाडले जात, आणि या कार्यक्रमांमध्ये असे काही जाहीर कार्यक्रम साजरे केले जात, की ते कार्यक्रम पाहाणाराचे शरीर थरथरा कापत असे. ह्दयांत धडधडू लागून कालवाकालव होई. घेरी येऊन कार्यक्रम पहाणारा इसम जमिनीवर कोसळण्याचे प्रकारही कांही कमी नसत. आणि शेवटी, हा कार्यक्रम म्हणजे मनुष्य हत्येचाच प्रकार की काय असे चित्र तो प्रत्यक्ष पाहाणाराच्या डोळ्यापुढे येई. आणि अशा तऱ्हेचे हे कार्यक्रम इ. सन १५१० सालापूर्वीपासून कैक वर्षे म्हणजे गोमंतकांत पोर्तुगीज लोकांचा प्रवेश आणि त्यांची राजसत्ता सुरू होण्यापूर्वीपासूनच चालत आले होते. गऱ्यांच्या जत्रेचा हा कार्यक्रम म्हणजे तरी काय, याची थोडीशी तरी कल्पना जी गोव्याच्या गतेतिहासाच्या सरकारी दप्तरांत प्रत्यक्षात बघून वर्णिलेली आहे तिच्या आधारे, वाचकांपुढे ठेवण्याचा प्रयत्न करू.

गावांत वार्षिक प्रमुख जत्रेच्या दिवसापूर्वी किंवा जत्रेच्या दिवशी देवालयासमोर किंवा त्या आसपास पूर्वापार रूढी आणि परंपरेने चालत आलेल्या जागेवर, एक हात चौरस लांबी रुंदीचा, पण पांच हात खोल असा खड्डा किंवा भोक पाडून त्यांत एक भला मोठा टणक घट्ट लांकडी खांब अंदाजे २५ किंवा तीस हात लांबीचा उभा करावयाचा. म्हणजे या लांकडी खांबाचे मूळ त्या खड्ड्याच्या आंत चार पांच हात खाली पुरून तो खांब कशाच परीस्थितीत हालणें किंवा हेलकावे घेणे अशक्य होईल अशा रितीने तो घट्ट करावयाचा. लाकडी गलबत समुद्रांतून जाताना शीड चढविण्यासाठी जो लांकडी कुंवा त्या गलबतास मध्यभागी जसा उभा केलेला असतो, त्या नमुन्याप्रमाणे हा लांकडी खांब जमिनीत घट्ट केलेला असतो असे म्हटल्यास चालेल. या लांकडी खांब्यास त्याच्या वरच्या टोकाकडे एक लोखंडी सळई अगदी घट्ट केलेली असून ती सळई एका लांकडी वर्तुळाकार चक्राच्या मध्ये असलेल्या भोंकातून आरपार केली जाते. हे वर्तुळाकार चक्र बैलगाडीच्या चाकाच्या नमुन्याचे असून त्या वर्तुळाकार चक्रास खालच्या बाजूस चार किंवा पांच ठिकाणी सभोवार समांतरावर लोखंडी वाळे किंवा आंगठ्या अगदी घट्ट बसविलेल्या असतात. वर्तुळाकार चक्र गरगरा फिरविता यावे, यासाठी त्यास दोन दिशांनी चांगले लांब दोरखंड घट्ट बांधून ठेवलेले असतात की, त्या दोरखंडास हातात धरून जमीनीवरील दोन इसमांनी त्या खांबाभोवती धांवत प्रदक्षिणा घेताना ते खांबावरील चक्र गरगरा जोरात आपल्या भोवती फिरत रहावे अशी त्याची रचना केलेली असते. जत्रेच्या दिवशी त्या खांबावरील चक्रास लोंबविण्यासाठी चार किंवा पाच पुरुष इसम व्रतस्थ राहिलेले, सचैल स्नान करून भालप्रदेशास गंधाचा मोठा टिळा, दोन्ही हातांच्या तीन ठिकाणी गंधाचे आडवे तीन तीन पट्टे, गळ्यात फुलांची माला घातलेली, प्रत्येक हातात कंकणाच्या जागी फुलांची माला वेष्टन केलेली, शुभ्र वस्त्र नेसून कसोटी घट्ट मारलेली, अशा वेशात देवापुढे उभे रहातात. भटजीसह लोक देवापुढे गाऱ्हाणे घालतात. नंतर त्या व्रतस्थ पुरुषास देवाचे तीर्थ दिल्यानंतर त्यास जमीनीवर जमीनीकडे त्याचे तोंड करून निजवितात व नंतर त्या प्रत्येकाच्या पाठीस चामडी व मांसास दोन दोन धारदार टोकांचे लोखंडी गरे टोचून त्या आरपार टोचलेल्या गऱ्यासह ते पुरुष वर उल्लीखित खांबास असलेल्या वर्तुळाकार चक्रास प्रत्येक वाळ्यास किंवा आंगठीस एक याप्रमाणे चार किंवा पाच पुरुष लोंबकळीत ठेऊन परत देवाकडे सर्व लोक गाऱ्हाणे घालतात आणि इतके झाल्यानंतर ते चक्र सभोवार एकसारखे न थांबता गरगरा फिरवून पाच किंवा सात प्रदक्षिणा त्या चक्राच्या करतात. पण ते चक्रीफिरविण्यास प्रारंभ करण्यापूर्वीपासून तो त्या प्रदक्षिणा पूर्ण होऊन त्या चक्रास लोंबकळीवलेले पुरुष खाली जमीनीवर आणून देवालयात नेईपर्यंत त्या खांबाच्या मुळाशी सभोवार एकसारखे रणवाद्य ढोल, नगारे, तासे गगनभेदी आवाजात बडवीत असतात

की, त्या आवाजात त्या लोंबकळत ठेवलेल्या पुरुषांनी किंवा इतरांनी कितीही मोठ्याने आक्रोश केला, तरी ऐकू येणंच शक्य नाही, अशा जोरांत आवेशात ती वाद्ये वाजवीत ठेवीत असत. अगदी थोडक्यात संक्षिप्तात गऱ्यांच्या जत्रेतील कार्यक्रमाची रूपरेषा ही अशी– आणि हे असे कार्यक्रम प्रतिवर्षी प्रमुख जत्रेच्या दिवशी फोंडा महालात हडकोळण, बेतकी आणि कुंडई गावात असलेल्या दैवतांच्या प्रतिवार्षिक प्रमुख जत्रेच्या दिवशी नियमितपणे साजरा करण्याची पध्दती चालत आली होती. या अशा कार्यक्रमाची माहिती हळूहळू पोर्तुगीज राजसत्तेचे गोव्यातील गव्हर्नर जनरल यांच्या कानावर येऊन पोचली. पण त्यांना हे मुळीच खरे वाटले नाही, म्हणून, यात खरेपणा काय आहे, हे स्वतः आपल्या डोळ्यांनी पाहिल्याशिवाय ते ऐकिव बातम्यांवर विश्वास ठेवीत नसत. त्यांनी बारीक चौकशी गुप्तपणे करवून माहिती मिळविली की, हा असा कार्यक्रम आता जवळच्या दिवसात कोणत्या गावात जत्रेच्या दिवशी होणार याचा दिवस, गाव, वेळ समजून घेतली आणि अकस्मात कुंडई गावात जत्रेच्या दिवशी त्या कार्यक्रमाच्या वेळी, प्रारंभीच, गुप्तपणे कोणास नकळत हजर झाले, जत्रेत तो कार्यक्रम चालू असलेला पाहण्यासाठी हजारो लोकांची उपस्थिती अफाट गर्दी. तेथे कोण कोणास ओळखणार आणि चौकशी करणार ? त्या गव्हर्नर जनरल साहेबांचे नाव जुजे फेरेर पेस्तान.

त्यानी हा स्वतः समक्ष सर्व कार्यक्रम आपल्या डोळ्यांनी बघितला, आणि ताबडतोब आपल्यापुढे तातडीने कुंडई गांवचा तत्कालीन इस्क्रीव्हांव म्हणजे कुळकर्णी चिटणीस यास हजर करविले आणि त्यास असा निर्वाणीचा हुकूम दिला की, जगात कोणतेही सुधारलेले राष्ट्र, स्पष्टपणे आणि डोळ्यांनी पाहिल्यानंतर मनुष्यांच्या मांसास आणि कातडीस धारदार टोकाचे लोखंडी गरे आरपार टोचून त्यास चक्रास किंवा रहाटास लोंबकळविणे आणि ते चक्र गरगरां फिरवीत रहाणे असे अनन्वित प्रकार धर्माच्या नावाखाली का असेना, चालू देणे कठीणच नव्हे, अशक्यच आहे. म्हणून, आपले सरकार सर्वश्रेष्ठ राजेसाहेबांच्या नावाने या अशा प्रकारच्या कृत्यांस नापसंती दर्शवून, यापुढे आजपासून भविष्यकालात हे किंवा अशाप्रकारचे कार्यक्रम तुमच्या पूर्ण जबाबदारीने या गावात कधीही होणार नाहीत, याची पूर्ण काळजी आणि जबाबदारी तुमच्यावर सोपविलेली असून तुम्ही व तुमच्यानंतर जे कोणी कुलकर्णी, चिटणीस, इस्क्रीव्हाव येतील, त्यानी या हुकुमास चोखपणे पाळा दिला पाहिजे. आणि हा हुकूम राजेसाहेबांचा उपयुक्त, सद्विवेकी आणि चांगल्या विचारसरणीचा असल्यामुळे, त्यास पाळा देणे अत्यावश्यक व हिताचे असून त्याच्या अंमलबजावणीसाठी आपण वेगळे आणि बळजबरीचे धोरण न स्विकारण्याची हमी देतो असे त्यास आश्वासनही दिले. शिवाय, सांगितले की, असे कार्यक्रम किंवा सदृश्य इतर गावांत जिथे जिथे होत असल्याची माहिती मिळेल, त्या सर्व ठिकाणी असेच हुकूम सोडण्याची आपण तातडीने व्यवस्था करणार आहे. अशा प्रकारचा हुकूम त्यांनी दिला व तो 'बोलेती दु गोव्हेर्नु दु इस्तादु दे इंदिय' या सरकारी राजपत्रावर नंबर ५० शनिवार ता. १४ डिसेंबर १८४४ या ग्यॅझेटवर प्रसिध्द झालेला असून त्या खाली त्याच ग्यॅझेटवर अशी सूचना प्रसिध्द झाली आहे की, याच प्रकारचा हुकूम ता. ७ डिसेंबरला हडकोळणच्या ग्रामचिटणिसास, ता. ११ डिसेंबरला बेतकी गांवच्या ग्रामचिटणिसास, तसेच मुसलमान काजीसही पाठविल्याचे तेथे नमूद केलेले आहे. या हुकुमानुसार कुंडई, बेतकी आणि हडकोळण या तीनही गांवात 'गऱ्याच्या जत्रा' नावाने साजरा होणारा हा कार्यक्रम पूर्णपणे कायमचा बंद झाला, आणि यावर बावीस वर्षे उलटली. नंतर बेतकी गांवचे कांही गावकार यानी गव्हर्नर जनरल साहेबास एक अर्ज ता. ९ फेब्रुवारी १८६६ रोजी सादर करून विनवणी केली की, सरकारच्या तारीख ११ डिसेंबर १८४४ हुकुमाची अंमलबजावणी करून बेतकी गावात कैक वर्षांपासून चालत आलेली प्रथा बंद पडल्याने, बेतकी गावात आणि गांवकरी लोकांत रोगराई, गरिबी, दैन्यावस्था वगैरे नानाविध प्रकारे बाधक झाले असून गांवच्या उत्कर्षाआड त्या दैवतांचा कोप ओढवलेला आहे. करिता, त्या हुकुमाचा फेरविचार करून दया दाखवावी आणि ती जुनी प्रथा परत चालू करण्याचा फेरहुकूम प्रसिध्द करावा. या अर्जावर बेतकी येथील तत्कालिन रहिवासी गांवकार पुंडलीक फट्टो, वासू फट्टो, विठ्ठल फट्टो, सांतू फट्टो, हरी फट्टो, वेंकटी फट्टो आणि इस्क्रीव्हांव नारायण रघुनाथ शेणवी याची सही असून वरील सहा इसमानी आपली सही न करता खूण केलेली आहे, व या इसमास अर्जात लिहिलेली भाषा कळत नसल्यामुळे त्यांचा प्रतिनिधी भाषांतर करणारा मिगेल दे कोस्त नांवाच्या

इसमाची त्यावर सही आहे. वरील अर्ज गव्हर्नर जनरल साहेब ज़ुजे फेरॅर पेस्तान यास सादर केल्यानंतर त्या गव्हर्नर जनरल साहेबांनी त्या अर्जावरील सर्व मजकूर वाचून त्यावर आपला शेरा लगेच त्याच तारीख ९ फेब्रुवारी १८६६ रोजी दिला. त्याचा आशय असा आहे :–

ज्यावरून या अर्जातील अर्जदारांचा हेतू ज्या मिंगेल कोस्त या भाषांतर प्रतिनिधीने या अर्जावर नमूद केलेला दिसतो. तो मिंगेल कोस्त इसम आपणापुढे हजर राहून बेतकी येथील जत्रेत गरे टोचून मनुष्यास लोंबकळवून चक्रास गरगरा फिरविण्याचा कार्यक्रम बंद झाल्यामुळेच गांवच्या जनतेस अवकळा आली, वाईट दिवस आले, हे मला पटवून देईल, तर या अर्जाचा विचार करणे शक्य होईल. (पहा :– आर्किव्ह् दे फार्मासिय, वर्ष १८६६ पृष्ठ ५०.)

हडकोळण गावांत प्रतिवर्षी रेड्याची जत्रा (कार्तिक अमावास्या तिथी रोजी)

वरील मजकुरावरून वाचकांच्या ध्यानांत आले असेलच की, इ. स. १५१० सालापूर्वी म्हणजे गोमंतकात पोर्तुगीज लोकांचा प्रवेश होण्यापूर्वीही कैक वर्षांपासून हडकोळण गावांत वार्षिक जत्रेच्या कार्यक्रमात गऱ्यांच्या जत्रेचा म्हणून कार्यक्रम होत होता, तो पूर्णपणे कायमचा बंद इ. स. १८४४ सालच्या डिसेंबर ता. १४ शनिवारच्या तत्कालीन हुकूमानुसार झाला आहे, पण त्याच गावांत प्रतिवर्षी रेड्याची जत्रा साजरी होत आहे. ही रेड्याची जत्रा त्या हडकोळण गावात केव्हापासून सुरू झाली, म्हणजे गऱ्यांची जत्रा बंद झाल्यानंतर ती सुरू झाली, किंवा त्याही पूर्वी गऱ्यांच्या जत्रेबरोबरच तीही सुरू होती याचा स्पष्ट पुरावा अद्याप तरी उपलब्ध झालेला नाही. पण, अंदाज म्हणून किंवा अनुमानाने सांगता येईल की, गऱ्यांची जत्रा बंद झाल्यामुळे नंतरच ही रेड्याची जत्रा सुरू झाली असावी असे वाटते.

या रेड्याच्या जत्रेच्या दिवशी म्हणजे कार्तिक अमावास्या तिथी रोजी, हडकोळण गावात देऊळ वाड्यावर हा जत्रोत्सव साजरा केला जातो. जत्रोत्सवाचा दिवस असल्याने श्रीनवदुर्गा, श्रीवेताळ देवालयांच्या परिसरात, प्राकारांत, नानाविश्व खाद्य आणि पेय पदार्थांची दुकाने थाटलेली असतात. संध्याकाळी ६ किंवा ७ वाजल्यापासूनच भाविकांची तुरळक ये-जा चालूच असते. एकाच दिवशी साजऱ्या होणाऱ्या बारा जत्रांपैकी ही एक जत्रा या हडकोळणच्या जत्रेत प्रतिवर्षी एका रेड्याचा बळी देतात, हा सर्वत्र लौकिक असल्याने, हा रेड्याचा बळी कसा काय दिला जातो, हे स्वतः प्रत्यक्ष पहाण्यासाठीच, लोकांची प्रचंड बेसुमार गर्दी असल्यास नवल नाही ! रात्रौ अकरा वाजण्याच्या सुमारास लोकांची वर्दळ वाढावयास सुरवात होते. त्यानंतर पावणी सुरू होते. देवालयासमोर नाटकाचा कार्यक्रम करण्यासाठी स्टेज उभारलेले असते, त्या स्टेजवर नाटक सुरू होण्याच्या वेळेची सूचक घंटा वाजू लागते. प्रेक्षक फार उत्सुकतेने नाटक केव्हा एकदा सुरू होते, याची वाट पहात असतानांच, प्रेक्षक शिट्या वाजवून एकसारखा गोंगाट कल्लोळ करून आणि त्यांतच प्रेक्षकांमध्ये लहान तान्ही मुले आपआपल्या आईच्या मांडीवर असलेली, एकच आक्रोश करून एकंदर वातावरण असह्य करून सोडतात. अशा पार्श्वभूमीवर त्या नाट्यप्रयोगास प्रारंभ होतो, आणि प्रेक्षकांमध्ये चाललेला गोंगाट कमी होऊ लागतो. हा नाट्यप्रयोग रंगभूमीवर चालू असतानाच रात्रौ मध्यरात्रीनंतर साधारणपणे एक वाजण्याच्या सुमारास महार आपले ढोलकेवाद्य वाजवावयास प्रारंभ करतो. यामुळे रेड्याच्या जत्रेचा प्रमुख कार्यक्रम जवळ आल्याचा हा इषारा असल्याचे जत्रेस उपस्थितांपैकी माहितगार लोक एकमेकांशी बोलताना दिसतात. रात्रौ दोन वाजण्याच्या सुमारास गावांतील मंडळी देवालयाच्या चौकावर श्रीदेवीसमोर उभी असते. त्या सर्वांपुढे चार वयस्क पुरुष धोतर नेसलेले, डोक्यास चांगला मोठा रुमाल मुंडासे बांधलेले आणि त्या चारही पुरुषांच्या उजव्या हातात एक तलवार, अशा प्रकारे उभे राहतात. श्रीदेवीला सार्वजनिक गाऱ्हाणे घालण्यासाठीच ही सर्व मंडळी त्या देवालयात जमलेली असतात. गंभीर वातावरणात ही सर्व मंडळी श्रीदेवीला सामुदायिक गाऱ्हाणे घालतात. परंपरेने चालत आल्याप्रमाणे देवा देवचारांना हांका मारून, आवाहन करून संबंध गांवाची, तेथील रहिवाशांची पूर्ण संरक्षण करण्याची मागणी करून प्रार्थना करण्यात येते. तेथे उपस्थित असलेली सर्व मंडळी जोरदार आवाजात 'हयऱ्हय' म्हणून त्या गाऱ्हाणे प्रार्थनेला साथ दिली जाते. एकंदरीत सर्व वातावरण धीर गंभीर वाढत्या स्वरूपात दिसत असते. गाऱ्हाणे प्रार्थनेचा कार्यक्रम संपताच महाराच्या ढोलक्याचा आवाज फार मोठ्याने जोरात होऊ

लागतो आणि उपस्थित मंडळी रेड्याला आणण्यासाठी निघतात. देवालयाच्या डाव्या बाजूकडे उतरणी-वरून खाली एका प्रचंड वृक्षाला बांधलेल्या आणि थोड्या कांही तासानंतर बळी देण्यांत येणाऱ्या रेड्याला तेथे ठेविलेले असते. तो रेडा तीन चार वर्षाचा वयाने असतो. त्याला या जत्रेच्या दिवशी उपाशी ठेवि-लेले असे सांगतात. मात्र त्या दिवशी दुपारी श्रीदेवीस महानैवेद्य झाल्यानंतर एक पान अन्नाचे त्या रेड्यापुढे ठेवलेले, एवढेच काय ते सबंध दिवसात त्या रेड्याच्या पोटांत गेलेले त्यामुळे, तो फार भुकेने तहानेने व्याकुळ होऊन सर्व मंडळीकडे पहात असणे स्वाभाविकच.

त्या रेड्याला श्रीवेताळाच्या देवालयासमोर आणण्याची तऱ्हा तर फारच मोठी हृदयद्रावक असते. रेड्याच्या गळयाला दोऱ्या बांधण्यात येतात. दोऱ्या बांधणारी माणसे हीसुध्दा ठराविकच असतात. कारण, असे करण्याचा तो म्हणजे 'मान' त्यांच्या वंशपरंपरेने चालत आलेला आहे. त्या रेड्याला टेकडीवर नेण्या-साठी त्याला बांधलेल्या दोऱ्या हातात घेऊन निघण्याचे वेळी ढोलक्याचा मोठा जोरदार आवाज आणि 'हय – हय' चा आक्रोश यामुळे तो आधीच गोंधळून गेलेला, उपाशी पोटी असलेला, आणि या सर्वामुळे त्याच्यावर काळाची छाया पडून आपणास बळी देण्यास नेत आहेत, हे त्यास कळले असावे. माणसाला मृत्यूची चाहूल लागते म्हणतात, तशीच या रेड्यालाही लागली असावी. आणि म्हणून तो रेडा जागेवरून हालतच नाही. त्यासाठी बळजबरीने त्यास दोऱ्या बांधलेल्या हातात घेऊन चालणारे इसम सरपटत ओढून नेतात आणि तो ठिकठिकाणी रक्तबंबाळ स्थितीत टेकडीच्या समोर अर्धा किलोमीटर अंतरा-वर एक पाण्याचा तलाव आहे, त्या तलावाकडे नेऊन तेथे त्याला आंघोळ घालण्यात येते. बळी देण्यापूर्वी त्या रेड्याला शुध्द सोवळा करण्याची भावना ती आंघोळ घालण्यामागे असावी. रेड्याला आंघोळ घातल्या-नंतर त्याला श्रीवेताळाच्या देवालयापुढे आणण्यात येते व तेथे असलेल्या दगडाजवळ उभे करण्यात येते. तो फार थकलेला, अर्धमेल्या स्थितीत, अंगात प्रतिकार शक्ती तर मुळीच न राहिलेली, आणि चालायला सोडाच उभा रहाण्याचे त्राण नसण्याच्या अवस्थेत तो रेडा तेथे असतो. रेडा बळी देताना पाहाण्यासाठी लोकांची गर्दी होऊ नये यासाठी, नाट्यप्रयोग रंगभूमीवर चालूच ठेवतात. रेडा श्रीवेताळाच्या देवालया-पुढे ठेवल्यानंतर परत महाराच्या ढोलक्याचा आवाज उत्तरोत्तर चढू लागतो तसतसा गाऱ्हाणे घालणारे गांवकरी नारळीच्या झाडांची पाने म्हणजे माडाच्या सुक्या चुडतांच्या मशाली पेटवून श्रीवेताळाचे देवालय आणि नवदुर्गेचे देवालय यामध्ये असलेल्या मोकळ्या जागेत थयथया नाचू लागतात आणि तोंडाने 'हय – हय' असा एकसारखा घोष करतात. मोकळ्या जागेत नाचणाऱ्या लोकांच्या जमावाने, रेडा बळी देण्याच्या जागेकडे आणखी लोकांनी येऊन गर्दी करू नये म्हणून, श्रीनवदुर्गेच्या देवालयाजवळच रोखून धरले जाते. रेड्याचा बळी देण्याची वेळ येऊन ठेपते. उपस्थितांचे श्वास घुसमटल्याचे चित्र पाहावे लागते आणि वातावरण फार गंभीर स्थितीत पोचल्याचा साक्षात्कार होतो. अशा वेळी त्या अर्धमेल्या आणि प्रतिकार शक्ती लयास गेलेल्या रेड्यास सर्व कांही सारखेच असते आणि श्रीवेताळाच्या देवालयासमोर असलेल्या दगडावर त्या रेड्याची मान ठेवतात आणि क्षणार्धात भल्या मोठ्या धारदार कोयत्याने त्या रेड्याचे शीर धडावेगळे करतात. चुडतांच्या मशाली पेटवून हातात धरलेले लोक गोलाकार नाचू लागून तोंडाने 'हय – हय' म्हणत हैदोस घालतात. या हैदोसमुळे सर्व परिसर घुमू लागून वातावरण बेफाम बनते आणि नाचणारे हे सर्व लोक एकत्र येऊन देवालयात जमतात आणि परत देवापुढे गाऱ्हाणी घाल-तात. इतके होईपर्यंत दिवस उजाडलेला असतो, आणि सकाळचे सहातरी होतातच. अशा प्रकारे ही रेड्याची जत्रा संपते.

बळी दिलेल्या रेड्याचे शीर व धड त्या दगडाजवळ असलेले, लगेच तेथून अविलंबे स्थलांतर केलेले दिसत नाही. सकाळचे ७॥ वाजले तरी ती तेथेच असल्याचे दिसते. जत्रेच्या दिवशी देवालय परिसरात आणि त्या आसपास खाद्य पदार्थांची दुकाने थाटलेले दुकानदार आपआपली दुकाने हलवून स्वगृही परत जायला लागतात. बळी दिलेल्या रेड्याची विल्हेवाट कशी काय केली जाते, याची चौकशी केल्याअंती अशी माहिती मिळाली की, रेड्याचे दोन्ही भाग, श्रीवेताळाच्या देवालयासमोर पन्नास मिटर अंतरावर असलेल्या झाडीत जुन्या कालीन एका मोठ्या काजऱ्याच्या वृक्षाजवळच पाणी सांचण्याचा एक ओंडका आहे, त्या ओंडक्यात खालचा भाग म्हणजे धड टाकतात आणि शीर त्या वृक्षास एक भोंक आहे त्यात ठेवतात किंवा त्या झाडास बांधून ठेवतात. कांही गेल्या वर्षापर्यंत हे शीर बेतकी गांवचे महार या जत्रेचे दिवशी

तेथे येवून हक्काने ते शीर बेतकीस नेत असत. पण हल्लीच्या वर्षात ते येत नाहीत. धड हडकोणचे महार नेत असत. पण, तेही आतां नेत नाहीत. यामुळे त्या दोन्ही भागांची विल्हेवाट कावळे, कुत्रे, कोल्हे फडशा उडवून केली जाते–

रेड्याची जत्रा संपली खरी, तरीपण भूतांची जत्रा सुरू ?

हडकोळण गांवची प्रतिवार्षिक रेड्याची जत्रा संपली. पण तेथे लगेच भूतांची जत्रा सुरू होणार आहे अशी बातमी मिळाली. भूतांची जत्रा हे ऐकताक्षणीच आश्चर्याचा धक्का बसल्यास नवल म्हणता येणार नाही. हे प्रकरण काय आहे, हे समजून घेण्याची जिज्ञासा कोणाहि अभ्यासू माणसास होणारच. म्हणून चौकशी करता अशी माहिती मिळाली की, रेड्याची जत्रा संपल्यादिवसापासून सतत पांच दिवस-पर्यंत या गांवचे श्रीनवदुर्गादेवीचे देवालय पूर्णपणे बंद करून ठेवतात. या पांच दिवसात देवालयाच्या प्राकारात आणि आसपाससुध्दां कोणीच येत नसतो. आणि हा नियम कडकपणे हडकोळण गावात पाळला जातो. त्या देवालयाजवळच एक सरकारी मराठी प्राथमिक शाळा आहे. पण, त्या शाळेत त्या पाच दिवसात, विद्यार्थ्यांचे पालक आपल्या मुलास पाठवीत नसतात. त्यामुळे ती शाळा बंदच असते. त्या परिसरांत पांच दिवसपर्यंत भूतांची वसती आणि संचार असतो अशी ग्रामस्थांची पूर्ण खात्री असते. अशा परिस्थितीमुळे त्या पाच दिवसात देवालयाच्या परिसरांत मुद्दाम जाऊन अनुभव काय येतो, हे पाहाण्यासाठी धाडसी वृत्ती किंवा विषाची परीक्षा घेण्यासाठी आपल्या स्वतःच्या जीवावर कोण उठणार ?

भूत–प्रेत– पिशाच्चादींचा संचार वर्षातून कधी काळी ठराविक महिना तिथी रोजी ठराविक जागी होतो, असे परंपरेने वृध्द लोक सांगत आले. पण ही एक अंधश्रध्दा असे म्हणून तसा प्रचार करणारे आजच्या कालात काही थोडे थोडके नाहीत. मात्र आपण स्वतः त्या त्या जागी मुद्दाम जाऊन स्वतः आपण त्या अंधश्रध्देचा अनुभव घेऊन इतरांसही ती वस्तुस्थिती अनुभवास आणणेचे काम कोणी कोठे केल्याचे जसे अद्याप ऐकिवांत नाही, तसेच, ही अंधश्रध्दा आणखी अशीच किती वर्षे चालणार याचे गणित करून उत्तर सांगणारे ज्योतिषी किंवा साधू बुवाही अद्यापपर्यंत तरी दिसत नाहीत, ही सत्य वस्तुस्थिती नाका-रण्यात अर्थ नाही ! मात्र, भूताखेतांना खूष ठेवण्यासाठी किंवा गावांतील रहिवाशांचे संरक्षण करण्या-साठी म्हणून भावना उराशी बाळगून बिचाऱ्या निष्पाप प्राणीमात्रांना प्रतिवर्षी, जत्रेच्या दिवसात, बळी देण्याचे प्रकार गोव्यातील काही देवालयांसमोर सर्रास चालू असलेले दिसतात. बळी प्रतिवर्षी दिला नाही तर त्या गावांवर सार्वजनिक काही अरिष्ट संकट येईल अशी समजूत असते. ती खरी किंवा खोटी आणि त्या बळी देण्यास योजलेल्या प्राण्यांमध्ये कोंबडा, बकरा याच प्राण्यांची निवड करून वाघ, सिंह, लांडगा अशा हिंस्त्र पशूंची निवड का केली नाही, याचे कारण जरी उघड असले, आणि रेड्याचा बळी हा हडकोळण या गावांशिवाय दुसरीकडे कुठेच देण्याचा प्रघात असल्याचे अद्यापपर्यंत तरी ऐकिवांत नाही हे खरे असले तरी बळी देण्याची क्रिया प्राचीन कालापासून यज्ञ यागादि कृत्यात चालत आलेली होती, हे सत्य असल्याने ते नाकारता येणार नाही. आणि बळी देण्याची आवश्यकता होती आणि त्यास सबळ तशीच कारणेही होती असेही मानता येईल. पण, हा प्रश्न यज्ञ यागादि क्रिया कर्माची पूर्ण माहिती असलेल्या तज्ञांनी सोडवावयाचा असल्याने त्यात लक्ष्य घालण्याची पात्रता लेखकास नाही, हे खरेच. पण आजच्या कालात जे यज्ञ यागादि होम हवनादि महान् अनुष्ठाने श्रीनागेश देवस्थान बांदिवडे, श्रीशांता-दुर्गा देवस्थान कवळे, श्रीदत्त महाराज देवस्थान सांखळी, इत्यादि ठिकाणी तज्ञ आणि जाणकार अनुभवी वैदिक श्रेष्ठ ब्राम्हणाच्या नेतृत्वाखाली केली गेल्याचे पाहाण्यात आले, तेथे तेथे, बळी देताना तो कोणत्याही प्राण्यांचा न देता, कोहळा फळ छेदून बळी देण्यात आला. कोठेही हवनद्वारा नवचंडी अनुष्ठान विधा-नांत बळी कोहळा फळ छेदूनच बळी देण्याचा प्रकार पाहण्यात येतो व तो सर्वसामान्य ठरल्यासारखेच आहे. ज्या देवस्थानात अद्याप प्रतिवर्षी जत्रेत किंवा तत्सम प्रसंगांत बळी कोणत्याही प्राण्याचा देण्याची वहिवाट आहे. त्या देवस्थानच्या भक्तगणांनी एकत्र येऊन, आपल्या दैवतापुढे गाऱ्हाणे, प्रार्थना सार्व-जनिक रित्या करून, प्राण्याचा बळी देण्याऐवजी कोहळा छेदणे किंवा नारळ फोडून त्यावर भागविण्याची मागणी करून कौल प्रसाद घेऊन कायम व्यवस्था करण्यास काही हरकत आहे की नाही, हा प्रयत्न करून तरी पाहाण्यात अडचण नसावी असे वाटते. कोणत्याही प्राण्याचा बळी देताना बळी देण्याच्या भावनेमागे

गावकऱ्यांचें संरक्षण करणे, भले करणे अशी मागणी करून कोणत्याही दैवतापुढे तो बळी देतात असे पाहाण्यात येते. जो प्राणी बळी देतात, तो प्राणी आपणास जिवंत मारणारांचे संरक्षण करो, भले बरे करो की त्यांचे कसे काय करो याचा अंदाज त्या प्राण्याचा बळी देणारांनी किंवा बळी देण्यास लावणाऱ्यांनी आपणा स्वतःवर हा बळी होण्याचा प्रसंग आलेला आहे याची कल्पना करवून विचार केल्यास, याचे स्पष्ट आणि चोख उत्तर लगेच मिळून डोळ्यापुढे काजवे येऊन सर्व शरीर थरथरा कापून घाम येईल की नाही, याचे प्रात्यक्षिक करणे हितावह ठरेल असे नाही का वाटत ? कांही देवस्थानात परंपरेने चालत आलेल्या रुढीरिवाज आणि एकमेकांच्या हक्काबद्दल वादविवाद लागून त्यांचे पर्यवसान गावातील वार्षिक जत्रोत्सव कांही वर्षे बंद होण्यात, आणि त्या जत्रोत्सवात प्राणी बळी देण्याचे प्रकारही बंद होण्यात आले होते असे जनतेने पाहिले. व अशा परीस्थितीची माहितीही गोमंतकातील वृत्तपत्रात वाचलेली आठवणीत आहे. परंतु बळी देण्याचा हा प्रकार जत्रा बंद असलेल्या वर्षात घडला नाही असे असूनही त्या गावात त्या वर्षात, कोणताच अनुचित प्रकार, रोगराई, अरिष्ट परमेश्वरकृपेने ओढवले नव्हते हा त्याच गांवच्या रहिवाश्यांचा अनुभव ऐकावयास मिळतो.

देवस्थानात वार्षिक जत्रोत्सवाच्या दिवसात उत्साही वातावरण पसरून एक प्रकारचा आनंद उपभोगण्यास मिळतो. आप्त, इष्ट, स्नेही, नातेवाईक मित्रपरीवाराची भेट जत्रेच्या निमित्ताने एकत्र होऊन जसे समाधान लाभते, त्याचप्रमाणे आपल्या कुलदैवत, ग्रामदैवत इत्यादि दैवतांच्या दर्शनाने आणि धार्मिक कार्यक्रमामुळे मनःशांति मिळून संसारिक नानाविध तापांनी अनुभवणारे क्लेश परिहार होण्यास मदत होते. यासाठी, आपल्या पूर्वजांनी विचारपूर्वक देवस्थानात प्रतिवार्षिक नानाविध उत्सव साजरे करण्याची वहिवाट सुरू केली होती. दिवसेंदिवस परीस्थिती बदलत गेली, विचार बदलत गेले, स्वास्थ असे शिल्लकच राहिले नाही, हिंदु धर्म संस्कृतीतील उज्वल आणि शाश्वत मूल्ये यांचा आदर करण्यात कसूर करून हिंदु धर्म संस्कृतीच्या नियम पालनाकडे दुर्लक्ष्य करण्यातच आपला मोठेपणा किंवा प्रगती मानणारा वर्ग पुढे पुढे येऊन अज्ञ आणि अननुभवी लोकांची दिशाभूल करण्याचे प्रयत्न सुरू करू लागून त्यातच धन्यता पावून मानसिक सुख भोगू लागला आणि या सर्वांचा परिणाम जो काही व्हावयाचा तो होणे अपरिहार्यच होते. पण जसजसे दिवस जातात, तसा अज्ञानपणा अनुभवाने दूर होऊन हिंदु धर्म संस्कृतीच्या मूल्याचे उपासक, तरुण पिढीत दिवसेंदिवस जास्त दिसून येतात, ही जमेची बाजू लक्षात घेता, सत्याचा वाली परमेश्वर आणि फार उशिरा का होईना, सत्याचा शेवट जयातच होतो म्हणूनच 'सत्यमेव जयते' ही उक्ती प्रचारात आली.

श्रीनवदुर्गा देवस्थानसंबंधी अत्यावश्यक माहिती

हडकोळण गावांत श्रीनवदुर्गा देवस्थानचा स्थापनाकाल जरी अद्याप नक्की कोणता हे शके किंवा सन पुराव्यासह हे सांगणे कठीण असले, तरी निश्चितपणे सांगता येईल की, ज्यावेळी हडकोळण गांव ज्या लोकांनी प्रारंभी वसाहतीस आणला हडकोळण गावात ग्रामसंस्था (कोमुनिदाद) स्थापना केली, त्याच काली त्या गावचे ग्रामदैवत म्हणून श्रीनवदुर्गा प्रमुख व त्यांची आनुषंगिक किंवा इतर परिवार दैवते स्थापून त्याचा सर्व दैनंदिन खर्च, संरक्षण खर्च देवालय इमारती, सेवेकरी वगैरे सर्व खर्च ग्रामसंस्थेच्याच उत्पन्नांतून, होईल अशी ही व्यवस्था गोमंतकात प्राचीन कालापासून चालत आलेली सर्वच गावांत होती याचे स्पष्ट पुरावे सांपडतात. आज हडकोळणच्या श्रीनवदुर्गा देवस्थानात जी दैवते आहेत, ती अशी :- प्रमुख दैवत श्रीनवदुर्गा असून इतर परिवार दैवतांची नांवे खालीलप्रमाणे :- १) श्रीवेताळ २) श्रीवाघनाथ ३) श्रीरवळनाथ ४) श्रीपूर्वाचारी ५) श्रीग्रामपुरुष ६) श्रीगांवपुरुष ७) श्रीगाडवंस ८) श्रीसांतेर ९) श्रीरुपेवंस १०) श्रीमाळवंस अशी असल्याचे त्या देवस्थानची घटना नियमावली (कोंप्रोमीस) जी गव्हर्नमेंट ऑफीसिअल ग्यॉझेट नंबर ४१ सीरिया तिसरी ता. ९ जानेवारी १९८६ पृष्ठ ४६७ ते ४७१ इंग्रजी भाषेत, आणि पृष्ठ ४७१ ते ४७३ मराठी भाषेत, प्रसिध्द झालेली आहे त्या नियमावलीवरून कळते. त्या देवस्थानचे संस्थापक महाजन 'वैश्य' ज्ञाती समाजाचे हडकोळण कोमुनिदादीचे जुने सदस्य नाईक नांवाचे 'फटटो गांवकार' आणि 'नाईक गांवकार' शिवाय जलमी, पाळणी, गावडे असे एकंदर महाजन १४९ असून त्यांची नांवे वर उल्लेखित नियमावलीत प्रसिध्द झालेली आहेत. देवस्थानात प्रतिवर्षी जे उत्सव साजरे होतात त्यांची यादी अशी आहे :- **चैत्र महिन्यात :-** बियातोंडी **श्रावण महिन्यात :-** श्रावण सोमवार

पूजा. **भाद्रपद महिन्यात :–** नवें. **आश्विन महिन्यात :–** नवरात्र, दसरा, बारस. **कार्तिक महिन्यात :–** सप्ताह, जत्रा, श्रीतुलसी विवाह. **फाल्गुन महिन्यात :–** शिमगा.

प्रतिवर्षी कोणत्याहि आगाऊ सूचनेशिवाय महाजनांच्या दोन खास बैठका घेण्यांत येतात व त्या श्रीनवदुर्गा देवीच्या सभामंडपातच घेण्यात येतात. पैकी पहिली बैठक गुडीपाडवा दिनी संध्याकाळी आणि दुसरी बैठक दिवाळी दिनी संध्याकाळी घेण्यात येते.

प्रमुख दैवत जे श्रीनवदुर्गा तिची मूर्ती काळ्या पाषाणाची, चतुर्भुज असून तिने आपल्या डाव्या खालच्या हातांत महिषाची जीभ धरलेली आहे. या श्रीदेवीस **श्रीमहिषासुरमर्दिनी** नांवाने ओळखतात. या श्रीदेवीच्या देवालयामागे जे देवालय प्रमुख रस्त्याकडे तोंड करून उभे आहे, ते देवालय श्रीवेताळाचे. त्याच्या गर्भागारांत उच्चासनावर दोन मूर्ती पाषाणाच्या साधारण दोन हातापेक्षा जास्त उंचीच्या असून त्यांतील एक दुसरीपेक्षा दोन इंच कमी उंचीची आहे. मोठी मूर्ती ही वेताळाची व त्याजवळची मूर्ती वेताळाची असे तेथे सांगतात. याच देवालयाच्या प्रवेश दरवाजासमोर एक खडकाळ दगड साधारण अर्धा मिटर लांबी, रुंदी, उंचीचा आहे त्याच दगडावर जत्रेच्या वेळी रेड्याचा बळी देण्यात येतो. प्रतिवार्षिक जत्रा कार्तिक अमावास्या रोजी आणि सर्व कार्यक्रम पूर्ण होईपर्यन्त पहाट उजाडते व त्या पहाटेस त्या दगडावर रेड्याचा बळी देण्यात येतो. म्हणजे प्रत्यक्षांत हा बळी मार्गशीर्ष शुक्ल प्रतिपदेच्या पहाटेस देतात ही वस्तुस्थिती दिसते.

वाघनाथ हे दैवत पाषाणी लिंग रूपात अश्वत्थ वृक्षाच्या पारावर असून हा पार श्रीनवदुर्गेचे देवालय व श्रीवेताळाचे देवालय यामध्ये आहे.

श्रीभूतनाथाची चतुर्भुज पाषाणी मूर्ती श्रीरवळनाथाच्या उजवीकडे श्रीरवळनाथाच्या देवालयांत स्थापित आहे. श्रीपूर्वाचारी हे दैवत श्रीनवदुर्गादेवीच्या देवालयाच्या उजवीकडे प्रमुख रस्त्याच्या बाजूस जमीन-तळावर पाषाणी लिंग रूपांत आहे. श्रीग्रामपुरुषही पाषाणी लिंग रूपात श्रीनवदुर्गा देवालयासमोरच जमीन-तळावर आहे. श्रीगाडवंस श्रीग्रामपुरुषाच्या उजवीकडे पाषाणी लिंग रूपात जमीनतळावर आहे. श्रीसांतेर पितळ धातूच्या कलशरूपात एका लहान देवळीत 'फडते गांवकार' वाड्यावर आहे. श्रीरुपेवंस हे दैवत तांबे धातूच्या पत्र्यावर लहान पेटीच्या आकाराचे असून ते श्रीसांतेरी जवळच आहे. श्रीपूर्वस नांवाचे दैवत श्रीनवदुर्गा देवीच्या गर्भागारांत श्रीनवदुर्गादेवीच्या गर्भागारात श्रीनवदुर्गादेवीच्या मूर्तीच्या उजव्या बाजू-कडे जमीनतळावर पाषाणी चतुर्भुज मूर्ती घोड्यावर बसलेली, अशा स्वरूपात आहे. प्रसाद कौल श्रीनवदुर्गा देवालयांत श्रीनवदुर्गादेवीच्या पाषाणी मूर्तीसच लावतात व ते प्रसाद तांबड्या पटकुळीच्या कळ्या २० आणि फुलाच्या पाकळ्या ५२ मिळून एकंदर ७२ प्रसाद लावतात व ही प्रसाद पूजा श्रीदेवीचे पुजारी ब्राम्हण वैदिक भटजी लावतात.

हे प्रसाद कौल सोमवार, एकादशी, अमावास्या, उत्सवाचे दिवशी घेत नसतात

इतर दिवशी सकाळी पूजा झाल्यावर ९ वाजता सुरू होऊन दुपारी १॥ वाजता बंद होतात. कारण दुपारी महानैवेद्य समर्पणादि पूजा असते. नंतर परत संध्याकाळी प्रसाद घेण्यास प्रारंभ होऊन सात वाजे-पर्यंत प्रसाद घेतात. प्रसाद कौल त्या प्रमुख दैवत श्रीनवदुर्गा पाषाणी मूर्तीस लावतात ती मूर्ती उभी असून तिच्या हातांत खड्ग, त्रिशूल, ढाल, महिषाच्या पाठीवर एक पाय आणि एका हातांत महिषाची जीभ धरलेली आहे. परिवार दैवतांची नांवे व ती कोणकोणत्या जागी आहेत ही ओळख व माहिती वर दिलेली त्या देवस्थानच्या अर्चक पुजारी वैदिक ब्राम्हणाकडूनच घेतल्याने वास्तविक शंका घेण्यास जागा असू नये. परंतु नियमावलीत जी दैवते नोंदलेली दिसतात त्यातील कांहीची नांवे व अर्चक पुजारी यांनी दिलेल्या माहितीतील कांही दैवतांची नांवे यांत काहीसा थोडा फरक दिसला. त्या गांवच्या जाणकार वृध्द इसमाकडून माहिती जबाबदारीपूर्वक मिळून जर या लिखाणात एखादेवेळी नांवाची चूक झाली आहे असे आढळून आले तर योग्य वेळी त्या चुकीची दुरुस्ती करता येईल व तशी माहिती देणाराचे आभार मानीनच परंतु उल्लेखित माहितीत देवस्थानच्या कायदेशीर नियमावलीच्या आधारेच माहिती असून शिवाय इतर उपलब्ध माहितीही दिली आहे.

२३

श्रीमन्दोदरी देवस्थान

बेतकी

श्रीमंदोदरीदेवी, बेतकी, फोंडा

श्रीमंदोदरी देवालय, बेतकी, फोंडा

श्रीमन्दोदरी देवस्थान

गोमंतकांत नानाविध दैवतांची शेंकडो प्राचीनदेवालयें आहेत आणि एकाच नांवाच्या दैवतांची देवालयें एकापेक्षां जास्त गावांत असलेलीही पहाण्यांत येतात. पण, श्रीमन्दोदरी नांवाच्या देवीचें देवालय अखिल गोमंतकांत एकमेव फक्त बेतकी गावातच आढळतें.

प्राचीन कालापासून असलेल्या विशेषकरून नविन काबिजादीत असलेल्या देवालयांच्या प्रतिवार्षिक जत्रोत्सवाचे वेळी जे नानाविध धार्मिक म्हणून कार्यक्रम पार पाडले जात आणि या कार्यक्रमांमध्यें असे काही जाहीर कार्यक्रम साजरे केले जात की ते कार्यक्रम पहाणाराचें अंग थरथरां कांपत असे. ह्दयांत धडधड् लागून कालवाकालव होई, घेरी येऊन जमिनीवर कोसळल्याचे प्रकारही कांहीं कमी नसत. आणि शेवटी, हा कार्यक्रम म्हणजे मनुष्य हत्येचा प्रकार की काय असें चित्र तो प्रत्यक्ष पहाणाराच्या डोळ्यांपुढें दिसे आणि असे हे कार्यक्रम इ. सन १५१० सालापूर्वीपासून कैक वर्षे म्हणजे गोमंतकांत पोर्तुगीज लोकांचा प्रवेश आणि त्यांची राजसत्ता सुरू होण्यापूर्वी पासूनच चालत आले होते. हा कार्यक्रम म्हणजे तरी काय याची थोडीशी तरी कल्पना, जी गोव्याच्या गतेतिहासाच्या सरकारी दप्तरात प्रत्यक्ष बघून वर्णिलेली आहे, तिच्या आधारें, वाचकांच्यापुढें ठेवण्याचा प्रयत्न करूं. गावात वार्षिक प्रमुख जत्रेच्या दिवसांपूर्वी देवालयासमोर किंवा त्या आसपास पुर्वापार रूढी आणि परंपरेने चालत आलेल्या जागेवर एक मोठा टणक घट्ट लांकडी खांब साधारण अंदाजे तीस हात उंचीचा उभा करावयाचा म्हणजे या खांबाच्या मुळाचा चार पाच हात लांब भाग जमिनीत भोक काढून घट्ट पुरायचा म्हणजे तो खांब कशाच परिस्थितीत हालणे किंवा हेलकावे घेणे अशक्य व्हावे. लांकडी गलबत समुद्रांतून जातांनां शीड चढविण्यासाठी जो खांब किंवा कुवा त्या गलबतास असतो, त्या नमुन्याचा हा खांब म्हटलें तरी चालेल. पण या कार्यक्रमाच्या खांबास वरच्या टोकाकडे एक लोखंडी सळई असते आणि ती सळई एक लांकडीचक्र किंवा बैलगाडीस असते त्या प्रकारचे एक चाक वर्तुळाकार, त्यास एका बाजूस पांच जागांवर लोखंडी वाटोळ्या आंगठ्या बसविलेल्या असावयाच्या आणि हे चक्र किंवा चाकांचे मधोमध असलेलें भोक त्या खांबावरच्या सळई वर ठेवल्या बरोबर ती सळई चाकाच्या भोंकाबाहेर यायची. त्या चाकास चक्राकार गरगरीत सभोंवार आपल्या भोंवती फिरविण्याची क्रिया दोन इसम ठरावीक पध्दतीने त्या चक्रास मोठे दोर वेष्टन केलेले, असल्यामुळे योग्य वेळी करण्याच्या तयारींत असत. जत्रेच्या दिवशीं त्या खांबावरील चाकास लोंबकळीवण्यासाठी चार किंवा पांच इसम व्रतस्थ राहिलेले पुरुष सचैल स्नान करून भालप्रदेशात गंधाचा मोठा टिळा, दोन्ही हातांत तीन ठिकाणीं गंधाचे पट्टे, गळ्यांत फुलांची माला, हाताच्या शेवटास कंकणाच्या जागी फुलांची माला बांधलेली, कासोटी घट्ट मारलेलें नेसण शुभ्र वस्त्र्यांचे, अशा अवस्थेत देवापुढे गाऱ्हाणे घालून त्यांस तीर्थ दिल्यानंतर त्या पुरुषांस जमीनी वर जमिनीकडे तोंड करून निजवावयाचे व नंतर त्या प्रत्येकाच्या पाठीस चामडी व मांसास दोन दोन धारदार लोखंडाचे गरे आरपार टोचून त्यांसह ते इसम त्या चक्र किंवा चाकाच्या प्रत्येक आंगठीस एक इसम या प्रमाणे त्यासंबध चक्रास सभोवार चार किंवा पांच इसम लोंबकळावयाचे. नंतर परत देवाकडे प्रार्थना करून ते रहात किंवा चक्र गरगरां मोठ्याने फिरवीत पांच किंवा सात फेरे घ्यावयाचे. पण ते फिरविण्यास प्रारंभ करण्यापूर्वी पासून तों ते पुरुष खाली जमिनीवर सोडवून आणि पर्यन्त एकसारखें रणवाद्य ढोल, नगारे, तासे मोठ्यामोठ्याने वाजवीत म्हणजे कोणीही आक्रोश जरी केला, तरी तो कधींच ऐकावयास येणे अशक्यच अशा जोरांत ते वाद्य चालू राही. अगदी थोडक्यांत आणि संक्षिप्तांत त्या कार्यक्रमाचीं रुपरेषा अशी आहे व हे असे कार्यक्रम प्रतिवर्षी जत्रेच्या दिवशी फोंडा तालुक्याच्या कुंडई बेतकी आणि हडकोळण येथे असलेल्या दैवतांच्या वार्षिक जत्रेच्या दिवशीं अगदी नियमीतपणे साजरा करीत असत. या कार्यक्रमाची बातमी हळूहळू पोर्तुगीज सत्तेचे गोव्यातील गव्हर्नर जनरल यांच्या कानावर आली. पण, त्यांना हे मुळीच खरें वाटले नाहीं म्हणून यांत खरेपणा काय आहे हें स्वतःच डोळ्याने पाहिल्याशिवाय ते विश्वास ठेवीत नसत. त्यांनी बारीक चौकशी करवून माहिती मिळीवली की हा कार्यक्रम आतां जवळच्या दिवसांत कोणत्या गावांत

जत्रेच्या वेळी होणार याचा दिवस समजून घेतला आणि अकस्मात कुंडई गावांत जत्रेच्या दिवशी त्या कार्यक्रमाच्या प्रारंभीस कोणास नकळत हजर झाला. जत्रेंत तो कार्यक्रम चालू असलेला पहाण्यासाठी हजारो लोकांची अफाट गर्दी तेथे कोण कोणाची चौकशी करणार ? त्या गव्हर्नर जनरल साहेबांचे नांव जुझे फेरेर पेस्तान, त्याने हा स्वतः समक्ष सर्व कार्यक्रम आपल्या डोळ्यांनी बघितला, आणि त्याने ताबडतोब आपल्यापुढे तातडीने कुंडई गांवचा तत्कालीन इस्क्रीव्हांव म्हणजे गांवचा चिटणीस यास हजर करविले आणि त्यास असा निर्वाणीचा हुकूम दिला की, जगांत कोणतेही सुधारलेले राष्ट्र स्पष्टपणे आणि डोळ्यांनी जाहीररीत्या पाहिल्यानंतर मनुष्याच्या मांसास आणि कातडीस धारदार लोखंडी गरे आरपार टोंचून त्यांस एका चक्रास किंवा रहाटास लोंबकळविणे असे अनन्वित प्रकार धर्माच्या नांवाखाली का असेना, चालू देणे कठीणच नव्हे अशक्यच आहे. म्हणून, आपले सरकार सर्वश्रेष्ठ राजेसाहेबांच्या नांवाने या अशा प्रकारच्या कृत्यांस नापसंती दर्शवून यापुढे, आजपासून भविष्य कालांत, हे किंवा अशा प्रकारचे कार्यक्रम तुमच्या पूर्ण जबाबदारीने या गावांत कधीही होणार नाहीत, याची पूर्ण काळजी आणि जबाबदारी तुमच्यावर सोपविलेली असून तुम्ही व तुमच्यानंतर जे कोणी चिटणीस येतील त्यांनी, या हुकुमास चोख-पणे पाळा दिला पाहिजे आणि हा हुकूम राजेसाहेबांचा उपयुक्त आणि सद्विवेक आणि चांगल्या विचारसरणीचा असल्यामुळे त्यास पाळा देणे अत्यावश्यक व हिताचे असून त्याच्या अंमलबजावणीसाठी आपण आणखी बळजबरीचे धोरण न ठेवण्याची हमी देतो असे त्यास आश्वासनही दिले. शिवाय, सांगि-तले की, असे कार्यक्रम किंवा सदृश्य इतर गावांत जिथे जिथे होत असल्याची माहिती मिळेल त्या सर्व ठिकाणी असेच हुकूम सोडण्याची आपण व्यवस्था तांतडीने करणार आहे. अशा प्रकारचा हुकूम त्यानी दिला व तो 'बोलेती दु गोव्हेर्नु दु इस्तादु दे इंदिय' या राजपत्रावर त्यांच्या सहीनिशी राजपत्र नं. ५० शनिवार ता. १४ डिसेंबर १८४४ या गॅझेटवर प्रसिध्द झालेला असून त्या खाली त्याच गॅजेटवर अशी सूचना प्रसिध्द केली आहे की, याच प्रकारचा हुकूम ता. ७ डिसेंबरला हडकोळणच्या ग्रामचिटणीसास, ता. ११ डिसेंबरला बेतकी गांवच्या ग्रामचिटणीसास, तसेच मुसलमान काजीसही पाठविल्याचे तेथे नमूद केले आहे. या हुकुमाप्रमाणे त्या तीनही गावांत हा कार्यक्रम बंद झाला – आणि यावर बावीस वर्षे लोटली. नंतर बेतकी गांवचे कांही गांवकार यांनी गव्हर्नर जनरल साहेबांस एक अर्ज ता. ९ फेब्रुवारी १८६६ रोजी सादर करून विनवणी केली की, सरकारच्या त्या ता. ११ डिसेंबर १८४४ हुकुमाची अंमलबजावणी करून गावांत कैक वर्षांपासून चालत आलेली प्रथा बंद पडल्याकारणाने गावांत आणि गांवकरी लोकांस रोगराई, गरीबी, दैन्यावस्था वगैरे नानाविध प्रकारे बाधक झाले असून गांवच्या उत्कर्षाआड त्या दैवतांचा कोप ओढवलेला आहे. करितां, त्या हुकुमाचा फेरविचार करून दया दाखवावी आणि ती जुनी प्रथा परत चालू करण्याचा फेरहुकूम प्रसिध्द करावा. या अर्जावर बेतकी येथील तत्कालीन रहिवासी गांवकर पुंडलीक फट्टो, वासू फट्टो, विठ्ठल फट्टो, सांतू फट्टो, हरी फट्टो, वेंकटी फट्टो आणि इस्क्रीव्हांव नारायण रघुनाथ शेणवी, यांची सही असून वरील सहा इसमानी आपली सही न करतां खूण केलेली आहे व या इसमांस अर्जात लिहिलेली भाषा कळत नसल्यामुळे त्यांचा प्रतिनिधी भाषांतर करणारा मिगेल द कोस्त नांवाच्या इसमाची त्यावर सही आहे – वरील अर्ज गव्हर्नर जनरल साहेब जुजे फेरेर पेस्तान यांस सादर केल्यानंतर त्या गव्हर्नर जनरल साहेबांनी त्या अर्जावरील सर्व मजकूर वाचून त्यावर आपला शेरा लगेच त्याच तारीख ९ फेब्रुवारी १८६६ रोजी दिला, त्याचा आशय असा आहे –

जेव्हां या अर्जातील अर्जदाराचा हेतू ज्या मिगेल कोस्त या भाषांतर प्रतिनिधीने या अर्जावर नमूद केलेला दिसतो तो मिगेल कोस्त इसम आपणापुढे हजर राहून बेतकी येथील जत्रेंत गरे टोंचून मनुष्यांस लोंबकळवून चक्रास गरगरां फिरविण्याचा कार्यक्रम बंद झाल्यामुळेच गांवच्या जनतेस अव-कळा आली, वाईट दिवस आले, हे मला पटवून देईल तर या अर्जाचा विचार करणे शक्य होईल (पहा :- आर्कीव्हु दे फार्मासियु वर्ष १८६५ पृष्ठ १०८ आणि वर्ष १८६६ पृष्ठ ५०). –

आतां देवस्थानच्या मुख्य माहितीकडे वळू

फोंडा तालुक्याच्या बेतकी गांवात श्रीमन्दोदरी देवीचे देवस्थान असून ते कोणत्या साली आणि कोणी स्थापन केले याबद्दल पुराव्यासह निश्चित माहिती कुठेच अद्याप उपलब्ध नसली, तरी हे देवस्थान

निदान पांचशे वर्षांपूर्वी स्थापन झालें असलेंच पाहिजे, याबद्दलची खात्री मिळणारे पुरावे संशोधकांस खचितच मिळू शकतात यांत संशय घेण्याचे कारण नाही. याशिवाय, अभ्यासूदृष्ट्या विचार केल्यास असें नक्की सांगता येईल की, बेतकी हा गांव ज्याकालीं वसतीस किंवा वसाहतीस आला, आणला गेला, त्या कालींच, बेतकी येथें ग्रामसंस्था ज्यांनी स्थापिली, त्याच लोकांनी हें श्रीमन्दोदरी देवस्थान स्थापन केलें आणि त्याचें संरक्षण, कारभार इत्यादि सर्व ग्रामसंस्था स्थापन केलेल्या लोकांनीच केल्यामुळें, जे त्या ग्रामसंस्थेचे आद्य संस्थापक, वर्गी सभासद गांवकार आणि कुलकर्णी, तेच या देवस्थानचे आद्य संस्थापक आणि महाजन आहेत, याबद्दलचा पुरावा मिळतो. या देवस्थानांत प्रमुख दैवत श्रीमन्दोदरी ही जल-देवता आहे. तिचें देवालय ज्या वाड्यावर आहे, त्या वाड्यास देऊळवाडो या नांवानें ओळखतात आणि देवालय असलेली जागा – ठिकाण त्याच देवस्थानच्या भोगवटीचें व मालकी हक्काचें आहे. या देव-स्थानांत प्रमूख दैवत श्रीमन्दोदरी ही जलदेवता असली, तरी आनुषंगिक आणखी दैवतें आहेत आणि त्यांतील श्रीशांतादुर्गा, श्रीरवळनाथ आणि श्रीग्रामपुरुष ही तीन, त्याच वाड्यावर असून श्रीनारायणदेव आणि श्रीकळस हीं दोन गांवकार वाड्यावर आहेत. त्याशिवाय, आणखी एक श्रीगाडव्हस नांवाचें दैवत माडमोलें नांवाच्या वाड्यावर आहे. या देवस्थानचा सर्व वार्षिक खर्च ज्या कालीं हें देवस्थान स्थापन केलें, त्याकाली त्याच्या संस्थापकांनी देवस्थानच्या कायम खर्चाच्या तरतुदीसाठी, ज्या जमिनी, शेती, बागायती, कुळागरें इत्यादि या देवस्थानकडे सोपविल्या होत्या, त्या सर्व जमिनींच्या वार्षिक उत्पन्नातून, तसेंच बेतकी गांवच्या ग्रामसंस्थेच्या म्हणजे कोमुनिदादीच्या उत्पन्नांतून केला जाई. आणि त्या देवस्थानांत होणाऱ्या प्रतिवार्षिक उत्सवांपैकीं, श्रीरामनवमी, वसंतपूजा, आणि एका नंदादीपाचा खर्च वगळतां बाकी सर्व उत्सव व दैनंदिन देवकृत्यांचा खर्च बेतकी ग्रामसंस्था (कोमुनिदाद) खजिन्यांतून अव्याहतपणें करण्याची व्यवस्था कायदेशीरपणें त्या कोमुनिदादीच्या आणि देवस्थानच्या जुन्या दप्तरांत केलेली आढळते. वार्षिक उत्सवांच्या नोंदीत चैत्र महिन्यांत संवत्सर प्रतिपदा, श्रीराम नवमी, वैशाख महिन्यांत वसंत पूजा आणि वायंगण फसल किंवा पीकाबद्दल पूजा, श्रावण महिन्यात श्रावणी सोमवार, श्रीगोकुळाष्टमी, आश्विन महिन्यात नवरात्र, दसरा आणि सर्द फसल किंवा पीकाबद्दल पूजा, कार्तिक महिन्यांत श्रीतुलसी पूजन; मार्गशीर्ष महिन्यात काला उत्सव, माघ महिन्यांत महाशिवरात्र; फाल्गुन महिन्यांत होलिकोत्स व शिमगा बोरेची परब, काला, गोडसांतवण, बियांतोगा, जागर इत्यादि उत्सवांचा समावेश आहे, आणि दोन नंदादीपांचाही समावेश आहे. वर उल्लेख केल्याप्रमाणें, या सर्व उत्सवांचा खर्च (श्रीरामनवमी, वसंत पूजा, एक नंदादीप वगळतां) बेतकी गांवच्या ग्रामसंस्था म्हणजे कोमुनिदादीच्या खजिन्यातून होण्याची कायदेशीर व्यवस्था आहे.

श्रीमन्दोदरी या जलदैवताबद्दल महाचित्तवेधक आख्यायिका

बेतकी हा गांव वसविण्याचें काम प्राचीन काली तत्कालीन जनतेनें हाती घेतलें, पण तेथें एक मोठीच अडचण उभी राहिली ती अशी कीं त्या गांवच्या सरहद्दीच्या क्षेत्रफळांत पाण्याचाच अभाव. आणि पाणी हेंच जीवन असल्यामुळें पाण्याशिवाय गांव वसविणें अगदीच अशक्य, म्हणून बेतकी गांवच्या डोंगराच्या माथ्यावर सांप्रत ज्या जागी मन्दोदरीचें तळें आहे, त्या जागी पाणी मिळविण्याच्या हेतूनें जमीन खोदण्यास जनतेनें प्रारंभ केला व खोदून खोदून खंदक तयार झाला. पण, अंदाजाबाहेर खोदूनही पाण्याचा झरा अत्यावश्यक प्रमाणांतही सांपडेना म्हणून ती जनता निराश होऊन कंटाळली आणि पाण्या-शिवाय हा गांव वसविणें शक्य नाही हें जाणून उद्वेगानें आपला बेत बदलून या सरहद्दीबाहेर गेल्या-शिवाय दुसरा उपायच नाही असें त्या जनतेनें मनांत आणून तो विचार पक्का करून अमलांत आणण्याच्या तयारीत असतांना, शेवटच्या क्षणी, तेथें एक योगी अकस्मात अवतरला. जनतेनें त्या योगी इसमास आपल्या संकटावस्थेची हकीगत कथन केली आणि यावर उपाय योजना केल्यास ही सर्व जनता महान संकटांतून पार पडून याच गांवी वसाहत करून उदरनिर्वाह करू शकेल अशी त्या योगी पुरुषास विनवणी केली. त्या योगी पुरुषानें थोडा वेळ विचार करून त्या जनतेस सांगितलें की, याच गावांत तुम्ही ज्या ठिकाणी पाण्याचा खंदक खणत होता. त्याच जागीं विपुल पाणी त्या खंदकांत तयार होऊन एक तलाव होऊं शकतो आणि त्या पाण्यानें हा सबंध गांव वसाहतीस येऊन भरपूर पिकासाठीही योग्य असा होणें शक्य

आहे. पण त्यासाठी एक मोठे दिव्य करावे लागेल आणि ते दिव्य म्हणजे साधेसुधे नसून त्या जागी दोन नरबली एक पुरुष आणि एक स्त्री लिंगी दिल्यास त्या जागेची स्थान देवता तुम्हावर प्रसन्न होऊन जल-संचय विपुल प्रमाणांत प्राप्त होणे शक्य आहे. नरबली दोन दिले पाहिजेत, हे समजल्यानंतर वसाहत करून गावांत स्थायिक होऊ पहाणारे लोक मोठ्याच चिंतेत पडले. सार्वजनिक हितासाठी म्हणून तोंडावाटे स्वार्थत्याग करण्याची भाषा वापरून वाचाळता व्यक्त करणारे किंवा हलवायाच्या घरावर तुलसी पत्र ठेवून दानधर्म केल्याची प्रौढी मिरवणारे, पुराणकाली अगदीच नव्हते असे जरी खात्रीने सांगतां येणे शक्य नसले, तरी दुर्बलास बळी देण्याची क्रिया कोणत्याहि समाजांत अनादिकालापासूनच चालत आलेली दिसते व हीं वस्तुस्थिती नाकारण्यांत अर्थ नाही. नाहीतर वाघसिंहादि श्वापदे बलवान पाहिल्यानंतर कोंबडे-बकरे यांचे बळी देण्याचे प्रकार हरएक ठिकाणी पाहाण्यांत आले नसते. गांव वसाहत करू इच्छि-णाऱ्यांपैकी एवढ्या असंख्य जनतेच्या हितासाठी एकानेही स्वार्थत्याग स्वतः किंवा आपल्या कुटुंबास बाधा न येण्यासारखी करण्याची पूर्ण काळजी घेतली, आणि त्या गावाच्या सरहद्दीत एक गरीब भटीण आपल्या दोन मुलांसह रहात असे ती कोंवळी मुले एक मुलगा व एक मुलगी. एके दिवशी त्या दोन मुलांची आई ती भटीण, आपल्या मुलास घरांत ठेवून आपल्या उदर निर्वाहाच्या साधनसामुग्रीसाठी गावां-बाहेर तात्पुरती गेल्याची संधी साधून त्या दोनही निरपराध कोवळ्या मुलास, कोणीतरी फूस लावून त्या खंदकाच्या जागी नेले आणि त्यांचे देहार्पण तेथे कसे आणि कोणत्या तरी रितीने केले ते परमेश्वराला माहित; मात्र नरबली त्या योगी पुरुषाने सांगितलेला त्या गांवची वसाहत करू पाहाणारांनी सिध्दिस नेला आणि त्यानंतर त्या जागेवर विपुल पाण्याचा संचय झाला. गांव वसविला गेला. भटीण आपल्या घरा-कडे परतल्यावर आपली दोन कोवळी मुले नाहीशी पाहिल्यानंतर त्या आईचे वात्सल्यप्रेम, तिने आक्रोश करून हंबरडा फोडला. तिच्या कानावर मुलांच्या हत्येची ती दुःखद घटना गेली, आणि तिने तिथेच अनावर स्थितीत त्या गावाला शाप दिला की, या गावांत चोवीस पिढ्यांचा काल वसूच नये. गावांत चुलीत अग्नी पेटू नये व अन्नही शिजू नये. आणि असा हा शाप देवून ती आपल्या सर्वस्वाचा घरादाराचा त्याग करून गांव सोडून, गांवाबाहेर निघून गेली. या शापामुळे गावांत भीतीदायक वातावरण निर्माण झाले. या शापास आपण, कारणीभूत झालो याची जाणीव प्रत्येक रहिवाशास झाली, आणि आपले, आपल्या कुटुंबाचे, वंशाचे कल्याण व्हावयाचे असेल, तर त्या गरीब भटणीचा वंशनाश करून या गावांत रहाण्याने कधीच सुखासमाधानाने रहाणे पूर्णतया अशक्य आहे. आणि एक तर आपण हा गांव सोडून गेले पाहिजे किंवा त्या भटणीने या गावावर दया दाखवून तरी उःशाप दिला पाहिजे. या दोनपैकी एक घडले पाहिजे म्हणून सर्व जनता त्या भटीण बाईस अक्षरशः शरण गेली, क्षमा मागितली आणि दयेची याचना केली. त्या उदार भटणीने त्या गावच्या कल्याणासाठी, आपले दुःख गिळून, आपला शाप मागे घेऊन सांगितले की चोवीस पिढ्यांच्या काला ऐवजी फक्त चोवीस तासात गांवात चुलीत अग्नी पेटू नये आणि अन्न शिजूं नये असा उःशाप दिला आणि तो उःशाप दिल्या कालापासून आजतागायत अव्याहतपणे दर प्रत्येक वर्षी एक दिवस, सबंध चोवीस तास, एकही मनुष्य त्या बेतकी गावांत चुलीत अग्नी पेटवीत नाही आणि अन्न शिजवून जेवण घेत नाही. ही रुढी परंपरेने नियमीतपणे त्या गावांत कसोशीने आणि जबाबदारीपूर्वक आज पर्यंत पाळीत आल्याचे पहाण्यांत येते. आणि ज्या दिवशी ही रुढी पाळली जाते, तो दिवस त्या गावांस एक प्रकारे पुनर्जन्म मिळाल्याचा दिवस अशा भावनेने 'नवोत्सव' म्हणून पाळला जातो, आणि तोच दिवस बेतकी गावांत श्रीमन्दोदरी दैवत ही जलदेवता मूळ स्थापना केलेला दिवस आहे असे मानून नव्याने पीक झालेल्या भाताच्या तांदुळाचे अन्न शिजवून तो महानैवेद्य प्रथम त्या श्रीमन्दोदरी देवीस समर्पण करतात आणि त्यानंतरच त्या पिकाच्या भाताचे तांदुळ गांवचे लोक आपल्या अन्नास वापरतात. अशी ही पुरातन कालापासून चालत आलेली वहिवाट त्या गावांत आहे. आणि त्या वहिवाटीस श्रीग्राम-देवतेचा उत्सव या नांवाने संबोधून प्रत्येक वर्षी साधारणपणे एप्रिल महिन्याच्या पहिल्या आठवड्यात हा उत्सव साजरा केला जातो. या श्रीमन्दोदरी देवालयाचा जीर्णोध्दार हल्लीच्याच वर्षात झाला असून त्या जीर्णोध्दाराचे काम बेतकी गांवची जनता एकत्र येऊन एकमेकांच्या सहकार्याने हे काम तडीस नेले आणि जीर्णोध्दार समारंभ मार्गशीर्ष कृष्ण द्वितीया तिथीच्या शुभमुहूर्तावर (डिसेंबर महिन्यात) साजरा करण्यात आला.

देवस्थानचे आद्य संस्थापक आणि महाजन

या देवस्थानचे आद्य संस्थापक आणि कायम महाजन सभासद बेतकी गांवचे गांवकर आणि कुळकर्णी आहेत. या देवस्थानची महाजनसभा वेगवेगळ्या दोन वांगड समूहाची आहे. पैकी एक वांगड वैश्य गांवकार 'फडते' ज्यांच्या पांच घरवई म्हणजे कुटुंब देवस्थान स्थापना कालांत होती. आणि दुसरा वांगड वत्स गोत्री गौंड सारस्वत ब्राम्हण जे "शिगबाळ" कुळकर्णी बेतकी गांवचे, ज्यांचे त्या देवस्थान स्थापना काली एकच कुटुंब होते. अर्थातच आजच्या कालांत त्या देवस्थानचे आद्य संस्थापक आणि महाजनांचे यादीत वर उल्लेखित दोनही वांगडांचे वंशज पुरुष आहेत हे वेगळे सांगण्याची जरुरी नसावी मात्र वरील दोनही वांगडांशिवाय, किंवा वर उल्लेखित दोनही समुहांशिवाय त्या देवस्थानच्या महाजन सभासदांच्या यादीत कोणाही परकी इसमाचा समावेश केला जाणार नाही, करतां येणार नाही, आणि त्या देवस्थानच्या व्यवस्थापन आणि कारभारांतही शिरकाव करतां येणार नाही असा स्पष्ट आणि निःसंदिग्ध दंडक त्या देवस्थानच्या घटनात्मक नियमावलीत कायदेशीररीत्या केलेला आढळतो. तसेच, त्या देवस्थानच्या घटनात्मक नियमावलीत असेही नमूद केलेले आढळते की, त्या देवस्थानची व्यवस्थापक कारभार समिती किंवा कमिटीची निवडणूक किंवा नेमणूक करताना, त्या समितीची किंवा कमिटीचा सेक्रेटरी, चिटणीस, इस्क्रीव्हांव किंवा ज्यास कमाविसदार अशा नांवाने संबोधिला जातो, तो इसम सर्व महाजनांनी ब्राम्हण वांगडांतील निवडला किंवा नेमणूक केलेला असावा. कारण, त्याच वांगडांतील इसमाचे प्राचीन कालापासून कमिटीच्या सेक्रेटरीचे काम केले गेले आणि ही वहिवाट देवस्थानांच्या कायद्याच्या कलम ५९ प्रमाणे बजावित आली आहे. असेही त्या घटनेत नमूद केलेले आढळते. श्रीमन्दोदरी देवस्थान – बेतकी, या देवस्थानची घटना नियमावली (कोंप्रोमिस्सु) पोर्तारीय नंबर १०६ तारीख २२ एप्रिल सन १९१० या सरकारी हुकुमाने मंजूर केलेली असून ती सरकारी गव्हर्नमेन्ट गॅझेट बोलेती ऑफिसियाल नंबर ३१ बुधवार ता. १४ सप्टेम्बर सन १९१० नंबर ७१ पुरवणीवर प्रसिध्द झालेली असून ती जिज्ञासूंस वाचावयास सरकारी सेन्ट्रल लायब्ररीत पणजी शहरांत वाचावयास मिळते.

२४

श्रीमहामाय (म्हामाय वडपादेवी) देवस्थान

फातर्पें – होर्णे



श्रीमहामाया वडपादेवी, फातर्पे–होर्णे, कुंकळी

श्रीमहामाया वडपादेवी देवालय, फातर्पे–होर्णे, कुंकळी

श्रीमहामाय (म्हामाय वडपादेवी) देवस्थान

गोमंतकांत केपे तालुक्यात फातर्प्यां या गावी होर्ण नावाच्या वाड्यावर आजच्या कालांत श्रीमहामाया देवस्थान जे दिसत आहे, ते देवस्थान इसवी सनाच्या सोळाव्या शतकापूर्वी सासष्टी तालुक्यात गिरदळी गावात स्थापित होते.

पोर्तुगीज लोकांचा गोमंतकांत प्रवेश इ. स. १५१० साली झाल्यानंतर काही कालाने त्यांचे राजकीय धोरण ज्यांचे 'राज्य त्यांचा धर्म' या तत्वावर चालू झाले आणि त्यामुळे तत्कालीन गोव्याच्या धार्मिक राजकारणावर त्याचा परिणाम सुरू झाला. पोर्तुगीज प्रवेशपूर्व कालांत गोमंतकांत हिंदूंची पुष्कळ देवालये होती. पुढे या देवालयावर पोर्तुगीजांच्या अमदानीत संक्रांत आली. गोवा बेटांतील म्हणजे तिसवाडीतील हिंदूंची सर्व देवालये ता. २८ जून १५४१ पूर्वी नष्ट करण्यात आली असा एका सरकारी लेखांत, ती देवालये जमीनदोस्त करण्यात आल्याचा स्पष्ट उल्लेख आहे. ह्या लेखामध्ये म्हटले आहे की, ह्या बेटांतील सर्व देवालये मोडण्यात आली असून ती पुन्हा केव्हाच उभारण्यात येणार नाहीत. इ. स. १५६६ पर्यंत गोवा बेटाचे संपूर्ण खिस्तीकरण झाले. त्यापूर्वी इ. स. १५६० साली जेजुइट पंथाचे लोक आपल्या धर्मप्रसारार्थ सासष्टीत गेले होते. सासष्टीत बहुतेक सर्व गावामध्ये लहान मोठी शेकडों देवालये होती. मुरगांव आणि लोटली या गावांमध्ये मशिदी होत्या. सदर देवालये आणि मशिदी हळूहळू नष्ट कराव्यात, असे पोर्तुगीज सरकारचे धोरण होते. ही देवालये नष्ट व्हावी यासाठी जेजुइट पाद्रीच्या विनंती वरून गोव्याच्या व्हाइसरायने ता. २० डिसेम्बर १५६५ रोजी आज्ञा केली की, हिंदु धर्मीयांनी नवीन देवालये बांधू नयेत किंवा असलेल्या देवालयांची दुरुस्ती किंवा डागडुजी करू नये. व्हाइसरायच्या या आज्ञापत्राची सासष्टीतील हिंदु धर्मीय पुढाऱ्यांस रायतुरच्या किल्ल्यात ता. १४ जानेवारी १५६६ दिवशी जाणीव देण्यांत आली. ही परीस्थिती ओढवल्यानंतर सासष्टीतील कित्येक देवालयांच्या कुळावी महाजनानी आपआपल्या देवांचा कौल घेऊन अनेक देवालयांतील दैवतांचे शेजारच्या परकी राज्यांत आदिलखानाच्या प्रदेशांत, आणि दक्षिणेंत हिंदु राज्यांमध्ये स्थलांतर केले. आदिलखानाचे राज्य मुसलमानाचे जरी असले, तरी तेथे हिंदु धर्मीयांस बरेच स्वातंत्र्य होते. कारण, त्या राज्यांतील अधिकारी देसाई आणि गांवकार हिंदुधर्मीयच होते. तात्पर्य, गोवा तिसवाडी बेटावरील दैवतांचे स्थलांतर इ. स. १५४० सालापूर्वी पोर्तुगीज राजसत्तेबाहेरील प्रदेशांत झाले असले पाहिजे. कारण, गोवा तिसवाडी बेट, दिवाडी आणि चोडण येथील हिंदूंची देवालये इ. स. १५४० सालांत उध्वस्त करण्यांत आली आहेत. तसेच, सासष्टी तालुक्यांतील हिंदूंची देवालये किंवा त्यांतील दैवते त्यांच्या कुळावी महाजनांनी ता. १ मे १५६० दिवसापूर्वी सासष्टी तालुक्याच्या हद्दीबाहेर, परकी राज्यांत स्थलांतर करून नेली असली पाहिजेत. कारण, जेजुइट पंथाच्या लोकांनी आपल्या धर्मप्रसारार्थ जो प्रवेश पहिल्यानेच सासष्टीत केला, तो ता. १ मे १५६० रोजी कुठ्ठाळ गांवच्या भूमीवर, आणि त्या दिवशी त्या कुठ्ठाळी गावांतील देवालयाच्या इमारतीत दैवत नसल्याचे त्यांना आढळून आले व ते दैवत त्यांच्या कुळावी महाजनांनी रात्रीच्या काळोखांत उचलून शेजारच्या आदिलशाहीच्या राज्यांत पळवून नेल्याचे कळल्याचे त्या जेजुइट पंथाच्या लोकांनी आपल्या गुप्त पत्रांत लिहून ठेवल्याचे सद्यःकालांत ती पत्रे पोर्तुगाल आणि रोम येथे प्रसिध्दीस आल्यामुळे उघडकीस आले आहे. सासष्टीतील हिंदु देवालयाच्या इमारती जेजुइट खिस्ती लोकानी ज्या जाळल्या, उध्वस्त केल्या, त्या इ. स. १५६० ते १५६७ च्या अवधीत. पण, त्या देवालयाच्या बहुतांशी इमारतीत प्रमुख दैवते नव्हती. ती त्या दैवतांच्या कुळाव्यानी बाटाबाटीच्या भयाने आकस्मिकरित्या, शक्य त्या रीतीने, मिळेल त्या सोईस्कर वाटेने, पळवून स्थलांतर केली होतीच. स्थलांतराच्या वेळी मोठमोठ्या वजनी पाषाणी दगडी मूर्ती रात्री अपरात्री डोक्यांवर घेऊन, रानावनांतून पळत जाणे हे अगदी अशक्य म्हणून त्या संकटकालात दैवतांचे प्रतीक म्हणून जे कांही त्यांना बरोबर घेऊन पळणे शक्य झाले, ते प्रतीक घेऊन ते बाहेरच्या राज्यांत पळून गेले आणि तेथे ते दैवत स्थापन केले, हे उघड आहे, हे सांगण्याची गरज नाही. ते अशा रीतीने पळून गेल्यानंतर त्यांच्यामागे ज्या इमारती राहिल्या, आणि इतस्ततः मोठमोठ्या पाषाणी अवजड

मूर्ती तेथे राहिल्या, त्यांचा ताबा त्या जेजुइट पंथाच्या बाटाबाटी करणाऱ्या लोकांनी घेऊनच हिंदूंची देवालये बाटीवली, मूर्ती फोडल्या, इमारतीस आगी लावल्या किंवा मोडून टाकल्या, अशा समाधानांत ते बेहोष निमग्न झाले. पण, जेव्हा हा वेग ओसरला आणि त्यांच्या मागाहून लक्षांत आले व कळून चुकले की, या कुळाव्यानीं स्वधर्म रक्षणार्थ आपली घरे दारे, सर्व संपत्ती, जमीन-जुमला, दागदागिने या सर्वांचा त्याग करून मोह, मायापाश तोडून, आपले कुलदैवत बरोबर घेऊन स्वार्थत्यागपूर्वक, आपल्या भूमीतून पलायन करून, परराज्यांत ती आपली कुलदैवते परत स्थापन करून तेथेच स्थायिक झाले, तेव्हां त्याचा परिणाम लगेच व्हायचा तोच झाला. बहुतांशी प्रजाजन ही भूमी सोडून परराज्यांत गेल्यामुळे शेती व इतर जमिनी ओसाड, व्यापार धंदा बंद, धान्य पीक नाही, कर नाही, कस्टम नाही, सर्व व्यवहार पूर्णपणे थंडावले आणि बंद. राज्य पडिक जमिनी आणि डोंगरांवर कसले करणार ? राज्यकर्त्यांचा नक्षा आपोआप उतरलाच. धोरण तांतडीनें बदलणे अनिवार्य झाले पण फार उशीर झाला होता. असें असूनही पुढें हिंदूस धर्मात पूर्ण स्वातंत्र्य दिलें तरच येथें राज्य करणे शक्य होईल ही राज्यकर्त्यांची पूर्ण खात्री झाली व तसें धोरण अंमलांत येण्यास झपाझप पावलें उचलली गेली. असें जरी झाले तरी एकदां अनुभव आलेला, हात पोळलेले असल्यामुळे विषाची परीक्षा कोण घेण्यास धजणार ? स्थलांतर होऊन पोर्तुगीज राजसत्ते बाहेर नेलेलीं देवालये परत या राज्यांत येणे कठीण होतेच आणि या अशा परीस्थितीमुळे श्रीमहामाया किंवा श्रीमहामाया देवस्थान एकदा बाटाबाटीच्या भयाने सासष्टी तालुक्यातील गिरदळी गावातून जें सध्याच्या केपें तालुक्याच्या फातर्पे गावांत होर्णे वाड्यावर स्थलांतर करून राहिले ते अद्यापपर्यंत तेथेंच साधारणपणे चारशें वर्षांपेक्षा जास्त काल सुस्थितीत उभें आहे. ज्या भयानक कालांत इ. सनाच्या सोळाव्या शतकांत सासष्टीच्या गिरदळी गावांतून हे दैवत बाटाबाटीच्या भयामुळे बाहेर स्थलांतर करण्यास आकस्मिकपणे निघाले, त्या दारुण प्रसंगी अर्थातच त्या देवालयाची तत्कालीन सर्व संपत्ती, जमीन जुमला, शेती – बागायती या सर्वांचा त्याग करून त्यावर तिलांजली देऊनच गिरदळींहून निघावे लागले हें अगदीं उघड आहे. त्या सर्व जमिनी जेझुइट पंथीयांनी व तत्कालीन सरकारने आपल्या ताब्यांत घेऊन त्यांचा विनियोग ख्रिस्तीधर्मीय लोकांच्या चर्चेस आणि त्यांच्या धर्मप्रसाराच्या कार्यास केला गेला. अशा बिकट परीस्थितीत श्रीमहामाया (श्रीम्हामाय) दैवत फातर्पे या गावांत व्होर्णे वाड्यावर स्थापून त्या जागी त्या दैवताची त्याच्या पंचायतन किंवा पंचिष्ठ दैवतांसह स्थापना, सुप्रतिष्ठा करणे, त्यांची देवालयें इमारती बांधणे, त्या सर्वांची दैनंदिन विधियुक्त पूजा अर्चा नित्य अखंडितरीत्या चालीवणे, नंदादीप, महानैवेद्य, सतत अव्याहतपणे चालीवणे, शिबिकोत्सव, वसंतपूजा, नवरात्रोत्सव अशा सारखे उत्सव त्या देवालयांत साजरे करणे, अभिषेकी पुजारी भटजी व इतर सेवेकरी यांस वेतन, देवालयें – इमारती संरक्षण, डागडुजी वगैरे खर्च सर्व आवश्यक व्यवस्था संपूर्णपणे नियमितपणे ठेवून एक धार्मिक संस्था आणि त्यांतही एक देवालय जबाबदारीपूर्वक आजपर्यंत चारशे वर्षांपेक्षा जास्त काल त्या दैवताचे एकमेव कुळावी कुटुंब कामत उपनांवाचें 'वत्स' गोत्राचें पणजी शहरांत ज्यांचा विस्तीर्ण ऐतिहासिक वाडा राजधानीच्या प्रमुख महत्वाच्या नाक्यावर एकेकाळच्या गव्हर्नर जनरलच्या पॅलेस शेजारी दिमाखाने मांडवी नदी किनाऱ्याकडे पहात उभा आहे, त्या वाड्यांत निवासस्थान असलेले, ज्यास 'म्हामाय कामत' या नांवानें गोव्यांत, सर्व भारतांत, आणि परराष्ट्रांत त्याच्या दिगंत कीर्तीमुळे आणि पुण्याईमुळे ओळखलें जातें, त्या एकमेव कुटुंबाकडून त्या देवस्थानाचा सर्व खर्च, कोणाच्याहि मदतीशिवाय होत आहे ही वस्तुस्थिती आहे. आणि ही गोष्ट साधीसुधी तर नव्हेच तर अगदी असामान्य अशी आहे. एक देवस्थान सुरक्षितपणे संभाळणे त्यांतील दैवतांची अखंडीतपणे पूजा अर्चा, अहोरात्र नंदादीप पेटविणे, महानैवेद्यादि सर्व सोपस्कार दैनंदिन पार पाडणें म्हणजे अक्षरशः सुळावरील पोळीच म्हणायची. हे फक्त प्रत्यक्ष अनुभवानेच कळणारे आहे. ज्यांनी आपआपल्या कुटुंबांतील इस्टेटीची विभागणी करताना कांही अविभाग आपआपल्या कुवतीप्रमाणे वेगळा काढून तो आपल्या कुलदैवतांच्या योग्य व्यवस्थेसाठी त्या देवस्थानकडे सोंपविणे आणि त्या देवस्थानाची व्यवस्था परंपरेने सांभाळण्याची जबाबदारी पाळणें यांत कसूर केली नाही, अशाच कुळाव्यांची थोडी अवघी देवालयें जशी गोमंतकांत दिसतात, त्यांपैकीच हे एक स्पष्ट उदाहरण डोळस मनुष्यास पाहाण्यासारखे आणि सत्य वस्तुस्थितीचे ज्ञान ज्यांस करून घ्यावयाचे आहे त्यास उद्बोधक ठरेल.

गोमंतकांत अशी ही देवालयें नानाविध कारणामुळें आरंभशूरपणानें थाटलेली पहाण्यात आहेत पण तेथील स्थापित दैवतांस पुरें एक वर्ष देखील दुपारी महानैवेद्याची अखंडित व्यवस्था करण्यास काय अडचणी आल्या याचा अनुभव एकीकडे असतानांच, आणखी इतर देवालयें आपल्या कबज्यांत मिळावी ही वृत्ती काय दर्शीवते ? बाटाबाटीच्या धुमश्चक्रीत गिरदळी गावातील पोर्तुगीज लोकांनी जी देवालयें उध्वस्त केली ती रवळनाथ, बर्नादेव (वीरभद्र), क्षेत्रपाळ आणि नारायण या दैवतांची होती, असा उल्लेख तत्कालीन उध्वस्त केलेल्या सासष्टींतील देवालयांच्या यादीत आढळतो. परंतु स्थलांतर झाल्या-नंतरच्या कालांत व्हॉर्ण – फातर्पे येथे जी दैवतें श्रीमहामाया किंवा श्रीम्हामाय देवस्थानांत सुप्रतिष्ठित करून जी आजतागायत तेथे आहेत तीं अशी :– श्रीमहामाया किंवा श्रीम्हामाई हे प्रमुख दैवत असून श्रीलक्ष्मीनारायण, श्रीआकारपुरुष, श्रीग्रामपुरुष, श्रीरवळनाथ. या पांच दैवतांपैकी श्रीलक्ष्मीनारायण दैवत हे संगमरवरी शुभ्रपाषाणी श्रीनारायण म्हणजे श्रीविष्णूची असून बाकी चारही दैवतें पाषाणशीला लिंगाच्या आकारात आहेत. श्रीमहामाया किंवा श्रीम्हामाय या प्रमुख दैवतास महाभिषेकानंतर कवच मुखवटा चांदीचा घालून महापूजा केली जाते. या श्रीमहामाया किंवा श्रीम्हामाय व उपादेवी अशा नांवानें प्राचीन काळापासून जसें ओळखण्यांत येतें, त्याच प्रमाणें त्या देवीचे जे कुळावी कामत उपनांवाचे त्यांस ही प्राचीन कालीं कामत गिरदोळकर या उपनांवानेंच ओळखत असत. त्यांस “कामत म्हामाय” या उपनावानें केव्हांपासून संबोधण्यांत येऊ लागलें, याचा नक्की काल जरी खात्रीपूर्वक सांगतां येणे कठीण असलें, तरी निदान इतकें तरी सांगता येईल की, इ. स. १७८० च्या एका कागदपत्रांत ‘कामत म्हामाय” असा उल्लेख आढळत असल्याचे पाहून तसें उपनांव – दोनशें दोन वर्षे तरी प्रचारांत आहे असें म्हणावयास हरकत नाही. तसेंच, ज्यावरून त्या श्रीमहामाया किंवा श्रीम्हामाय या देवीचे एकमेव कुळावी कामत जे त्या देवस्थानाबद्दलची स्थापना, संरक्षण, पूजा-अर्चा, उत्सव सर्वच जबाबदारी तन-मन-धनानें एकनिष्ठेनें कुलदैवत म्हणून श्रध्दापूर्वक परंपरेनें संभाळीत आले, त्यामुळें अर्थातच ‘कामत म्हामाय’ याच उपनांवानें त्या कुटुंबास जनतेनें बहुमानपूर्वक संबोधणें साहाजिकपणें ठरलें यांतही आश्चर्य मानण्यांचे कारण नाही. त्या देवस्थानची सर्वच जबाबदारी आणि व्यवस्थापन कारभार ते कामत म्हामाय कुटुंब वंशपरंपरेनें पिढ्यानपिढ्या चालवित आले असून त्याच कुटुंबाकडून त्या देवस्थानास ‘कुट्ये बागायत’, ‘कातयादेग बागायत’, ‘आंब्या मळो बागायत’, ‘निसांची आड शेत-जमीन’, ‘कुणगोशेत जमीन’, ‘आंवाळे शेत जमीन’, ‘शेंकें शेतजमीन’, अशा जमिनी खास त्याच देवालयास त्याच्या खर्चासाठी नेमून दिल्या आहेत. इसवी सन १८८० सालांत या देवस्थानचा सर्व कारभार श्री. त्रिविक्रम कामत म्हामाय नावाचे त्या कुटुंबांतील एक तत्कालीन प्रमुख पुरुष चालवीत असत असा उल्लेख तत्कालीन कागदपत्रांवरून कळतो. तसेंच त्या काली त्या कुटुंबांत श्री. विठ्ठल कामत म्हामाय, केशव कामत म्हामाय, रामू कामत म्हामाय, नानू कामत म्हामाय, लक्ष्मण कामत म्हामाय, राणू कामत म्हामाय, शाणू कामत म्हामाय, वैंकुंठ कामत म्हामाय, शेषगिरी कामत म्हामाय, वासुदेव कामत म्हामाय, पुंडलीक कामत म्हामाय, गोविंद कामत म्हामाय, शेषगिरी कामत म्हामाय, वासुदेव कामत पांडुरंग कामत म्हामाय, रायू कामत म्हामाय, पांडु कामत म्हामाय इतके पुरुष असल्याची नोंद मिळते.

आदिशक्तिर्महामाया सच्चिदानंदरूपिणी ।
पालनार्थं स्वभक्तानां शांतादुर्गाभिधामता ॥ १ ॥

नमो दुर्गे महादुर्गे नवदुर्गास्वरूपिणी ।
कैवल्यवासिनी देवी शांतादुर्गे नमोस्तुते ॥ २ ॥

श्रीशांता विजयप्रदा विजयते दुर्गा हृदा तां भजे ।
क्रुद्धौ शान्तियुतौ कृतौ हरिहरौ कृत्वाऽधिहस्ते यया ॥
शांतायै च नमो नमो नहि परं यस्या ममाऽलंबनम् ।
शांतायाः खलु किंकरोऽस्मि रमतां तत्पादयोर्मे मनः ॥ ३ ॥

श्रीशांतादुर्गा देवस्थान

कवळें – फोंडा

•

सासष्टीच्या केळोशी गावांतून स्थलांतर होऊन फोंडा महालांत कवळें गावांत स्थापन झालेलें श्रीशांतादुर्गा देवस्थान.



श्री शांतादुर्गा, कवळे



श्री शांतादुर्गा, देवस्थान, कवळे

श्रीशांतादुर्गा, कवळें

महारवाड्यांत आसरा घेणारे जागृत देवस्थान

फोंडा तालुक्याच्या कवळें गावात हे सुप्रसिध्द आणि जागृत देवस्थान एका सुंदर स्थळी आहे. तेथील सृष्टीसौंदर्य अत्यंत मनोहर फार आल्हाददायक आणि सभोंवतालचा परिसर मनोवेधक आहे. फोंड्याहून कवळे येथील हे देवस्थान अवघ्या १। मैल अंतरावर असून तेथे येण्याजाण्यास फोंडा स्टँडवरून नियमित प्रवासी वाहतूक करणाऱ्या बसेस असतात.

जागृत देवस्थान

श्रीशांतादुर्गा देवस्थान आजच्या काळांत फार मोठ्या भरभराटीत असून तेथील श्रीजगदंबा मातेचे दैवत महान जागृत आहे. तेथील वैभव पुरातन कालापेक्षांही दिवसेंदिवस वाढत आहे हे त्या जागृत श्रीशांतादुर्गा देवीच्या कृपेचें फळ होय. तेथील वार्षिक महापर्वणी महारथोत्सव माघ शुक्ल पंचमी रोजी होत असतो आणि त्या जत्रेस जनसागर केवढा मोठा असतो हे प्रत्यक्ष पाहिल्या शिवाय कळणार नाही. कवळें येथील या देवालयाची इमारत अमुकच साली बांधली गेली, याबद्दलचा उल्लेख त्या देवस्थानच्या दप्तरांतही आढळत नाही. पण, इ. स. १७४० साली सरदार नारोराम मंत्री त्या देवीच्या वार्षिक महापर्वणीच्या जत्रेस कवळेस आले होते, त्या साली, हे देवालय होते ही गोष्ट सिध्द करणारी कागदपत्रें आहेत. तसेच, सरदार रामचंद्र मल्हार यांनी या देवस्थानच्या जुन्या काळी अग्रशाळा बांधल्याचा निर्देश गोवा सरकारच्या दप्तरांत मिळतो. श्रीशाहू छत्रपती यांच्या अष्टप्रधानांतील मंत्री नारोराम शेणवी (श्रीशांतादुर्गा देवस्थानच्या "रेगें" या वांगडाचे कुळावी महाजन) यांनी छत्रपतींचे मुख्य प्रधान श्रीमंत बाजीराव पेशवे यांजकडून श्रींचे अमतपड, नंदादिपादि उज करता मौजे कवळें हा गांव सुद्दर तस ११४० म्हणजे इ. स. १७२९ साली या देवस्थानास दिला होता, पण नंतर पेशव्यांचे मांडलिक श्रीमंत सौंदेकर राजे यांच्या अमदानीत हा गांव अनामत झाला. पण, पुढे रामचंद्र मल्हार सुखठणकर वांगडाचे (याच श्रीशांतादुर्गा देवीचे कुळावी महाजन) यांनी पूर्व सनदेबरहुकूम हा गांव इनाम चालविण्याविषयी नवी सनद सौंदेकराने सवाई इमडी सदाशिव राजेंद्र यांजकडून करून घेतली. या देवस्थानात हल्लींच्या दहा वर्षात मूर्त स्वरुपांत आलेल्या हरएक सोई नवीन बांधकामाच्या अग्रशाळा, नगारखाना, श्रीस्थळ एक उत्कृष्ट देवस्थानांपैकी आहे असे वाटल्या वांचून रहावत नाहीं. या स्थलांत श्रीशांतादुर्गा देवीचें मंदिर सुभव्य इमारत पूर्वाभिमुख असून तिच्या तीन बाजूंनीं भव्य अग्रशाळा, देवालयासमोर दीपस्तंभ, त्यापुढे प्राकाराच्या प्रवेशद्वारातून बाहेर येतांना उजव्या बाजूस तलाव असा शोभिवंत देखावा दिसतो. श्रीदेवीच्या मंदिरातील वगरेकडे लक्ष दिले असता, हे पंचलवी चतुर्भूज मूर्ती असून तिच्या जवळच, लहान सहा इंच आकाराचे श्रीमंगेश लिंग आहे. हे शिवलिंग त्या देवस्थानचे वत्स गोत्री 'वर्दे' नामक कुळावी महाजनांचे आहे असे सांगतात. 'वर्दे' वत्स गोत्री हे मुळचे श्रीमंगेश देवाचे कुळावी होत. श्रीशांतादुर्गा देवस्थानचे मूळ आद्य संस्थापक कौशिक गोत्रांचे गौड सारस्वत ब्राम्हण कुळावी महाजन होत. नंतरच्या कालांत याखेरीज वत्स गोत्रीय 'वर्दे' व भारद्वाज गोत्री 'पाणंदीकर' ही दोन गौड सारस्वत ब्राम्हणांची घराणी यांची भर पडली. प्राचीनकाली केळोशी येथे पाणंद (पायण) वाड्यावर पाळंदीकर यांच्या मूळ कुटुंबाचे घर होते असे सांगतात.

धार्मिक छळाचा परिणाम

कवळे येथील श्रीशांतादुर्गा देवीचे आद्यस्थान गोव्यात सासष्टी तालुक्याच्या केळोशी गांवात पोर्तुगीज राज्यकर्ते आणि झेझुइट पंथाचे खिरस्ती धर्मीय पाद्री लोक यांच्याकडून इ. सनाच्या सोळाव्या शतकांत हिंदुधर्मीयांचा धार्मिक छळ सुरू झाल्यानंतर या देवतेचे स्थलांतर केळोशीहून फोंडा तालुक्याच्या कवळे गांवात झाले. हे स्थलांतर केव्हा झाले, याबद्दल पोर्तुगीज सरकारकडून इ. स. १९२९

साली जो आनआरिय, दे इंदिय पोर्तुगीझ ग्रंथ सरकारी माहितीचा म्हणून प्रसिध्द झाला. त्यांत श्रीशांतादुर्गा कवळे देवालय सासष्टीच्या केळोशीहून इ. स. १५६४ साली धार्मिक छळाच्या कारणामुळे स्थलांतर केले गेले, अशी स्पष्ट माहिती आहे. (पहा- पृष्ठ २३), असे जरी झाले, तरी त्या देवस्थानचे कुळावी इतिहासाचार्य कै. वा. पांडुरंगबाब शेणवीपिसुर्लेकर, आपल्या 'श्रीशांतादुर्गा देवालयाचा पूर्वेतिहास' या लेखात लिहितात, 'समकालीन पोर्तुगीज कागदपत्रांवरून केळोशीहून ता. १४ जानेवारी १५६६ नंतर व दि. २९ नोव्हेंबर १५६६ च्या पूर्वी देवतांचे स्थलांतर झाले ही गोष्ट निश्चित ठरते. (पहा- श्रीशांतादुर्गा चतुःशताब्दि महोत्सव ग्रंथ प्रकाशन इ. स. १९६६ पृष्ठ १६९) या स्थलांतर कालाबद्दल तत्कालीन झेझुइट पंथाच्या पाद्रींनी आपण ता. १ मे १५६० दिवशी प्रथमतःच सासष्टीतील कुशस्थळी गावात प्रवेश केल्यापासूनच्या दिवसापासून ज्या एकंदर अनेक घडामोडीचा खाजगी रिपोर्ट आपल्या वरिष्टांस पाठविला होता, ती सर्व कागदपत्रे आजच्या कालात उपलब्ध आहेत. ती बारकाईने वाचून पहाता हा स्थलांतर काल इ. स. १५६० ता. १ मे पूर्वीचा असावा असे वाटल्यास आश्चर्य मानण्याचे कारण नाही. कारण, त्याच रिपोर्टात कुट्टाळी येथून श्रीमंगेश देवाचे स्थलांतर ता. १ मे १५६० दिवसापूर्वी दुसऱ्या राज्यांत नेल्याने त्यास दैवत बाटविण्यास मिळाले नाही आणि दैवता शिवाय असलेली देवालयाची ती इमारत त्यांनी आपले चर्च बनविले असा त्यांत उल्लेख आहे असो.

पहिल्या मानाची वहिवाट

केळोशीकर म्हणजे श्रीशांतादुर्गा कवळे देवस्थानच्या कुळावी श्रीमंगेश देवस्थानांत, आणि कुठ्ठाळकर म्हणजे श्रीमंगेश देवस्थान मंगेशीच्या कुळावी कुटुंबांस श्रीशांतादुर्गा कवळें देवस्थानांत पहिला मान देण्याचा सांप्रदाय आहे. आणि म्हणून प्रतिवर्षी महापर्वणीच्या महारथोत्सवांत रथावर नारळ फोडण्याचा अग्रक्रम श्रीकैवल्यपूर मठाधीशानंतर श्रीशांतादुर्गा कवळें देवस्थानांत श्रीमंगेश देवाच्या कुळावीयांस व श्रीमंगेश देवस्थानांत श्रीशांतादुर्गा कवळें, देवीच्या कुळावीयांस देण्याची वहिवाट आजतागायत आहे. पण, श्रीशांतादुर्गा देवस्थानात कैवल्यपूर मठाधीशांनंतर बुर्ये या उपनांवाच्या वैष्णव सांप्रदायाच्या कुटुंबियांकडून रथावर नारळ फोडण्यांत येतो. कारण, या कुशल वैष्णव सांप्रदायाच्या गृहस्थाने पूर्वी एकेकाळी त्या देवालयांतील सुतार कामाची एक मोठी तेढ दुरुस्त केल्यामुळे त्यांच्या वंशजांस हा बहुमान देण्यांत येतो असे सांगतात. हे नारळ फोडून झाल्यावर मात्र अगोदर कुशस्थलीकर श्रीमंगेश देवाचे कुळावी व त्यांच्यानंतर इतर लोकांनी रथावर नारळ फोडण्याची वहिवाट आहे. या श्रीशांतादुर्गा – कवळें देवस्थानची घटनात्मक नियमावली प्रारंभी ता. ५ नोव्हेंबर १९०९ रोजी सरकारने मंजूर करून ती बोलेती ऑफिसियाल नंबर ८६ वर प्रसिध्द झाली आहे. नंतर, त्यातील काही कलमांची दुरुस्ती करून ती ता. २० मार्च १९६५ रोजी मंजूर झाली ती सरकारी गॅझेट नंबर ५ पहिली सीरियामध्ये प्रसिध्द झाली आहे. या देवस्थानचा चतुःशताब्दि महोत्सव शके १८८८ म्हणजे इ. स. १९६६ साली झाला असून त्या महोत्सवाच्या वेळी येथे ज्या जागी श्रीदेवीचे वृंदावनासारखे स्मारक उभारले असून त्यावर माहितीसाठी शुभ्र संगमरवरी कोरीव शिलालेख बसविलेला आहे. कवळें येथेही असेच स्मारक तलावाच्या बाजूस उभारलेले आहे. या सुप्रसिध्द देवस्थानास भेट देणाऱ्या प्रवासी, यात्रेकरू, पर्यटकांस जरूरीच्या सर्व सोई, जेवण मिळण्याची खाणावळ, चहा-कॉफी-फराळाची सोय असलेली दुकाने देवालयाच्या प्रवेशमहाद्वाराच्या जवळच आसपास असल्यामुळे तसेच प्रवासी वहातुक करणाऱ्या नियमित बससर्व्हिस असल्यामुळे कोणतीच अडचण होत नाही. या देवस्थानच्या उजव्या बाजूस दोन मिनिटांच्या अंतरावर श्रीगौडपादाचार्य संस्थान कवळें मठ स्मार्त सांप्रदायी आहे.

श्रीशांतादुर्गा – कवळें देवस्थानच्या भांडारात वेळोवेळी जशी भर पडत होती, तशीच आकस्मिकपणे विनाकारण नुकसानी सोसण्याचे प्रसंग ओढविल्याशिवाय राहिले नाहीत. अशा भयंकर नुकसानी सोसण्याचा प्रसंग म्हणजे इ. स. १८९८ साली पडलेला पठाण लोकांचा दरोडा होय. हा दरोडा जितका आकस्मिक तितकाच भयंकर होता, त्यांत देवालयाचे मौल्यवान दागिने, कवचें, सोने चांदीच्या वस्तू, रोकड, मिळून जवळजवळ एक लाख रुपये किंमतीचा माल चोरीस गेला आणि नासधूसही झाली होती.

त्याचे अगोदर काही महिन्यापूर्वी श्रीमंगेश देवस्थानावर (प्रियोळ) व श्रीमल्लिकार्जुन (काणकोण) या देवस्थानावर असे दरोडे पडले होते. त्या दरोड्यांत पुष्कळ नुकसानी झाली होती.

देवस्थानचे महाजन

या देवस्थानचे मूळ प्रारंभीचे महाजन. कुळावी फक्त कौशिक गोत्री गौड सारस्वत ब्राम्हण. त्यांची नावे : १) म्हाले (शिरोडकर), २) हरपती (पिसुर्लेकर), ३) वैद्य (हवालदार स्थळेकर कोपीकर), ४) सुखठाणकर (घांटकर, सुर्लकर, (सांखळी) कुवेलकर, कारापूरकर, कांसारकोडकर, निलकुंदकर), ५) भांडारी (भांडारकर, चिन्नरकर), ६) धोंदे, ७) रामाणी (रामायणी, देसाई), ८) श्रीधरपई (पुनरेकर), ९) रेगे (मंत्री, बक्षी, नाडकर्णी, कुलकर्णी, असोळडेकर, कुडचडकर, कोठंबकर, तळवडकर, मळकर्णेकर, शिरवईकर, शेळ्ढेकर, होडारकर, बाळ्ळीकर, सांवर्डेकर, साळावलीकर, सुर्लकर (सांगे) सांकोर्डेकर, खोलकर, झणकर), १०) शिंसाणी (कुंडईकर), ११) गायतोंडे (कुळकर्णी, हेदे, उसकईकर, कसबेकर, दाभोळकर, बरडे), १२) साखरदांडे (कुळकर्णी, नारिंगकर) अशी बारा वागंडाची मूळ कुटुंबे.

या शिवाय, वत्स गोत्री वर्दे (वालावलीकर, बोरकर, भरणे, जाखी, सबनीस, आचमनी, खासनीस, बळ्ळवल्लीकर) आणि भारद्वाज गोत्राचे पाणंदीकर (पई पाळंदीकर, गंगोळीकर, कल्याणकर हे महाजन आहेत. पण, या वत्स आणि भारद्वाज गोत्रांच्या महाजनांचा समावेश वर उल्लेखिलेल्या बारा वांगडात होत नाही. या खेरीज, कानविंदे, सवनी किंवा सोहनी, मुंग्रे, वर्टी, डांगी, दणाईत, नाईक दणाईत, पाडगांवकर नाईक, पेडवे, कर्णिक, टेंभे, पंडित, पंडित-खांडळकर, चुंबडे, कोठारी, गावगोडकर, कलणकर, घांटे, दस्तीकर, बाडी, तुडती, हेरेकर, चिंचखडकर, सांगडकर, हेमाडी, शिरूर अशीही महाजनांची उपनामे आढळतात. परंतु, ही कोणकोणत्या वांगडाची हे कळत नाही.

वार्षिक उत्सव, जत्रोत्सव आणि महापर्वणी उत्सव

या देवस्थानांत वर्षाचे बाराही महिने नानाविध उत्सव साजरे होत असतात. त्यांत काही संस्थानकडून, काही श्रध्दाळू महाजनांनी किंवा इतर भाविकांनी भांडारांत ठेविलेल्या रकमेच्या व्याजातून व काही खाजगी रितीने होतात. स्थलाभावामुळे त्या सर्वांची यादी येथे देणे अशक्य म्हणून अवघेच महत्वाचे तेवढे उत्सव खाली दिलेले आहेत.

चैत्र :– शुक्ल प्रतिपदा रोजी कवळे गौडपादाचार्य मठ संस्थानकडून वसंतोत्सव श्रीरामनवमी, वसंतपूजा.

वैशाख :– अक्षयतृतीया लालखी उत्सव.

ज्येष्ठ :– श्रीलक्ष्मीनारायण प्रतिष्ठोत्सव.

श्रावण :– नागपंचमी शिबिकोत्सव.

भाद्रपद :– मुक्ताभरणी व्रतोत्सव, अनंत व्रतोत्सव.

आश्विन :– नवरात्रोत्सव, दसरा, कोजागिरी लालखी उत्सव, दीपावली उत्सव लालखी.

कार्तिक :– तुलसी विवाह व कालाउत्सव (शुक्ल द्वादशी), आंवळी भोजन, (वद्य २ या), नोकरोठणोत्सव (वद्य ५).

मार्गशीर्ष :– पालखी व लालखी उत्सव (शुक्ल ५ मी) आंवळी भोजन (वद्य ५ मी).

माघ :– जत्रोत्सव, खांद्यावरील रथ, लालखी उत्सव, नौकारोहणोत्सव, सार्वजनिक महारुद्र, नित्यपूजा, पालखी उत्सव (वद्य २ या ते ५ मी) महाशिवरात्री रथोत्सव.

फाल्गुन :– श्रीपट्ट (प्रसादपटा) प्रतिष्ठोत्सव (शुक्ल ७ मी), प्रतिष्ठोत्सव (शुक्ल १० मी)), लालखी उत्सव, पौर्णिमा शिमगोत्सव.

जत्रोत्सव

जत्रोत्सव माघ शुक्ल प्रतिपदा रोजी सुरू होऊन शुक्ल षष्ठीस सांगता होते. या प्रसंगी फार मोठी यात्रा जमते. या उत्सवास केळोशीकरांच्या दर कुटुंबातून निदान एक तरी माणूस हजर असतोच.

श्रीमंगेश देवस्थानचे व इतर देवालयांचे महाजनही हजर असतात. माघ शुध्द पंचमीचा महापर्वणी दिवस होय. केळोशीकरांच्या कुटुंबात श्रीदेवी प्रित्यर्थ चार सण पाळावयाचे असतात. श्रावण, आश्विन, मार्गशीर्ष आणि माघ या चार महिन्यांतील शुक्ल पंचमीचा दिवस. माघ शुक्ल षष्ठी रोजी पहाटेस महारथांतून श्रीशांतादुर्गेची जंगी मिरवणूक निघते. व हा महापर्वणीचा महत्वाचा उत्सव पूर्ण होतो. ही मिरवणूक निघण्यापूर्वी रथांत आरूढ झालेल्या श्रीदेवीची पूजा करून रथावर देवस्थानचा नारळ फोडून झाला, म्हणजे पहिल्याने नारळ फोडण्याचा मान श्रीगौडपादाचार्य संस्थान कैवल्यपूर मठाधीशांचा आहे. मठाधीशांचे गैरहजेरीत त्या मठस्थ ब्राम्हणाकडून अथवा त्या मठाच्या कमाविसदाराकडून नारळ फोडण्यात येतो. त्यानंतर रथावर नारळ फोडण्याचा मान बुर्यो उपवनाच्या वैष्णव सारस्वत ब्राम्हणाचा, याचे कारण, या नावाच्या एका कुशल वैष्णव गृहस्थाने पूर्वी कधी तरी त्या देवालयातील सुतारकामाची एक मोठी तेढ दुरुस्त केल्यामुळे त्या कालापासून त्याच्या वंशजास हा मान देण्यात येतो असे सांगतात. त्या नंतर अगोदर कुशस्थलीकर श्रीमंगेशदेवाचे कुळावी व त्याच्या नंतर इतर उपस्थितांनी त्या रथावर नारळ फोडण्याची वहिवाट परंपरेने चालत आली आहे, या देवस्थानांत दर महिन्याच्या शुक्ल आणि वद्य या दोनही पक्षातील पंचमी हा दिवस नित्युत्सवाचा आहे. या दिवशी रात्री पुराण कीर्तनादी कार्यक्रम झाल्यावर श्रीदेवीची पालखीतून मिरवणूक निघत असते. विशेष सोईकरता निर्णय सागराच्या पंचागांत वीस घटी पर्यंत मिळेल. तीच तिथी उत्सवास धरण्याची येथें पूर्वपार वहिवाट आहे. तसेच कोणीही महाजन त्या देवस्थानांत पंचमी रोजी आला असता,त्या दिवशीचा उत्सव पूर्ण केल्याशिवाय त्या देव स्थानातून बाहेर जातां येणार नाही असा निर्बंधआहे. निरुपायाची अडचण असलीच तर श्रीदेवी कडे नारळ ठेवून निरुपायाबद्दल विनंती प्रार्थनाकरून मग जावें लागतें.

अवर्णनीय आणि नेत्रदीपक सर्वांगीण प्रगती.

या देवस्थानच्या कुळावी महाजनांनी या सोळा वर्षांच्या कालांत श्रीशांतादुर्गा देवालयात आणि त्याच्या परिसरांत जी धार्मिक आणि विकासाच्या दृष्टीनें अत्यंत श्रेष्ठ दर्जाची अशी कार्यें केली आहेत, त्यांची तुलना करणे फार कठीण आहे. व त्या सर्वांची ओळख येथे करणे शक्य नसून त्यासाठी एक स्वतंत्र ग्रंथ लिहावा लागेल.

नमुन्यादाखल उल्लेख करावयाचा झाला तर या देवस्थानात दि. १३ ते २१ जानेवारी १९६२ असा नऊ दिवस सहस्त्रचंडी यज्ञ महोत्सव धूमधडाक्यात साजरा झाला.

त्यानंतर इ. स. १९६५ मध्ये अद्यावत सर्व सोयीनी युक्त अशी अग्रशाळा, महाद्वार, नगारखाना संपूर्णपणे नवीन पध्दतीने बांधून पूर्ण केली. दि. २८ नोव्हेंबर १९७५ रोजी मंत्रांच्या जयघोषात नव्या श्रीमंगेशलिंगाची मोठ्या समारंभपूर्वक श्रीशांतादुर्गा देवी सान्निध प्रतिष्ठापना करण्यांत आली.

इ. स. १९६६ मध्ये श्रीशांतादुर्गा चतुःशताब्दि महोत्सव न भूतो न भविष्यती अशा थाटाने साजरा झाला. त्यानंतरच्या कालांत सुवर्णशिबिका अत्त्युत्तम प्रकारे बनवून त्याबद्दलचा महोत्सव अवर्णनीय रित्या माघ शुक्ल ५ मी शके १८९७ दि. ५-२-१९७६ गुरुवार रोजी घडवून आणला.

अशी सुंदर आणि भव्य सुवर्ण शिबिका गोमंतकांत अद्याप तरी दुसरीकडे नाही.

मुख्य मंदिराच्या मागेही नवीन अग्रशाळा सर्व सोयींनी युक्त अशी बांधून पूर्ण झाली, आणि फाल्गुन शुक्ल १ दा. ते १० मी शके १८९८ अनलनाम संवत्सरी दि. १९ ते २८ फेब्रुवारी १९७७ या दिवशी, श्रीशांतादुर्गा देवीच्या अभिषेक मूर्तीच्या प्रतिष्ठापनाच्या अमृतमहोत्सवानिमित्त तसेच कलाभिवृध्यर्थ 'अयुतचंडी महायाग' नेत्रदीपक महोत्सवात साजरा झाला.

हे सर्व पाहिल्यानंतर श्रीदेवी शांतादुर्गेचा महिमा वर्णन करणे आम्हां पामरांच्या शक्ती बाहेरचें आहे म्हणून या देवीला अनन्य भावें शरण जाऊन दीर्घ दंडवत नमस्कार करून म्हणावेसें वाटतें :

आदिशक्तिर्महामाया सच्चिदानंदरूपिणी ।
पालनार्थ स्वभक्तानां श्रीशांतादुर्गाभिधामता ॥

गोमंतक
N
सातर्ड्याकडे
सावंतवाडीकडे
धारगळ
हरमळ
म्हापसा
वागातोर
अंजुना
बागा
कळंगुटे
अडवलपाल
मुळगांव
सांखळी
माशेल
खांडोळे
बेतकी
कासरपाल
केरी
पणजी
दोना-पावल
हडकोळण
मंगेशी
म्हाडदोळ
फोंडा
वेलिंग
मुरगांव
वास्को-द-गामा
(संभाजीनगर)
दाबोळी
बांदिवडे
रामनाथी
कवळे
शिरोडे
बोगमालो
कांसौली
माजोर्डा
कोळवा
मडगांव
चांदोर
कुंकळ्ळी
सावर्डे
कुडचडे
काले
कुळे
सोनावली
दूधसागर
कारांझोल
दूधसागर धबधबा
बेळगांवकडे
कॅसलरॉककडे
पारोडा
बेतुल
पाळोळे
लोलये
श्रीपर्तगाळ मठ
माशे
कारवारकडे
राज्य सीमा
नद्या
प्रमुख रस्ते
रेल्वे
रेल्वे स्टेशन
विमानतळ
शहर/गांव
मंदिर (पुस्तकांत उल्लेखिलेले)
समुद्रकिनारा